# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर



लेखक - श्री. चां. भ. खैरमोडे.



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

# चरित्र ग्रंथ

खंड ६ व ७

लेखक–

चां. भ. खैरमोडे

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

किंमत ३० रु.

प्रथमावृत्ती एप्रिल १९८५

प्रकाशक :

**सू. व्दा. देशमुख सचिव**
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०००३२

(C) प्रकाशकाधीन

मुद्रक :
**श्री. प. म. महाबळ**
६५६, प्रॉम्प्ट सर्व्हिस,
सांगली-४१६ ४१६.

1
B

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने आजवर अनेक ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यात चरित्रे, आत्मचरित्रे यांचाही समावेश आहे. तसेच अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तींच्या वाङमयाचाही समावेश आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कै. चां. भ. खैरमोडे यांनी १५ खंडात लिहिलेले चरित्र मंडळाने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला आहे. मंडळाने या १५ खंडापैकी पाच खंडाना अनुदान दिले असून खंड–८ मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे. खंड–६ व ७ चे हस्तलिखित खंड ८ च्या नंतर मंडळाकडे आल्यामुळे खंड ८ नंतर आता खंड–६ व ७ प्रकाशित होत आहे.

या पुस्तकाचे लेखन कै. खैरमोडे यांनी १९७१ मध्येच केले आहे. त्यावेळी प्रस्तावनेत त्यांनी "खंड–६ चे प्रकाशन झालेले पाहण्याचे भाग्य मला मिळत आहे" असे म्हटले होते. त्यामुळे कदाचित वाचकांचा गैरसमज होण्याची शक्यता आहे. हे पुस्तक मंडळाकडे मुद्रणासाठी आले तेव्हा दुर्दैवाने खैरमोडे यांचे निधन झाले होते. त्यांच्या लेखनात बदल करणे योग्य होणार नसल्यामुळे त्यांचे प्रास्तविक तसेच ठेवले आहे.

वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

४२, यशोधन,
मुंबई–४०००२०.
दिनांक – १ एप्रिल, १९८५.

सुरेन्द्र बारलिंगे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

# प्रस्तावना

डॉ· बाबासाहेब आंबेडकरांचा, श्री. चां. भ. खैरमोडे लिखित हा सहावा व सातवा खंड एकत्र निघत आहे. अनेक प्राणघातक आपत्तीतून हा सहावा खंड सहीसलामत बाहेर पडून आज त्याला प्रकाशनाचा मार्ग लाभत आहे.. हा गहाळ झालेला खंड मिळविण्याच्या कामी प्रा. नलिनी पंडित यांनी परिश्रमपूर्वक फार सहाय्य केले आहे. त्यांच्या सहाय्यामुळेंच या पुढील खंडांच्या प्रकाशनाबाबतचा हताशपणा जाऊन सर्व खंड प्रकाशित करण्याची उमेद आलेली आहे.

डॉ. बाबासाहेबांची साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेणारी 'धर्मांतराची घोषणा' या विषयाला हे दोन्ही खंड वाहिलेले आहेत. जिज्ञासूना थक्क करुन सोडणारी माहिती या खंडांतून खच्चून भरलेली आहे. धर्मांतराचा विचार करताना डॉ. बाबासाहेबांनी देशाभिमानाला व शास्त्रीय दृष्टीकोनाला कुठेच तडा जाऊ दिलेला नाही, हे सनातनी हिंदुधर्माभिमान्यांनाही मान्य करावे लागेल.

हे सारे वाचकांपुढे मांडताना श्री. खैरमोडे यांनी कुठेच कसूर किंवा आळस केलेला नाही. डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना गुलामगिरीतून वर काढण्यासाठी केलेली राजकीय व सामाजिक चळवळ मुद्यापुराव्यानिशी जगापुढे मांडण्याचे काम तन, मन, धन, खर्च करुन श्री. खैरमोडे यांनी केले, मात्र ते सारे प्रकाशात येण्यापूर्वीच ते कालवश झाले. प्राणपणाला लावून त्यांनी केलेले हे उर्वरीत काम 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने' प्रकाशित करण्याचे योजल्यामुळे व्यक्तिशः माझे ओझे कमी झाले आहे.

मी श्रीमती द्वारका खैरमोडे (पूर्वाश्रमीची द्वारका गायकवाड) हुजूरपागेची माजी विद्यार्थीनी, यंदा त्या विद्यालयाचा शताब्दीमहोत्सव चालू आहे. त्या शाळेच्या वसतीगृहातील वास्तव्याने मला जगात स्वाभिमानाने काही भरीव कार्य करण्याची हिम्मत आलेली आहे. श्री. खैरमोडे यांचे उर्वरीत काम प्रकाशात आणणे हे त्याचेच प्रतीक आहे. या त्या विद्यालयाच्या शताब्दी प्रसंगी मी माझी कृतज्ञता व्यक्त करते.

मंडळातर्फे हे छपाईचे काम सांगलीला श्री. महाबळ यांच्याकडे दिले. तेथे प्रुफे तपासणे वगैरे जिकीरीची कामे आमची मैत्रिण प्रा. मालती किर्लोस्कर व यांचे सहायी प्रा. देशपांडे यांनी केले म्हणून हे खंड लवकर प्रसिद्ध करता आले.

पहिल्या खंडाच्या प्रती गहाळ झाल्यामुळे-मुद्रण प्रती अनेक वेळा कराव्या लागल्या त्या कामी कु. प्रतिभा तथा रमा आंबेडकर, डॉ. प्रज्ञा सावंत M. B. B. S. श्रीमती हेमा भंडारे यांनी आपापल्या व्यवसायातून वेळ काढून लिहण्याचे काम केले याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

सर्वश्री डॉ. सुरेंद्र बारलिंगे, शा. शं. रेगे, डॉ. पी टी. बोराळे, वि. गो. खोबरेकर, नि. धु. भंडारे, टी, एच म्हात्रे, ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले. साहित्य संस्कृती मंडळचे सचीव श्री. सू. द्वा, देशमुख व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी वर्ग यांच्या सहकार्यामुळेच केवळ हे खंड लवकर प्रसिद्ध होत आहेत. या सर्वांचे मी आभार मानते.

'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने हे काम अंगीकारल्यामुळें माझी चिंता दूर झाली आहे. म्हणून मंडळाची मी व्यक्तिशः ऋणी आहेच शिवाय डॉ. बाबासाहेबांचा समग्र वाचकवर्गही आभारी राहील.

द्वारका खैरमोडे.

४३-अ, हिंदु कॉलनी
दादर, मुंबई ४०००१४,
ता, ४-९-८४,

# अनुक्रमणिका

## खंड ६ वा


| | |
|---|---|
| प्रास्ताविक | १ ते ६८ |
| प्रकरण १ ले | ६९ ते ८७ |
| प्रकरण २ रे | ८८ ते ९६ |
| प्रकरण ३ रे | ९७ ते १०८ |
| प्रकरण ४ थे | १०९ ते १४६ |
| प्रकरण ५ वे | १४७ ते १६२ |
| प्रकरण ६ वे | १६३ ते १७६ |
| प्रकरण ७ वे | १७७ ते १८२ |
| प्रकरण ८ वे | १८३ ते २०० |
| प्रकरण ९ वे | २०१ ते २२२ |
| प्रकरण १० वे | २२३ ते २४४ |
| प्रकरण ११ वे | २४५ ते २६२ |
| प्रकरण १२ वे | २६३ ते २८० |
| प्रकरण १३ वे | २८१ ते २९० |
| प्रकरण १४ वे | २९१ ते ३१० |
| परिशिष्ट | |
| Caste And Conversion | ३११ ते ३१६ |


## खंड ७ वा


| | |
|---|---|
| प्रकरण १ ले | १ ते ३० |
| प्रकरण २ रे | ३१ ते ७२ |
| प्रकरण ३ रे | ७३ ते ९६ |
| प्रकरण ४ थे | ९७ ते ११८ |
| प्रकरण ५ वे | ११९ ते १३६ |
| आधारभूत वाङमय | ३१७ ते ३२० |
| | I – III |



सौ. रमाबाई तथा आईसाहेब आंबेडकर

# अर्पण पत्रिका

बहुजन समाजाच्या, मानसिक धार्मिक व सामाजिक गुलामगिरीची शृंखला तोडून त्या समाजाला माणुसकीचे व स्वाभिमानाचे जीवन जगता यावे म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांना न जुमानता पददलितांच्या उद्धारा करिता रात्रंदिवस तळमळीने कार्य करणाऱ्या श्रीमान छत्रपती शाहू महाराज, कोल्हापूर यांना, सहावा व सातवा खंड नम्रता पूर्वक अर्पण.

लेखक

# प्रास्ताविक

१ डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचा सहावा खंड प्रकाशित होत असलेला पहाण्याचे भाग्य मला मिळाले याबद्दल आनंद होत आहे. हा चरित्रखंड ( व पुढील ७ ते १५ खंड ) प्रकाशित झालेले मला पहावयास मिळणार नाहीत, अशी माझी समजूत, मी ' तळवलकर नर्सिंग होम, ' हिंदू कॉलनी, मुंबई, ४०० ०१४ येथे १९ ते २७ ऑगस्ट १९६८ या काळात असताना झालेली होती. या अवधीत दोन बाटल्या रक्त देऊन डॉ. नीळकंठ गजानन तळवलकर, M. D [ Bom. ] M. R C. P [ London ] Physician यांनी मला पुनर्जीवन दिले. श्री. विश्वास केशव मोघे ( वास्तु-शिल्पकार ) आणि डॉ. विनायक शंकर तळवलकर, M. B B S.. D O [ Bom. ] D. O. ( Oxon ) यांनी माझ्यासाठी ब्लड बँकेमध्ये ( जे. जे. हॉस्पिटल ) रक्तदान केले. डॉ, नी. ग. तळवलकर यांनी मला सहा महिने औषधोपचार केला. या तिघांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

२ डॉ० आंबेडकर जुलै १९१३ ते मे १९१६ या काळात कोलंबिया ( न्यू यार्क, अमेरिका ) विद्यापीठात विद्यार्थी असताना त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास तत्त्वज्ञान, धर्म, राजकारण इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास केला. आणि अवघ्या तीन वर्षांत त्यांनी एम्. ए. व पीएच्. डी या पदव्या मिळविल्या. ( चरित्र खंड १, द्वितीय आवृत्ती, पान ८०–९१ पहा ) ते जून १९१६ ते जून १९१७ आणि जून १९२० ते मार्च १९२३ या काळात लंडन

येथे असताना अर्थशास्त्र, कायदा वगैरे विषयांचा अभ्यास करून त्यांनी डी. एस्सी. व बार–ॲट–लॉ या पदव्या संपादन केल्या. या सात वर्षांत आणि १९२३ ते १९३५ च्या काळात त्यांनी जी विद्यार्जनाची अनुपमेय दीर्घ तपश्चर्या केली त्यामुळे त्यांना हिंदुधर्म, हिंदुसमाज, हिंदुसमाजाची मनोवृत्ती अस्पृश्य समाज, अस्पृश्य समाजाची मनोवृत्ती इत्यादि विषयांकडे पहाण्याची दिव्य दृष्टी प्राप्त झाली. त्यांनी तिचा उपयोग हिंदु समाज व अस्पृश्य समाज यांना जागे करण्यासाठी चळवळ करण्यात केला. ही चळवळ त्यांनी १९३५ पर्यंत कशी केली, याचा साद्यंत व साधार इतिहास मी मागील पाच खंडांत सुमारे दोन हजार पानांत लिहिलेला आहे. या चळवळीमुळे अस्पृश्य समाजात प्रचंड जागृती झाली. पण हिंदुसमाजातून या चळवळीला विरोध झाला. हिंदूंनी अस्पृश्यांना जवळ करावे व हिंदुसमाजाची शक्ती वृद्धिगत करावी म्हणजे अस्पृश्य समाजाला हिंदुसमाजात स्वाभिमानाने व आत्मीयतेने राहता येईल, अशी डॉ. आंबेडकरांची अपेक्षा होती. हिंदूंच्या विरोधी भूमिकेमुळे ती अपेक्षा भंग पावली. आंबेडकरांनी हिंदूंचा गेल्या पाच सहा हजार वर्षांचा इतिहास आपल्या दिव्य बौद्धिक दृष्टीने पाहिला आणि अस्पृश्यांच्या भवितव्याचा मागील व पुढील हजारो वर्षांचा इतिहास हाही पाहिला. आणि त्यांनी १९३४–३५ च्या काळात मनात ठरविले की वेदादी धार्मिक ग्रंथांतील शिकवणुकीमुळे माणुसकी व बंधुभाव यांना पारखे झालेले हिंदू गेल्या हजारो वर्षांत अस्पृश्यांना पशूपेक्षाही हीन मानत आले व पुढेही तसेच हीन मानत जातील मग. अस्पृश्यांनी हिंदुधर्मात का राहावे ? गेल्या हजारो वर्षांत हिंदूंच्या छळांना कंटाळून जे अस्पृश्य मुसलमान व ख्रिस्ती धर्मात गेले, त्यांनी आपल्या मुलाबाळांना, नातवंडांना नव्या नव्या धर्मात मानाचे व माणुसकीचे स्थान प्राप्त करून दिले. पण हे अस्पृश्यांचे कार्य एकसंघ झाले नाही. असे एकसंघ कार्य आपण करावे व अस्पृश्य समाजाला नवीन धर्मात न्यावे, असे विचार आंबेडकरांच्या मनात १९३४–३५ च्या काळात घोळू लागले. ते विचार त्यांनी सप्टेंबर १९३५ मध्ये नक्की केले आणि येवले, ( ता. येवले, जि. नासिक ) येथे रविवार दिनांक १३ ऑक्टोबर १९३५ रोजी रात्री भरलेल्या अस्पृश्यांच्या सभेत त्यांनी **अस्पृश्यांच्या धर्मांतराची घोषणा जा**हीर केली. या संबंधी स्पृश्य व अस्पृश्य समाज व इतर अहिंदू समाज यांच्यात ज्या क्रिया, प्रक्रिया व प्रतिक्रिया उत्पन्न झाल्या त्यांचा सविस्तर व साधार इतिहास मी या साहाव्या खंडात देत आहे. हे आधार जमा करण्यासाठी आणि धर्मांतराच्या प्रश्नांचा अस्तिपक्षी व नास्तिपक्षी इतिहास नमूद करण्यासाठी मी जिवापाड मेहनत केलेली आहे; हे वाचकांना ( हा खंड ) वाचताना दिसून येईल.

३ अस्पृश्यांना समानतेचे हक्क द्यावयाचे नाहीत आणि त्यांच्या धर्मांतराला विरोध करावयाचा, ही हिंदूंची समाजघातक मनोवृत्ती किती हीन दर्जाची होती, याची साधार माहिती मी ( या खंडात ) सविस्तर दिलेली आहे. हेतू हा की, आंबेडकरांनी समता प्रस्थापनेसाठी जी चळवळ १९२४ ते १९३५ पर्यंत केली तो आपल्याही हिताची आहे, कारण त्यामुळे आपली सामाजिक व मानसिक गुलामगिरी नष्ट होते असे, ब्राह्मण, मराठे व तत्सम जाती यांना वाटले नाही, हे वाचकांनी समजून घ्यावे. आंबेडकरांच्या समानतेच्या चळवळीत हे लोक भाग घेत नव्हते. कारण ते वेदादी शास्त्रांतील शिकवण व रूढी यांचे परंपरागत गुलाम होते. अस्पृश्य समाजातील महारेतर जाती ( चांभार, ढोर, मांग, भंगी ) यांनीही आंबेडकरांच्या समता प्रस्थापनेच्या चळवळीत बहुसंख्येने भाग घेतला नाही. आणि धर्मांतराच्या चळवळीतही बहुसंख्येने भाग घेतला नाही. कारण तेही हिंदुधर्माची शास्त्रे, पुराणे, रूढी आणि आचार – विचार यांचे पक्के गुलाम होऊन राहिलेले होते. आंबेडकरांच्या समता चळवळीत भाग घेणे म्हणजे धर्मशास्त्रे व रूढी-आचार यांच्या विरुध्द वर्तन करून पापसंचय करणे होय, अशी या जातींची धारणा होऊन बसली होती. हिंदूच्या आणि विशेषत: अस्पृश्यांच्या दु:खाचे उगमस्थान म्हणजे ऋग्वेदातील पुरुषसूक्त. वैदिक काळात ( सुमारे इ. स. पू. ५ ते ६ हजार वर्षे ) वैदिक समाजात निरनिराळ्या व्यवसायांची वाढ होत गेल्यानंतर त्या व्यवसायांना अनुवंशिक परंपरने चिकटून रहाणाऱ्यांचे स्वतंत्र चार गट निर्माण झाले. ते परस्परांशी अत्यंत आपलेपणाने सहकाय करीत असत. या चार गटांचे हे लोभस ऐक्य पाहून नारायण ऋषीला काव्य करण्याची स्फूर्ती उत्पन्न झाली. व त्याने १६ ऋचांचे ( मंत्रांचे ) पुरुषसूक्त रचले. त्यातील १२ वी ऋचा अशी:

" ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्य : कृत : ।
ऊरू तदस्ययद् वैश्य : पद्भ्यां शूद्रो अजायत ।।

अर्थ :– " या पुरुषाचे मुख ब्राह्मण ( ज्ञानी ) झाला आहे. त्याचे बाहू क्षत्रिय ( शूर पुरुष ) झाले आहेत. त्याचा मध्यभाग ( मांड्या ) वैश्य (व्यापारी) होत आणि त्यांच्या पायांच्या स्थानी शूद्र झाले आहेत. या ऋचेतील पुरुष म्हणजे समाज (अगर राष्ट्र ) असा या ऋचेचा अभिप्रेत अर्थ आहे. " ( पुरुषसूक्त :– त्याचा अर्थ, भावार्थ आणि स्पष्टीकरण : लेखक – पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर पा. १० ( १९६१ ) )

४ मानवी शरीरातील तोंड, बाहु, मांड्या ( पोट ) आणि पाय ही परस्परांशी सहकार्य करतात. त्यामुळे शरीराचे सर्व व्यवहार सुरळीत चालतात. त्याप्रमाणे ज्ञानी, शूर, व्यापारी आणि शूद्र ( शेतकरी कामगार व नोकर चाकर, हे परस्परांशी सहकार्य करतात म्हणून समाजाचे ( राष्ट्राचे ) व्यवहार सुरळीत चालतात. असे या ऋचेत नारायण ऋषीने सुचविले आहे. ही ऋचा रूपकात्मक व काव्यात्मक आहे, हे उघड आहे. ऋग्वेदातील मंडल एक व दहा ही मंडले एकत्र केल्यानंतर रचली गेली व ती ऋग्वेद संहितेत बऱ्याच काळाने प्रविष्ट केली गेली. असे वैदिक वाङ्मयाचे तज्ज्ञ मानतात. वैदिक समाज, वन्य, शेतकीप्रधान, औद्योगिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरातून जाऊन शेवटी त्याला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर पुरुषसूक्त रचले गेले, हे उघड होते. तेव्हा पं. सातवळेकरांनी या १२ व्या ऋचेचा जो अर्थ दिलेला आहे तो वस्तुस्थितीला धरून आहे,हे स्पष्ट होते.

५ बाराव्या ऋचेत " अस्य " हा षष्टीचा प्रत्यय आहे. याचा अर्थ ' याचा – ची – चे ' असा होतो. ' यापासून ' किंवा ' यातून ' असा होत नाही. या पुरुषाचे ( समाजाचे – राष्ट्राचे ) तोंड ब्राह्मण, बाहू क्षत्रिय व पोट वैश्य असाच मूळचा अर्थ आहे. त्याचप्रमाणे ' पद्भ्यां ' याचा अर्थ ' पायातून ' असा होत नाही. त्याचा अर्थ " पायाच्याठि काणी" असा होतो या संबंधात पं. सातवळेकर लिहितात " येथे ' पद्भ्यां शूद्रो अजायत ' या वाक्याचा अर्थ ' त्याच्या पायापासून शूद्र झाला ' असे कित्येकजण मानतात व तसा करतातसुध्दा. ' पद्भ्यां ' हे रूप तृतीया, चतुर्थी आणि पंचमी मध्ये सारखेच आहे. पंचमी विभक्ती मानली तर त्याच्या पायापासून असा अर्थ होईल. पण चतुर्थी मानली तर त्याच्या पायासाठी असा अर्थ होईल. आम्ही चतुर्थी विभक्ती मानून असा अर्थ केला आहे की, ' या मानव समाजरूपी पुरुषाच्या पायाच्या स्थानी कर्मचारी मानले गेले आहेत. ' ' पायाच्या स्थानी शूद्र आहेत. " ( पुरुषसूक्त पा. १० ) महामहोपाध्याय सिध्देश्वर चित्राव शास्त्री यांनी ' पद्भ्यां शूद्रो अजायत ' या वाक्याचा अर्थ ' शूद्र लोक त्याच्या ( विराट पुरुषाच्या ) पायापासून उत्पन्न झाले असा लावला आहे. ( ऋग्वेदाचे मराठी भाषांतर पान ६८५ ) वेदाचार्य पं. सातवळेकर यांचा अर्थ ऐतिहासिक घटनेला धरून असल्यामुळे तोच बरोबर आहे, असे स्पष्ट होते. या विचारसरणीला पाठिंबा देणारा श्री. ना. गो. चाफेकर यांचा लेख " पुरुषसूक्ताची मीमांसा " या शीर्षकाखाली ' नवभारत ' मासिकाच्या नोव्हेंबर १९६ च्या अंकात ( पान २०–२५ ) प्रसिध्द झाला होता. पुरुष या शब्दाचे निरनिराळे अर्थ, पुरुष सूक्तातील ऋचांचे निरनिराळ्या विद्वानांनी निरनिराळे केलेले अर्थ, ' ब्राह्मण

या शब्दाचे त्यांनी केलेले वेगवेगळे अर्थ, पुरुषसूक्ताच्या निरनिराळ्या ऋचांची संख्या निरनिराळ्या वेदांत व इतर धार्मिक ग्रंथांत निरनिराळी आहे, इत्यादी मुद्यांचे विवरण श्री. चाफेकर यांनी केलेले आहे. पहिल्या ५ ऋचात, पुरुष, विराट पुरुष व आदिपुरुष यांचे जन्म कसे झाले, याबद्दलचे वर्णन आहे. ज्या वेदात परमेश्वराच्या उत्पत्तीचे वर्णन आहे, तो वेद परमेश्वराने निर्माण केला, असे म्हणणाऱ्यांचा हा परस्पर मुखभंग करणारा मजकूर आहे. श्री. चाफेकर यांच्या लेखाचा सारांश असा आहे की, ब्रह्मदेवाच्या मुखातून भुजांतून, मांड्यांतून व पायांतून चार वर्ण जन्मले, हे हिंदुधर्मातील एक अजब थोतांड आहे.

६ वैदिक समाजात ज्ञानी लोकांचे ( ब्राह्मणांचे ) वर्चस्व ऋग्वेदानंतरच्या काही काळाने प्रस्थापित झाले. तेव्हा त्यांनी आपले श्रेष्ठत्व आणि इतरांचे ( क्षत्रिय वैश्य व शूद्र ) कनिष्ठत्व टिकविण्यासाठी या १२ व्या ऋचेचा अर्थ असा केला की, ब्राह्मण हे ब्रह्मदेवाच्या मुखातून, क्षत्रिय बाहुंतून, वैश्य मांडयांतून आणि शूद्र पायांतून निर्माण झाले. हा अर्थ समाजात रूढ करून त्याला उचलून धरणारे लोक इतर धार्मिक ग्रंथांत ब्राम्हणांनी घातले. रामायण, महाभारत, स्मृती इत्यादी ग्रंथांत आणि भारतातील सर्व भाषांतील हिंदुधर्मग्रंथांतून हे पहावयास मिळते. मराठी भाषेत जे धार्मिक ग्रंथ, पुराणे वगैरे निर्माण झाले त्यांतही हेच पहावयास मिळते. बाराव्या ऋचेचा हा समाजभेदक व विध्वंसक अर्थ रूढ झाल्यानंतर हिंदुसमाजात विषमतेचे जालीम वीष जे भिनले ते कायमचेच. यामुळे मूळच्या चार वर्णांतून हिंदुसमाजात कालांतराने ज्या जाती निर्माण झाल्या; त्यांची संख्या सुमारे ३००० आहे. ( Caste in India P. 3 by G H. Hutton) "आम्ही ब्रह्मदेवाच्या मुखातून जन्मलो म्हणून आम्ही सर्वांपेक्षा श्रेष्ठ" असे जे ब्राह्मण म्हणत असत त्यांना सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते 'ब्रह्मवांत्युत्पन्न' ( ब्रह्मदेवाच्या वांतीतून उत्पन्न झालेले ) अशी शिवी १९२० ते १९३० च्या काळात आपल्या भाषणातून व लिखाणातून हासडीत असत.

७ (अ) बाराव्या ऋचेचा जो समाजविघातक अर्थ रूढ करण्यात आला त्याला भक्कम पाठिंबा देण्यासाठी श्रीभगवद्गीतेत – 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । तस्य कर्तारमपिमां विध्दयकर्तारमव्ययम् ॥' ( ४–१३ ) हा श्लोक श्रीकृष्णाच्या तोंडी घातला असावा असे वाटते. महाभारतात असलेली मूळची गीता अगदी लहान ( काहींच्या मते ३३ श्लोकांची ) असावी.

७ (ब) पुरुषसूक्तातील १२ व्या ऋचेत असे दिसत नाही, की चार वर्ण देवाने

उत्पन्न केले त्या उत्पत्तीचे श्रेय श्रीकृष्णाने स्वत:कडे घेतलेले आहे, असे श्रीगीतेतून दिसते. गीतेतील 'चार्तुवर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागश: । तस्य कर्तारपि मां विद्धयकर्तारमव्ययम् । (४–१३) या श्लोकाच्या अगोदरचे दोन तीन श्लोक पाहिले तर त्याच श्लोकांचा व या श्लोकाचा तर्काला अनुरूप असा काही संबंध दिसून येत नाही. हिंदू समाजाची व्यवसायावरून रूढ झालेली समाजरचना हिला धार्मिक स्वरूप देण्यासाठी व पुरुषसूक्तातील ब्राह्मणी विचारसरणीला आधार म्हणूनच हा श्लोक (४-१३) श्री भगवद्गीतेत एकाद्या ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मवृंदाने घुसडून दिलेला असावा. आपली कर्मे चारी वर्णांनी करावीत, त्यातच त्यांना मोक्ष मिळतो, ही विचारसरणी मांडण्यामागेही त्या त्या वर्णांना, विशेषत: शूद्र वर्णाला, तो आहे त्या स्थितीत डांबून ठेवणे, हा या ब्रह्मवृंदाचा हेतू होता हे उघड आहे. गेल्या दोन हजार वर्षांच्या काळात, ह्या चार वर्णांनी देवाने त्यांना नेमून दिलेली कामे दूर सारून, त्यांना जी योग्य कामे दिसली, ती केली. ब्राह्मणाने व्यापार केला, लढाया केल्या. शूद्राने विद्यार्जन केले, धनोत्पादक कर्मे केली व आपली सांपत्तिक स्थिती उत्तम करून घेतली. या वर्णांनी देवांच्या आज्ञा पायदळी तुडविल्याबद्दल देवाने त्यांना कोणती शिक्षा दिली ? याचा इतिहास ब्राह्मण्यग्रस्त ब्रह्मवृंदांनी जगापुढे मांडलेला नाही. सारांश, हिंदुसमाजात आपले श्रेष्ठत्व टिकविण्यासाठीच हे धार्मिक ग्रंथ व त्यांतील श्लोक ब्राम्हणांनी लिहून ते श्रीकृष्णाच्या बोकांडी मारलेले आहेत. हे चार वर्ण मीच उत्पन्न केले तरी पण हे सर्व लोक एकच आहेत. त्यांचा निर्माता मी आहे. तरीपण ती चार्तुवर्ण्य व्यवस्था गुणकर्मानुरूप सहज झाली. आणि या व्यवस्थेचा मी मुळीच कर्ता नाही. ही परस्परविरोधी विचारसरणी श्रीकृष्णाच्या तोंडी घालून ब्रह्मवृंदांनी मूर्खपणाचा कळस केलेला आहे. कोटीकोटी शूद्रांच्या दु:खांना कारणीभूत झालेली वर्ण व्यवस्था टिकून रहावी, म्हणून सांगणारा श्रीकृष्ण, त्या व्यवस्थेतून निर्माण झालेल्या दु:खाची जबाबदारी टाळतो, हे विश्वामित्री तंत्र ब्रह्मवृंदाने श्रीकृष्णाच्या माथी मारलेले आहे. श्रीकृष्णाचे अनन्वित हाल ब्रह्मवृंदांनी आपल्या स्वार्थासाठी केले, हे उघड आहे. (सार्थ ज्ञानेश्वरी साखरे महाराज पा. ८८–९० १९१० ऑगस्ट आणि सार्थ ज्ञानेश्वरी, शं. वा. दांडेकर पा. १००–१०१, जुलै १९५३) कौरव पांडवांच्या महायुद्धानंतर कालानुसार जे निरनिराळे तात्त्विक सिद्धांत निर्माण झाले, त्यांवर नवे नवे श्लोक रचून ते गीतेत योग्य त्या ठिकाणी घातले गेले; म्हणूनच गीतेतील विचारप्रणाली परस्पर विरोधी असल्याचा दावा काही तज्ज्ञ विद्वान करतात. हा मुद्दा लक्षात घेतला तर मी 'चातुर्वर्ण्यं मय

सृष्टम्,' या वचनाबद्दल जो मुद्दा वर मांडलेला आहे, तो नीटसा वाचकांच्या ध्यानी येईल.

८ पुरुषसूक्तात अगर ऋग्वेदात अन्य ठिकाणी ' वर्ण ' हा शब्द नाही. हा शब्द पुढील काळात रचलेल्या धर्मग्रंथांत आला असावा. याबद्दल श्री. सिद्धेश्वर-शास्त्री चित्राव लिहितात, " चातुर्वर्ण्य निर्देश : १२ व्या ऋचेमध्ये ' ब्राह्मण ' ' राजन्य ' ( क्षत्रिय ) ' वैश्य ' आणि ' शूद्र ' लोकसमूहांचा निर्देश असला तरी त्यास तेथे ' वर्ण ' म्हटलेले नाही. ( तत्सम अन्य निर्देश ' ब्रह्म ' ' क्षत्र ' ' विश ' ८–३५; १६–१८ ) यावरून ऋग्वेदकाली चातुर्वर्ण्यव्यवस्था नसून ती वैदिकोत्तर कालात प्रस्थापित झाली असावी. अथर्ववेदात चातुर्वर्ण्य निर्देश अनेक वेळा आढळतो. ' ( अ. वे. ४–२०–४; ५–१७–९ ) " ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, पान ६८४ ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ' हे वचन गीतेत कौरवपांडवांच्या युध्दानंतरच्या काळात घातले गेले असावे, हे उघड होते. ( कौरव पांडवांचा युध्दकाळ इ. स. ३१८० मार्गशीर्ष, चि. वि. वैद्य इतिहास संशोधन मंडळ, निबंध, इ. स. १९१४, इ. स. पूर्वी ३१७९ वि. का. राजवाडे, असा असावा असे तज्ज्ञांचे मत आहे. )

९ ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं ' या वचनाला पाठिंबा देण्यासाठी गीतेत आणखी श्लोक घातलेले असावेत. त्याचा प्रमुख हेतू हाच की चातुर्वर्ण्य हे परमेश्वराने निर्माण केलेले आहे. ते पवित्र आहे. आणि त्याच्यावर धर्माची उभारणी केलेली आहे. आणि जेव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा धर्माला तारण्यासाठी आणि दुष्टांचे परिपत्य करून साधूचे रक्षण करण्यासाठी ' श्रीकृष्ण अवतार घेतात. ' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ४–७ ॥ परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ४–८ ॥ धर्माला ग्लानी केव्हा येते हे ठरविण्याचे अधिकार ब्राह्मणांचे; साधू कोण व असाधू कोण हेही ठरविण्याचे अधिकार ब्राह्मणांचे. त्याचे मते साधू म्हणजे ब्राह्मण व असाधू म्हणजे त्यांचे वर्चस्व न मानणारे इतर लोक. गाई व ब्राह्मण यांच्या संरक्षणासाठी श्रीकृष्णाने आतापर्यंत युगायुगांत अवतार घेतले याबद्दल पुराणात कथा आहेत. गेल्या हजारो वर्षांत शूद्रादी अःस्पृश्यांचा सवर्ण हिंदूंनी राक्षसी छळ केला. तेव्हा त्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि दुष्ट सवर्ण हिंदूंचे पारिपत्य करण्यासाठी श्रीकृष्णाने का अवतार घेतला नाही ? कारण श्रीकृष्णाच्या मते – म्हणजे ज्या ब्राह्मणांनी त्याच्या तोंडी हे

वचन घातले **त्यांच्या मते – शूद्रादी अस्पृश्य हे साधू नव्हेतच.** त्यांनी सवर्ण हिंदूंची सेवा करता करता मरावे म्हणजे त्यांना मोक्ष मिळतो. जन्मल्यापासून मरेपर्यंत त्यांनी अत्यंत घाणेरडी कामे करावी. हिंदूंचा छळ एक अवाक्षरही तोंडातून न काढता सोसावा व शेवटी भुकेकंगाल अवस्थेत टाचा घाशीत घाशीत मरावे, हे तत्त्वज्ञान त्यांच्या तोंडावर श्रीकृष्णाने फेकलेले असल्यामुळे त्यांच्यासाठी त्याला अवतार घेण्याचे कारण राहात नाही.

चातुर्वर्ण्य टिकविण्याच्या उद्देशाने हे तत्त्वज्ञान श्रीकृष्णाने ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य यांनाही सांगितलेले आहे. या चार वर्णांनी आपआपली विहित कर्मे गडबड न करता करावीत म्हणजेच ते लोक मेल्यानंतर मोक्ष पावतात. हे तत्त्वज्ञान गीतेच्या अठराव्या अध्यायात आहे. ते असे

' ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।। ४१ ।।
शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।। ४२ ।।
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ।। ४३ ।।
कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ।। ४४ ।।
स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ।। ४५ ।।
यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।। ४६ ।।
श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। ४७ ।।
सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।। ४८ ।।
असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः
नैष्कर्म्यसिद्धिं परमां सन्यासेनाधिगच्छति ।। ४९ ।।

अर्थ ४१) हे परंतपा ! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांची कर्मे त्यांच्या स्वभावजन्म म्ह. प्रकृतिसिद्ध गुणाप्रमाणे पृथक विभागली आहेत.

(४२) शम, दम, तप, शुचिर्भूतपणा, शांती, सरळपणा (आर्जव), ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान, विज्ञान म्हणजे विविध ज्ञान व अस्तिक्यबुद्धी हे ब्राह्मणाचे स्वभावजन्य कर्म होय.

(४३) शौर्य, तेजस्विता, धैर्य, दक्षता, युद्धातून पलायन न करणे, दातृत्व आणि ( प्रजेवर ) सत्ता चालविणे हे क्षत्रियांचे स्वभावजन्य कर्म होय.

(४४) कृषी म्ह.शेती, गौरक्ष्य म्ह. गुरेढोरे पाळण्याचा धंदा आणि वाणिज्य म्ह. व्यापार हे वैश्यांचे स्वभावजन्य कर्म होय. आणि तसेच सेवा करणे हे शूद्रांचे स्वभावजन्य कर्म होय.

(४५) आपआपल्या ( स्वभावजन्य गुणांप्रमाणे ) प्राप्त झालेल्या कर्मांत जो पुरुष नित्य रत असतो त्याला ( त्यानेच ) परमसिध्दी प्राप्त होते. आपल्या कर्मात तत्पर राहिल्याने सिध्दी कशी मिळते ते ऐक.

(४६) ज्याच्यापासून सर्व भूतांची प्रवृत्ती झाली व ज्याने हे सर्व जग विस्तारिले किंवा व्यापिले आहे, त्याची पूजा आपल्याम ( स्वधर्माप्रमाणे,) प्राप्त झालेल्या कर्मांनी ( केवळ वाणीने अगर पुष्पांनी नव्हे ) केली म्हणजे मनुष्याला (त्यानेच) सिध्दी प्राप्त होत असते.

(४७) परक्याचा धर्म सुखाने आचरिता आला तरी त्यापेक्षा आपला धर्म म्हणजे चातुर्वर्ण्यविहित कर्म विगुण म्हणजे सदोष असले तरी तेच अधिक श्रेयस्कर आहे. आपले स्वभावसिध्द म्हणजे गुणस्वभावानुरूप निर्मिलेल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेने नियमित झालेले कर्म करीत असता त्यात ( कोणतेही ) पाप लागत नाही.

(४८) जे कर्म सहज म्हणजे जन्मतःच गुणकर्मविभागामुळे नियत आहे ते सदोष असले तरी हे कौंतेय ! ( कधीही ) सोडू नये. कारण धुराने ज्याप्रमाणे विस्तव, त्याप्रमाणे सर्व आरंभ म्हणजे उद्योग (कोणत्या ना कोणत्यातरी) दोषाने वेढलेले असतात.

(४९) ( म्हणून आसक्ती न ठेविता ) मन ताब्यात आणून निष्काम बुध्दीने वागले म्हणजे ( कर्म फलाच्या ) संन्यासाने परम नैष्कर्म्यसिध्दी प्राप्त होते. ( श्री भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोग शास्त्र पा. ८४२ – ८४४, बाळ गंगाधर टिळक, १९१८ )

९ (ब) आद्य शंकराचार्य, ज्ञानदेवादी संत व लो. टिळक यांनी, गीतेत जे चातुर्वर्ण्याबद्दल मत प्रदर्शित झाले तेच अंधपणे उचलून धरले. ते मत खरे की खोटे, याची चर्चा त्यांनी केली नाही. या श्रेष्ठींनी मळलेली वाट सोडली नाही. मग त्यांना क्रांतिकारक का म्हणावे ?

१० श्रीकृष्णाने हिंदू समाजाला समतेची शिकवण दिली, असे मत प्रदर्शित करणारे हिंदू गीतेतील

विद्याविनय संपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि
शुनि चैव श्वपाके च पंडिता : समदर्शिन : ॥ ५-१८

(ज्यांना देवासंबंधीचे ज्ञान प्राप्त झालेले आहे, असे लोक विद्या विनय व संस्कृती यांनी परिपूर्ण असलेला ब्राह्मण गाय, हत्ती, कुत्रे व अस्पृश्य माणूस यांच्याकडे समदृष्टीने पाहतो ) हा श्लोक भडाभडा म्हणून दाखवितात, त्यावेळी त्यांना हे लक्षात येत नाही की देवासंबंधी ज्ञान प्राप्त झालेल्यांची ही स्थिती असते, हे मान्य; पण इतरांचे काय? पहिल्या प्रकारचे लोक हिंदू समाजात किती असतात, आणि जरी असले तरी ते समानतेने हिंदू समाजात वागतात का ? ही समानतेची भूमिका ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं, या गीतेतील उद्‌गाराच्या विरुद्ध होत नाही काय ? ही समानतेची शिकवण नसून बहुजन समाजाची दिशाभूल करणारी प्रवृत्ती होय. चातुर्वर्ण्याची कल्पना टिकविण्यासाठी ब्राह्मणांना श्रीकृष्णाच्या तोंडी अनेक श्लोक वेळोवेळी घालावे लागले. याची काही उदाहरणे वरच्या परिच्छेदात मी दिलेली आहेत. पण ही चातुर्वर्ण्याची कल्पना टिकू शकत नाही. कारण चार वर्णांच्या पायावर उभारलेला धर्म पुढील काळात हजारो जाती निर्माण झाल्यामुळे कोसळला. तेव्हा ही धर्मग्लानी हजारो वेळा झाली होती. त्यावेळी श्रीकृष्णाने ही धर्मग्लानी नष्ट करण्यासाठी अवतार घेतले व हजारो जाती नष्ट करून फक्त चारच वर्ण हिंदू समाजात पुन्हा प्रस्थापित केले, याचे पुरावे हिंदुधर्मशास्त्रात मिळत नाहीत.

११ महाभारताच्या काळानंतर भारतात जैन व बौद्ध धर्माचा बराच प्रसार झाला. हे धर्म, जातिभेद मानीत नव्हते. त्यांनी जातिभेद नष्ट करून समाजात समता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले आणि त्यांना थोडे बहुत यश आले. पण जातिभेदाचे निर्दालन त्यांना संपूर्णतया करता आले नाही. पुढील काळात हिंदुसमाजात अनेक ब्रह्मवेत्ते, वेदांती, तत्त्वज्ञ, संतकवी व शाहीर उत्पन्न झाले.

१) अद्वैतवादी शंकराचार्य ( इ. स. ७७८-८१० )
२) विशिष्टाद्वैतवादी रामानुजाचार्य
इ. स. १०१७-११३७ )
३) पूर्ण द्वैतवादी मध्वाचार्य ( जं. १२०० )
४) भेदाभेदवादी द्वैताद्वैतवादी निंबार्क ( १२००-१२७५ )
५) शुद्धाद्वैतवादी वल्लभाचार्य ( १४७०-१५५० )

इत्यादिकांनी ' अहं ब्रह्मास्मि ' ' तत्वमसि ' वगैरे वेदान्त विषयावर काथ्याकूट केला. आणि अनेक धार्मिक पंथोपंथ निर्माण करून हिंदुसमाजात नवा जातिभेदाची भर टाकली. त्यांना अस्पृश्य समाजातील लोकांत ब्रह्म दिसले नाही. कारण ते ब्रह्म फक्त उच्चवर्णीय जातीतच असते. असे त्यांचे ज्ञान वेदादी धर्मग्रंथातील परंपरागत शिकवणुकीवर उभारलेले होते. अस्पृश्यांच्या दुःखावर ब्रह्मज्ञानाचा व्यवहारी उपाय शोधणे हे त्यांना पापमय वाटत होते. आद्य शंकराचार्यांचे अद्वैत-वादी तत्त्वज्ञान हेच खरे, असे मत प्रदर्शित करणारे हिंदू, त्या तत्त्वज्ञानाला हाणून पाडणारे रामानुजाचार्य, मध्वाचार्य, निंबार्क, वल्लभाचार्य वगैरे तत्त्वज्ञान्यांना सोयीस्कर रीतीने डावलतात, हे ऐकणाऱ्यांच्या अगर वाचकांच्या लक्षात येत नाही. हेही आद्य शंकराचार्यांचे योग्य स्थान हिंदूच्या समाजघातक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ठरवताना दृष्टीसमोर ठेवणे तर्कनिष्ठ विचारवंतांना सहाय्यकारक होईल. अद्वैतवादाला श्रेष्ठ समजणारे व जातिभेदाचे अस्तित्व शास्त्राच्या चष्म्यातून पहाणारे हिंदू, म्हणजे ढोंगधत्तुरे माजविणारे पाषाणहृदयी मानव होत हे उघड होते. या लोकांनीच हिंदुलोक व हिंदुसमाज यांना निःसत्त्व दुबळे आणि गुलाम-वृत्तीचे केले.

१२ लिंगायत धर्माचे संस्थापक श्री. बसवेश्वर ( ११३२-११६८ ) आणि मानभावी धर्माचे संस्थापक श्री. चक्रधर स्वामी ( ११९४-१२७२ ) यांनी जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न केले. पण त्यांना संपूर्ण यश आले नाही. अस्पृश्य समाजातील बऱ्याच लोकांनी या दोन्ही धर्मांचा स्वीकार केला होता. पण अलीकडे या धर्मांतरितांना अस्पृश्यच समजले जाते. शीख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानक ( इ. स. १४६९-१५३९ ) यांनीही जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न केले. पण याही धर्मात चार प्रमुख जाती पुढे निर्माण झाल्या. त्यापैकी ' मजहबी ' या जातीला बहुसंख्य शीख अस्पृश्य मानतात. या जातीचा शीख उच्चवर्णीय शिखांच्या स्वयंपाकघरात (लष्करात) गेला, तेव्हा त्याला त्या उच्चवर्णीय शिखाने

मारले. तेव्हा त्या उच्चवर्णीय शिखावर १९३४ मध्ये पुण्यातील कोर्टात खटला भरला होता.

१३ १) नामदेव (इ. स. १२७०–१३५०)
२) ज्ञानदेव ( ,, १२७५–१२९६ )
३) चोखामेळा ( ,, १२९२–१३३८ )
४) सावता माळी ( मृ. १२९६ )
५) चांगदेव ( मृ. १२९८ )
६) विसोबा खेचर ( मृ. १३०९ )
७) नरहरी सोनार ( मृ. १३१३ )
८) जगमित्र नागा ( मृ. १३३० )
९) एकनाथ ( इ. स. १५३३–१५९९ )
१०) तुकाराम ( ,, १५९८–१६४९ )

वगैरे संतांनी भूतदयेच्या व भक्तीच्या दृष्टीतून जातीभेदाची तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न केले. पण जातिभेदांचे जे मूळ चातुर्वर्ण्य यावर त्यांनी हल्ले केले नाहीत. कारण चातुर्वर्ण्य ईश्वरनिर्मित आहे व त्यावर हल्ले करणे पाप होय, अशीच या संतांची समजूत होती. आणि ती धर्मग्रंथांतील, पारंपारिक शिकवणुकीवर उभारलेली होती. भागवत धर्माचे हे संत, परमेश्वराचे हे अस्तित्व जळी, स्थळी, पाषाणी, काष्ठी, वगैरे चरावर सृष्टीत आहे, असे मानत होते. अस्पृश्य लोकही परमेश्वराचे अंश होत असेही ते मानत होते. पण पाली पुढे विंचू जशी नांगी टाकतो, तसे ते समाजरूढीपुढे लोटांगण घालीत असत. त्यामुळे त्यांना अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करण्याची चळवळ हाती घेता आली नाही. रामदास ( इ. स. १६०८–१६८१) यांनी आपल्या लेखनांत आणि प्रवचनांत चातुर्वर्ण्य व जातिभेद याना उचलून धरले. त्यामुळे हिंदू समाजातील समाजघातक विचारांना बळकटी आली.

१४ संताच्या नंतरच्या इ. स १६०० ते १९०० या काळात
१) निरंजन माधव ( १७०३–१७९० )
२) प्रभाकर ( १७५४–१८४३ )
३) रामजोशी ( १७६२–१८१२ )
४) अनंत फंदी ( १७७४–१८१० )
५) सगनभाऊ ( १७७८–१८४० )
६) होनाजी बाळा ( मृ. इ. स. १७९० )

वगैरे कवी शाहीर निर्माण झाले आणि ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थना-समाज, सत्यशोधकसमाज वगैरे संस्था निर्माण झाल्या. कवी शाहीर यांनी जाति-भेदांच्या अनिष्टतेबद्दल प्रक्षोभक कवने लिहिली नाहीत. उपरिनिर्दिष्ट समाजांनीही जातिभेदांचे निर्मूलन करण्याचे कंकण हाती बांधले नाही. 'सत्यशोधक समाज' ने ब्राह्मण्य व जातिभेद यांच्यावर हल्ले केले. पण सत्यशोधकांनी जातिभेद आणि अस्पृश्यतानिवारण या बाबतीत वाचाळपणाच्या पलीकडे फारसे कार्य केले नाही. राजर्षी श्री. छत्रपती शाहू महाराज यांनी रोटीव्यवहार व बेटीव्यवहार या साधनांनी जातिभेद नष्ट करण्याचा जो आदेश दिला होता त्याकडे सत्यशोध–कांनी कानाडोळा केला. आणि चळवळीत स्वतःचे उखळ पांढरे करून घेण्यातच ते मश्गूल झाले.

१५ सारांश, जातिभेदामुळे हिंदुसमाज दिवसेदिवस खिळखिळा होत गेला. त्याची शक्ती निःसत्त्व झाली. यामुळेच हिंदुसमाजाला मुसलमानानी आक्रमणांपुढे गेल्या १२०० वर्षांत अनेकदा नतमस्तक व्हावे लागले. हे हिंदुसमाजातील विचार-वंतांना दिसले. पण चातुर्वर्ण्य व जातिभेद हे ईश्वरनिर्मित आहेत व ते पवित्र अविनाशी आणि धर्माचे आधार आहेत म्हणून त्याविरुद्ध उठाव करण्याची हिंमत या विचारवंत हिंदूंना झाली नाही. आणि झाली तरी ती हिंमत थिटी पडली. म्हणूनच भारतात पातंत्र्याचे दिवस अनेकदा आले आणि शेवटी मुसलमानांनी अस्पृश्य-वर्गातील कोटी कोटी लोकांना इस्लाम धर्मात गेल्या दीड हजार वर्षात घेऊन लोकसंख्येच्या बळावर १५ ऑगष्ट १९४७ ला भारताचे दोन तुकडे केले. तरीही सनातनी म्हणविणारे हिंदू वेद, चातुर्वर्ण्य, जातिभेद हे ईश्वरनिर्मित होत, या समाज घातक विषारी कल्पनेला चिटकून राहत आहेत. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केल्यानंतर अस्पृश्यसमाजात, पर्यायाने सवर्ण हिंदुसमाजात, जी प्रचंड चळवळ झाली तीत हे स्पष्ट झाले की बहुसंख्य सवर्ण हिंदू उपरिनिर्दिष्ट कल्पनेला मूठमाती देण्यास तयार नाहीत. दुसरे दृश्य या चळवळीत दिसले ते हे की हिंदुसमाज हा शीड व नावाडी नसलेल्या जहाजाप्रमाणे चळवळीच्या आंदोलनात दोलायमान होत असतो. पण तो संपूर्णपणे बुडून जात नाही. या परिस्थितीचा फायदा जीर्णमतवादी हिंदू आपले नेतृत्व ईश्वरनिर्मित आहे असा करून घेतात आणि ख्रिस्ती व इस्लामी धर्मप्रचारक अस्पृश्यांना आपल्या कळपात ओढून नेण्याचा गुप्त अगर उघड प्रयत्न कर-तात जोपर्यंत सवर्ण हिंदू या कल्पनेचे बळी म्हणून राहतील, तोपर्यंत ही भयंकर परिस्थिती हिंदुसमाजात राहणारच !

१६ राष्ट्रपिता महात्मा गांधीजी ( २–१०–१८६९ ते ३०–१–१९४८ ) यांचा जन्मशताब्दी समारंभ २ ऑक्टोबर १९६९ ते २२ फेब्रुवारी १९७० या काळात साजरा झाला. तेव्हा व त्याच्या अगोदर व नंतरच्या काळात अस्पृश्य, बौद्ध वगैरे मागासलेल्या लोकांवर अमानुष अत्याचार सवर्ण हिंदूंनी व सरकारी अधिकाऱ्यांनी केले. ही एक लक्षणीय घटना होय. गांधीजींच्या शिकवणुकीचे पाढे सवर्ण हिंदूंनी गेल्या ५० वर्षांत घोकले आणि शेवटी त्यांनी त्यावर डांबर फासले. या अत्याचाराची काही ज्ञात प्रकरणे – (1) Report of the Cammissioner for Scheduled Caostes & Scheduled Tribes 1967–68 ( seventh report, Volumes I & II ) Pages 43–56 & (2) Report of the committee on untouchability, Economic & Educational development of the Scheduled Castes & Connected documents 1969, Pages 15 - 37 यांत दिलेली आहेत. क्रमांक

(२) चा रिपोर्ट Elayaperumal [ Chairman ] Report म्हणून प्रसिद्ध आहे. या कमिटीचे उपाध्यक्ष खासदार पद्मश्री कर्मवीर भाऊराव कृष्णराव ऊर्फ दादासाहेब गायकवाड हे होते. कमिशनरच्या रिपोर्टात प्रकरणांची सविस्तर माहिती नाही. इलाया पेरुमल रिपोर्टात सुमारे ४० प्रकरणांची माहिती आहे. यात काहींची माहिती सविस्तर नाही. स्थळ, काळ, कारणे व शेवट या संबंधीची माहिती असल्या सरकारी अहवालात आली तर समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना व इतर संशोधक लेखकांना त्यांचा उपयोग होईल. शिवाय भावी पिढ्यांनाही ही प्रकरणे बोधक व मार्गदर्शक होतील. ‘ वर्तमानपत्रे ’ व ‘ इलाया पेरुमल ’ अहवाल यात जी प्रकरणे प्रसिद्ध झालीत त्यांतून काहींची माहिती मी खाली देत आहे.

१ (अ) मध्यप्रदेशातील एका गावात तीन अस्पृश्यांनी आपल्या मिशांना रँगलरी फॅशनचे वळण लावले म्हणून त्या गावच्या सवर्ण हिंदूंनी त्यांना गोळ्या घालून ठार केले. मिशांचे आकडे वर ठेवणे हा हक्क फक्त सवर्ण हिंदूंचा आहे. मिशांचे आकडे खालच्या बाजूलाच ठेवले पाहिजेत, ही रूढी सदर अस्पृश्यांनी मोडली. म्हणून त्यांना ठार करण्यात आले. ( दी टाइम्स ऑफ इंडिया, करंट टॉपिक्स २६–१२–१९६७ पान ८ )

(ब) मिशांना रँग्लरी फॅशनचे वळण काही अस्पृश्यांनी दिले म्हणून मध्यप्रांतात व इतर राज्यांत हिंदूंनी अस्पृश्यांना बेदम मारल्याची काही प्रकरणे झाली. ( इलायापेरूमल रिपोर्ट पा. १९ )

(क) मध्यप्रदेशातील सतनामीपंथाचे अस्पृश्य लोक बंडखोर वृत्तीचे आणि सवर्ण हिंदूंच्या ठोशास ठोसा देणारे आहेत. सवर्ण हिंदूंच्या समोर बाजल्यावर बसणे, अंगावर सोन्याचे दागिने घालणे, लग्नाची वरात घोड्यावरून काढणे, तीत बँड वाजविणे, दारूकाम करणे वगैरे गोष्टी सवर्ण हिंदूंना सहन होत नसतात. ते जेव्हा सतनामी लोकांवर याबद्दल हल्ला करतात तेव्हा सतनामी लोक सवर्ण हिंदूंना तोंड देतात व त्यांना पिटाळून लावताता. ( इ. रि. पा. १० )

म्हैसूर शहरात एक रस्ता आहे. त्यावरुन अस्पृश्यांनी चप्पल घालून चालणे हा गुन्हा आहे. ही रूढी काही तरुण अस्पृश्यांनी मोडली तेव्हा सवर्ण हिंदूंनी त्यांना बेदम मार दिला. ( दी टाइम्स, करंट टॉपिक्स २६–१२–६७ पान ८ )

(ड) तामिळनाडू ( मद्रास ) प्रातांतील काही गावांत सवर्ण हिंदू अस्पृश्यांना सायकलवर बसून जाऊ देत नाहीत. ही रूढी मोडणाऱ्या अस्पृश्यांना सवर्ण हिंदूंनी खूप मार दिला. ( कित्ता )

(इ) गौहत्ती ( आसाम प्रांत ) जवळच्या तिनसुखिया या शहरात अस्पृश्य समाजातील बऱ्याच मुली पदवीधर होत्या. सवर्ण हिंदूतील गुंडांनी त्यांना परोपरीने, छळले. त्या मुलींच्या तक्रारींकडे अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही. त्या मुलींतून १५० मुलींनी या छळाला कंटाळून मुसलमानी धर्म स्वीकारला. ( इ. रि. पा. १६ )

३) मनसुखी जि. गौहत्ती ( आसाम ) या गावातील ग्रामपंचायतीचा अध्यक्ष म्हणून एक अस्पृश्य ( माजी काँग्रेस आमदार ) निवडून आला तेव्हा सवर्ण हिंदूंनी त्याला परोपरीने छळून हैराण केले. तेव्हा तो अस्पृश्य हताश झाला. हिंदूंनी त्याला राजीनामा द्यावयास भाग पाडले. ( इ. रि. पा. १६ )

४) तामीळनाडू ( मद्रास ) प्रांतातील काही अस्पृश्यांनी अस्पृश्यांच्या वस्तीत उपयुक्त वस्तूंची दुकाने सुरू केली. तेव्हा त्या त्या गावातील सवर्ण वाण्यांच्या दुकानांवर अस्पृश्य गिऱ्हाईक जाण्याचे टाळू लागले. आपल्या मालाची विक्री कमी होत आहे, हे कळताच सवर्ण वाण्यांनी सवर्ण गुंडांच्या हस्ते अस्पृश्यांच्या दुकानांवर हुल्लड करण्याचे व दहशत बसविण्याचे प्रकार सुरू केले. थोड्याच दिवसांनी अस्पृश्यांना आपली दुकाने बंद करणे भाग पाडले. ( इ. रि. पा. २१ )

५) गुजरात प्रांतात बहुतेक सर्व हॉटेल्समध्ये अस्पृश्यांना दुकानाच्या बाहेरच्या फूटपाथवर चहा व पाणी देण्यात येते. सार्वजनिक विहिरीवर फक्त सवर्ण हिंदूच पाणी घेऊ शकतात. ( इ. रि. पा. १७

६) उत्तर प्रदेशातील (अ) क्वीन्स कॉलेज, बनारस (ब) गव्हर्नमेंट कॉलेज, आग्रा गव्हर्नमेंट (क) कॉलेज, कानपूर (ड) मदनमोहन, मालवीय हॉस्टेल' अलाहाबाद विद्यापीठ आणि इतर शैक्षणिक ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांना सवर्ण हिंदू हिंदू विद्यार्थ्यांच्या बरोबर जेवणासाठी बसण्याची बंदी आहे. या बाबतीत अस्पृश्य विद्यार्थ्यांनी शिक्षण खाते, प्रांतिक व मध्यवर्ती सरकार व स्थानिक पुढारी यांच्याकडे तक्रारी केल्या. या सर्वांनी या बाबतीत अंगचोरपणा केला. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळांना या सर्वांनी गुळमुळीत व उडवाउडवीची उत्तरे दिली. या अन्यायाविरुद्ध कोणालाही काही उपाययोजना करता आली नाही.
( इ. रि. पा. २७ )

७) अलिगढ ( उत्तरप्रदेश ) येथील हिरालाल बाराणसी इंटर कॉलेजमध्ये ओमप्रकाश नेता हा अस्पृश्य विद्यार्थी होता. तो वर्गात नेहमी पहिला नंबर राखत असे. त्याच्या हुशारीवर खूष होऊन कॉलेजच्या प्रिन्सिपॉल व इतर अधिकाऱ्यांनी त्याला सिनिअर प्रोटेक्टोरियल मॉनेटर म्हणून नेमले. तेव्हा सवर्ण हिंदू विद्यार्थ्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. त्यांनी ओमप्रकाशला परोपरीने छळण्यास सुरुवात केली. त्यांनी त्याला धमकी दिली की तू या पदाचा राजीनामा दे नाहीतर आम्ही तुला खतम करू. ओमप्रकाशने या धमकीला भीक घातली नाही. हिंदू विद्यार्थ्यांनी संधी साधून त्याच्यावर हल्ला केला. तेव्हा तो प्रिन्सिपॉलच्या ऑफिसकडे धावत गेला व त्याने प्रिन्सिपॉलचे संरक्षण मागितले. ते विद्यार्थी प्रिन्सिपॉल ऑफिसात घुसले व ओम-प्रकाशला प्रिन्सिपॉलच्या टेबलावर पाहून त्याच्यावर चाकूचे वार केले. ओमप्रकाश थोड्यावेळाने मेला. ( टाइम्स १८–११–६७ व इ. रि. पा. २८ )

८) उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यातील हाथी आगडखेडे व बाराबांकी जिल्ह्यांतील काही खेडी येथे ऑगष्ट १९६८ सालात सवर्ण हिंदूंनी व सरकारी नोकरांनी अस्पृश्य स्त्री–पुरुषांना बेदम मारले. व त्यांच्यांतील तरुणांना आपल्या आयाबहिणींवर संभोग करण्यास भाग पाडले. या संबंधीची चर्चा लोकसभेत २६–८-१९६८ रोजी रात्री झाली. ( **Loksabha debates, Val. XX dated 20 th, to 30 th. August 1968. Parts 21–28 Pages 1295–1307** )
तेव्हा सभासदांनी चर्चेत ३ व ६ अस्पृश्यांवर अत्याचार झाले असे सांगितले. सर-कार तर्फे या मुद्यावर मौन पाळलेले दिसते. या चर्चेचा जो अहवाल प्रसिद्ध झाला तो मी येथे उदधृत करीत आहे.

९) आईशी अतिप्रसंग करण्यास मुलास भाग पाडले. पोलीसावर आरोप. न्यायालयीन चौकशीचा हुकूम. उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यात चीड आणणारे

कृत्य लोकसभेत तीव्र प्रतिक्रिया

नवी दिल्ली ता. २६– गोंडा जिल्ह्यातील हाथीआगड खेड्यातील एका तरुणास आपल्या आईशी अतिप्रसंग करण्यास पोलिसांनी भाग पाडले, अशा आरोपांची न्यायालयीन चौकशी करावी असे केंद्राने उत्तर प्रदेश सरकारला सांगितले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आज लोकसभेत सांगितले. आरोप शहारे आणणारे आहेत.

तातडीच्या प्रश्नास उत्तर देताना चव्हाण म्हणाले, "पोलिसांनी अत्याचार केल्याच्या इतर आरोपांचे बाबतीत आणि बाराबंकीसारख्या जिल्ह्यातील बेकायदेशीरपणाच्या प्रकरणी लक्ष घालण्याचा सल्लाही राज्याचे गव्हर्नरांना देण्यात आला आहे."

श्री. एस. एम. जोशी ( सं. समाजवादी ) व श्री. रामाअवतार शास्त्री ( कम्युनिस्ट ) यांच्या तातडीच्या प्रश्नांतील आरोपाचा आपण इन्कार करू शकत नाही किंवा त्यास दुजोराही देऊ शकत नाही, असेही ते म्हणाले. विरोधी खासदारांनी मुख्यमंत्र्यांना विचारले : " आई आणि मुलाला नग्न स्थितीत पोलीस स्टेशन मधून बसस्टँड पर्यंत आणले आणि पोलिसांचा निषेध करणाऱ्या खेडुतांना मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय ? " "हे आरोप शहारे आणणारे आहेत," असे चव्हाण म्हणाले. ते पुढे म्हणाले "प्रदेशाचे गृहखात्याचे चिटणीस आणि ॲडीशनल इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांना इथे चर्चेसाठी बोलावल्यानंतर न्यायालयीन चौकशी करावी, असा राज्याला सल्ला देण्याचा निर्णय केंद्राने घेतला."

गोंडा आणि बाराबंकी जिल्ह्यातील खून आणि बेकायदेशीरपणाच्या अनेक प्रकारांचा उल्लेख करून श्री. रामसेवक यादव ( सं. समाजवादी ) यांनी विचारले, " राष्ट्राध्यक्षांच्या राजवटीत इतर प्रदेशातील कायदा व सुव्यवस्था स्थिती खालावत आहे काय? "श्री. चव्हाण म्हणाले," हाथी आगड येथील पोलीस अत्याचारांच्या आरोपासंबंधी सरकारने काय उपाय योजले आहेत, हे मी अगोदरच स्पष्ट केले आहे. माझी आणखी सूचना अशी आहे की, पार्लमेंट सल्लागार समितीची उत्तर प्रदेशात सप्टेंबरात बैठक होईल. त्यावेळी सभासदांनी बेकायदेशीरपणासंबंधीची आणखी प्रकरणे उत्तर प्रदेश शासनाच्या लक्षात आणून द्यावीत.

**पोलीस अत्याचाराबाबत तक्रार–** प्रारंभी केलेल्या निवेदनात श्री. चव्हाण म्हणाले, " श्री. रामसेवक यादव, इतर काही संयुक्त समाजवादी कार्यकर्त्यांबरोबर

गोंडाचे डिस्ट्रिक्ट मॅजेस्ट्रेटना भेटले. पोलिसांनी हाथीआगड खेड्यात काही अत्याचार केल्याची तक्रार त्यावेळी त्यांनी केली. पोलिसांनी त्या खेड्यातील स्त्रियांशी. गैरवर्तणूक केली असा आरोप आहे. त्यांना नग्न करून पोलीसस्टेशनवर नेले खेड्यातील बहुतेक सर्व रहिवाशांची चीजवस्तू पोलिसांनी लुटली, असाही आरोप आहे."

राज्यसरकारच्या अहवालात म्हटले आहे की, हाथी आगड आणि इतर दोन खेड्यांतील वीस लोकांनी जंगलरक्षकास वेढा घातल्याचे समजल्यावरून गेल्या ३० मे रोजी पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या संदर्भात वरील घटना घडल्याचा आरोप आहे. दोन पोलिसांवर हल्ला करण्यात आला. दोन बंदुका व वीस काडतुसे पळविण्यात आली. आणि एका पोलिसास अडकवून ठेवले. त्यानंतर सहा लोकांना अटक करण्यात आली. व गुन्हा नोंदविण्यात आला, स्त्रियांचा अपमान होईल, असे काहीही घडले नाही असे राज्य सरकारने म्हटले आहे. ( सकाळ २७–८–६८ ) वरील माहिती इलाया पेरुमल रिपोर्टमध्ये नाही.

१० शिरसगाव, ता. व जि. औरंगाबाद ( मराठवाडा ) येथील सवर्ण हिंदूंनी १९६६ रोजी बौद्धांच्या वस्तीवर हल्ला केला व त्यांच्या स्त्रियांची नग्नावस्थेत मिरवणूक काढली. त्या स्त्रियांना दगड व लाठ्या यांनी हिंदूंनी मार दिला. त्या स्त्रियांतील एका तरुणीवर तीन हिंदूंनी जबरी संभोग केला. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटपुढे हे प्रकरण नेण्यात आले. ( इ. रि. पा. २३ )

याबद्दलची सविस्तर माहिती मिळविण्यासाठी मी काही ठिकाणी पत्रे पाठविली होती. मला कोणीही उत्तर दिले नाही. उत्तरासाठी पाकिटे पाठविली होती.

११ अलाहाबाद कॉलेज हॉस्टेलमध्ये राहणारा एक अस्पृश्य विद्यार्थी डॉ. आंबेडकरांचा फोटो आपल्या खोलीत ठेवतो म्हणून सवर्ण हिंदू विद्यार्थ्यांनी त्याला दम भरला; तरी त्या विद्यार्थ्याने तो फोटो काढण्याचे नाकारले. सवर्ण हिंदू विद्यार्थ्यांनी त्याला बेदम मारले. त्या विद्यार्थ्याने प्रिन्सिपॉलकडे तक्रार केली. प्रिन्सिपॉलने दोन्ही पक्षाची समजूत काढली. ( इ. रि. पा. २८ )

१२ (अ) कांचीकचेर्लू जि. कृष्णा, आंध्रप्रांत येथील एका अस्पृश्य मुलाला ( कम्मा जातीच्या ) सवर्ण हिंदूंनी २४ फेब्रुवारी १९६८ रोजी जाळून मारले. त्यांचे म्हणणे असे होते की, या मुलाने चप्पल व तांब्याचे लोटे चोरले, म्हणून त्याचे हातपाय दोराने बांधून त्याला त्यांनी शेजारच्या झाडाला बांधले व त्याला

आग लागली. तो मुलगा आक्रोश करीत होता. व ४०–५० कम्मा हिंदू हा तमाशा पहात फिदीफिदी हसत उभे राहिले होते. ( टाईम्स ४–१०–६८ पा. १ इ. रि. पा. १६ ) सात आरोपींच्यावर खटला भरण्यात आला. न्यायमूर्ती ए. डी. बी. रेड्डी यांच्या डिव्हिजन बेंचने चार आरोपींना निर्दोषी ठरविले. (१) बी. व्यंकटेश्वरेलु (२) जी. नरसिंगराव आणि (३) जोन्नालगप्पा चिन्नी यांना जन्मठेपेची शिक्षा दिली. ( नवशक्ति ८–२–७० पा. १ इ. रि. पा. १६ )

या अत्याचाराची न्यायप्रविष्ट हकीकत ब्लिट्झ २५–५–६८ या अंकात " Andhra Hell house for Harijans " या शीर्षकाखाली दिली होती.

(ब) याच गावात सवर्ण हिंदूंनी के. चिन्ना रामय्या या अस्पृश्य तरुणाला २ ऑक्टोबर १९६८ ( गांधी जयंती ) या दिवशी कुऱ्हाडीचे घाव घालून ठार केले. त्याचे मारेकरी कोण हे सर्व गावाला माहीत होते. पण पोलीस पार्टीला त्यांची नावे कोणी सांगितली नाहीत. त्यामुळे पोलिसांना कोणालाही अटक करता आली नाही. ( टाईम्स ४–१०–६८ पा. १ )

१३ वेनमणी ता. नागट्टीनम् जि. पूर्व तंजावर या खेड्यातील अस्पृश्य शेत-मजुरांच्या झोपड्यांना बुधवारी २५–१२–१९६८ रोजी रात्रौ ८–३० च्या सुमारास स्पृश्यवर्गीय शेतमजुरांनी आग लावली. या झोपड्या २८ होत्या. हल्लेखोर अस्पृश्य वस्तीत घुसले. तेव्हा ४२ अस्पृश्यांनी ९ × ६ फुटांच्या झोपडीत आश्रय घेतला. हल्लेखोरांनी या झोपडीला बाहेरून कुलूप लावले व झोपडीला आग लावली. झोपडीत सर्व लोक ४२ जळून मेले. शेजारच्या झोपडीत लोक जळून जखमी झाले व एक पुरुष मेला. भाजलेल्यांची संख्या १२ व मेलेल्यांची ४३ होती. इन्स्पेक्टर जनरल ऑफ् पोलीस, मद्रास. ( आर. एस्. महादेवन् ) पी. डब्ल्यू. मिनिस्टर ( एम्. करुणानिधी ) आणि कायदेमंत्री मद्रास ( माधवन् ) यांनी २७ डिसेंबरला या गावाला भेट देऊन दुःखी अस्पृश्यांना सहाय्य दिले. आगीचे मुख्य कारण असे सांगण्यात आले की, अस्पृश्य शेतमजुरांनी कम्युनिस्ट पक्षाने ठरविलेल्या दरापेक्षा कमी दरावर शेतात काम केले व पक्षाच्या शिस्तीला बाध आणला आणि स्पृश्यवर्गीय शेतमजुरांच्या पोटावर या अस्पृश्य शेतमजुरांनी पाय दिला. म्हणून या कम्युनिस्ट पक्षाच्या स्पृश्य व अस्पृश्य वर्गीय शेतमजुरांत संघर्ष निर्माण झाला होता. स्पृश्यवर्गीय शेतमजुरांनी या झोपड्यांवर हल्ला करण्याच्या अगोदर तीन तास पक्कीरी स्वामी ( वय २८ ) या अस्पृश्य शेतमजुराचा खून केला, त्याचे प्रेत फरफटत ओढत आणून या वसतीत टाकले, तेथील अस्पृश्यांना दहशतीच्या

धमक्या दिल्या आणि मग झोपड्यांना जमावाने आग लावली. सरकारने चौकशीची आज्ञा कढली. ( दी इंडियन एक्सप्रेस २७ ते २८ डिसेंबर १९६८. सकाळ २७–१२–६८ ) दी इंडियन एक्सप्रेसने २८–१२–६८ च्या अग्रलेखात असे मत प्रदर्शित केले की, हे स्पृश्य व अस्पृश्य शेतमजूर कम्युनिस्ट पक्षाचे होते. तरी ह्यांच्यांत जो संघर्ष धुमसत होता त्यात जातिभेदाचाच जास्त अंश होता. कमी दरावर काम करणे ही अस्पृश्य शेतमजुरांना झोडपण्यास स्पृश्य शेतमजुरांना सबब मिळाली.

१४ (अ) पंजाब सरकारने असे जाहीर केले की, जी व्यक्ती २० पुरुषांचे संतती प्रतिबंधक ऑपरेशन घडवून आणील त्याला सरकार एक ट्रॅन्झिस्टर बक्षीस देईल. हे बक्षीस मिळविण्याच्या हेतूने कॉर्नल या गावातील पोलीस सिवान गावाच्या अस्पृश्य पुरुषांना ऑपरेशनच्या ठिकाणी बळजबरीने घेऊन जात असत. त्या पुरुषांत ५०–६० वर्षांचेही लोक होते. नुकतेच लग्न झालेल्या एक तरुणाची पत्नी त्याच्याकडे नांदावयास १७–१२–६८ ला आली आणि पोलिसांनी त्या तरुणाला ऑपरेशनसाठी २०–१२–६८ ला बळजबरीने नेले. ( टाइम्स ८–१–६९ पा. १५ )

ब) खेडेगावातील काही अस्पृश्यांना २९–१२–६८ ला पोलिसांनी सांगितले की, प्रत्येकाला जमीन बक्षीस देत आहेत. 'ती घेण्यास तुम्ही चला'. काही अस्पृश्य पोलिसांच्या बरोबर गेले आणि पोलिसांनी त्यांना ऑपरेशनच्या ठिकाणी सुपूर्द केले. (कित्ता)

क) ३०–१२–६८ ला १०० पोलीस सिवान गावात शिरले व वायबार काढून अस्पृश्यांच्या वस्तीवर त्यांनी हल्ला केला. एका पोलिसाने, उजगारसिंग या पंचवीस वर्षांच्या अस्पृश्याने पोलिसांच्या अत्याचारांना विरोध केला म्हणून, त्याच्यावर गोळी झाडून त्याला ठार केले व त्याचे प्रेत दूर अंतरावर फरफटत नेऊन टाकले. त्यानंतर पोलिसांनी अस्पृश्य स्त्रियांची वस्त्रे सोडून त्यांना, त्यांच्या पुरुष नातलगांना लाठ्यांनी मारले. ( कित्ता )

१५ ओरिसा प्रांतातील बलुगाव ( जि. कटक ) जवळच्या एका खेड्यातील सवर्ण हिंदूंनी भीमा नायक या तरुणाला १२–७–६९ ला चोर म्हणून पकडले. त्याला दिव्याच्या खांबाला बांधले व लाठ्यांनी त्याला झोडपले. नंतर त्यांनी त्याच्या अंगावर पेटवलेल्या पलित्यांनी डाग दिले तो तेथे मूर्च्छित अवस्थेत असताना त्याला इस्पितळात नेले. पण तो अगोदरच मेलेला होता. या प्रकरणात पोलिसांनी २४ सवर्ण हिंदूंना अटक केली. ( टाईम्स १३–९–६९ पा. १० )

१६ रागीमंगळचा हा अस्पृश्य तरुण खाम्मम (आंध्र) या शहरात एका हॉटेलच्या बाजूला उभा राहिला होता. आपली कोंबडी कोणी नेली म्हणून हॉटेलचा मालक आपल्या नोकरांना विचारू लागला. तेव्हा नोकर काही उत्तर देईना. तेव्हा मालक त्यांना शिव्या व धमक्या देऊ लागला. कोंबडी त्या चोराने नेली असावी, असे म्हणून नोकर रागीमंगळचाला शिव्या देऊन विचारू लागले. तो गोंधळून गेला. तेव्हा नोकरांनी त्याला खूप मारले एका खोलीत बंद केले व त्याच्या लुंगीला आग लावली. हॉस्पिटलमध्ये त्याला नेले व त्याचा हात कापावा लागला. पोलिसांनी पाच जणांना अटक केली. ( टाईम्स २६–९–६९ पा. ११ )

१७ चांगोले ता. तंदूर जि. हैद्राबाद येथील एका सवर्ण हिंदूला एका देवऋषीने सांगितले की, तुझ्या शेतात अपार द्रव्य आहे. तेथे तू एक माणूस बळी दिलास व तेथे खोल खणलेस तर द्रव्य हाती लागेल. त्या सवर्ण हिंदूने त्या गावचा अस्पृश्य मुलगा एल्लप्पा याला भूलथाप देऊन ऑगस्ट १९६९ च्या एका सकाळी शेतात नेले. त्याचे हातपाय बांधले व त्याच्या डोक्यावर पहारीने घाव घालून त्याला ठार केले. ( टाईम्स २९–१०–६९ पा. १ )

१८ एकलारा ता. मुखेड जि. नांदेड येथील मातंग व बौध्द लोकांनी गावकीची कामे सोडली होती. त्या गावच्या बोळबाई देवीच्या जत्रेत रेडे कापण्याचे काम रूढीप्रमाणे करण्याचे या लोकांनी नाकारले. तेव्हा गावकऱ्यांनी त्यांच्यावर बहिष्कार पुकारला. ( नवक्ति १७–११–६९ पा. ३ )

१९ कानोसा, ता. वसमतनगर जि. परभणी येथील सुदामा नावाच्या १७ वर्षांच्या बौद्ध विद्यार्थ्याला १३–१०–६९ ला एका सवर्ण हिंदूच्या मळचात नेण्यात आले. त्या मळचात जे इंजिन होते ते चालत नव्हते. तेव्हा त्याला एक नरबळी दिला तर ते इंजिन चालेल असे त्या गावच्या देवऋषीने त्या हिंदूला सांगितले होते. सदर हिंदूने त्या तरुणाच्या हातात पेटलेला पलिता दिला व तोच नंतर त्याच्या अंगावर टाकला.त्याचे अंग खूप भाजले. तो अत्यवस्थ असताना त्याला हॉस्पिटलमध्ये नेले व तेथे तो मेला मरणाच्या अगोदर त्याने पोलिसांना खरी हकीगत सांगितली. त्याचे वडील गंगाराम हौसाजी बौद्ध यांनी २१–१०–६९ ला सरकारी कचेऱ्यात तक्रार नोंदविली. पण गावकऱ्यांनी त्याला धाकदपटशा दाखवून चूप बसावयास भाग पाडले. हे प्रकरण गावकरी दाबण्याचे प्रयत्न करीत आहेत हे पाहून स्थानिक रिपब्लिकन पक्षातर्फे ४–१२–६९ ला परभणी कलेक्टरकडे मोर्चा नेऊन या प्रकरणाचा न्याय

झाला पाहिजे, अशी मागणी करण्यात आली. ( नवशक्ति २६–११–६९ पा. ६ २–१२–६९ पा. ६, टाईम्स ४–१२–६९ पा. ८ आणि नवशक्ति ६–१२–६९ पा. ३ )

२० निफाड ( जि. नासिक ) या शहरापासून जवळ असलेल्या खेळस या खेडयातील बौध्द व अस्पृश्य हा एक पक्ष आणि सवर्ण हिंदू हा एक पक्ष असे भेद निर्माण झाले होते. बौध्द व अस्पृश्य यांनी सवर्ण हिंदू विरोधाला न जुमानता गावठाणात आपली घरे बांधली होती. त्यामुळे उभय पक्षांत प्रक्षुब्ध वातावरण धुमसत राहिले होते. हरी शिवराम गवळी व त्याचा भाऊ काशिनाथ हे बौध्द रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते होते व या घरबांधणीच्या कामात ते पुढारी होते. ते फार दिवस सवर्ण हिंदूच्या डोळयांत खुपत होते. सदर बौध्दाचा घोडा, शिंदे या सवर्ण हिंदूच्या शेतात शिरला. तेव्हा त्याला घरी आणण्यासाठी हरी शेतात गेला. तेव्हा शिंदे कुटुंबातील लोकांनी त्याच्यावर कुऱ्हाडीने हल्ला केला. त्याच्या मदतीला काशीनाथ धावून आला. तेव्हा सदर लोकांनी त्याच्यावरही कुऱ्हाडीने हल्ला केला. दोघे बंधू त्या शेतातच मरण पावले. या प्रकरणात दत्तात्रय गंगाधर, यशवंत लख व सौ. हिराबाई या, शिंदे कुटुंबातील व्यक्तींना पोलिसांनी अटक केली या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता आमदार शांता दाणी सदर गावी गेल्या होत्या. ( नवशक्ति ५–१०–६९ पा. ६ )

२१ संगमनेर ( जि. अहमदनगर ) येथील बालमुकुंद या सवर्ण हिंदूने यादव पवार, यशवंत पवार आणि बंडू आगरे या तीन विद्यार्थ्यांना आपल्या घरात भाडोत्री म्हणून ठेवले. काही दिवसांनी त्याला समजले की, हे विद्यार्थी अस्पृश्य जातीचे आहेत. तेव्हा त्याने त्या विद्यार्थ्यांना शिवीगाळ करून त्यांचे सामान घराबाहेर फेकले व त्यांना १९–१–१९७० ला घरातून हुसकून लावले. हे वृत्त सर्व नगर जिल्ह्यात पसरले तेव्हा स्पृश्य व अस्पृश्य विद्यार्थ्यांनी या प्रकरणाची दाद लावण्याचे ठरविले. व त्यांनी एक छापील विनंती–पत्र प्रसिध्द केले ते असे : –

## " जाहीर आवाहन "

**विद्यार्थी व नागरिक बंधू – भगिनींनो,**

स्वातंत्र्योत्तर काळात अस्पृश्यता निवारण्याचा जयघोष आपल्या देशात सतत चालू आहे. त्याच बरोबर अस्पृश्य समाजाचा छळ व अत्याचार अखंडितपणे चालू आहेच. गांधी जन्म शताब्दीचे वर्षातही या अत्याचारांना खंड पडलेला नाही.

संगमनेर शहरही या बाबतीत अपवाद कसे असू शकेल? सर्व मानव जातीला लाजविणारी व चीड आणणारी अशी घटना संगमनेरमध्ये भरवस्तीत **बालमुकुंद असोपा** या प्रतिष्ठित म्हणून वागणाऱ्या महाभागाच्या घरात घडली. त्यांचे घरात भाडेकरू म्हणून राहात असलेले यादव काशिनाथ पवार, यशवंत भिकाजी पवार व बंडू काळू आगरे या १६–१७ वयाच्या कोवळ्या मनाच्या ९–**१०** वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ते **महार** आहेत म्हणून त्यांना शिवीगाळ करून ता. १९–११–७० रोजी सकाळी १०–३० वा. सामानासह घराबाहेर हाकलून दिले. कारण ते **हरिजन** समाजातले होते. आयुष्यभर गरिबांची अडवणूक करणाऱ्या बालमुकुंद शेठजीचें देव या मुलांच्या सहवासाने विटाळणार होते. अस्पृश्यता निवारणाचे कायदेही केवळ प्रचारासाठी असल्याने **पोलिसांकडूनही या विद्यार्थ्यांना संरक्षण मिळू शकले नाही.** या शहरात अशी घटना घडणे ही खरोखरीच लांच्छनास्पद गोष्ट आहे. या घटनेस जबाबदार असलेले बालमुकुंद शेठ यांना सरकारी यंत्रणा कोणतेही शासन करू शकली नाही. तरी अशा समाजकंटकांना जरूर ते शासन करण्याची जबाबदारी सर्व सुबुध्द नागरिकांवर आणि विशेषतः विद्यार्थी–संघटनेवर आहे. म्हणून वरील तीन विद्यार्थ्यांवर जो अन्याय झाला, त्यांची निर्भर्सना व मानहानी झाली, ह्याचा जाब विचारण्यासाठी, अन्याय दूर करण्यासाठी व अपराधाला शासन करण्यासाठी **गुरूवार ता. २२–१–७० रोजी दुपारी ४ वा. बालमुकुंद शेठ यांचे घरावर व कचेरीवर मोर्चा आयोजित** करण्याचे संगमनेर विद्यार्थी संघटनेने ठरविलेले आहे. तरी या कार्यक्रमात सर्वांनी सहकार्य द्यावे व मोर्चासाठी हायस्कूल, कॉलेजमधील विद्यार्थी–विद्यार्थिनी व नागरिक यांनी २२–१–७० रोजी दुपारी ४ वा. नेहरू चौकात जमावे. ही विनंती.

आपले नम्र

**विद्यार्थी – संघटना, संगमनेर,**

( श्रीराम मुद्रणालय, सगमनेर )

( या हस्त पत्रिकेत दिनांक व विद्यार्थी संघटनांची नांवे नाहीत. ) या विनंती-प्रमाणे सुमारे अडीच हजार लोकांचा मोर्चा, कलेक्टर डी. एस. पी. व जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयावर २२–१–७० रोजी सायंकाळी नेण्यात आला. आणि विद्यार्थी संघटनेतर्फे या सर्वांना निवेदन सादर करण्यात आले. श्री. असोपा व त्यांचे कुटुंबीय यांच्यावर खटला भरा अशी निवेदनात मागणी केली होती. ( महाराष्ट्र टाइम्स २७–१–७० पा. ३, केसरी २८–१–७० पा. ३, नवशक्ति ४–२–७० पा. ३ )

या प्रकरणात सर्व जातींच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जे धैर्य दाखविले ते प्रशंसनीय आहे. नव्या पिढीचा हा एकोपा पाहून मला हायसे वाटले.

२२ कळणे ( जि. ठाणे ) येथील सर्वे नं. २९७ ही जागा बौद्धांची स्मशान-भूमी होती. ती ग्रांमपंचायतीच्या शासकाने खेमचंद राजकुमार कंपनीला कारखाना काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची रीतसर परवानगी न घेता विकली. तेव्हा बौद्धांनी या कृत्याचा निषेध करणारे ठराव पास करून ते सर्व अधिकाऱ्यांकडे पाठवून न्याय मागितला व अपराध्यांना शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी केली. कंपनीने सदर जागेवर असलेली थडगी उकरण्यास सुरुवात केली. तेव्हा बौद्धांनी सत्याग्रह करण्याची तयारी चालविली. त्या जागेवर १४४ कलम लावून बौद्धांना त्या जागेत पाऊल टाकण्यास बंदी केली गेली. बौद्धांची कृतिसमिती सत्याग्रह करील असा पुन: अधिकाऱ्यांना इशारा देण्यात आला. ( नवशक्ति ५–२–७० पा. ५ )

२३ कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमात प्रत्येक जिल्ह्यात ठराविक मुदतीत ठराविक उच्चांक गाठण्यासाठी या कार्यक्रमाचे अधिकारी उत्तर प्रदेशात वाटेल त्या तरुण व वृद्ध नागरिकांना भूलथापा देऊन शस्त्रक्रिया करण्यास घेऊन जातात. आणि या शस्त्रक्रियेसाठी जे पैसे सदर लोकांना मिळतात त्यात सदर अधिकारी प्राप्तीचा वाटा बळजबरीने उपटतात, याबद्दलचे वृत्तान्त जनतेत पसरलेले आहेत. या अत्याचाऱ्यांच्या विरुद्ध लेखी तक्रार करणाऱ्या अस्पृश्यांना हे अधिकारी मारहाण करीत असतात. सीतापूर जिल्ह्यातील ( उत्तर प्रदेश ) बऱ्याच खेड्यांतून अस्पृश्य तरुण शस्त्रक्रियाची जबाबदारी चुकविण्यासाठी दूरवर पळून गेलेले आहेत. ही सर्व घटना लांछनास्पद आहे.

"This whole episode is disgraceful" असे टाईम्स ऑफ् इंडियाने Current Topics मध्ये मत प्रदर्शित केले आहे. (२–३–७० पा. ८)

२४ रत्नागिरीच्या प्राथमिक शाळेत ११–६–६९ रोजी एका बौद्ध शिक्षकेची अब्रू घेण्याचा प्रयत्न पाच सवर्ण हिंदूंनी केला होता. ते प्रकरण दाबण्याची धडपड संबंधित सवर्ण हिंदूंनी केली. पण बौद्धांनी ते प्रकरण कोर्टात नेले. त्याचे काय झाले असा प्रश्न श्री. ज. ग. भावे यांनी ३–३–७० ला मुंबई विधान परिषदेत विचारला. तेव्हा राज्यगृहमंत्री श्री. कल्याणराव पाटील यांनी खुलासा केला की, मोहन मनोहर शेरे व वसंत गणपत दळी ( दळवी ) यांना न्यायालयाने ४ महिन्यांची सक्त मजुरी व ३०० रु. दंड अशी शिक्षा दिली आणि वामन मलुष्टे, नरहर उर्फ बाळू भटांगे व रमेश तथा बाबू शेटे यांना सोडून दिले. ( नवशक्ति ४–३–७० पा. ४ )

२५ गोलेगाव, ता. भूम जि. उस्मानाबाद येथील अस्पृश्य जातीची विधवा स्त्री श्रीमती शांताबाई मल्हारी मस्के ही आपल्या जमिनीचे प्रकरण सरकारी अधिकाऱ्यांच्याकडे घेऊन गेली; तेव्हा तिला समजले की, आपली जमीन दुसऱ्याच्या नावावर नोंदविलेली आहे. तेव्हा तिने जाहीरपणे अधिकाऱ्याला धमकी दिली की, हा अन्याय लौकर दूर केला नाही तर सार्वजनिक ठिकाणी आत्मदहन करीन. अधिकाऱ्यांनी योग्य कृती करून सदर स्त्रीचे प्राण वाचवावेत. नाहीतर या प्रकरणाचे परिणाम गंभीर होतील, असा इशारा जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे चिटणीस श्री. कदम यांनी दिला. ( नवशक्ति, ५–३–७०, पा. ५ )

२६ २०-२-७० रोजी सिंगनाक, ता.निलंगा जि. उस्मानाबाद येथील रकमाबाई महार ही ६५ वर्षांची वृद्धा शेजारच्या गावाहून आपल्या गावी येत असताना हणमंता वडार या इसमाने तिला शेजारच्या शेतात ओढून नेले व ती आरडाओरड करीत असताच तिच्यावर त्याने जबरी संभोग केला. त्या धक्क्याने ती बेशुद्ध झाली. तिचा आरडाओरडा इतर लोकांनी ऐकला व ते तिच्या मदतीला आले. तेव्हा तो हणमंता पळून जाऊ लागला. लोकांनी त्याचा पाठलाग करून त्याला पकडून गावात नेले व पोलिसांच्या ताब्यात दिले. रकमाबाईला लोकांनी हॉस्पिटलात नेले पण तेथे २२–२–७० ला ती मेली. ( नवशक्ति, ७–३–७०, पा. ५ )

२७ "**गांधी जन्म शताब्दीत अस्पृश्यता**" असे शीर्षक देऊन २०–३–७० च्या नवशक्तीने ( पा. ६ ) अशी बातमी प्रसिध्द केली की, अकोला ( विदर्भ ) शहरापासून ३–४ मैलांवर असलेल्या चाचोडी या खेडयात पिण्याच्या पाण्याची फक्त एकच विहिर आहे व तीत फक्त सवर्ण हिंदूच पाणी भरत असतात. तेथील बौद्धांनी सदर विहिरीवर पाणी भरण्याचे ठरविले. तेव्हा हिंदूंनी विरोध केल्यानंतर रिपब्लिकन पक्षाने सत्याग्रह केला आणि कलेक्टर व इतर सरकारी कचेऱ्यांवर मोर्चे नेले. तेव्हा अधिकाऱ्यांनी बौध्दांना पाणी पुरविण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे सरकारने नवी विहीर खोदली, पण तिला पाणी लागले नाही. नंतर ७ – ८ हजार रुपये खर्चून दुसरी विहीर खोदण्यात आली. तिलाही पाणी लागले नाही. मग तिसरी विहीर १६–१७ हजार रुपये खर्चुन खोदण्याचे वचन अधिकाऱ्यांनी दिले; पण ते पाळले नाही. मग बौद्धांनी पाच महिलांना गांधींच्या जन्मदिनी ( २–१०–६९ ) हिंदूंच्या विहिरीवर पाणी भरण्यास पाठविले. तेव्हा हिंदूंनी सदर महिलांना अडथळा केला व त्यांना पोलिसांच्या स्वाधीन केले. कोर्टाने त्या महिलांना सव्वा महिन्यांची शिक्षा सुनावली. इतर लहानथोर बौद्धांच्यावरही खटले भरण्यात आले. सरकारी अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, महाराष्ट्र

विधान परिषदेचे उपसभापती श्री. आर. एस्. गवई हे सदर गावाला गेले व सवर्ण हिंदू व बौद्ध यांची त्यांनी समजूत घातली. बौद्धांना त्यांनी आश्वासन दिले की, सरकार तुम्हांला एक स्वतंत्र विहीर बांधून देईल. यावर नवशक्तीने अभिप्राय व्यक्त केला की, . . . अशा तऱ्हेने हजारो रुपयांची उधळपट्टी करून व अस्पृश्यता कायम ठेवून शेवटी डोंगर पोखरून उंदीर काढण्यात आला. ( नवशक्ती, २०-३-७०, पा. ६ )

१९५२ च्या सुमारास पाणी प्रकरण जंजिऱ्याजवळच्या एका गावात झाल्याचे वृत्त टाईम्समध्ये आल्याचे मला आठवते. एका सुशिक्षित अस्पृश्य तरुणाने त्या गावाच्या सार्वजनिक विहिरीवर स्वत: पाणी भरले. तेव्हा सवर्ण हिंदूंनी त्या तरुणाला मारले. त्याने मारेकऱ्यांवर फिर्याद केली. पण गावातील सवर्ण हिंदूंनी खोटे साक्षी पुरावे न्यायाधीशापुढे ठेवून निर्णय आपल्या बाजूचा करवून घेतला. सदर अस्पृश्य तरुणाने त्या निर्णयाविरूध्द अपील केले व निर्णय आपल्या बाजूचा करून घेतला. आरोपी सवर्ण हिंदूंना शिक्षा झाली व दंडही झाला.

२८ पारेगाव, ता. खानापूर जि. सांगली येथील मातंग समाजाचे श्री. नामदेव साठे यांचा दि. १२–८–६९ रोजी गांवगुंडांकडून बंदुकीच्या गोळयांनी आणि फरशी कुऱ्हाडींनी अमानुषपणे खून करण्यात आला. त्याचा तपास पोलिसांनी अद्याप केलेला नाही. याबद्दल आणि महाराष्ट्रातील अस्पृश्य समाजावर जे अन्याय व जुलूम होतात, त्याची सरकारकडून योग्य दाद लागत नाही, त्याबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी मानखुर्द येथे भरलेल्या मातंग समाजाच्या एका जाहीर सभेत ठराव मंजूर करण्यात आले. महाराष्ट्र मातंग सभेचे अध्यक्ष ॲड. प्रेमानंद आवळे हे मुख्यमंत्र्यांना ठराव देण्यासाठी भेटले. ( सांजमराठा, ३–४–७०, पा. ४ )

२९ कानडी, ता. येवले जि. नासिक येथील बौद्धांना हिंदू गावगुंड गेली ७-८ वर्षे छळत आले. त्यांनी बौद्धांच्या शेतजमिनीवर ( सर्वे नं. ६४–६५ ) आणि बौद्ध वस्तीवर अलीकडेच आक्रमण केले व संबंध वस्ती संपूर्णपणे उद्‌ध्वस्त केली. उद्‌ध्वस्त केलेल्या घरांची लाकडे, माती व इतर वस्तू या गुंडांनी नेल्या व स्वत:च्या गुरांचे गोठे त्या सामुग्रीने बांधले. बौद्ध लोक जीव वाचविण्यासाठी परागंदा झाले. श्री. माधव चेंडूजी साबळे यांनी असे जाहीर केले. आणि या प्रकरणाची फिर्याद कोर्टात केली व कलेक्टरने निर्णय बौद्धांच्या बाजूने दिला; पण गुंडाच्या भीतीमुळे बौद्ध परत या गावात रहावयास येत नाहीत. येवल्याचे फौजदार या गावात येतात, गुंडांचे ऐकतात व परत जातात. बौद्धांनी आपल्या गावात सुरक्षितपणे रहावे, याबद्दल कोणी काही करू शकत नाही. ( नवशक्ति, २७–४–७०, पा. ६ ).

३० मानवांचे बळी देवदेवतांना देण्याच्या प्रकरणांवर राज्यसभेत मार्च १९७० च्या पहिल्या आठवड्यात चर्चा झाली. तेव्हा सरकारतर्फे असे उत्तर देण्यात आले की, ही प्रकरणे बहुतांशी बनावट आहेत, असे चौकशीअंती समजले. परभणी जिल्हा ( महाराष्ट्र ) आणि आंध्रप्रदेश यांत हरिजन तरुणांचे बळी दिले, हे चौकशीअंती खोटे आहे, हे कळून आले. ( वरील क्रमांक (५) व (११) पहा) ( टाईम्स, करंट टॉपिक्स, ६–३–७०, पा. १० )

३१ शेड्यूल्ड कास्टस् आणि शेड्यूल्ड ट्राईब्स यांना सरकारी नोकऱ्यांमध्ये प्रवेश व त्यांना बढती देण्याच्या बाबतीत कोणते उपाय सरकारने योजलेले आहेत, याबद्दल माहिती विचारणारा प्रश्न प्रश्नांक ४८९९ ( २६–८–१९६९ ) खासदार श्री. बाबूराव पटेल यांनी विचारला त्याला. उत्तर श्री. जे. बी. मुथ्याल राव, कायदा व समाजहित खात्याचे मंत्री, यांनी दिले. ते अपुरे वाटल्यावरून श्री. पटेल यांनी अशी टीका केली की, सरकार शेड्यूल्ड कास्टस् यांना सरकारी नोकऱ्यांत खास सवलती देते, हे खरे; पण हरिजनांचे खून होतात, त्यांना जाळण्यात येते, त्यांना देवदेवतांपुढे कोंबड्या–बकऱ्याप्रमाणे बळी देण्यात येते, ते सवर्ण हिंदूंना खूष-करण्यासाठी हेही खरे. " special treatment is being given these days to the member of our Scheduled castes. Many of them are being murdered, burnts live, beaten and even cut like goats before stone goddesses to please the high castes ( Baburao Patel ) ( Mother India, February 1970, P. 36-37 )

३२ खासदार श्री. बाबूराव पटेल, संपादक, मदर इंडिया, मुंबई, यांनी प्रश्न प्रश्नांक ५०९८ ( २६–८–१९६९ ) विचारला की गेल्या तीन वर्षात प्रत्येक प्रांतात अस्पृश्यता निवारण कायद्यान्वये ( untouchability offences Act ) किती प्रकरणे उत्पन्न झाली व त्यांत अपराध्यांना कोणत्या प्रकारच्या शिक्षा सरकारने दिल्या या प्रश्नाला श्री. जे. बी. मुथ्याल राव, मंत्री, कायदा व समाजहित खाते, यांनी जी उत्तरे दिली, ती श्री. पटेल यांना समाधानकारक वाटली नाहीत. या बद्दल त्यांनी सरकारने सदर कायद्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी न केल्याबद्दल आणि ही बजावणी सवर्ण हिंदूच्या हातांत ठेवल्याबद्दल टीकात्मक उद्‌गार काढले ते असे–Harijans are being beaten, burnt and sacrificed like goats by caste hindus all over the country. They are denied common human rights. In Mysore they are not even allowed to take water from the wells, nor they are allowed to walk on the roads. There

is law to punish this; but it is in the hands of caste hindus. They never use the law and do not know even how many times The law has been enforced. - Baburao Patel (Moher India, February 1970, P. 4 2)

३३ खडकप्रसाद जि. देंगानल (ओरिसा) या खेड्यातील खंडायत (क्षत्रिय). सवर्ण हिंदूंनी २० मे १९७० ला अस्पृश्यांच्या ३० झोपड्यांना आग लावून सर्व अस्पृश्यांना सर्व दृष्टींनी निराश्रित केले. अस्पृश्य लोक आणि सवर्ण हिंदू यांच्यात बरीच वर्षे कलहाग्नी धुमसत होता. शेतीत अस्पृश्यांनी मोफत अगर कमी मजुरीत काम करण्याचे नाकारले अगर अस्पृश्यांनी स्वतःची प्रगती घडवून आणण्यासाठी चालू केलेली चळवळ ही सवर्ण हिंदूंना आवडली नाही, वगैरे कारणांनी हा कलहाग्नी धुमसत होता. त्याचा स्फोट रती नायक हा १८ वर्षाचा अस्पृश्य (पानो या लढाऊ जातीचा) व चिलो पायलो (क्षत्रिय) यांच्या भांडणामुळे झाला. पायलो हा ग्रामपंचायतीचा सभासद होता. तो नायकाला ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत एका उमेदवाराला मत देण्यास सांगत असता नायकाने पायलोला रागाने सांगितले की तू मला मतदान कोणासाठी करावे हे सांगणारा कोण ? दुसरे कारण असे सांगण्यात आले की, सत्यनारायण राऊत हा लष्करात नोकरीवर असलेला सवर्ण हिंदू आपल्या गावाहून खडकप्रसाद या गावाला आला, तेव्हा नायक व तीन अस्पृश्य तरुण यांनी त्याला लुटले व त्याच्याकडून ८५ रु. घेतले. तेव्हा त्याने मदतीसाठी आरडाओरड केली. त्याच्या मदतीसाठी तीन सवर्ण हिंदू धावून आले. त्यांतील एकाच्या पायावर नायकाने कुऱ्हाडीचा घाव घातला व तो आणि त्याचे तीन साथीदार पळून गेले. तेव्हा राऊतने पोलिसांकडे फिर्याद केली. पोलिसांनी चार अस्पृश्यांना कैद केले. लगेच सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांच्या झोपड्यांना आग लावली. आगात अस्पृश्यांच्या लहान मुलांना फेकण्याचा प्रयत्न केला. पण मुलांच्या लढाऊ मातांनी सवर्ण हिंदूंच्या हातांतून आपली मुले हिसकावून घेतली. त्या दूरवर पळून गेल्या. २०० सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांतील लहान थोरांना लाठ्यांनी मारले व तेथून त्यांना रात्री पिटाळून लावले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी निमसरकारी समिती नेमण्यात आली. सरकारने अस्पृश्यांचे पुनर्वसन करण्यासाठी १३००० रु. मंजूर केले. सवर्ण हिंदूंनी कोर्टात केस लढविण्यासाठी निधी गोळा करण्याचे हाती घेतले. अस्पृश्यांना यासाठी काहीही करता आले नाही. ( टाईम्स, २–६–७० पान ३ )

३४ मिसेस ऐझाझ रसूल, सदस्य, उत्तरप्रदेश विधानसभा, लखनौ, यांनी ता. १९–६–७० रोजी विधानसभेत असा प्रश्न विचारला की, अस्पृश्यवर्गीय विधवा कामगार स्त्रियांबरोबर सरकारी सिमेंट फॅक्टरीत सवर्ण कामगारांनी जबरी संभोग केले. त्याबद्दल सरकारने अपराध्यांना काय शिक्षा केली? हे वृत्त २०–६–७० च्या टाईम्समध्ये ( पा. ७ ) प्रसिद्ध झाले तेव्हा सदर प्रकरणाची सविस्तर माहिती मला कळवा म्हणून मी २२ जूनला सदर माननीय सदस्य महिलेला पत्राद्वारे विनंती केली. त्यांनी मला ६ जुलैला पत्र पाठवून कळविले की, जगिदिहाचे रहिवासी हरचंद यांची पत्नी श्रीमती कबुत्री आणि मर्धुवाचे रहिवासी राम बरकच यांची पत्नी श्रीमती ब्रिजीया यांच्याबरोबर सरकारी फॅक्टरी दाला जि. मिरझापूर येथे ता. ४–४–७० ला कामगारांनी जबरी संभोग केला. त्या स्त्रियांनी मिर्झापूर पोलीस ठाण्यावर तक्रार नोंदविली व पोलिसांनी त्या स्त्रियांची वैद्यकीय तपासणी करून इं. पी. कोडच्या ३७३, १४७, ३४२ व ३८४ या कलमाखाली अपराध्यांवर खटला भरला.

३५ नवशक्ति, शनिवार, ५ डिसेंबर १९७०, पा १ यात बौद्ध तरुणावर बलात्काराचा आरोप ठेवून धिंड काढली. श्रीवर्धन तालुक्यात **रानवली गावी गुन्हा. जसवली गावी शिक्षा. मुख्यमंत्र्याकडे बौद्धांतर्फे शिष्टमंडळ.** ही बातमी वाचून लाखो बायकांच्या मनात संतापाचे कल्लोळ उठले. हरिश्चंद्र नान्या हाटे हा रानवली गावचा बौद्ध तरुण चौदा नोव्हेंबरला गावाशेजारच्या रस्त्याच्या कडेला संडासानजिक बसला होता तिथे तीन बैलगाड्या असवली गावाहून आल्या. त्यात सहा पुरुष व एक स्त्री होती त्या स्त्रीने हाटे याच्याकडे बोट दाखवून त्या पुरुषाला सांगितले की याने मला धक्का मारला. त्या गृहस्थाने काही चौकशी न करता हाटे याच्यावर हल्ला केला व त्याला शिव्या देऊन जबर मार दिला. हाटे याचा आरडाओरडा ऐकून लोक तेथे जमा झाले व नंतर त्यांनी या प्रकरणात समझोता घडवून आणला. नंतर १६ नोव्हेंबरला जसवली गावचे सरपंच श्री. बडे रानवली गावाला आले व तेथील लोकांना या प्रकरणाचा विचार करण्याबद्दल एकत्र जमू या असे म्हणाले. २० नोव्हेंबरला श्री. गणपत कातकर ( कुणबी समाजाचे पुढारी ) हे रानवलीस आले व त्यांनी प्रमुख बौद्ध मंडळींना २० नोव्हेंबरला ( रविवार ) जसवलीला या प्रकरणाचा विचार करण्यासाठी या असे आमत्रण दिले. पण ते बौद्ध जसवलीला गेले नाहीत. त्याच दिवशी श्री. कातकर हे रानवलीला आले व हाटे आणि इतर चार बौद्ध यांना घेऊन परत जसवलीला गेले. या पाच बौद्धांच्या सुरक्षिततेची हमी श्री. कातकरांनी रानवलीच्या बौद्धांना दिली होती. जसवलीला त्याने सभा भरवली. तिचे अध्यक्ष जसवलीचे रहिवाशी हाजी सुलेमान फोफळकर हे होते.

यक्षांनी श्री. कातकर यांना सभेचे प्रयोजन विचारले व कातकर याने सांगितले की, १४ नोव्हेंबरला माझ्या पत्नीवर बलात्कार केला, याबद्दल गावातर्फे न्याय व्हावा. बलात्कार कोणी केला असे अध्यक्षांनी विचारले, तेव्हा कातकर म्हणाला की मी त्याला ओळखत नाही. पण त्याचे नाव हरिश्चंद्र नान्या हाटे आहे व त्याला आम्ही सहा जणांनी मारलेले आहे. त्या प्रकरणाचा न्याय देण्यासाठी पंच निवडले. त्या पंचांनी निकाल दिला की, हरिश्चद्राचे केस काढावेत, डोक्यास डांबर फासावे, गळयात चपलाची माळ घालावी आणि वाजंत्री लावून त्याची जसवली गावातून धिंड काढावी. त्याप्रमाणे हरिश्चंद्राची धिंड काढण्यात आली. त्याच्या अगोदर हरिश्चंद्राला योग्य न्याय मिळावा, त्याबद्दल जसवलीच्या रहिवाशांनी तरतूद केली नाही.

या प्रकरणाची दाद लावून घेण्यासाठी मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष श्री. सी. एच्. खरे यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्ट मंडळ मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना भेटले. त्या नंतर ३०–४० बौद्ध रानवली व जसवली या गावांना गेले व तेथील सवर्ण हिंदूंच्या पुढे आपले म्हणणे मांडले व बौद्धांना धीर दिला. त्यानंतर बौद्धांचे मोर्चे सरकारी कचेऱ्यांवर नेण्यात आले व आमच्यावरील अत्याचार दूर करा अशी त्यांनी अधिकाऱ्यांपुढे कैफियत मांडली. त्यानंतर श्री. बा. प. राऊत, सरचिटणीस तिल्लोरी, कुणबी समाजोन्नती संघ, यांनी मुंबईहून असे पत्रक प्रसिध्द केले की, रानवलीचे बलात्कार प्रकरण सत्य आहे. आणि सी. एच्. खरे यांनी लोकांची दिशाभूल करण्यासाठी चळवळ चालविली आहे. ( नवशक्ति, बुधवार २३–१२–७०, पा. ५ ) त्याला उत्तर म्हणून श्री. खरे यांनी असे पत्रक प्रसिध्द केले की, श्री. राऊत यांनी हे लपविले आहे, की पोलिसांनी हे प्रकरण आपसात मिटवा, हे पूर्वी सांगितले होते; आणि इतक्या उशिराने श्री. राऊत यांना पत्रक काढण्याचे शहाणपण सुचले हे विचित्र नव्हे का ? ( नवशक्ति, मंगळवार २९–१२–७० ) सरकारी यंत्रणेने या प्रकरणात अखेर हात घातला व १९-१-७१ ला बारा जणांना अटक केली. (१) हसन ईस्माईल बडे ( जसवलीचे सरपंच ) (२) गोविंद सुडक्या मंडवकर ( रानवली ) (३) महादेव कानू आडगावले (खेरडी) (४) हसनमिया अहमद बडे (जसवली) (५) कुडवळकर ( बौद्ध धिंडकेस विरोध करणारा पण बैठकीत भाग घेणारा ) (६) फोफळकर (७) सखाराम सोनू टाकळे ( हाटे याचे डोक्यास व तोंडास डांबर फासणारा आणि चपलांचा हार घालणारा ) (८) गणपत कातकर ( बैठक बोलवणार ) (९) पांडुरंग रामजी आदवडे (१०) भाग्या धोंडू आदवडे (११) रामचंद्र खोपटकर

( ९ ते ११ हाटे याला मारणारे ) आणि (१२) युसुफ अबदुल्ला ( मुंडण करणारा) भारतीय दंड विधानाच्या नं १४३, ३४२, ३५५, ३२६, व ५०४ या कलमान्वये २०–१–७१ रोजी महाड येथे फर्स्ट क्लास ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट श्री. एस्. डी. पंडित यांच्यापुढे उभे केले. प्रत्येकाला ३०० रु. च्या जमिनावर मुक्त करण्यात आले. श्री. खरे यांनी पत्रक काढून महाराष्ट्र–शासनाने हे प्रकरण न्यायप्रविष्ट करून घेतले, याबद्दल शासनाचे आभार मानले. ( नवशक्ति, शनिवार २३-१-७१, पा. ६ ) या प्रकरणाची पुन्हा सुनावणी ७–७–७१ आणि १६–७–७१ झाली. फिर्यादीतर्फे पोलीस प्रॉसीक्यूटर अॅ. गांधी काम चालवीत होते. त्यांचे सहाय्यक मुंबईचे रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते अॅ. एम्. बी. मोरवे, अॅ. डी. बी. बचाव अॅ. एस्. एस्. हे फणसे होते. आरोपीतर्फे अॅ. ओक हे काम पहात होते. ( नवशक्ति, ८–७–७१व १७–७–७१ )

शेवटची सुनावणी २३–७–७१ ला झाली. तेव्हा त्या खटल्याचे निकाल-पत्र न्यायमूर्ती एस्. डी. पंडित यांनी कोर्टात दुपारी वाचून दाखविले. त्यांनी १२ ही आरोपींना संशयाचा फायदा देऊन सोडून दिले. हरिश्चंद्र हाटे या बौद्ध तरुणाने सौ. सरस्वतीबाई कातकर या बाईची छेड काढली, हा आरोपीचा मुख्य मुद्दा गृहीत धरून त्याचा ५०० रुपयांचा जात मुलायजा एक वर्षासाठी घेण्याचा न्यायाधिशाने हुकूम दिला. या निकालाविरुद्ध अलीबागच्या सेशन कोर्टात अपील करण्याचे ठरविण्यात आले. हे अपील शेतकरी कामकरी पक्षाचे नेते आमदार दत्ता पाटील चालविणार असे प्रसिद्ध करण्यात आले. महाडच्या चवदार तळ्याच्या खटल्यातील अपील डॉ. आंबेडकर यांनी येथे चालविले होते. ( चरित्रखंड ३ पहा ) हे प्रकरण शेवटपर्यंत मुंबई हायकोर्टापर्यंत नेण्याचे रि. पक्ष, मुंबई प्रदेशचे चिटणीस सी. एच्. खरे यांनी जाहीर केले. (नवशक्ति, २५–७–७१, पा. ८ रविवार )

३६ सांगली जवळच्या गव्हाण या गावात मातंग समाजाची पाच घरे आहेत. २२–५–७१ रोजी श्री. केशवराव धोंडो भोसले या ६० वर्षाच्या मातंग वृद्धाने गावातील मारुतीच्या मूर्तीला सकाळी पाणी घातले. हे स्पृश्य वर्णीयांना समजले. तेव्हा सर्वजण मांगाने देव बाटविला म्हणून संतापले. उपसरपंच श्री. विठोबा सखाराम पाटील व पंडित शिवराम सुतार यांनी केशवरावांना बेशुद्ध होईपर्यंत मारले. गावातील मराठ्यांनी मांग लोकावर दहशत बसवली. म्हणून त्यांना पोलिसांकडे हे प्रकरण नेणे धोक्याचे वाटले. संयुक्त सोशॅलिस्ट पार्टीचे चिटणीस श्री. बिराज साळुंखे यांनी गव्हाण गावाला जाऊन या प्रकरणाची तक्रार डी. एस्.

थी. कडे केली व नंतर विठोबा पाटील व शिवराम सुतार यांना अटक करण्यात आली. केशवरावांचा मुलगा प्रल्हाद सैन्यात आहे. त्याला ही बातमी कळवली; तेव्हा तो रजा काढून वडिलांना भेटून गेला. केशवरावांना औषधोपचार कोणी केला नाही. परिषदेचा प्रतिनिधी अगर काँग्रेसचा ग्रामपुढारी अथवा काँग्रेसचा आमदार यांनीं या प्रकरणात लक्ष घातले नाही. गावच्या मराठ्यांनी अशी हूल उठवली की, केशवराव हा वेडसर आहे. ( नवशक्ति, ९–६–७१, पा. १ ) या प्रकरणाचा बराच गवगवा झाला. तेव्हा केशवरावांना औषधोपचारासाठी १५० रु. देण्याची घोषणा सांगली जिल्हा परिषदेचे समाज कल्याण खात्याचे सभापती श्री. एस्. एस्. कोलप यांनी गव्हाणच्या ग्रामसभेत १ जूनला केली. पण ती रक्कम केशवरावांना देण्यात आली नाही. (नवशक्ति, १९-६-७१, पान ३), ( २६-६-७१ पा. ३ ) जिल्हा परिषदेने १५० रु. केशवरावांना कर्ज म्हणून देण्याचे नंतर ठरविले, पण केशवरावांनी ते कर्ज स्वीकारण्याचे नाकारले.

संसोपाचे बिराज साळुंखे यांनी जनतेत वर्गणी जमा करून श्री. बाजीराव रामचंद्र ऊर्फ बाबा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गव्हाणच्या ग्रामपंचायत कार्यालयात सभा भरवून १५० रु. रक्कम श्री. केशवराव यांना सन्मानाने दिली. ( किस्ता २–७–७१ पा. ३ )

३७ डॉ. टी. एस्. नायर हे मद्रासचे एक अग्रणी वकील १८८५ ते १९२० च्या काळात ते होऊन गेले. ते ब्राह्मणेतर होते आणि त्यांच्यामुळे काँग्रेसमध्ये ब्राह्मणेतर सुशिक्षित आले. पण त्यांना काँग्रेसमधील ब्राह्मणी कुटिल डावपेचाचा वीट आला व त्यांनी १९१६ मध्ये ब्राह्मणेतर पक्ष व त्या पक्षाची तीन वर्तमानपत्रे स्थापन केली. हजारो सुशिक्षित ब्राह्मणेतर तरुण या पक्षात आले व हा पक्ष दि जस्टिस् पार्टी म्हणून १९१७ ते १९४४ च्या काळात ब्राह्मणी नेतृत्वाला खतम करण्यासाठी झटला. या प्रयत्नात श्री. इ. व्ही. रामस्वामी नाईकर (जन्म १८७०) यांचा सिंहाचा वाटा होता. यांनीच हिंदु–देवदेवता व अवतारी पुरुष यांना खेटरांच्या माळा घालून त्यांच्या मिरवणुकी काढण्याची व त्यांचे दहन करण्याची चळवळ १९५० ते १९७० च्या काळात करून ब्राह्मणेतरांच्या मानसिक गुलामगिरीची बंधने अंशतः तरी ढिली केली. जस्टिस पार्टीला त्यांनी ' द्रविड कझागम ' ( द्रविड संस्था ) हे नाव १९४४ मध्ये दिले व राजकीय क्षेत्रातील ब्राह्मणी वर्चस्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या धार्मिक अतिरेकी मोडतोडीमुळे त्यांचे शिष्य त्यापासून दूर झाले व त्यांनी १९४९ मध्ये ' द्रविड मुनेत्र कझागम ' ( द्रविड

प्रगतिकारक संस्था ) हा नवा राजकीय पक्ष स्थापन केला. या राजकीय पक्षाच्या हातात १९६९ पासून द्रविड प्रदेशाचा (मद्रास) राज्य कारभार आहे. ( **D.M.K in Power, by P. Spratt** ) सर्व दृष्टींनी पुरोगामी विचारसरणी असलेल्या य मद्रासी शासनाला अस्पृश्यांवर होत असलेले ब्राह्मणी व ब्राह्मणेतरी अत्याचार थांबविता आले नाहीत. त्यांची अनेक उदाहरणे वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली आहेत. त्यातील एक शेवालपुराई जि. द. आरकाट या मद्रासपासून १५० किलोमीटरवर असलेल्या खेड्यात एप्रिल १९७१ मध्ये घडून आले. या गावातील अस्पृश्यांनी सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरणे, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करणे, वगैरे गोष्टी केल्यामुळे गावातील सवर्ण हिंदू चिडले. त्यांनी अस्पृश्यांना सार्वजनिक रस्त्यांतून जाणे, (कारण अस्पृश्यांच्या पादस्पर्शाने हे रस्ते विटाळतात) प्रेते सार्वजनिक रस्त्यातून स्मशानभूमीकडे नेणे ( जून १९७१ मध्ये अस्पृश्यांची प्रेतयात्रा सार्वजनिक रस्त्यावर सवर्ण हिंदूंनी २४ तास अडवून ठेवली. पोलिसांच्या संरक्षणाखाली ती यात्रा स्मशानात नेली ) अशा प्रकारच्या तीस गोष्टींवर बंधने घातली. अस्पृश्यांनी फक्त एकाच रस्त्याने जावे यावे, असे बंधन घातले व तसा एक रस्ता ग्रामपंचायतीने तयार केला. या अत्याचाराविरुद्ध अस्पृश्यांनी ओरड केली तेव्हा सवर्ण हिंदूंनी दगड व काठ्या यांनी हल्ले केले. एक अस्पृश्य लहान मूल सार्वजनिक तळ्यात पाणी प्याले, तेव्हा सवर्ण हिंदूंनी त्या मुलाला बेदम मारले. तेव्हा अस्पृश्यांनी सवर्ण हिंदूवर हल्ले केले. मग सरकार मध्ये पडले. पोलिसांनी १४ सवर्ण हिंदूना अस्पृश्यता निवारण कायद्याखाली अटक केली. मग सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांना गावात येणे बंद केले. त्यांना दुकानांतून धान्य मिळू दिले नाही. त्यांना शेतकामावर आणि इतर क्षेत्रांत रोजगारी देणे बंद केले व शेजारच्या गावांनी त्यांना रोजगारी देऊ नये, अशी अस्पृश्यांची नाकेबंदी केली. अस्पृश्य लोक उपाशीतापाशी राहू लागले. सरकारने याबद्दल हूं की चूं केले नाही. गावातील अस्पृश्य व सवर्ण हिंदू यांच्यांतील स्त्री–पुरुषांचे प्रेमप्रकरण या गडबडीला कारणीभूत झाले, अशी एक वदंता होती. या प्रेमप्रकरणाची नायिका बहुधा सवर्ण हिंदू असावी. या प्रकरणाची माहिती टाईम्सपत्रात दोनवेळा आली. ती मी इथे देत आहे.

## ‘ HARIJAN ROAD ’

How can Harijans be blamed for feeling that there is a **built – in** hostility against them **in** the **administration ? A** new road has been constructed in a village in the south Arcot district of Tamil Nadu for their ‘ exclusive use. ’ It appears that the caste

hindus of the village objected to the 'pollution' of the regular road by harijans. Would this kind of open discrimination be possible if the district authorities had gone to their rescue ? Surely, those harijans who made the use of the road could have been given adequate police protection.

If the Tamil Nadu govrenment is serious about improving the lot of harijans in rural areas, it should immediately suspend the officials who agreed to the construction of what has come to be known as 'Harjan road.' What is more, action should be taken against the village Panchayat for its failure to protect the rights of harijans. There should be a specitic provision in the law to suspend or supersede such Local bodies as connive at casteist discrimination. ( The Times of India, Wednesday, 8-9-71, Current Topics, P. 8 )

'Tension in hamlet as Harijans are boycotted.

Madras, september 12 - Sevalapurai, a hamlet of 2. 000 people, 150 Kilometers from here, in south Arcot district, is in the grip of tension with caste hindus and harijans ranged on either side.

The Harijans face a virtual social boycott and economic sanction.

The authorties have restored the uneasy peace in the village after their posting a police contingent there in June in the wake of caste hindus banning harijans from using the public road. The police arrested 14 caste hidus under the untouchability ( offences ) Act. The village munsiff was also suspended.

## THE RETALIATION

The caste hindus retaliated by boycotting the harijans, refusing to employ them on farms or any other add jobs. They also urged neighbouring villages not to employ the harijans.

Then followed the denial of purchases from the grocery shop. Rice mill owners refused to hull their paddy.

The Harijans are, of course, not allowed to draw water from the village - pond and a harijan child which strayed into the pond to quench its thirst was allegedly beaten a few weeks ago.

Inquiries show that the prevailing bitterness has been accentuated by an affair between a man and a woman belonging to different castes.

The harijans also felt humiliated when three months ago a funeral procession was not allowed to pass through the public road. They had to abandon the body on the road for 24 hours, and latter senior officials had to escort the funeral procession. UNI ( The Times of India, Monday, 13-9-71. P. 11 )

३८ राजस्थानात अनेक ठिकाणी अस्पृश्यांवर जुलूम-जबरदस्ती होत असते त्यांपैकी दोन अहवाल मी येथे देत आहे.

## (अ) जोधपूरकडे रजपुतांचे हरिजनांवर अत्याचार

नवी दिल्ली; दि. १२ ( हिं. स. ) – गेल्या ८ सप्टेंबर रोजी जयपूर जिल्हृयातील पालावाला गावी १५०० रजपूत लोकांनी गावातील हरिजनांवर हल्ले केले. त्यांत २० हरिजन जखमी झाले असून त्यातील चौघांजणांची प्रकृती चिंताजनक आहे.

आज पालावाला येथील २० हरिजनांचे एक शिष्टमंडळ भारतीय हरिजन संघाचे नेते श्री. शिवनारायण सरसुणीया यांना भेटले व त्यांनी ही हकीकत वार्ताहरांना सांगितली.

हा हल्ला झाल्यानंतर गावातील सर्व हरिजन भीतीमुळे गाव सोडून दुसरीकडे निघून गले आहेत. हे हरिजनांचे शिष्टमंडळ येत्या सोमवारी पंतप्रधानांना भेटणार आहे. " ( नवशक्ति, सोमवार, १३-९-७१ )

(ब) पालावाला, रामपुरा, पलैरहा आणि भाक्री या जयपूर जिल्ह्यातील खेड्यांतील हरिजन रेघार व सवर्ण हिंदू यांच्यात जुलै ते सप्टेंबर १९७१ या काळात अनेकदा तंटे व मारामाऱ्या झाल्या, सवर्ण हिंदूंच्या छळांना त्रासून गेलेले या तीन गावांतील काही अस्पृश्य ( रेघार ) लोक आपली गावे सोडून आपल्या नातलगांच्या गावात जाऊन राहिले व काही तालुक्याच्या ठिकाणी बस्सी येथे

पोलिसांच्या आश्रयाला गेले. या मारामाऱ्यांत जखमी लोकांमध्ये अस्पृश्यांची संख्या जास्त आहे. पैकी १० लोकांना हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. तालुक्यातील खेड्यांतून पोलिसांची पथके अस्पृश्यांना संरक्षण देण्यासाठी फिरती ठेवण्यात आली. पण गाव सोडून गेलेले अस्पृश्य आपापल्या गावाला परत गेले नाहीत. पोलीस दुसऱ्या गावाला गेले की सवर्ण हिंदू अस्पृश्यांवर पुन: जुलूम करीत असत.

रेघार ही जात राजस्थानात चांभार जातीपेक्षा श्रेष्ठ मानली जाते. मृत जनावरांची कातडी सोलून काढणे, ती कमविणे, त्या कमविलेल्या कातड्यांपासून पाण्याच्या पखाली व मोटा तयार करणे, सवर्ण हिंदूंच्या शेतांत रोजगार करणे, त्यांच्या शेतांत वाटेकरी होणे, सवर्ण हिंदूंची पादत्राणे दुरुस्त करणे, हे रेघार जातीचे परांपरागत धंदे होत. मोटा तयार करणे, पादत्राणे दुरुस्त करणे, व शेतात रोजगार करणे याबद्दल सवर्ण हिंदू रेघार लोकांना धान्य देत असत. या जातीत शिक्षणाचा प्रसार झाला. त्यांचे शिक्षित लोक सरकारी नोकर झाले व त्यांच्यांत स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. तेव्हा त्यांच्यातील सुशिक्षितांनी जमातीची संघटना करून जाहीर सभेत हिंदूंची कामे बंद करण्याचे ठराव केले. त्या सभेत त्यांनी मागणी केली की धान्याच्या ऐवजी पैसे हिंदूंच्याकडून घ्यावेत. या लोकांनी पैशाची मागणी करण्याची आणि बहिष्काराची चळवळ सर्वत्र पसरवली तेव्हा सवर्ण हिंदूंना त्यांचा राग आला व ते या लोकांच्या पुढाऱ्यांना सरकारी नोकरीतील अस्पृश्यांना आणि त्यांच्या शेतांवर राबणाऱ्या व वाटेकरी लोकांना परोपरीने छळू लागले. या चळवळीमुळे हिंदू शेतकऱ्यांची मृत गुरे फाडणे, त्यांना नवीन मोटा मिळणे थांबले. तेव्हा त्यांच्या पिकांना विहिरीचे पाणी मिळेनासे झाले व पिके वाळून गेली फाटकी पादत्राणे आणि तुटक्या मोटा दुरुस्त होईनात; म्हणून सवर्ण हिंदू रेघारांना शिव्याशाप देत फिरू लागले. फाटक्या मोटा व तुटकी पादत्राणे यांना दुरुस्त करण्याची कामे रेघार जमातीतील काही लोक चोरून अगर उघड रीतीने करू लागले; तेव्हा रेघार जमातीच्या पंचांनी त्यांच्यावर वाळीत पुकारले. तेव्हा जातिबहिष्कारामुळे हैराण

झालेले हे जातिद्रोही लोक पंचांना शरण आले व त्यांनी सवर्ण हिंदूंची कामे करण्याचे सोडून दिले. या सर्व प्रकारामुळे सवर्ण हिंदूंनी व शेतकऱ्यांनी आपली संघटना " किसान संघर्ष समिती " या नावाने उभारली व तिच्यातर्फे रेघारांच्या सर्व व्यवहारांवर बहिष्कार पुकारला. त्यामुळे रेघारांना सवर्ण हिंदूंच्या शेतांत रोजगार मिळणे, वाटेकरीपण मिळणे, पिण्याचे पाणी त्यांच्या विहिरीतून मिळणे, त्यांच्या गुरांना चरण्यास जाण्याचे आणि त्यांना शेताकडे जाणे व घराकडे जाणे यांचे मार्ग बंद करण्यात आले. दुकानांतून धान्य, मीठ, तेल, मिळणे बंद झाले. सर्व बाजूंनी रेघारांचा कोंडमारा केल्यामुळे रेघार डबघाईस आले. त्यांनी सवर्ण हिंदूंना या अन्यायाबद्दल जाब विचारला. तेव्हा ३००–४०० सवर्ण हिंदूंनी त्यांच्या वस्तीत शिरून स्त्री, पुरुष व मुले यांना यथेच्छ मारले. त्यांच्या झोपड्या उद्‌ध्वस्त केल्या. आणि त्यांच्या सामानाची लूटालूट केली.* जाट, मिनास व ब्राह्मण लोक यांनी या मारामारीत व लूटमारीत मोठ्या त्वेषाने भाग घेतला होता. हे हल्ले वेळोवेळी २।३ महिने होत होते. या हल्लेखोरांपैकी बाराजणांना कैद केले आहे. रेघारांनी तालुका कचेरीत तक्रारी नोंदल्या. त्यात मुख्य तक्रार ही होती की त्यांनी सवर्ण हिंदू शेतकऱ्यांना ज्या मोटा दिल्या त्यांची किंमत एक लाख रुपयांची आहे. त्याबद्दल ते शेतकरी त्यांना धान्याच्या रूपाने अल्प मोबदला देऊ इच्छितात. तो आम्ही घेणार नाही. त्यांना सरकारकडून ज्या जमिनी मिळाल्या त्यांचा ताबा त्यांना सवर्ण हिंदूंनी घेऊ दिला नाही. सरकारी संरक्षण मिळाले की, हे शूर सवर्ण हिंदू शेपटी तंगडीत घालून स्वस्थ बसत. सरकारी संरक्षण संपले की, हिंदूंचे शौर्य अस्पृश्यांना सतावण्यास उड्या मारू लागे. हा धुमाकूळ बऱ्याच खेड्यांत चालू होता.

या प्रकरणाकडे स्थानिक, राजकीय पुढारी परंपरागत दृष्टिकोनातून बघतात. या लोकांनी शिक्षण घेऊ नये, नोकरीत जाऊ नये, सवर्ण हिंदूंच्या पुढे त्यांनी परंपरागत गुलाम म्हणूनच राहिले पाहिजे, आणि हे सर्व गुंडाळून ठेवून ते जर सवर्ण हिंदूंच्या पायरीवर येऊ लागले तर आम्ही सवर्ण हिंदू त्यांना रसातळाला पोहोचवू. सरकार त्यांना सरक्षण देते, ते आम्ही आमच्या बळावर जमीनदोस्त करू, अशी या स्थानिक राजकारणी सवर्ण पुढाऱ्यांची भूमिका आहे. या प्रकरणाकडे कानाडोळा करून बडे राजकीय पक्ष मूग गिळून बसले, त्यामुळे या गावठी हिटलरांचे राज्य या खेड्यांतून चालू राहते. या प्रकरणांचा दुसरा अहवाल मी खाली देत आहे.

* Rajsthan Harijan tribe fights exploitation '

- By T. M. Kaul.
' The Times of India ' News Service
JAIPUR, September 20.

The reghars have fled Palawala, Rampura, Paleraha and Bhakari villages in Jaipur district following a series of clashes with caste hindus over past two months.

They have sought refuge at Bassi, a tehsil headquarters, or with their relations in trouble - free hamlets.

Politcal observers here feel that if the factors behind the socio-economic tensions that have led to the clashes are not removed soon, the situation may worsen. Part of the trouble is traceable to politicians resisting socio - economic changes in the countryside.

So far, over 12 people have been arrested. Ten of the injured ( all Reghars, a community of scheduled caste people ) have been admitted to the local hospital. Though police units are patrolling the affected areas, in Bassi tehsil the Reghars have not so far returned to their hamlets.

The Reghars, who are a step higher than chamars in the social order, had for decades been skinning cattle, tanning hides, manufacturing and repairing ' charas ' ( leather bucket for drawing water from wells ) and repairing old shoes.

## 12 ARRESTED

While they used to be paid cash for providing new 'charas' they had to accept food grains at harvest time for the rest of their services.

Moreover, if a cultivator had more land than he and his relatives could look after, rghars used to be engaged as laboureres or allowed to sow crops on a share - cropping basis.

But with growing education among reghars, some of them have joined government services. These arrangements are no longer acceptable to the commnaity.

**A large number of meetings have been organised over the past few months to press the demand for a better deal for the reghars. At one of these meetings the reghars decided not to skin cattle or repair old ' charas ' and shoes.**

Practically every farmer in the countryside was affected by the decision. Some poor reghars, who were not educated or had no land, were willing to continue doing such work. But they too fell in line with the rest of the Community when heavy fine were imposed on them by the Community's emerging lead ership.

Well-water drawn through 'Charas' accounts for 90 (ninety) percent of the irrigation water in the area. The reghars are insisting on wages in cash for their services.

The farmers set up a Kisan Sangharsh Samiti to hit back at the reghars. The Samiti decided to impose a social boycot on the reghars. Groups of farmers including Brahmins, Jats, Minasi Scheduled Tribe, organised themselves and took back the fields leased out to the reghars on a share - cropping basis

**The Reghars were also barred from grazing their cattle in common fields. They were prevented from going to their fields or houses through traditional short - cuts. They were not even allowed to draw water from private wells. The supply of provisions from village shops was stopped.**

## HOUSES LOOTED

30 to 40 of the reghars, who had fled, had taken shelter in the Gangai temple at Bassi. They said the trouble was spreading to Bassi and many other villages.

These reghars complained that at Palewala 300 to 400 Jats, Minas and Brahmins surrounded their houses, beat up men, women and children and looted their property. At Bhakri, the reghars were prevented from drawing water from a private well. The Subdivisional Officer of Bassi got the well reopened, but it was again closed.

Despite the reprisals, the reghars seem determined not to repair old ' Charas ' or shoes, They are equally bent on not accepting food grains in lieu of wages.The community's leaders complain that farmers owe the reghars roughly Rs. 1 lakh towards ' Charas ' supplied to them over the past few years.

The reghars have another grievence. They say caste hindus do not want them to settle on their land. The reghars have, in some instances, not been allowed to take possion of land allotted to them by the government.

Surprisingly leaders of major political parties have shown little awareness of the consequences of the brewing trouble in the rural areas of Jaipur district. ( The Times of India, Tuesday 12-9-71 p. 3 )

३९ जातीयतेचे उच्चाटन करणारी गुजरात भागाची समिती हिची अहमदाबाद येथे ६ व ७ नोव्हेंबर १९७१ या दिवशी बैठक भरली. तिचे उद्घाटन करीत असता गुजरातचे राज्यपाल श्री. श्रीमान नारायण यांनी भाषणाच्या ओघात सांगितले की, जामनगर येथील हॉस्पिटलमध्ये एक सवर्ण महिला शस्त्रक्रिया करण्यासाठी दाखल झाली व तिला शस्त्रक्रियागृहात नेण्यात आले. शस्त्रक्रिया करणारा डॉ. अस्पृश्यच आहे, हे तिला समजले; तेव्हा तिने हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांना सांगितले की, मी रोगाने मेले तरी चालेल, पण मी अस्पृश्य डॉक्टरांचा हस्तस्पर्श घेऊन विटाळ करून घेणार नाही. राज्यपालांनी दुसरे एक उदाहरण सांगितले की, गुजरात सरकारच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनने एका उच्च सुशिक्षित तरुणाची सरकारी कॉलेजातील एका जागेसाठी निवड केली. तो तरुण त्या कॉलेजात नोकरीवर हजर राहाण्यासाठी गेला, तेव्हा तो अस्पृश्य जातीचा

आहे असे समजले. आमच्या कॉलेजात अस्पृश्य शिक्षक नको, असा सवर्ण हिंदू शिक्षकांनी गिल्ला केला. तेव्हा सदर अस्पृश्य तरुणाला घरी जावे लागले. या प्रकरणाची माहिती जी प्रसिद्ध झाली ती मी येथे देत आहे.

" Kiss of death preferred to Harijan's touch "

Ahmedabad, November 6, A caste Hindu woman at Jamnagar refused to get operated on when she came to know that the surgeon who was to operate on her was a harijan.

She was actually brought into the operation theatre. Even then she preferred to invite death rather then be touched by a harijan.

Narrating this incident, the Gujarat governor, Mr. Shriman Narayan said a highly qualified harijan youth was refused a job in a college in Ahmedabad even after being selected when the authorities came to know his community.

Mr. Narayan was inaugurating the two day convention of the gujarat unit of the anti communal committee here today. U. N. I. " ( The Times of India, Sunday, 7-11-71, p 9 )

## ' LIP SERVICE '

There is hardly a month without some shocking instance of the practice of uutouchability, supposedly outlawed on the day the constitution come into force 21 years ago and even of atrocities on harijans coming to light. These disturb the public conscience for a short period after which every one reverts to business as usual

Even so. the case of the Jamnagar woman revealed by the Governor of Gujarat Mr. Shriman Narayan is an extra-ordinary one. Taken to the operation theatre for emergency surgery she refused to let herself be touched by a harijan surgeon Told that

she might die if the operation was delayed. She replied that she would take the consequences.

There is obviouly no legal or administrative remedy against this kind of insanity. The tragedy is that the government often fails to intervene even in cases where it can do so effectively. Mr. Narayan also disclosed, for instance, that a doctor employed by the Gujarat Government was not allowed to join duty when it was discovered that he was a harijan. One hopes that the governor has made due amends for the disgusting way in which the doctor has been treated, The Government owes him a public apology. ( The Times of India, Tuesday. 9-11-71, Current Topics. P. 10 )

१७ अस्पृश्य लोक हे आपले परंपरागत गुलाम, सेवक आणि आपण दिलेल्या शिळ्यापाक्या अन्नावर लाचारीने जगणारे लोक आहेत. ते अलीकडे आपल्या मांडीला माडी लावून बसू लागले आहेत. ते आपल्या पूर्वपरंपरागत हक्कांना दूर सारून आपल्या वरच्या पायरीवर जाऊ पहात आहेत. आणि काही काळाने ते आपल्यावरही सत्ता गाजवतील, अशी भीती सवर्ण हिंदूंना पडलेली असल्यामुळे ते द्वेषाने, मत्सराने आणि चिडलेल्या भावनेने अस्पृश्यांचा अमानुष छळ करीत असतात. हा छळ पाप नाही, असे त्यांचे परंपरागत धर्मज्ञान, संस्कृती आणि श्रेष्ठपणाची जाणीव ही त्यांना गुप्तपणे सांगत असतात. यांना आपण हजारो वर्षे खोल गर्तेत डांबून ठेवले, ते आता स्वयंप्रज्ञेने वरवर जात आहेत, तेव्हा त्यांना खाली खेचणे हे आपले पवित्र कर्तव्य होय, असे सवर्ण हिंदू मानतात. म्हणून ते अस्पृश्यांचा छळ करतात. अमेरिकेतील निग्रोंना अमेरिकन लोकांनी आपले गुलाम म्हणून इ. स. १६०० ते १८६३ पर्यंत ( आणि त्यानंतरही ) राबविले. आणि त्यांचे जीवन पशूंच्या जीवनापेक्षाही नीचतम केले. जे ख्रिस्ती धर्माच्या चष्म्यातून या गुलामगिरीकडे पाहून तिचा धिक्कार करीत असत, त्यांना गुलामाचे व्यापारी आणि जमीन मालक उत्तर देत की, हे निग्रो गोऱ्या लोकांच्या सेवेसाठीच परमेश्वराने निर्माण केलेले आहेत आणि त्यासाठी ते नोहाने कॅनान याला शाप दिला -" Cursed be Canaan; a Servants of Servants Shall be be Into his brethren " ( old Testament, 9th Chapter, Genesis Verse 25 ), या बायबलमधील उद्गाराचा पुरावा देत असत. अमेरिकन लोकांचा १००-१५० वर्षे छळ सोसून निग्रो लोकांनी आपली सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याची

शिकस्त केली. यामुळे सदर निग्रो लोक गेल्या १०० वर्षांत इतके प्रगत अवस्थेत पोहोचले की, त्यांना आता अमेरिकेत स्वतंत्र राज्य हवे आहे. या उन्नत निग्रोंना चोपून काढण्यासाठी अमेरिकेतील धनाढ्य जमीनदार, कारखानदार आणि व्यापारी लोकांनी कु क्लुक्स क्लॅन ही गुप्त संस्था १८७० च्या आसपास स्थापून तिला कोटी कोटी डॉलर्सच्या देणग्या दिल्या. नाट्य, विद्या, व्यापार, खेळ, लेखन इत्यादी क्षेत्रांत स्वयंप्रेरणेने उन्नत होणाऱ्या निग्रोंचा खून करणे, त्यांची मालमत्ता जाळणे, त्यांच्या लहान थोर स्त्रियांच्याशी जबरीने संभोग करणे, इत्यादी त्यांचे सभासद व त्यांचे सहकारी करीत आलेले आहेत. जे जे सच्चे राष्ट्रप्रेमी आणि मानवतावादी अमेरिकन निग्रोंच्या बाजूने राहिले, त्यांचे खून करणे हे या क्लॅनचे प्रमूख ध्येय आहे. अब्राहम लिंकन ( १८०९-१८६५ ), जॉन केनडी (२९-५-१९१५ ते २२-११-१९६३ ), रॉबर्ट केनेडी ( २०-११-१९२५ ते ६-६-१९६८ ) आणि डॉ. मार्टिन ल्यूथर किंग ( १५-४-१९२९ ते ५-४-१९६८ ) यांचे खून करणारे लोक क्लॅनचेच हस्तक होते, असा बऱ्याच अमेरिकनांचा समज होता. कारण हे हुतात्मे निग्रोंच्या बाजूचे होते. गेल्या २०-२५ वर्षांत निग्रोंच्या स्वातंत्र्य चळवळीत ब्लॅक मुस्लीमस् व ब्लॅक पॅन्थर्स असे हिंसावादी पंथ अमेरिकेत बळावत चाललेत. गोऱ्या लोकांशी सशस्त्र लढे दिले पाहिजेत. हे या पंथाचे ब्रीद वाक्य आहे.

अस्पृश्यांवर छळ, गांजणूक आणि अत्याचार हे सवर्ण हिंदू करतात. त्यांची मनोभूमिका क्लॅनच्या सभासदांच्या मनोभूमिकेसारखीच आहे. हे स्पष्टपणे सांगणे इष्ट आहे. वेदादी हिंदूंचे पवित्र ग्रंथ यांनी हजारो वर्षांपूर्वी हिंदूंच्या मेंदूत उच्चनीच जातिभेदांचे विषारी इंजेक्शन दिले. त्या इंजेक्शनच्या कैफात सवर्ण हिंदू आणि अवर्ण हिंदू जगत आले. सवर्णांनी या कैफातच अस्पृश्यांवर अगणित अमानुष आणि जीवघेणे छळ केले व ते अस्पृश्यांनी त्या इंजेक्शनच्या कैफातच सहन केले. सवर्ण अवर्ण हिंदूंच्या मेंदूत जे इंजेक्शन रुतलेले आहे ते काढण्यासाठी या दोन्ही हिंदूंना **ब्रेनवॉशिंगची** जरूरी आहे. हिटलर आणि स्टॅलिन यांच्या कारकीर्दीत ब्रेनवॉशिंग या शब्दाचा जो अर्थ होता तो येथे अभिप्रेत नाही. आम्ही तुम्हांपेक्षा श्रेष्ठ आहोत असे म्हणविणारे सवर्ण हिंदू आणि आम्ही तुमच्यापेक्षा नीच आहोत असे म्हणविणारे अवर्ण हिंदू यांच्या मेंदूतून ही उच्चनीचपणाची भावना नष्ट करणे, हा इथे ब्रेनवॉशिंगचा अर्थ आहे. आणि त्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी जातपात-तोडक-मंडळाच्या १९३६ च्या लाहोर येथील अधिवेशनासाठी 'जात्युच्छेदन' या विषयावर जे इंग्रजी भाषण तयार केले होते, ( पण ते

परिषद न भरल्यामुळे वाचून दाखविले गेले नाही. ) त्यात जे उपाय सांगितले आहेत ते या ब्रेन वॉशिंगसाठी वापरणे इष्ट आहे. त्या उपायांचा सारांश असा–

(१) वेदादी धर्मग्रंथ परमेश्वराने निर्माण केले व म्हणून ते अत्यंत पवित्र होत. यांत मानवांना फेरफार करता येणार नाही, ही जी रूढ कल्पना आहे, ती खोटी आहे. (२) ते सर्व धर्मग्रंथ मानवांनी तयार केले म्हणून ते पवित्र नाहीत व त्यात परिस्थिती, कालान्वये योग्य ते फेरफार करणे इष्ट आहे, ही कल्पना समाजात रूढ केली पाहिजे. (३) धर्मग्रंथाचे पावित्र्य ही कल्पना नष्ट केल्यानंतर त्यात सांगितलेली चातुर्वर्ण्याची, जातिभेदांची व श्रेष्ठ कनिष्ठ भावनेची कल्पना आपोआप नष्ट होते. मग हिंदूंना एक संघ व शक्तिमान करण्याचे उपाय हिंदूंना हाताळता येतील व जातिभेदांच्या भिंती कोसळून पडतील. ( Annihilation of Caste, P. 60-61, by Dr B, R. Ambedkar )

१८ जोपर्यंत हिंदू हे उपाय योजणार नाहीत तोपर्यंत जातिभेद व श्रेष्ठ-कनिष्ठपण यांचे विषारी इंजेक्शन हिंदूंच्या मेंदूतून नष्ट होणार नाही आणि हिंदू अस्पृश्यांवर अमानुष जुलूम करीत राहतील व अस्पृश्यांना या छळांना कंटाळून मुसलमान अगर ख्रिस्ती धर्मांचा आश्रय करावा लागेल. मग भारतात दुसरे पाकिस्तान अगर ख्रिस्तिस्थान निर्माण होईल, हे भविष्य सांगण्याची जरूरी नाही. या पापाची सर्व जबाबदारी सवर्ण हिंदूंच्या धर्मघातक, समाजघातक व देशघातक मनोवृत्तीवर राहील.

१९ गांधी जन्म शताब्दीच्या काळात घडलेली दुसरी लक्षणीय घटना म्हणजे स्वामी लक्ष्मण चैतन्य ब्रह्मचारी महाराज यांनी सौराष्ट्रातील कानपार या खेड्यात २७ सप्टेंबर १९६९ ला प्रचंड यज्ञ करण्याची केलेली घोषणा ! हजारो वर्षांपूर्वी अयोध्येत जो अश्वमेध श्रीरामचंद्राने केला होता, तशा प्रचंड स्वरूपाचा हा यज्ञ करण्याचे कार्य ब्रह्मचारी महाराजांनी योजले होते. तेव्हा काही श्रीमंतांनी या पवित्र धार्मिक कृत्यासाठी लाखो रुपयांच्या देणग्या महाराजांना देण्याचे वचन दिले. या यज्ञात हजारो खंडी धान्य, तूप वगैरे वापरण्याचे जाहीर झाले. यासाठी सुमारे १२ कोटी रुपयांचा खर्च होईल, असे जाहीर झाले. होते. १७ सप्टेंबरला सोन्याच्या नांगराला बैल जोडून भूमिपूजन करून यज्ञभूमी नांगरणे व १९ सप्टेंबरला यज्ञ सुरू करणे, असे जाहीर करण्यात आले. ( नवशक्ति, १३–९–६९ पा. ५, टाईम्स, १३–९–६९ पा. १५ ) स्वामींनी १६ सप्टेंबरला तीन हजार

प्रेक्षकांच्या समोर दोन बैल सोन्याच्या नांगराला जुंपून यज्ञभूमी नांगरली व यज्ञाच्या कामाला सुरुवात केली. (नवशक्ति, १८-९-६९ पा. ३) या समारंभाला राजे महाराजे, श्रीमंत व्यापारी आणि १०० ब्राह्मण उपस्थित होते. ब्राह्मणांना दक्षिणा भरपूर देण्याइतके पैसे जमले नव्हते. या समारंभासाठी उंट, तमासगीर, घोडेस्वार यांची एक मैल लांबीची मिरवणूक यज्ञभूमीकडे आली. त्या मिरवणुकीचे छायाचित्र टाईम्समध्ये १९-९-६९ ला ( पा. ९ ) प्रसिद्ध केले होते. ४० तोळ्यांचा सोन्याचा नांगर करून देण्याचे आश्वासन श्रीमंतांनी दिले होते. ते त्यांनी पाळले नाही. म्हणून ब्रह्मचारी महाराजांनी यज्ञसमारंभी लोखंडी नांगराला सोन्याने मढवून यज्ञभूमी नांगरली. १२५ फूट उंचीचा ध्वजस्तंभ भूमीवर उभारला होता. तो अग्रभागी जळाला. त्यामुळे ध्वजारोपण होऊ शकले नाही. जमलेल्या हजारो प्रेक्षकांचा हिरमोड झाला. ( नवशक्ति, २०-९-६९ ) या कोटीचंड यज्ञात प्रमाणाबाहेर धान्य खर्च होणार म्हणून या यज्ञात धान्याची नासाडी करू नका म्हणून सरकारने बंदी हुकूम बजावला. तेव्हा ब्रह्मचारी महाराजांनी यज्ञ समारंभ स्थगित केला.

२० मी ही हकीकत येथे देत आहे, त्यात माझा एवढाच हेतू आहे की, धर्माच्या नावाखाली धार्मिक वृत्तीचे लोक हिंदूंच्या अंधश्रद्धेचा कसा विपरीतपणे उपयोग करतात व स्वतःचे स्तोम समाजात माजवितात, हे वाचकांच्या नजरेत आणावे. हिंदू धर्माची पीठे, मंदिरे, देवळे व तीर्थस्थाने येथे जे द्रव्यनिधी आहेत; त्यात कोटी कोटी रुपये पडून राहिलेले आहेत. त्यातील बराच भाग ब्राह्मण-भोजने, धार्मिक उत्सव, समारंभ वगैरे बाबतींत खर्च होत असतो. या अफाट द्रव्याचा उपयोग जर दरिद्री, मागासलेले वर्ग, अदिवासी, भटके वगैरे लोकांच्या मुलामुलींना विद्यादान देण्यासाठीच, या लोकांना राहण्यासाठी स्वच्छ घरे बांधण्यासाठी इत्यादी कार्यात केला गेला तर हिंदू समाजात एकदोन पिढ्यांत सुशिक्षित, सुसंस्कृत, सेवाभावी आणि सुधारक लोकांची निर्मिती होईल आणि हिंदूसमाज प्रगतीच्या पायऱ्या चढतचढत शिखराला जाईल. या संबंधी राजा राममोहन राय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, बॅ. विनायकराव सावरकर इत्यादी समाजसुधारकांनी हिंदूंना खूप उपदेश केला. पण हिंदूंच्या अज्ञानावर व अंधश्रद्धेवर जळवाप्रमाणे जगणाऱ्या हिंदुधर्म मार्तंडांना ते अद्याप पटलेले नाही.

२१ गांधी शताब्दीच्या काळात घडलेली तिसरी लक्षणीय घटना म्हणजे राष्ट्रीय

स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक माननीय श्री. माधवराव सदाशिवराव गोळवलकर गुरुजी (जन्म १९–२–१९०६) यांनी मुंबईच्या 'नवाकाळ' दैनिकाला ३१ डिसेंबर १९६८ ला दिलेली मुलाखत. ती सदर दैनिकात १-१-६९ ला " सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरुजी यांची मुलाखत. भारतातील बहुतेक अल्पसंख्य पूर्वी हिंदूच, त्यांना स्वगृही बोलावणे उचित " या शीर्षकाखाली ( पा. १ व ४ ) आणि ' अस्पृश्यांना स्पृश्य करणारा नवा साधा विधी ! श्री. गोळवलकर गुरुजी यांचा खास उपक्रम. ' या शीर्षकाखाली २-१–६९ ला ( पा. १ व ४ ) प्रसिध्द झाली होती. या मुलाखतीत गुरुजींनी जी ब्राह्मण्यग्रस्त विचारसरणीची मते प्रगट केली त्यामुळे महाराष्ट्रातील तर्कनिष्ठ व सुधारक प्रवृत्तीच्या लोकांत खूप खळबळ माजली. या मतांना खोडून काढणारी भाषणे व लेखही काही वृत्तपत्रे व मासिके यातून प्रसिध्द झाले होते. राष्ट्रसेवा दल प्रकाशन, पर्वती, पुणे ९ या संस्थेने गुरुजींच्या परंपरावादी मतांचा समाचार घेणारे चार विद्वान लेखकांचे लेख ' चातुर्वर्ण्य, श्री. गोळवलकर गुरूजी आणि राष्ट्रीय एकात्मता ' या पुस्तिकेत १८–४–६९ ला प्रसिध्द झाले. या पुस्तिकेत नवाकाळचा दिनांक दिलेला नाही. गुरूजींच्या जीर्ण मतांचा निषेध करणाऱ्या तीन सामाजिक समता पदयात्रा महाराष्ट्रात निघाल्या. एक निपाणीहून २७-४–६९ ला, दुसरी पुणे व तिसरी मुंबई येथून सप्टेंबर १९६९ मध्ये.

२२ वेदादी धार्मिक ग्रंथ हे ईश्वरनिर्मित आहेत हे मत गुरुजींनी मुलाखतीत अप्रत्यक्षपणे व्यक्त केलेले आहे. हे मत खोडून काढणारे लेख आतापर्यंत अनेक विद्वानांनी लिहिलेले आहेत. वेदांतील ऋचा ( मंत्र ) निरनिराळ्या ऋषींनी रचलेल्या आहेत आणि त्यांची नावे सदर ऋचांच्या अग्रभागी लिहिली आहेत. काही ऋचा विश्ववारा, घोषा, सूर्या, गुहू, वाक्, इंद्राणी, श्रद्धा, सन्वी, सार्पराजी, रोमशा, लोफमुद्रा, ध्वसनी इत्यादी स्त्रियांनी रचलेल्या आहेत. त्यांतील बहुसंख्य स्त्रिया ब्राह्मणेतर समाजांतील होत्या. ( ऋग्वेदाचे मराठी भाषांतर पा. ७४९ – ७५९ ) यांची नावे सदर ऋचांच्या अग्रभागी दिलेली आहेत. ऋग्वेदातील बऱ्याच ऋचांमध्ये निसर्गाचे काव्यमय वर्णन आहे. काही ऋचांमध्ये उषा, सूर्य, वरुण, इंद्र, मरुत वगैरे देवदेवतांच्या प्रार्थना आहेत. आम्हांला विपुल अन्न, धान्य, गाई, संतती द्या, आमच्या शत्रूंचा नाश करा, वगैरे मागण्या या प्रार्थनेत आहेत. उदा. (१) आमची संपत्ती हजारांनी वाढव, अशी उषेला मागणी ऋग्वेद मंडल १, सूक्त १२४, यात आहे. (२) एखादा तरुण पुरुष ज्या प्रमाणे तरुणीच्या मागे जातो त्या प्रमाणे हा सूर्य अत्यंत आकर्षक अशा उषेच्या मागे जात आहे, असे

निसर्गाचे काव्यमय वर्णन ऋग्वेद मंडल, सूक्त ११५, यात आहे. (३) ऋग्वेद मंडल ७ ऋचा ५–२७ यात सोमस्तुती आहे. (४) वैदिक काळातील समाजातील रूढ झालेल्या नियोग पध्दतीने संतती निर्माण करण्याच्या चालीचा उल्लेख ऋग्वेद मंडल १०, सूक्त १८ यात आहे. मृत पतीच्या शवासमोर विलाप करणाऱ्या स्त्रीला त्या उल्लेखात असे म्हटले आहे की, तू आता शांत हो. दिराशी पुनर्विवाह कर आणि संतती निर्माण कर. (५) यम हा भाऊ व यमी ही बहीण यांचा संवाद ऋग्वेद मंडल १०, सूक्त १० यात दिलेला आहे. यमी यमाला म्हणते, तू माझ्याशी संभोग कर व मला संतती होऊ दे. यम तिला नकार देतो. यमी त्याची समजूत परोपरीने घालते. यम आपला आग्रह सोडत नाही. ( ऋ. म. भाषांतर पा. ६३१–३२ ) (६) स्वनय राजा व त्याची पत्नी रोमशा यांचे संभोग शृंगारासंबंधीचे संभाषण ऋग्वेद मंडल, १ सूक्त १२६, ऋचा ६–७ यात दिलेले आहे. (६) ( स्वनय म्हणतो, ) " संभोगसमयी मुंगसाप्रमाणे घट्ट चिकटून राहणारी आणि रेताने बरबटलेली रोमशा मला शेकडो भोग देत आहे. " (७) ( रोमशा म्हणते : ) मला तू घट्ट मिठी मार. गंधारदेशीय मेंढीप्रमाणे दाट केसांनी झाकलेले माझे अवयव वरकरणी लहान भासत असले तरी ते तसे नाहीत. ( कित्ता पा. १२६ ) (७) इंद्र व त्याची पत्नी इंद्राणी यांच्यातील भांडण व नंतर समेट झाल्याचे वर्णन ऋग्वेद मंडल १०, सूक्त ८६, यात आहे. त्यातील १६ व १७ ऋचा यांचा अर्थ– १६ ( मैथुनोत्सुक इंद्राणी म्हणते ) हे इंद्रा, दोन मांड्यांच्या दरम्यान लोंबते लिंग असणारा मनुष्य संभोगास असमर्थ असतो. झोपल्या अवस्थेत ज्याचे लिंग ताठते तोच संभोग करू शकतो–इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

(१७) ( इंद्राणीच्या प्रस्तावाविषयी अनुत्सुकता दर्शविणारा इंद्र म्हणतो ) हे इंद्राणी, दोन मांड्याच्या दरम्यान लोंबते लिंग असणारा मनुष्यच ताठ लिंग-धारी व्यक्तीपेक्षा अधिक चांगला संभोग करू शकतो. इंद्र सर्व श्रेष्ठ आहे. ( कित्ता पा. ६८०–८१ )

(७) वृत्रवधार्थ.... सिद्ध होण्यापूर्वी मित्रतुल्य अग्नीने इंद्राप्रीत्यर्थ तीनशे पशू शिजवले. ( ते भक्षिल्यानंतर ) मनूच्या तीन यज्ञपात्रातून इंद्र सोमरस प्याला.

(८) तीनशे पशूंचे मांस आणि सोम सेवन करून अहिवध करणाऱ्या हे इंद्रा, सेवकाला पुकारणाऱ्या धन्याप्रमाणे देवगण तुला युद्धसाह्यार्थ आवाहन करतात. ( कित्ता ५–२९–७–८ वा. ३३२ )

तीनशे पशू हे रेडे होते. आणि यज्ञपात्रे म्हणजे मोठे हांडे. असे अर्थ इतरत्र पहावयास मिळतात.

ऋग्वेदातील ऋचा या परमेश्वराचे श्वास होत. त्या परमेश्वराने निर्माण केल्या, असे मानणाऱ्या धर्ममार्तंडांनी, या ऋचांमध्ये देवदेवतांच्या प्रार्थना, विपुल धनधान्य, संतती, गायन वगैरे मागण्या, नियोग पद्धतीने संतती निर्माण करण्याची समाजरूढी, यम–यमीचें संभोग भाषण, राजा व राणी यांचे संभोग शृंगाराचे भाषण, इंद्र व इंद्राणी यांची संभोगाबद्दलची चर्चा वगैरे मानवी समाजाला लागू पडणारे उल्लेख आलेले पाहूनही ऋग्वेद हा ईश्वरनिर्मित म्हणणं म्हणजे मूर्खपणाची परिसीमा होय. ऋग्वेद हे पवित्र म्हणता; मग त्यात संभोग, शृंगार, सामाजिक रूढी या घाणेरड्या गोष्टी कशा काय आल्या ? का ऋग्वेद प्रसवणारे परमेश्वराचे तोंडच गटार होते ? सारांश वेदादी धार्मिक ग्रंथ हे ईश्वर-निर्मित व वंदनीय होत, ही ब्राह्मणी भूमिका अत्यंत तिरस्करणीय आहे.

२३ चातुर्वर्ण्य हे परमेश्वराने निर्माण केले हे परंपरागत मत गुरुजींनी व्यक्त केले. हेही सपशेल चुकीचे आहे हे मी वरील परिच्छेद ३ ते १५ आणि २० यात जे विवेचन केलेले आहे, त्यावरून स्पष्ट होईल. चातुर्वण्याची कल्पना पुरुषसूक्ता–तील बाराव्या ऋचेतून पुढे वैदिक काळाचा ३–४ हजार वर्षांचा काळ लोटल्यानंतर निर्माण झाली. या पुरुषसूक्ताच्या ऋचा ऋग्वेदात १६ आहेत. ऋग्वेदानंतर यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, वाजसनेयी संहिता, अर्णय संहिता, मंत्रायणी संहिता, काठक संहिता, तैत्तिरिय आरण्यक, शतपथ ब्राह्मण, सांख्यायन श्रौतसूत्र, कात्यायन श्रौतसूत्र, मानवश्रौतसूत्र, श्वेताश्वतर उपनिषद, मुंडक उपनिषद, श्रीमद् भागवत या धार्मिक ग्रंथांतही पुरुषसूक्त आहे. त्याच्या ऋचांची संख्या १६ नाही. (१) वाजसनेयी यजुर्वेदात ( ३१–१–२२ ); (२) काण्व यजुर्वेद ( अ ३५।९–२२ ) २२ आहे. (३) तैत्तिरिय आरण्यकात ती १८ आहे. (४) सामवेदात ( ६–४। ३–७ ) ती ७ आहे. आणि (५) अथर्ववेदात ( १९।६।१–१६ ) ती १६ आहे. या भिन्न भिन्न ऋचांतील काही शब्द ऋग्वेदात असलेल्या पुरुषसूक्तातील शब्दांपेक्षा वेगळे आहेत. या ऋचांत ४ वर्गांची उत्पत्ती ज्या पद्धतीने सांगितलेली आहे, ती ऋग्वेदातील पुरुषसूक्तातील ऋचात सांगितलेल्या उत्पत्तीपेक्षा अगदी निराळी आहे. भागवतात तर बरीचशी वेगळी आहे. ( पुरुष सूक्त, पान ३३, सातवळेकर ) मी ही सविस्तर माहिती येथे देत आहे ती एवढ्याचसाठी की ( चातुर्वर्ण्य ) चार वर्ग परमेश्वराने निर्माण केले हे गुरुजींचे ( आणि इतरांचेही ) मत कसे खोटे आणि

जनतेची दिशाभूल करणारे आहे, हे वाचकांच्या लक्षात यावे. या पवित्र पुरुषसूक्ताची चिरफाड करून त्याला १०–१५ ग्रंथांत घुसडून देणारे मानव होते, हे काम परमेश्वराचे नव्हे ! म्हणूनच ऋचांची संख्या व त्यांतील शद्ब ही निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळ्या अवस्थेत आली, हे उघड होते. हे हस्तलाघव ब्राह्मण वर्गाचे होते. कारण सर्व धार्मिक ग्रंथ त्यांच्या ताब्यात होते. पुरुषसूक्ताची अशी मोडतोड ब्राह्मणांनी केली; तेव्हा त्यांनी पुरुषसूक्ताच्या पावित्र्याची पत्रास ती काय ठेवली? पुरुषसूक्ताचे पावित्र्य समाजात रुजवून ब्राह्मण वर्गाने हिंदू समाजाची भयंकर दिशाभूल गेल्या काही हजारो वर्षांत चालवलेली आहे.

२४ सवर्ण हिंदूंच्या छळांना कंटाळून हिंदुसमाजातील खालच्या जातीतील लोक मुसलमान व ख्रिस्ती झाले. जे मुसलमान झाले त्यांच्या हस्ते गेल्या १००–१५० वर्षांत जेव्हा हिंदू मुसलमानांचे दंगे झाले, तेव्हा मुसलमान पुढाऱ्यांनी हिंदूंच्या छातीत सुरे भोसकल्याचे कार्यक्रम या धर्मांतरित मुसलमानांच्या हस्ते यशस्वी करून दाखविले आणि याच धर्मांतरित मुसलमानांच्या संख्याबळावर त्यांनी भारतात पाकिस्तान निर्माण केले. जे हिंदू मुसलमान अगर ख्रिस्ती झाले, त्यांना परत हिंदू धर्मात आणणे उचित असे गुरुजींना आता वाटत आहे. सदर धर्मांतरित लोक सुमारे ३००० जातिभेदांनी छिन्नविछिन्न झालेल्या हिंदू धर्मात परत येण्यास तयार होतील काय ? झालेच, तर गुरुजी त्यांना कोणत्या जातीच्या खुराड्यात जागा देतील ? या प्रश्नांचा खुलासा गुरुजींनी आपल्या मुलाखतीत केलेला नाही.

२५ अस्पृश्यांना स्पृश्य करण्याचा एखादा विधी तयार करावा व त्या विधीने अस्पृश्यांना स्पृश्य करून घ्यावे, असा एक मुद्दा गुरुजींनी आपल्या मुलाखतीत उपस्थित केलेला आहे. हा विधी कोणी तयार करावयाचा ? हिंदूधर्माचे चार शंकराचार्य हे वेदादी धर्मग्रंथातील समाजघातक विचारसरणीचे संरक्षक आहेत.

मां हि पार्थ व्यपाश्रित्य ये ऽ पि स्यु : पापयोनय : ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्ते ऽ पि यान्ति परां गतिम् । ९–३२ गीता.

अस्पृश्य हे पापयोनीत जन्मलेले व त्यांना परमेश्वरानेच अस्पृश्य केलेले आहे, असे या नरपुंगवांचे परांपरागत मत आहे. मग ईश्वराने जन्मत: अस्पृश्य केलेल्या लोकांना शुद्ध करणारा विधी तयार करावयाचा म्हणजे परमेश्राच्या निर्मितीला

बाध आणण्याचे पाप हे धर्मरक्षक करतील हे स्पष्ट होते. चातुर्वर्ण्य हे परमेश्वराने निर्माण केले म्हणून ते पवित्र व त्यात मानवाला काही फेरफार करता येत नाही, या मताचा घोष करणारे गुरुजी अस्पृश्यांना शुद्ध करण्याचा विधी करावा असे म्हणतात, ही त्यांची भूमिका परस्परविरोधी व हास्यास्पद आहे, हे उघड आहे. एखाद्या शंकराचार्याने असला विधी तयार केला तर तो स्वीकारावयास अस्पृश्य लोक तयार होतील काय? हा विधी स्वीकारणे म्हणजे ब्राह्मणी वर्चस्व स्वीकारणे, हे समजण्याइतके ज्ञान अस्पृश्यांना झालेले आहे. आणि महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारसरणीचे जे अस्पृश्य लोक पाईक आहेत, ते आंबेडकरांच्या एका उद्गाराचे अनुकरण करतील. सवर्ण हिंदू आणि अस्पृश्य लोक यांच्या संघर्षाच्या संबंधात आंबेडकर आयर्लंडच्या होमरूल चळवळीतील जॉन एडवर्ड रेडमंड ( १८५१–१९१८ ) व त्यांचे विरोधक सर एडवर्ड हेन्री कार्सन ( १८५४–१९३५ ) यांच्या झगड्याचे उदाहरण देत असत. कार्सन हा अल्पसंख्यांक प्रॉटेस्टंट ( उत्तर आयर्लंड ) गटाचा पुढारी होता. आणि रेडमंड हा बहुसंख्य रोमन कॅथॉलिक गटाचा ( दक्षिण आयर्लंड ) पुढारी होता. होमरूल बिलाला प्रॉटेस्टंट गटाचा विरोध होता. या गटाने आयर्लंडचे दोन भाग व्हावेत, पण होमरूल बिल लागू करू नये, असा हट्ट धरला. तेव्हा आयर्लंडचे दोन तुकडे होऊ नयेत म्हणून रेडमंड कार्सनला म्हणाला, की तुम्हां प्रॉटेस्टंट अल्पसंख्याकांना हव्या त्या संरक्षण सवलती आम्ही देतो. पण तुम्ही आयर्लंडचे दोन तुकडे करू नका. त्यावर कार्सन रागाने म्हणाला, "Damn your safeguards, we don't want to be ruled by you." ( तुमच्या संरक्षण सवलतींचा धिक्कार असो ! तुमचे वर्चस्व आम्हांला नको आहे ! ) होमरूल आयर्लंडमध्ये आले की, राज्यकारभार बहुसंख्य रोमन कॅथॉलिक गटाच्या हातांत जाणार होता. गुरुजींचा शुद्धिविधी अस्पृश्यांच्या पुढे कोणी नेला तर त्यांना अशाच तऱ्हेचे उद्गार ऐकावे लागतील. निदान ते अस्पृश्य एवढे तरी म्हणतील की, आम्हांला शुद्ध करणारे तुम्ही कोण ? आम्ही मूळचे शुद्ध आहोत. ते तुमच्या उलटचा असलेल्या डोळ्यांना आतापर्यंत दिसलेले नाही.

२६ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही लाखो सभासदांची संघटना गुरूजींच्या हातात आहे. या संघटनेचा उपयोग ते हिंदू समाजातील जातिभेद, धार्मिक वेडगळ समजुती आणि कर्मकांडांच्या महारोगांनी फिदफिदलेले आचार यांना नष्ट करून हिंदुसमाज एकसंघ, प्रबळ व प्रतापशाली व्हावा म्हणून प्रयत्न करतील, अशी दुःखी व दुबळ्या हिंदूंची समजूत होती. पण गुरूजींनी हजारो वर्षे चावून चावून चोथा झालेल्या

मतांची मुलाखतीत उजळणी करून त्या दुर्दैवी हिंदूंची घोर निराशा केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संस्था ब्राह्मणांची आहे आणि त्या संस्थेतर्फे हिंदू समाजात पर्यायाने भारतात ब्राह्मणांचे वर्चस्व स्थापन करण्याचे ध्येय संघाचे आहे, असा सर्व-साधारणपणे ब्राह्मणेतर हिंदूंचा व इतर अहिंदूंचा समज ( वा गैरसमज ) आहे. गुरूजींच्या मुलाखतीतील विचारसरणी वाचून हा समज दृढ होण्याचा जास्त संभव आहे.

२७ " कृण्वन्तो विश्वमार्यम् " ( आम्ही सर्व विश्व आर्यमय करू ) अशा घोषणा आर्यांनी गेल्या ५–६ हजार वर्षांत केल्या. पण त्यांनी समाजात हजारो जाती निर्माण करून हिंदुसमाजाला नि:सत्त्व केले व आपल्या वंशजांना परकीयांचे गुलाम केले. " हिंदुस्थान हिंदूका, नही किसीके बापका. " अशी घोषणा १९४० पासून देऊन हिंदू महासभेच्या पुढाऱ्यांना १२ ऑगस्ट १९४७ ला भारताचे दोन तुकडे झालेले पाहणे भाग पडले. हे तुकडे करण्याचे कार्य हिंदूंच्या नीचपणाला कंटाळून मुसलमान झालेल्या अस्पृश्यांनी केले, तरी हिंदूंना जातिभेद नष्ट करण्याचे सुचले नाही व अजूनही सुचत नाही. गुरुजींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघापुढे अखंड भारताचे ध्येय ठेवलेले आहे. पण ते साध्य करण्यासाठी ते पोथीनिष्ठ उच्चनीच जातिभेदांचे अस्तित्व टिकवून वरकड उपायांचा शोध घेत आहेत. गुरुजी आपले पोथीनिष्ट जातिभेदांचे विचार जर सवर्ण हिंदू समाजाच्या आणि अस्पृश्य समाजाच्या गळी उतरविण्याचा युक्तिप्रयुक्तीने प्रयत्न करतील तर अस्पृश्य समाजाला इस्लामी अगर ख्रिश्चन आश्रय घेणे भाग पडेल आणि लो. टिळक ( २३–७–१८५६ ते १–८–१९२० ) यांनी १९१६ सालात लखनौ करार करून मुसलमानांना पाकिस्ता-नचा पाया घालण्यास जशी संधी दिली, तशी गुरुजी हे भारतात दुसरे पाकिस्तान अगर पहिले ख्रिस्तीस्तान यांचा पाया घालण्याची संधी निर्माण करणारे थोर पुरुष होत, असे भावी इतिहासकार ठरवतील, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होईल काय ?

२८ गुरुजींना हिंदुसमाज एकसंध, बळकट व राष्ट्रीय ऐक्याचा आदर्श म्हणून करावयाची मनापासून इच्छा असेल तर त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे खालील गोष्टी साध्य करण्यासाठी प्रचंड चळवळ उभी करावी.

(अ) वेदादी हिंदूंचे धार्मिक ग्रंथ हे मानवांनीच निर्माण केलेत व त्यांत योग्य ते फेरफार समाजाच्या ऐक्यासाठी करणे इष्ट आहे. ही विचारसरणी हिंदुसमाजात रूजविणे.

(ब) पूजा, विवाहादी धार्मिक विधी वगैरे करण्याचे अधिकार सर्व हिंदूंना आहेत, ही विचारसरणी हिंदुसमाजात रुजविणे. हे अधिकार पूर्वपरंपरेने ब्राह्मणांनी लाटलेले आहेत. ते नष्ट करणे जरूर आहे. यासाठी मद्रास प्रांतात ( तामीळनाडू ) द्रविड मुन्नेत्र कळघम् सरकारने कायदा करण्याचे ठरविलेले आहे. त्रावणकोर देवस्वम् बोर्डाने केरळ प्रांतात ब्राह्मणेतरांना पूजादी विधी शास्त्रोक्त पद्धतीने करता यावेत म्हणून ' तंत्र वेदान्त शाळा ' यातून विद्यार्थी तयार करण्याचे कार्य हाती घेतलेले आहे. ही शाळा कोट्टायमपासून २७ किलो-मीटरवर असलेल्या तिरुवल्ली या ठिकाणी आहे. तीत आठ सवर्ण हिंदू व दोन अस्पृश्य विद्यार्थी आहेत. त्यांनी दोन वर्षांत अभ्यासक्रम पुरा करावा व सनदा मिळवाव्यात. बोर्डाच्या अंमलाखाली जी मदिरे आहेत; त्यांत त्यांना नोकरी करावी लागेल. ( मदर इंडिया, मे १९७०, पा. ५७, ) सं. खासदार बाबूराव पटेल.) या देवस्थान मंडळाने नऊ ब्राह्मणेतर पुजारी नेमलेत. त्यांत दोघेजण अस्पृश्य वर्गीय आहेत. ( नवशक्ति, १९–१०–७०, पा. २ ) गुरुजींनी संघातर्फे अशी शाळा सुरू करावी.

(क) हिंदू जातीतील तरुण–तरुणांचे विवाह साजरे करणारी केंद्रे सर्व भारतभर संघातर्फे चालू करावीत. संघातील अविवाहित सभासदांनी आंतर-जातीय विवाह केलाच पाहिजे, अशी अट संघाच्या घटनेत घातली पाहिजे.

२९ गुरुजी व संघ यांनी वरील परिच्छेदातील गोष्टी अमलात आणल्या तर हिंदू समाजाचे दृढीकरण एका पिढीत होईल आणि संघाचे उद्दिष्ट अखंड भारत करण्याचे आहे ते ताबडतोब साध्य करता येईल. जर या गोष्टी साध्य केल्या तर त्यांचे ( हिंदूंच्या दृढीकरणाचे ) जे कार्य श्रीराम व श्रीकृष्ण यांना करता आले नाही, ते गुरुजी व संघ यांनी केले, अशी नोंद भारताच्या भावी इतिहासात केली जाईल. आणि ते कीर्तीने अमर होतील पण हे प्रचंड व भरीव राष्ट्रकार्य श्री गोळवलकर गुरुजी करू शकणार नाहीत, असे वाटते. कारण त्यांच्या विचारसरणीला व जातिश्रेष्ठत्वाच्या अहंकाराला मूठमाती देणारे हे कार्य आहे. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यांच्यावर आतापर्यंतचे जे अत्याचार सवर्ण हिंदूंनी केले त्याविरुद्ध निषेधाचे अवाक्षरही तोंडातून काढले नाही. मुसलमानी अत्याचारावर ते ज्या हिरीरीने आग ओकून भाषणे करतात ती लक्षात घेतली म्हणजे मी मांडलेले वरील मुद्दे वाचकांना पटतील.

३० गांधी जन्मशताब्दी समारंभाच्या काळात चौथी लक्षणीय घटना म्हणजे

जगन्नाथपुरीचे श्री. शंकराचार्य यांनी पाटणा ( बिहार ) येथे ३१ मार्च १९६९ ला भरलेल्या द्वितीय हिंदू–परिषदेत अस्पृश्यतेचे केलेले शास्त्रोक्त समर्थन हे होय. अस्पृश्य लोक पशूपेक्षाही हीन दर्जाचे आहेत. त्यांचा दर्जा शास्त्रांनीच ठरविलेला आहे आणि त्यात कोणालाही काहीही फेरफार करता येणार नाही; अशा अर्थाचे उद्‌गार श्री. शंकराचार्यांनी काढले होते, असे काही वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केले होते. भारताच्या घटनेतील कलम १७ या अन्वये अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा होय. ह्या कायद्याचा भंग करणारे श्री. शंकराचार्यांचे हे भाषण होय. म्हणून शंकराचार्यांच्यावर बिहार सरकारने कायदेशीर इलाज करावा, अशी मागणी भारतातील काही भागांतून आली तेव्हा बिहार सरकारने खटला भरण्याची तयारी केली. मध्यंतरी श्री. शंकराचार्यांनी खुलासा प्रसिद्ध केला की, मी पुरीच्या पीठाचा प्रमुख आहे. आणि पीठाची शास्त्रोक्त आचारसंहिता व परंपरा अस्पृश्यांना हीन लेखण्याची आहे. ती पाळणे, हे माझे कर्तव्य आहे. व्यक्तिशः मी सुधारक असलो तरी सुधारक मतांचा उच्चार मला जाहीरपणे करणे शक्य नाही. खटला भरण्यास भरपूर पुरावा न मिळाल्यामुळे बिहार सरकारने खटला भरण्याचे रहित केले.

त्यानंतर संयुक्त सोशॅलिस्ट पक्षाचे श्री. शिवानंद तिवारी यांनी श्री. शंकराचार्यांवर खटला भरला. पण तो न्यायाधीशाने नामंजूर केला. अस्पृश्यता पाळा असे लोकांना सांगणे, हा गुन्हा होतो; पण एखाद्या व्यक्तीने अस्पृश्यता वैयक्तिक जीवनात पाळली तर तो गुन्हा होत नाही, असे सदर न्यायाधीशाने मत व्यक्त केले. ( टाईम्स ५–६–६९ पा. ३ )

श्री. शंकराचार्यांनी गोरक्षणासंबंधी जे भाषण दिल्लीत केले होते, त्यासंबंधी २–४–६९ ला लोकसभेत चर्चा झाली होती. त्या चर्चेत काही खासदारांनी श्री. शंकराचार्यांच्या मतावर टीका केली. त्या टीकेमुळे श्री. शंकराचार्यांची बदनामी झाली म्हणून त्याबद्दल २६००० रु. ची नुकसान भरपाई मागणारी फिर्याद तेजकरण जैन आणि इतर व्यक्ती यांनी श्री. शंकराचार्यांचे शिष्य म्हणून सुप्रीम कोर्टात केली. तो खटला २९–४–७० ला सुनावणीस निघणार होता. ( टाईम्स, २२–४–७०, पा. १ ) तो नंतर सुप्रीम कोर्टाने फेटाळला.

३१ अस्पृश्यता–निवारण, हरिजन–उध्दार, समाज–समता वगैरे गोंडस नावांखाली भारतातील सर्व प्रदेशांत जी ढोंगबाजी सवर्ण हिंदूंनी गेल्या ४०–४५

वर्षांत चालवलेली आहे तिचा स्फोट आतापर्यंत अनेक वर्तमानपत्रे, लेखक व वक्ते यांनी प्रामाणिकपणे केलेला आहे. या क्षेत्रात डॉ. आंबेडकर यांचे कार्य अद्वितीय आहे. हिंदूंच्या मेंदूत धार्मिक ग्रंथाच्या शिकवणुकीचे जे विषारी इंजेक्शन भिनलेले आहे, ते नष्ट करण्याचा आंबेडकरांनी १९१९ ते १९३४ च्या काळात प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही. मग त्यांना धर्मांतराची घोषणा १३–१०–३५ ला करावी लागली. ही घोषणा योग्य होती, हे तर्कनिष्ठ, विचारी, राष्ट्रहितवादी आणि मानवतावादी व्यक्तींना स्पष्टपणे कळून येईल. यासंबंधीचा साद्यंत व साधार इतिहास मी या सहाव्या खंडात दिलेला आहे. हे सर्व मान्य करण्यास जो हाडाचा हिंदू तयार होणार नाही. ' स वै युक्तो ऽ थवा पशु : ' असेच त्याच्याबद्दल म्हणावे लागेल. अशा विचारसरणाच्या हिंदूंच्यापुढे १९७० सालात अस्पृश्यांना हिंदू व राज्यकर्ते कसे वागवितात याचा नमुना मी येथे ठेवीत आहे.

## SHOCKING

India has its own version of aprtheid. Harijans in some parts of Madhya Pradesh have complained that they were prevented from voting in local election under dire threats of punishment. Even the few harijans who manage to get themselves elected are often made to sit separately at panchayat meetings, and now comes the report from a village near Patiala, where the panchayat has segregated the houses of harijans by putting up a barbed wire-fence around them.

The kind of idiocy can be combated in only two ways. Either the state governments withdraw aid frome all panchayats which practice untouchabitity in any form or harijans are encouraged, to stand up for their rights and district officials come to their aid The main responsibilty here is that of the secular parties which have failed to come to make common cause with the harijans A study team of the new congress has just completed a survey of harijan disabilities in Punjab. There is no point in collecting data if the bill to act is not there (The Tims of India, 28-3-70 current topics, p. 8)

दक्षिण आफ्रिकेत गोरे लोक तद्देशीय काळ्या लोकांना रसातळाला नेण्यासाठी जे उपाय योजतात ते ' अपरथीड ' ( Aparthied ) या नावाने वर्णद्वेषावर

उभारलेले असतात. भारतातील 'अपरथीड' काहीसे निराळेच आहे. मध्यप्रदेशातील हरिजनांनी अशा तक्रारी केलेल्या आहेत की, सवर्ण हिंदू हरिजनांना मतदान करू देत नाही. कोणी हरिजन मतदानाचा हक्क बजावण्यास धजला तर सवर्ण हिंदू त्याचा सर्व बाजूंनी छळ करतात. त्यामुळे त्या गावात राहणे जिकिरीचे होते. जे हरिजन ग्रामपंचायतीत निवडून येतात, त्यांना पंचायतीचे अधिकारी पंचायतीच्या इमारतीबाहेर बसण्यास भाग पाडतात. पतियाळानजिकच्या एका गावात ग्रामपंचायतीने हरिजनांच्या वस्तीभोवती काटेरी तारांचे कुंपण घातलेले आहे. या कोंडवाड्यातून बाहेर जावयाचे व बाहेरून आत यावयाचे, हे सवर्ण हिंदू ठरवतील त्याचवेळी ! या हेतूने हे कुंपण घातले गेले होते, हें उघड आहे. सवर्ण हिंदूंच्या असल्या समाजघातकी कृत्यांना आळा घालणे जरूर आहे. (१) प्रांतिक सरकारांनी अशा ग्रामपंचायती अगर इतर संस्था यांना अनुदान देऊ नये आणि (२) हरिजनांनी आपल्या हक्कांची अंमलबजावणी प्राणपणाने केली पाहिजे व त्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांना सहाय्य केले पाहिजे. धर्मातीतपणाचा झेंडा ज्या राजकीय पक्षांनी हातात घेतलेला आहे त्यांनीही या बाबतीत हरिजनांना संपूर्णतया सहाय्य करावे. पंजाब प्रांतातील हरिजनांच्या परिस्थितीची पहाणी करण्यासाठी नव्या काँग्रेसने एक समिती नेमली होती. तिचा अहवाल अजून प्रसिद्ध झालेला नाही. हरिजनांचे कष्टप्रद जीवन सुखी व्हावे असे प्रांतिक सरकारला वाटत नाही. म्हणूनच हरिजनांची दिशाभूल करण्यासाठी त्याने चौकशीचा डोंबाऱ्याचा खेळ सुरू केला.

श्री. जयपाल (दिल्ली) यांचे २६-४-७० चे पत्र 'Indian Apartheid' या नावाने टाईम्सच्या २८-४-७० च्या अंकात ( पा. १० ) प्रसिद्ध झालेले आहे. त्यात ते लिहितात की, अस्पृश्यांवर जुलूम, जबरदस्ती भारतातील सर्व प्रांतांत होत असतात, हे सत्य आहे. गेल्या निवडणुकीत उत्तर प्रदेशातील अस्पृश्य मतदारांना भारतीय क्रांति-दलाच्या कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रावर मतदानासाठी जाऊ दिले नाही. हा प्रकार चालू असताना पोलीस अधिकारी व मतदान केंद्रावरील अधिकारी डोळ्यांवर कातडे ओढून मख्खपणे दुसऱ्या दिशांकडे पहात होते ३२) वरील काही स्तंभांतून सवर्ण हिंदूंच्या नीच मनोवृत्तीची जी उदाहरणे मी दिलेली आहेत, त्यावर कळस म्हणजे भारतातील काही ब्राह्मण अस्पृश्यांना ज्या शैक्षणिक व नोकरीविषयक सवलती मिळतात, त्या आपल्या मुलांना मिळाव्यात म्हणून आपले पुत्र अस्पृश्यांना प्रत्येक वर्षांच्या मे व जून मध्ये दत्तक देतात व सरकारी सवलती मिळवितात. या दत्तकपुत्रांचे शिक्षण चालू असता त्यांचे दत्तक पिताजी सदर

ब्राम्हणाचे अंगण झाडून त्यांच्या शिळ्यापाक्या तुकड्यावर जगत असतात. ( हे दत्तकपुत्र शिक्षण संपल्यानंतर नोकरीत शिरतील व नंतर ब्राह्मण म्हणून मिरव, तील, हे काय सांगायला हवे ? ) या संबंधीची काही उदाहरणे राजस्थान-मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश येथील काही भागात नजरेस आली. त्याबद्दल शिड्युल्ड कास्टस् अँड शिड्यूल्ड ट्राईब्स, दिल्ली, यांच्या नजरेस हा ब्राह्मणी अत्याचार आणून दिला व त्याबद्दल योग्य ती कायदेशीर उपाय योजना करा, असे कमिशनरसाहेबांना सुचविले. कमिशनरसाहेबांनी भारत सरकारच्या कायदेखात्याकडे हे प्रकरण पाठविले. सदर खात्याने कमिशरसाहेबांना सल्ला दिला की, ही दत्तक प्रकरणे कायदेशीर रीतीने झाली असतील तर त्या बाबतीत सरकारला काही करता येत नाही. ही बाब कमिशनरसाहेबांनी १९६७–६८ च्या आपल्या अहवालात नमूद केलेली आहे. ती अशी :–

## CHAPTER 7

List of scheduled castes and sheduled Tribes ( Articles 341 and 342 )

73 The University grants commission brought to the notice of this office a press report indicating that some students in Delhi had successully bypassed the admission rules of professional and arts colleges, by taking recourse to the law of adoption, by getting themselves adopted by scheduled castes, to enjoy concessions granted to scheduled caste students The University grants commission also stated that the persons concerned possessed certificates from competent authorities, authorised by the ministry of home affairs in this behalf, as proof that they belonged to the scheduled castes. The commission, therefore, requested this office to consider law it could be ensured that only genuine candidates got concessions intended for scheduled castes. The matter was taken up with the Department of social welfare for obtaining legal advice.

**And the advice given is that the legal status of a high caste child adopted by a scheduled caste family would make him eligible to treatment as a member of the adopters**

cast if the adoption satisfies the conditions laid down in the Hindu Adoption and Maintenance Act, 1956. In the case of the scheduled tribes, however, the said enactment does not apply and the guiding factor in such cases will be whether the customs of the concerned tribe permit the adoption of a non-tribed into the tribe and whether the particular adoption in question is covered by the customs. "

(Report of the commission for scheduled castes & sheduled tribes, 1967-68, Vols I & II, page 33, Seventh Report. )

या ब्राह्मणी कायदेशीर अत्याचारासंबंधी वर्तमानपत्रांतून, हरिजन सेवक संघ अगर दलितांच्या सेवेबद्दल हंबरडा फोडणाऱ्या व सरकारी मलिदा मटकावणाऱ्या संस्था यांच्याकडून निषेधाचे सूर उठवल्याचे प्रसिद्ध झालेले नाही. खासदार श्री. बाबूराव पटेल यांनी या बाबतीत ब्राह्मणी पोटभरू वृत्तीवर व सवर्ण हिंदूंच्या हिजडेपणावर सपाटून कोरडे ओढलेत. ते असे–

## ' Synthetic Harijans of India.

For the first time in several thousand years, harijans are in special demand. In fact, brahmins and caste hindus, who have inflicted a million tortures on our poor and helpless harijans through milleniums of wicked caste history, are now willingly ' adopting ' harijan fathers in many states of the country.

This adoption is neither a penitential measure on the part of caste hindus nor is it an act of long delayed justice to our poor harjans. It is purely a temporary and fraudulent measure of selfish interest by the caste hindus. It is just another dirty trick which the caste hindus are playing upon the poor and helpless harijans when they adopt the harijans as ' Fathers ' for their own Brahmin sons.

In Rajastan and Madhya pradesh, aodption ceremenies, in which scions of brahmin families like sharmas; Varmas, Shuklas, Vajpeyees, Chaturvedis etc. are given in adoption to harijan

families of some Jatavs or Solankis, usuallv take plece by the score, in the months of May and June every year.

People wonder whether there is really a change of heart on the part of the caste hindus, whether they have really decided to embrace the harijans as their long last brothers, whether they have really reconciled themselves to the truth that harijans have the same flesh and blood as the caste hindus, whether they have at last stumbled upon the historical truth that in the vedic times there was no untouchability and no separation between man and man.

Whenever hariajans hear of some such 'adoption' ceremony in their own town they of ndly permit their minds to speculate in such optimistic thoughts and actually see a new sun rising for them on their old horizon of sufferings.

But when they attend the 'adoption' ceremony, they find the harijan servant to be 'adopted' as the 'father' for the brahmin son of the family still sweeping the verandah and cleaning utensils even which a fraudulent 'adoption' ceremony is being performed with the son sitting before the sacrificial fire all by himself and reciting some unitellegible 'mantras' in Sanskrit.

Then slowly and painfully the real purpose of the 'adoption' ceremony leaks out when 18 years old Shyama Charan Shukla' previonsly a Brahmin boy, appears as Shyama Charan Jatav, the son of Bhure Lal Jatav - a "chamar" [ untouchable ] by caste - in the application form submitted for admission to the local medical college.

This miracle of a brahmin boy suddenly acquiring a legally adopted harijan father is performed by our secular state which under Article 46 of our constitution directs that 'the state shall promote with special care the educatioal and economic interests of the weaker sections of the people and, in particular, of

scheduled castes and the scheduled tribes and shall protect them from social injustice and all forms of exploitation.

**Every educational institution in the country has a certain fixed quota of admissions reserved for the harijan students. But our harijans are poor and helpless, too poor and too helpless to help themselves by educating their chidren. Millions of harijan children do not get even primary education, leave alone any higher education. Our harijans never have enough money even to satisty half their hunger. To such people, education is a luxury which they can not afford. No one in the hindu society wants to help these poor and helpless harijans to improve their conditions of life. On the contrary they are kicked down and kept down by caste hindus in varions wicked ways.**

In persuance of artical 46 of the constitution, laws have been enacted to protect the interests of the harijans and to give them a fair deal in life, but all these laws have to be enforced by caste hindus who are in charge of administration. These high caste bastards never enforce the laws for the benefit of the harijans, even if they see harijans tied to the stake and burnt alive.

**And now the Brahmins of Raiasthan, Madhya Pradesh, Uttar Pradesh and other states - the shrewd old bones of opprtunism – are robbing the harijans, even of their statutory right of admission into educational institution by persuading the harijans to ' adopt ' brahmin boys as their sons, merely to get admissions into the colleges for these brahmin sons. Harijans-group of eternally hungry people - are thus selling their names and' parentage ' to the brahmins and high caste landlods.**

This demonical misuse of artical 46 of the constitution by fabricating synthetic harijans overnight must be immedately stopped by a penal law punishing all those involved in the fraud. All educational institutions must be severely punished for aiding and abetting the cause of Artical 46. (Mother India, 1970,p. 8-10)

खासदार श्री. सूरजभान यांनी या प्रकरणाचा स्फोट लोकसभेत केला व

या दुष्कृत्यांना संपूर्ण आळा घालण्यासाठी लोकसभेत Hindu Adoption Act or Reservation usurpation, Act " हा कायदा मांडण्याचा मनोदय 'upright' (spokeman of the oppressed, suppressed and depressed, South Avenue, New Delhi') या आपल्या इंग्रजी पाक्षिकात १ नोव्हेंबर १९७० ला जाहीर केला. हा कायदा केव्हा मंजूर होईल व झालाच तर त्याची अंमलबजावणी काटेकोरपणाने होईल की नाही, याबद्दल शंका वाटते. श्री. सूरजभान यांनी 'upright' या पाक्षिकात (१-११-७०, पा. १-७) एक उदाहरण दिलेले आहे. जलाग मोहल्ला, मसजिद नजीक जोधपूर (राजस्थान) येथील श्री. श्री. धार पुरोहित, हा ब्राह्मण तरुण आय्. ए. एस. परीक्षेत दोनदा नापास झाला. त्यानंतर त्याची वयोमर्यादा संपली. मग त्याच्या वडिलांनी त्याला त्यांच्या शेतात कामगार म्हणून असलेल्या श्री. गोविंद जाटव या अस्पृश्याला जानेवारी १९६९ मध्ये दत्तक म्हणून दिला. तो जाटव ३६ वर्षांचा व त्याचा दत्तकपुत्र पुरोहित हा २७ वर्षांचा. दत्तक गेला तरी तो आपल्या मूळच्या वडिलांकडे रहात होता. त्याचा दत्तक पिता जाटव हा शेतात झोपडीत रहात होता. धार जाटव याला हरिजन जातीचा म्हणून सर्टिफिकेट मिळाले. तो पुन्हा आय. ए. एस्. च्या परीक्षेला ( क्रमांक ६८१९ ) बसला आणि त्याची निवड यू. पी. एस्. सी. ने मध्यवर्ती सरकारच्या क्लास एक च्या राखीव जागेसाठी २०-५-७० ला केली तो सध्या नोकरीस हरिजन म्हणून आहे. पण त्याची पत्नी व दोन मुले ब्राह्मण म्हणून आहेत. तो त्यांच्याबरोबर राहातो. त्याचा दत्तक पिता कोठे तरी पसार झालेला आहे.

३३ अस्पृश्य समाजाचे १९३५ च्या पूर्व काळातील हजारो वर्षे आणि नंतरच्या ३०-३५ वर्षांच्या काळातील जीवन माणुसकीला पारखे झालेले होते. या पार्श्वभूमीवरून विचार केला तर डॉ. आंबेडकरांना धर्मांतराची घोषणा १३-१०-१९३५ रोजी करणे भाग पडले, हेही वाचकांना मान्य करावे लागेल या सर्व ऐतिहासिक पापांचे धनी नरपशू सवर्ण हिंदू लोक आहेत. हे सत्य खोडून काढण्याचे जे कोणी प्रयत्न करतील ते सत्य इतिहासाचे मारेकरी होत. वैदिक काळातील ब्राह्मणी बौद्धिक माजोरीपणा म्हणजे वेदादी ग्रंथ शुद्रातिशूद्र यांना वर्ज्य म्हणून या वर्गांना अज्ञानांधकारात ठेवले. रामायण, महाभारत काळांतील त्यांचे पाप म्हणजे शुद्रातिशूद्र हे श्रेष्ठ त्रैवर्णिकांचे दास, दासानुदास म्हणून त्यांना हीन स्थितीत गाडून टाकले. मध्य युगात व त्यानंतरच्या काळात शुद्रातिशूद्र यांना

ब्राह्मणी वर्चस्वाने अगदी रसातळाला नेले. छत्रपती श्रीशिवाजी, महात्मा गांधी यांच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळात शूद्रातिशूद्रांना स्वाभिमान नसतो, स्वातंत्र्याची आस नसते आणि राजकारण हे फक्त त्रैवर्णिकाचीच खास मिरास अशी अलिखित आज्ञा शूद्रातिशूद्रांच्या डोक्यावर लादली ती ब्राह्मणी वर्चस्वाने. डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश राजकर्त्यांचा आश्रय घेऊन अस्पृश्यांची सर्वांगीण सुधारणा घडवून आणताना स्वाभिमान व राष्ट्राभिमान यांना संपूर्णतया सांभाळले. तरी ब्राह्मणी वर्चस्वाखाली गोगलगाय झालेल्या त्रैवर्णिकांनी यांना राष्ट्रद्रोही ठरविले. सारांश, या लोकांनी निरनिराळ्या काळात निरनिराळी कारणे दाखवून अस्पृश्यांना गुलामगिरीच्या खातेऱ्यात दडपून टाकले. हे लोकही आपली वडिलोपार्जित परंपरा पुढेही अशीच चालवतील. तेव्हा त्यांच्यापासून दूर रहाणे हा एक अस्पृश्यांच्या उन्नतीचा मार्ग होय, हे आंबेडकरांनी ओळखले. म्हणून त्यांनी धर्मांतराची घोषणा ( १३–१०–१९३५ ) केली. या धर्मांतराच्या चळवळीचा इतिहास मी चरित्रखंड ६ व ७ यांत दिलेला आहे. तो आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यास करणाऱ्यांना उपयुक्त ठरेल, अशी माझी खात्री आहे.

३४ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, सचिवालय, मुंबई ३४ या संस्थेने सहाव्या खंडाच्या प्रकाशनासाठी अनुदान प्रकाशकांना दिले याबद्दल मी तिचे हार्दिक आभार मानतो

३५ ती. लक्ष्मणशास्त्री जोशी २५–१–१९०१ यांनी १९६८ च्या मे मध्ये मला बोलावून घेऊन मी चरित्र लेखनासाठी जे श्रम केले त्याबद्दल गौरवपर उद्गार काढले. त्यांनी मला त्याबाबतीत मार्गदर्शनपर काही सूचनाही केल्या. मी त्यांचा ऋणी आहे.

३६ इन्स्टिटयूट ऑफ् हिस्टॉरिकल स्टडीज, कलकत्ता, या संस्थेतर्फे तीन भागात प्रसिद्ध होणाऱ्या डिक्शनरी ऑफ् नॅशनॅलिस्ट बायोग्राफीज या ग्रंथासाठी महाराष्ट्रातील ५६ व गोव्यातील १४ स्वातंत्र्य सैनिकांची अल्पचरित्रे लिहिण्यासाठी मी १९६६ ते १९७० (एप्रिल) च्या दरम्यान कामे करीत होतो. तेव्हा अनेक विद्वानांच्याकडून माहिती गोळा करण्यासाठी मी त्यांना पत्रे पाठविली आणि त्यांच्या मुलाखती घेतल्या. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू तीर्थरूप महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ( ५–८–१८९० ) यांना मी पुण्याला जाऊन भेटलो व पत्रेही पाठविली. २४–१–१९६९ चे त्यांचे पुण्याहून जे मला पत्र आले

त्यात त्यांनी आपण आंबेडकर चरित्राचा प्रचंड उद्योग हाती घेतला आहे. शक्य तर मुंबईस आपणाकडे यावे असे मनात आहे, अशी इच्छा प्रदर्शित केली. ते मुंबईस कधी येणार आहेत या संबंधीची चौकशी करणारे पत्र मी त्यांच्या खाजगी चिटणीसांना लिहिले. तेव्हा त्यांनी मला उत्तर ६–२–६९ ला दिले व त्यात त्यांनी खुलासा केला. " मला कोणी चिटणोस नाही. जेव्हा विद्यापीठात होतो तेव्हा तेथील सेवकांचा उपयोग होई. कारण तेथे कुलगुरूच्या दिमतीला असा सेवकवर्ग – बंगला गाडीची तरतूद होती. काम अगदी निर्वेतन. मी स–वेतनी लागलो नव्हतो व माझ्यावेळी ते पदही स–वेतनी झाले नव्हते. इतरत्र सर्व स–वेतनी आहेत, तसेच पुण्यासही होईल. आताचा युगधर्मच तसा आहे. मी शि. प्र मं. मधून निवृत्त झालो. १९३५. त्यावेळी निवृत्ती वेतन रु ७० दरमहा. पूर्वी शाळेचे मासिक वेतन १४०. त्यापूर्वी १००, त्यापूर्वी ७५. पुस्तकावरील धूळही मीच ४–६ महिन्यांनी व वर्षा दोन वर्षांनी झाडतो. आता ते होत नाही. मी आपला सर्व संभार शि. प्र. मं. स देऊन टाकला आहे. " मी हा मजकूर येथे देत आहे, त्याचा हेतू एवढाच की, ती. पोतदार यांनी स्वावलंबी व स्वार्थत्यागी जीवन व्यतीत केले, याची जाणीव नव्या पिढीला व्हावी. मी त्यांना ६–३–६९ ला माझ्या घरी आणले. ६ ते १८ खंडाचे माझे हस्तलिखित ते पहावयास मागतील अशी माझी अटकळ होती. बोलण्याच्या ओघात व अन्य ठिकाणी कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित होण्याची घाई असल्यामुळे त्यांनी हस्तलिखित पहाण्याची इच्छा दाखविली नसावी. मात्र त्यांनी असे उद्‌गार काढले की, मी जे आंबेडकरांचे चरित्र लिहिलेले आहे, तो सामाजिक, धार्मिक व राजकीय चळवळीचा साधार इतिहास आहे व तो भावी पिढ्यांना मार्गदर्शक होईल. या त्यांच्या उत्तेजनपर आशीर्वादाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रबोधनकार ती. केशवराव सीताराम ठाकरे ( १७–९–१८८५ ) यांनी मला पत्र पाठवून बोलावून घेतले. माझी पत्नी, सर्वश्री धों. गो. वाघमारे, निवृत्ती धों. भंडारे आणि दोन गृहस्थ यांना घेऊन कलानगर, बांद्रा येथे १–३–७० ला संध्याकाळी मी त्यांना भेटलो. त्यांचे पाक्षिक ' प्रबोधन ' मी १९२२ पासून वाचत होतो. त्यांचे सर्व ग्रंथही मी वाचलेत. जातिभेद, सामाजिक सुधारणा वगैरे प्रश्नांवरील त्यांची विचारसरणी अनेक लेखकांना मार्गदर्शक झालेली आहे. त्यांनी माझ्या कार्याबद्दल प्रशंसा केली. मी त्यांचा आभारी आहे.

ती. नरहर रघुनाथ उर्फ काकासाहेब फाटक ( १५–४–१८९३) यांना

मी या प्रास्ताविकाचे हस्तलिखित श्री. वाघमारे यांच्या मार्फत दाखविले. त्यांनी सर्व मजकूर वाचून काही सूचना मला लिहून कळवल्या. श्री. वाघमारे म्हणाले, काका आजारी असतानाही तुमचे प्रास्ताविक त्यांनी संपूर्ण वाचले. मी त्यांना त्रास दिला याची मला जाणीव झाली. त्यांची क्षमा मागण्यासाठी मी त्यांना पत्र लिहिले. त्याला त्यांनी जे उत्तर पाठविले आहे, ते मला हृद्य वाटले. म्हणून मी येथे उद्धृत करीत आहे.

॥ श्री ॥

मुंबई ४, नवीन भटवाडी,
क्रॉस लेन.
ता. ११–३–७०

श्री. चां. भ. खैरमोडे यांसी

क्र. सा. न. वि. वि.

आपले ता. १० चे पत्र वाचले. ते पाहून मलाही खेद झाला. मला तसदी दिली, ही कल्पना खेदास कारण झाली. आपले लेखन वाचण्याची व त्याबद्दल मला योग्य वाटल्या त्या सूचना करण्याची जी संधी मिळाली तिच्या योगाने मला एक प्रकारचे समाधान झाले. आपण एक फार मोठे व भावी पिढ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असे प्रचंड लेखन कार्य चालविले आहे. त्याला सल्ला-मसलतीच्या रूपाने अत्यल्प हातभार लावण्याची संधी मला लाभणे हे भाग्य आहे. त्याची तसदी कोण मानील ? निदान मी तरी या भावनेचा नाही. कळावे ही विनंती.

आपला स्नेहकांक्षी,
**न. र. फाटक**

या सहाव्या खंडातील प्रकरणांत आणि प्रास्ताविकात मी जो मजकूर घातलेला आहे व जी मते प्रगट केलेली आहेत, त्याबद्दल मी सर्वस्वी जबाबदार आहे.

या खंडात मी जी माहिती दिलेली आहे ती जमा करण्यास मला सर्वश्री यशवंतराव भीमराव ( भैय्यासाहेब ) आंबेडकर, पद्मश्री श्री. भाऊराव गायकवाड, श्री, दत्तोबा संतराम पवार, प. वा. श्री. रावबा ठेंगे, वि. गो. खोबरेकर, डॉ. विठ्ठल रामचंद्र भूसरथ (**M. B. B. S. M. R. san 1** माजी चीफ मेडिकल ऑफिसर, मुंबई म्यु. शाळा, फेलो, सिनियर शिक्षक, ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई,

मुंबई युनिव्हर्सिटी लेक्चरर, गव्हर्नमेंट स्कॉलर व गोल्ड मेडालिस्ट, मुंबई ८ ) डॉ. विनायकराव एकनाथ मोरे (M. A., LL.B. Ph. D. F.R.S.A. London इंडिया हाऊस, ऑल्ड्विच, लंडन, डब्लू सी. २,) गुरुनाथ दिवेकर, बाळासाहेब फाटक, लक्ष्मण केशव गोरे, रामचंद्र केशव लेले, पाडुरंग अण्णाजी सरवदे ( मुंबई विद्यापीठाचे पीएच. डी. चे विद्यार्थी ) नामदेव ज्ञानोबा कांबळे, ( गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ) पी. एच्. डीचे विद्यार्थी कृष्णराव नारायणराव कदम, डॉ. रा. बा. मोरे व सौ. कमलाबाई मोरे, धों. गो. वाघमारे, राघू गेणूजी खंडागळे, नानासाहेब भाऊसाहेब पाटील ( बोरगांवकर ), कोंडिबा रखमाजी पोळ ( परिंचे जि. पुणे ) आणि मुंबई विद्यापीठ ग्रथालय, सचिवालय ग्रंथालय, मराठी ग्रंथ संग्रहालय, केसरी मराठा ग्रंथसंग्रहालय (पुणे), गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, नॅशनल लायब्ररी, बेल्वेडेर, कलकत्ता २७, ( collection of 5000 letters of Sir Tej Bahadur Sapru and correspondence of political leaders of India with him, donated to the National Library by his, son, shri P. M. Sapru. ) दी टाईम्स ऑफ इंडिया लायब्ररी, मुंबई १, गव्हर्मेंट रेकॉर्ड ऑफिस, सेंट्रल लायब्ररी, मुंबई आणि मुंबई कायदे मंडळ ग्रंथालय यांचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी मला परोपरींनी सहाय्य केले. याबद्दल मी या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

४१ बाबासाहेबांचे लेख ज्या ज्या प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध झालेले वाचकांना होते, ते उपलब्ध करून देण्याची माझी इच्छा आहे. ते लेख पूर्वीच्या खंडात मी दिलेले आहेत. या खंडात ' Caste and conversion ' हा बाबासाहेबांचा १९२६ चा लेख मी परिशिष्ट १ मध्ये देत आहे. तो लेख मिळविण्याचा मी गेली कित्येक वर्षे प्रयत्न करीत होतो. श्री. राघू गेणूजी खडांगळे व श्री. धों. गो. वाघमारे यांनी डॉ. वि. रा. भूसरथ यांच्याकडून तो मला मिळवून दिला. श्री. खडांगळे यांनी त्या लेखाची प्रत तयार केली. मी त्या तिघांचा फार आभारी आहे.

४१ हा सहावा खंड मी राजर्षी श्री. छत्रपती शाहू महाराज, कोल्हापूर यांना अर्पण करीत आहे. फोटो मला प्रबोधनकार ती. केशव सीताराम ठाकरे यांच्याकडून मिळाला. बाकीचे तीन फोटो मला पुराभिलेख व पुरातन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई १, यांच्याकडून मिळाले.

बहुजन समाजाच्या मानसिक, धार्मिक व सामाजिक गुलामगिरीची

शृंखला तोडून त्या समाजाला माणुसकीचे स्वाभिमानाचे जीवन जगता यावे म्हणून राजर्षींनी ब्रिटिश साम्राज्याच्या अधिकाऱ्यांच्या धमकावण्यांना न जुमानता चळवळीसाठी राज्यत्याग करून या समाजाची सेवा करण्याचे जे बाणेदार निवेदन सदर अधिकाऱ्यांना पाठविले होते, ते मला मिळाले नाही. ते मी या खंडात देणार होतो. त्या निवेदनात महाराजांच्या उदार, निर्भर व थोर अंतःकरणाचे चित्र स्पष्टपणे वाचकांना दिसून आले असते. या पुढील खंड महर्षी वि. रा. शिंदे, औंधचे माजी महाराज श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव पंत, कर्मवीर भाऊराव पाटील वगैरे व्यक्तींना अर्पण करणार आहे.

डॉ. विनायकराव एकनाथ मोरे, इंडिया हाऊस, ऑल्ड्विच, लंडन, डब्लू. सी. २ आणि श्री. यशवंतराव मोतीराम विजये, १४, पार्टस्डाऊन ॲव्हेन्यू, गोल्डर्स ग्रीन, लंडन, एन्. डब्लू ११, हे प्रत्येकी १०५ रु. पाठवून पब्लिकेशन कमिटीचे सभासद झाले. या तिघांचे मी आभार मानतो. अशा वर्गणीचा उपयोग प्रकाशक छापखान्याचे पैसे देण्यासाठी करतात.

मिस एलेनार झेलियट, या अमेरिकन विदूषीला १९६८ च्या प्रारंभी पेनिसिल्वीनिया ( अमेरिका ) विद्यापीठातर्फे पीएच्. डी. पदवी मिळाली. डॉ. आंबेडकर व अस्पृश्य समाजाच्या विमोचनाचा इतिहास या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला होता. या प्रबंधासाठी त्यांनी भारतात फिरून माहिती गोळा केली होती. दस्तऐवज, कात्रणे, वर्तमानपत्रांच्या फायली वगैरे सामुग्री मी मुंबई विद्यापीठात ठेवली होती. तिचा त्यांना प्रबंध तयार करताना प्रामुख्याने उपयोग झाला. त्या आंबेडकरांचे राजकीय चरित्र अमेरिकेत लवकरच प्रसिद्ध करणार आहेत, असे समजते. मी मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात जी आंबेडकर चरित्राची सामुग्री ठेवलेली आहे; तिचा उपयोग करून आणखी दोन विद्यार्थ्यांनी पीएच्. डी. पदवी मिळविली. न्यूयार्कच्या मिशन कॉलेजच्या प्राचार्य मदर फिस्के ( वय ६४ ) यांनीही मुंबई विद्यापीठात सदर सामुग्रीचा अभ्यास केला. त्या न्यूयार्कमध्ये डॉ. आंबेडकर यांच्यावर लवकरच ग्रंथ प्रसिद्ध करीत आहेत.

या खंडाची मुद्रणप्रत डॉ. कु. मंदाकिनी पावसकर ( एम्. डी. विद्यार्थी ) सर्वश्री नामदेव गोधाजी भालेराव, ( एल्. एल्. एम्. ) राजाराम थोरात, अरुण तात्याराव भालेराव, सीताराम केशव कडलाक, कु. रंजना धाकूजी खंडागळे, राघ गेनूजी खंडागळे, सौ. भागीरथी राघू खंडागळे, सुधाकर वाघमारे, प्रल्हाद नामदेव

चेंदणकर, यशवंत भिवा कांबळे यांनी तयार केली. सर्वश्री भालेराव यांची मातोश्री आजारी असताना आणि थोरात हेही आजारी असताना या दोघांनी रात्री जागरणे करून 'मुक्ति कोन पथे ?' हे प्रकरण मुळातून लिहून काढले.

४७ डॉ. आंबेडकर एज्युकेशन सोसायटी, पब्लिकेशन कमिटी, मुंबई १३, या संस्थेने आंबेडकर चरित्राचे खंड ४ ( १९३६ ) व खंड ५ ( १९६८ ) आणि खंड १ ( द्वितीय आवृत्ती १९६८ ) हे चार ग्रंथ ( पाने ११६४ ) प्रसिद्ध केले; तेव्हा संस्थेच्या कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस जिवापाड मेहनत केली. प्रस्तुतचा सहावा खंड प्रसिध्द करण्यासाठी त्यांनी आपले प्रयत्न कित्येक महिने चालू ठेवले. हा खंड १४ एप्रिल १९७० ला प्रसिद्ध करण्याचे त्यांचे प्रयत्न अपरिहार्य कारणामुळे यशस्वी झाले नाहीत. माझ्या शारीरिक दुर्बलतेमुळे मला या खंडाची मुद्रिते पहिल्यापासून तपासणे शक्य नसल्यामुळे ते काम श्री. नाना अभ्यंकर यांनी केले. मुद्रिताचा प्रत्येक फॉर्म मशिनवर जाण्याच्या अगोदर श्री. घों. गो. वाघमारे व श्री. राजाराम थोरात हे मला घरी आणून दाखवीत असत व नंतर छापण्यास परत नेत असत. या सर्वांनी आणि संस्थेच्या इतर कार्यकर्त्यांनी या खंडाच्या प्रकाशनासाठी फार त्रास घेतला. त्यांचे मी आभार मानतो.

४८ माहितीने परिपूर्ण असलेले यापुढील आठ खंड ( पाने सुमारे ६ हजार ) अद्याप प्रसिद्ध व्हायचे आहेत. या खंडातून बाबासाहेबांचे प्रचंड कार्य आणि उत्तुंग व्यक्तित्व यांचे सम्यक् दर्शन वाचकांना होईल.

४९ बाबासाहेबांच्या चरित्राचे पाच खंड आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतून मला पैसे मिळालेत असा गैरसमज पसरल्याचे मला दिसून आले. या सर्व खंडांच्या प्रकाशकांकडून मला अद्याप लेखकाचा मोबदला म्हणून एक पैसाही मिळालेला नाही. सरकारी अनुदान मिळाले, ते छपाईच्या खर्चासाठी. हा गैरसमज दूर व्हावा, म्हणूनच मी खुलासा इथे मुद्दाम करीत आहे.

चां. भ. खैरमोडे
१४७ अ, हिंदू कॉलनी,
दादर, मुंबई १४.
ता. १४–४–७०

ता. क.

मी दिनांक ६ ते ३० मे १९७१ च्या काळात तळवलकर नर्सिंग होम, हिंदू कॉलनी येथे हृदयविकाराच्या आजाराने पडून होते. तेव्हा ज्या मित्रांनी मला भेटून शुभेच्छा प्रदर्शित केल्या, त्यांचा मी आभारी आहे. मला मात्र त्यावेळी वाटत होते की, खंड ६ ते १८ मला प्रसिद्ध झालेले पहावयास मिळणार नाहीत. याही आजारात डॉ. नी. ग तळवलकर आणि नेत्रविशारद डॉ. वि. शं. तळवलकर यांनी मला पुनर्जन्म मिळवून दिला. त्यांचे ऋण फेडता येणे शक्य नाही.

या आजारात व त्यानंतर मला मुद्रिते तपासावयास शक्य झाले नाही. हे किचकट काम श्री. ना. गो. भालेराव, एल्. एल्. एम्. यांनी केले. या सर्व लोकांचे मी आभार मानतो.

**चां भ. खैरमोडे**
१-११-७१

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र

## खंड सहावा

### प्रकरण १ ले

### महापतिव्रतेचे निर्वाण

गोलमेज परिषदांचे कार्य, ग्रंथांच्या सामुग्रीची जुळवाजुळव आणि चळवळीतील कटू प्रसंग यांच्या कैचीत सापडलेले बाबासाहेब मधून मधन विचार करीत की, आपणाला उदर निर्वाहाचे कायमचे साधन काय ? बॅरिस्टरीच्या प्रॅक्टिसमध्ये त्यांना आशा दिसेना. लॉ कॉलेजचे प्रोफेसर म्हणून त्यांना उत्पन्न होते, पण ते फारच अपुरे. सदर कॉलेजच्या प्रिन्सिपॉलची जागा मिळाली तर आपणाला बरेच आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल आणि ग्रंथलेखन मनाप्रमाणे अखंडितपणे करता येईल, असे त्यांना वाटे. प्रॅक्टिसकडे त्यांचे विशेष लक्षन व्हते. या व इतर काही कारणांमुळे त्यांना कायम स्वरूपाचे चांगले उत्पन्न नव्हते. प्रत्येक महिन्याला ५–१० नवी पुस्तके विकत घेणे, प्रचारासाठी प्रवास करणे, इत्यादी बाबींसाठी त्यांना खर्चाला भरपूर पैसे नसत; म्हणून लॉ कॉलेजमध्ये नोकरी करण्याचे त्यांनी ठरविले. लॉ कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागेसाठी त्यांनी १९३२ साली प्रयत्न

सुरू केले. पण त्यावेळच्या हायकोर्टाच्या मुख्य जज्जांनी सरकारला असा इशारा दिला की, आंबेडकर हे एक राजकीय पक्षाचे व दलित वर्गाचे पुढारी आहेत. तेव्हा त्यांच्याकडे सरकारने विश्वासाच्या दृष्टीने पाहू नये, कारण सरकारी महत्त्वाच्या पदावर नेमण्यात येणारा माणूस हा सरकारच्या विश्वासातील माणूस असला पाहिजे. मुख्य जज्जाने असा खो घातल्यामुळे १९३३–३४ च्या काळात बाबासाहेबांना लॉ कॉलिजच्या प्रिन्सिपॉलच्या जागेच्या बाबतीत यश मिळाले नाही. तरीही निराश न होता त्यांनी आपले प्रयत्न चालू ठेवले. शेवटी त्यांना यश मिळाले लॉ–कॉलेजचे प्रिन्सिपॉल व पेरी प्रोफेसर ऑफ ज्युरिसप्रूडन्स म्हणून त्यांची नेमणूक १ जून १९३५ पासून एका वर्षासाठी ( प्रोबेशनवर ) करण्यात आली. ( ग. नो. इ. डी. नंबर ४३, ता. १६–४–१९३५, बी. जी. जी. एक्स्ट्रॉ ऑर्डिनरी, पार्ट १. गुरुवार, ता. १८–४–१९३५. ) ही नेमणूक पुढे १ जून १९३६ पासून दोन वर्षे वाढविण्यात आली. ( ग. नो. इ. डी. नंबर ४३, ता. १४–२–१९३६, बी. जी. जी. पार्ट १, तारीख २०–२–१९३६, पा. २९५–९६. ) परंतु ते संपूर्ण तीन वर्षे या पदावर राहिले नाहीत. या अवधीत बाबासाहेबांनी लॉ कॉलेजच्या कारभारात अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्यांत डोळ्यात भरण्यासारख्या दोन सुधारणा प्रमुख होत. लॉ कॉलेजचे ग्रंथालय असावे तितके व्यवस्थित नव्हते. ते ग्रंथालय प्रथमतः त्यांनी आपल्या देखरेखीखाली व्यवस्थित केले व नंतर त्यात कायद्यावरील शेकडो ग्रंथांची भर हळू हळू पडू लागली. लॉ कॉलेज तेव्हा फुल–टाईम कॉलेज नव्हते. ते तसे व्हावे, त्याला स्वतंत्र इमारत असावी आणि स्वतंत्र रजिस्ट्रार असावा, अशी सरकारकडे त्यांनी मागणी करून ती यशस्वी केली. या कॉलेजचे वर्ग पूर्वी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये सकाळी व सायंकाळी भरत असत. या कॉलेजची इमारत चर्चगेट स्टेशनजवळ बांधण्यात आल्यानंतर हे कॉलेज पूर्ण वेळ भरू लागले.

बाबासाहेबांचे शेकडो विद्यार्थी, वकील आणि कायद्याचे शिक्षक यांनी आपल्या खाजगी बैठकांतून, सभांतून आणि लेखनांतून साहेबांना धन्यवाद दिले. बाबासाहेबांनी प्रिन्सिपॉल पदाच्या जागेचा राजीनामा दिल्यानंतर श्री. ए. ए. ए. फैजी यांची प्रिन्सिपॉल म्हणून सरकारने नेमणूक केली. त्यांनी उस्मानिया युनिव्हर्सिटी, हैद्राबाद ( डेक्कन ) येथे १४ ऑक्टोबर १९४५ रोजी ' The teaching of law in Indian Universities या विषयावर भाषण केले होते.ते The Law Magazine 1855–1945 Special 90 years issue, April 1946 ' या मासिकात ( पा. १ – १६ ) प्रसिद्ध झाले होते. त्यात डॉ. आंबेडकरयांच्या बद्दल ( त्यांनी

षा. ७–८ ) गौरवपर उद्‌गार काढलेले होते. ते असे :–

' In 1936, The Hon,ble Dr. B. R. Ambedkar, my illustrious predecessor as principal, Government Law College, Bombay, proposed in his paper ' Thoughts on the Reform of Legal Education in the Bombay Presideney ' a four year course. ( 1936 Govt. Law Callege Magazine, p. 6 – 17) Dr. Ambedkar, himself a student of London and Colombia ( U. S. A. ) with his wide varied experiance of law and life, was a keen student of the methods of legal education. He proposed a four year course ( p. 10 ) starting from matriculation, lays down categorically ' From the educationist's point of view, the study of law requires a study of certain auxiliary subjects without which the study of law alone would be an incomplete equipement for the practice of the profession, ( p. 9 ). He devides the course into two periods of two years each. For the first LL. B., the course would include : 1 Sociology, Psycology 2 Logic and Rhetoric, 3 English, 4 Contracts, 5 Legal philosophy Maximus 6 Constitutional law, 7 Government of India Acts & Law of crimes, criminals' procedure.

वेरूळ येथील सुप्रसिद्ध लेणी पाहण्यासाठी मित्रमंडळीची सहल काढण्याची कल्पना बाबासाहेबांना १९३४ च्या नोव्हेंबरमध्ये सुचली. या सहलीच्या तारखा ठरवाव्यात आणि बाबासाहेबांना अचानकपणे दुसरेच एखादे महत्त्वाचे काम निघावे, मग ती तारीख रद्द व्हावी, असा सुमारे एक महिना सहलीच्या जमवाजमवीचा फार्स होत होता. शेवटी एकदाची २४ डिसेंबर ही तारीख नक्की ठरली. त्या दिवशी सकाळीच दोन लॉन्यांतून लोक सहलीला निघाले. त्यांत सर्वश्री शिवतरकर, आसईकर, प्रधान, कवळी, मडकेबुवा, दिवाकर पगारे, देवजी डोळस वगैरे लोक होते. या दोन लॉन्या नाशकाला आल्या व तेथे श्री. अमृतराव रणखांबे, श्री भादुजी निकाले वगैरे मंडळी विचरहून आली. नाशिकच्या लोकांनी तोपर्यंत मुंबईच्या लोकांची जेवणे उरकून घेतली व रात्री नगरला मुक्काम करण्याचे ठरविले. त्या प्रमाणे दोन लॉन्या व श्री. रणखांबे यांची टूरिंग, नगरच्या रस्त्याला लागल्या. बाबासाहेबांनी आग्रह करून नाशिकच्या चार पाच लोकांना सहलीत सामील करून घेतले. त्यात श्री. तुकाराम बाबूराव काळे, मामलेदार कचेरीतील कारकून, यांना रजा काढण्यासही वाव न देता बाबासाहेबांनी त्यांना

सहलीत समाविष्ट केले. बाबासाहेब रणखांब्यांच्या टूरिंगमध्ये बसले. गप्पा, विनोद करीत ही मंडळी सूर्यास्ताच्या सुमारास नगरला पोहचली. तेथे श्री. रणखांबे यांचे काका ( मावशीचे यजमान ) श्री. रावबा पुंजाजी ठेंगे, कॉंट्रॅक्टर यांच्या बंगल्यावर हे सारे लोक उतरले. श्री. रावबा ठेंगे यांचे मुलगे श्री. कृष्णराव व भागवत हे पाहुण्यांच्या दिमतीस लागले. चहा कॉफीचा कार्यक्रम झाल्यावर पत्त्यांचा अड्डा सुरू झाला. श्री. रावबांनी नगरच्या युरोपियन क्लबमधील सामानसुमान, स्वयंपाकी, वाढपी वगैरे भाड्याने आणले व जेवण दोन तासांचे आत तयार करविले. चिकन बिर्याणी, मटण बिर्याणी, मटणाचे इतर प्रकार, ब्रँडी, शेरी बियर वगैरे पेये यांची रेलचेल पाहून व त्यांचा मनसोक्त आस्वाद घेऊन सारेजण झोपी गेले. दुसऱ्या दिवशीची न्याहरी आणि प्रवासात लागणारी शिदोरी यांचीही श्री. ठेंगे यांनी भरगच्च तयारी केली. सहलीत भागवत व ठेंगेही सामील झाले.

औरंगाबादला जाताना, मध्य गोदावरी नदीत स्नान वगैरे करून खाण्याचा कार्यक्रम उरकून घेण्याचे ठरले; पण नदीच्या वाळूत एक लॉरी अडकली. ती परतीरावर नेण्यासाठी सर्वांनी ढकलण्याठी हात लावले, पण ती वाळूतून बिलकुल हलेचना. तेव्हा साहेब म्हणाले, " अरे, शोभेचे कपडे काढा आणि तिला खांदे द्या " साहेबही लंगोट लावून खांदा द्यायला तय्यार ! इतर खांदे द्यायला तयार झालेल्या लोकांत बरेचणजण हडकुळे व पाप्याची पितरे असलेल्या शरीरयष्टीचे होते; त्यांच्या शरीराबद्दल थोडा विनोद, थोडीशी थट्टा करीत साहेबांनी पैलवानासारखे दंड थोपटले व हसत हसत लॉरीला खांदा दिला. ते पाहून इतरांनीही खांदे दिले व उचलून तिला पैलतीरावर नेऊन ठेवली. मग थट्टा मस्करी करीत स्नानजेवणादी कार्यक्रम उरकून, सहलवाले औरंगाबादेच्या वाटेस लागले. औरंगाबादेला संध्याकाळी एका डाकबंगल्यावर सहलवाले उतरले. बाबासाहेब औरंगाबादेला आल्याचा वृत्तांत समजताच हजारो अस्पृश्य लोक त्यांच्या दर्शनास गेले. तेथील लोकांनी बाबासाहेब व त्यांचे सहकारी मित्र यांच्या जेवणाची व दुसरे दिवसाच्या प्रवासाची सर्व सोय केली. औरंगाबादेतील लोकांनी आग्रह करून बाबासाहेब व त्यांचे साथीदार यांना एक दिवस पाहुणे म्हणून ठेवून घेतले. त्यांनी युरोपियन पद्धतीप्रमाणे पाहुण्यांच्या खाण्यापिण्याचा थाट केला. सहलवाले औरंगाबादेहून परत नगरला चौथ्या दिवशी पोहचले. श्री रावबा ठेंगे यांनी पुनःश्च पाहुण्यांना थाटाची मेजवानी दिली व बाबासाहेबांना पोहोचवायला नाशिकपर्यंत गेले. नाशिक येथे त्यांचा निरोप घेताना बाबासाहेबांनी त्यांचे मनःपूर्वक

आभार मानले. आभार मानल्यावर ते गहिवरून म्हणाले, "तुमच्या सारखे लोक मला मित्र म्हणून मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो." बाबासाहेबांचा आवाज भावनातिरेकामुळे सद्‌गदित झाला. हे दृश्य पाहून इतरांनाही गहिवरून आले.

सहलवाले मुंबईला ३०–१२–१९३४ ला संध्याकाळी परतले. बाबासाहेबांनी श्री. रावबा ठेंगे यांना ३–१–१९३५ ला आभारप्रदर्शक पत्र मुंबईहून लिहिले ते असे–

Bhimarao R. Ambedkar<br>
M. A; Ph. D. Sc.<br>
Barrister - at - Law<br>
J. P; M. L C.

Rajgraha,<br>
New Dadar,<br>
Bomb y 14,<br>
2-1-1935

प्रिय रावबा,

आम्ही सर्वजण ता. ३० रोजी संध्याकाळी मुंबईस सुखरूप पोहोचलो.

आपण व आपल्या घरच्या मुलांमाणसांनी दाखविलेले प्रेम, सर्वांनी घेतलेला त्रास व केलेला पाहुणचार आम्ही कधीही विसरू शकतच नाही. मात्र तुम्हां सर्वांना आम्ही जो त्रास दिला त्याची फार लाज वाटते.

माझा आपल्याला काही उपयोग होण्यासारखा असेल तर करून घेण्यास कचरू नये, असे माझे आपणांस सांगणे आहे.

आपल्या घरच्या मंडळीस व कृष्णराव, भागवत यांस कुशल कळविणे.

आपला कृ.<br>
**भीमराव आंबेडकर**

ता. क. – आणखी एका प्रश्नासंबंधीने मला आपल्याला लिहावयाचे आहे; पण ते पुढील पत्री लिहीन.

पुढे काही दिवसांनी रावबा यांना धारवाड जिल्ह्यातील एका पुलाच्या कामात आणि नगर येथील इमारतींच्या कामात फार मोठी खोट आली. त्यांची आर्थिक परिस्थिती जी एकदा खालावली ती कायमची ! श्री. रणखांबे व साहेब

यांचे संबंध पुढे दुरावले होते. तेव्हा रावबा जेव्हा जेव्हा भेटावयास जात तेव्हा तेव्हा साहेब त्यांच्याशी तुटकपणे वागत असत. एखाद्या नावडत्या माणसाशी संबंध असलेला माणूस, मग त्याने साहेबांच्या विरुद्ध काहीही केलेले नसले, तरी साहेब त्यांच्याशी तुटकपणे वागत. हा त्यांच्या स्वभाव विशेष होता. या स्वभावाची झळ अनेक लोकांना अनुभवावी लागली आहे.

साहेब वेरूळच्या सफरीहून मुंबईला परत आले तेव्हा सौ. रमाबाईनी अंथरूण धरले होते. त्यांचा आजार १६-१-१९३५ ला बराच वाढला. जानेवारीला नाशिकचे समाजसेवक व पुढारी, नाशिकचे कलेक्टर मि. ई. डब्लू पेरी, आय्. सी. एस् , यांना चहापार्टी देण्याचे ठरवीत होते. सदर पार्टीला साहेबांनी उपस्थित राहावे आणि नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांच्या अनेक गाऱ्हाण्याबाबत विचार-विनिमय करावा म्हणून भाऊराव गायकवाड यांनी साहेबांना पत्र पाठविले. तेव्हा साहेबांनी त्यांना १७–११–३५ ला उत्तर दिले, की सौ. रमाबाईंची प्रकृती फारच बिघडलेली आहे, तरी चहापार्टीची तारीख पुढे ढकलावी.

सौ रमाबाईंना अनेक डॉक्टरांचे औषधोपचार चालू होते. त्यांच्या प्रकृतीत चढउतार सतत चार महिने होत गेले. मे महिन्याच्या २२ तारखेस प्रकृतीत चिंताजनक फरक झालेला दिसून आला, त्यावेळी साहेब पनवेलला मुलांचे वसति-गृह स्थापन करण्याच्या कामासाठी तेथे जाऊन राहिले होते. एका माणसाला पनवेलहून साहेबांना मुंबईस घेऊन येण्यास पाठविले. साहेब २४ तारखेस मुंबईस आले. आल्यापासून ते रमाबाईंच्या जवळ बसून होते. रमाबाई साहेबांकडे टक लावून बघत; त्यांना बोलण्याचे त्राण नव्हते. साहेब स्वतःच रमाबाईंना औषध देत होते, बशीत कॉफी ओतून त्यांना ती पिण्याचा आग्रह करीत होते, मोसंब्याचा रस साहेब स्वतःच्या हाताने आग्रहाने पाजीत, रमाबाईही साहेबांच्या आग्रहाखातर थोडेसे घेत. मात्र रविवारी ता. २६ मे १९३५ ला सकाळी रमाबाईंनी डोळे मिटले. त्यांचा श्वासोच्छ्वास जड होऊन मंदावला. शेवटी त्या साध्वीचे पंचप्राण सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास पंचत्वात विलीन झाले. घरातील लोकांनी हंबरडा फोडला. " रामू, तू मला सोडून गेलीस, तुला मी काही सुख दिले नाही. तू माझ्यासाठी खस्ता खाल्यास, त्याग केलास ! " असे म्हणून साहेब ओक्साबोक्शी रडू लागले. त्याच्या शोकाकुल आवाजाने राजगृह व आसपासचे वातावरण शोक-सागरात बुडून गेले.

रमाबाईंच्या मृत्यूची वार्ता हां हां म्हणता साऱ्या मुंबईत पसरली. अस्पृश्य

समाजातील, गिरण्यांतून व कारखान्यांतून काम करणाऱ्या लोकांनी तावडतोब काम बंद केले व राजगृहाजवळ गोळा झाले. सारा अस्पृश्यवर्ग आपल्या लाडक्या आईच्या वियोगाने अश्रू ढाळीत राजगृहासमोर उभा होता.

स्मशानात नेण्याची लोक तयारी करू लागले तेव्हा साहेब त्यांना म्हणाले, " रामूला पांढरी पातळे फार आवडत असत. तिला चांगले शेवटचे पांढरे पातळ आणा ! " लोक म्हणाले " सौभाग्यवतीला शेवटचे पातळ हिरवे द्यावयाचे असते ! हिरवेच पातळ आणले पाहिजे ! " साहेबानी मूक संमती दिली.

प्रेतयात्रा राजगृहापासून वरळीच्या स्मशानाकडे दुपारी दोन वाजता निघाली. त्यावेळी ४०–५० हजारांचा लोकसमुदाय सामील झालेला होता. साहेब, डॉ. सोळंकी, देवराव नाईक, हे एक मोटारीत, बसले होते. दुसऱ्या दोन मोटारींत शिवतरकर, कमलाकांत चित्रे, अनंतराव चित्रे, दत्ता प्रधान वगैरे मंडळी होती. तीन चार मोटारींत घरची व जवळच्य नात्याची मंडळी होती. मडकेबुवा समता सैनिक दल व लोकसमूहाला ओरडून दिशा दाखवीत होते. यशवंत ( एकुलता एक मुलगा ) हातात शिंकाळे धरून पुढे रडत रडत चालला होता. स्वत: लेखकही या प्रेतयात्रेत सामील झालेला होता.

स्मशानात अग्निसंस्कार झाल्यानंतर पुन: साहेबांनी टाहो फोडला. लोकांनी त्यांची समजूत घातली. सर्व मंडळी राजगृहात परत आली; तो सर्व दिवस व २६ मे ची रात्र साहेबांना पत्नीच्या अनेक आठवणी येऊन दु:खाचे उमाळे येत होते. डोळ्यांतून अश्रू अखंड ठिपकत होते. आप्तेष्टांनीही त्यांना मनसोक्त रडू दिले कारण यापुढे साहेब आपले हे दु:ख कधीच असे प्रकट करू शकले नसते !

पत्नीला यापुढे गर्भधारणा झाली तर ती बाळंतपणानंतर क्षयाला बळी पडेल, अशी तिची नाजूक प्रकृती झाली आहे; अशी डॉ. दस्तूर यांनी १९२६ च्या आधीच सूचना दिलेली होती. या गोष्टीची वाच्यता बाबासाहेबांनी पत्नीजवळ केली नव्हती; पण तशी स्वत: दक्षता घेत होते. चि. यशवन्त हे आपले एकुलते एक अपत्य व तेही सदा आजारी पाहून रमाबाई आणखी दोन तरी अपत्ये आपल्याला हवीत अशी आपली इच्छा पतीजवळ व्यक्त करीत. त्यावेळी साहेब त्या त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत व अभ्यासिकेच्या पुढील गच्चीत जाऊन उभे राहात. अशा वेळी रमाबाई तळमजल्यावर येऊन अश्रू ढाळीत पलंगावर पडून राहात.

जेव्हा ' चार–मिनार ' घर विक्रीला काढल्याची वार्ता कळली व २० तोळयाचे दागिने गहाण ठेवून बाबासाहेबांनी नव्या पुस्तकांचे गठ्ठे आपल्या वाचनालयात आणले तेव्हा मुकुंदाची आई, लक्ष्मीबाई, रागारागाने चार गोष्टी सुनवण्यासाठी, दिराच्या अभ्यासिकेत गेल्या आणि " भावोजी ! " हा एकच शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडला. बाबासाहेब भावजयीचा शब्द ऐकून एकदम खुर्चीवरून उठले; पण भावजयीच्या तोंडून पुढील शब्द बाहेर पडण्याऐवजी त्या खाली मान घालून तळमजल्यावर परतल्या देखील. खाली येऊन स्फुंदून स्फुंदून रडू लागल्या. त्यांना दिराला सांगावयाचे होते की, तुम्ही पुस्तकांसाठी सर्व घराची राखरांगोळी करीत आहात. पुढे आपले कसे होणार आहे ? पण त्यांना हे शब्द उच्चारण्यास धीर झाला नाही; आणि बाबासाहेबांनीही त्या कशासाठी आल्या होत्या याची चौकशीही केली नाही !

बाबासाहेबांना संसाराची ओढ नाही असे लोक बोलत, तेव्हा साहेब चिडून सांगत, की मी माझ्या पुस्तकांवर जेवढे प्रेम करतो, तेवढेच बायको व मुलगा यांच्यावरही करतो. ते मला ( लेखकाला ) कधी कधी सांगत की, मी खूप पैसा मिळवीन, आणि पत्नीला व मुलाला औषधोपचारासाठी लंडनला नेऊन डॉक्टरी इलाज करून सुखात ठेवीन. पण हे त्यांच्या हातून घडले नाही. नंदादीपात तेवणाऱ्या ज्योतीसारख्या रमाबाईंची, ते वेळोवेळी आठवण काढून प्रशंसा करीत.

दुसऱ्या दिवसापासून राजगृहावर, बाबांच्या सांत्वनासाठी लोकांचे थवेच्या थवे येऊ लागले. बाबासाहेबांचा दुःखाने म्लान झालेला चेहरा पाहून लोकांना भडभडून येई. मीही भेटायला गेलो, तेव्हा मला पाहून एकदम त्यांना भडभडून आलं. डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. आम्हां तेथे असलेल्या सगळ्यांनाच दुःख अनावर झाले. कद्रेकर व दिवाकर पगारे भेटीसाठी आलेल्या लोकांना गटागटाने आत सोडत होते. दोन तीन मिनीटांनी दुसरा गट आत घेत असत. मी बराच वेळ एका खुर्चीवर बसून होतो. माझ्याकडे पाहून साहेब म्हणाले, " कसं काय चाललं आहे तुझं ? तुला परमनंट केलं का ?" " मी गेली चार वर्षे सेक्रेटरिएटमध्ये लीव्ह व्हेकन्सीत रखडत आहे आणि त्यात चार खंड पडले आहेत " असे सांगताच ते एकदम स्तब्ध झाले व मग म्हणाले, " सरकारी खात्यांतील अधिकाराच्या जागेवर असलेले लोक आपलेच पाहिजेत आणि त्यांच्या हातात ह्या पोस्टस् आल्या तरच आपल्या लोकांचे असे हाल होणार नाहीत. " यानंतर सर्व्हिससंबंधी आपण गव्हर्नर व होममेंबर यांच्याकडे कसे प्रयत्न करीत आहोत याबद्दल साहेबांनी थोडी

माहिती दिली. भेटीला येणाऱ्यांची संख्या वाढतच होती. दुसऱ्यांनाही भटायला मिळावे म्हणून आम्ही नमस्कार करून बाहेर आलो.

रमाबाईंच्या मृत्यूची पहिली शोकसभा साहेबांचे कुटुंब ज्या चाळीत राहात होते तेथील महिला समाजातर्फे शनिवार ८ जून १९३५ रोजी रात्री ८–३० ला भरविण्यात आली. या सभेची काळया रेषेने वेष्टिलेली हस्तपत्रिका मी मुद्दाम येथे उद्धृत करतो.

**पोयबावडी सिमेंट चाळ येथील महिला समाजातर्फे कै. सौ. आईसाहेब आंबेडकर यांचे जाहीर दुःख प्रदर्शन**

अखिल अस्पृश्य समाजाचे सर्वश्रेष्ठ पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुशील पत्नी **कै. सौ. रमाबाई उर्फ आईसाहेब आंबेडकर** यांचे जाहीर दुःख प्रदर्शन **श्री. सिताराम नामदेव शिवतरकर** यांचे अध्यक्षतेखाली शनिवार ता. ८–६–३५ रोजी ८.३० वाजता ( स्टॅं. टा. ) **पोयबावडी सिमेंट चाळ समोरील पटांगणात** होणार आहे. तरी सर्व बंधु–भगिनींनी या दुःखात वाटेकरी होण्याकरिता सभेस अवश्य हजर राहावे. सभेनंतर पोवाडे व शोकगीते गाईली जातील.

व्यवस्थापक

**समस्त महिला मंडळ**

भारतभूषण प्रिंटिंग प्रेस, कामाठीपुरा, मुंबई नं. ८

या सभेनंतर मुंबईत. ठिकठिकाणी व मुंबईबाहेरही शेकडो शोकसभा झाल्या. बाबासाहेबांना शोकप्रदर्शक हजारो पत्रे आली. त्यांना उत्तर द्यावे म्हणून साहेबांनी काळया चौकटीत इंग्रजी व मराठी पत्रिका छापून घेतल्या. मराठी पत्रिका येथे देत आहे. :–

राजगृह,
न्यू दादर कॉलनी,
मुंबई, ता. १२ जून १९३५

वि. वि. माझ्या पत्नीच्या शोचनीय मृत्यूच्या दुःखानिमित्त आपण पाठविलेले पत्र मिळाले. आपण व्यक्त केलेल्या सहानुभूतीबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. कळावे,

आपला

बाबासाहेब, १९२३ ते १९२९ कालातील आठवणी काढून गहिवरून म्हणत "तिने माझ्यासाठी अपार कष्ट सहन केले. उपास काढले, एका वस्त्रानिशी घरात राहिली. मला आमच्या मुलांना वाचविण्यासाठी काही करता आले नाही. मी यापुढे यशवंत–आमच्या एकुलत्या एक मुलासाठी जेवढे करता येईल तेवढे करीन. याला औषधोपचारासाठी लंडनला ठेवीन! तो माझा एकुलता एक मुलगा. मी त्याच्या विद्याभ्यासासाठी अळंटळं केली. पत्नी व मुलगा यांचा मी अपराधी आहे पण काय करू? हे समाजक्रांतीचे व्रत मी स्वीकारले आहे. त्यासाठी १९१३ ते १९२३ या काळात मी माझी बौद्धिक व मानसिक शक्ती वाढविण्यासाठी एखाद्या योग्याच्या निष्ठेने समाजाच्या उन्नतीला आवश्यक असणाऱ्या सर्वांगीण अभ्यासाची समाधी लावली. दररोज २०–२२ तास अभ्यास केला. पदव्या मिळविल्या. मी प्रकांड पंडित झालो; पण कुटुंबासाठी मी काहीच करू शकलो नाही!" अशा प्रकारचे उद्‌गार मी अनेक वेळा त्यांचे तोंडून ऐकले आहेत. त्या आठवणींनी पाणावलेले डोळे पाहिले आहेत. रमाबाईंच्या मृत्यूने त्यांच्या आयुष्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली होती

रमाबाईंच्या मृत्यूनंतर दोन आठवड्यांनी साहेब आपल्या दररोजच्या कामात लक्ष घालू लागले. पण मधून मधून ते राजगृहात पत्नीच्या आठवणीने उदास होऊन अश्रू ढाळत असत. या दुःखाचा परिणाम त्यांच्या डोकेदुखीत झाला. हा विकार जुलैमध्ये फारच बळावला. यावरील डॉक्टरी उपायाने काही गुण येईना; म्हणून ते वैद्यांची औषधे घेऊ लागले. त्यानेही गुण येईना, म्हणून शेवटी कैवल्यधाम लोणावळा या संस्थेचे प्रमुख स्वामी कुवलयानंद यांच्या सल्ल्यावरून ते ५ एप्रिल १९३६ ला कैवल्यधामातील उपचारासाठी लोणावळ्याला एक बंगला भाड्याने घेऊन राहू लागले. त्यांच्या सोबत मडकेबुवा, देवराव नाईक व आणि काही मंडळी होती. उपचारासाठी एका ठराविक वनस्पतीचा पाला वाटून त्याचा लेप, रात्रभर डोकीवर ठेवायचा. या उपचारासाठी साहेबांचे आवडते कुरळे केस काढून गोटा करणे भाग पडले. आधी केस काढून घ्यायला ते नाखूष होते; पण मग एकदाचे तयार होऊन न्हाव्याच्या हाती डोके दिले. हा लेप लावण्याचा उपचार बारा दिवस चालू होता. या उपचाराने साहेबांना दिवसेंदिवस आराम वाटू लागला. डोकेदुखीचा त्रास कमी होऊ लागला असता एकदा नाईक विनोदाने म्हणाले, 'साहेब तुम्ही अंगावर कफनी घालून मेखला बांधलीत व हातात सोटा घेतलात, की, थेट संन्याश्यासारखे दिसाल आणि पुढे चेष्टा करता करता म्हणाले, "वर फेटा बांधलात, की, थेट विवेकानंद होणार!" साहेबांनीही

हे विनोदी बोलणे मनावर घेऊन तसे करून पाहवयाचे ठरविले. लगेच शिप्याला बोलावून तसा पोशाख शिवण्याचा आदेश दिला. पोशाख अंगावर चढवून हातात सोटा घेऊन व एकदा फेटा बांधून व दुसऱ्यांदा फेटा न बांधता फोटो घेतले. त्यांपैकी फेटा न घातलेला फोटो साहेबांना फार आवडला. त्या फोटोच्या प्रती मुंबईत व इतरत्र हजारोंच्या संख्येने विकल्या गेल्या. हे फोटो अनेकांनी आपल्या घरात लावून, त्याची ते पूजा करीत असत.

डोकेदुखीचा आजार बरा झाल्यावर, साहेब लोणावळ्यावरून मुंबईस परतले, तेव्हा यशवंताचा संधिवाताचा आजार वाढलेला आहे, असे त्यांना दिसून आले. मलबारकडील एका गृहस्थाने सांगितले, की, संधिवातावर उत्तम औषधोपचार करणारा वैद्य मलबारमध्ये आहे. तेव्हा साहेबांनी त्या वैद्याशी पत्रव्यवहार करून, शंकरमामाबरोबर यशवंतला पाठवून दिले. ते दोघे मुंबईहून बोटीने त्रिवेंद्रमला गेले. त्रिवेंद्रमहून दहा मैलावर असलेल्या खेड्यातील वैद्याकडे एक महिनाभर उपचारासाठी राहिले. यशवंतचा संधिवाताचा विकार तात्पुरता बरा झाला; मात्र पूर्णपणे बरा झाला नाही. मधून मधून तो विकार उपटे. पण पूर्वीपेक्षा त्याची तीव्रता बरीच कमी असे.

साहेब लोणावळ्याहून परतल्यानंतर थोड्याच दिवसांनी डेव्हिड अब्राहम (देवीदास) याचा खून झाला. हा खून कामाठीपुरा १३ वी गल्लीत दोन गटाच्या मारामारीत झाला. नंतर त्याच्या दोन अनौरस मुलांमध्ये इस्टेटीबद्दल वाद निर्माण झाला. साहेबांनी एका मुलाचे वकीलपत्र घेतले. त्यांनी श्री. ए. एस. असईकर वकील, यांना प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात खटला चालवायला दिला. तेव्हा साहेब डोकीवर केस नसल्यामुळे काळी टोपी घालून ती केस ऐकत बसत.

बाबासाहेबांचे सारे जीवन संन्यस्त संसाराचे होते. रमाबाईनी आपले जीवन पतीच्या विद्याव्यासंगापायी पूर्वायुष्य अत्यंत हालअपेष्टेत व्यतीत केले. उत्तर आयुष्यात त्यांच्या संसारात समृद्धी आली. पण तिचा उपभोग घेण्याइतकी त्यांची शारीरिक स्थिती चांगली राहिली नाही.

" मी लग्न का केले ?" असे कधी कधी साहेब म्हणत. " मी रामूला काय सुख दिले ? " लोक म्हणतात, " आंबेडकर फार दैववान, " पण माझ्या इतका

दुर्दैवी माणूस कोणी नाही ! मला माझ्या कुटुंबाला जरासुद्धा सुख देता आले नाही !"

## धर्मांतराची घोषणा

आयुष्याची १०–१२ वर्षे आपण सार्वजनिक कार्यात व्यतीत केली. या अवधीत आपण आपली आर्थिक, बौद्धिक व आध्यात्मिक ( धार्मिक ) क्षेत्रांत किती प्रगती केली, याबद्दलचे विचारतरंग बाबासाहेबांच्या मनात १९३५ च्या जुलैमध्ये म्हणजेच रमाबाईंच्या मृत्यूच्या आघातानंतर जास्त प्रभावीपणे उमटू लागले. १९२४ जुलै पासून त्यांनी बॅरिस्टरीची प्रॅक्टिस सुरू केली. आता त्या गोष्टीला १० वर वर्षे लोटली होती; तरी त्यांची आर्थिक परिस्थिती समाधानकारकपणे सुधारण्याची त्यांना संधीच मिळाली नाही; कारण त्यांना अती अल्प मोबदला मिळेल अशाच केसेस मिळत. घवघवीत प्राप्ती होईल अशा केसेस त्यांना मिळाल्या नाहीत; कारण त्यांची जात, त्यांची राजकीय स्वतंत्र मते व अस्पृश्यांचे पुढारीपण. यामुळे त्यांना बाटलीबॉईज कॉलेज आणि लॉ कॉलेज यांमध्ये नोकरी करावी लागली.

१९२३ मध्ये ते जेव्हा लंडनहून मुम्बईस आले, तेव्हापासून पुढील तीन चार वर्षेपर्यंत भारताच्या आर्थिक प्रश्नांवर त्यांनी १० ग्रंथ रचण्याचा मनसुबा रचला होता. आणि त्या अनुषंगाने त्या विषयावरील माहिती गोळा केली होती. परंतु त्यांना हें ग्रंथ लिहिण्याइतकी सवड व परिस्थिती लाभली नाही. हातात भरपूर पैसा असला तर कुटुंबाचा व स्वतःचा ( पुस्तकांचा ) खर्च बिनधोकपणे करता येईल व मग ग्रंथ लिहिण्याला मनाला स्वास्थ लाभेल अशी त्यांची मनोधारणा असल्यामुळे १९३५ नंतर आपल्या एकंदर जीवनाबद्दल त्यांना उदास व निरुत्साही वाटू लागले. त्यांना भरपूर पैसा कमविता आला नाही व ग्रंथ लिहिता आले नाहीत. याला आणखी एक कारण होते. ते म्हणजे सामाजिक जीवनात त्यांना स्वकीयांपासून व परकीयांपासून होणारा तीव्र विरोध ! तो विरोध काही अंशी अज्ञानामुळे व काही अंशी जाणूनबुजून करण्यात आला होता. या विरोधाच्या प्रतिक्रिया त्यांच्या मनावर वेळोवेळी होत असत; अशा वेळी ते खाजगी बैठकींतून अगर मित्रांना पाठविलेल्या पत्रांतून त्यासंबंधी वैतागाचे उद्‌गार काढीत असत व म्हणत की नको हे पुढारीपण! मी लौकरच सार्वजनिक जीवनातून निवृत्त होणार व नोकरी आणि लेखन करणार. ही नोकरी म्हणजे हायकोर्टाचे न्यायाधीश होणे.

यासाठी ते १९३२ पासून प्रयत्न करीत होते. परंतु हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश दी ऑनरेबल सर जॉव्हन वुइलियम फिशर ब्यूमाँट, के. सी. ( १९३०–४३ ) यांनी सदर गोष्टीस मंजुरी दिली नाही. कारण त्यांचा दृष्टिकोन असा होता की, आंबेडकर ही व्यक्ती राजकारणी आहे. अशी व्यक्ती न्यायखात्यात नसावी. न्यायाधीशाची जागा मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी रॅम्से मॅक्डोनल्डचे पत्र, मुंबईचे तेव्हाचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साईक्स यांना आणलेले होते. ही माहिती मला एकदा बाबासाहेबांचे निकटवर्ती सहकारी वकील श्री. बा. जी. मोडक यांनी सांगितली होती. पण त्या पत्राचा काही उपयोग झाला नाही. या सर्व परिस्थितीमुळे बाबासाहेब वैतागून गेले व त्यांनी २२ जुलै १९३५ ला एक निवेदन जाहीर केले की, मी अस्पृश्यांच्यासाठी बरेच कार्य केलेले आहे. आता मी सार्वजनिक चळवळीतून निवृत्त होणार आहे. यापुढे अस्पृश्यांनी डॉ. सोळंकी यांच्या नेतृत्वाखाली आपली चळवळ चालवावी. या जाहीर निवेदनामुळे पुण्या–मुंबईतील अस्पृश्य समाजाला मोठाच धक्का बसला. या बाबतीत टाईम्सच्या प्रतिनिधीने डॉ. सोळंकी यांची २४ जुलैला मुलाखत घेऊन खुलासा विचारला. तेव्हा सोळंकी म्हणाले. की, या बाबतीत आपणाला काहीच माहिती नाही. ही मुलाखत २५ जुलैच्या टाईम्सने प्रसिद्ध केली ती अशी.

### Dr. AMBEDKAR – DEPRESSED CLASS CHAIRMAN AT HIS FORSAKING POLITICS.

Poona, July 24, 1935.

Great surprise and keen disapointment is expressed by the local depressed classes at the news that Dr. Ambedkar has forsaken politics. They say they feel that he has deserted them. They had hoped to see him among their representatives in the Bombay Legislative Assembly.

Asked for his opinion, Dr. Solanky, who is attending the session of the Legislative Cauncil in Poona, said, he knew nothing about what Dr. Ambedkar intended doing. He had not written to him. If it was true then it was a great surprise.

या घटनेबद्दल निरनिराळ्या लोकांनी निरनिराळे तर्क केले. मुंबईच्या ' क्रॉनिकल ' पत्राच्या बातमीदाराने असा तर्क लढविला की आंबेकडरांना हायको-

टांचा जज्ज अगर मुंबईच्या कायदेमंडळात मंत्री होण्याची इच्छा आहे, म्हणून त्यांनी ही घोषणा करून आपल्या मार्गातील अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो मजकूर असा –

## "What Is Behind Dr. Ambedkar's Retirement."

### Chances of High Court or Ministership In Balance May Necesstitate Period of Inaction

( From A Correspondent )

What is the secret behind the retirement of Dr. B. R. Ambedkar ? There are several speculative rumours about the matter which neither Dr. Ambedkar nor leaders of his party have repudiated. They prefer to remain silent and regret at his retirement.

Inquiriies however show that there are several cogent reasons behind the decision of Dr. Ambedkar, which, it is understood, are responsible for his retirement from public life. First and foremost is the official position he ocdupies at present in the Government Law College.

## Chance For High Court

The civil Disobedience Movement entrants in the public service have to give an undertaking in writing that they will not participate in political movements. This is the " sine qua non" or the first codition for entering government service now.

Dr. Ambedkar, being a government servant, in virtue of his office the as principal of the Government Law College, naturally cannot take any active part in politics and therefore his retirement is inevitable.

Then, as the principal of the LawCollege, there is a chance for him to go to the Hige Court as one of His Majesty"s Judges,

even to fill temporary vacancy whenever any vacancy occurs.

In the time of Sir Fredriks Sykes, ex-Governor of Bombay attempt was made to elevate Dr. Ambedkar to t heBench buthe, proposal fell through. It is probable that Lord Brabourne may during his regime appreciate the services rendered by Dr. Ambedkar by elevating him to the Bench. The Principalship of the Law College is often a stepping stone to the High Court.

But even granting that Dr. Ambedkar retires temporraily from public life, it won't deter him from entering it again after some time, if circumstances change. It is not Dr. Ambedkar but the leaders of his party who would work for him to go to the Assembly under the new reforms and they could not do so at a moment's notice. It all depeads on the future.

## OR AS A MINISTER

Then the question arises whether Dr. Ambedkar would prefer to be a Hige Court Judge or a minister under the reforms. This depends upon how events mould themselves. If there is a chance of his going to the Hige Court before the reforms, he would be prepared for it; if not, he will wait and chalk out his plan according to circumstances under the new reforms. The question arises who would capture the Assembly, viz the Congress or the Liberals. Of course, the chances are for the Congress. In that case, will Dr. Ambedkar make a common cause with the Congess, if he is elected to the Assembly? If not, the chances of his getting membership are very remote.

This question also depends upon the decision of the All India Congress Working Committee at Wardha next week. If they decide against the congress candedates holding ministerial posts then there is a better chance for Dr. Ambedkar to get in the Assembly and become one of the ministers.

डॉ. आंबेडकर लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल आहेत. सबब ते सरकारी नोकर

ठरतात. या अवस्थेत ते कायदे मंडळात सरकार नियुक्त सभासद म्हणून राहणे, नियमबाह्य आहे. पण सरकार असले नियम स्वतःच्या सोयीसाठी धाब्यावर बसवीत असते. लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून डॉ. आंबेडकर यांचा हायकोर्टचे जज्ज म्हणून हक्क मान्य करणे जरूर आहे. पण सरकार ते करणार की नाही, हे आणि खुद्द आंबेडकर त्याबद्दल संमती देतील की नाही, हे सांगणे कठीण आहे. कारण १९३५ च्या कायद्यान्वये जे कायदे मंडळ निवडून येईल, त्यात काँग्रेस पक्ष मंत्रिमंडळ करील की मवाळ पक्ष मंत्रिमंडळ बनवणार, यावर डॉ. आंबेडकरांचा पवित्रा अवलंबून राहील. काँग्रेसचे मंत्रिमंडळ झाले तर आंबेडकर जज्जाची जागा स्वीकारतील व मवाळांचे मंत्रिमंडळ झाले तर आंबेडकरांना मंत्रिमंडळात स्थान मिळेल. मग ते जज्जाच्या जागेवर पाणी सोडतील, असा क्रॉनिकल्च्या मजकुराचा मथितार्थ आहे.

यापुढे ज्या घटना घडल्या त्यावरून हे स्पष्ट झाले की डॉ. आंबेडकर यांनी प्रिन्सिपॉलच्या जागेचा राजीनामा देऊन निवडणुकीत ( १९३७ ) भाग घेतला व म्हणूनच त्यांना राजकीय प्रश्नांच्या पुढे स्वतःची आर्थिक समृद्धी साधणे हे कमी महत्त्वाचे वाटत होते, हे सिद्ध होते.

शनिवार ता. १२–१०–३५ ला बाबासाहेब नाशिकला गेले, तेव्हा सकाळी ११ वाजता त्यांना स्टेशनपासून गावात मोठ्या थाटाने मिरवत नेण्यात आले. विदगाव, नाशिक रोड वगैरे ठिकाणी त्यांना पाटर्या दिल्या. नासिक रोड येथे त्यांच्या नावे एक वाचनालय सुरू केले होते. त्यांच्यासाठी एक पत्र्याची शेड बांधली होती. तिचे उद्‌घाटन बाबासाहेबांच्या हस्ते झाले. त्यावेळी भाषण करताना त्यांनी जनतेला उपदेश केला की, तुम्ही स्वावलंबी व्हा. स्वतःच्या पायांवर उभे राहून आपल्या प्रगतीचे कार्य करा. माझे बरे वाईट झाले तर माझ्यामागे चळवळ चालविण्यास लोक तयार झाले पाहिजेत. रात्री नऊ वाजता रविवार पेठ, हिरालाल गल्ली, येथे सहभोजन झाले. त्यांत देशपांडे हे एकच काँग्रेसमन होते. रविवारी ता. १३ ऑक्टोबरला, बाबासाहेब नाशिकहून विंचूरला गेले. मार्गावरील गावांतून त्यांना अनेक ठिकाणी हारतुरे देण्यात आले. विंचूर येथेही स्पृश्य वर्गातर्फेही त्यांना चहापार्टी देण्यात आली. सकाळी ते येवले म्युनिसिपालिटीचे मानपत्र स्वीकारण्यास गेले. मानपत्राला उत्तर देताना ते म्हणाले की, आमच्या चळवळीमुळे स्पृश्य वर्गीयांच्या दृष्टिकोनात बदल घडेल व ते आमच्याशी आपुलकीने वागण्यास तयार होतील, असे दिसत नाही ! तेव्हा

आम्ही हिंदूंमधून दूर राहून स्वावलंबनाने आमच्या प्रगतीसाठी झगडत राहू. ( ' नाशिक जिल्ह्यातील डॉ. आंबेडकरांची फेरी ' बुधवार, लोकसत्ता १६-१०-३५ नाशिक घ. नं. ९२६ )

मानपत्र समारंभानंतर श्री. अमृतराव रणखांबे यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची जाहीर सभा रात्रौ १० वाजता झाली. तीत अस्पृश्यांनी धर्मांतर करावे अशी घोषणा करणारे भाषण बाबासाहेबांनी केले आणि त्या भाषणाला पाठिंबा देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तो ठराव स्वतः बाबासाहेबांनी लिहून आणलेला होता, तो असा :—

'अस्पृश्य मानलेले वर्ग व स्पृश्य मानलेले वर्ग यांमध्ये समता व संघटना घडवून आणण्याच्या हेतूने तितके सामर्थ्य नसताही, माणसांची व द्रव्याची अपरिमित हानी सोसून मुंबई इलाख्यातील अस्पृश्य वर्गांनी महाड येथे चवदार तळयावर व नाशिक येथे काळाराम मंदिराचा सत्याग्रह तर गेली सहा वर्षे सतत चालविण्यात आला. परंतु स्पृश्य मानलेल्या हिंदूंचे किंचितही मतपरिवर्तन झाल्याचे दिसत नाही. इतकेच नव्हे तर स्पृश्य व अस्पृश्य या उभयतांतील होऊ घातलेल्या संघटनेला व तद्जन्य हिंदुसमाजाच्या सामर्थ्याला कवडीचीही किंमत स्पृश्य समाज देत नाही, असे त्यांनी आपल्या वर्तनाने सिद्ध केले आहे. म्हणून अस्पृश्य वर्गाची ही परिषद असा ठराव पसार करीत आहे की, हिंदूंची मनधरणी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा काहीही उपयोग होत नसल्याने त्याबाबतीत अस्पृश्य वर्गाने आपले सामर्थ्य विनाकारण मुळीच खर्च करू नये व सत्याग्रहाची मोहीम यापुढे बंद करावी आणि स्पृश्य मानलेल्या वर्गापासून आपला समाज स्वतंत्र करावा व हिंदुस्थानातील अन्य समाजांमध्ये आपल्या समाजाला मानाचे व सम–तेचे स्थान मिळविण्याकरिता अस्पृश्य वर्गाने एकनिष्ठेने प्रयत्न करावा, असे या परिषदेचे मत आहे.' हा ठराव '**अस्पृश्य समाजाला नव्या मनूचा नवा संदेश**' म्हणून जनता पत्राच्या पहिल्या पानावर, जाड चौकटीत, सुमारे दोन वर्षे देण्यात येत असे.

डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली १३ ऑक्टोबर १९३५ ला येवले ( नाशिक ) येथे मुंबई इलाखा दलित वर्गीय परिषद भरली होती. प्रेक्षक सुमारे १० हजार होते. बाबासाहेबांनी धर्मांतराचा ठराव मांडला व त्यावर मुद्देसूद भाषण केले. प्रेक्षकांतील तरुण पिढीला या ठरावामुळे फार आनंद झाला. वृद्ध लोक व स्त्रिया

हे धर्मभोळे, त्यांना या घोषणेने चत्मकारिक वाटले; तरीही साहेबांचे पोटतिडिकीने केलेले जळजळीत भाषण ऐकून त्यांनीही ठरावाला संमती दिली. हिंदुलोक अस्पृश्यांना खालच्या पायरीवरचे हिंदू म्हणून छळतात. ते परधर्मात गेले तर या छळातून मुक्त होतील व स्वत.च्या हिमतीवर उपजीविका करतील, शिक्षण घेऊन ते स्वत:ची प्रगती घडवून आणतील. या मुद्यांवर साहेबांचे भाषण एक तासभर झाले. सारे लोक मंत्रमुग्ध होऊन भाषण ऐकत होते. ठराव टाळ्यांच्या प्रचंड गज-रात मंजूर झाला.

साहेब व त्यांचे सहकारी येवल्याहून परतले व नाशिकमध्ये त्यांचा मुक्काम असताना मंगळवार दि. १५-१०-३५ ला आणि १६-१०-३५ ला भंगी (मेघवाल) लोकांनी त्यांना चहापार्टी व भोजनपार्टी दिली. साहेब व त्यांचे सहकारी आपल्या बरोबर जेवतात हे पाहून त्यांना मनस्वी आनंद व उत्साह वाटला.

धर्मांतराच्या घोषणेवर निरनिराळ्या लहान मोठ्या व्यक्तींनी आपापली अनुकूल वा प्रतिकूल निवेदने प्रसिद्ध केली. ती मी येथे देत आहे. :–

असोसिएटेड प्रेसने गांधीजींनी आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेसंबंधी जे प्रतिकूल उद्‌गार काढले ते आंबेडकरांना दाखवून त्यांचे मत अजमाविले. गांधी-जींचे मत असे होते की, अस्पृश्यता मरणोन्मुख अवस्थेत आली आहे. अस्पृश्यांना धर्मांतर करण्याची जरुरी नाही. आंबेडकरांचे हे कृत्य फार घाईचे वाटते. धर्माची आवश्यकता मानवी जीवनात आहे आणि धर्म बदलणे ही बाब शर्ट बदलण्याइतकी सोपी नाही. यावर आंबेडकरांनी मत प्रदर्शित केले की धर्माची आवश्यकता गांधी सांगतात, ते मला मान्य आहे. पण **तो धर्म सर्व मानवांना समान वागविणारा असला पाहिजे. हिंदू धर्माची बैठक असमानतेच्या पायावर आहे. म्हणून हिंदु धर्म अस्पृश्यांना त्याज्य वाटतो.** हिंदूंनी अस्पृश्यांवर जुलूम केले व कविठा (गुजराथ) या गावी तर त्यांनी दुष्टपणाचा कहर केला. मी **धर्मांतर करून या गोष्टीबद्दल हिंदूंच्यावर सूड उगवीत आहे, असे कोणी समजत असेल तर ते चूक आहे.** हिंदुधर्मातील असमानता हीच या धर्मांतराच्या दुःखाचे मूळ होय, म्हणून हे धर्मांतर!" अशा आशयाचे उत्तर डॉ. आंबेडकरांनी गांधीजींच्या निवेदनाला दिले. "मी हिंदू म्हणून मरणार नाही" असेही ते पुढे म्हणाले. या संबंधीचा मजकूर मी पुढे देत आहे. :–



मिस् एलिनार झिलियट या विदुषीने Ph. D. करताना
आपल्या विषयावर श्री.खैरमोडे यांचेबरोबर
मुंबई युनिव्हर्सिटीच्या '**खैरमोडे संग्रह**' पाहून चर्चा करीत असता.



चौथ्या खंडाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने
**प्रा. न. र. फाटक यांच्या हस्ते सत्कार करताना**
१) श्री. खैरमोडे २) प्रा. न. र. फाटक ३) श्री. वासुदेव वरळीकर

## प्रकरण २ रे

# धर्मांतराची चळवळ

दैनिक 'त्रिकाळ' या पत्राने, बुधवार २३–१०–३५ च्या अंकात दुसऱ्या पानावर खालील तीन बातम्या छापल्या होत्या :–

### "आंबेडकरांचे व्याहीपण ब्राह्मण स्वीकारणार"

अहमदाबाद ता. २१ – येथील आर्यसमाजाचे पुढारी पं. श्रुतबंधु शास्त्री यांनी डॉ. आंबेडकर यांना असे कळविले आहे की, मी जन्माने ब्राह्मण असलो तरी आपली मुलगी तुमच्या मुलाला देण्याची माझी तयारी आहे."

### "डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी खासदार गौबा निघाले"

लाहोर, ता. २१ – खासदार गौबा हे डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी निघाले आहेत. शाहीगंज प्रकरणातील डिक्टेटर पीर जमियत अल्ली शहा हेही याच कारणासाठी मुंबईकडे निघाले आहेत."

खासदार गौबा म्हणजे कन्हय्यालाल गौबा हे आर्यसमाजिष्ट विद्वान आणि उत्कृष्ट इंग्रजी लेखक व बॅरिस्टर. त्यानी मिस् मेयोच्या 'मदर इंडिया' या ग्रंथाला 'अंकल सॅम' या नावाखाली ग्रंथरूपाने उत्तर दिले होते. ते पुढे मुसलमान झाले. तेव्हा त्यांचे नाव खलिद गौबा असे होते. ते १९३५ मध्ये मुसलमान होते. पुढे ते पुन: हिंदू झाले.

### "डॉ. आंबेडकरांना बुद्ध धर्म पसंत"

मुंबई, ता. २१ – आपण इस्लामी अगर ख्रिस्ती धर्म स्वीकारीत नाही. असे

डॉ. आंबेडकर यांनी जाहीर केले. बुद्ध धर्म हा लोकशासित धर्म असल्यामुळे तो आपल्याला पटत असल्याचे त्यांनी सांगितले. हरिजन परिषद भरवून नंतर ते या बाबतीत काय ते ठरविणार आहेत."

आम्ही तुमच्या मुलाला आमच्या मुली देतो, अशा आणखी काही बातम्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या. या ब्राह्मणांच्या मुली यशवंत व मुकुंद करणार काय ? असे त्यांचे मित्र त्यांना चेष्टेने विचारत असत. पण या ब्राह्मण मुली लग्नासाठी त्यांच्या बापांनी राजगृहात दाखवावयास आणल्या नाहीत. बोलाचाच भात, बोलाचीच कढी, जेवुनिया कोण तृप्त झाला ? अशीच ही ब्राह्मणांची वृत्ती होती.

शीखधर्म एकेश्वरी व समताप्रवण आहे, तो तुम्ही स्वीकारा अशी तार अमृतसरहून सरदार दरीपसिंग ठोबिया, अमृतसर येथील सुवर्ण मंदिराचे उपाध्यक्ष, यांनी बाबासाहेबांना १६–१०–३५ ला पाठविली. (टाईम्स, गुरुवार, १७-१०-३५, पा. ५ ) आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा अनिष्ट आहे. अशी निवेदने हरिजन-सेवक संघ, शाखा मुंबई, यांचे अध्यक्ष मथुरादास विसनजी आणि काँग्रेसचे अध्यक्ष श्री. बाबू राजेन्द्रप्रसाद यांनी प्रसिद्ध केली. ( कित्ता )

डॉ. आंबेडकर बुद्ध धर्म स्वीकारणार, अशी बातमी टाईम्सने ( सविस्तर ) २६-१०-३५ च्या अंकात (पा. १३ Dr. Ambedkar to turn Buddhist ? ) प्रसिद्ध केली. तेव्हा प्रा. धर्मानंद कोसंबी हे बाबासाहेबांना रविवारी २७ ऑक्टो-बरला राजगृहात भेटले. दोघांनी बुद्ध धर्मावर चर्चा केली. तेव्हा प्रा. धर्मानंद कोसंबी यांना असे वाटले की, जरी आंबेडकरांनी कोणता धर्म स्वीकारावयाचा याबद्दल स्वतःला बांधून घेतले नाही, तरी त्यांचा बौद्ध धर्माकडे ओढा आहे. ते त्याच रात्री गांधीजींना भेटण्यास वर्ध्याला गेले. त्यांनी गांधीजींना सांगितले की, **Mahatmaji, I have a hunch thought, Dr. Ambedkar would accept Budhism.** बुद्धमंदिर परळ भागात बांधून तेथे बौद्ध धर्मावर प्रवचने देण्याचा व अस्पृश्यांना या धर्माकडे प्रवृत्त करण्याचा माझा विचार आहे. तर आपण मला आर्थिक सहाय्य देण्याची व्यवस्था करावी. गांधीजी म्हणाले, "किती खर्च येईल ?" कोसंबी म्हणाले, 'सुमारे सतरा अठरा हजार.' जवळ जुगुलकिशोर

बिर्ला बसलेले होते त्यांच्याकडे गांधीजींनी पाहिले मात्र, लगेच जुगुलकिशोरनी साडे सतरा हजारांचा चेक कोसंबी यांच्या नावे दिला. ही हकीकत त्यांनी मला माझ्या घरी, पितळवाला बिल्डिंग, पोयबावडी येथे येऊन सांगितली आणि 'बुद्धजन बौद्ध विहार,' सेंट झेवियर प्ले ग्रांऊडजवळ बांधण्याची त्यांची योजना मला सांगितली. त्यांनी मला व लक्ष्मण बाबाजी भिगारदिवे यांना कार्ल्याचा स्तूप बघावयास नोव्हेंबरच्या एका रविवारी नेले. बरोबर दोन इंजिनियर्स होते. त्यांनी स्तूपाचे व चैत्याचे मोजमाप घेतले व त्या मॉडेलवर परळला स्तूप व इमारत बांधली. तेथे त्यांची प्रवचने होत. एका प्रवचनास सी. ना. शिवतरकर, कर्मवीर भाऊराव पाटील वगैरे उपस्थित होते. तेव्हा बा. जा. देवरुखकर व वि. ल. केळशीकर हे २५–३० लोकांना घेऊन तेथे विरोध करावयास आले. बाबासाहेबांनी अजून बौद्ध धर्म स्वीकारला नाही. तुम्हांला हे उपद्व्याप कोणी सांगितले ? तुम्ही आमच्यात फूट पाडता, तुम्ही काँग्रेसचे हस्तक आहात वगैरे भाषा वापरून तेथे मोठी गडबड उसळविली. देवरुखकर मला मारावयास आले तेव्हा शिवतरकरांच्या मुलाने मला पाठीस घातले. त्यांचे म्हणणे असे की, शिवतरकर हा बाबासाहेबांचा शत्रू. त्यांना का येथे आणले ? या गडबडीत नंतर माझा व कोसंबीचा संबंध तुटला. ते थोड्याच दिवसांनी विहार सोडून गेले. शेवटी आम्हांला समजले की, त्या दिवशी शिवतरकरांचे प्रवचन होते. ते हाणून पाडणे हा देवरुखकरांचा डाव होता. बुद्ध धर्मावर प्रवचने हे केवळ निमित्त.

## " डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करण्यापूर्वी पूर्ण विचार करावा "

या मथळ्याखाली 'सकाळ' या पत्राने २८–१०–३१ च्या अंकात काही लोकांची मते प्रसिद्ध केली होती. श्री. के. के. सकट यांचे पत्र " अस्पृश्योद्धाराचे काम एकट्या ब्राह्मणांचे नाही. ब्राह्मणेतर व महार यांच्यावरील जबाबदारी " या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाले होते. महार लोक खालच्या लोकांना अस्पृश्य मानतात अशी श्री. सकट यांनी तक्रार केली होती.

श्री. सकट यांचे एक पाठीराखे श्री. माटे यांनी अस्पृश्यांबरोबर सहभोजन करण्याचे नाकारले. याबद्दल बातमी प्रसिद्ध झाली होती ती अशी –

" अस्पृश्योद्धाराच्या अघळपघळ गप्पा मारणारे श्री बापू माटे यांनी आज रोजी पुणे येथे व्हावयाच्या सहभोजनात भाग घेण्याचे नाकारले, असे कळते. श्री.

अण्णा भोपटकर हे मात्र त्यात भाग घेणार आहेत." (विविधवृत्त,१४-८-३६, पा.१)

४ मार्च १९३६ रोजी आगाखान पंथीय मुसलमानांची सभा मुंबईत भरली. तेव्हा आगाखान यांनी सभेत असे उद्‌गार काढले की, अस्पृश्य लोक हिंदू धर्म सोडून परधर्मात जाण्यास उत्सुक आहेत. त्यांना आपल्या धर्मात घ्यावे व त्यांची सर्वांगीण उन्नती घडवून आणावी. याबद्दल आपल्या पंथातील तरुणांनी प्रयत्न करावेत. यामुळे ते इस्लामचीच मोठी सेवा करतील. ( The Indian Annual Regisier of India, Vol II – July – December 1935, p. 9. ) पण या बाबतीत आगाखान पंथीयांनी काहीच हालचाल केली नाही.

१० नोव्हेंबर १९३५ ला नाशिक जिल्ह्यातील महार समाज सेवकांनी सभा भरवून धर्मांतराला पाठिंबा दिला, आणि त्यांच्या घरांतील देव, देवता यांच्या मूर्ती व धार्मिक ग्रंथ यांची होळी केली. ( Ibid, p. 32 )

श्रीमती खलिदा ख्वानुम् ( हलिदे अदिब ) या तुर्की क्रांतिकारक विदुषीने १९३४ साली जुलिया मिलिया इस्लामिया या संस्थेच्या वतीने हिन्दुस्थानात व्याख्याने दिली. हिन्दुस्थानातील सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीची पाहणी केल्यानंतर तिने Inside India हा ग्रंथ लिहिला. तो लंडनमध्ये १९३७ ( दुसरी आवृत्ती १९४१ ) साली प्रसिद्ध झाला. अस्पृश्यांच्या परिस्थितीबद्दल काही हिंदूंशी चर्चा करताना तिने त्यांना प्रश्न केला की या लोकांचा इतका छळ इतके वर्षे झाला तरी ते हिंदू धर्मात का राहिले ? तिला एका हिन्दूने उत्तर दिले की, अस्पृश्य लोक मुसलमान अगर ख्रिस्ती झाले असते तर त्यांचा प्रश्न कायमचा मिटला असता, हा तुमचा मुद्दा रास्त आहे. परंतु ऐहिक उन्नतीसाठी पारलौकिक उन्नतीचा त्याग करण्याची प्रवृत्ती मानवात नसल्यामुळे हे दोन्ही धर्म स्वीकारले नाहीत. हे (अनैतिहासिक) उत्तर सदर विदुषीला पटले नाही. ( पा. ७४ ) बौद्ध धर्मात समतेचा जास्त पुरस्कार आहे असे सदर विदुषीने म्हटल्यावर प्रोफेसर मलकानी तिला म्हणाले की, बौद्ध लोकांनी ब्राह्मणांची उच्चनीच जातिभेद निर्मितीबद्दल टिंगल करता करता निरनिराळ्या व्यवसायांतील घाणीबद्दल इतका तिरस्कार उत्पन्न केला की, कातड्यांचा व्यवसाय करणाऱ्या, मासे मारणाऱ्या, गुरे मारणाऱ्या वगैरे लोकांना त्यांनी अस्पृश्य ठरविले. ( proffessor Malkani said to me once " Budhism laughs at the Brahamanic pride in birth and breeding, but introduced a new pride based on occu-

patlon. All occupations connetced with slaughtered animals came to be regarded as unclean, So all leather workers, hunters, butchers, fishermen, men who were of low castes already became untouchables " ( Inside India P. 77 )

हिन्दू धर्मातील दोष लपविण्याच्या ज्या अनेक युक्त्या वापरण्यात येत असतात, त्यांपैकी एक युक्ती मलकानी वापरली. हिंदू धर्मातील दोष दूर करण्याचे खरे कार्य हाती घेणे हे हिंदूच्या रक्तातच नसल्यामुळे त्यांच्या हातून या चुका होत आलेल्या आहेत आणि त्या चुकामुळे हिंदू समाजाला आणि धर्माला जबरदस्त किंमत देऊन गुलामगिरीत त्यांना (अस्पृश्यांना) अमानुष रीतीने जीवन जगावे लागले, याबद्दल हिंदूंना अधूनमधून वाईट वाटते. एवढेच, हिंदू धर्मात व समाजांत क्रांती करावी व सर्व हिंदूंना स्वाभिमानाने जगण्यास अनुकूल परिस्थिती उत्पन्न करावी, अशी तीव्र जाणीव हिंदूंना होत नाही.

धर्मांतराची घोषणा सर्व जगात घुमली तेव्हा सर्व धर्मांचे ( ख्रिश्चन, इस्लाम, शीख वगैरे ) प्रतिनिधी आंबेडकरांना भेटण्यास आले. हिंदूंना आणि शिखांना ही भीती होती की, आंबेडकर व त्याचे अनुयायी यांनी इस्लाम अगर ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर हिंदू व शीख समाजाचे पारडे हलके होईल आणि धर्मांतरित अस्पृश्य लोक हिंदूना ' दे माय धरणी ठाय ' करून सोडतील आणि काही वर्षांनी हे धर्मांतरित लोक राजकीय सत्ता काबीज करतील आणि त्यांचे सैन्यात व पोलिस दलात सामर्थ्य वाढेल. मग ते हिंदू लोकांवर सत्तेचे कोरडे ओढतील. ही परिस्थिती ओळखून डॉ. कूर्तकोटी ( शंकराचार्य ) यांच्यातर्फे व मुंबईतील हिंदूसभेतर्फे डॉ. एम्. बी. वेलकर यांच्या नेतृत्वाखाली हिंदूंचे शिष्टमंडळ आंबेडकरांना भेटण्यास २५ ऑक्टोबर १९३५ ला राजगृहास आले. शिष्टमंडळाने आपली व्यथा डॉ. आंबेडकरांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले की, **जेणेकरून भारत देशाच्या हिताला धोका येईल अशा प्रकारचे धर्मांतर मी करणार नाही, याबद्दल तुम्ही निश्चित असा. एवढेच काय पण देशहितासाठी माझ्या समाजाच्या प्रगतीवर मला जळजळीत कोळसे ठेवण्याची वेळ आली तर मी तसे करण्यास कां कू करणार नाही !** कोणता धर्म स्वीकारावा यासंबंधी नक्की निर्णय मी माझ्या अनुयायांना सांगण्याच्या अगोदर मी हिंदू सभा आणि तत्सम समाज यांच्या पुढाऱ्यांच्याबरोबर चर्चा करूनच शेवटचा निर्णय घेईन.

या वरील घटनेच्या विरुद्ध अशी एक घटना अहमदाबादला त्याच दिवशी

चडली. आम्हांला सवर्ण हिंदूंनी अमानुष रीतीने वागविले हे खरे, तरीपण आम्ही हिंदुधर्मात राहू. आंबेडकर यांनी धर्मांतर केले तर त्यांना आम्ही आमचे पुढारी म्हणून मानणार नाही. अशा अर्थाचे उद्‌गार अहमदाबादच्या हरिजन सभेत काढण्यात आले. अध्यक्ष मूळदास विश्म हे हरिजन होते.

नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्यांची सभा १० नोव्हेंबर १९३५ ला नाशिक रोड येथे भरविण्यात आली होती. ती नाशिक डिस्ट्रिक्ट डिप्रेस्ड क्लास यूथ लीग या संस्थेतर्फे. सभेस सुमारे ८०० लोक हजर होते. त्यांत काही मुसलमानही होते. धर्मांतराला पाठिंबा आणि हिंदू देवदेवता, शास्त्रे, पुरोहित, भटजी, जत्रा वगैरेवर अस्पृश्यांनी बहिष्कार टाकावा, असे ठराव सभेत मंजूर करण्यात आले. मनुस्मृती व इतर हिंदुधर्माचे पवित्र ग्रंथ पुराणे यांची होळी या सभेत केली. मंदिरप्रवेश सत्याग्रह आणि प्रचार समिती बरखास्त करण्याचाही ठराव या सभेत मंजूर करण्यात आला.

महाबोधी सोसायटी, बनारस या संस्थेच्या चिटणिसांनी डॉ. आंबेडकरांना तार पाठवून विनंती केली की, हिन्दू धर्म सोडण्याचे तुमचे नक्की ठरले तर तुम्ही बौद्ध धर्म स्वीकारा. आशिया खंडातील बहुसंख्य लोकांचा हा धर्म आहे. त्यांत जातिभेद नाही. हे तुम्ही स्वीकारले तर आमचे धर्मप्रचारक आम्ही तुमच्याकडे पाठवू.

श्री. खलिद गौबा ( मूळचे हिंदू-आर्यसमाजिष्ट ) यांनी तार पाठवून डॉ. आंबेडकरांना इस्लामी धर्म स्वीकारण्याची विनंती केली. या धर्मात तुम्हाला आणि तुमच्या अनुयायांना संपूर्ण समान हक्क मिळतील.

डॉ. आंबेडकरांच्या घोषणेमुळे नाशिकचे सनातनी हिंदू खूष झाले. कारण त्यांना रथोत्सव आता निर्विघ्नपणे पार पाडता येईल, अस्पृश्य अडथळा करण्यास येणार नाहीत, हे त्यांच्या आनंदाचे कारण होय.

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेसंबंधी अनेक विचारवंतांनी आपले विचार टाईम्स व इतर वर्तमानपत्रे यांत प्रदर्शित केले. टाईम्समध्ये एल्. जी. प्रधान ( २२–१०–३५ ), सी. कृष्णन् व व्ही. डब्लू. कुवडेकर ( २४–१०–३५ ) डी. डी. पिंगळे व साहेबराव आर्. बामजी (४–११–३५), पी. आर. व्यंकटस्वामी व पी. एच् गद्रे ( ५–११–३५ ) रावबहादूर एम्. सी. राजा ( १५–११–३५ )

या लेखकांनी डॉ. आंबेडकरांना थोडा धीर धराबयास सांगितले. काहींनी हिंदूंना व गांधींना दोष दिले. गांधीजी म्हणतात की, अस्पृश्यता मरणोन्मुख स्थितीस आलेली आहे. हे धादांत खोटे आहे. अस्पृश्यतेचा नंगा नाच खेड्यापाड्यांत चालू आहे, हे गांधीजी डोळ्याआड करतात हे ठीक नाही, असे श्री. भोळे यांचे म्हणणे होते.

श्री. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी आणि नाशिक शहरातील प्रागतिक मतांचे हिंदू यांनी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी २६ ऑक्टोबरला १९३५ ला एक सभा भरविली. तीत डॉ. आंबेडकरांनी हिंदू लोकांना जागे करणारी चळवळ हाती घेतली, याबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. आंबेडकरांच्या चतुर नेतृत्वाबद्दल सर्वांनी त्यांची स्तुती केली. मात्र या चळवळीचा परिणाम अस्पृश्यांनी इस्लाम अगर ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यात झाला तर तो हिंदूंना व हिंदुसमाजाला अतिशय बाधक होईल, म्हणून श्री. आर्. जी. प्रधान एके काळचे कायदे कौन्सिलर व पांच हिंदू यांचे शिष्टमंडळ श्री. शंकराचार्यांच्या आशीर्वादाने मुंबईला पाठविण्यात आले. ते डॉ. आंबेडकरांना १० नोव्हेंबर १९३५ ला राजगृहात भेटले. त्यांनी डॉ. कूर्तकोटी यांचे नमस्कार डॉ. आंबेडकरांना सांगितले. तीर्थांची ठिकाणे, देवळे, पाणवठे वगैरे जागांसंबंधी लोकमतांतर करण्यासाठी थोडा काळ लागेल. त्यासाठी हिंदुलोक प्रचार करतील. हिंदू वसतीत अस्पृश्यांना राहू देण्याची व्यवस्था हिंदू लोक करतील. यालाही वेळ लागेल. तोपर्यंत डॉ. आंबेडकरांनी अन्य धर्मांत जाण्याची घाई करू नये, अशी शिष्टमंडळाने विनंती केली. डॉ आंबेडकरांनी मंडळाला उत्तर दिले की, हा प्रश्न सोडविण्याचे अनेक मार्ग तुम्ही सुचविता हे ठीक, पण ते मार्ग हिंदुलोक स्वीकारतील का ? हिंदु धर्माचे तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे, असे हिंदू म्हणतात. पण त्या धर्माचे व्यवहारात किती हिडीस स्वरूप आहे, हे तुम्ही का लपविता ? हिंदु धर्माचे तत्त्वज्ञान पूर्ण ब्रह्म आणि वर्णभेदांची चढती व उतरती उतरंड यांत सामावलेले आहे, हे तुम्हांला नष्ट केल्याशिवाय हिंदुसमाजात ऐक्य व बंधुभाव आणता येणार नाही. वेद, स्मृती, श्रुती, पुराणे यांनी हिंदूंचे सर्व जीवन जाम जखडून ठेवलेले आहे. ही बंधने नष्ट केल्याशिवाय तुम्हाला हिंदुधर्मात सुधारणा घडवून आणता येणार नाही. १९३५ च्या कायद्याने मतदानाचे हक्क विस्तृत प्रमाणात हिंदूंना मिळालेले आहेत. त्यांचा उपयोग ते आपआपली स्थाने घट्ट करून घेण्यात करतील व अस्पृश्यांवर जुलुमाची आग पाखडतील. निवडणूकीस उभे राहणाऱ्या हिंदूंनी आपला कार्यक्रम जाहीर करावा व त्यात हिंदुधर्म व समाज यांच्यातील स्मृतिपुराणोक्त बंधनांची राखरांगोळी आम्ही करू, अशी नोंद करून निवडणूक लढवावी. माझी खात्री आहे, की

अशा उमेदवाराला हिंदू मतदार चारी मुंड्या चीत करतील. हिंदूंनी हा मुद्दा लक्षात घ्यावा. अंतिम निर्णय घेण्याच्या अगोदर तुम्ही जे लोकमतांतराचे प्रचार कार्य करणार आहात त्याची मी दखल घेईन.

नवीन धर्मपंथ स्थापणे व त्यांत अस्पृश्यांनी समविष्ट होणे, ही जोखमीची कामे आहेत. ती मी हाती घेणार नाही. डॉ. कूर्तकोटी यांनी ती हाती घ्यावीत. माझी इच्छा एकच आहे की, अस्पृश्यांनी एका प्रबळ अशा धर्मात प्रवेश करावा व स्वतःच्या प्रगतीचे मार्ग त्या धर्मात राहून चोखाळावेत. बौद्ध, आर्य व शीख धर्म हे आमच्या डोळ्यांपुढे आहेत. प्रत्येक धर्माच्या प्रवेशात अडचणी आहेत, त्यासंबंधी आमचे विचार चालू आहे. हरिजन सेवक संघाने अस्पृश्यांची प्रगती घडविण्याचे कार्य हाती घेतलेले आहे, या मुद्द्याबद्दल डॉ. आंबेडकर म्हणाले, "या संघाला अस्पृश्यता निवारण्याचे कार्य यशस्वी करता येणार नाही, कारण तो संघ कॉंग्रेसचे एक पिल्लू आहे."

भारतीय राजकारणासंबंधी बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले, भारताला लोकशाही अगर लोकप्रिय राज्यकारभार झेपणार नाही. त्याला हुकूमशाहीची जरुरी आहे. केमालपाशा अगर मुसोलिनी यांच्या तोडीचा सर्वाधिकारी भारताला हवा आहे. गांधीजी हे हुकूमशहा होतील तर ते मला परवडेल. पण ते तसे होत नाहीत; याबद्दल मला त्यांची कीव येते. कमालपाशा याने सर्व पुराणमतवाद्यांना नेस्तनाबूद केले व तुर्कांना आधुनिकतेचा मुलामा दिला. टर्की देशात आमूलाग्र क्रांती करुन या देशाला प्रगतीच्या मार्गावर आणून सोडले आहे. आता टर्की हा एक प्रबळ देश झालेला आहे. म्हणून मला कमालपाशाबद्दल फार आदर वाटतो. गांधींनी भारताचे सर्वाधिकारपद स्वीकारले नाही, यामुळे त्यांनी माझी घोर निराशा केली. भारताचे राजकीय भवितव्य मला काळेकुट्ट दिसत आहे.
( लेखकाने कमालपाशाचे चरित्र लिहिलेले आहे. )

अस्पृश्यांच्या तरुणांबद्दल बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले, या लोकांनीही माझी घोर निराशा केली. ख्यालीखुशाली आणि ढोंगीपणा यांकडे यांचा फार ओढा आहे. त्यांच्यात ध्येयवादीपणाचा अंशही मला आढळला नाही. रानडे, गोखले, टिळक यांच्या तोडीचा ध्येयवाद त्यांच्यांत नसल्यामुळे हे लोक समाजाचे वा देशाचे काही भरीव कार्य करतील असे मला वाटत नाही !

सारांश, मी अस्पृश्य असल्यामुळे या समाजाचे हित साधणे हे माझे आद्य कर्तव्य आहे आणि देशाच्या हिताकडे लक्ष देणे हे दुय्यम दर्जाचे मी समजतो. मी **धर्माला फार मानतो; पण हिंदू धर्मातील ढोंग धतुऱ्यांचा मा तिरस्कार करतो.** आम्ही जो धर्म स्वीकारू तो सर्व बाजूंनी परीक्षा करून. तोपर्यंत तुम्ही हिंदुलोक लोकमतांतराचे प्रचार कार्य करणार आहात, त्याकडे आम्ही लक्ष ठेवू.

अखिल महाराष्ट्र अस्पृश्य परिषदेच्या चिटणिसांनी पुण्याहून २८–११–३५ ला जाहीर पत्रक काढले की, तरूण हरिजनांची परिषद लौकरच पुण्यात भरविण्यात येईल. तीत डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेबद्दल विचारविनिमय करण्यात येईल. या परिषदेचे अध्यक्षपद ज्यांना द्यावे असे सुचविले आहे त्यात कन्हैयालाल गौबा व मौ. शौकत अल्ली याचीही नावे आहेत. पुण्यात " आंबेडकर " या नावाचे वर्तमानपत्र हिंदू युवक संघातर्फे काढण्याबद्दलही विचार चालू आहे, असे निवेदनात सांगितलेले आहे. ( दी टाईम्स् ऑफ् इंडिया, ३०–११–३५, पान १७ ) ही परिषद १२–१–१९३६ ला पुण्यात भरली.

## ' Bombay Depressed Classes Decision.

Complete severance of the depressed class from the hindu fold and embracing any other religion guarenteeing them equal status and treatment with other members of the faith was the gist of a resolution passed unanimously at the Bombay Pressidency Depressed Classes Conference held today ( 13 th oct. 1935 ) at Yeola, Nasik District. The resolution was adopted on the advice of Dr. Ambedkar. He literally recounted the treatment meted out by cast hindus to harijans. So far, he said, they had been unsuccessful in their efforts to bring about a change of heart and it was futile to waste their energies and money in further trying to get redress and work in harmonious cooperation. He declared that after deeply pondering over a way out, he had come to the conclusion that the best way was complete reverance from the hindu fold. "We shall seize the right for equality wherever we are denied it. Because we have the misfortune to call ourselves hindus, we are treated thus. If we were members of another faith none would treat us so " ( The India Annual Register, vol II July-Dec. 1935 page 29, Editor -Nripendra Nath Mitra ) To harijans so far he said " They had been unsuccessful in their efforts to bring about a change of heart and it was totally to waste.

# प्रकरण ३ रे

# धर्मांतराची चळवळ

अस्पश्यांनी धर्मांतराची उत्सुकता दाखविल्यानंतर त्यांना आपल्या धर्मात घण्यासाठी प्रथम व जाहीर चळवळ ख्रिस्ती लोकांनी केली. त्यांचे धर्मप्रचारक हिंदुस्थानात, अमेरिकेत आणि इंग्लंडमध्ये अस्पृश्यांना आपल्या धर्मात समाविष्ट करून घेण्यासाठी जो प्रचंड खर्च करावा लागेल, त्याची उभारणी करू लागले. लंडनमध्ये मि. गॉडफ्रे या धर्मप्रचारकाने पहिल्याच आठवड्यात हजारो पौंड गोळा केले; आपल्या प्रचारासाठी त्याने 'The Untouchable's Quest'. हे ९५ पानांचे पुस्तक जुलै १९३६ मध्ये प्रसिद्ध केले. अस्पृश्यांनी धर्मांतराची चळवळ डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुरू केलेली आहे. 'The news has been coming for some years past, of so many village groups of untouchables asking for the nearest church or mission for a teacher, that it ha been impossible tomeet the dem nd ,

' In Octoder 1935 in the town of Nasik in the Bombay Presidency, ten thousand people were listening intently to a starting speech. A plump man, wearing spectacles, was addressing them to do what had always semed impartilly to change their religion, – – – – Choose any religion which gives you equality of status and treatment, " he said, " I had the misfortune of being born with the stigma of untouchabitity but it is not my fault. I will not die a Hindu, for this is my power " ( p. 7 ) .

या चळवळीचा मिशनरी लोकांनी उपयोग करून घेतला, तर लाखो अस्पृश्य ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करतील, अशी फिलिप्स यांनी त्या ग्रंथात

मिशनऱ्यांना विनंती केली होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ख्रिस्ती लोकांत चालू असलेला जातिभेद व अस्पृश्यता ही दोन्ही नष्ट केली, तरच डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास तयार होतील, एरवी नाही, असाही इशारा त्यांनी आपल्या ग्रंथात दिलेला होता. ( ' Years ago Dr. Ambedkar said to Dr. stanley Jones, " If you christians had succeededs in wholly wiping out cast distinction we should turn towards you, but you have not done it particularly in South India, and the ace stings, for it is true. (P. 88)

डॉ. मुंजे आणि मसूरकर महाराज यांच्या प्रयत्नाने जगद्‌गुरू श्री. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी याची पाद्यपूजा पुण्याच्या अस्पृश्यांतर्फे विधिपूर्वक झाली. ( Harijans offer ' puja ' to Shankaracharya - ceremony in Poona' Times of India, dated 4-1-1936 P. 3 ) भगूर (नाशिक) येथे अस्पृश्यांना जानवी घालण्याचा समारंभ आर्य समाजातर्फे ३०-१२-६६ ला झाला. ( Times, 3-1-36, P. 11 ) त्याचा निषेध करण्यासाठी नाशिक येथे ३-१-३६ ला अस्पृश्यांतर्फे सभा भरवून हिंदूंची धर्मशास्त्रे जाळण्याच्या धमक्या वक्त्यांनी दिल्या. ( Times, 4-1-36, P. 13 ) त्रावणकोरच्या अस्पृश्यांचे पुढारी डॉ. भास्कर हे अनुयायांसह लाहोरला शीख धर्माचा स्वीकार करण्यास गेले. (Times, 6-1-36, P. 5 ) हिंदुमहासभेचे १७ वे अधिवेशन पुण्यात झाले. अध्यक्ष पंडित मदन मोहन मालवीय होते. आंतरजातीय विवाह व सहभोजन यांना पाठिंबा देणारा ठराव बॅ. जयकर यांच्या अनुयायांनी मांडला. तो पंडित मालवीयांनी धुडकावून लावला. ( विविधवृत्त, ५-१-१९३६, पा. २५ )

हिंदूंची ही समाजघातकी मनोवृत्तीच अस्पृश्यांना हिंदू धर्मातून इतर धर्मांत जाण्यास कारणीभूत झाली. म्हणूनच गेल्या हजार वर्षांत लाखो अस्पृश्य मुसलमान व ख्रिस्ती धर्मांत गेले. या संबंधात खालील दोन वृत्तांत वाचकांना उद्‌बोधक वाटतील.

' अस्पृश्यांना मुसलमान करून घेण्याची डाक्क्याच्या नबाबाची घोषणा जाहीर झाल्यापासून आजपर्यंत पुण्यात ४० हिंदू स्त्रियांना मुसलमान बनविल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. पुण्यात भरलेल्या हिंदुमहासभेची ही फलश्रुती समजावी. ' ( विविधवृत्त, १६-२-३६, पा. १ )

# इस्लामचा आघात

' मला एका मौलवीने १९२२ साली सांगितले की " गोखले, आम्ही तरवारीच्या बळावर हरिजनांना बाटविले, असे आपण म्हणता. १८९७ साली आमची तरवार गेली. आज मुसलमानांजवळ तरवार नाही. राजसत्तेचा आधार नाही. मोहात पाडण्याकरता हजारो रुपये आमच्याजवळ नाहीत. मग प्रत्येक शुक्रवारी स्वखुशीने या एकाच मशिदीत सरासरी दहा अस्पृश्य, आज अनेक वर्षे मुसलमान होतात; याला तुमचे उत्तर काय ? याला उत्तर एकच, की तुमच्या हिंदुसमाजाची अस्पृश्यांशी वागणूक !" त्या दिवशी माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला ' ( 'आंबेडकरांच्या चरित्राचे रहस्य'ले.– दे. भ. केशवराव गोखले, माजी आमदार, बेळगाव – नवयुग, खास अंक, १३–४–४७, पा. २१ )

बाबासाहेबांनी १९३६ च्या डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मद्रास प्रांतात दौरा केला. तेव्हा त्यांना भेटण्यास स्पृश्य, मुसलमान व ख्रिस्ती यांचे पुढारी आले. जे ख्रिस्ती पूर्वीचे अस्पृश्य होते ते ख्रिस्ती झाले, तरी त्यांना स्पृश्य ख्रिस्ती लोक आपल्या चर्चमध्ये येऊ देत नाहीत, अशी त्यांनी बाबासाहेबांपुढे तक्रार केली. त्यांचे म्हणणे असे की केवळ धर्मांतर केल्याने आपण स्पृश्य होत नाही. या मुद्याला बाबासाहेबांनी चिडून उत्तर दिले की, तुम्ही ख्रिस्ती समाजात जर नामर्दपणे जीवन घालवू लागला तर स्पृश्य ख्रिस्ती तुम्हांला दूर ठेवणारच !" आणि ते आपल्या नव्याने स्वीकारणाऱ्या धर्माबद्दल म्हणाले, " . . . . . . हातावर शिरकमले घेऊन जेथे जाऊ, तेथे लढावयाचे, या निश्चयाने धर्मांतर करावयाचे आहे. उद्या मुसलमान अगर ख्रिस्ती झाल्यावर, ते लोक जर आम्हांस महार ख्रिस्ती म्हणून निराळ्या चर्चमध्ये जाण्यास सांगू लागले तर आम्ही तसल्या चर्चला आग लावू." (जनता, ८–२–१९३६, पा ७ ) पुणे येथील डि. सी. मिशन ऑफ इंडिया या संस्थेच्या अहिल्याश्रमाच्या इमारतीत ' महाराष्ट्र अस्पृश्य – युवक परिषद ' दि. ११ व १२ जानेवारी १९३६ रोजी भरविण्यात आली होती. मद्रासचे रावसाहेब प्रो. एन्. शिवराज हे अध्यक्ष होते. परिषदेत धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देणारी भाषणे झाली. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केली तेव्हा तिला विरोध करणारे वक्तव्य डॉ. सोळंकी यांनी १७ ऑक्टोबर १९३५ रोजी मुंबईतील वर्तमानपत्रांकडे पाठविले होते. त्या वक्तव्याला उद्देशून ' लोकमान्य ' या दैनिकाने १९ ऑक्टोबरच्या अंकात, ' डॉ. आंबेडकरांना घरचा आहेर ' या मथळ्याखाली डॉ. सोळंकीची मुलाखत प्रसिद्ध केली होती.

' हिंदुसमाजातील तरूण पिढी, सुधारक मतांची आहे व अस्पृश्यांना हे लोक चांगले वागवतीलच. तेव्हा धर्मांतर करून अस्पृश्यांचा काहीच फायदा होणार नाही. ' अशा अर्थाचे उद्‌गार डॉ सोळंकींनी मुलाखतीत काढलेले होते. धर्मांतराच्या विरोधी सूर काढणारे ते डॉ. सोळंकी पुण्यातील या परिषदेस उपस्थित राहिले, व त्यांनी धर्मांतरास पाठिंबा दिला. पाठिंबा देणाऱ्या त्यांच्या भाषणात विचारांपेक्षा भावनाप्रधानतेचाच अविष्कार प्रखरपणे झाला. त्यांच्या भाषणातील प्रमुख भाग असा होता.– ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याजवळ माझी एकच मागणी आहे, आणि ती म्हणजे, त्यांनी यापुढे अस्पृश्यांना एक क्षणभरही या दुबळ्या हिंदुधर्मात न ठेवता, आम्हांस मर्दांचा स्वतंत्र धर्म द्यावा. आम्हांला गीता नको, संत नकोत, महंत नकोत, वेद नकोत, शंकराचार्य नकोत, आम्हांला फक्त डॉ. आंबेडकर हवेत. . . . . . ' ( टाळ्या ) . . . . ( जनता, १५–२–३६, पा. २ )

बाबासाहेबांचे या परिषदेत जे भाषण झाले तेही भावना हेलावणारे व प्रक्षोभक होते. त्यांच्या भाषणातील मुख्य सूत्र हे की, आम्ही दुसऱ्या कोणत्याही धर्मात गेलो तरी तेथेही झगडा द्यावाच लागणार आहे. हे दिसत असताही आम्ही ते पत्करू; पण आम्हांला आता हा हिंदुधर्म नको आहे. त्यांच्या भाषणातील काही भाग मी येथे देत आहे. " . . . . . आम्ही मुसलमान, ख्रिस्ती किंवा शीख झालो तरी तेथेही आमच्या भवितव्याकरता झगडा करावा लागणार आहे, हे आम्ही ओळखतो. उद्या आपण मुसलमान झाल्याबरोबर सर्वच नबाब होणार नाहीत, शीख झाल्याबरोबर सरदार होणार नाहीत, किंवा ख्रिस्ती झाल्याबरोबर पोप होणार नाहीत. ( हशा. ) कोठेही आपण गेलो तरी आपणांस लढा हा करावा लागणारच आहे. . . . . .

" तुम्हां सात कोटी लोकांची जबाबदारी माझ्यावर आहे. त्या माझ्या हातून जर का थोडी चूक झाली, तर केवढ्या मोठ्या समाजाच्या नुकसानीस मी कारणीभूत होईन याचा मला रात्रंदिवस विचार करावा लागत आहे. . . . .पण ज्यांनी विश्वासाने जबाबदारी टाकली आहे त्यांना नरकात पिचत ठेऊन मला माझा मोठेपणा कायम ठेवायचा नाही; तर त्यांच्या उद्धाराकरता मी माझ्या सर्वस्वावर पाणी सोडण्यास तयार आहे.

" जे लोक मला असे सांगतात की, तुम्ही हिंदुधर्मात राहून स्वाभिमानाने जीवन कंठण्यास अवश्य अशा आपल्या अटी स्पृश्य हिंदूंपुढे मांडा व त्या अटी

स्पृश्य हिंदू पाळतात किंवा नाही हे पहा. त्या लोकांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, मी ज्या अटी मांडीन त्या स्पृश्य हिंदूंना केव्हाही पूर्ण करता येणार नाहीत; अशी माझी बालंबाल खात्री आहे. ती अट कोणती हे ज्यांना ऐकावयाचे असेल किंवा पार पाडण्याची ज्यांची तयारी असेल, त्यांनी माझ्याकडे यावे. पण माझी या बाबतीत पक्की खात्री आहे की, ती अट पाळणे स्पृश्य हिंदूंना कदापि शक्य नाही. (टाळ्या)

" आपल्या चळवळीच्या मुळाशी परमेश्वराचा आधार, ( किंवा ) काही तरी खात्रीने आहे, यात शंका नाही. नाही तर परस्पर विरुद्ध अशा दोन्ही पक्षांकडून 'एक कोट रुपिया देयेंगे' अशी भाषा आली नसती. हे काही परमेश्वरी इच्छेखेरीज घडून आले नाही. ( टाळ्या )

" म. गांधींनी नऊ लाखाचा फंड गोळा केला, तो काही तुमच्या खऱ्या हितासाठी नसून, तुम्ही त्यांच्या काँग्रेसला सोडून जाऊ नये, काँग्रेसचे वजन कायम राहावे म्हणून! त्यांनी टाकलेले दयेचे तुकडे चघळून स्पृश्यांच्या दारात कायमचे गुलाम म्हणून आपण पडून राहावे, म्हणून स्पृश्य हिंदूंचे हे सर्व उद्योग आहेत. माझं त्या सर्वांना असे सांगणे आहे की, आता स्पृश्य हिंदूंनी माझ्यापुढे प्रत्यक्ष परमेश्वर आणून उभा केला तरी मी हिंदुधर्मातून जाणार! ( प्रचंड टाळ्या व जयजयकार, शिंग–तुताऱ्यांचे आवाज. ), आता यापुढे स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्य समाजाकरिता काहीही केले नाही तरी मी जाणार व काहीही केले तरी मी जाणार!" (टाळ्या)
( जनता, १५–२–३६, पा. ७, )

परिषद चालू असता तीत तुर्की टोप्या घातलेल्या लोकांची संख्या डोळ्यात भरेल अशी उपस्थित होती. बाबासाहेब आणि सोळंकी हे १२ जानेवारीच्या रात्री आपल्या अनुयायांसह शिखांनी केलेल्या भजनाच्या कार्यक्रमास उपस्थित राहिले. शीख व मुसलमान ( अश्रफअली, सय्यद, गुलाम भीक नायरंग, एम. एल्. ए., अंबाला ) यांचे प्रतिनिधी, बाबासाहेब व त्यांचे अनुयायी यांनी आमचा धर्म स्वीकारावा, अशी विनंती करण्यासाठी बाबासाहेबांना अहिल्याश्रमात भेटले.
( टाईम्स, १५–१–३६, पा. ४ )

श्री. राजभोज, अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेस लीगचे जनरल सेक्रेटरी, लीगतर्फे सर सयाजीराव यांना बडोद्यात मानपत्र देऊन, अहमदाबादला

१३–१–३६ ला गेले. तेथे त्यांनी धर्मांतराच्या चळवळीचा निषेध केला. ( कित्ता. )

पुण्यातील मुक्कामात बाबासाहेबांना मुसलमान, शीख व ख्रिस्ती पुढारी व धर्मगुरू भेटीला येत, आणि त्यांच्याशी चर्चा करून, ते साहेबांना " आपला धर्म स्वीकारा " अशी विनंती करीत. हे लोक आपापल्या भूमिकेचे समर्थन करीत असत आणि डॉ. आंबेडकर आपला धर्म स्वीकारतील, अशी अटकळ बांधून तिची वाच्यता जाहीरपणे करीत. वर्तमानपत्राचे बातमीदार अशा वृत्तांना प्रसिद्धी देत असत. मुंबईच्या टाईम्सने एक वृत्त असे प्रसिद्ध केले होते की, डॉ. आंबेडकर मुसलमान धर्माचा स्वीकार करतील, अशी पुण्यातील मुसलमानांना आशा वाटत आहे. ते वृत्त असे–

**' Dr. Ambedkar May Embrace Islam !**
**Hope of Muslim Deputation.**
**Poona, January, 14,**

Mr. Gulam Bheek Nairang, M. L. A , secretary of the central Tabligh committee, Ambala, with Dr. Durani, Maulvi Zakeria, Maniar and Maulvi Khujandi, who were deputed in connection with recent Depressed Classes Youth Conference to watch the situation arising out of Dr. Ambedkar's proposed intention to embrace another faith, met at the residence of H. H. Moledina last evening and dicussed the situation.

Many prominantt local muslims were also present. The deputation expressed the view that although Dr. Ambedkar had not openly intended that he would embrace Islam together with his foll owers, still there were indications that he would ultimately decide-in favour of the Islamic Faith. It was therefore decided that the community should be prepared for the eventuaility and propogate the cause of tabligh in Maharashtra.

A meeting was also held in the city under the presidentship of Mr. A. A. Khan, Adovocate.' (Times of India, Bombay 16-1-36, P. 12 )

पुण्याच्या महाराष्ट्र अस्पृश्य परिषदेतील भाषणांच्या ओघात बाबासाहेबांनी अशा अर्थाचे उद्‌गार काढले की, जर हिंदू माझी अट मान्य करतील तर मी हिंदुधर्मात राहीन ! ही अट कोणती ? हे समजून घेण्यास पुण्यातील प्रतिष्ठित हिंदू लोक बाबासाहेबांना भेटले. चर्चेत त्यांनी सांगितले की, मातंग समाजातील वयोवृद्ध पुढारी श्री. के. के. सकट यांना शंकराचार्य मानून, १०० ब्राह्मण कुटुंबांकडून, त्यांची पाद्यपूजा करावी. ही पूजा अगोदर होऊ द्या; मग मी माझी अट तुम्हांला सांगेन. काही प्रतिष्ठित हिंदूंना वाटले की हे बाबासाहेबांचे बोल ब्राह्मणांना चिडविण्याकरता आहेत; त्याला महत्त्व न देता आपण पुन: त्यांची मनधरणी करू या; तर काहीना वाटले की बाबासाहेब हिंदूंची टिंगल करीत आहेत, तेव्हा त्यांचे आपण पुनरपि तोंडसुद्धा पाहू नये ! त्यांतील एक कट्टर हिंदुमहासभावादी अनुयायी म्हणाला, हे साहेबांचे आव्हान समजा आणि १०० च काय १००० ब्राह्मण कुटुंबाकडून सकट यांची पाद्यपूजा करू या आणि डॉ. आंबेडकरांना विचारू या, सांगा तुमची अट ! पण या व्यक्तीच्या बोलण्याला कोणीच महत्त्व दिले नाही. सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्ते यांना मात्र मनातून आनंद झाला; कारण त्यांना वाटले, डॉ. आंबेडकरांनी पुणेरी ब्राह्मणांची चांगलीच जिरविली. पण त्यांना त्यावेळी हे सुचले नाही की, अस्पृश्यांना समान हक्क देण्याबाबत सवर्ण हिंदूंच्या मनाचे परिवर्तन करण्यास जसे ब्राह्मण असमर्थ आहेत तसेच सत्यशोधक व ब्राह्मणेतरही असमर्थ आहेत सगळेच अंधरूढीचे गुलाम !

अस्पृश्य लोकांनी आपल्या धर्मात यावे, यासाठी संघटित प्रचार कार्य करण्यासाठी ख्रिस्ती लोकांनी विशेष परिश्रम घेऊन प्रयत्न केले. मुसलमानांनीही तसे प्रयत्न केले परंतु ते संघटित स्वरूपाचे नव्हते. हे सर्व प्रकार पाहून पंडित मदन मोहन मालवीयासारख्या हिंदुधर्माभिमानी पुढाऱ्यांनी असे ठरविले की, अस्पृश्यांना यापुढे समाजात सन्मानाने वागवावे; व त्यांच्या मनात जो हिंदूबद्दल व हिंदू धर्माबद्दल असंतोष, तिटकारा व किल्मिष निर्माण झालेली आहेत ती नष्ट करावीत. म्हणजे अस्पृश्य लोक धर्मांतरास तयार होणार नाहीत. या कार्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उभारण्याचा संकल्प जाहीर केला. पण ख्रिस्ती, मुसलमान किंवा हिंदू यांचे प्रयत्न फलद्रूप झाले नाहीत.

शीख लोकांनी बाबासाहेबांच्या बरोबर धर्मांतरासंबंधी बोलणी केली. तेव्हा शीख धर्मातील पाच करार न पाळता फक्त एकच करार– किरपाण वापरणे– आम्ही पाळू, असा बाबासाहेबांनी हेका धरला. हा हेका धरणे हे त्यांचे पूर्ण

विचारांती होते. या बाबतीत पुष्कळ भवती न भवती झाली, पण निश्चित निर्णय झाला नाही. शेवटी बाबासाहेबांच्या अटीबद्दल, शीख समाजाचे मत काय आहे, ते अजमाविण्यासाठी एक समिती, गुरुद्वार प्रबंधक कमिटीतर्फे, स्थापन करण्यात आली. तिचे नाव 'धी सरब - हिंदू-शीख मिशन, अमृतसर.' या समितीचे प्रमुख श्री. मास्टर तारासिंग, शेटीया बाबू वगैरे तरुण शीख होते. या संस्थेतर्फे सुमारे सात लाखांचा निधी धर्मांतराच्या कार्यासाठी व खालसा कॉलेज काढविण्यासाठी वेगळा काढण्यात आला.

पंजाबमधील गुरुद्वारे ही शिखांची पवित्र पूजास्थाने होत. सुरुवातीपासून त्यांची व्यवस्था पहाणारे लोक त्या पूजास्थानांचे महंत बनले व शेवटी पूजास्थाने व त्यांची स्थावर – जंगम मिळकत यांचे ते वहिवाटदार आणि मालक होऊन बसले. या स्थित्यंतरामुळे सदर महंत पूजास्थानांना लागणाऱ्या खर्चासाठी मोठे उत्पन्न हवे म्हणून शीखधर्मीयांकडून वर्गणी वगैरेच्या रूपाने पैसे उकळू लागले. या परिस्थितीविरुद्ध शीख समाजात, या गुरुद्वारावहिवाटदारांबद्दल विलक्षण घृणा उत्पन्न झाली. महंताकडून पूजास्थाने काढून घेणे व त्यांची व्यवस्था ठेवण्यासाठी समिती नेमणे, हे मार्ग शीख कार्यकर्त्यांना दिसले. त्यासाठी चळवळ करण्यास सुरवात केली व त्या चळवळीतून 'अकाली दल' निर्माण झाले. या दलाने महंतांना जाहीर विनंती केली की गुरुद्वारांची स्थिती सुधारा व त्यांची व्यवस्था ठेवण्यासाठी समाजातील प्रतिनिधी घ्या. पण महंतांनी या विनंतीचा मान राखला नाही. तेव्हा अकाली दलाने, महंतांकडून गुरुद्वारे काढून घेऊन त्यांची व्यवस्था एका समितीकडे सोपवावी म्हणून अत्यंत प्रक्षोभक अशी चळवळ सुरु केली. या व्यवस्था पहाणाऱ्या समितीस नाव दिले 'शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटी.' महंतांनी, प्रक्षोभक चळवळ पाहून गुरुद्वारे त्या कमिटीकडे सुपुर्द केली. ही घटना १९२२ च्या जुलै ते सप्टेंबरमध्ये घडून आली. तेव्हापासून 'शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटी' या संस्थेने गुरुद्वारांची व्यवस्था व धार्मिक कृत्ये याबद्दलची अधिकारसूत्रे आपल्या हाती घेतली.

अस्पृश्यांनी धर्मांतर करावे या चळवळीला हिंदुस्थानातील बहुसंख्य अस्पृश्यांचा पाठिंबा मिळाल्यानंतर कोणता धर्म स्वीकारल्यास आपल्या सर्व अनुयायांना बरोबर घेऊन धर्मांतर करता येईल याबद्दल बाबासाहेब, ख्रिस्ती, मुसलमान, शीख, बौद्ध, जैन वगैरे निरनिराळ्या धर्मांच्या प्रतिनिधींबरोबर, १९३६ च्या पूर्वार्धात चर्चा करू लागले. त्याच्याच जोडीला प्रत्येक धर्माच्या

शास्त्राचा अभ्यास करू लागले. या चर्चांमधून व अभ्यासामधून त्यांच्या मनाचा कल शीख व बौद्ध धर्मांकडे, दिवसेंदिवस जास्त झुकू लागला. बौद्ध धर्माचे प्रतिनिधी साहेबांची गाठभेट घेत व सामुदायिक धर्मांतरानंतर, ( नव ) बौद्धधर्मीयांच्या सर्वांगीण उन्नतीकरता काय कार्यक्रम तुम्ही हाती घेऊ शकाल? या साहेबांच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर न देता निघून जात. शीख प्रतिनिधी, साहेबांच्या सान्निध्यात (राजगृहात) इतर प्रतिनिधींपेक्षा जास्त वेळ रहात व ते साहेबांच्या उपरिनिर्दिष्ट प्रश्नाला उत्तर देत की आम्ही नव–शीखांच्या, औद्योगिक, तांत्रिक व विश्व-विद्यालयीन शिक्षणाची तरतूद करू शकू व त्यासाठी आपणांशी विचारविनिमय करून योग्य तो कार्यक्रम ठरवू. शीख प्रतिनिधींच्या या व्यवहारी आणि धर्मांतरित अस्पृश्यांना उपकारक दिसणाऱ्या आश्वासनाचे बाबासाहेबांना आकर्षण वाटले व त्यांच्या मनाचा कल जास्तच शीख धर्माकडे झुकू लागला. परंतु त्यांनी याबाबतीत निर्णायक असा आपला बेत जाहीर केलाच नाही ! अस्पृश्यांच्या शीख धर्म-स्वीकाराला, हिंदूंचे श्रीशंकराचार्य, हिंदुमहासभेचे पुढारी डॉ. मुंजे वगैरे लोकांनी जरी आपला पाठिंबा व्यक्त केला तरी साहेबांनी सदर निर्णय घेण्याआधी, शीख स्त्री-पुरुषांनी, अशी जाहीर प्रतिज्ञा घ्यावी की, नवधर्मांतरितांबरोबर आम्ही निःशंकपणे बेटी व्यवहार करू; अशी इच्छा प्रगट केली. ही इच्छा व्यक्त केल्यानंतर शिखांनी बाबासाहेबांना अमृतसरला नेऊन या मुद्यावद्दल त्यांची खात्री करण्याचे ठरविले.

श्री अकाल तक्तसाहेब (गुरुद्वारा) अमृतसर, येथे सदर प्रश्नाचा चोहो-बाजूंनी विचारविनिमय करण्यासाठी १२–४–३६ ला, श्री. गुरुसिंग मुसाफीर, नानकशाही पंथाचा सेवक, ऑ. सेक्रेटरी, शीख गुरुद्वाराप्रबंधक कमिटी, यांनी जाहीर केले. त्या पत्रात, प्रमुख अस्पृश्य पुढारीही हजर रहणार आहेत, असेही जाहीर केलेले होते. ते विनंती–पत्र ' शीख धर्माचा जाहीरनामा ' म्हणून जनतेच्या २१–३–३६ च्या अंकात प्रसिद्ध झालेले होते.

अमृतसरच्या गुरुद्वारामध्ये शीख स्त्रीपुरुषांची सभा भरविण्यात आली. सदर सभेस बाबासाहेब, शिखांच्या आपाद मस्तक वेषात उपस्थित राहिले. सभेच्या सुवातीला बाबासाहेबांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचा फोटो, Illustrated Weekly of Indiaच्या एप्रिल १९३७ च्या अंकात प्रसिध्द झालेला होता. " तुम्ही आमच्या मुली, तुमच्या मुलांना व तुमच्या मुली आमच्या मुलांना घेण्यास व देण्यास तयार आहात काय ?" असा, बाबासाहेबानी गुरुद्वारात भर-

लेल्या सभेत प्रश्न केला. तेव्हा सभेस आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांनी ' होय ' म्हणून होकार गगनभेदी आवाजात जाहीर केला.

अमृतसरच्या सभेत केलेल्या भाषणाचा त्रोटक वृत्तांत विविधवृत्ताने १९-४-३६ च्या अंकात ( पा. १ ) प्रसिद्ध केला होता तो असा :-

" मी पुढे काय करणार आहे हे इतक्यातच मला सांगता येण्यासारखे नसले तरी शीख पंथ मला आवडतो हे मी सांगू शकेन " असे अमृतसर येथे भरलेल्या शीख धर्मप्रसारकांच्या परिषदेत डॉ. आंबेडकर यांनी बोलून दाखविले. "
( वि. वृत्त दि. १से एप्रिल १९३६, पा. ३ )

## - धर्मांतर व कौन्सिले -

डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराचा पुकार केला; पण आपण कोणता धर्म स्वीकारणार हे जाहीर केले नाही. त्यामुळे स्वाभाविकच असे तर्कवितर्क सुरू झाले आहेत की आंबेडकरांनी दुसरा धर्म स्वीकारला तर त्यांच्या कोन्सिलातील जागा कायम रहातील किंवा नाही ?

डॉ. आंबेडकरांनी टाईम्सला मुलाखत देऊन आपण ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्माशिवाय कोणताही धर्म स्वीकारला तरी आपल्या जागा जाणार नाहीत असे सांगितले आहे. डॉ. आंबेडकरांचे आणखी असे म्हणणे आहे की, आम्हांला ठिकठिकाणी ज्या जागा मिळाल्या आहेत त्या हिंदूकडून मिळालेल्या नाहीत. हिंदूंना कायद्यात जागाच नाहीत. सर्वसाधारण जागांत हिंदूंचा समावेश होतो. तेव्हा अस्पृश्यांना ज्या जागा मिळाल्या त्या हिंदू, पारशी, बौद्ध, शीख, जैन, ज्यू वगैरे सर्वांकडून मिळाल्या. कायद्याच्या दृष्टीने आंबेडकरांचे म्हणणे बरोबर असेल, पण हिंदूंनी अस्पृश्य आपल्यामधून जाऊ नयेत म्हणून हा त्याग केला, एवढी गोष्ट मान्य करण्याइतके आंबेडकर उदार नसावेत याबद्दल खेद होतो. म. गांधींनी जो उपवास केला तो हिंदुधर्मातून आंबेडकर जावेत म्हणून केला ? बंगालमधील हिंदूंचे प्रहार सहन करून हरिजनांना जे प्रमाणाबाहेर हक्क दिले ते आंबेडकरांच्या धर्मांतराकरता ? आंबेडकरांनी धर्मांतर करणे न करणे ही गोष्ट वैयक्तिक आहे, पण हिंदूंनी त्याग केला नाही हे म्हणणे चूक आहे. आंबेडकरांचे म्हणणे असे की अस्पृश्यांनी निवडणूकीला उभे राहू नये म्हणून काँग्रेसवाल्यांनी आपल्या नालायकीबद्दल हे वादळ उठविले आहे. ह्या गोष्टीला महत्त्व देण्याइतके

डॉक्टर आंबेडकर कमकुवत असतील असे वाटत नाही. एखादी दुसरी व्यक्ती तसे बोललीही असेल, पण तेवढ्यावरून काँग्रेसवर आरोप लादणे हे समंजसपणाचे नाही. पण काही असले तरी धर्मांतरानंतर आपल्या जागा कायम राहतील ही आंबेडकरांना वाटणारी खात्री संशयातीत आहे ' ( चित्रमयजगत्, ऑगस्ट १९३६, स्फुट विचार, पा. ३८७ )

# प्रकरण ४ थे

# धर्मांतराची चळवळ

डॉ. आंबेडकर, धर्मांतराच्या बाबतीत डॉ. मुंजे, डॉ. कुर्तकोटी, ख्रिस्ती, मुसलमान आणि शीख पुढारी यांच्याबरोबर जी गुप्त खलबते करीत होते त्याबद्दल रा. ब. राजा यांनी आपल्या भाषणांतून व वक्तव्यांतून तक्रार केली. त्यांनी हिंदू पुढाऱ्यांबरोबर पत्रव्यवहार करून अशी माहिती मिळविली की डॉ. आंबेडकर यांनी ख्रिस्ती अगर मुसलमान धर्म स्वीकारण्याचे ठरविले तर त्यांना सक्रीय विरोध करण्यास हिंदू पुढारी अग्रेसर राहतील आणि रा. ब. राजा यांना प्रत्यक्षपणे मदत करतील ही बातमी रा. बा. राजानी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली, तेव्हा जनता पत्रातून राजांवर टीकेचा वर्षाव सुरू झाला.१३-८-१९३६ च्या 'जनतेत' बाबासाहेबांचे पत्र प्रसिद्ध झाले होते.'मी हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही, पण राजा परिया म्हणून जन्मले व परिया म्हणूनच ते मरणार आहेत. ही त्यांच्या संस्कृतीस व मानवतेस काळोखी आहे ' अशा अर्थाचे विचार सदर पत्रात बाबासाहेबांनी व्यक्त केलेले होते.

३० मे ते २ जून १९३६ हे चार दिवस, मुंबईतील नायगाव या भागातील भव्य पटांगणात ( आता तेथे शिखांचे गुरुद्वार मंदिर आहे. ) धर्मांतराच्या घोषणेस पाठिंबा देणाऱ्या तीन परिषदा झाल्या. अखिल मुंबई इलाखा महार परिषद ही प्रमुख परिषद होय. या परिषदेचे चिटणीस दिवाकर नेवजी पगारे, मारुती विठ्ठल धमरे आणि चांगदेव नारायण मोहिते हे होते. स्वागताध्यक्ष रेवजी दगडूजी डोळस हे होते. अध्यक्ष श्री. बी. एस्. व्यंकटराव उर्फ ' हैद्राबादी आंबेडकर ' हे होते. ज्या जागी भव्य मंडप उभारण्यात आला होता, त्या जागेला, **' रमाबाई नगर '** असे नाव दिले होते. मंडपाला तीन भव्य दरवाजे होते. त्यांना रमाबाई दरवाजा, महाड दरवाजा व नाशिक दरवाजा अशी नावे दिली होती. व्यासपीठ ५०० लोक सामावून घेण्याइतके भव्य होते. मंडप तर ५० हजार लोकांना सामावून घेणारा होता. मंडपात ठिकठिकाणी उद्‌बोधक वचनांचे फलक लटकावलेले होते. ती वचने अशी होती. :-

' माणूसकी प्राप्त करून घ्यायची असेल तर धर्मांतर करा '

' संघटना करावयाची असेल तर धर्मांतर करा '

' सामर्थ्य संपादन करावयाचे असेल तर धर्मांतर करा '

' समता प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा '

' स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर धर्मांतर करा '

' संसार सुखाचा करावयाचा असेल तर धर्मांतर करा '

' जो धर्म तुमच्या माणुसकीला काही किंमत देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता ?'

' जो धर्म तुम्हांला पाणी मिळू देत नाही, त्या धर्मात का राहता ?'

' जो धर्म तुम्हांला शिक्षण घेऊ देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता ?'

' जो धर्म तुमच्या नोकरीच्या आड येतो त्या धर्मात तुम्ही का राहता ?'

' जो धर्म तुमची पदोपदी मानहानी करतो त्या धर्मात तुम्ही का राहता ?'

' ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे !'

' ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे अधर्म मानले जाते, तो धर्म नसून, रोग आहे !!'

' ज्या धर्मात अमंगल पशूंचा स्पर्श झाला असताना चालतो पण माणसाचा स्पर्श चालत नाही, तो धर्म नसून वेडगळपणा आहे. '

'जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये, असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे !'

' जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा ; निर्धनांना निर्धन रहा, अशी शिकवण देतो तो धर्म नसून ती शिक्षा आहे. '

' वाचेने सर्वभूती एक ईश्वर म्हणणारे आणि कृतीने माणसाला पशुतुल्य लेखणारे लोक दांभिक आहेत. त्यांचा संग करू नका. '

' मुंग्यांना साखर घालणारे आणि माणसांना पाण्यावाचून मारणारे लोक दांभिक आहेत. त्यांचा संग करू नका !'

' आजवरी होतो तुझे सत्तेखाली । तोवरी केली विटंबना ' ॥

महार परिषदेची सुरवात ३० मेला सायंकाळी ६–३० वाजता हैद्राबाद

संस्थानचे प्रख्यात अस्पृश्य पुढारी श्री. बी. एस्. व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. समता सैनिक दलाचे सैनिक व्यवस्थेकरता खडे होते. परिषदेस हिंदुस्थानातील बहुतेक सर्व प्रांतांतील अस्पृश्यांचे पुढारी आणि समाजसेवक आले होते. स्पृश्यांपैकी अनंत हरी गद्रे, बॅ. समर्थ, भास्करराव जाधव, व साहेबांचे सहकारी स्पृश्य, शीख समाजांतील सरदार ईश्वरसिंग, दरबारसिंग, केहरसिंग, अमरसिंग, इत्यादी पुढारी, ख्रिस्ती समाजातील व मुसलमान समाजातील काही कार्यकर्ते परिषदेत उपस्थित होते. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा केल्यानंतर अस्पृश्य समाजातील तरुण कार्यकर्त्यांचा ओढा मुसलमानी धर्म स्वीकारण्याकडे जास्त दिसत होता. ते फेज कॅपस् व तुर्की टोप्या घालून परिषदेत उपस्थित होते. अत्यंत उत्साहाने आणि विस्तृत प्रमाणावर, मुंबईत झालेला, अस्पृश्य चळवळीचा हा कार्यक्रम पहिलाच होय. स्वागताध्यक्ष, सरचिटणीस, अध्यक्ष व वक्ते (स्त्री पुरुष) यांची भाषणे आवेशपूर्ण व वीरश्रीयुक्त वाणीने झाली. बाबासाहेबांचे भाषण, जे या परिषदेत झाले ते प्रमुख होते. ते 'मुक्ती कोन पथे ?' या शीर्षकाखाली 'जनता' पत्राच्या २०-६-३६च्या अंकात छापले होते व पुढे ते पुस्तकरूपानेही प्रसिद्ध झाले. या परिषदेत, धर्मांतराला पाठिंबा व हिंदुधर्मातील देव, पूजाअर्चा, व्रतवैकल्ये, मंदिरे, यात्रा यांवर अस्पृश्यांचा बहिष्कार असे प्रमुख ठराव प्रचंड टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आले. १ जूनला सकाळी बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई संत समाज' यांची परिषद झाली. स्वागताध्यक्ष शंकरदास नारायणदास बर्वे होते. साहेबांचे भाषण ऐकून श्रोते दिङ्मूढ अवस्थेतून खडबडून जागे झाले व साहेबांनी दिलेल्या संदेशाप्रमाणे, या सर्व संतांनी, आपापल्या माळा, जटा, ती ठराविक वस्त्रे यांची होळी केली. दोन जून रोजी मातंग समाजाची परिषद झाली. या परिषदेने, महार परिषदेत झालेल्या ठरावांना पाठिंबा दिला. ( जनता, २०–६–३६ )

या परिषदेत ' मुक्ति कोन पथे ' या शीर्षकाखाली जे प्रसिद्ध झालेले होते ते असे :–

## मुक्ति कोन पथे ?

**१३ मे १९३६ चे मुंबईतील भाषण –**

" सद्‌गृहस्थ बांधवांनो आणि भगिनींनो,

ही परिषद मी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेचा विचार करण्याकरिता मुद्दाम बोलावण्यांत आलेली आहे, हे तुम्हांस कळून चुकले आहेच. धर्मांतराचा विषय हा माझ्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा आहे, इतकेच नव्हे तर तुमचे पुढील सर्व

भवितव्य माझ्या दृष्टीने त्याच्यावर अवलंबून असल्याकारणाने तो विषय मला अत्यंत महत्त्वाचा वाटतो. हे महत्व तुम्हां सर्वांना पटले आहे असे म्हणण्यास हरकत वाटत नाही असे नसते तर आज एवढ्या मोठा समुदायाने तुम्ही येथे जमला नसता आणि म्हणून तुम्ही सर्वजण जे या ठिकाणी जमला आहात ते पाहून मला अतिशय आनंद वाटतो.

## परिषदेची आवश्यकता

धर्मांतराची घोषणा केल्यापासून अनेक ठिकाणी लहानमोठ्या प्रमाणावर सभा भरवून आपल्या लोकांनी या विषयावरील आपले मत व्यक्त केलेले सर्वांच्या कानी आलेले आहे; परंतु सर्वांनी एके ठिकाणी जमून विचारविनिमय करून धर्मांतराच्या प्रश्नाची निर्णयात्मक चर्चा करण्याची संधी आजपावेतो आपल्याला प्राप्त झालेली नव्हती. तशा संधीची तुमच्यापेक्षा मला अत्यंत जरूरी होती. धर्मांतराची मोहीम सफल होण्याकरता पूर्वतयारीची फारच आवश्यकता आहे. ही गोष्ट तुम्हां सर्वांना कबूल करावी लागेल. धर्मांतर हा मौजेचा विषय नव्हे. हा माणसाच्या जीविताच्या साफल्याचा प्रश्न आहे. जहाजातून एका बंदराकडून दुसऱ्या बंदराला नेण्याकरिता नावाड्याला जेवढी पूर्वतयारी करावी लागते, तेवढीच पूर्वतयारी धर्मांतराकरिता करावी लागणार आहे. त्याशिवाय हा तीर सोडून पैलतीर गाठणे शक्य होणार नाही. परंतु नावेत किती उतारू येतात याचा अंदाज समजल्याखेरीज नावाडी सामानसुमान जमविण्याच्या प्रयत्नास लागत नाही. त्याचप्रमाणे माझीही स्थिती आहे किती लोक धर्मांतर करावयास तयार आहेत याचा कयास लागल्याशिवाय मला धर्मांतराची पूर्वतयारी करण्याच्या उद्योगाला लागणे शक्य नाही. परंतु आपल्या लोकांची कोठेतरी परिषद झाल्याशिवाय लोकमताचा कयास घेण्याची संधी मला प्राप्त होणार नाही, असे जेव्हा मी मुंबईच्या कार्यकर्त्या लोकांस सांगितले, तेव्हा त्यांनी खर्चाची अगर परिश्रमांची सबब पुढे न करता परिषद भरविण्याची जबाबदारी आपल्या अंगावर मोठ्या खुषीने घेतली. ती जबाबदारी पार पाडण्याकरिता त्यांना किती कष्ट सोसावे लागले याची हकीकत आपले परमपूज्य पुढारी व स्वागत मंडळाचे अध्यक्ष राजमान्य राजश्री रेवजी दगडूजी डोळस यांनी आपल्या भाषणात सविस्तरपणे सांगितली आहे. इतक्या खस्ता खाऊन त्यांनी माझ्याकरिता हा जो सभेचा घाट घडवून आणला त्याकरता मी परिषदेच्या स्वागत मंडळाचा अत्यंत ऋणी आहे.

# नुसत्या महारांचीच परिषद का ?

माझी धर्मांतराची घोषणा जर सर्व अस्पृश्यांकरिता आहे तर मग सर्व अस्पृश्यांची सभा का बोलाविली नाही ? नुसत्या महारांचीच सभा का बोलावण्यात आली, असा आक्षेप काही लोक घेण्याचा संभव आहे. ज्या प्रश्नांची चर्चा करण्याकरिता ही सभा बोलावण्यात आली आहे, त्या प्रश्नांचा खल करण्यापूर्वी या आक्षेपाला उत्तर देणे मला आवश्यक वाटते. महारांचीच का सभा बोलाविली व सर्व अस्पृश्यांची सभा का बोलाविली नाही याला अनेक कारणे आहेत. पहिले कारण असे की, या परिषदेत कसल्याही प्रकारच्या मागण्या मागावयाच्या नाहीत. सरकारपासून काही राजकीय हक्क मागावयाचे नाहीत किंवा हिंदू लोकांपासून काही सामाजिक हक्क मागावयाचे नाहीत. आपल्या जीविताचे काय करावयाचे, आपल्या आयुष्यक्रमाची रूपरेखा कशी ठरवावयाची, एवढाच प्रश्न या परिषदेपुढे आहे. तो प्रश्न ज्या त्या जातीने स्वतंत्र विचार करून सोडवणे बरे. ज्या कारणाकरिता सर्व अस्पृश्य लोकांची सभा एकत्रित करण्याची मला आवश्यकता वाटली नाही त्यांपैकी हे एक कारण आहे. नुसत्या महारांचीच परिषद भरविण्याचे दुसरेही एक कारण आहे. धर्मांतराची घोषणा केल्यापासून आज जवळजवळ दहा महिन्यांचा अवधी लोटलेला आहे. या अवधीत लोकजागृतीचे काम पुष्कळसे झाले आहे. आता लोकमत अजमाविण्याची वेळ आली आहे, असे मला वाटते. हे एक साधे आणि सोपे साधन आहे अशी माझी समजूत आहे. धर्मांतराचा प्रश्न कृतीत उतरविण्याकरता जो प्रयत्न करणे आवश्यक आहे, तो प्रयत्न करण्यापूर्वी खरे लोकमत काय आहे, याची खात्री करून घेणे अत्यंत आवश्यक आहे; आणि माझी अशी समजूत आहे की, जातीजातीची सभा करून अजमाविलेल्या लोकमताबद्दल जशी खात्री देता येईल तशी सर्व साधारण अस्पृश्यांची सभा भरून अजमाविलेल्या लोकमताबद्दल देता येणार नाही. कारण सर्व अस्पृश्यांची परिषद असे नाव देऊन जरी सभा बोलाविली तरी ती सर्व अस्पृश्यांची प्रातिनिधिक स्वरूपाची सभा होऊ नये व लोकमतांची खात्री करून घेता यावी म्हणूनच नुसत्या महार लोकांची सभा भरविण्यात आलेली आहे. या सभेत इतर जातींचा समावेश न केल्यामुळे त्यांचे काही नुकसान होऊ शकत नाही त्यांना धर्मांतर करावयाचे नसेल तर त्यांचा या सभेत समावेश न केल्यामुळे त्यांना वाईट वाटण्याचे काही कारण नाही. त्यांना धर्मांतर करावयाचे असेल तर या सभेत त्यांचा समावेश करण्यात आला नव्हता म्हणून त्यांच्या धर्मांतरात कसलीही

आडकाठी येऊ शकणार नाही. जशी महार लोकांची सभा भरविण्यात आलेली आहे तशीच अस्पृश्यांतील इतर जातींना आपापल्या जातींच्या सभा भरवून या विषयासंबंधाने आपले लोकमत व्यक्त करण्याची संधी मोकळी आहे, व तशा सभा त्यांनी कराव्या अशी मी त्यांना सूचना करतो व त्या कामी त्यांना माझ्या-कडून जी मदत होण्यासारखी असेल ती मी अवश्य करीन. येथवर झाली ती केवळ प्रस्तावना झाली, आता मी आजच्या सभेच्या मुख्य विषयाकडे वळतो.

" धर्मांतराचा विषय जितका महत्त्वाचा आहे तितकाच तो गहनही आहे. साध्या माणसाच्या बुद्धीला त्याचे आकलन होणे कठीण आहे. तसेच साध्या माणसाला धर्मांतरासारख्या विषयाची समजूत करून देणे हे काम काही सोपे दिसत नाही. तथापि तुम्हां सर्वांची समजूत पटल्याशिवाय धर्मांतर कृतीत उतरविणे कठीण आहे, याची जाणीव मला पूर्णपणे आहे. आणि म्हणून जितक्या सुलभ रीतीने या विषयाची मांडणी मला करता येईल तितक्या सुलभ रीतीने मी ती करणार आहे.

## धर्मांतराची ऐहिक कारणे –

धर्मांतराच्या विषयावर दोन दृष्टीने विचार केला पाहिजे. सामाजिक दृष्टीने विचार केला पाहिजे; धार्मिक दृष्टीनेही विचार केला पाहिजे. तसाच तात्त्विकदृष्टयाही विचार केला पाहिजे. परंतु कोणत्याही दृष्टीने विचार करू लागलो तरी प्रथमतः अस्पृश्यता ही काय बाब आहे, तिचे खरे स्वरूप काय याचा पुरता समज करून घेणे अत्यंत आवश्यक आहे; त्याशिवाय माझ्या धर्मांतराच्या घोषणेचा अर्थ तुम्हाला कळणे शक्य होणार नाही. अस्पृश्यता ही काय बाब आहे व तिचे खरे स्वरूप काय आहे याचा तुम्हांस समज व्हावा म्हणून प्रथमतः तुमच्यावर होत असलेल्या जुलमाच्या कहाणीची तुम्हांला आठवण करून देणे आवश्यक वाटते. सरकारी शाळेत मुले घालण्याचा हक्क सांगितल्यामुळे, विहिरीवर पाणी भरण्याचा हक्क सांगितल्यामुळे, वरात घोड्यावरून नेण्याचा हक्क सांगितल्या-मुळे स्पृश्य हिंदूंनी मारहाण केल्याची उदाहरणे नेहमीच घडत असल्याकारणाने ती सर्वांच्या डोळ्यासमोर नेहमी असतात. परंतु मारहाण करण्याची दुसरी अशी अनेक कारणे आहेत की ज्यांचा उल्लेख केला असता हिंदुस्थानच्या बाहेरील लोकांना तरी त्याचा विस्मय वाटेल. उंची पोषाक घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. पाणी भरण्याकरता तांब्या पितळेची भांडी वापरल्यामुळे

मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. जमीन खरेदी केल्यामुळे जाळपोळ केल्याचे उदाहरण देता येईल. जानवे घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. मेलेली गुरे न ओढल्यामुळे व मेलेल्या गुरांचे मांस न खाल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल, पायात बूट व मोजे घालून गावातून गेल्यामुळे, भेटलेल्या स्पृश्य हिंदूस जोहार न घातल्यामुळे, शौचास जाताना तांब्यात पाणी नेल्यामुळे छळ झाल्याचे उदाहरण देता येईल व पंचाच्या पंक्तीत चपाती वाढल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण नुकतेच घडले आहे. वरील प्रकारचे जोर–जुलूम झाल्याची व तुम्हांला अमानुष तऱ्हेने वागविल्याची अनेक प्रकरणे तुमच्या ऐकिवात असतील व तुमच्यापैकी काहींना तर त्याचा प्रत्यक्ष अनुभवही असेल. जेथे मारहाण करता येण्यासारखे नसेल तेथे बहिष्काराच्या शास्त्राचा तुमच्याविरुद्ध कसा उपयोग करण्यात येतो हेही तुम्हांस अवगत आहेच. मोलमजुरी मिळू द्यावयाची नाही, रानांतून गुरांना जाऊ द्यावयाचे नाही, माणसांना गावात येऊ द्यावयाचे नाही, वगैरे सर्व प्रकारची बंदी करून स्पृश्य हिंदू लोकांनी तुमच्या लोकांस जेरीस आणल्याची आठवण तुम्हांपैकी पुष्कळांना असेल. परंतु हे असे का घडते, याच्या मुळाशी काय आहे ही गोष्ट माझ्यामते तुमच्यापैकी फारच थोड्या लोकांना कळत असेल. ती समजून घेणे माझ्या मते अत्यंत आवश्यक आहे.

## ही वर्गकलहाची बाब आहे

वर जी कलहाची उदाहरणे दिली आहेत तिच्याशी व्यक्तीच्या गुणावगुणांचा काही संबंध नाही. दोघां खटनटांतील तो कलह नव्हे. अस्पृश्यतेचा प्रश्न हा वर्गकलहाचा प्रश्न आहे. स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन समाजांतील तो कलह आहे. एका माणसावर होत असलेल्या आगळिकीचा हा प्रश्न नव्हे. एका माणसावर होत असलेल्या अन्यायाचा हा प्रश्न नव्हे. एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर चालविलेल्या आगळिकीचा हा प्रश्न आहे. हा एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर चालविलेल्या अन्यायाचा हा प्रश्न आहे. हा वर्गकलह सामाजिक दर्जासंबंधीचा कलह आहे. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाशी वागताना आपले वर्तन कसे ठेवावे या संबंधाचा हा कलह आहे. या कलहाची जी वर उदाहरणे दिली आहेत त्यांवरून जी एक बाब उघडपणे सिध्द होत आहे ती ही की, तुम्ही वरच्या वर्गाशी वागताना बरोबरीच्या नात्याने वागण्याचा आग्रह धरता, म्हणूनच हा कलह उपस्थित होतो. तसे जर नसते तर, चपातीचे जेवण घातल्यामुळे, उंची पोषाख घातल्यामुळे, जानवी घातल्यामुळे,

तांब्यापितळेच्या भांड्यांत पाणी आणल्यामुळे, घोड्यावरून वरात नेल्यामुळे, तो वरच्या वर्गाचे कोणाचे नुकसान करीत नाही. आपल्याच पदराला खार लावतो. असे असता वरच्या वर्गाला त्याच्या करणीचा रोष का वाटावा ? या रोषाचे कारण एकच आहे, व ते हेच की, अशी समतेची वागणूक त्याच्या मानहानीला कारणीभूत होते. तुम्ही खालचे आहात, अपवित्र आहात, खालच्या पायरीनेच तुम्ही राहिलेत तर तुम्हांला सुखाने राहू देतील. पायरी सोडली तर कलहाला सुरुवात होते, ही गोष्ट निर्विवाद आहे. वरील उदाहरणावरून आणखी एक गोष्ट सिद्ध होते, ती ही की अस्पृश्यता ही नैमित्तिक नसून नित्याची आहे. हीच गोष्ट स्पष्ट भाषेत सांगावयाची म्हणजे हा स्पृश्य अस्पृश्य यांमधील कलह नित्याचा आहे व तो त्रिकालाबाधित असा रहाणार आहे. कारण ज्या धर्मामुळे तुम्हांला खालची पायरी देण्यात आलेली आहे तो धर्म वरच्या वर्गाच्या म्हणण्याप्रमाणे सनातन आहे. त्याच्यात कोणत्याही प्रकारचा कालमानानुसार फेरबदल होऊ शकत नाही. तुम्ही आज जसे खालचे आहात तसेच तुम्ही नेहमी खालचे राहिले पाहिजे. याचाच अर्थ असा की स्पृश्य व अस्पृश्य यांचेमधील हा कलह कायमचा राहणार आहे या कलहातून तुमचा निभाव कसा लागणार हा मुख्य प्रश्न आहे व त्या प्रश्नाचा विचार केल्याशिवाय तुम्हांला गत्यंतर नाही, असे माझे मत आहे. तुमच्यापैकी ज्यांना हिंदुलोक वागवतील त्याप्रमाणे वागावयाचे असेल, त्यांचा सेवा धर्म पत्करून जगावयाचे असेल, त्या लोकांना या प्रश्नांचा विचार करण्याचे काहीच प्रयोजन नाही. परंतु ज्यांना स्वाभिमानाचे जिणे आवश्यक वाटते, ज्यांना समत्वाचे जिणे आवश्यक वाटते, त्यांना या प्रश्नाचा विचार केल्याशिवाय गत्यंतर नाही. कोणत्या तऱ्हेने या कलहात आपला बचाव करता येईल, याचा विचार करणे त्यांना आवश्यक आहे. या कलहातून आपला बचाव कसा होईल ? या प्रश्नांचा निर्णय करणे मला तरी मोठेसे कठीण वाटत नाही. येथे जमलेल्या तुम्हां सर्व लोकांना एक गोष्ट कबूल करावी लागेल, व ती ही की कोणत्याही कलहात ज्याच्या हाती सामर्थ्य असते त्याच्याच हाती जय असतो. ज्याला सामर्थ्य नाही त्याने यशाची आशा बाळगावयास नको. ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाने सिद्ध झालेली आहे. तिच्या समर्थनार्थ पुरावा देण्याचे कारण नाही.

## प्रथम सामर्थ्य मिळवा.

याच्या पुढील प्रश्न जो तुम्ही विचारात घेणे आवश्यक आहे तो हा की या कलहातून सुटका करून घेण्यास तुमच्या पदरी पुरेसे सामर्थ्य आहे काय ? मनुष्याला तीन

प्रकारचे सामर्थ्य अवगत असते. एक मनुष्यबल, दुसरे द्रव्यबल, व तिसरे मानसिकबल या बलापैकी कोणते बल तुम्हांला उपलब्ध आहे, असे तुम्हांला वाटते ? मनुष्यबलाच्या दृष्टीने तुम्ही अल्पसंख्यांक आहात ही गोष्ट तर उघडच आहे. मुंबई इलाख्यात अस्पृश्य वर्गाची लोकसंख्या एक अष्टमांश एवढीच आहे. तीही संघटित नाही. आपापसांतील जातिभेदामुळे तिच्यात संघशक्तीचा पूर्ण अभाव आहे. संघटित नाही ती नाहीच; पण एकत्रितही नाही. ती खेडोपाडी विखुरली गेलेली आहे. अशा कारणांमुळे असलेल्या अल्प स्वल्प संख्येचा देखील प्रसंगग्रस्त झालेल्या अस्पृश्य वर्गाच्या वस्तीस कोणत्याही प्रकारचा उपयोग होऊ शकत नाही. द्रव्यबलाच्या दृष्टीने पाहिले तर तुमची तीच गत आहे. तुमच्या जवळ थोडे मनुष्यबळ आहे म्हटले असता चालेल; पण तुमच्याजवळ द्रव्यबळ मुळीच नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. तुम्हांला व्यापार नाही, उदीम नाही, नोकरी नाही, आणि शेतीही नाही. वरच्या वर्गाचे लोक जो घासकुटका देतील त्याच्यावर आज तुमची उपजीविका आहे. तुम्हांला अन्न नाही. तुम्हांला वस्त्र नाही. तुमच्याजवळ द्रव्यबल ते काय असणार ? अन्याय झाला तर कोर्टातून दाद मागण्याइतकी अवकाद ( ताकद ) आज तुमच्यात नाही. तुमच्यातील हजारो लोक कोर्टाचा खर्च सोसण्याची ऐपत नसल्यामुळे हिंदूकडून होणारा त्रास, विटंबना व जोर जुलूम अगदी मुकाटयाने सोशीत आहेत. मानसिक बलाची तर याहीपेक्षा अधिक उणीव आहे. शेकडो वर्षे वरिष्ठ वर्गाच्या सेवेत घालविली असल्यामुळे शेकडो वर्षे त्यांनी केलेली विटंबना, छी : थू निमूटपणे सोसल्यामुळे उलट बोलण्याची सवय, प्रतिकाराची हिम्मत नाहीशी झाली आहे. तुमच्यांत सर्व लोक हताश, दीनवाणे व निस्तेज झालेले आहेत. निराशेचे व नामर्दुमकीचे वातावरण सर्वत्र पसरले आहे. आपण काही करू शकू, अशा प्रकारचा विचार देखील कोणाच्या ध्यानी मनी येऊ शकत नाही.

## तुमचाच छळ का होतो ?

वस्तुस्थितीचे मी हे केलेले वर्णन जर खरे असेल तर त्यापासून निघणारा सिद्धांत तुम्हा सर्वांना कबूल करावा लागेल. व तो हा की तुम्ही तुमच्या सामर्थ्यावर अवलंबून राहाल तर तुम्हांला या जुलमाचा प्रतिकार करता यावयाचा नाही. तुमच्यांत सामर्थ्य नसल्यामुळेच तुमच्यावर जोर जुलूम होतो, याबद्दल मला कांडीचाही संशय नाही. या इलाख्यात तुम्हीच अल्पसंख्यांक आहात अशातला काही भाग नव्हे. तुमच्याप्रमाणे मुसलमान देखील अल्पसंख्यांक आहेत. ज्याप्रमाणे महारामांगांची दोनचार घरे गावात असतात त्याचप्रमाणे मुसलमानांचीही एकदोनच घरे गावात

असतात. त्या मुसलमानांच्या वाटेस कोणीही जात नाही. परंतु तुमच्यावर मात्र सारखा जुलूम चाललेला असतो. याचे कारण काय ? दोन मुसलमानांची घरे असून त्यांच्या वाटेला गाव जात नाही. तुमची दहा घरे असूनही गाव तुमचा छळ करतो. असे का होते ? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याची खोज तुम्ही चांगल्या रीतीने केली पाहिजे. माझ्या मते या प्रश्नाचे एकच उत्तर देता येईल व ते हे की त्या दोन मुसलमानांच्या घरांच्या पाठी साऱ्या हिंदुस्थानातील मुसलमान समाजाची शक्ती व सामर्थ्य उभे आहे, याची जाणीव हिंदु लोकांना असल्यामुळे त्या दोन मुसलमान घरांच्या वाटेस जाण्याची कोणीही हिंदूची सहसा छाती होत नाही. त्या दोन घरांच्या वाटेस गेले असता पंजाबपासून थेट मद्रासपर्यंत मुसलमान समाज आपली शक्ती वेचून त्यांचे संरक्षण करील अशी खात्री असल्यामुळे ती दोन मुसलमान घरे निर्भयपणे आपला व्यवहार करीत असतात. तुमच्या बाबतीत हिंदू लोकांची खात्री असते की तुम्हांला कोणीही मदत करणार नाही; तुमच्याकरिता कोणीही धावून येणार नाही.; तुम्हांला पैशाची मदत होणार नाही व अधिकाऱ्यांची मदत होणार नाही. मामलेदार व पोलीस त्यांचेच असल्यामुळे स्पृश्य–अस्पृश्यांच्या वादात ते जातीला जागतात, कर्तव्याला जागत नाहीत, याची त्यांना खात्री असते. या तुमच्या असहाय स्थितीमुळेच तुमच्याशी हिंदू लोक जुलूमाची व अन्यायाची वागणूक करतात. येथवर मी जे विवेचन केले आहे त्यावरून दोन गोष्टी सिद्ध होत आहेत. त्यापैकी पहिली गोष्ट ही की सामर्थ्य असल्याशिवाय तुम्हांला या जुलूमाचा प्रतिकार करता येणे शक्य होणार नाही. दुसरी, प्रतिकाराला अवश्य असलेले सामर्थ्य आज तुमच्या पदरी नाही. या दोन गोष्टी सिद्ध झाल्याबरोबर तिसरी एक गोष्ट आपोआपच सिद्ध होते आणि ती ही की हे अवश्य असलेले सामर्थ्य तुम्हाला कुठून तरी बाहेरून मिळविले पाहिजे. हे सामर्थ्य तुम्हांला कसे मिळविता येईल हाच खरोखरी महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्याचा तुम्ही निर्विकल्प मनाने विचार केला पाहिजे.

## बाहेरून सामर्थ्य आणले पाहिजे.

या देशातील जातिभेद, धर्मभेद यांचा लोकांचे मनांवर व नीतिमत्तेवर एक विलक्षण परिणाम घडून आलेला मला तरी दिसून येतो. या देशात दुःख, दारिद्र्य आणि क्लेश यांच्याकरिता कोणालाही खेद वाटत नाही; व वाटलाच तर त्याच्या निवारणाकरिता कोणी प्रयत्न करीत नाही. आपल्या धर्मबांधवांवर किंवा जाति-

बांधवांवर जर दुःखाचा, दारिद्र्याचा अथवा जुलुमाचा प्रसंग ओढवला तर त्याच्या निवारणाकरता मात्र लोक सहाय्य करतात ही नीतिमत्तेची दृष्टी कितीही विकृत असली तरी ती जारी आहे, हे कोणीही विसरून चालता कामा नये. ज्या गावांमध्ये अस्पृश्य लोकांवर हिंदूंकडून जुलूम होतो त्या गावांत इतर धर्मांचे लोक नसतात अशातला भाग नाही. अस्पृश्यांवर होत असलेला जुलूम अन्यायकारक आहे, ही गोष्ट त्यांना पटत नाही असेही नव्हे. होतो हा अन्याय होतो असे वाटत असूनही ते त्यांच्या सहाय्यास धावून जात नाहीत. याचे कारण काय ? तुम्ही आम्हांला का मदत करीत नाही असा जर प्रश्न तुम्ही त्यांना केलात तर " तुमच्या वादात आम्हांला पडण्याचे कारण काय ? तुम्ही आमच्या धर्माचे असता तर आम्ही तुम्हांला सहाय्य केले असते " असे उत्तर ते तुम्हांला देतील. यावरून एक गोष्ट तुमच्या ध्यानांत येऊ शकेल की कोणत्याही अन्य समाजाचा ऋणानुबंध तुम्ही जोडल्याशिवाय, कोणत्याही अन्य धर्मात तुम्ही सामील झाल्याशिवाय तुम्हांला बाहेरचे सामर्थ्य मिळू शकत नाही. याचाच स्पष्ट अर्थ असा आहे की तुम्ही धर्मांतर करून कोणत्या तरी अन्य समाजात अंतर्भूत झाले पाहिजे, त्या शिवाय तुम्हांला त्या समाजाचे सामर्थ्य प्राप्त होऊ शकणार नाही. आणि जोपर्यंत तुमच्या पदरी सामर्थ्य नाही तोपर्यंत तुम्हांला व तुमच्या भावी पिढीला आजच्या दीनवाण्या स्थितीमध्ये दिवस काढावे लागणार आहेत.

## धर्मांतराची आध्यात्मिक कारणे

येथपर्यंत ऐहिक कल्याणाकरिता धर्मांतराची आवश्यकता काय आहे याचे दिग्दर्शन केले आहे. आता आध्यात्मिक कारणाकरिता धर्मांतराची कशी आवश्यकता आहे या विषयीचे माझे विचार तुमच्या समोर मी मांडीत आहे. प्रथमतः धर्म कशाकरता असतो ? त्याची आवकश्यकता काय ? हे जाणून घेतले पाहिजे. धर्माच्या अनेक व्याख्या अनेक लोकांनी केलेल्या तुम्हांला सापडतील; पण त्या सर्वांमध्ये अर्थपूर्ण व सर्वांना पटण्यासारखी अशी एकच व्याख्या आहे. 'ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म ' हीच ती खरी धर्माची व्याख्या होय. ही धर्माची व्याख्या मी केलेली नाही. ही व्याख्या सनातनी हिंदूंचे अग्रगण्य लो. टिळक यांनीच दिलेली आहे. तेव्हा धर्माच्या व्याख्येबद्दल मखलाशी केल्याचा आरोप माझ्यावर कोणी करू शकणार नाही. ही व्याख्या जरी मी केलेली नसली तरी मी वादाकरता मान्य केलेली आहे अशातला भाग नाही. मला ती कबूल आहे. समाजाच्या धारणेकरिता घातलेली बंधने म्हणजेच धर्म हीच माझी देखील

धर्माची कल्पना आहे. ही व्याख्या वास्तविकदृष्टया अथवा तार्किकदृष्टया योग्य अशी दिसली तरी समाजाच्या धारणेकरिता समाजाची बंधने कशाप्रकारची असावीत या प्रश्नाचा व्याख्येवरून काहीच बोध होऊ शकत नाही अथवा उलगडाही होऊ शकत नाही. समाजाच्या योग्य धारणेकरिता समाजाची बंधने कशी असावीत हा प्रश्न शिल्लक राहतोच. व हा प्रश्न धर्माच्या व्याख्येपेक्षा फार महत्त्वाचा आहे. धर्म कोणता व अधर्म कोणता हे व्याख्येवर अवलंबून नसून बंधनाच्या हेतूवर व स्वरूपावर अवलंबून आहे. ज्या बंधनांनी समाजातील सर्व प्रजेची धारणा होऊ शकते ती बंधने कशी असावीत, म्हणजे खऱ्या धर्माचे स्वरूप कसे असावे याचा विचार करताना समाज आणि व्यक्ती यांचा तात्त्विक दृष्टया संबंध काय व कसा असावा हा प्रश्न साहजिकपणेच उद्‌भवतो. या प्रश्नासंबंधाने आधुनिक समाजशास्त्रवेत्त्यांनी तीन प्रकारची मते प्रतिपादन केलेली आहेत. काहींच्या मते व्यक्तिमात्राला सुखप्राप्ती व्हावी हाच समाजघटनेचा अंतिम हेतू आहे. काहींच्या मते व्यक्तिमात्राला त्यांच्या अंगभूत गुणांचा व शक्तीचा विकास करता येऊन त्याला पूर्णावस्थेस पोहोचविण्यास मदत व्हावी हाच समाजसंघटनेचा अंतिम हेतू असला पाहिजे. व काहींच्या मते समाजसंघटनेचा मुख्य हेतू व्यक्तीची उन्नती किंवा व्यक्तीचे सौख्य हा नसून आदर्शभूत समाज तयार करणे हाच होय. हिंदूधर्माची कल्पना या तीनही कल्पनाहून अगदी निराळी आहे. हिंदुधर्मात व्यक्तीला काही स्थान नाही. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाशी कसे वागावे याची बंधने हिंदू धर्मात आहेत. ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म मला स्वतःला मान्य नाही. व्यक्तीच्या जीवनाला समाजाची जरी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे अंतीम ध्येय होऊ शकत नाही, व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे असे मी समजतो. व्यक्ती ही जरी समाजांतर्गत असली, मनुष्य मात्र हा जरी समाजाचा एक घटक असला तरी त्याचा आणि समाजाचा संबध शरीर आणि अवयव, गाडा आणि त्याचे चाक याचा जसा संबंध आहे तसा नव्हे, असे मी समजतो.

## समाज आणि व्यक्ती

ज्याप्रमाणे थेंब समुद्राच्या पाण्यात टाकला असता त्याचा लोप होतो, तसा माणसाचा केवळ समाजात राहिला म्हणून लोप होऊ शकत नाही. त्याचे जीवन स्वतत्र असते. त्याचा जन्म समाजाच्या सेवेकरता नसून आत्मोन्नतीकरिता आहे. ह्या एकाच कारणामुळे सुधारलेल्या राष्ट्रांत एका माणसाला दुसऱ्या माणसास

आपला गुलाम करून ठेवता येत नाही. ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही आणि हिंदू धर्मात व्यक्तीला प्राधान्य नसल्याकारणाने - तो धर्म मला मान्य होऊ शकत नाही. तसेच ज्या धर्मात एका वर्गाने विद्या शिकावी, दुसऱ्या वर्गाने शस्त्र धरावे, तिसऱ्याने व्यापार करावा व चौथ्याने नुसती सेवा करावी, असे आहे तो धर्म मला मान्य नाही. विद्या दरेकाला हवी, शस्त्राची दरेकाला जरूरी आहे, पैसा सर्वांना पाहिजे, ही गोष्ट जो धर्म विसरतो व जो एकाला सज्ञान करण्याकरिता बाकीच्यांना अज्ञानात ठेवतो तो धर्म नसून लोकांना बौद्धिक गुलामगिरीत ठेवण्याचा कावा आहे. जो धर्म एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला नि:शस्त्र करतो तो धर्म नसून एकाला दुसऱ्याने पारतंत्र्यात ठेवण्याची शक्कल आहे. जो धर्म काहींना धनसंपादनाचा मार्ग मोकळा ठेवतो व बाकीच्यांना आपल्या (उप) जीविकेकरिता दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची अनुज्ञा देतो तो धर्म नसून ती स्वार्थपरायणता आहे. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य हे असे आहे. त्याविषयी माझे मत काय आहे हे मी स्पष्टपणे मांडले आहे. हा हिंदू धर्म तुम्हांला हिताचा आहे की काय याचा तुम्ही विचार करा. व्यक्तीच्या आत्मोन्नतीला पोषक असे वातावरण उत्पन्न करणे ही धर्माची मूलभूत कल्पना आहे, हे जर मान्य केले तर हिंदू धर्माने तुमची आत्मोन्नती कधीही होऊ शकणार नाही. व्यक्तीच्या विकासाला तीन गोष्टींची आवश्यकता आहे. सहानुभूती, समता आणि स्वातंत्र्य. हिंदू धर्मात या तिन्हीपैकी एक तरी बाब तुमच्याकरिता उपलब्ध आहे. असे तुम्हांला म्हणता येईल काय ?

## हिंदू धर्मात तुम्हांला सहानुभूती आहे काय ?

सहानुभूतीच्या दृष्टीने पाहिले तर सर्वत्र शून्यच आहे, असे म्हणावे लागेल. कोठेही तुम्ही गेलात तरी तुमच्याकडे आपुलकीच्या भावनेने कोणीही पाहणार नाही. याचा अनुभव तुम्हांला चांगलाच आहे. आपुलकीची भावना नाहीच नाही, परंतु हिंदू लोकांकडून तुम्हांला परक्यापेक्षा परके लेखण्यात येते. एकाच गावात राहणारे स्पृश्य आणि अस्पृश्य याचा परस्पर संबंध कसा असतो हे जर पाहू गेले तर शेजारी शेजारी राहणारे दोघे भाऊ असे कोणालाही म्हणता येणार नाही. छावणी दिलेले हे दोन परस्परविरोधी सैन्यांचे तळ आहेत असेच म्हणावे लागेल. जितके मुसलमान लोक हिंदूना जवळचे वाटतात, त्यांच्याशी जेवढा त्यांचा स्नेहभाव असतो त्याच्या शतांशाने देखील तुमच्याशी हिंदूंचा नसतो. हिंदुमुसलमान हे लोकलबोर्डात, कायदेकौन्सिलात, व्यापारात एकमेकांना सहाय्यभूत होऊन

वागतात; पण तुमच्याशी तसे सहानुभूतीने हिंदू लोकांनी वागल्याचे एखादे तरी उदाहरण दाखवून देता येईल काय ? उलटपक्षी त्यांचा तुमच्या विरुद्ध नेहमीच कटाक्ष असतो, ही गोष्ट मात्र खरी आहे. हिंदूंच्या मनात तुमच्या विरुद्ध असलेल्या कटाक्षाचा परिणाम किती विधिपूर्वक झाला आहे हे तुमच्यापैकी ज्या कोणाला दाद मागण्याकरिता कोर्टात जाण्याचा प्रसंग आलेला आहे तो आपल्या अनुभवाने सांगू शकेल. कोर्ट आपल्याला न्याय देईल, पोलीस आपल्याला मदत करील असा तुम्हांपैकी कोणा एकाला तरी विश्वास वाटतो का ? व तो जर वाटत नाही तर तशी वृत्ती होण्यास काय कारण आहे ? माझ्या मते अशा अविश्वासाचे कारण एकच आहे व ते हेच की हिंदू लोकांमध्ये तुमच्याबद्दल कोणत्याही प्रकारची सहानुभूती नसल्याकारणाने ते आपल्या अधिकाराचा सदुपयोग करतील अशी आशा तुम्हांला वाटत नाही. हे जर खरे आहे तर शत्रुत्वाने भरलेल्या या वातावरणात राहून तुमचा काय उपयोग होणार आहे ?

## हिंदू समाजात तुमच्याकरिता समता आहे काय ?

हा प्रश्न खरोखरीच विचारावयास नको. अस्पृश्यता ही मूर्तिमंत असमानताच आहे. एवढी मोठी असमानतेची जागती ज्योत कोठेच दिसत नाही. अस्पृश्यतेपेक्षा जास्त उग्र स्वरूपाची असमानता जगाच्या इतिहासात अन्यत्र कोठेच सापडणार नाही. कमी अधिक भावामुळे एकाने आपली मुलगी दुसऱ्याच्या मुलाला न देणे, कमी अधिक भावामुळे एकाने दुसऱ्याच्या बरोबर सहभोजन न करणे अशा प्रकारचे असमानतेचे निदर्शक वर्तन आपणास पाहावयास सापडते. परंतु एका माणसाला दुसऱ्या माणसाने न शिवण्याइतका पतित लेखण्याची प्रथा हिंदू धर्माखेरीज आणि हिंदू समाजाखेरीज अन्यत्र कोठेही सापडेल काय ? ज्याच्या स्पर्शाने पाणी बाटते, ज्याच्या स्पर्शाने देव बाटतो तो प्राणी मानवाच्या कोटीत गणला गेला आहे असे कोणी तरी म्हणेल काय ? अस्पृश्य माणसाकडे पाहण्याची दृष्टी आणि रक्तपितीने भरलेल्या माणसाकडे पाहण्या दृष्टी यात काय फरक आहे ? रक्तपिती भरलेल्या माणसाबद्दल लोकांच्या मनात किळस जरी असली तरी त्याच्याबद्दल लोकांच्या मनात सहानुभूती असते ! परंतु तुमच्याबद्दल सहानुभूती तर नसतेच पण किळस मात्र असते. रक्तपिती भरलेल्या माणसापेक्षा देखील तुमची स्थिती हीन आहे. अजूनही खेडेगावात एखादा स्पृश्य माणूस उपास सोडीत असताना जर महाराचा शब्द त्याच्या कानावर पडला तर तो अन्न ग्रहण करीत नाही. एवढा

कलंक तुमच्या शरीराला, एवढा कलंक तुमच्या शब्दाला आहे. अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक आहे, असे काही लोक म्हणत आहेत, पण त्या बतावणीत खरे म्हटले असता काही अर्थ नाही. हिंदू धर्म कलंकित आहे असे एकही हिंदू मानीत नाही. तुम्ही कलंकित आहात, अपवित्र आहात, असे मात्र बहुजन हिंदू समाज मानतो. ही दशा तुम्हांला का प्राप्त झाली ? तुम्ही हिंदू धर्मात राहिल्यामुळे ही दशा तुम्हांला प्राप्त झाली आहे, असे मला वाटते. तुमच्यातील जे मुसलमान झाले त्यांना हिंदू अस्पृश्य मानीत नाहीत व असमान लेखीत नाहीत. तुमच्यातील जे ख्रिस्ती झाले त्यांना हिंदू लोक अस्पृश्य मानीत नाहीत व असमान लेखीत नाहीत. नुकताच त्रावणकोर येथे घडलेला प्रकार लक्षात घेण्यासारखा आहे. तेथील थिया जातीतील अस्पृश्य लोकांस रस्त्यावरून चालण्याची मनाई आहे. परवाच त्यांच्यापैकी काही जणांनी शीख धर्म स्वीकारला हे तुम्हांस माहीत असेलच. अस्पृश्य असताना ज्या लोकांस त्या रस्त्यावरून चालता येत नव्हते त्याच लोकांनी शीख धर्म स्वीकारल्याबरोबर त्यांच्यावरची बंदी उठवली गेली. या सर्व गोष्टीवरून एक गोष्ट सिद्ध होत आहे की तुमच्या अस्पृश्यतेला व तुमच्या असमानतेला जर काही कारण असेल तर ते तुमचा आणि हिंदू धर्माचा असलेला लागाबांधा हे होय.

या असमानतेच्या अन्यायात सांत्वन करण्याच्या हेतूने काही स्पृश्य लोक अस्पृश्यांना सांगतात की तुम्ही शिक्षण घ्या, म्हणजे तुम्हाला शिवू ! तुम्ही स्वच्छ रहा म्हणजे तुम्हाला शिवू ! आणि समानतेने वागवू ! खरे म्हटले असता, अडाणी महाराची, दरिद्री महाराची आणि अस्वच्छ महाराची जी गत होते तीच गत शिकलेल्या महाराची, पैसेवाल्या महाराची आणि स्वच्छ राहाणाऱ्या महाराची होते. हे तुम्हां आम्हां सर्वांना अनुभवाने माहीत आहे. पण तो प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी जर शिक्षण घेतल्याशिवाय, हाती पैसा असल्याशिवाय, अंगावर पोषाख असल्याशिवाय, मानमान्यता मिळणार नाही, तर साध्या महाराने काय करावे ? ज्याला शिक्षण प्राप्त होऊ शकत नाही, ज्याला पैसा मिळू शकत नाही, आणि ज्याला नीटनेटका पोषाख करता येत नाही, त्या महाराला समानता कशी मिळणार ? ख्रिस्ती धर्मात, मुसलमानी धर्मात जी समतेची शिकवण देण्यात आली आहे तिचा संबंध विद्या, धन, पोषाख, पराक्रम अशा बाह्य वस्तूंशी मुळीच नाही. माणसाचे मनुष्यत्व हीच महत्त्वाची गोष्ट आहे, असे दोन्ही धर्म मानतात व ते मनुष्यत्व सर्वांना आदरणीय असले पाहिजे, कोणी कोणाचा अपमान करू नये व कोणी कोणाला असमान मानू नये, असे ते धर्म शिकवितात. हिंदू धर्मात या शिकवणीचा पूर्ण अभाव आहे. ज्या धर्मात मनुष्याच्या

मनुष्यत्वाला व त्याच्या माणुसकीला काही किंमत नाही तो धर्म काय कामाचा ? आणि त्याला कवटाळून धरून राहण्यात काय हशील आहे ? याला उत्तर म्हणून काही हिंदू लोक उपनिषदांची साक्ष देतात व त्यांत ईश्वर सर्वत्र भरला आहे असे तत्त्व आहे, म्हणून वढाई मिरवात. विज्ञान आणि धर्म या दोन गोष्टी अगदी निरनिराळ्या आहेत. एखादी गोष्ट विज्ञानाचे तत्त्व आहे की धर्माची शिकवण आहे याचा विचार केला पाहिजे. सर्वभूती एक ईश्वर हा विज्ञानाचा सिद्धान्त आहे. धर्माच्या तत्त्वाचा वागणुकीशी संबंध असतो, विज्ञानाचा नसतो. सर्वभूती एक ईश्वर ही धर्माची शिकवण नाही. हे विज्ञानाचे तत्त्व आहे. ही गोष्ट, हिंदू लोक त्याप्रमाणे वागत नाहीत, ह्या माझ्या म्हणण्याचा पुरावाच आहे. उलटपक्षी हिंदू लोकांचा असा आग्रहच असेल की सर्वभूती एक परमेश्वर आहे, ही गोष्ट तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त नसून त्यांच्या धर्माचा पाया आहे, आणि म्हणून आमचा धर्म श्रेष्ठ आहे, तर त्यांना एवढेच उत्तर पुरे आहे की त्यांच्या इतके नीच लोक जगामध्यें दुसरे कोणीच नसतील ! मुखाने सर्वभूती ईश्वर असा जप करणाऱ्या आणि कृतीने भूतमात्रांची विटंबना करणाऱ्या लोकांचा ' मुखमें राम बगलमें छुरी ' ' बोलणे महानुभावाचे पण करणी कसाबाची ' अशा दुष्ट लोकांतच समावेश करावा लागेल. सर्वभूती एक ईश्वर मानणारे आणि कृतीने माणसाला पशुतुल्य लेखणारे लोक दांभिक आहेत, त्याचा संग करू नका ! ! मुंग्यांना साखर घालणारे व माणसांना पाण्यावाचून मारणारे लोक दांभिक आहेत; त्यांचा संग करू नका ! ! त्यांच्या संगामुळे तुमच्यावर काय परिणाम झाला आहे ? तुमची इज्जत नाहीशी झाली, तुमचा मान सन्मान नाहीसा झाला ! खरे म्हटले असता हिंदू समाजातच तुम्हांला मान सन्मान नाही, हे म्हणणे वस्तुस्थितीच्या मानाने अपुरे पडते. तुम्हांला हिंदू लोकच हलके मानतात असे नव्हे, तर मुसलमान व ख्रिस्ती लोक देखील तुम्हांला हलके लेखतात. खरे म्हटले असता मुसलमानी धर्मात, ख्रिस्ती धर्मात श्रेष्ठकनिष्ठ, उच्चनीच असा भेदभाव जागृत करणारी शिकवण नाही. असे असताना देखील हे लोक तुम्हांला कमी लेखतात. त्याचे कारण काय ? ह्याचे कारण एकच. हिंदू लोक तुम्हांला नीच लेखतात, म्हणूनच तुम्हांला मुसलमान व ख्रिस्ती लोक नीच लेखतात. अस्पृश्यांना जर आम्ही समान लेखले तर हिंदू लोक आपल्याला अस्पृश्यांच्या इतकेच खालचे लेखतील या भीतीमुळे मुसलमान व ख्रिस्ती लोक तुमच्याशी हिंदूप्रमाणेच अस्पृश्यता पाळतात. आम्ही हिंदू समाजात हीन गणले गेलो आहोत इतकेच नव्हे तर हिंदूच्या असमानतेच्या वर्तणुकीमुळे आम्ही सर्व हिंदुस्थान देशामध्ये सर्वांपेक्षा हीन गणलो गेलो आहोत. ही अपमान-कारक परिस्थिती टाळण्याकरिता, हा कलंक धुवून काढण्याकरिता, नरदेहाचे चीज

करण्याकरिता, जर कोणता एकदा उपाय असेल तर तो एकच आहे व तो म्हणजे हिंदू धर्माचा व हिंदू समाजाचा त्याग करणे हाच होय.

## हिंदुधर्मात तुम्हांला स्वातंत्र्य आहे काय ?

दरेक नागरिकाला जेवढे कायद्याने व्यवसाय स्वातंत्र्य आहे, तेवढे व्यवसाय स्वातंत्र्य तुम्हांलाही आहे. दरेक नागरिकाला कायद्याने जितके व्यक्तिस्वातंत्र्य आहे, तेवढे व्यक्तिस्वातंत्र्य तुम्हांलाही आहे, असे काही लोक म्हणतील. परंतु या म्हणण्यात खरोखरी काही अर्थ आहे काय ? याचा खोल विचार तुम्ही करावयास पाहिजे. ज्याला जन्मजात धंद्याशिवाय दुसरा कोणताही धंदा समाज करू देत नाही त्या माणसाला तुला व्यवसायस्वातंत्र्य आहे असे सांगण्यात काय हशील आहे ? ज्याला संपत्ती मिळविण्याचे कोणत्याही प्रकारचे द्वार खुले नाही त्याला तुझ्या संपत्तीला कोणीही हात लावू शकणार नाही, तुझी संपत्ती उपभोगण्यास तू स्वतंत्र आहेस, असे सांगण्यात काय सत्य ( तथ्य ) आहे ? जन्मजात अपवित्रते-मुळे ज्याचा नोकरीत प्रवेश होऊ शकत नाही, ज्याच्या हाताखाली नोकरी करण्याचा इतर लोकांना अपमान वाटतो, अशा माणसास कोणत्याही नोकरीवर अधिकार सांगण्याचे तुला स्वातंत्र्य आहे, असे सांगणे म्हणजे त्याची थट्टा करणे आहे. कायद्याने पुष्कळ हक्क दिले असतील, पण समाज त्यांचा उपयोग करू देईल तरच ते खरे हक्क आहेत असे म्हणता येईल. अस्पृश्यांनी चांगला पोषाख घालून हिंडावे असा हक्क कायद्याने दिला आहे. पण हिंदू समाज तसे कपडे वापरू देत नाही तर त्या हक्काचा काय उपयोग ? अस्पृश्यांनी तांब्यापितळेच्या भांड्यांत पाणी आणावे असा हक्क कायद्याने दिला आहे, पण हिंदू समाज अस्पृश्यांना धातूची भांडी वापरू देत नाही, तर त्या हक्काचा काय उपयोग ? अशी पुष्कळ उदाहरणे देता येतील. परंतु सारांश हा की समाज उपभोगू देईल तर आपला हक्क असे म्हणता येईल. ज्या हक्काला समाजाची आडकाठी आहे, हरकत आहे, तो हक्क कायद्याने जरी दिला असला तरी त्याचा काही उपयोग नाही. अस्पृश्य लोकांना काय शीर स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याची जास्त जरूरी आहे. सामाजिक स्वातंत्र्य जोपर्यंत तुम्हांला प्राप्त झाले नाही तोपर्यंत तुम्हांला कायद्याने कितीही स्वातंत्र्य दिले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. तुम्हांला शारीरिक स्वातंत्र्य आहे असे काही लोक सांगतील. तुम्हांला कायद्याची मनाई नसेल तिकडे जाता येते, कायद्याची मनाई नसेल त्याप्रकारे बोलता येते हे खरे, परंतु या स्वातंत्र्याचा काय उपयोग आहे ? मनुष्यमात्राला जसे शरीर

आहे तसेच मनही आहे. जितकी शारीरिक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे तितकीच मानसिक स्वातंत्र्याचीही आवश्यकता आहे. नुसत्या शारीरिक स्वातंत्र्याचा कांही उपयोग नाही. महत्त्व आहे ते मानसिक स्वातंत्र्याला आहे. खरे म्हटले असता शरीराचे स्वातंत्र्य कशाकरिता असते ? ज्याला त्याला मनसोक्त व्यवहार करता यावा एवढयाच करता आहे. कैद्याच्या पायांतील बेडया काढून त्याला मोकळे करण्याचा मतलब काय ? हेतु एवढाच की त्याने बाह्य जगात मोकळया मनाने वावरून आपल्या अंगी असलेल्या कर्तबगारीचा पूर्ण फायदा घ्यावा म्हणून. परंतु ज्या माणसाचे मन स्वतंत्र नाही त्याला असल्या बाह्यात्कारी स्वातंत्र्याचा काय उपयोग ? मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो मोकळा असून गुलाम आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जरी कैदी नसला तरी तो तुरुंगांत आहे, ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्य हो जिवंतपणाची साक्ष आहे. परंतु मानसिक स्वातंत्र्य वसत आहे त्याचा लोप झाला नाही, याचा पुरावा काय ? मानसिक स्वातंत्र्य कोणाला आहे, असे म्हणता येईल? जो आपली बुद्धी जागृत ठेवून आपले हक्क काय आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय याची जाणीव करून घेतो, त्याला मी स्वतंत्र म्हणतो.जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कह्यात आणण्यास सिद्ध असतो, तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो रुढीच्या स्वाधीन झाला नाही, जो गतानुगतीक बनला नाही, ज्याच्या विचारांची ज्योत विझली नाही, तो स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुसऱ्याच्या शिकवणीने वागत नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवीत नाही, जो आपल्या हक्कांचा अपहार केला असता त्याच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी, स्वाभिमान ज्याला आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो. जो आपल्या आयुष्याचे ध्येय व आपल्या आयुष्याचा व्यय दुसऱ्याने घालून दिलेल्या आज्ञेप्रमाणे ठरवीत नाही, जो आपल्या बुद्धीनुसार आपल्या आयुष्याचे ध्येय काय असावे व आपले आयुष्य कोणत्या कार्यात कशा रीतीने व्यतीत करावे हे आपले आपण ठरवितो. सारांश जो सर्वस्वी स्वाधीन आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो.

या दृष्टीने पाहिले असता तुम्ही स्वतंत्र आहात का ? तुमचे आयुष्य व तुमच्या आयुष्याचे ध्येय तुमच्या स्वाधीन आहे का ? माझ्या मते तुम्हांला स्वातंत्र्य नाहीच, पण तुम्ही दास आहात, सेवक आहात, इतकेच नव्हे तर तुमच्या

दास्यत्वाला सीमा उरली नाही. ! हिंदुधर्मात कोणालाही विचार स्वातंत्र्य असू शकत नाही. जो जो मनुष्य हिंदू धर्मात राहील त्या त्या माणसाला आपल्या विचार स्वातंत्र्याला तिलांजली दिल्याशिवाय गत्यंतर नाही. वागताना त्याने वेदांप्रमाणे वागले पाहिजे. स्मृतींत तशी आज्ञा असेल तर स्मृतीतील आज्ञेप्रमाणे वागले पाहिजे. स्मृतींत तशी आज्ञा नसेल तर महाजनांच्या पावलावर पाऊल ठेवून वागले पाहिजे. हिंदू धर्मात बुद्धीला, विचाराला प्राधान्य तर नाहीच नाही; पण वाव देखील नाही. हिंदूने कोणाची तरी गुलामगिरी केलीच पाहिजे. वेदाची गुलामगिरी केली पाहिजे, स्मृतीची कास धरली पाहिजे अगर महाजनांचे अनुकरण केले पाहिजे. विचारशक्तीचा त्याने मुळीच उपयोग करता कामा नये. जोपर्यंत तुम्ही हिंदू धर्मात आहात तोपर्यंत तुम्हांला विचारस्वातंत्र्य प्राप्त होऊ शकत नाही. यावर कोणी असे म्हणतील की हिंदू धर्माने तुमचेच मानसिक स्वातंत्र्य हिरावून घेतले असे नव्हे, तर हिंदु धर्माला प्रमाण मानणाऱ्या सर्व जातींचे मानसिक स्वातंत्र्य हिरावून घेतलेले आहे. हिंदूधर्मामुळे सर्वच बौद्धिक गुलामगिरीत सापडले आहेत हे खरे, पण त्यामुळे ते समदुःखी आहेत असे कोणी समजू नये. कारण या बौद्धिक गुलामगिरीचे दुष्परिणाम सर्वांना भोगावे लागत नाहीत. स्पृश्य वर्गाच्या ऐहिक सुखावर या बौद्धिक गुलामगिरीचा कोणत्याही प्रकारचा अनिष्ट परिणाम होऊ शकत नाही. ते जरी वेदाचे गुलाम झाले, स्मृतींचे दास असले, महाजनांचे गतानुगतिक बनले तरी हिंदू समाजाच्या व्यवहारात त्यांना वेदांनी, स्मृतींनी व महाजनांनी उच्चपद दिलेले आहे. दुसऱ्यावर हुकमती गाजवण्याकरता त्यांना अधिकार दिलेला आहे. सारा हिंदू धर्म वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंनी वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंच्या संवर्धनाकरिता रचलेला आहे, ही गोष्ट अगदी निर्विवाद आहे. ज्याला ते धर्म म्हणतात त्या धर्मात तुम्हांला गुलामांची भूमिका दिलेली आहे. इतकेच नव्हे तर, या गुलामगिरीतून तुमची सुटका होऊ नये, अशा प्रकारची व्यवस्थाही त्या धर्मात केलेली आहे. म्हणून हिंदू धर्मातील ह्या बौद्धिक गुलामगिरीतून सुटका करून घेण्याची तुम्हाला जितकी जरूरी आहे, तितकी हिंदूंना नाही. अशा रीतीने विचार केला असता हा हिंदू धर्म तुम्हांला दोन्ही तऱ्हेने मारक झाला आहे. या धर्माने तुमचे मानसिक स्वातंत्र्य हिरावून घेऊन तुम्हांला गुलाम केले आहे; व याच धर्माने तुम्हांला व्यवहारात गुलामगिरीच्या दशेत आणून टाकले आहे. तुम्हांला जर स्वातंत्र्य हवे असेल तर तुम्हांला धर्मांतरच केले पाहिजे.

## अस्पृश्यांतील संघटन आणि धर्मांतर

अस्पृश्यता – निवारणाची जी आज चळवळ चालू आहे, त्या चळवळीवर अशी

टीका करण्यात येते की अस्पृश्य वर्गात ज्या निरनिराळ्या जातींचा समावेश झालेला आहे, त्या जातींतही परस्परांतील व्यवहारामध्ये जातिभेद पाळण्यात येतो; नव्हे अस्पृश्यता पाळण्यात येते. महार व मांग एकमेकाच्या हातचे खात नाहीत. दोघेही भंग्यासारख्या जातीला शिवत नाहीत, व त्यांच्याशी अस्पृश्यता पाळतात, परस्परांत जातिभेद व अस्पृश्यता पाळणाऱ्या लोकांना वरच्या जातींकडून तुम्ही जातिभेद सोडा, अस्पृश्यता मानू नका, असे म्हणण्याचा काय अधिकार आहे ? असा प्रश्न नेहमी विचारण्यात येतो. तुम्ही आपसांतील जातिभेद व अस्पृश्यता नाहीशी करा, मग आमच्याकडे दाद मागण्यास या, असा साळसूदपणाचा सल्ला त्यांना देण्यात येत असतो. या टीकेच्या मुळाशी असलेल्या कथेत सत्य आहे, हे आपल्यापैकी सर्वांना कबूल करावे लागेल. पण त्या टीकेत केलेला आरोप मात्र खोटा आहे. अस्पृश्यवर्गात समाविष्ट झालेले लोक जातिभेद पाळतात व काही अस्पृश्यता पाळतात, या गोष्टीचा इन्कार करता येणे शक्य नाही. या गोष्टी मान्य करणे प्राप्त असले तरी या अपराधाला ते कारणीभूत आहेत, असे म्हणणे निखालस खोटे आहे. जातिभेदाचा व अस्पृश्यतेचा उगम अस्पृश्य लोकांपासून झालेला नाही. जातिभेदाचा व अस्पृश्यतेचा उगम वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंच्या हातून झालेला आहे. जातिभेदाचा व अस्पृश्यतेचा पायंडा त्यांनी घातला आहे. जातिभेद व अस्पृश्यता पाळण्याचा धडा वरिष्ठ वर्गाच्या हिंदूंनी घालून दिलेला आहे, ही गोष्ट जर सत्य असेल तर जातिभेदाच्या व अस्पृश्यतेच्या रूढीची जबाबदारी स्पृश्य वर्गावरच पडते; अस्पृश्य वर्गावर पडू शकत नाही. अस्पृश्य वर्गाचे लोक जातिभेद व अस्पृश्यता पाळताना वरच्या वर्गाच्या लोकांनी दिलेला धडा गिरवीत आहेत. तो धडा जर खोटा आहे तर त्याचे पाप ज्यांनी तो धडा दिला त्यांच्यावरच येऊन पडते. ज्यांनी गिरवला त्यांच्यावर येऊन पडू शकत नाही. हे उत्तर जरी समर्पक असले तरी या उत्तराने माझे स्वतःचे समाधान होऊ शकत नाही. ज्या कारणामुळे अस्पृश्यता व जातिभेद ही आपल्यामध्ये शिरली, त्या कारणाला आपण जरी जबाबदार नसलो, तथापि आपल्यामध्ये जो जातिभेद व जी अस्पृश्यता नांदत आहे तिचा धिक्कार न करणे, ती आहे तशीच चालू देणे आपल्याला इष्ट नाही. अस्पृश्यतेचा व जातिभेदाचा शिरकाव करण्यास जरी आपण जबाबदार नसलो तरी ती घालविण्याची जबाबदारी आपण सर्वांनी ओळखली आहे, याबद्दल मला समाधान वाटते. माझी खात्री आहे की महार जातीत असा कोणीही पुढारी नाही की जातिभेद पाळावा असे तो म्हणतो. तुलनाच करावयाची झाली तर ती पुढाऱ्यांमध्येच केली पाहिजे. महारातील शिकला-सवरलेला वर्ग घेतला आणि ब्राह्मणांतील शिकलासवरलेला वर्ग जर घेतला व दोहोंची तुलना जर केली तर अस्पृश्य

वर्गातील सुशिक्षित वर्ग जातिभेद मोडण्याला जास्त अनुकूल आहे, ही गोष्ट कोणा-सही कबूल करावी लागेल. इतकेच नव्हे तर ती गोष्ट कृतीनेही सिद्ध करून घेता येईल. महारांतील सुशिक्षित वर्ग या सुधारणेला अनुकूल आहे, इतकेच नव्हे तर महारांतील अडाणी जनता देखील या गोष्टीला अनुकूल आहे, हे सिद्ध करून देता येईल. आज महारांमध्ये असा एकही मनुष्य सापडणार नाही की, जो महारां–मांगांत रोटी व्यवहार व्हावा, याच्या विरुद्ध असेल. आपल्यांतील जातिभेद मोड–ण्याची आवश्यकता तुम्ही ओळखता या गोष्टीबद्दल मला मोठे समाधान वाटते व मी तुमचे अभिनंदन करू इच्छितो. परंतु अस्पृश्यांतील जातिभेद मोडण्याचा प्रयत्न कसा यशस्वी करता येईल याचा तुम्ही विचार केला आहे काय? सहभोजन केल्याने किंवा क्वचित प्रसंगी सहविवाह केल्याने जातिभेद मोडू शकत नाहीत. जातिभेद ही एक मानसिक स्थिती आहे, एक मानसिक व्यथा आहे. ही मानसिक व्यथा जडण्याचे कारण हिंदू धर्माची शिकवण ही आहे. आपण जातिभेद पाळतो, अस्पृश्यता पाळतो, याचे मुख्य कारण, ज्या हिंदू धर्मात आपण आहोत तो धर्म तसे करावयास सांगतो म्हणून. वस्तू कडू असेल तर ती गोड करता येईल. खारट असेल, तुरट असेल तर तिची रुची बदलता येईल. पण विषाचे अमृत करता येणार नाही. हिंदू धर्मात राहून जातिभेद नष्ट करू असे म्हणणे म्हणजे विषाचे अमृत करू असेच म्हणण्यासारखे आहे.

अर्थात ज्या धर्मात माणसाची घाण माणसाने मानली पाहिजे अशी शिकवण देण्यात येत आहे, त्या धर्मात आपण जोपर्यंत आहोत तोपर्यंत जातिभेद नाहीसा होणार नाही. आपल्या मनातील जातिभेद व अस्पृश्यता नाहीशी करावयाची असल्यास त्यांनी धर्मांतर करणे हा एकच रामबाण उपाय आहे.

## नामांतर आणि धर्मांतर

येथपर्यंत धर्मांतराची कारणमीमांसा तुमच्यापुढे मी मांडली आहे. ही कारणमीमांसा तुम्हांला विचारप्रवर्तक होईल, अशी मला आशा आहे. ही कारणमीमांसा ज्यांना खोल आणि गहन अशी वाटत असेल त्यांना या विषयाचा सहज समज पडावा म्हणून मी काही साधे बालबोध विचार तुमच्यापुढे मांडणार आहे. या धर्मांतराच्या प्रश्नात नवे असे काय आहे ? खरे म्हटले असता हिंदूंचा आणि तुमचा सामाजिक संबंध काय आहे ? जितके मुसलमान लोक हिंदूपासून भिन्न

आहेत, तितकेच तुम्हीही हिंदूंपासून भिन्न आहात. ख्रिस्ती समाज हिंदूंपासून जितका भिन्न आहे, तितकेच तुम्हीही हिंदूंपासून भिन्न आहात. ख्रिस्त व मुसलमान यांच्याशी जसा हिंदूंचा रोटीबेटी व्यवहार होत नाही, तसाच तुमच्याशीही होत नाही. तुमचा आणि हिंदूंचा समाज हे आतासुद्धा निरनिराळे वेगवेगळे दोन समाज आहेत. धर्मांतर केल्याने एका समाजाचे दोन तुकडे करण्यात आले, असे कोणालाही म्हणता यावयाचे नाही व कोणालाही वाटावयाचे नाही. आज जसे तुम्ही निराळे आहात तसेच धर्मांतर केल्यामुळे निराळे होणार आहात. धर्मांतराने नवे असे काही होणार नाही. हे जर खरे आहे तर धर्मांतराचा बाऊ कोणाला का वाटावा हे मला समजत नाही. दुसरे असे की धर्मांतराचे महत्त्व तुम्हांला जरी पटत नसले तरी नामांतराचे महत्त्व तुम्हां सर्वांना पटले आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. तुमच्यापैकी कोणालाही तुझी जात काय म्हणून विचारले तर ती चोखामेळा, हरिजन वगैरे सांगता. पण महार हे नाव सांगत नाही. अशा प्रकारचे नामांतर करण्याचे कारण अगदी सोपे आहे. अपरिचित अशा माणसाला अस्पृश्य कोण व स्पृश्य कोण हे सांगता येणार नाही. आणि म्हणून जोपर्यंत जात कळली नाही, तोपर्यंत स्पृश्य हिंदूंच्या मनात कोणत्याही प्रकारची दूषित भावना उत्पन्न होत नाही. प्रवासात अपरिचित स्पृश्य अस्पृश्य बंधुभावाने वागत असलेले दिसतात. एकमेकांपासून विडीपान घेतात, फळ फळावळ घेतात, परंतु त्याच माणसास ज्याच्याशी आपण व्यवहार करतो त्याची जात कळली व त्याची जात अस्पृश्य आहे, असे समजले की त्याच्या मनात तिरस्कार उत्पन्न होतो, त्याला तिडीक येते; व आपल्याला फसवले म्हणून त्याला क्रोध येऊन प्रवासात जडलेल्या मैत्रीचे पर्यवसान शिवीगाळीत व मारामारीत होते. हा अनुभव पुष्कळांना असेल, अशी माझी खात्री आहे. तुम्हांला जी ही जातिवाचक नावे प्राप्त झालेली आहेत त्या नावांना इतकी दुर्गंधी लागलेली आहे की त्याचा उच्चार केला असताना देखील स्पृश्य लोकांना मळमळून येते. आणि म्हणूनच तुम्ही स्वतःला महार न म्हणता, चोखामेळा म्हणून लोकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करता ! परंतु त्याने लोक फसत नाहीत, याचाही तुम्हांला अनुभव आहेच. कारण चोखामेळा म्हटले काय किंवा हरिजन म्हटले काय, लोक जे समजावयाचे ते समजतात ! तुम्हांला नामांतराची आवश्यकता भासते हे तुमच्या वर्तणुकीनेच तुम्ही सिद्ध केले आहे. मला तुम्हांला एवढेच विचारावयाचे आहे की नामांतर करणे हे जर तुम्हांला आवश्यक वाटते तर मग तुम्हांला धर्मांतर करण्यास काय हरकत असावी ? धर्मांतर हे एका दृष्टीने नामांतरच आहे. धर्मांतराने होणारे नामांतर हे तुम्हांला जास्त फायदेशीर

पडेल, मुसलमान म्हणवून घेणे, ख्रिस्ती म्हणवून घेणे, बौद्ध म्हणवून घेणे, शीख म्हणवून घेणे हे धर्मांतर आहेच पण नामांतरही आहे. ते खरे नामांतर आहे. या नामांतराला दुर्गंधी नाही. हे नामांतर आमूलाग्र आहे. त्याचा शोध कोणी करू शकणार नाही. परंतु चोखामेळा, हरिजन या नामांतरापासून काही अर्थ नाही. जुन्या नावाची घाण नव्या नावाला लागल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत तुम्ही हिंदू धर्मात राहाल तोपर्यंत तुम्हाला नामांतर करावेच लागेल. कारण नुसते हिंदू म्हणवून चालणार नाही. हिंदू हा कोणी मनुष्यप्राणी आहे, असे कोणीच ओळखीत नाही. महार असे सांगून भागणार नाही. कारण त्या नावाचा उच्चार केल्याबरोबर कोणी जवळ येणार नाही. असल्या मधल्या स्थितीत घोटाळत राहण्यापेक्षा, आज हे नाव, उद्या ते नाव, असे नामांतर करीत बसण्यापेक्षा धर्मांतर करून कायमचे नामांतर तुम्ही का करू नये, असा तुम्हांला माझा प्रश्न आहे.

## विरोधकाची भूमिका

धर्मांतराची चळवळ सुरू झाल्यापासून अनेक लोकांनी त्या चळवळीच्या विरुद्ध अनेक आक्षेप घेतलेले आहेत. त्या आक्षेपात किती सत्य आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. काही हिंदू लोक धार्मिकपणाचा मोठा आव आणून तुम्हांला असे सांगतात की, " धर्म ही काही उपभोगाची वस्तू नव्हे ! ज्याप्रमाणे आपण आज एक कोट घालतो, दुसऱ्या दिवशी दुसरा घालतो, त्याचप्रमाणे धर्मात फेरबदल करता येणार नाही ! हिंदू धर्माला झुगारून देऊन तुम्ही परधर्मात जाता तर जे तुमचे पूर्वज इतके दिवस या हिंदू धर्मात राहिले ते मूर्ख होते की काय ?" असा प्रश्न काही शहाण्यांनी उपस्थित केला आहे. माझ्या दृष्टीने या आक्षेपात कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही. केवळ पूर्वजांचा धर्म म्हणूनच त्याला चिकटून राहावे हे म्हणणे एखाद्या मूर्खाला शोभू शकेल. कोणीही शहाणा माणूस अशा प्रकारची भूमिका घेऊ शकणार नाही. केवळ पूर्वजांचा धर्म म्हणून धर्मांतर करू नये असे म्हणणाऱ्या लोकांनी इतिहास वाचला नसेल असेच म्हणणे प्राप्त आहे. पूर्वीचा आर्यांचा धर्म, ज्याला वैदिक धर्म म्हणतात, त्यात गोमांस भक्षण करणे, दारू पिणे, स्वैर वर्तन करणे, या तीन गोष्टीत मुख्यत: धर्म साठवला होता. तो धर्म हजारो वर्षे हिंदुस्थानातील लोकांनी पाळला व अजूनही काही ब्राह्मण लोकांना त्या धर्माकडे जाण्याची हुक्की येते. केवळ पूर्वजांचा धर्म पाळावयाचा तर वैदिक धर्म सोडून हिंदुस्थानातील लोकांनी बौद्ध धर्म का स्वीकारला ? वैदिक धर्म त्यांनी का झिडकारला ? या धर्मात आमचे पूर्वज राहिले, ही गोष्ट खरी आहे. परंतु ते लोक

स्वसंतोषाने, स्वखुशीने राहिले असे मात्र माझ्याने म्हणवत नाही. या देशात अनेक कालपावेतो चातुर्वर्ण्याची संस्था अव्याहत चालू होती. या चातुर्वर्ण्यात ब्राह्मणांनी विद्या शिकावी, क्षत्रियांनी लढाई करावी, वैश्यांनी पैसा मिळवावा व शूद्रांनी सेवा करावी असा नियमबद्ध आयुष्यक्रम बांधलेला होता. या आयुष्यक्रमात शूद्र लोकांजवळ विद्या नव्हती, धन नव्हते आणि अन्नवस्त्रही नव्हते. अशा विपन्न व निःशस्त्र स्थितीत ज्या तुमच्या पूर्वजांना राहावे लागले, त्यांनी हा धर्म स्वसतोषाने स्वीकारला असे कोणत्याही शहाण्या माणसास म्हणता येणार नाही. या तुमच्या पूर्वजांना या धर्माविरुद्ध बंड करणे शक्य झाले असते काय, याचा विचार करणे प्राप्त आहे. त्यांना बंड करता आले असते व ते त्यांनी केले नसते तर हा धर्म त्यांनी स्वसंतोषाने पत्करला असे म्हणता आले असते. परंतु खरी वस्तुस्थिती पाहिली असताना त्यांचा निरुपाय झाल्यामुळेच या धर्मात त्यांना राहावे लागले, ही गोष्ट निर्विवाद आहे. या दृष्टीने पाहिले असताना हा हिंदुधर्म आमच्या पूर्वजांचा नसून, तो त्यांच्यावर जबरदस्तीने लादलेली एक गुलामगिरी आहे. त्य गुलामगिरीतून आपली सुटका करून घेण्याची साधने त्यांना उपलब्ध नव्हती म्हणून त्यांना त्या गुलामगिरी विरुद्ध बंड करता आले नाही व गुलामगिरीतच राहावे लागले. याबद्दल त्यांना कोणी दूषण देणार नाही. कोणी झाले तरी त्यांची कीवच करील. परतु हल्लीच्या पिढीवर तशा प्रकारची जबरदस्ती कोणालाही करता येणार नाही. त्यांना सर्व बाबतीत स्वातंत्र्य आहे. त्या स्वातंत्र्याचा उपयोग करून जर त्यांनी आपली स्वतःची सुटका करून घेतली नाही तर त्यांच्यासारखे नीच, त्यांच्यासारखे अधम व त्यांच्यासारखे परोपजीवी दुसरे कोणीच नाहीत, असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागेल.

## माणूस आणि पशूंतील फरक

केवळ पूर्वजांचा धर्म म्हणूनच त्याला चिकटून राहावे, हे म्हणणे मूर्खाला शोभू शकते. कोणीही शहाणा मनुष्य अशा प्रकारची भूमिका घेऊ शकणार नाही. ज्या परिस्थितीत मनुष्य सापडला त्याच परिस्थितीत त्याने आजन्म राहावे हे सांगणे पशूंना शोभेल, माणसांना शोभू शकणार नाही. माणसात व पशूत कोणत्या प्रकारची तफावत असेल तर ती हीच की, पशू आपली प्रगती करून घेऊ शकत नाही; माणूस आपली प्रगती करून घेऊ शकतो. स्थित्यंतर केल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही.धर्मांतर हे एक प्रकारचे स्थित्यंतर आहे. आणि जर धर्मांतर केल्याशिवाय प्रगती होत नसेल तर धर्मांतर करणे आवश्यक आहे. केवळ वडिलांचा धर्म ही बाब प्रगतिप्रिय माणसांच्या आड येऊ शकत नाही.

धर्मांतराच्या विरुद्ध आणखीहि एक मुद्दा सांगण्यात येतो. तो असा की, धर्मांतर हा एक प्रकारचा पळपुटेपणा आहे. आज हिंदूंतील अनेक लोक हिंदू धर्माची सुधारणा करण्याकरिता सिद्ध आहेत. त्यांच्या साहाय्याने जातिभेद व अस्पृश्यता नाहीशी करता येण्यासारखी आहे. अशा समयी धर्मांतर करणे सर्वस्वी अयोग्य आहे, असे काहींचे म्हणणे आहे. हिंदूंतील समाजसुधारकांबद्दल कोणाचे काय मत असेल ते असो, माझ्या मनात त्यांच्याबद्दल अत्यंत तिटकारा आहे. मला याचा चांगला अनुभव आहे. आणि या अर्धवट लोकांचा मला अगदी वीट आला आहे. ज्या लोकांना आपल्या जातीत राहावयाचे आहे, आपल्या जातीत मरावयाचे आहे, आपल्या जातीत लग्न करावयाचे आहे, त्या लोकांनी आपण जातिभेद मोड-णार आहोत, अशी खोटी वल्गना करावी व त्या वल्गनेवर अस्पृश्य लोकांनी विश्वास ठेवला नाही म्हणून संतप्त व्हावे, ही गोष्ट मोठीच आश्चर्याची आहे. या लोकांच्या वल्गना ऐकल्या म्हणजे, अमेरिकेतील निग्रो लोकांच्या सुटकेकरता ज्या गोऱ्या अमेरिकन लोकांनी प्रयत्न केला, त्यांची मला आठवण होते. एके काळी अमेरिकन निग्रो लोकांची स्थिती भारतातील अस्पृश्य वर्गाप्रमाणे होती. त्यांची गुलामगिरी कायद्याने प्रस्थापित केलेली होती. तुमची गुलामगिरी धर्माने प्रस्थापित केलेली आहे, एवढाच काय तो फरक आहे. या निग्रोंची त्यांच्या गुलामगिरीतून सुटका करण्याकरिता अमेरिकेतील काही सुधारक प्रयत्न करीत होते. पण हिंदु-समाजसुधारकांची आणि निग्रोंची सुटका करणाऱ्या अमेरिकेतील गोऱ्या सुधारकांची तुलना करता येईल काय ? काळ्या शिद्दी लोकांची गुलामगिरीतून सुटका व्हावी म्हणून आपल्याच रक्तमांसाच्या गोऱ्यांशी अमेरिकन सुधारणावाद्यांनी तुंबळ युद्ध केले. त्यांना गुलामगिरीत ठेवावे, असे म्हणणाऱ्या असंख्य गोऱ्या लोकांचे प्राण घेतले व आपल्यांपैकी असंख्य लोकांच्या प्राणांची आहुती दिली. त्या प्रसंगाचे वर्णन इतिहासातून वाचले आणि आमच्या समाजसुधारकांचे चित्र डोळ्यांपुढे ठेवले म्हणजे 'कहाँ राजा कहाँ पोतराजा' असेच म्हणणे भाग पडते. सुधारक म्हणून म्हणविणाऱ्या भारतातील अस्पृश्यांच्या कैवाऱ्यांस असे विचारणे प्राप्त आहे की, अमेरिकेतील गोऱ्या लोकांनी निग्रोंच्या सुटकेकरता जी आपापसांत यादवी केली तशी यादवी करण्यास तुम्ही सिद्ध आहात का ? व सिद्ध नसाल तर सुधार-णेच्या व्यर्थ वल्गना करण्यात काय हशील आहे ! हिंदूमधले फार मोठ्यांतले मोठे अस्पृश्यांच्या उन्नतीकरता झटणारे म्हटले म्हणजे महात्मा गांधी. त्यांची मजल किती लांब जाऊ शकते ? इंग्रज सरकार विरुद्ध निःशस्त्र प्रतिकाराचा लढा लढ-विणारे महात्मा गांधी अस्पृश्य वर्गावर जुलूम करणाऱ्या हिंदूंचे मन देखील

दुखवायला तयार नाहीत !! त्यांच्या विरुद्ध सत्याग्रह करायला तयार नाहीत !! इतकेच नव्हे तर त्यांच्याविरुद्ध कायदेशीर इलाज करायला देखील तयार नाहीत !! या सुधारकांचा काय उपयोग आहे मला कळत नाही.

## खरे चुकते स्पृश्यांचेच

काही जण अस्पृश्यांच्या सभेत येऊन मोठ्या तावातावाने स्पृश्यांना शिव्या देतील. काहीजण अस्पृश्यांच्या सभेत येऊन मोठ्या आढ्यतेने अस्पृश्यांना सांगतील की, बाबांनो, तुम्ही स्वच्छ राहा, शिक्षण घ्या, तुमच्या पायांवर उभे राहा वगैरे. खरे म्हटले असता कोण आरोपी असेल तर तो स्पृश्य वर्ग. कोणाचे चुकत असेल तर ते स्पृश्य वर्गाचे. पण त्या स्पृश्य वर्गाची सभा करून त्यांची कान उघाडणी करतील तर हराम आहे. हिंदू धर्मातच राहून तुम्ही आपला लढा चालू ठेवा, तुम्ही आम्ही मिळून तो यशस्वी करू, असे सांगणाऱ्या सुधारकांना दोन गोष्टींची आठवण करून देणे आवश्यक वाटते. गेल्या महायुद्धात एका अमेरिकन व इंग्लिश माणसामाणसामध्ये लढाईसंबंधाने झालेला संवाद माझ्या वाचण्यात आला आहे. तो उद्‌बोधक असल्याकारणाने त्याचा या प्रसंगी उल्लेख करणे उचित वाटते. संवादाचा विषय लढाई कोठपर्यंत चालू ठेवायची या संबंधाने होता. त्या अमेरिकन गृहस्थाच्या प्रश्नाला उतर देताना इंग्रज माणसाने मोठ्या तोऱ्याने सांगितले की शेवटचा फ्रेंच माणूस ठार होईपर्यंत आम्ही लढाई लढू. हिंदू समाजातील सुधारक जेव्हा असे म्हणतात की, अस्पृश्यतेचा हा लढा आम्ही शेवटपर्यंत लढू, तेव्हा शेवटचा अस्पृश्य ठार होईपर्यंत लढू असाच त्याचा अर्थ निदान मी तरी करतो. दुसऱ्याचे शिर तळहातावर घेऊन युद्धाला निघणाऱ्या योद्ध्यापासून विजयश्रीची आशा धरणे किती रास्त आहे, हे ठरविणे तुम्हांला काही अवघड जाऊ नये. आमच्या लढ्यात जर आम्हीच मरणार आहोत तर मग भलत्याच ठिकाणी लढा करण्यात काय हशील आहे ! हिंदू समाजाची सुधारणा करणे हे आमचे ध्येय आहे, या पलीकडे आम्हांला कोणत्याही प्रकारचे कर्तव्य नाही. धर्मांतर करून जर आम्हांला आमचे स्वातंत्र्य मिळू शकते तर आम्ही हिंदू धर्माच्या सुधारणेचा लढा काय म्हणून आमच्या अंगांवर घ्यावा ? व त्या लढ्यात आमच्या सामर्थ्याची, शक्तीची, व द्रव्याची आहुती काय म्हणून द्यावी ? हिंदू समाजाची सुधारणा करणे हा अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीचा मुख्य हेतू आहे, असा कोणीही आपला गैरसमज करून घेऊ नये. अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीचा मुख्य हेतू अस्पृश्यांना सामाजिक स्वातंत्र्य मिळवून देणे हाच आहे; आणि ते स्वातंत्र्य

धर्मांतराशिवाय प्राप्त होणार नाही, हेही तितकेच खरे आहे. अस्पृश्यांना समतेची आवश्यकता आहे ही गोष्ट मला मान्य आहे व समतेची प्राप्ती हा खरोखरीच त्यांच्या चळवळीचा एक हेतू आहे. परंतु ही समता प्राप्त करून घेण्याकरिता त्यांनी हिंदू धर्मातच राहिले पाहिजे, नाहीतर समता प्राप्त व्हावयाची नाही असे कोणालाही म्हणता येणार नाही. समता प्राप्त करून घेण्याचे दोन मार्ग मला दिसतात. हिंदू धर्मात राहून समता मिळवायची किंवा धर्मांतर करून समता मिळवायची. हिंदू धर्मात राहून समता प्राप्त करावयाची झाल्यास नुसती शिवाशिव जाऊन कार्यभाग होणार नाही. रोटी व्यवहार व बेटी व्यवहार घडला तरच समानता प्राप्त होऊ शकेल. याचाच अर्थ असा की, चातुर्वर्ण्याचा बीमोड झाला पाहिजे व ब्राह्मणी धर्माचा विध्वंस झाला पाहिजे. ही गोष्ट शक्य आहे का ? व ही जर शक्य नसेल तर हिंदू धर्मात राहून समतेच्या वागणुकीची अपेक्षा करणं शहाणपणाचे होईल काय ? व या प्रयत्नात तुम्हांला यश येईल काय ? त्या मानाने धर्मांतराचा मार्ग किती सोपा आहे ? हिंदू समाज मुसलमान समाजाला समतेने वागवितो. हिंदू समाज ख्रिस्ती समाजाला समतेने वागवितो. अर्थात् धर्मांतराने सहजगत्या सामाजिक समता प्राप्त होऊ शकते हे जर खरे आहे, तर मग धर्मांतरासारख्या साध्या सोप्या मार्गाचा तुम्ही अवलंब का करू नये ? माझ्या मते धर्मांतराचा मार्ग हा जसा अस्पृश्य लोकांना तसाच हिंदूनाही सुखाचा होणार आहे. हिंदू धर्मात राहाल तोपर्यंत तुम्हाला त्याच्याशी शिवाशिवी करिता, पाण्याकरिता, रोटीकरिता, बेटीकरिता भांडण करावे लागेल व जोपर्यंत हे भांडण चालू राहील तोपर्यंत तुमच्यांत आणि त्यांच्यात बखेडा माजेल व तुम्ही एकमेकांचे वैरी होऊन राहाल. धर्मांतर केले तर भांडणाचे सर्व मूळच नाहीसे होईल. तुम्हांला त्यांच्या देवळांवर हक्क सांगण्याचा काही अधिकार राहणार नाही व जरूरीही राहणार नाही. सहभोजन करा, सहविवाह करा वगैरे सामाजिक हक्काकरिता भांडण्याचे काही कारण उरणार नाही; आणि हे भांडण जर मिटेल तर उभयतामध्ये प्रेम वाढून सलोखा उत्पन्न होईल. आज मुसलमान व ख्रिस्ती समाजाची आणि हिंदू समाजाची परस्पर स्थिती काय आहे,हे पाहा. तुमच्याप्रमाणे हिंदू लोक मुसलमानांना अगर ख्रिस्ती लोकांना आपल्या देवळांत घेत नाहीत, त्यांच्यात आणि हिंदूंत जो आज सलोखा आहे तो तुमच्यांत, आणि हिंदूंत नाही. हा जो फरक आहे त्याचे मुख्य कारण हेच की तुम्ही हिंदु धर्मात राहिल्यामुळे हिंदु समाजाशी सामाजिक धार्मिक हक्काकरिता तुम्हांला भांडावे लागते. परंतु ते हिंदु धर्मातून बाहेर गेल्यामुळे यांना हिंदू लोकांशी धार्मिक व सामाजिक हक्काकरिता लढा चालविण्याचे कारण पडत नाही. दुसरे असे, की

हिंदू समाजात त्यांना कोणत्याही प्रकारचे सामाजिक हक्क नसले, म्हणजे त्यांच्याशी रोटी व्यवहार होत नसला व बेटी व्यवहार होत नसला तरी, हिंदू समाज त्यांना असमानतेने वागवीत नाही. धर्मांतराने जर समता प्राप्त होऊ शकते, धर्मांतराने.जर हिंदू आणि अस्पृश्य यांच्यामध्ये सलोखा उत्पन्न होऊ शकतो, तर तो समतेचा साधा आणि सुखकर मार्ग अस्पृश्य लोकांनी का स्वीकारू नये ? अशा रीतीने पाहिले असताना हा धर्मांतराचा मार्ग खऱ्या स्वातंत्र्याप्रत नेणारा आहे व त्या पासून खरी समता प्राप्त होणार आहे. धर्मांतराचा मार्ग हा पळपुटे-पणाचा मार्ग नाही, तो भेकडपणाचा मार्ग नाही, तो एक शहाणपणाचा मार्ग आहे.

धर्मांतराच्या आड आणखी एक बाब उपस्थित करण्यात येते. जातिभेदाला त्रासून धर्मांतर करण्यात काही अर्थ नाही, असा युक्तिवाद काही हिंदू लोक कर-तात. ' कोठेही गेलात तरी तेथे जातिभेद आहेतच. मुसलमानात गेलात, तरी त्यांच्यात जातिभेद आहेतच. ख्रिस्त्यांत गेलात, तरी त्यांच्यातहि जातिभेद आहे ' असे हिंदू लोक सांगतात. दुर्दैवाने ही गोष्ट कबूल करणे भाग आहे की, भारतातील अन्यधर्मीय समाजामध्येसुद्धा जातिभेदाचा शिरकाव झाला आहे. पण या पापाचे धनी हिंदू लोकच आहेत. मूळात हा रोग त्यांच्यातून उद्‌भवलेला आहे. त्याचा संसर्ग मग इतर लोकांना झाला आहे. ही त्यांच्या दृष्टीने नाइलाजाची गोष्ट आहे. ख्रिस्ती व मुसलमान यांच्यामध्ये जरी जातिभेद असला तरी तो जातिभेद हिंदूंतील जातिभेदासारखा आहे, असे म्हणणे कोतेपणाचे लक्षण आहे, असे म्हणावे लागेल. हिंदूंतील जातिभेद व मुसलमान आणि ख्रिस्ती यांच्या'तील जातिभेद या दोहोमध्ये मोठे अंतर आहे. पहिल्या प्रथम ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, मुसलमान व ख्रिस्ती यांच्यामध्ये जरी जातिभेद असला तरी तो जातिभेद समाजाचे प्रमुख अंग आहे असे कोणालाही म्हणता येणार नाही. ' तू कोण ? ' याला ' मी मुसल-मान आहे,' मी ख्रिस्ती आहे,' एवढे उत्तर दिले असताना त्या उत्तरावरून सर्वांचे समाधान होते. 'तुझी जात काय ?' असे विचारण्याची कोणासही आवश्यकता भासत नाही. परंतु कोणाहि हिंदूला ' तू कोण ? ' असा प्रश्न विचारला असताना मी हिंदू असे उत्तर त्याने दिले तर तेवढ्याने कोणाचेही समाधान होऊ शकत नाही. ' तुझी जात काय ?' असा प्रश्न विचारण्यात येतो व त्याचे उत्तर दिल्या-शिवाय कोणालाही त्याच्या स्थितीचा उमज पडत नाही. यावरून हिंदू समाजात जातीला कसे प्राधान्य देण्यात आले आहे व मुसलमान आणि ख्रिस्ती समाजांत कसे गौणपद प्राप्त झाले आहे हा मुद्दा आपोआपच सिद्ध होऊ शकतो.

या शिवाय हिंदूतील व इतरांमधील जातिभेद यांमध्ये आणखीही एक महत्त्वाचा फरक आहे. हिंदूतील जातिभेदाच्या मुळाशी हिंदूंचा धर्म आहे. मुसलमान व ख्रिस्ती यांच्यांतील जातिभेदाच्या मुळाशी त्यांच्या धर्माचे अधिष्ठान नाही. हिंदूंनी ' जातिभेद सोडू, ' असे म्हटले असता त्यांचा धर्म त्यांच्या आड येईल. परंतु ख्रिस्ती आणि मुसलमान लोकांनी आपल्यातील जातिभेद मोडण्याचा उपक्रम आरंभिला तर त्यांचा धर्म त्यांच्याविरुद्ध येऊ शकणार नाही. हिंदूंना धर्मनाश केल्याशिवाय जातिविध्वंसन करता येणार नाही. मुसलमान व ख्रिस्ती लोकांना जातिनाशन करण्याकरिता धर्मनाशन करण्याचेकाही कारण नाही. जातिनाशनाच्या कामात त्यांचा धर्म त्यांच्या आड येणार नाही. इतकेच नव्हे तर त्यांच्या धर्माचा अशा कार्याला फार मोठा पाठिंबा मिळू शकेल. जातिभेद सर्वत्रच आहे असे जरी कबूल केले ' तरी हिंदू धर्मातच राहा ' असा निष्कर्ष त्यापासून निघू शकत नाही. जातिभेद ही गोष्ट जर अनिष्ट असेल तर ज्या समाजात गेले असता जातिभेदाची तीव्रता विशेष नाही, किंवा ज्या समाजात गेले असताना जातिभेद लवकर, सहज व सुलभपणे मोडता येईल, त्या समाजात जा. हाच खरा तर्कशुद्ध सिद्धांत आहे असे मानावे लागेल.

" नुसत्या धर्मांतराने काय होणार ? तुम्ही आपली आर्थिक स्थिती व शैक्षणिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करा " असे काही हिंदू लोक सांगत आहेत. या प्रश्नांनी आपल्यापैकी काही लोक संभ्रमून जाण्याचा संभव आहे. आणि म्हणून त्या प्रश्नाचा विचार करणे मला आवश्यक वाटते. प्रथमतः प्रश्न असा की, तुमची आर्थिक व शैक्षणिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न कोण करणार आहे ? तुम्ही किंवा तुम्हांला जे असा उपदेश करतात ते ? ते बोंबलण्यापलीकडे तुमच्याकरता काही करतील असे मला वाटत नाही व करण्याची त्यांची तयारीही मला दिसत नाही. उलट जो तो हिंदू आपापल्या जातीपुरती दृष्टी ठेवून आपापल्या जातीची अर्थिक स्थिती सुधारण्याकरिता झटत आहे. ब्राह्मण लोक ब्राह्मण बायकाकरिता सूतिकागृहे, ब्राह्मण मुलांकरिता स्कॉलरशिप, ब्राह्मण बेकारांना नोकऱ्या मिळवून देण्याची सोय यांमध्ये गुंतले आहेत. सारस्वत तसेच करीत आहेत. जो तो आपापल्याकरिता व ज्याला कोणी नाही त्याचा परमेश्वर अशी स्थिती आहे. तुमची उन्नती तुम्हीच करावयाची, दुसरा कोणी तुम्हांला मदत करणार नाही. अशी जर खरी स्थिती आहे तर या लोकांच्या म्हणण्याकडे लक्ष देण्यात काय हशील आहे ? नुसती दिशाभूल करून कालक्षेप करण्यापलीकडे यांचा दुसरा काही हेतू दिसत नाही. तुमची स्थिती तुम्ही सुधारावयाची, असेच जर या हिंदू लोकांचे म्हणणे असले तर त्यांच्या तर्कटाकडे लक्ष देण्याचे कोणाला काही कारण नाही, व त्यांना उपदेश

करण्याचा कोणाला काही अधिकारही नाही. तथापि एवढेच सांगून हा प्रश्न सोडून देण्याचा माझा विचार नाही. त्याचे खंडन करणे मला अवश्य आहे.

## नुसत्या धर्मांतराने काय होणार ?

असे जे हिंदु लोक विचारतात त्यांच्या विचारशून्यतेचे मला मोठे आश्चर्य वाटते. भारतातील शीख, मुसलमान व ख्रिस्ती हे पूर्वाश्रमीचे हिंदूच होते व तेही बरेचसे शूद्र व अस्पृश्य होते. ज्या हिंदू लोकांनी धर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्वीकारला, त्यांचा कांहीच अभ्युदय झाला नाही असे या टीकाकारांना म्हणावयाचे आहे काय ? व हे म्हणणे जर सत्य नसेल, तर धर्मांतराने त्यांचा उत्कर्ष झाला आहे, हे जर कबूल करणे प्राप्त असेल, तर मग धर्मांतराने अस्पृश्यांचे काहीच कल्याण होणार नाही, असे म्हणणे किती यथार्थ होईल, याचा त्यानी अवश्य विचार करावा. धर्मांतराने काही होणार नाही, या म्हणण्याचा गर्भित अर्थ, धर्म ही अगदी कुचकामाची वस्तू आहे, असाच निघू शकतो. धर्म ही कुचकामाची वस्तू आहे, तिच्यापासून काही लाभ नाही, हानी नाही, असे ज्यांचे म्हणणे आहे त्यांनी अस्पृश्यांनी हिंदू धर्मातच राहिले पाहिजे, असा आग्रह का धरावा, हे मला समजत नाही. त्यांना धर्मात काही अर्थ नाही असे वाटते, तर कोणता धर्म सोडला आणि कोणता घेतला याबद्दल अशा लोकांनी वितंडवाद का करावा ? नुसत्या धर्मांतराने काय होणार असे जे हिंदू लोक विचारतात, त्यांना, नुसत्या स्वराज्यापासून काय होणार असे हिंदुस्थानातील लोकांनादेखील विचारता येईल. प्रथम आर्थिक व शैक्षणिक प्रगती होणे आवश्यक आहे हे जर खरे आहे तर नुसत्या स्वराज्याचा काय उपयोग ? आणि नुसत्या स्वराज्यापासून जर देशाचा काही फायदा होत असेल तर धर्मांतरापासूनही अस्पृश्यांचा फायदा झालाच पाहिजे. खोल विचारान्ती सर्वांस मान्य करावे लागेल की, जितकी स्वराज्याची आवश्यकता भारताला आहे तितकीच धर्मांतराची आवश्यकता अस्पृश्यांना आहे. धर्मांतर व स्वराज्य या दोहोंचा अंतिम हेतू एकच आहे. त्यांच्या अंतिम हेतूत कोणत्याही प्रकारचा भेद नाही. तो अंतिम हेतू म्हणजे स्वातंत्र्याची प्राप्ती. आणि स्वातंत्र्य हे जर मनुष्यमात्राच्या जीवनाला आवश्यक अशी वस्तू आहे तर ज्या धर्मान्तरापासून अस्पृश्यांना स्वतंत्र जीवन प्राप्त होऊ शकते ते धर्मांतर निरर्थक आहे, असे कोणालाही म्हणता येणार नाही.

## आधी उन्नती की आधी मांतर ?

या ठिकाणी आधी आर्थिक उन्नती की आधी धर्मांतर या प्रश्नाचाहि विचार

करणे मला आवश्यक वाटते. आर्थिक उन्नती आधी झाली पाहिजे असे म्हणणाऱ्या लोकांचे मत मला ग्राह्य होऊ शकत नाही. आधी धर्मांतर मग आर्थिक उन्नती किंवा आधी आर्थिक उन्नती मग धर्मांतर हा वाद आधी राजकीय उन्नती की आधी सामाजिक उन्नती या वादासारखा शुष्क आहे. समाजाच्या उन्नतीला अनेक साधनांची आवश्यकता असते व ती सर्वच साधने आपापल्या परीने आवश्यक असतात. त्यांत अमुक एकाचा उपयोग प्रथम करावयाचा व दुसऱ्याचा उपयोग नंतर करावयाचा असा अनुक्रम नेहमीच ठेवता येणार नाही. परंतु तसा अनुक्रम ठेवणे असाच जर आग्रह असेल, तर आधी धर्मांतर की आधी आर्थिक उन्नती या प्रश्नांचे उत्तर आधी धर्मांतर असेच मी म्हणेन. जोपर्यंत अस्पृश्यतेचा कलंक तुमच्यावर बसला आहे तोपर्यंत तुमची आर्थिक उन्नती कशी होऊ शकणार हे मला समजत नाही. दुकानदारी करण्याच्या हेतूने तुम्हांपैकी कोणी जर एखादे दुकान घातले व दुकानदार अस्पृश्य आहे असे कळले तर त्याच्यापासून कोणीही माल घेणार नाही. नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने जर तुम्हांपैकी कोणी एकाने नोकरीकरिता अर्ज केला व अर्जदार अस्पृश्य आहे असे समजले तर त्याला नोकरी मिळणार नाही. कोणाची शेती विकावयाची झाली व तुम्हांपैकी कोणी ती खरेदी करण्याचा विचार केला व मागणी करणारा अस्पृश्य आहे म्हणून समजले तर तुम्हांला ती जमीन कोणी विकणार नाही. आर्थिक उन्नतीचा कोणताही मार्ग तुम्ही स्वीकारला तरी अस्पृश्यतेमुळे कोणत्याही मार्गात तुम्हांला यशप्राप्ती होणार नाही. अस्पृश्यता ही एक तुमच्या उन्नतीच्या मार्गात कायमची धोंड आहे. ती दूर केल्याशिवाय तुमचा मार्ग सुकर होऊ शकत नाही व धर्मांतर केल्याशिवाय ही धोंड बाजूला व्हायची नाही. तुमच्यांतील कांही तरुण लोक आज शिक्षणाच्या मागे लागले आहेत आणि या शिक्षणाकरिता जिकडून पैसा मिळेल तिकडून पैसा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. या पैशाच्या लालचीमुळे कित्येकांच्या मनात आहोत तेथेच अस्पृश्यच राहून उन्नती करून घेण्याकडे प्रवृत्ती दिसून येते. परंतु तरुणांना मी असा एक प्रश्न विचारू इच्छितो की, शिक्षण घेतल्यानंतर तुम्हांला तुमच्या शिक्षणानुरूप नोकरी मिळण्याचा मार्ग जर खुला नाही तर तुम्ही शिक्षण घेऊन काय करणार आहात ? आपल्यांतील शिकलेल्यांपैकी पुष्कळसे लोक आज बेकार आहेत, त्याचे कारण काय ? माझ्या मते या बेकारीचे कारण पुष्कळ अंशांनी अस्पृश्यता हेच आहे. अस्पृश्यतेमुळेच तुमच्या गुणांची चहा होऊ शकत नाही. अस्पृश्यतेमुळेच तुमच्या लायकीचे चीज होऊ शकत नाही. अस्पृश्यतेमुळेच तुम्हांला पोलिसांत घेत नाहीत. अस्पृश्यतेमुळे तुम्ही पट्टेवाल्याचीही जागा मिळवू शकत नाही. अस्पृश्यतेमुळेच तुम्ही कोणी वरच्या जागेला चढू शकत नाही. अस्पृश्यता हा एक प्रकारचा शाप आहे. त्यापासून तुम्ही दग्ध झाला आहात

व तुमच्या गुणांची राखरांगोळी झाली आहे. अशा स्थितीत तुम्ही गुणसंपादन ते काय करणार व केले तरी त्याचा काय उपयोग होणार? तुमच्या गुणांचे काही चीज व्हावे, तुमच्या शिक्षणाचा काही उपयोग व्हावा, तुमच्या आर्थिक उन्नतीची द्वारे खुली व्हावीत, अशी जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही आधी अस्पृश्यता घालविली पाहिजे; म्हणजेच धर्मांतर केले पाहिजे.

## धर्मांतराविरुद्ध काही शंका

येथवर धर्मांतरविरोधकांनी जी कारणे पुढे केलेली आहेत, त्या कारणांचा विचार केला आहे. आता धर्मांतराविषयी सहानुभूती असणाऱ्या काही लोकांनी ज्या शंका प्रदर्शित केलेल्या आहेत, त्या शंकाचे निरसन करण्याचा प्रयत्न मी करीत आहे. पहिल्या प्रथम आमच्या महारकी वतनाचे काय होईल? असा बऱ्याचशा महार लोकांना बाऊ वाटत आहे, असे माझ्या कानी आले आहे. वरिष्ठ जातीतील धर्मांतराविरोधी लोकांनी तुम्ही धर्मांतर केले तर तुमच्या महारक्या जातील, अशी भीती गावोगाव महार लोकांना घातल्याचेही माझ्या कानी आले आहे. महारकी गेली तर मला स्वतःला कोणत्याही प्रकारचा खेद वाटणार नाही. ही गोष्ट तुम्हा सर्वांना माहीत आहे. महारांना अधोगतीस नेणारी जर कोणती एखादी बाब असेल तर ती महारकी होय, हे माझे मत गेल्या दहा वर्षांपासून लोकांपुढे मी मांडीत आलो आहे. आणि ज्या दिवशी या महारकीच्या बेडीतून तुमची सुटका होईल त्या दिवशी तुमच्या उद्धाराचा मार्ग मोकळा झाला असे मी समजेन. परंतु ज्या कोणाला महारकी हवी असेल, त्या लोकांना मी एवढे आश्वासन देऊ शकतो की, धर्मांतरामुळे महारकी वतनाला कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचू शकत नाही. या बाबतीत सन १८५० सालच्या कायद्याचा उल्लेख करणे अवश्यक आहे. त्या कायद्याच्या कलमाप्रमाणे कोणाही माणसाच्या केवळ त्याने धर्मांतर केले, एवढ्याच कारणामुळे वारसाच्या अगर मालमत्तेच्या कोणत्याही अधिकारास बाध येऊ शकत नाही. ज्यांना कायद्याचा आधार पुरेसा वाटत नसेल त्यांनी नगर जिल्ह्यातील परिस्थिती विचारात घ्यावी. नगर जिल्ह्यातील पुष्कळ महार खिस्ती झाले आहेत व काही ठिकाणी तर एकाच घरात काही माणसे खिस्ती झाली आहेत व काही महारच राहिली आहेत. तथापि जे खिस्ती झाले आहेत त्यांचा वतनावरचा हक्क नाहीसा झाला नाही. याचा दाखला नगरचे महार तुम्हां सर्वांना देऊ शकतील. तेव्हा धर्मांतरापासून महारकी वतनाला धोका येणार

आहे. अशी भीती कोणीही बाळगू नये.

दुसरी शंका राजकीय हक्कांसंबंधी आहे. धर्मांतर केले तर आमच्या राजकीय हक्कांचे काय होईल, अशीही शंका पुष्कळ लोकांकडून प्रदर्शित करण्यात येते. अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या राजकीय हक्कांचे महत्त्व मी ओळखीत नाही, असे कोणालाही म्हणता येणार नाही. हे राजकीय हक्क मिळविण्याकरिता जेवढी दगदग व जेवढी पराकाष्ठा मी केली, तेवढी दगदग व तेवढी पराकाष्ठा इतर कोणीही केलेली नाही. तथापि राजकीय हक्कांवरच सर्वस्वी भर देणे योग्य होणार नाही, असे मला वाटते. जे राजकीय हक्क दिलेले आहेत ते काही यावच्चंद्रदिवाकरौ अशा अटीवर दिलेले नाहीत. ते कधी ना कधी संपुष्टात येतील. इंग्रज सरकारने जो निवाडा दिला होता त्या निवाड्यात आपल्याला दिलेल्या राजकीय हक्कांची कालमर्यादा वीस वर्षांची ठरविलेली होती. पुणे करारात तशा प्रकारची कालमर्यादा निश्चित केलेली नसली तरी त्यांतील मुदत अमर्याद आहे, असे कोणालाही म्हणता येणार नाही. ज्यांचा राजकीय हक्कांवर भर आहे, त्यांनी हे राजकीय हक्क गेल्यावर मग काय होईल, याचा विचार अवश्य करावा. ज्या दिवशी हे राजकीय हक्क जातील, त्या दिवशी आपल्याला आपल्या सामाजिक सामर्थ्यावरच अवलंबून राहावे लागेल. ते सामर्थ्य आपल्या अंगी नाही हे मी वर सांगितलेच आहे. ते सामर्थ्य आपल्याला धर्मांतर केल्याशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही, हेही मी वर सिध्द करून दिले आहे, कोणत्याही माणसाने जवळचा विचार करून भागणार नाही. तात्पुरत्या लाभाला भाळून जाऊन शाश्वत हित कोणत्या गोष्टीत आहे, याचा विचार न करणे हे अंती दुःखदायक होणार आहे. अशा परिस्थितीत कायमचा लाभ कोणत्या गोष्टीत साठविलेला आहे, याचा विचार सर्वांनी अवश्य करावयास पाहिजे. माझ्या मते शाश्वत हिताच्या दृष्टीने पाहिले असता धर्मांतराचा उपाय हाच खरा उपाय आहे. त्याकरिता राजकीय हक्कांची जरी आहुती देण्याचा प्रसंग आला, तरी त्याला कोणीही भीक घालू नये. धर्मांतराने राजकीय हक्कांस धोका नाही. परंतु धर्मांतर केले असता आपल्या राजकीय हक्कांना का धोका बसावा, हेच मला समजत नाही. तुमचे जे राजकीय हक्क आहेत, ते तुम्ही कोठेही गेला असता तुमच्याबरोबर येतील, या विषयी मला कोणत्याही प्रकारची शंका वाटत नाही. तुम्ही मुसलमान झालात तर तुमचे हक्क मुसलमान म्हणून तुम्हाला मिळतील. तुम्ही ख्रिस्ती झालात तर तुमचे हक्क ख्रिस्ती म्हणून तुम्हांला मिळतील. तुम्ही शीख झालात तर तुमचे हक्क शीख म्हणून तुम्हांला मिळतील. राजकीय हक्क हे लोकसंख्येवर अवलंबून आहेत. ज्या समाजाची लोकसंख्या वाढेल त्या समाजाचे राजकीय

हक्कही वाढतील. आम्ही हिंदुसमाजातून निघून गेलो तर आमच्या पंधरा जागा, राहिलेल्या हिंदूंच्या वाटयास जातील असा कोणीही आपला भ्रम करून घेऊ नये. आम्ही मुसलमान झालो तर आमच्या पंधरा जागा मुसलमान लोकांना हल्ली ज्या जागा प्राप्त झाल्या आहेत त्यांच्यात भरीला पडतील. आम्ही ख्रिस्ती झालो तर आमच्या जागा ख्रिस्ती समाजाला ज्या जागा मिळाल्या आहेत त्याच्या भरीला जातील. एकूण आमचे राजकीय हक्क आम्ही जिकडे जाऊ तिकडे जातील. तेव्हा या बाबतीत भिण्याचे असे काहीच कारण नाही. उलटपक्षी आपण जर धर्मांतर केले नाही व हिंदू धर्मातच राहिलो तर आपले हक्क राहतील काय, याचा विचार तुम्ही अवश्य केला पाहिजे. समजा, हिंदू लोकांनी अस्पृश्यता मानू नये व मानल्यास तो गुन्हा आहे, असा एक कायदा पास केला व तसा कायदा पास केल्यानंतर तुम्हांला असा प्रश्न विचारला की, तुमची अस्पृश्यता कायद्याने काढून टाकली आहे. आता तुम्ही अस्पृश्य राहिला नाहीत, फार तर तुम्ही गरीब व दरिद्री आहात. तुमच्याप्रमाणे इतर जातीही दरिद्री आहेत; परंतु अशा दरिद्री जातींना आम्ही स्वतंत्र राजकीय हक्क दिलेले नाहीत, मग तुम्हांला का द्यावेत ? या प्रश्नाला तुम्ही काय उत्तर द्याल, याचा तुम्ही पूर्णपणे विचार करावयास पाहिजे. मुसलमान लोकांना, ख्रिस्ती लोकांना यांचे उत्तर सहज देण्यासारखे आहे आमचा समाज दरिद्री आहे, अज्ञानी आहे, मागासलेला आहे, म्हणून आम्हांस स्वतत्र राजकीय हक्क देण्यात आले आहेत असे नसून आमचा धर्म निराळा आहे, आमचा समाज निराळा आहे आणि जोपर्यंत आमचा धर्म निराळा आहे तोपर्यंत राजकीय हक्कांचा वाटा आम्हांस मिळाला पाहिजे, असे समर्पक उत्तर ते देऊ शकतील. तुमचा समाज निराळा, तुमचा धर्म निराळा म्हणून तुम्हांला राजकीय हक्क मिळाले पाहिजेत अशा प्रकारची भूमिका जोपर्यंत तुम्ही हिंदू धर्मात आहात व हिंदुसमाजात आहात, तोपर्यंत तुम्हांला घेता येणार नाही. ज्या दिवशी तुम्ही धर्मांतर करून हिंदू समाजापासून स्वतंत्र व्हाल त्या दिवशी ही भूमिका तुम्हाला घेता येईल, तोपर्यंत ती घेता येणार नाही. आणि जोपर्यंत अशा स्वतंत्र भूमिकेवर उभे राहून तुमच्या राजकीय हक्कांची मागणी तुम्ही करू शकत नाही, तोपर्यंत तुमचे राजकीय हक्क शाश्वत आहेत, त्यांस धोका नाही, असे समजून चालणे अत्यंत अज्ञानीपणाचे लक्षण आहे, असे मला वाटते. या दृष्टीने पाहिले असताना धर्मांतर हे राजकीय हक्कांना विरोधक नसून राजकीय हक्कांचे संवर्धन करण्याचा तो एक मार्ग आहे, असेच म्हटले पाहिजे. तुम्ही हिंदू धर्मात राहिलात तर तुमचे राजकीय हक्क जातील, तुम्हांला राजकीय हक्क बुडू द्यावयाचे नसतील, तर धर्मांतर करा. धर्मांतरानेच ते कायम राहणार आहेत.

## समारोप

मी माझा निश्चय करून टाकलेला आहे. मी धर्मांतर करणार, हे निश्चित आहे. माझे धर्मांतर कोणत्याही प्रकारच्या ऐहिक लाभाकरिता नाही. अशी कोणतीही गोष्ट नाही की अस्पृश्य राहून मला ती प्राप्त करून घेता येणार नाही. माझ्या धर्मांतराच्या मुळाशी आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कसलीही भावना नाही. हिंदू धर्म माझ्या बुद्धीला पटू शकत नाही. हिंदू धर्म माझ्या स्वाभिमानाला रुचू शकत नाही. तुम्हांला मात्र आध्यात्मिक तसेच ऐहिक लाभाकरिता देखील धर्मांतर करणे आवश्यक आहे. काही लोक ऐहिक लाभाकरिता धर्मांतर करण्याच्या कल्पनेस हसतात व तिचा उपहास करतात. अशा लोकांना मूर्ख म्हणण्यात कोणत्याही प्रकारचा संकोच मला वाटत नाही. मेल्यावरती आत्म्याचे काय होईल, हे सांगणारा धर्म श्रीमंतांच्या उपयोगाचा असेल. फावल्यावेळी अशा धर्माचा विचार करून मनोरंजन त्यांना करता येईल. जिवंतपणी ज्यांनी सौख्य भोगले त्यांना, आपण मेल्यानंतर आपणांस सुख कसे मिळेल याचा विचार ज्यांत प्रामुख्याने केला असेल तोच धर्म, असे वाटणे अगदी साहजिकच आहे. पण ज्यांची अमुक एका धर्मात राखरांगोळी झाली आहे, जे अन्नवस्त्राला मोताद झाले आहेत, ज्यांची माणुसकी नाहीशी झाली आहे, त्या लोकांनी धर्माचा ऐहिकदृष्ट्या विचार करू नये तर काय डोळे मिटून आकाशाकडे पहात राहावे ? या गर्भश्रीमंत रिकामटेकड्यांच्या वेदान्ताचा गोरगरीबाला काय उपयोग ?

## धर्म माणसाकरता आहे.

मी तर तुम्हाला असे स्पष्ट सांगू इच्छितो की माणूस धर्माकरिता नाही, धर्म माणसाकरिता आहे. माणुसकी प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. संघटना करावयाची असेल तर धर्मांतर करा. समता प्राप्त करून घ्यावयाची असेल तर धर्मांतर करा. स्वातंत्र्य प्राप्त करून घ्यायचे असेल तर धर्मांतर करा. संसार सुखाचा करावयाचा असेल तर धर्मांतर करा. जो धर्म तुमच्या माणुसकीला काही किंमत देत नाही, त्या धर्मांत तुम्ही का राहता ? जो धर्म तुम्हांला देवळांत जाऊ देत नाही, त्या धर्मांत तुम्ही का राहता ? जो धर्म तुम्हांला पाणी मिळू देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता ? जो धर्म तुम्हांला शिक्षण घेऊ देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता ? जो धर्म तुमच्या नोकरीच्या आड येतो, त्या धर्मात

तुम्ही का राहता ? जो धर्म तुमची पदोपदी मानहानी करतो, त्या धर्मात तुम्ही का राहता ? ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे, तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. ज्या धर्मात माणसाची माणुसकी ओळखणे अधर्म मानला जातो तो धर्म नसून रोग आहे ! ज्या धर्मात अमंगल पशूंचा स्पर्श झाला असताना चालतो, पण माणसांचा स्पर्श चालत नाही, तो धर्म नसून वेडगळ-पणा आहे. जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये, असे सांगतो, तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे. जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित राहा, निर्धनांना निर्धन राहा अशी शिकवण देतो, तो धर्म नसून ती शिक्षा आहे ! !

धर्मांतराच्या बाबतीत जे जे काही प्रश्न उद्‌भवतात त्या त्या प्रश्नांचा मी यथामति ऊहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रश्नावरील माझे विवेचन कदाचित पाल्हाळिक झाले असेल; परंतु या विषयाचा सांगोपांग विचार करण्याचे मी पूर्वीपासून ठरविले होते. धर्मांतराच्या बाबतीत विरोधकांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यांना उत्तर देणे आवश्यक होते. धर्मांतराच्या घोषणेची सार्थकता पटल्याशिवाय कोणी ही धर्मांतर करू नये, असे माझे मत आहे अणि त्यामुळे कोणाचीही वृत्ती साशंक राहू नये व कोणाच्याही मनात किंतू राहू नये, एवढ्या-करिता इतक्या सविस्तरपणे या प्रश्नाचा विचार मला करावा लागला आहे. माझे विचार तुम्हांला कितपत पटतील हे मी सांगू शकत नाही. परंतु तुम्ही ते पूर्णपणे ध्यानात घ्याल अशी मला आशा आहे. रुचेल ते बोलावे अशा रीतीने लोकप्रियता मिळविणे हे व्यावहारिक माणसाला शोभते, पण पुढाऱ्याला शोभणार नाही, असे माझे मत आहे. लोकांचे बरे कशात आहे व वाईट कशात आहे हे जो निर्भयपणे व निर्भिडपणे लोकापवादाची पर्वा न करता लोकांपुढे मांडतो त्यालाच मी पुढारी समजतो. तुमचे हित कशात आहे हे सांगणे माझे कर्तव्यकर्म आहे. ते तुम्हांला रुचले नाही तरी ते सांगणे मला भाग आहे. माझे कर्तव्यकर्म मी केले आहे. आता या प्रश्नाचा निर्णय करणे हे कर्तव्यकर्म तुमचे आहे. धर्मांतराच्या प्रश्नाचे मी मुद्दाम दोन विभाग केले आहेत. हिंदू धर्माचा त्याग करावयाचा किंवा हिंदू धर्मातच राहावयाचे हा त्याचा एक भाग आहे. त्याग करावयाचा झाल्यास कोणत्या धर्माचा स्वीकार करावयाचा किंवा नवीन धर्माची उभारणी करावयाची हा त्याच प्रश्नाचा दुसरा विभाग आहे. मला फक्त आज पहिल्या प्रश्नावर तुमचा निर्णय काय आहे ते जाणून घ्यावयाचे आहे. पहिल्या प्रश्नाचा निर्णय झाल्याशिवाय दुसऱ्या प्रश्नाचा विचार करण्यात अगर त्या बाबतीत तयारी करण्यात काही अर्थ

नाही. तेव्हा पहिल्या प्रश्नावर तुम्हांला जे काही करावयाचे आहे ते ठरवा. तुम्हांला ते ठरविण्याकरिता दुसरी संधी मला देता येणार नाही. आज या सभेत जे तुम्ही ठरवाल त्याप्रमाणे माझा पुढचा कार्यक्रम मी ठरवीन. तुम्ही जर धर्मांतराच्या विरुद्ध निर्णय केला तर प्रश्न मिटला. माझ्या स्वत:करिता जे मला करावयाचे असेल ते मग मी करीन. तुम्ही धर्मांतराच्या तर्फेचा निर्णय जर केलात तर त्याचबरोबर तुम्ही सर्वांनी संघटित रूपाने धर्मांतर करण्याचे आश्वासन दिले पाहिजे. धर्मांतराचा निश्चय झाला तर वाटेल त्याने वाटेल त्या धर्मात जावे अशा प्रकारची फाटाफूट तुम्ही जर करणार असाल तर मी तुमच्या धर्मांतराच्या कार्यात पडणार नाही. तुम्ही माझ्याबरोबर यावे अशी माझी इच्छा आहे. ज्या धर्मात आपण जाऊ त्या धर्मात आपल्या उन्नतीप्रित्यर्थ जे काही कष्ट, परिश्रम करावे लागतील, ते परिश्रम करण्यास माझी तयारी आहे. परंतु मी सांगतो म्हणून धर्मांतर केले पाहिजे या भावनेला वश होऊन काही करू नका. तुमच्या बुद्धीला जर पटेल तरच होकार द्या. माझ्याबरोबर न येण्याचा निश्चय तुम्ही केलात, तरी त्याबद्दलही मला काही दु:ख होणार नाही. उलट माझ्यावरची जबाबदारी गेली म्हणून मला आनंद वाटेल. हा निर्वाणीचा प्रसंग आहे हे तुम्ही ध्यानात ठेवालच. तुमच्या भावी पिढीची भवितव्यता तुम्ही ठरवाल त्याप्रमाणे ठरणार आहे. तुम्ही आज स्वतंत्र होण्याचा निश्चय जर केला, तर भावी पिढी स्वतंत्र होईल; तुम्ही आज पराधीन राहण्याचा निश्चय केला तर भावी पिढी सुद्धा पराधीन राहील. म्हणून तुमची जबाबदारी अत्यंत कठीण आहे.

## स्वयंप्रकाशित व्हा.

या प्रसंगी तुम्हांला काय सांगावे, याचा विचार करीत असताना भगवान बुद्धाने आपल्या भिक्षुसंघास मरणापूर्वी जो उपदेश केला व ज्याचा महापरिनिब्बान-सुत्तात उल्लेख केलेला आहे, त्याची मला आठवण होते. एकदा भगवान बुद्ध नुकतेच दुखण्यातून उठल्यामुळे विहाराच्या छायेत पसरलेल्या आसनावर बसले असताना त्यांचा शिष्य आयुष्यमान भगवंताकडे येऊन त्यास अभिवादन करून, एके बाजूस बसला आणि म्हणाला "भगवंतास मी सुखात असताना पाहिले आहे व आजारी असताना पाहिले आहे. भगवंताच्या आजाराने माझे शरीर शिशासारखे जड झाले आहे, मला धर्मही सुचत नाही. परंतु त्यातल्या त्यात मला एवढे समा–धान वाटते की, भिक्षुसंघाविषयी काही तरी सांगितल्याशिवाय भगवंताचे

परिनिर्वाण व्हावयाचे नाही. " भगवान बुद्ध यांनी उत्तर दिले की, आनंदा ! भिक्षुसंघास माझ्यापासून काय हवे आहे ? आनंदा ! आत बाहेर काही न ठेवता धर्मोपदेश केला आहे, त्यात तथागताने आचार्यमुष्टी मुळीच ठेवली नाही. तर मग आनंदा, तथागत भिक्षुसंघाविषयी काय सांगणार ? तेव्हा आनंदा, तुम्ही दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा ! परप्रकाशित राहू नका ! स्वतः-वरच विश्वास ठेवा, दुसऱ्या कोणाच्या अंकित होऊ नका ! सत्याला धरून रहा, सत्याचाच आश्रय करा ! व दुसऱ्या कोणाला शरण जाऊ नका ! " मी देखील बुद्धाच्या शब्दांचाच आश्रय करून तुम्हाला असा निरोप देतो की, तुम्हीच आपले आधार व्हा ! स्वतःच्या बुद्धीला शरण जा ! दुसऱ्या कोणाचाही उपदेश ऐकू नका ! दुसऱ्या कोणालाही वश होऊ नका ! " सत्याचा आधार घ्या ! सत्यास शरण जा ! दुसऱ्या कशासही शरण जाऊ नका !" हा भगवान बुद्धाचा उपदेश तुम्ही या प्रसंगी ध्यानात ठेवाल तर माझी खात्री आहे की, तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही.

## प्रकरण ९ वे

# धर्मांतराची चळवळ

### विचार विनिमय

परधर्म स्वीकारण्याच्या मसलती चालू असता धर्मांतराच्या नावाखाली डॉ. आंबेडकर आपल्या पुढारीपणाची जाहिरात करीत आहेत, राजकीय हक्कांचा बाजार करीत आहेत, वगैरे आरोप इतरांनीही केले होते. त्यांत स्पृश्य व अस्पृश्य पुढारी आणि वर्तमानपत्रे यांचा समावेश होता. सदर आरोपांतील काही नमुने 'जनतेच्या' २२ आणि २९ ऑगस्ट १९३६ च्या अंकांत प्रसिद्ध केले होते. ते मी खाली देत आहे.

**' अस्पृश्य समाज आणि धर्मांतर. शीख धर्म ! का ? कोणता ? डॉ. मुंजे यांची सूचना, कोण काय म्हणतो ?**
**प्रभात– ता. १०–८–३६**

## डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर

" मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही " अशी डॉ. आंबेडकरांनी प्रतिज्ञा केली असून आपल्याबरोबर आपल्या शक्य तितक्या बांधवांना हिंदुधर्म सोडावयास लावण्याचा त्यांचा निश्चय त्यांनी पूर्वीच जाहीर केलेला आहे. एक धर्म सोडून ते दुसरा कोणता धर्म स्वीकारणार ते मात्र त्यांनी अद्यापि सांगितलेले नाही. तथापि अस्पृश्यांनी धर्मांतर केल्यास नवीन घटनेखाली, पुणे–कराराप्रमाणे त्यांना मिळालेले विशेष हक्क कायम राहातील की नाही, हा वाद नुकताच निघाला असता अस्पृश्यांनी इस्लाम किंवा ख्रिस्ती

धर्माचा स्वीकार केल्यास हे हक्क राहणार नाहीत, पण केवळ नावाला हिंदू राहून पंजाबातील आदिधर्मीयांप्रमाणे त्यांनी एखादा निराळा पंथ काढला तर त्यांचे हक्क गमावणार नाहीत, असे डॉ. आंबेडकरांनी अर्थपूर्ण विधान केलेले होते. याचाच अर्थ डॉ. आंबेडकर धर्मांतर न करता फार तर पंथांतर करतील असा आम्ही अर्थ केलेला होता. हा अर्थ बरोबर होता. हे दाखविणारा पुरावा आता उपलब्ध झालेला आहे.

वरील वाद सुरू होण्यापूर्वी जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात डॉ. आंबेडकर आणि डॉ. मुंजे यांची मुंबईस मुलाखत झाली. या मुलाखतीपूर्वी डॉ. आंबेडकरांनी आपल्या मनात एक विशिष्ट विचारसरणी तयार करून ठेवली होती. आणि ती त्यांना डॉ. मुंजे यांचे समोर विशिष्ट हेतूने मांडावयाची होती, हे स्पष्ट दिसते. ही विचारसरणी अशी की, अस्पृश्यांनी हिंदुधर्माचा त्याग करून दुसरा धर्म स्वीकारलाच तर इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्मापेक्षा शीख धर्म अधिक चांगला. हा विचार करताना डॉ. आंबेडकरांनी **वैयक्तिक किंवा जातीय ऐहिक लाभापेक्षा राष्ट्रीय दृष्टी** पुढे ठेवली आहे, हे कबूल केले पाहिजे. मुसलमान किंवा ख्रिस्ती झाल्याने स्वतंत्र मतदार संघाचा जो फायदा मिळाला असता तो शीख झाल्यावर मिळणार नाही.

मुसलमान किंवा ख्रिस्ती झाल्याने जे फायदे होतील ते एका बाजूला ठेवून दुसऱ्या बाजूला डॉ. आंबेडकरांनी तोटे ठेवले. एक मुख्य तोटा हा की, अस्पृश्य, हिंदुसंस्कृतीला कायमचे मुकतील. इतकेच नव्हे तर राष्ट्रीयत्वालाही मुकतील. या नफ्यातोटयाचा विचार केल्यास अस्पृश्यांनी ' धर्मांतर ' केल्यास त्यांनी शीख होणेच हिंदुसमाजाला सापेक्षतः हितावह आहे, हे उघड आहे. हिंदुसमाजाला हा युक्तिवाद जर पटत असेल तर अस्पृश्यांनी शीख धर्माचा ( आमच्या मते शीख स्वतंत्र धर्म नसून हिंदुधर्मांतर्गत एक पंथ आहे ) स्वीकार केल्यास अस्पृश्य म्हणून आज त्यांना मिळणाऱ्या राजकीय सवलती जाणार नाहीत. अशी त्याने हमी द्यावयास पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे आहे. आणि त्याकरताच ही गोष्ट त्यांनी हिंदुसभेचे पुढारी डॉ. मुंजे यांचेसमोर मांडली.

या विशिष्ट प्रश्नांवर देशांतील हिंदू पुढाऱ्यांचे मत अजमावून पाहाण्याकरता डॉ. मुंजे यांनी कित्येक पुढाऱ्यांना ' खाजगी आणि गुप्त ' पत्रे लिहिली. त्यांत अस्पृश्यांचे मद्राकलडील पुढारी रा. ब. राजा यांनाही एक पत्र लिहिले. या

रावबहाद्दुरांनी डॉ. मुंजे यांना उत्तर पाठवून स्वस्थ बसावयाचे. पण तसे न करता हा खाजगी आणि गुप्त पत्रव्यवहार प्रसिद्ध करून शिष्टाचाराचा भंग केलाच, पण एका महत्त्वाच्या प्रश्नाला जे विशिष्ट हितकर वळण लागत चालले होते, त्यांत बिघाड उत्पन्न केला !

रा. ब. राजा यांचा वरील योजनेवर मुख्य आक्षेप असा की, धर्मासारख्या आध्यात्मिक बाबतीत नफ्यातोटच्याच्या भाषेत सौदा करणे इष्ट नाही. अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाकडे केवळ राजकीय दृष्टीने न पाहता धार्मिक दृष्टीनेच पाहिले पाहिजे. अस्पृश्यांचा धार्मिक आणि सामाजिक दर्जा सुधारण्याऐवजी हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांनी त्यांना शीख धर्मात लोटण्यास प्रवृत्त व्हावे याबद्दल रावबहादुरांनी सखेदाश्चर्य प्रकट केले आहे ! आपल्या विचारसरणीला महात्मा गांधींनी, त्यांचे कल्याण शिष्य राजगोपालाचारी यांनी आणि पं. मालवीयांनी उचलून धरल्यामुळे रावबहादुरांना पराकाष्टेचा आनंद झालेला आहे !

पण रावबहादुरांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांना मुख्य प्रश्नच कळला नाही, असे मोठ्या दुःखाने म्हणावे लागते. डॉ. आंबेडकर यांनी त्यांना ताबडतोब खरमरीत उत्तर दिले आहे. धार्मिक बाब हा जर सौद्याचा विषय होऊ शकत नाही, तर महात्मा गांधी पुण्याचा करार करण्याच्या फंदात कशाला पडले आणि रावबहादूर राजा यांनी तरी अस्पृश्यांकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवण्याचा हट्ट कशाला धरला ? धर्म हा श्रद्धेचा आणि आत्म्याचा प्रश्न आहे हे सर्वांनाच समजते. पण हिंदुधर्मात राहून आत्म्याची उन्नती होत नाहीच पण शिवाय ऐहिक दृष्ट्याही मानखंडना होते, अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर काही अस्पृश्यांनी धर्मांतर करावयाचे ठरविलेच, तर हिंदू समाजाचे व हिंदी राष्ट्राचे कमीत कमी नुकसान होईल या दृष्टीने काय केले पाहिजे एवढाच मुद्द्याचा प्रश्न आहे. धर्मांतर करताना डॉ. आंबेडकर किंवा त्यांचे अनुयायी जी कारणे पुढे आणतात ती डॉ. मुंजे यांना किंवा कोणालाच पटण्यासारखी नाहीत. तात्त्विक–दृष्ट्या रा. ब. राजा, म. गांधी किंवा डॉ. मुंजे यांचे पूर्ण मतैक्य आहे. पण आज धर्मांतराच्या कारणांची मीमांसा करावयाची नसून अस्पृश्यांनी धर्मांतराचा हट्ट धरलाच तर त्यांच्या या हट्टाला जास्तीत जास्त इष्ट वळण कसे लावता येईल एवढाच प्रश्न आहे. त्याची चिकित्सा करणे म्हणजे धर्मांतराला पाठिंबा किंवा प्रोत्साहन देणे नव्हे, हें रावबहादुरांच्या, महात्माजींच्या किंवा पंडितजींच्या, लक्षात येऊ नये याचे आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटते !'

प्रभात ता. १२–८–३६

## अविवेकी कोण ?– डॉ. मुंजे की आंबेडकर

सत्याची आणि अहिंसेची सेवा एवढ्यावरच पूर्ण होणार नाही आणि महात्माजींच्या दृष्टीने आपले आत्मिक बल कमी ठरेल म्हणूनच की काय 'लोकशक्ति'च्या संपादकांनी 'डॉ. मुंजे यांचा अविवेकी सल्ला' या मथळ्याखाली एक विषारी आणि बदनामकारक लेख खरडला आहे !

केवळ मथळ्यावरून आतील विचारांची कल्पना करता येण्यासारखी आहे. तथापि काँग्रेसच्या या मुखपत्राचे सत्य कोणत्या दर्जाचे आहे याचा वाचकांना बोध होण्याकरिता सदरहू लेखांतील काही वाक्ये आम्ही येथे उद्‌धृत करतो.

१) पण हिंदुमहासभेचे आजचे पुढारी अस्पृश्योद्धाराच्या या कामी अगदी अनर्थावह धोरण स्वीकारीत असून डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी यांनी शीख धर्म स्वीकारावा असा उघड सल्ला देण्यास पुढे येत आहेत. डॉ. आंबेडकर यांनी कोणता धर्म स्वीकारावा या बाबतीत सल्ला देणे हे हिंदू महासभेच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य होऊ शकत नाही.

२) एखाद्या धर्मछळाने गांजलेल्या व्यक्तीने त्या धर्माचा त्याग करण्यास प्रवृत्त व्हावे, आणि आपल्या गांजलेल्या इतर लोकांना धर्मांतराचा उपदेश करण्यास तयार व्हावे, ही गोष्ट इष्ट असो की अनिष्ट असो, हे आपणास समजू शकते. पण त्याच धर्मातील बलिष्ठ म्हणवून घेणाऱ्या जातीतील काही व्यक्तींनी आपल्या गांजलेल्या धर्मबांधवांना प्रोत्साहन द्यावे, आणि त्यांची दुसऱ्या कोणत्या तरी धर्मात सोय लावून देण्याची हमी घ्यावी, हे आम्हांस समजू शकत नाही.

३) हिंदुसमाजातील स्पृश्यास्पृश्याचा वर्गविग्रह शीख आणि हिंदू अशा दोन धर्मांतील धर्मकलहाचे स्वरूप धारण करील तर त्यापासून हिंदू धर्माचे, हिंदू समाजाचे किंवा हिंदी राष्ट्राचे कोणत्या प्रकारचे हित साधेल असे डॉ. मुंजे यांना वाटते?

अस्पृश्योद्धाराच्या कळकळीपेक्षा डॉ. मुंजे यांचा राजकीय पक्ष आणि हिंदू महासभा यांना नेस्तनाबूत करण्याचा रात्रंदिवस ध्यास लागल्यामुळे प्रत्येक वाक्यागणिक संपादकांनी डॉ. मुंजे आणि हिंदुमहासभा यांची नावे आणण्याची खबरदारी घेतलेली आहे ! संपादक महाशय आणखी म्हणतात–

' निवडणूकीच्या वेळी सनातनी लोकांशी सहकार्य करून धार्मिक बाबतींत कायद्याचा हात घालण्यास आपण विरोध करू, अशी आश्वासने द्यावयाची आणि अस्पृश्य बंधूंना धर्मांतराचा मार्ग खुला करून देऊन त्यांच्यावर उपकार केल्याचा देखावा करावयाचा, या धोरणात येथून तेथून सर्वत्र अविवेक भरलेला अहे.

भ्रमिष्टपणाची मजल यापलीकडे कधी गेली आहे काय ? डॉ. आंबेडकर यांची योजना हिंदुमहासभेपुढे अद्यापि यावयाची आहे, आणि तीवर डॉ. मुंजे-सुद्धा हिंदू पुढाऱ्यांची मते अद्यापि प्रसिद्ध व्हावयाची आहेत. ' आपण अनुकूल किंवा प्रतिकूल निर्णय करीपर्यंत ही बाब खाजगी आणि गुप्त ठेवा ' असे डॉ. मुंजे, रा. ब. राजा यांना पाठविलेल्या पत्रात म्हणतात. म्हणजे अद्यापि कोणताच निर्णय झाला नसताना ' लोकशक्ति 'कार श्री. जावडेकर माथेफिरूपणाने डॉ. मुंजे यांना त्यांच्या, पक्षाला आणि हिंदुमहासभेला धोपटीत सुटले आहेत ! भ्रमिष्ट झालेला मनुष्य नेहमी दुसऱ्याला भ्रमिष्ट ठरवितो. स्वत: भ्रमिष्ट असल्याची कबुली केव्हाही देत नाही, हा व्यवहारातील नित्याचा अनुभव आहे.

अस्पृश्य लोक धर्मांतर करणार ही गोष्ट गृहीत धरून देशाच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी मुसलमान व्हावे, ख्रिस्ती व्हावे की, शीख व्हावे, हा मुख्य प्रश्न आहे. त्यावर आपले प्रांजल मत देण्यास किंवा आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे डोळ मिटून महात्माजींची साथ करण्याला ' लोकशक्ति 'कारांना पूर्ण मुभा होती. डॉ. मुंजे किंवा हिंदुमहासभा यांचे नाव आणण्याचे देखील कारण नव्हते. पण डॉ. मुंजे यांचे नाव कानी पडताच बुजून जाऊन वाटेल तिकडे ते धावत सुटले ! धर्मांतराच्या बाबतीत हिंदुमहासभा किंवा डॉ. मुंजे यांची मते पूर्वी प्रसिद्ध झालेली आहेत. अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत हिंदुमहासभेचे कार्य आणि काँग्रेसचे कार्य जनतेसमोर आहेच. तो प्रश्न डॉ. आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे ताबडतोब सोडविणे कोणत्याही व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या शक्तीबाहेरचे आहे. धर्मांतराच्या निश्चयापासून डॉ. आंबेडकरांना निवृत्त करणे महात्माजींना काय पण त्यांचे पितर स्वर्गातून उतरले तरीही त्यांना अशक्य आहे. मग काही अस्पृश्य धर्मांतर करूच लागले तर त्यावेळी तारतम्य बुद्धीचा का उपयोग करू नये ? शीखधर्म स्वीकारताना उत्पन्न होणाऱ्या अडचणींचा परिहार करण्याची त्यांनी विनंती केली, आणि तिचा विचार केला तर ते धर्मांतराला प्रोत्साहन कसे होते ? तुम्ही शीख व्हाच असा डॉ मुंजे यांनी किंवा हिंदुमहासभेने अस्पृश्यांना आग्रह केल्याचे जावडेकर दाखवून देतील काय ? किंवा ' तुमच्या अडचणींचा आम्ही विचार

करणार नाही, महात्माजींचा हरिजन सेवक संघ हिंदू धर्मातच तुमची तावडतोब उन्नती करून दाखविणार आहे, असे डॉ. मुंजे यांनी उत्तर देताच डॉ. आंबेडकर आपला विचार सोडून देतील असे जावडेकरांना वाटते काय ? मग त्यांनी स्वतःच पुढे होऊन डॉ. आंबेडकरांना ' हरिजनाचे ' अंक का वाचून दाखवू नये ? डॉ. आंबेडकर अस्पृश्यांकरिता प्रथम राखीव जागा मागत होते. पण आमच्या ' राजकारणपटू ' महात्माजींनी त्याला विरोध केल्यामुळे आंबेडकर विभक्त मतदार संघाचा हट्ट धरून बसले ! त्याला उत्तर म्हणून महात्माजींनी उपवास सुरू केला, आणि त्याचे पर्यवसान काय झाले ? तर अस्पृश्यांकरितां जागा राखून द्याव्या लागल्याच पण निराळ्या स्वरूपात विभक्त मतदार संघही कायम राहिलाच ! ' लोकशक्तीच्या ' मते हा मुत्सद्दीपणा अलौकिक आहे !! डॉ. मुंजे यांना न बोलावता डॉ. आंबेडकर यांनी महात्माजींचा सल्ला विचारला असता, तर महात्माजी ' अंतस्थ प्रेरणेने ' एकदम म्हणाले असते, ' शीख होणार ? छे ! धार्मिक बाबतीत सौदा करणे मला पसंत नाही. ' त्यावर डॉ. आंबेडकर यांनी पुणे–करार होण्यापूर्वी मुंबईस इंडियन मर्चंटस् चेंबरच्या जागेत भरलेल्या हिंदू पुढाऱ्यांच्या सभेत ज्या स्वराने भाषण केले, त्याच स्वरात महात्माजींना असे णकावले असतें की, ठीक आहे बच्चंजी ! हा आंबेडकर आपल्या अनुयायांसह मुसलमान होणार आणि मग आपला इंगा दाखविणार ! तुमच्याच डोळ्यांदेखत हिंदू संस्कृतीचा नायनाट केला नाही तर माझे नाव बदलून ठेवा. एक वर्षात स्वराज्य कसे मिळविता तेही पहातो ! महात्माजींनी विधवांप्रमाणे आपले निर्वाणीचे उपवासाचे हत्यार मग बाहेर काढले तरी उपयोग होणार नाही ! पण आमचेच चुकले. डॉ. आंबेडकर मुसलमान झाल्यावर महात्माजी उपवास तरी कशाला करतील ? ' मला सर्व धर्म सारखेच ' असे म्हणतील आणि टकळी फिरवीत बसतील. मग ' लोकशक्ति ' कारांनाहि देशात धर्मकलह वाढण्याची भीती वाटणार नाही. अस्पृश्य शीख झाले तर मात्र देशात धर्मकलह वाढण्याची त्यांना भीती वाटते ! '

**विहार, ता. १३–८–३६**

## अध्यात्माचा पुळका

डॉ. आंबेडकर व डॉ. मुंजे यांच्या दरम्यानचा पत्रव्यवहार श्री. राजा यांना डॉ. मुंज्यांनी कळविताच श्री. राजांना अध्यात्माचा पुळका येऊन त्याच्या लाटेत श्री. राजगोपाळाचारी आणि गांधीजी देखील गडप होऊ लागले. अस्पृश्यांना धर्मा-

तर करायचे आहे, ते त्यांची अध्यात्माची भूक हिंदू धर्माला भागविता येत नाही म्हणून. तिघांनीही गृहीत धरलेली ही गोष्ट उघड उघड खोटी आहे. धर्माचा आध्यात्मिक ( **Spiritual** ) म्हणून गणलेला भाग सर्व धर्मात जवळ जवळ सारखाच आहे. माणसाला स्वतःचा दुबळेपणा जाणवतो म्हणून जिचा आधार द्यायचा ती अतिमानुष कुबडी प्रत्येक धर्म पुढे करतो. तत्त्वज्ञान आणि नीतिमूल्मे यांच्यांत निरनिराळ्या धर्मांत फारसा फरक आढळणार नाही. फार तर इतकेच म्हणता येईल की, या गोष्टीचा तात्त्विक आणि काल्पनिक काथ्याकूट हिंदू धर्माने सर्वांत जास्त केला आहे.

धर्मांतर करण्यास अस्पृश्य तयार होतात ते हिंदू धर्मातील अध्यात्म अपुरे वाटते म्हणून नव्हे, तर हिंदू धर्मातील सामाजिक व आर्थिक विषमता अस्पृश्यांना इतर सर्व हिंदू जातींपेक्षा जास्त असह्य होते यासाठी. हिंदू धर्मात होणारा सामाजिक छळ आणि आर्थिक अन्याय यांतून डोके वर काढण्यास धर्मांत-राखेरीज उपाय नाही, अशी अस्पृश्यांची खात्री झाली आहे. अस्पृश्याने कितीहि प्रयत्न केला तरी समाज हीन लेखणार आणि अस्पृश्य वर्गाने दरिद्रीपणाने राहून इतर हिंदूंचें उच्छिष्ट खाऊन जीव जगविणे हा अस्पृश्यांचा धर्म आहे असाच आग्रह धरणार. हिंदूंतील अस्पृश्यता घालविण्याच्या घोषणा गांधीजींनी डझनावारी केल्या; पण त्यांचा काहीएक उपयोग झाला नाही. गांधींच्या इतर हुल्लडीप्रमाणे मंदिर-प्रवेशाची हुल्लड देखील चार सहा महिने फोफावून एकदम अस्तप्राय झाली. हिंदू धर्माचे अस्तित्व सवर्णांनी पश्चात्तापपूर्वक अस्पृश्यता घालविण्यावर अवलंबून आहे, असे गांधी म्हणतात. पण अस्पृश्यता जाण्याची अगर स्पृश्यांना पश्चात्ताप होत असल्याची लक्षणे कोठेच दिसत नाहीत. त्या अर्थी हिंदू धर्मच नामशेष होण्याच्या पंथास लागला आहे, हे अनुमान गांधीजींच्याच प्रमेयावरून निघते. मृत्युपंथास लागलेल्या या धर्माला कवटाळून धरून त्याच्याबरोबर नामशेष न होता त्याचा त्याग करुन स्वतःचे जीवन धर्मांतराने तेजस्वी आणि अभिमानास्पद करावे, या डॉ. आंबेडकरांच्या सूचनेला विरोध का असावा ?

आध्यात्मिक साधनांनी धर्मसुधारणा करण्याचा प्रयत्न धर्मात सुधारणा तर घडवून आणीत नाहीच, पण आगोदरच बोकाळलेल्या वेडगळ आणि भ्रामक समजू-तींना अध्यात्माचा आधार मिळतो हे हिंदू धर्मावर झालेला थिऑसफीचा परिणाम पाहिल्यास, स्पष्ट दिसून येईल. गांधीजींच्या अध्यात्मानेही अस्पृश्यता दूर होणे कालत्रयी शक्य नाही. अस्पृश्यांनी स्वतःची हीनता घालवायची असेल तर अध्यात्म-

चर्चेच्या चक्रव्यूहात न पडता ऐहिक, भौतिक बुद्धिवादाचे अवलंबन केले पाहिजे. तर्कशुद्ध बुद्धिवाद स्पष्ट सांगतो की प्रत्येक व्यवहाराशी धार्मिक अध्यात्माचे कोडे जखडणाऱ्या हिंदू धर्माचा त्याग केल्यावाचून अस्पृश्यांची अस्पृश्यता जाणार नाही.

मुसलमान, ख्रिस्ती किंवा शीख यांपैकी कोणत्याही धर्माचा स्वीकार केल्याने अस्पृश्य अध्यात्माला मुकणार नाहीत; त्यांची अस्पृश्यता मात्र नाहीशी होईल. हिंदूधर्मातील वैषम्यात मुरलेल्या श्री. राजगोपाळाचारींना अस्पृश्यता अशी तडकाफडकी नाहीशी होणे 'राक्षसी' वाटेल तर नवल नाही. हिंदू अध्यात्माने सामाजिक विषमतेची आणि अन्यायाची पुटेच्या पुटे आज हजारो वर्षे हिंदूच्या मनावर चढवून जातिभेद अस्पृश्यता आणि स्त्रियांचे दास्य यांचा गड्डा असा हिंदू धर्म निर्माण केला आहे. त्या हिंदू अध्यात्माच्या पाशातून सुटण्यासाठीच अस्पृश्यांना धर्मांतर करणे भाग आहे.

या बाबतीतील अध्यात्म बाजूस ठेवले तर डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरावर गांधीजीप्रभृतींचा एकच आरोप उरतो. तो 'बाजारीपणा' (Bartar) चा. अस्पृश्यांच्या सामाजिक अडचणी दूर करण्यात शिखांना हिंदूकडून मदत होणे शक्य नाही. परंतु आर्थिक व राजकीय अडचणी दूर करण्यात मात्र हिंदूंनी शिखांना मदत करणे शक्य आहे. त्यांपैकी राजकीय अडचण दूर करणे अत्यंत अगत्याचे आहे. कारण शिखांच्या मार्गात ती अडचण येण्याचा संभव आहे. ( The hindus cannot help sikhs to remove the social diffiiculty, but they can. certainly help the sikhs to remove the financial and political difficulties. Of these it is most urgent to remove the political difficulty because it might become an obsticle in the way of the sikhs ) या आंबेडकरांच्या वाक्यावरच या आरोपाची भिस्त आहे. गांधीजी आणि त्यांचे अनुयायी या वाक्यातून हा 'बाजारीपणा' काढीत आहेत. 'आम्ही मुसलमान किंवा ख्रिस्ती होतो, नाही तर तुम्ही आम्हांला पैसे द्या!' असा अर्थ आंबेडकरांच्या पत्रांतून काढणारे आणि आंबेडकरांविरुद्ध मुसलमान, ख्रिस्ती व सरकार यांना चिथावणी देणारे, यांच्या अध्यात्माची व देशप्रेमाची तारीफ करावी तितकी थोडी!'

जागृति, १५-८-३६

## 'एवढा गहजब का ?'

डॉ. आंबेडकर व डॉ. मुंजे यांच्या दरम्यान अस्पृश्यांच्या धर्मांतरासंबंधाने

झालेल्या वाटाघाटी संबंधीचा पत्रव्यवहार वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेला असून त्यावर डॉ. आंबेडकर व डॉ. मुंजे या दोघांचे खुलासेही प्रसिद्ध झाले आहेत. हे दोन खुलासे वाचल्यावर साधारणत: प्रत्येक हिंदूचे समाधान झाले पाहिजे. डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी यांनी शीख धर्माचा स्वीकार केला, तर खरे पाहिले असता हिंदू समाजावरील एक मोठी आपत्ती टळेल. एवढेच नव्हे तर हिंदू संस्कृतीचे संरक्षण होण्याला मोठे सहाय्य होईल. हिंदू समाजातल्या गुलामगिरीत खितपत पडून अस्पृश्य समाजाने हल्लीप्रमाणेच दुबळेपणात दिवस कंठावेत, स्पृश्य हिंदू समाजाच्या, विशेषत: सनातन्यांच्या, दगडी अंत:करणात पाझर फुटेपर्यंत अर्थात जगाच्या अंतापर्यंत वाट पहावी, किंवा मुसलमान अगर ख्रिस्ती होऊन कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ व्हावा, त्याप्रमाणे वागावे किंवा शीख धर्माचा स्वीकार करून हिंदू संस्कृतीच्या कक्षेतच रहावे, परंतु तेजस्वी बाण्याने स्वत:ची उन्नती करून घ्यावी एवढाच प्रश्न आहे. ज्या अस्पृश्यांना मुळीच धर्मांतर, पंथांतरसुद्धा करावयास नको असेल त्यांच्यावर धर्मांतराची जबरी, डॉ. आंबेडकर यांनी आपल्या खुलाशात म्हटल्याप्रमाणे कोणी करू इच्छित नाही, किंवा शकत नाही. परंतु हिंदू धर्माच्या सध्याच्या स्वरूपाला आणि हिंदू समाजातील अन्यायाला व जुलमाला हजारो अस्पृश्य कंटाळलेले आहेत व आज ना उद्या ते धर्मांतर करणार आहेत, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. आतापर्यंत थोडेथोडके अस्पृश्य या देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांत ख्रिस्ती किंवा मुसलमान झालेलेच आहेत. हा क्रम यापुढे विशेष जोराने चालू राहावयाचा हे ज्याला थोडी बुद्धी व थोडा चौकसपणा असेल त्याला कळून येणार आहे. मुसलमान व ख्रिस्ती या दोन्ही समाजाचे पुढारी अस्पृश्यांना आपल्या कळपात ओढण्यासाठी टपून बसलेले आहेत. त्याकरिता जंगजंग पछाडीत आहेत. अशा वेळी डॉ. आंबेडकर हे आपल्या समाजातील लोकांना शीख धर्मात जावयांस सांगून हिंदू समाजावर उपकारच करीत आहेत. डॉ. आंबेडकरांचे प्रतिस्पर्धी व डॉ. मुंजांचा विश्वासघात करून खाजगी पत्रव्यवहार अवेळी चव्हाट्यावर मांडणारे रा. ब. राजा यांचा जन्म ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या सेवेत गेलेला असून त्यांना अस्पृश्यांनी धर्मांतरच करावयाचे तर शीख होण्यापेक्षा मुसलमान किंवा ख्रिस्ती व्हावे हे अधिक चांगले, असे वाटते. असे त्यांनीच प्रसिद्ध केलेल्या पत्रव्यवहारांतील डॉ. मुंज्यांना त्यांनी लिहिलेल्या पत्रावरून स्पष्टपणे दिसून येते. आणि आश्चर्याची व दु:खाची गोष्ट ही की, अनेक हिंदू वर्तमानपत्रे डॉ. आंबेडकर यांना शिव्याशाप देत असून रा. ब. राजा हे हिंदू समाजाचे त्राते मानून चालले आहेत ! डॉ. आंबेडकर यांना राष्ट्रीय दृष्टी आहे. ते सरकारशी निस्पृहपणे वागणारे आहेत. उलटपक्षी रा. ब. राजा हे सरकारी अधिकाऱ्यांना खूष ठेवण्यात झटणारे असून असेंब्लीमध्ये

आतापर्यंत त्यांनी सरकारच्याच बाजूने मतदान केलेले आहे. परंतु आजकाल आंबेडकर हे काँग्रेसवाले व इतर हिंदू यांच्या दृष्टीने ' सैतान ' ठरले आहेत. कारण काय ? तर एकच व ते हे की डॉ. आंबेडकर हे गांधींना अप्रिय आहेत. का तर ते गांधीपुढे मान तुकविण्यास व त्यांच्यावरच अस्पृश्यता निवारणाचे कार्य सोपविण्यास तयार नाहीत.

डॉ. मुंजे यांनी आपल्या खुलाशात म्हटल्याप्रमाणे डॉ. आंबेडकर व त्यांचे अनुयायी यांना धर्मांतरापासून परावृत्त करावयाला हिंदुसमाज किंवा गांधीजी समर्थ नाहीत. मग त्यातल्या त्यात हिंदू समाजाला अगदी कमी प्रमाणात बाधक होईल व कदाचित परिणामी फायदेशीरही होईल अशा प्रकारचे धर्मांतर ते करीत असले तर त्याला संमती देणे हे शहाणपणाचे नव्हे काय ? मुसलमान व ख्रिस्ती यांचे आपली संख्या वाढविण्याचे जे आटोकाट प्रयत्न चालले आहेत ते लक्षात घेता गांधीजी हे त्या बाबतीत हिंदू समाजाचे संरक्षण करू शकणार नाहीत. आपल्या स्वतःच्या मुलालाही ते मुसलमान होण्यापासून परावृत करू शकले नाहीत. मग त्यांनी असल्या बाबतीत ढवळाढवळ का करावी आणि डॉ. मुंजे प्रभृती हिंदू महासभेचे पुढारी हिंदू समाजाच्या संरक्षणार्थ ज्या धोरणाचा अवलंब करीत आहेत, त्यांच्या आड का यावे ते आम्हांस समजत नाही. रा. ब राजा व गांधीजी यांनी सदरील पत्रव्यवहार प्रसिद्ध करून मुसलमान समाज, ख्रिस्ती समाज व ब्रिटिश सरकार यांना, आंबेडकर हा पहा कसा तुमचा गुप्त शत्रू आहे, असे भासवून आंबेडकरांवर त्यांच्या मनांतल्या हिंदू संस्कृतीच्या प्रेमाबद्दलची शिक्षा म्हणूनच की काय वैयक्तिक सूड उगविला आहे. आमच्या मते हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असा झाला. याला विश्वासघात, दगलबाजी असेहिं म्हणण्यास हरकत नाही. यांत हिंदू समाजाचा कोणताच फायदा झाला नाही. परंतु त्याचे लचके तोडण्यास तयार असणाऱ्या समाजांच्या हातांत मात्र कोलीत सापडले. शीख धर्म हा खरे पाहिले असता स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्मातलाच जैन, लिंगायत, ब्राह्मो, प्रार्थना समाजिस्ट, बौद्ध यांच्याप्रमाणें एक पंथ आहे. त्या पंथाचा अस्पृश्यांनी स्वीकार केला म्हणून त्याबद्दल वाईट वाटण्याचे मुळीच कारण नाही. हिंदूंचे एक शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांनी सुद्धा हेच मत व्यक्त केलेले आहे आणि शेट जुगोल किशोर बिर्ला, भाई परमानंद, राजा नरेंद्रनाथ, बॅरिस्टर जयकर या हिंदू पुढाऱ्यांनी डॉक्टर मुंज्यांच्याच धोरणाला संमती दिली आहे. डॉ. आंबेडकर व डॉ. मुंजे यांच्यावर काँग्रेसची कुलंगी कुत्री थुंकून जो गहजब करीत आहेत, त्यांत

आम्हांला काँग्रेसमधल्या बौद्धिक गुलामगिरी खेरीज आणि हिंदू म्हणविणारांचा अजागळपणा व अदूरदृष्टी याखेरीज काही विशेष आहे असे वाटत नाही. डॉ. आंबेडकरांवर धर्माचा बाजार मांडल्याचा आरोप करणाऱ्या लोकांना आपण स्वतःच धर्माचा बाजार मांडला आहे, धर्माच्या नावावर लोकांना झुलवीत आहोत, घोर सामाजिक अन्यायाचे स्तोम माजविणाऱ्या ढोंगाला धर्म म्हणून डोक्यावर घेऊन नाचत आहोत, याची जाणीव जेव्हा होईल तेव्हा सुदिन ! ' सैतानी ' असे आंबेडकरांच्या शीख धर्मविषयक सूचनेला विशेषण देणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की खरा सैतानीपणा विश्वासघात करण्यात आहे वैयक्तिक द्वेषासाठी सबंध समाजाचे नुकसान करण्यात आहे ? ( जनता, २२-८-३६ )

' वैनतेय ', ता: १८-८-३६

## मुंजे – आंबेडकर तडजोड

डॉ. आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या योजनेबाबत डॉ. मुंजे व रा ब. राजा यांच्या दरम्यान झालेल्या पत्रव्यवहाराला रा. ब. राजा यांनी गेल्या आठवड्यात प्रसिद्धी दिल्यामुळे सर्वत्र मोठी खळबळ माजली असून या विषयाची सांप्रत जोराजोराने चर्चा होत आहे. डॉ. आंबेडकर यांच्या घोषणेला पोकळ वायबार म्हणून तिची उपेक्षा करण्याचा आव आरंभी कोणी कितीही आणण्याचा प्रयत्न केला तरी त्या बाबतीतील डॉ. बाबासाहेबांच्या दृढ निश्चय व हरिजन वर्गांतून त्यांना मिळत गेलेला वाढता पाठिंबा पाहून ही बाब उपेक्षणीय नव्हे हे चाणाक्ष लोकांच्या नजरेस आल्यावाचून राहिले नाही. डॉ. साहेबांच्या घोषणेमुळे अहिंदू समाजाच्या आशाळभूत नजरा हरिजन वर्गाकडे वळून जो तो हा वर्ग एक गटाने आपल्या धर्मात सामील कसा होईल, याविषयी खटपट करू लागला. अशा स्थितीत हरिजन समाज हिंदू धर्माच्या कक्षेबाहेर जाण्याने स्वधर्माचे आणि स्वसमाजाचे होणारे नुकसान आकलन करू न शकणाऱ्या मतिमंदाखेरीज आणि ते आकलन होऊनही त्या विषयी बेफिकिरी बाळगणाऱ्या ' मला काय त्यांचे ?, वृत्तीच्या लोकांखेरीज सर्व हिंदूंना या प्रश्नाविषयी आस्था वाटणे आणि हिंदू समाजाला कमीत कमी विघातक अशा रीतीने हा प्रश्न निकालात कसा निघेल याची काळजी लागून राहणे स्वाभाविक होते. हरिजन समाज आणि त्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर यांचे समाधान होईल अशा प्रकारचे परिवर्तन स्पृश्य हिंदूंच्या मनोवृत्तीत आणि आचरणात होऊन धर्मांतराचे कारणच नाहीसे झाले असते तर डॉ. आंबेडकरांसुद्धा सर्वच हिंदूंना आनंद झाला असता. कारण डॉ. आंबेडकर झाले तरी

आध्यात्मिक समाधानासाठी धर्मांतराचा उपाय सुचवीत नसून व्यावहारिक हिता-साठी त्या मार्गाचे अवलंबन करण्याचा अखेरचा आणि अनिवार्य सल्ला ते आपल्या ज्ञातिबांधवांना देत आहेत. हिंदू समाजात राहून समाजांतील इच्छित स्थान प्राप्त होत असेल तर दुराग्रहाने धर्मांतर करण्याचीही त्यांची इच्छा नाही. आणि म्हणूनच धर्मांतराचे कार्य तातडीने न उरकता उभय पक्षांना पूर्ण विचार करता यावा व शक्य तर हिंदू समाजातून हरिजन समाज कायमचा फुटण्याची आपत्ती टाळावी म्हणून या बाबतीत त्यांनी मुदतीचे बंधन स्वतःवर व आपल्या अनुयायांवर घालून घेतले आहे. पण हाताशी असलेल्या मुदतीत हिंदू समाजाचे मतपरिवर्तन होऊन हरिजन समाज स्पृश्य समाजाशी एकजीव होईल अशी खात्री देण्याइतकी आशाजनक परिस्थिती आज तरी निर्माण झालेली नाही; हे नाकबूलच करता येईल काय ? समाजाच्या मनोरचनेत अघटित क्रांती घडून स्पृश्य हिंदूंचे वर्तन हरिजनांना संतोषकारक वाटले तर उत्तमच. पण हिंदुसमाजाच्या दुर्दैवाने तशी गोष्ट घडवून न आली तर हरिजन वर्गाचे धर्मांतर हिंदू धर्माला आणि हिंदू समाजाला कमीत कमी तापदायक व्हावे अशा विषयी कोणी प्रयत्न चालविले तर त्याला हिंदू धर्माचा शत्रू म्हणावयाचे की उपकारकर्ता म्हणावयाचे ? धर्मांतर अपरिहार्यच असेल तर हरिजनांनी शीख धर्म स्वीकारावा पण इस्लाम अगर ख्रिस्ती धर्म स्वीकारू नये असे प्रयत्न हिंदुमहासभेचे पुढारी डॉ. मुंजे यांनी केले व त्यांना यशही आले. आमच्या दृष्टीने डॉ. मुंजे यांचा या गोष्टीत दूरदर्शीपणा आणि हिंदू समाजाच्या हिताविषयीची जागरूकता दिसून येते. पण मद्रासचे हरिजन पुढारी रा. ब. राजा, म. गांधी व राजगोपालाचार्य प्रभृती पुढाऱ्यांनी या योजनेबद्दल आपली नापसंती व्यक्त केली असून सांप्रत डॉ. मुंजे यांच्याविरुद्ध मोठेच काहूर उत्पन्न केले आहे.

हरिजनांचे धर्मांतर हे व्यावहारिक फायद्यासाठी व्हावयाचे आहे, हे डॉ. आंबेडकर यांनी आरंभीच स्पष्ट केले असल्यामुळे हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाची तुलनात्मक श्रेष्ठता त्यांच्यापुढे मांडण्यात अगर ऐहिक फायद्यासाठी त्यांनी धर्माचा लिलाव मांडला असे म्हणून त्यांना हिणविण्यात अर्थ नाही. त्याहून वेगळे असे काही विधायक कार्य करून त्यांची समजूत घालता आली तरच हा धर्मांतराचा प्रश्न टळेल. महात्माजींनी या बाबतीत केलेली लोकजागृती आणि चालविलेले आस्थेवाईक प्रयत्न निःसंशय अभिनंदनीय आहेत. पण दुराग्रही सनातनी वृत्तीचा पगडा अद्याप बहुसंख्य लोकांवर असल्यामुळे त्यांना अपेक्षेइतके यश आलेले नाही.

अशा परिस्थितीत हरिजनांनी हिंदू समाजाच्या राजकीय दृष्ट्या प्रतिपक्षी असलेल्या गटांत सामील होण्यापेक्षा तटस्थांच्या गटात जाणे हे जास्त हितावह होईल असे वाटून डॉ. मुंजे यांनी डॉ. आंबेडकर यांच्याशी बोलणे चालविले. पुणे–करारामुळे हरिजनांना मिळालेल्या सवलती त्यांनी इस्लाम अगर ख्रिस्ती धर्म न स्वीकारता शीख धर्म स्वीकारल्यास कायम ठेवण्याचे आश्वासन डॉ. मुंजे यांनी डॉ. आंबेडकर यांना दिले व त्यांनाही ते मान्य झाले. या बाबतींतील वस्तुस्थिती डॉ. मुंजे यांनी रा. ब. राजा यांना कळवून त्यांचा अभिप्राय मागविला असता, त्यांनी स्वतः तर धर्मांतरांच्या या योजनेला विरोध केलाच पण डॉ. मुंजे यांची संमति न घेता अनधिकाराने सारा पत्रव्यवहार प्रसिद्ध करून जिकडे तिकडे वावटळे उठवून दिली. 'ऐहिक गोष्टीसाठी धर्मांतर करणे हें योग्य नाही. आम्ही हिंदू धर्मात राहूनच आमची उन्नती करून घेणार, इत्यादी रा.ब. राजांचे उद्गार स्पृश्य हिंदूंना कितीही गोड वाटले तरी त्यामुळे हा धर्मांतराचा प्रश्न सुटतो काय ? रा. ब राजा यांची हिंदू धर्मावरील ही निष्ठा कौतुकास्पद असली तरी जोपर्यंत त्यांचे नेतृत्वाबाहेर हरिजनांचा मोठा वर्ग शिल्लक राहतो व त्याचे पुढारी डॉ. आंबेडकर हे धर्मांतराच्या प्रश्नाचा विचार व्यावहारिक फायद्यावर नजर ठेवूनच करणार, तोपर्यंत रा. ब. राजांच्या धर्मनिष्ठेबद्दल हार्दिक आभार मानून हरिजनांच्या धर्मांतराचा प्रश्न तडजोडीच्या दृष्टीने सोडविण्यातच व्यावहारिक सुज्ञपणा आहे, या गोष्टीकडे सोईस्कर दुर्लक्ष करण्यात हशील नाही.

हरिजनांचे धर्मांतर अपरिहार्यच असेल तर त्यांनी शीख धर्माचा स्वीकार करावा व तसे केल्यास हिंदू महासभा त्यांच्या आड येणार नाही. असे म्हणण्यात डॉ. मुंजे यांनी हाच सुज्ञपणा दाखविला आहे. कारण अशा धर्मांतराने हरिजन समाज आजच्या संकुचित व्याख्येप्रमाणे हिंदू धर्मात न राहिला तरी हिंदू संस्कृतीच्या कक्षेत खात्रीने राहतो आणि न जाणो हिंदू धर्मीयांची दृष्टी व्यापक झाली तर पुढे मागे हिंदू विविध पक्षांचे एकीकरण होऊन तो पुन्हा व्यापक हिंदू संस्कृतीच्या धर्माच्या कक्षेत खात्रीने येईल, हिंदू धर्मीय व्यक्ती मुसलमान अगर ख्रिस्ती झाल्याने हिंदू समाजाला जेवढी दुरावते तेवढी शीख झाल्याने दुरावत नाही; हे उघड आहे. याच विचाराने श्रीमच्छंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी हरिजनांना शीख धर्म स्वीकारण्याचा सल्ला खाजगी रीतीने व जाहीर रीत्याही दिलेला होता. किंबहुना शीख धर्मात गेल्याने धर्मांतर होत नाही, शीख व्यक्ती हिंदूच राहाते असे दाखवून देण्यासाठी स्वतःही शीख पंथाची दीक्षा घेण्याची तयारी दाखविली होती. वस्तुतः

शीख, जैन, बौद्ध हे स्वतंत्र धर्म नसून ती हिंदू धर्मांतर्गत मते अगर पंथ आहेत. स्मार्त, शैव, शाक्त, गाणपत्य, इत्यादी अनेक मतांचा समावेश जो हिंदू धर्म करू शकतो त्या व्यापक आणि उदार हिंदू धर्माला आपल्या कक्षेत वरील पंथांचा अंतर्भाव करून घेणे मुळीच कठीण नाही हरिजनांच्या धर्मांतरापेक्षां त्याचे पंथांतर हे कोणाही हिंदुधर्माभिमान्याला जास्त श्रेयस्कर वाटेल आणि त्या दृष्टीने डॉ. मुंजे यांच्या तडजोडीला त्यांची मान्यताच मिळेल. अशा प्रकारचे पंथांतर हाही गौण मार्ग आहे, हे खुद्द डॉ. मुंजेही कबूल करतील. पण दुसऱ्या अधिक चांगल्या योजनेच्य अभावी त्यांनी या मार्गाचे अवलंबन केले आहे. हरिजनांनी हिंदुधर्मातच राहावे असे म्हणणाऱ्यांनी केवळ डॉ. मुंजे यांना नावे ठेवून भागणार नाही, तर अन्य उपायांनी हरिजन हिंदुधर्मातच राहतील, अशी हमी द्यावी आणि मग डॉ. मुंजे यांना बोल लावावा.

सेवक २२–८–३६

## ' हरिजनांचे धर्मांतर '

' हरिजनांच्या धर्मांतराविषयी डॉ. आंबेडकर व डॉ. मुंजे यांनी आपसात विचार विनिमय करून एक तडजोडीचा मसुदा तयार केला व खाजगी रीतीने मत आजमावण्याकरिता डॉ. मुंजे यांनी तो. रा. ब. राजा यांचेकडे पाठविला. या बाबतीत अखेरचा निर्णय होईपर्यंत या योजनेची वाच्यता होऊ नये, अशी त्यांची इच्छा होती व ती त्यांची इच्छा धाब्यावर बसवून हा मसूदा, त्या संबधीचा पत्रव्यवहार व आपले मत रा. ब. राजांनी चव्हाटयावर टांगले ! हा पत्रव्यवहार अकाली प्रसिद्ध करण्यात रा. ब. राजांनी शिष्टाचाराचे उल्लंघन केले यात शंका नाही. परंतु त्यामूळे तडजोडीच्या प्रयत्नात बाध येईल असे आम्हांस वाटत नाही. कारण डॉ. आंबेडकर – मुंजे यांच्या तडजोडीची योजना जनतेच्या माहितीकरिता व पसंतीकरता आज ना उद्या पुढे आलीच असती आणि तिच्यावर आजच्यासारखी चर्चाही झाली असती. ही पुढे होणारी चर्चा रा. ब. राजांच्या घाईमुळे आजच झाली इतकेच फार तर म्हणता येईल.

डॉ. आंबेडकर व मुंजे यांनी जो मसुदा तयार केला होता त्याचा आशय असा आहे की, हरिजनांनी मुसलमानी किंवा ख्रिस्ती धर्म न स्वीकारता शीख धर्माचाच स्वीकार करावा व धर्मांतरित नव शीख वर्गाचा अंतर्भाव वर्गीकृत जातीमध्ये करून पुणे–कराराने जे राजकीय हक्क हरिजनांना प्राप्त झाले आहेत ते नव शिखांना उपभोगण्यास हिंदुमहासभेने परवानगी द्यावी. या योजनेला बॅ.

जयकर, रामानंद चतर्जी, बिर्ला वगैरे हिंदू पुढाऱ्यांनी संमती दिली आहे. म. गांधी, मालवीय व राजगोपालाचारी यांना मात्र ही योजना ' सैतानी ' वाटत आहे !

हरिजनांच्या शिखीकरणाविरुद्ध राव ब. राजांनी केवढेही अकांडतांडव केले तरी डॉ आंबेडकर हेच खरे हरिजनांचे पुढारी आहेत व हरिजनांचा त्यांच्यावर विश्वास आहे, हे कुणालाच नाकबूल करता येणार नाही. ज्या परिस्थितीला कंटाळून डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराचा निश्चय जाहीर केला ती परिस्थिती सुधारण्याचा व डॉ. आंबेडकरांना धर्मांतरापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न कोणीही हिंदू पुढाऱ्याने केला नाही. उलट केसरीसारख्या हिंदुसभावाल्यांनी त्यांच्या धर्मांतराचा अद्यापही उपहासच चालविला आहे ! अशा स्थितीत आंबेडकरांचा निश्चय जर बदलणे शक्य नाही तर निदान हरिजनांचे धर्मांतर हिंदू समाजाच्या नाशाला कारणीभूत न होईल अशी खटपट कोणी केली तर ती अभिनंदनीयच समजली पाहिजे. मुसलमान, ख्रिश्चन, शीख व बौद्ध यांपैकी कोणत्या तरी एका धर्माचा स्वीकार हरिजनांना करणे भाग आहे. हरिजनांच्या दृष्टीने विचार केला तर मुसलमान अगर ख्रिस्ती धर्मच त्यांना अधिक हितावह होईल असे वाटते. मात्र तसे झाल्यास या समाजाचे संख्याबल वाढून ते हिंदू समाजाच्या हिताला घातक झाल्याशिवाय रहाणार नाही, हिंदू संस्कृतीच्या भवितव्याची जबाबदारी थोड्या बहुत प्रमाणात आपल्यावरही आहे ही गोष्ट आंबेडकरांनी कबूल केली असून हिंदू समाजाच्या व देशाच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी शीख धर्माचा स्वीकार करण्यास संमती दिली आहे. डॉ. आंबेडकरांचा निश्चय बदलणे शक्यच नसेल तर त्यांच्या शिखीकरणास समंजस हिंदूंनी मान्यता द्यावी असेच म्हणू . . . ' ( जनता, २९–८–३६, पा. ४–५ )

शीख धर्माचा स्वीकार करण्याबद्दल वाटाघाटी सुरु झाल्या, त्या गुप्त होत्या. परंतु त्यांचे ध्वनी प्रतिध्वनी जाहीरपणे ऐकू येऊ लागले. त्यांना पाठिंबा देणारे उद्‌गार श्री. शंकराचार्य डॉ. कूर्तकोटी यांनी लाहोर येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात काढले. त्यांतील प्रमुख भाग असा :– ' अस्पृश्यांनी शीख पंथाचा स्वीकार करावयाचे ठरविल्यास त्यांना कोणीही अडथळा करू नये, असे मी म्हणतो. माझी तसे करण्यास अनुज्ञा आहे. – – – – – – सत्याग्रह करण्याऐवजी हिंदू धर्मांतर्गत शीख पंथाचा स्वीकार करा आणि अस्पृश्यता झुगारून द्या, असा सल्ला मीच डॉ. आंबेडकरांना दिला. अस्पृश्यांनी शीख होणे हे धर्मांतर नव्हे, असे माझे मत आहे. कारण शीख धर्म हा परधर्म नव्हे. अर्थात तो परधर्म नसल्यामुळे शीख धर्म स्वीकार, हे धर्मांतर होऊं शकत नाहीं.- - - -' (जनता, ३१-१०-३६ पा. १).

# प्रकरण ८ वे

# धर्मांतराची चळवळ

## देवदासींचा पाठिंबा

अस्पृश्य समाजात वेश्याव्यवसायावर जीवन घालविणाऱ्या स्त्री–पुरुषांना या लांछनास्पद व्यवसायातून मुक्त करण्याची चळवळ उभारावी आणि त्यांना धर्मांतरास उद्युक्त करावे असे बाबासाहेबांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी या लोकांची सभा १६–६–१९३६ ला रात्री पोयबावडी येथील दामोदर हॉलमध्ये भरविली. त्या सभेचा वृत्तान्त प्रसिद्ध झाला तो असा.

## धर्मांतरास देवदासींचा पाठिंबा

गेल्या मे महिन्यात मुंबई इलाखा महार परिषदेत पास झालेल्या धर्मांतराच्या ठरावाचा पहिला आघात कामाठीपुऱ्यात वस्ती करून राहिलेल्या मुरळ्या जोगती, देवदासी इ. समाजाने त्याग केलेल्या वर्गावर बसला. साधारणतः या वर्गातील सर्व स्त्रिया सदाचरणाने उदरनिर्वाह करण्यास असमर्थ झाल्यामुळे अनीतिकारक व्यवसायात पडल्या आहेत. महार–परिषदेनंतर या स्त्रिया आपल्या परिस्थितीचा विचार करू लागल्या व त्यांनी स्वयंस्फूर्तीने एक खाजगी बैठक बोलाविली व त्यात असे ठरविण्यात आले की, आपल्या व्यवसायातील बायांची व पुरुषांची एक सभा बोलवावी व त्यावेळी डॉ. बाबासाहेबांना आमंत्रण देऊन त्यांच्या मुखातून आपल्या मुक्ततेच्या चार उपदेशपर गोष्टी ऐकाव्या. त्याप्रमाणे देवतांना वाहिलेल्या सर्व वर्गांची, पुरुष ( वाघे, पोतराज, भुते, वगैरे ) व स्त्रिया यांची एक सभा ता. १६ जून १९३६ रोजी रात्रौ पोयबावडीवरील दामोदर

हॉलमध्ये भरली होती. सभेस स्त्रिया व पुरुष मिळून मोठा लोकसमुदाय जमला होता व त्यामुळे दामोदर हॉल माणसांनी अगदी फुलून गेला होता. आरंभी काही देवदासी, मुरळ्या, पोतराज, वाघ्ये यांची भाषणे होऊन त्यांनी या व्यवसायापासून निवृत्त होण्याची आपल्या बंधुभगिनींना विनंती केली. काही वक्त्यांनी जाहीर-रीतीने असे सांगितले की, आपण या व्यवसायातून पूर्वीच बाहेर पडलो असून आपण प्रामाणिकपणे मिळवलेल्या घामाचा पैसा मिळवून आपला उदरनिर्वाह करीत असतो व यामुळे आपले जिणे स्वाभिमानाचे झाले आहे. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर टाळ्यांच्या कडकडाटात भाषण करण्यास उठले. त्यांच्या चेहऱ्यावर त्या रात्री उद्विग्नतेची छाया पसरली होती. त्यांनी भाषणास सुरवात करताच सभा-गृहात एकदम शांततेचे व गंभीर वातावरण पसरले. डॉ. आंबेडकर आपल्या भाषणांत म्हणाले,

## डॉ. आंबेडकरांचे भाषण

"आजच्या सभेचे महत्त्व नुकत्याच भरलेल्या महार परिषदेपेक्षा मला शतपटीने अधिक वाटते. समाजाचा जो भाग अत्यंत हीन किंवा टाकाऊ गणला जातो असा तुमचा समज आहे, धर्माच्या नावाखाली अनैतिक रीतीने आपला निर्वाह करणाऱ्या अशा तुम्ही स्त्रिया आहात, ज्यांचा स्वाभिमान लुप्त झालेला आहे, देहविक्रय करून पोटे भरणे हेच ज्यांचे जीवनसर्वस्व आहे, अशा वर्गाने जगात काय चाललेले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी व आपला चरित्रक्रम सुधारण्याची तयारी करावी ही गोष्ट खरोखर तुम्हांस भूषणावह आहे आणि म्हणूनच महार परिषदेत २५००० लोकसमुदाय जमला त्याचे मला महत्त्व वाटत नाही. पण आज तुम्ही जरी ४००–५०० येथे जमला असला तरी त्याचे मला अधिक महत्त्व वाटत आहे. आजच्या तुमच्या या सभेबद्दल **मी तुम्हांला धन्यवाद देतो**. एवढ्या प्रस्तावनेनंतर मी मुख्य विषयाकडे वळतो. आज मुंबई शहरात महार समाजाला कोठे लज्जेने मान खाली घालावी लागते, तर तुमच्या कामाठीपुऱ्यातून जाताना आपल्या भगिनी त्या ठिकाणी इतर समाजांकडून आपली विटंबना करून कशी घेत आहेत; हे चित्र डोळ्यांसमोर उभे राहिल्याबरोबर प्रत्येक महाराला खेद वाटल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही आज महार समाजा-बरोबर धर्मांतर करण्याची तयारी दाखविली आहे. परंतु या तुमच्या निश्चयाने माझ्या अनुयायांची संख्या वाढली म्हणून मला आनंद वाटत नाही किंवा माझ्या धर्मांतराच्या घोषणेस अधिकाधिक पाठिंबा मिळत आहे म्हणून मला समाधान

वाटत नाही. आमच्या धर्मांतराचा अर्थ नीट लक्षात घ्या. आम्ही धर्मांतर करीत आहोत ते या दुर्गंधीच्या वातावरणातून बाहेर पडण्याकरिता करीत आहोत. सर्वांना समतेचे, बंधुत्वाचे, स्वाभिमानाचे व आदर्श जीवित लाभून त्यांचा आयुष्यक्रम उज्ज्वल व्हावा या दृष्टीने आम्ही धर्मांतरास तयार झालो आहोत. तुम्हांला जर आमच्याबरोबर यावयाचे असेल, तुमच्या जातिबांधवाबरोबर यावयाचे असेल तर तुम्ही प्रथम हा आपला दुर्गंधित आयुष्यक्रम अजिबात सोडून दिला पाहिजे. तुमच्या मलिन वृत्तीचा तुम्हांस त्याग केला पाहिजे. हे करण्यास तुम्ही तयार असाल तर तुम्ही आमचे बरोबर या, नाहीतर तुम्ही आमचे बरोबर येऊ नका. वाटल्यास तुम्ही आहात त्याच ठिकाणी राहा. तुम्ही मुसलमान व्हा किंवा ख्रिश्चन व्हा. आमची त्यास हरकत नाही. परंतु जर आमचे बरोबर तुम्हांस यावयाचे असेल तर तुम्ही काया, वाचा व मन यांची शुद्धी करून व त्रिशुद्धीने शुचिर्भूत होऊनच तुम्हाला आमचे बरोबर येता येईल. नाहीतर मी तुम्हांला स्पष्टपणे सांगतो की तुम्हांला आमचे बरोबर येता येणार नाही. **मी तुम्हांला येऊ देणार नाही.** आणि जर तुम्ही आपला आयुष्यक्रम पूर्ववत् चालू ठेऊन महार जातीस बट्टा लावण्याचे कार्य सोडणार नसाल तर तुम्हांस बजावून सांगतो की हजारो तरुण स्वयंसेवक तयार करून मी तुमच्या कामाठीपुऱ्यातून उठाव करीन.

तुम्हांला समजले पाहिजे की स्त्री जात ही समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांच्या चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहिणी होणारी स्त्री उत्तम कुलातील असावी अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो व तशी भार्या मिळावी म्हणून खटपट करतो. कारण त्याला माहीत असते की आपला, आपल्या मुलाबाळांचा, आपल्या कुटुंबाचा व कुळाचा नावलौकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून आहे. इतकी थोरवी स्त्री वर्गाला प्राप्त झाली आहे. परंतु तुमचा कामाठीपुऱ्यातील चरित्रक्रम पाहिला तर समाजाला व स्त्री जातीला काळीमा फासण्यासारखा आहे. म्हणून तुम्ही, स्त्रियांचे समाजात काय स्थान आहे हे जाणून आपल्या मलिन आयुष्यक्रमाचा त्याग केला पाहिजे; व आपला स्वतःचा व जातीचा दर्जा व नावलौकिक वाढविला पाहिजे. तुम्ही कदाचित असा प्रश्न कराल की, हा धंदा आमच्या उपजीविकेचे साधन आहे, इतकेच नव्हे तर या धंद्यामुळेच आज आम्हांला कशाची ददात नाही. आमचे आयुष्य सुखाने चालू आहे. आम्हांला येथे नोकरचाकर वगैरे सुखसोयी आहेत. असा ऐषआरामाचा व थाटाचा चरित्रक्रम सोडून आम्ही काय करावे ? ज्या वेळेस मी तुम्हांस हे लाजिरवाणे जिणे सोडण्यास सांगतो त्यावेळेस असेही निक्षून सांगतो की, तुम्हांस उपजीविकेची साधने उपलब्ध करून देण्याची

जबाबदारी मी घेणार नाही. आज हजारो स्त्रिया गरीब नवऱ्यांशी लग्न लावून त्यांच्या सहवासांत अठरा विश्वे दारिद्र्यात दिवस कंठीत आहेत. त्यांना पोट भरण्या-करिता हरेक तऱ्हेचे कष्ट करावे लागतात. हजारो स्त्रिया गिरण्या, कारखाने यांत नोकऱ्या करून, संसारातील इतर हालअपेष्टा भोगून आपल्या मुलाबाळांत गरिबीने अर्धपोटीही राहतात. परंतु त्या, तुमच्या धंद्यात सुख लाभते म्हणून त्यात शिरत नाहीत. त्या तसे का करीत नाहीत ? दुःखे का सहन करतात ? याचा तुम्ही विचार करा. महाभारतातील कथा तुम्ही ऐकल्या आहेत. ज्यावेळी पांडव द्यूतात हरले त्यावेळेस ते वल्कले, मृगचर्म धारण करून वनवासात जाण्यास निघाले. त्यांच्याबरोबर हीच वस्त्रे परिधान करून द्रौपदीदेखील होती. वाटेत कौरवांपैकी दुर्योधनाने तिला म्हटले, " द्रौपदी, ह्या मूर्ख नवऱ्यांबरोबर सहवास करून तू आपले हाल का करून घेतेस ? तुझ्या सुकुमार देहाला का कष्ट देतेस? तू मजबरो-बर राहा. मी तुला पूर्ण ऐश्वर्यात ठेवीन व तुला काडीचेही दुःख होणार नाही. " पण त्या वेळेस मानी साध्वी द्रौपदीने दुर्योधनाला जे उत्तर दिले, ते तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. ती म्हणाली, " जर मला नीतीने आयुष्यक्रम कंठिता येत नसेल तर मला ऐश्वर्य नको. राजवाड्यापेक्षा कष्टमय वनवास अधिक प्रिय आहे. " तुम्ही देखील हाच बाणा बाळगला पाहिजे. तुम्ही कष्ट करण्यास का भ्यावे ? तुमच्या इतर हजारो भगिनींप्रमाणे आपआपल्या गावी जाऊन किंवा नोकऱ्या करून काबाडकष्टाने उपजीविका करण्यास तुम्हांस का जड वाटावे ? तुम्हांला आपल्या जातीचा अभिमान का नसावा ? हे स्वतःचे विटंबना करणारे व जातीला काळीमा फासणारे जीवित तुम्ही का सोडू नये ? तुमच्या या लांछनास्पद धंद्याने संबंध महार जातीला किती लाज आणली आहे याची कदाचित् तुम्हांला कल्पना नसेल, पण आम्हांला हरघडी तुमच्यामुळे मान खाली घालावी लागते. काही वर्षापूर्वी कामाठीपुऱ्यात मी एका सभेला गेलो होतो. त्यावेळेस माझे मित्र डॉ. सोळंकीही हजर होते. शिक्षणाविषयी भाषण करताना मी म्हणालो होतो की, सरकार शिक्षणाच्या बाबतीत मुसलमानांना ज्या सवलती देते त्या अस्पृश्य समाजास देत नाही. ही गोष्ट अगदी खरी आहे. त्या ठिकाणी काही मुसलमान गृहस्थ हजर होते. त्यापैकी एकाने सांगितले की, महारांस मुसलमानांविषयी का वैषम्य वाटावे? आम्ही दोन दोन, चार चार महारणी ठेवतो. या बोचक वाक्याचे प्रत्युत्तर मी दिले नाही. पण या वाक्याचे मला किती वाईट वाटले असेल याची तुम्हीच कल्पना करा. मला कोणत्या गोष्टीची अतिशय चीड येत असेल, ज्या गोष्टीचा अतिशय संताप येऊन तळपायाची आग मस्तकात जात असेल तर या तुमच्या आयुष्यक्रमाची व

तुमच्या कामठीपुऱ्यातील राहणीची. म्हणून मी तुम्हांस परत एक वेळ बजावून सांगतो की तुम्हांस महार म्हणून घ्यावयाचे असेल तर हा गलिच्छ धंदा तुम्हांला एकदम सोडलाच पाहिजे. या धंद्यात राहून तुम्हास मी आमचे बरोबर येऊ देणार नाही आणि इतकेही करून तुम्ही ऐकणार नसाल तर मी तुमचा या ठिकाणाहून उठाव केल्याशिवाय राहणार नाही. तर तुम्ही तावडतोब जागे व्हा व या हीन चरित्रक्रमाचा त्याग करा.

मला आशा वाटते, ती ही की आजची सभा तुम्ही स्वयंस्फूर्तीने बोलाविली आहे व आपली सुधारणा करून घेण्यास उद्युक्त झाला आहा. तरी ही माझी आशा लवकर सफल होईल अशी इच्छा प्रदर्शित करून मी माझे भाषण संपवितो."

भाषण चालू असता जमलेल्या स्त्रियांची अंत:करणे सद्‌गदित झाली होती. कारण डॉ. बाबासाहेबांचे भाषण अत्यंत स्फूर्तिदायक असे झाले. नन्तर सभेतील इतर कार्यभाग आटोपल्यावर सभा बरखास्त झाली.' (जनता ४-७-१९३६, पा. ६)

या सभेचा वृत्तांत इतर वर्तमानपत्रांतूनही प्रसिद्ध केला होता. ' दी टाईम्स ऑफ इंडिया' ने जो वृत्तांत प्रसिद्ध केला होता तो मी खाली देत आहे :—

**' Dr. Ambedkar's plea for clean livng - Advice to Mahar women.**

An impassioned appeal to cast off the evil practices and customs among certain sections of the depressed classes was made by Dr. Ambedkar at a meeting at Damodar Thakarsey Hall, Bombay, on Tuesday night.

The meeting was largely atteneded by man and women belonging to the Devdasi, Patraje ( potraj ), Bhute, Aradhi and Jogiti ( Jogti ) sects and was held to accord support to the mass conversation move inaugarated at Yeola.

After several speakers, both men and women, had addressed the gathering on the need for a change of faith as a step towards social freedom, Dr. Ambedkar made a fervent appeal especially to the women, most of whom had come from Kamathipura.

" Whether you change religion along with us or not, " said the doctor addressing the women, " it does not matter much. But I insist that if you want to be with the rest of us, you must give up your disgraecful life. The mahar women of Kamathipura are a shame to the community. Unless you are prepared to change your ways, we shall have nothing to do with you, and we shall have no use for you. These are only two ways open to you either you remain where you are and continue to be despised and shamed or you give up your desgusting profession and come with us "

Proceeding, Dr. Ambedkar said, " You will ask me how you are to make your living, I am not going to tell you that. There are hundreds of ways of doing it. But I insist that you must give up this disgrading life. You must marry and settle down to normal domestic life like as women of other classes do and not continue to live under conditions which inevitably drag into prostitution " (The Times of India, dated 17-6-1936, P. 12, Wednesday).

ही सभा संपल्यानंतर आलेल्या स्त्री-पुरुषांनी हॉलच्या आत बराच दंगा केला व हॉलच्या बाहेरही रस्त्यावर येऊन त्यांनी शिव्या हासडल्या व आरडा-ओरड केली. या दंगलीमुळे पोयबावडी परळ येथे त्या रात्री वातावरण थोडेसे गरम झाले होते. दंगेखोर लोक ट्राम, व्हिक्टोरिया, रेल्वे इत्यादी वाहनांनी परत आपापल्या घरी गेले. मी या सभेस हजर नव्हतो म्हणून मी या सभेचा वृत्तांत काय होता, याबद्दल प. वा. श्री. दिवाकर पगारे यांना १९४० च्या डिसेंबरमध्ये विचारला होता. तेव्हा त्यांनी मला जो वृत्तान्त सांगितला तो असा–

या स्त्रीपुरुषांना मडकेबुवा वगैरे लोकांनी असे भासविले होते की तुमच्या-वर पोलीस वगैरे लोकांकडून जो त्रास होतो तो बाबासाहेब सरकारकडून कमी करवून घेतील, तेव्हा तुम्ही दहा रुपये प्रत्येक माणशी द्या व सभेला या. चार पाच लॉरीज भरून स्त्रिया सभेला आल्या. साहेबांचे भाषण ऐकून त्या स्त्रिया संतापल्या व त्यांनी सभेत गोंगाट सुरू केला. त्यांचे म्हणणे असे होते की, तुम्ही आम्हांला व्यवसाय सोडा म्हणता; मग आमच्या पोटापाण्याची व्यवस्था तुम्ही काय करणार? तुमच्या लोकांनी आम्हांला भूलथापा देऊन येथे आणले. आम्ही येथून जातो! या भाषणामुळे स्त्रियांनी सभागृह सोडले व त्या शिव्याशाप

देत रस्त्यावर आल्या. त्यांच्या गोंगाटामुळे आसपासचे लोक थक्क झाले. या सर्व परिस्थितीमुळे या प्रकरणाबद्दल काही पत्रांतून टीका झाली. या संबंधीचा उल्लेख जनतेच्या अहवालात नाही. श्री. पगारे यांनी मला सांगितलेला वृत्तान्त बऱ्याच अंशी खरा असावा असे मला वाटले म्हणूनच मी सदर टीका येथे उद्धृत करीत आहे. हेतू हा की, वाचकांना आणि अभ्यासू विद्यार्थ्यांना सत्य परिस्थितीची दुसरी बाजू पाहावयास मिळावी.

१) **प्रमोद**, दि. २१–६–१९३६, पा. ४. मुंबई.

## " वेश्या व डॉ. आंबेडकर "

ता. १६ रोजी मुंबई येथे परेल दामोदर हॉलमध्ये देवदासी, वाघ्ये, मुरळचा, कडकलक्ष्मी इ. अनैतिक धंदे करणाऱ्या लोकांची जाहीर सभा भरली होती. या सभेस कामाठीपुऱ्यातील वेश्यांची अलोट गर्दी जमली होती. सुमारे २०० वेश्या तरी या प्रसंगी हजर असाव्यात. प्रथमतः गायन-वादनाचा कार्यक्रम पार पडल्यावर देवदासी समाजातील काही वक्त्यांची भाषणे होऊन त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराला पाठिंबा दिला. त्यानंतर डॉ. आंबेडकरांचे भाषण झाले. त्याचा थोडक्यांत सारांश पुढीलप्रमाणे आहे.

" वेश्याव्यवसाय हा कोणत्याही धर्मावरील कलंक आहे. हे कलंकित जिणे घेऊन मी तुम्हांला धर्मांतर करू देणार नाही. कामाठीपुऱ्यातील तुमच्या व्यवसायाची पाळेमुळे नाहीशी केल्याखेरीज मी धर्मांतराच्या गोष्टी तुम्हांला बोलू देणार नाही. हा तुमचा व्यवसाय बंद करण्यासाठी मी शेकडो कार्यकर्त्या तरुणांना आपले सर्वस्व वेचायला भाग पाडीन. स्त्री हा अलंकार मानला जातो; पण त्या अलंकाराची वेश्याव्यवसायामुळे आज माती झाली आहे. चिखल झाला आहे. त्या चिखलाचे डाग महारांना आपल्या अंगावर उडवून घेण्याची इच्छा नाही. तुम्ही महार जातीचे नाव घेऊ नका. त्यांचे अनुकरण करू नका. तुम्हांला धर्मांतर करावयाचे असेल तर वाटेल त्या धर्मांत जा, पण आपल्या पक्तीला महारांना बसविण्याचा उपद्व्याप करू नका. आधी कामाठीपुऱ्यातील दुकाने बंद करा. देहविक्रय थांबवा, आणि नंतर सहकार्याची अपेक्षा करा. "

डॉ. आंबेडकर यांच्या भाषणाने सभेच्या चालकांची व तेथे जमलेल्या देवदासींची निराशा झाली असावी.

२) **नवा मनु**, शनिवार, २७–६–३६ (मुंबई)

## वेश्या वर्गाबद्दल डॉ. आंबेडकरांचे हीन उद्गार

हिंदुधर्मात अस्पृश्यांना माणुसकीचे जीवन मिळत नाही म्हणून सर्व अस्पृश्यांनी, म्हणजे ज्यांना हल्ली हरिजन म्हणण्याच्या प्रघात पडला आहे त्या सर्व हरिजनांनी, धर्मांतर करावे अशी डॉ. आंबेडकर यांनी येवले परिषदेत घोषणा केली. तेव्हापासून निरनिराळ्या अस्पृश्य जातीतर्फे डॉ. साहेबांच्या या घोषणेला पाठिंबा देण्यासाठी जातीनिहाय सभा, परिषदांची झोड उठली आहे.

मे अखेर दादर येथे भरलेल्या महार, मांग, वगैरे खास परिषदांचा गाजा-वाजा पाहिलाच आहे. गेल्या ता. ६ रोजी परेल दामोदर हॉलमध्ये अशी एक पोटजात सभा भरली होती. सभेस देवदासी, मुरळ्या, भुते, कडकलक्ष्मी, जोगते वगैरे जातीचे लोक हजर होते. सभेचा विशेष म्हणजे सभेस कामाठीपुऱ्यातील महार वेश्यांचा बराच मोठा जमाव धर्मांतराच्या घोषणेला पाठिंबा देण्याकरिता प्रमुखपणे हजर होता.

## महार जातीवरील कलंक

ह्या वेश्यांना उद्देशूनच डॉ. मजकुरांनी प्रामुख्याने भाषण केले. ते म्हणाले, "आमच्या बरोबर तुम्ही धर्मांतर करणार की नाही, याबद्दल मला मुळीच पर्वा नाही. तुम्ही महार वेश्या आमच्या जातीला कलंक आहा. तुमचा आमचा काही सुद्धा संबंध नाही. तुम्हांला धर्मांतर करावयाचे असेल तर प्रथम हा धंदा सोडा. तुम्ही म्हणाल की, आम्ही खायचे काय? तुम्ही खायचे काय, जगायचे कसे, हा प्रश्न माझा नाही. तुम्ही काय धंदा करावा हे सांगण्याचे माझे काम नाही. तुम्ही वाटेल ते करा. इतर जातींच्या लोकांप्रमाणे संसार थाटून रहा. हा अधोगतीचा मार्ग सोडण्यास तयार असाल तरच धर्मांतराची गोष्ट बोला."

## माणुसकीचा अभाव

वेश्यासंबंधाने डॉ. साहेबांचे हे उद्गार अत्यंत बेजाबाबदारपणाचे म्हटले पाहिजेत. पोटाची खळगी भरण्याकरिता तनुविक्रय करावा लागणे ह्या समाजा–तील दोषार्ह परिस्थितीला, दोष देण्याऐवजी आणि ती पद्धती कशी नाहीशी करावी

ह्याचा विचार आणि त्यासाठी उपाययोजना करण्याऐवजी, ह्या स्त्रियाच वाईट चालीच्या, बदमाष, व्यसनी आणि जातीला काळीमा आणणाऱ्या अशी ब्राह्मणी नीतिमत्तेचा आव आणणाऱ्या डॉ. साहेबांनी, त्यांना दूषणे दिली आहेत. आपण होऊन आनंदाने व मजेने स्त्रिया तनूविक्रय करण्याला तयार होतात. असे म्हणणे म्हणजे स्त्रीत्वाचा उपमर्द करणारे, उन्मत्त, बेपवाईचे वर्तन तर आहेच; पण त्याहीपेक्षा असे उद्‌गार काढणाऱ्याच्या ठिकाणी साधी माणुसकीही नाही असे दाखविणारे आहे.

वेश्या-प्रतिबंधक योजनांचा विचार करण्यासाठी लीग ऑफ नेशन्सने कमिटी नेमून निरनिराळ्या देशांतील वेश्याव्यवसायाबद्दल रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यात आर्थिक हलाखी व उपासमार हीच स्त्रियांना वेश्येच्या धंद्यात ओढ-ण्यास प्रामुख्याने व बव्हंशी कारणे आहेत असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला आहे. जपान, चीन वगैरे देशातून तर जाईंट स्टॉक कंपन्या काढून इतर कारखान्यां-प्रमाणे कुंटणखाने चालविण्यात येतात. भांडवलशाही पद्धतीने कारखान्यातील मजुरांप्रमाणे स्त्रियांच्या तनूविक्रयावर नफेबाजी व सट्टाबाजारही चालतात.

## तनुविक्रयाची कारणे

पण इतर देशांचे तरी दाखले कशाला? खुद्द मुंबईत 'व्हिजिलन्स सोसायटी' मार्फत जे अनेक खटले कोर्टात येतात, त्या हकिकती, वकिलीचा धंदा करणाऱ्या डॉक्टरसाहेबांचे डोळ्यांखालून गेल्या नसतील असे म्हणणे धाडसाचे होईल. ह्या खटल्यांमधून ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे की नुसत्या धंदेवाईक वेश्याच नव्हे तर चांगल्या संभावित गरजू स्त्रियांनाही दारिद्र्यामुळे तनुविक्रयावर स्वत:ची व आप्तेष्टांची गुजराण करणे भाग पडलेले आहे. उघड कुंटणखान्या-इतका हा प्रकार समाजात विस्तृत प्रमाणावर चालणे परिस्थितीने भाग पडते. नुसत्या दारिद्र्याच्या गांजणुकीनेच त्यांना या जिवंत नरकात ओढून आणलेले आहे. मुलेबाळे, संसार ह्यांची तळमळ वेश्यांना नसते, असे म्हणणे म्हणजे त्या मनुष्यच नव्हेत असे म्हणण्यासारखे आहे. घरदार, संसार ह्यांची ओढ इतरांप्रमाणे त्यांनाही असते. मनुष्यत्वाचे सर्व भाव त्यांच्या हृदयात असतात. पण असलेले घरदार, आप्ते, सोयरे ह्यांना पारखे होऊन ह्या नरकात राहणे परिस्थितीने त्यांना भाग पाडले आहे. असे असता तुम्हीच वाईट आहात, हा मार्ग सोडा, म्हणायचे पण

माणुसकीचे जीवन कसे मिळवावे, काय करावे, काय खावे हे मात्र आम्ही सांगणार नाही, असे बेपर्वाईचे चढेल भाषण करणे म्हणजे जखमेवर मिठाचे पाणी शिंपडण्यासारखे आहे.

डॉ. साहेबांसारख्या सुविद्य, विचारी माणसाला समाजात दारिद्रय कसे माजले आहे; बेकारी किती भेसूर पसरली आहे आणि त्यामुळे संसार, घरेदारे कशी उद्ध्वस्त होत आहेत हे दिसत असता, ह्या स्त्रियांना लग्न करून घरदार थाटा म्हणणे हे किती हास्यास्पद व अशक्य आहे हे कळत नसेल, असे नाही; पण खरा प्रश्न जो पिळवणूक आणि दारिद्रय यांचा नायनाट करणे, त्याला हात घालणे, नव्या राजवटीच्या मानसन्मानांपुढे डॉ. साहेबांना सोयीचे नाही. सर्व अस्पृश्य जनता ही, समाजाचा सर्वांत हलाखीच्या स्थितीतला, दरिद्री, निकृष्ट भाग आहे. त्याचे दारिद्रय, त्यांची समाजाकडून होणारी पिळवणूक ही थांबल्याखेरीज त्यांना सुखाचे दिवस लाभणे शक्य नाही. पण या प्रश्नाला असा उघड हात घालणे म्हणजेच विद्यमान समाजरचनेवर व तिच्यावर अधिष्ठित असलेल्या राजवटीवरच हल्ला करावा लागणार. तेव्हा या भानगडींना बगल देऊनच शिवाशिवीसारख्या पोकळ, धार्मिक प्रश्नांचे व सामाजिक अटी, दुराग्रहांचे स्तोम माजवून आगामी निवडणुकांच्या वेळी हंगामी पुरेसा पाठिंबा मिळवून वेळ मारून नेण्याचा डॉ. मजकुरांचा आशय स्पष्ट आहे. पिढान्‌पिढ्या रुढिमूलक दुराग्रहांच्या अमानुष छळामुळे गांजलेल्या अस्पृश्य मनाला धर्मांतर वगैरे गोष्टींनी आज क्षणभर मोह पडत असला तरी धर्मांतर होऊन गेल्यावरही निकृष्ट अवस्था सुधारत नाही, हा अनुभव आल्यावर डॉ. साहेबांचे हे थातुरमातुर चालण्यासारखे नाही."

या दोन्ही पत्रांची टीका सवर्ण हिंदूंच्या दृष्टिकोनाची होती. तीत या पतित स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी सवर्णांनी फारसे भरीव कार्य केलेले नव्हते. गोवा, वेंगुर्ले या भागातील देवदासी मुंबईत हा धंदा करीत असतात. त्यांची सुधारणा करण्यासाठी व त्यांना या व्यवसायाच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या संस्था मुंबईत होत्या. या अस्पृश्य जातींतील स्त्रियांना सुधारून त्यानंतर योग्य मार्गाला लावण्यासाठी कार्य करणारी अस्पृश्यांची संस्था मुंबईत नव्हती. या स्त्रियांच्या प्रश्नाला गती देण्याचा बाबासाहेबांचा हा पहिलाच प्रयत्न होता. पुढील काळात त्यांना ती गती वाढवायची होती. पण त्यासाठी बाबासाहेबांना **जून १९३६ च्या पुढील काळात वेश्यांची सुधारणा करण्यासाठी भरपूर लक्ष देता आले नाही, कारण त्यांचा सर्व वेळ राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्यांसाठी खर्च होत गेला.**

वेश्याव्यवसाय हा अतिपुरातन काळचा व्यवसाय होय. तो सर्व देशांत, सर्व समाजांत, सर्व जातींत, सदा सर्वकाळ चालत आलेला आहे. या व्यवसायाचे मूळ कारण दारिद्रय व दुसरे कारण अज्ञान. ही दोन्ही कारणे अस्पृश्य समाजात भरपूरपणे अस्तित्वांत आहेत या व्यवसायाला धार्मिक स्वरूप देण्यासाठी देवदासी, जोगत्या, मुरळ्या, भाविणी वगैरे प्रकारांनी देवांना व देवींना मुली सोडण्याची चाल हिंदुसमाजात चालू झाली. ही चाल अनिष्ट आहे व ती समाजात चालू देऊ नये असे हिंदुधर्मांचे रक्षक व देवांचे पुजारी ब्राह्मण यांनाच कधीही वाटले नाही. उलटअंशी या चालीला त्यांनी उचलून धरले व देवदासींना गिऱ्हाईक मिळवून देण्याची व त्यांत गुप्तपणे कमिशन कमविण्याची चाल त्यांनी सुरू केली. हा व्यवसाय इतर देशांत व्यापारी दृष्टीने करण्यात येतो; व त्यात अनेक श्रीमंतांनी करोडो रुपयांचे भांडवल गुंतविलेले आहे. या व्यापाऱ्यांची भव्य वेश्यागृहे अनेक मोठ्या शहरांतून व बंदरांतून आहेत. या व्यापाऱ्यांच्या कार्याची नक्कल हिंदुस्थानात सुरू झाली व हिंदी वेश्याव्यवसाय हा व्यापारी तत्त्वावर मुंबई, पुणे, कलकत्ता, लाहोर, मद्रास वगैरे मोठ्या बंदरातून सुरू झाला. मुंबईतील वेश्याव्यवसायात अस्पृश्य समाजातील स्त्रियांचा मोठा भरणा आहे. त्यातून मुरळ्या, जोगत्या, देवदासी यांची संख्या फार मोठी आहे. मुंबईत १९३० सालात सुमारे ७०० वेश्यागृहे व सुमारे ९००० वेश्या होत्या. त्यापैकी ५० टक्के हिंदू, १५ टक्के युरोपियन, ३५ टक्के मुसलमान, पार्शी वगैरे अन्य जातींच्या व धर्मांच्या वेश्या होत्या. हिंदू वेश्यांमध्ये अस्पृश्य वेश्यांची संख्या जास्त होती. ( Second Annual report of the league of purity, 1930, p. p. 17 – 18 )

(1) The Bombay Prostitution Act ( section 3, 5 & 6 ) soliciting for the puropse of prostitution, living on earning of prostitution and procuring women or girls for the purpose of prostitution आणि (2) children's Act ( section 7 (1) unproteceted children ) या कायद्यान्वये वेश्या व्यवसायातून मुक्त होऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांना व मुलींना मदत करता येते. मात्र या बाबतीत अस्पृश्यांच्या उभ्या चळवळीत असे एकही उदाहरण झालेले नाही. वेश्याव्यवसायाला उत्तेजन देणारी साधने सरकारने बंद करावीत, असे आपले मत बाबासाहेबांनी, सोशल प्युरिटी लीगला कळविले होते. त्यांचे पत्र लीगच्या दुसऱ्या रिपोर्टात पान १६ वर छापले होते. ते येणेप्रमाणे :–

Damodar Hall, Parel,
Bombay 15 th Aug. 1930,

The activities, so called amusement parks or carnivals, in the city of Bombay are not what they are advertised to be. There is nothing like amusement in there carnivals. They are nothing but dens to deprive poor workers of their money and morals. Some action is quite necessary to put a stop to such sources of evils in the city.

Sd / Dr. B. R. Ambedkar
M. A., Ph. D., D. Sc., Bar at law.

वेश्याव्यवसाय यूरोप, आशिया अमेरिका आणि आफ्रिका खंडांतील निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या पद्धतीने चालविण्यात येतो. वेश्यांना शक्य तो जास्त सहानुभूतीने वागविण्याचे प्रयत्न तेथे होतात. विशेषता जपानमध्ये या व्यवसायाला शुद्ध व्यापारी स्वरूप देण्यात आलेले आहे. या व्यवसायात लाखो रुपये मिळवून आयुष्याच्या शेवटचे दिवस हजारो स्त्रिया सुखाने घालवितात. समाजातही त्यांना वाईट रीतीने वागविले जात नाही. अशा प्रकारच्या काही स्त्रियांनी आत्मचरित्रे प्रसिद्ध केलेली आहेत. त्यापैकी " The men in my life ' by Martha Wats हे आत्मचरित्र उत्कृष्ट होय. या स्त्रियांनी आपले अनुभव अत्यंत उघडया अंत–करणाने लिहिलेले आहेत. त्यांचे मत असे की, उत्तम प्रकृतीची तरुणी या व्यवसायात फार तर दहा पंधरा वर्षे टिकू शकते. अगदी अल्पावधीतच जर तिला गुप्तरोग झाला तर ती तीन चार वर्षांत व्यवसायाला नालायक ठरते व शेवटी रोगामुळे मृत्यू पावते. हिंदुस्तानात हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो आणि तो अत्यंत अमानुषपणे !

व्यवसायातील स्त्रियांवर मालक अनेक प्रकारचे अत्याचार करतात आणि आणि त्यांना कमी खर्चाच्या जीवनावर जगवितात. शेकडा ९५ स्त्रिया लवकरच रोगांनी व खाण्यापिण्याच्या हलाखीने जर्जर होतात. मग त्या धंद्यास नालायक होतात. मालक त्यांना हाकलून देतात. अशा दुःखी स्त्रिया एका छोटया घाणेरडया खोलीत ७-८ जणी राहून व्यवसाय करतात. त्यावेळी यांना ४-८ आणे देणारी गिऱ्हाइके मिळतात. मालक व मालकीण ते बहुधा मुसलमान व हिंदू असतात इतक्या अडचणींना तोंड देऊन काही वेश्या स्वतःच्या कमाईवर स्वतंत्र होतात व स्वतः मालकिणी बनतात. अशा वेश्यांनी स्वतःची स्थावर, जंगम इस्टेट केलेली आहे. अशा एका स्त्रीचे उदाहरण माझ्या ऐकिवात आहे. तिचे नाव भागाबाई.

जात महार, राहण्याचे गाव-सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात. सासरच्या छळाला कंटाळून ती परपुरुषाबरोबर पळून मुंबईला आली. काही दिवसांनी त्याने तिला सोडली. ती दुसऱ्या बरोबर राहू लागली. असे तिचे बरेच यजमान झाले. शेवटी ती वेश्यागृहाच्या दलालाच्या तावडीत सापडली. तिने वेश्यागृहात १०–१५ वर्षे व्यवसाय केला; सर्व त्रासांना व रोगांना तोंड देऊन तिने कामाठी–पुऱ्यात स्वतःचे वेश्यागृह सुरू केले. ती ते गृह एका मुसलमानाच्या मदतीने चालवी. भावाला भेटण्यासाठी ती १९२४ सालात गावी जाताना ती कोरेगाव स्टेशनवर उतरली. तिचे व तिच्या मुसलमान मित्राचे एकंदर स्वरूप पाहून तिला मोटार–सर्व्हिसवाले पॅसेंजर म्हणून घेऊन जाण्यास तयार होईनात. तेव्हा ती मुंबईला परतली व स्वतःची मोटार घेऊन आली. तिने मोटर–सर्व्हिस सुरू केली. पॅसेंजरचे दर तिने वेळोवेळी उतरवून ५० । ६० मैलाला ४ आण्यापर्यंत आणले. हेतू हा की, सवर्ण हिंदूंच्या मोटार सर्व्हिसेस बंद पाडाव्यात. पण ती एकटी मोटार सर्व्हिस-वाल्यांपुढे टिकाव धरू शकली नाही. तिने सर्व्हिस बंद केली. 'महारणीची मोटार' हें नांव त्यावेळी फार लोकप्रिय झाले होते. अस्पृश्यांचे पॅसेंजर ती बऱ्याच वेळा फुकटात नेई. ती आपल्या भावाला भेटावयास गावी गेली तेव्हा तिने पाटील–कुलकर्ण्यांना पोषाख केले व त्यांनी ते गुपचूप घेतले. तिच्या भावाने मात्र बहिणीकडून काही घेतले नाही. कारण ही कमाई भडवेगिरीची आहे, असे भाऊबंद म्हणतील. ही त्याला भीती होती. एका बंगाली ब्राह्मण ग्रॅज्युएट तरुणीला वेश्याव्यवसाय कसा पत्करावा लागला, तिला समाजाने व नातलगांनी किती निर्दयपणे वागविले याबद्दलची हकिगत तिने आपल्या आत्मचरित्रात दिलेली आहे. गिऱ्हाईकांत मोठे विद्वान, पुढारी, देशभक्त होते, हेही तिने स्पष्ट लिहलेले आहे.

**( The biography of an Educated Hindu fallen Girl )**

हें बंगाली ब्राह्मण ग्रॅज्युएट स्त्रीने लिहिलेले पुस्तक जेव्हा मी वाचले तेव्हा मला भागूबाईच्या चरित्राची आठवण झाली.

भागूबाई व बंगाली ब्राह्मण तरुणी यांच्या चरित्रात बरेच साम्य आहे, असे मला वाटले.

भागूबाईसारखी इतर उदाहरणे फार थोडी. १०–१५ वर्षे व्यवसाय करून मालक व मालकीण यांच्या कर्जफेडीत शेवटचे दिवस त्यांची मोलकरीण म्हणून

घालविण्यात अगर दुर्धर रोगांनी पछाडल्यामुळे भर रस्त्यावर रात्री २–४ आण्या–साठी तनुविक्रय करून अगर भीक मागत हिंडून आयुष्याचे शेवटचे दिवस कंठ–णाऱ्या दुर्दैवी स्त्रियांची संख्या फार ! कामाठीपुऱ्यातील व्यवसाय करणाऱ्या अस्पृश्य स्त्रियांची संघटना करून त्यांच्यात स्वाभिमान उत्पन्न करावा, त्यांच्या चळवळीच्या जोरावर त्यांना त्यांच्या अनिष्ट जंजाळातून मुक्त करावे, अशा प्रकारची विचारसरणी डॉ. बाबासाहेब कधी कधी खाजगी बैठकींतून व्यक्त करीत असत. १६–६–३६ च्या सभेत या स्त्रियांनी गोंधळ माजविल्यामुळे व बाबासाहेब त्यामुळे चिडून गेल्यामुळे त्यांच्या तोंडून त्या स्त्रियांना झोंबणारे शब्द बाहेर पडले व त्या स्त्रियांही तावातावाने अद्वा तद्वा बोलत निघून गेल्या. त्यानंतर बाबासाहेबांनी त्या स्त्रियांच्या प्रश्नाकडे कधीच पाहिले नाही.

# प्रकरण ७ वे

## धर्मांतराच्या चळवळीतील इतर अस्पृश्यांचा वाटा

धर्मांतराच्या चळवळीला महारेतर जाती, ढोर, चांभार, मांग, भंगी वगैरेंचा पाठिंबा नव्हता. तो मिळविण्याचा डॉ. बाबासाहेब व त्यांचे सहकारी यांनी फारसा प्रयत्न केला नाही. या जातींतील काही पुढारी व समाजसेवक तोंडदेखला पाठिंबा देत आणि नंतर विरोध दर्शवीत असत. या जातींतील बहुसंख्य लोकांचा उघड विरोध होता. अशा लोकांना उच्चवर्णीय समाजसेवक व राजकारणी लोकांचा पाठिंबा असे. असे हे महारेतर समाजसेवक वरिष्ठ वर्गाच्या मार्गदर्शनाखाली धर्मांतराला विरोध दर्शविणाऱ्या सभा व सम्मेलने भरवीत असत. अशा एका सम्मेलनाची हकिकत मी येथे उद्धृत करीत आहे :–

## भोकरवाडीत श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी

मातंग समाजाचे मानपत्र व जगद्गुरूंचा आशीर्वाद

## " जिवंत मांसाहार करा व क्षत्रिय धर्म स्वीकारा "

' पुणे येथील अखिल मातंग समाजातर्फे भोकरवाडीतील मातंग वस्तीत श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांना जाहीर मानपत्र देण्याचा समारंभ रविवार ता. २८ जून रोजी सकाळी साजरा करण्यात आला. त्यावेळी श्रीमत् शंकराचार्यांच्या बरोबर प्रि. अत्रे, श्री अनंतराव गद्रे हेही उपस्थित झाले होते. स्पृश्य व अस्पृश्य मंडळी मिळून एकंदर श्रोतृवृंदात ३०० वर लोक होते. शेट पोपटलाल शहा, श्री प्रतापसिंग पहिलवान, सुभेदार घाटगे, आचार्य भावे, रा. सकट, रा. लांडगे

रा. कारंडे, म्यु. कौन्सिलर, इन्स्पेक्टर दिवेकर इ. मंडळी व हरिजन स्त्रियाही हजर होत्या. सुरुवातीला मातंग मुलींनी स्वागतपर पद्य म्हटल्यावर पुढील मानपत्र वाचून दाखविण्यात आले.

'श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या आगमनामुळे आम्हां मातंगांना धन्यवाद वाटत आहे. शबरी प्रभू रामचंद्राचे स्वागत करताना जशी भांबावली त्याप्रमाणे आमची गत श्रींचे स्वागत करताना आज झाली आहे. आम्ही मातंग लोक श्रींचे प्रेमपूर्वक स्वागत करून आमचे सुखदुःख श्रींच्या चरणी मांडीत आहोत.

आम्ही मातंग लोक महर्षी मातंग, मार्कंडेय मुनी, शैलेंद्र ऋषी, ज्योतिषरत्न भाडळी या थोर कुळांतील आहोत. हिंदूच्या कोणत्याही धर्मसंघात आम्हांला अस्पृश्य लेखलेले नाही. मूळस्थंबू ग्रंथाच्या १८ व्या अध्यायात तर असे भविष्य आहे की, भगवान नारायण आपला १० वा अवतार मातंग बाईच्या पोटी घेणार आहेत. तापीमहात्म्य नावाच्या ग्रंथात तापी नदीशेजारी मातंग जातीच्या ७ राजांनी राज्य केल्याचा दाखला आहे. या शिवाय बौद्ध धर्माचा चीन देशात प्रचार करण्यासाठी मातंग मिशनरी गेल्याचा दाखला पाली भाषेतील ग्रंथात आहे. जैन लोकांच्या पवित्र ग्रंथात मातंग मुनींनी आपल्या ज्ञानाची भर घातलेली आहे. लिंगायत व मानभाव पंथातही शेकडो मातंग स्त्रीपुरुषांनी आपल्या ज्ञानाचे तेज दाखविलेले आढळून येते. महाराष्ट्रात मातंग लोक धाडसी म्हणून प्रसिद्ध आहेत. सुप्रसिद्ध नेताजी पालकर याचा शरीरसंरक्षक यल्लाप्पा मातंगच होता. मातंगांचा धाडसी स्वभाव लक्षात घेऊन स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज यांनी आपल्या सर्व तोफखान्यावर धाडसी मातंग गोलंदाजांची नेमणूक केलेली होती. सातारला त्यामुळेच तोफखानेवाल्या मांतगांचा मांगकडा या नावाने आजपर्यंत प्रसिद्ध आहे. पण आम्ही मातंग लोक शिक्षणात सर्व अस्पृश्यांत मागासलेले आहोत. महाराष्ट्रात इतर अस्पृश्यांत संख्येने आमच्या लोकांचा दुसरा नंबर आहे. आमचा धंदा दोरी–दोरखंडाचा असून तो स्वच्छ आहे. चारपाचशे वर्षांत आमची गणना अस्पृश्यांत झाली आहे. पूर्वी आमचा समाज स्पृश्यांत मोडत असे. आज घटकेस आमच्या समाजाच्या हितासाठी साताराचे भाऊराव पाटील यांनी मातंगांतील दोन पदवीधर एल. बी भिंगारदेवे, बी. ए. (ऑनर्स), के. एल. मोरे, बी. ए. हे दोन मातंगांचे लाल तयार केले आहेत. गुरुवर्य प्रो. माटे यांनी बऱ्याच सुशिक्षित मातंग मुलांस पुढे येण्याबद्दल अमोल मदत केली आहे. पुण्याच्या नारायण पेठेच्या मांगवाड्यात

तर वयोवृद्ध भावे मुनींनी मातंग लोकांच्या पोरापासून ते थेट म्हाताऱ्यापर्यंत त्यांच्या कल्याणासाठी त्या ठिकाणी कायमचेच तप चालविले आहे. या थोर पुरुषाखेरीज महाराष्ट्रात आम्हांस कोणाचा आधार नाही. सरकारने अस्पृश्यांस पुष्कळ हक्क व सवलती दिल्या आहेत. त्या आमच्या मातंगांच्या पदरी पडत नाहीत. अस्पृश्यांत आमच्या मातंगांची स्थिती फार शोचनीय आहे. हिंदुसम्राटा, तुझ्या आगमनाने आम्ही मातंग लोक आज पवित्र झालो आहोत. आमच्या मातंगांच्या वस्तीत दुसऱ्यांदा येऊन आमच्या लोकांस तू ऋणी करुन ठेविले आहेस. थोर पुरुषा, तुझ्या भगव्या चिंधीत जे सामर्थ्य आहे, ते सामर्थ्य एक लाख समाजापुढे व्याख्यान देणाऱ्या पुढाऱ्यांतसुद्धा नाही. हिंदुधर्म ही सर्व धर्मांची जननी आहे. त्या जननीचाच तेजस्वी सुपुत्र तू आहेस. हे आमच्या अस्पृश्यांच्या प्राणसख्या **तुझ्या भगव्या वस्त्रात सामर्थ्य एकवटलेले आहे.**

'समर्थाचा शिक्का ! धाक पडला ब्रह्मादिका' या म्हणीप्रमाणे तुझ्या त्या भगव्या चिंधीचा प्रभाव हिंदुस्तानच्या बादशाहचे प्रतिनिधी गव्हर्नर–जनरल यावर पडतो. गव्हर्नर जनरल हा जसा बादशाहाचा प्रतिनिधी आहे, त्याप्रमाणेच तुझ्या त्या भगव्या चिंधीचाही प्रतिनिधी आहे. हे थोर पुरुषा, तुझ्या पाठीशी आज गुरुनानकाच्या वाद्याचे बडवे आहेत. कै. शाहू छत्रपतींची ब्राह्मणेतर जनता आहे. मराठी वर्तमानपत्राचे सम्राट, केसरी, ज्ञानप्रकाश ही पत्रे आहेत. कै. गो. ग. आगरकर, रानडे यांच्यासारख्या सुधारकांचे तांडे पाठीशी आहेत. शेकडो वर्तमानपत्रांचे संपादक तुझ्या कार्यास अनुकूल आहेत. स्वर्गातून कै. गो. ग. आगरकर, रानडे, म. जोतीबा फुले, कै. शाहू छत्रपती, **श्रीवर असंख्य पवित्र** कार्याबद्दल--पुष्पवृष्टी करीत आहेत. श्रींनी आजच्या प्रसंगी आम्हां मातंगांना आपल्या दिव्य तेजाने मार्ग दाखवावा अशी आमची श्रींच्या चरणी विनंती आहे "

श्रींचे नम्र सेवक

**के. के. सकट** **बळीराम शंकर रोडगे**

(इतर ३२)

" यानंतर मातंग समाजाचे एक पुढारी रा. के. के. सकट यांनी जगद्गुरूंच्या कामगिरीबद्दल गौरवपर भाषण केले. . ." (ज्ञानप्रकाश, –१–७३६)

हे वृत्त पाहून बाबासाहेबांना चीड आली. ब्राह्मण्याच्या गुलामगिरीतून ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांना मुक्त करण्याची आपली चळवळ महारेतर लोक व

त्यांचे पाठीराखे नीट समजावून घेत नाहीत व आपल्या घातकी कृतीने चळवळीला अपशकून करतात, हे वाईट. भावी पिढ्या त्यांना समाजद्रोही म्हणूनच समजतील अशा प्रकारचे उद्गार खाजगी भाषणांतून व चर्चेतून ते काढीत असत. पण एवढ्यावर डॉ. बाबासाहेब संतुष्ट राहिले नाहीत. श्री शंकराचार्यांच्या पाद्यपूजेच्या समारंभानंतर पुण्याला ते एका सभेत बोलले. भाषणाच्या ओघात डॉ. बाबासाहेबांनी असे उद्गार काढले की जर हिंदू माझी अट मान्य करतील तर मी हिंदू धर्मात राहीन. ही अट कोणती हे समजावून घेण्यास पुण्यातील प्रतिष्ठित हिंदू लोक बाबासाहेबांना अहिल्याश्रम, भोकरवाडी, पुणे येथे भेटले. चर्चेत त्यांनी सांगितले की तुम्ही अगोदर १०० चित्पावन ब्राह्मण कुटुंबांकडून श्री. के. के. सकट यांना मातंग समाजाचे शंकराचार्य मानून त्यांची पाद्यपूजा जाहीरपणे पुण्यात घडवून आणा, मग मी माझी खरी अट तुम्हांला सांगेन. हा वृतान्त ज्ञानप्रकाशात प्रसिद्ध झाला होता, हे मात्र आठवते. डॉ. बाबासाहेबांचे हे उद्गार ब्राह्मणांना चिड-विण्यासाठी आहेत, त्याला महत्त्व न देता आपण त्यांची पुन: मनधरणी करूया असे काही सद्गृहस्थ म्हणाले. साहेबांनी आपली टिंगल केलेली आहे. तेव्हा त्यांचे आपण पुन्हा तोंड पाहू नये, असेही काही गृहस्थ म्हणाले. त्यांतील एक कट्टर हिंदुमहासभा अनुयायी श्री. अनंत हरी गद्रे म्हणाले, " हे साहेबांचे आव्हान आपण स्वीकारूया आणि १०० च काय १००० चित्पावन ब्राह्मण कुटुंबांकडून सकट यांची पाद्यपूजा करूया आणि आंबेडकरांना विचारूया, सांगा आता तुमची अट ! " पण या मुद्द्याला कोणी महत्त्व दिले नाही. श्री. गद्रे यांनी चित्पावन कुटुंबे या कार्यासाठी तयार करण्याची गुप्त मोहीम पुण्यात सुरू केली. पण शेवटी ती सर्वस्वी फसली. सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्ते यांना मात्र मनांतून आनंद झाला की आंबेडकरांनी पुणेरी ब्राह्मणांची चांगलीच जिरविली. पण त्यांना त्यावेळी हे सुचले नाही की, अस्पृश्यांना समान हक्क द्या, याबद्दल सवर्ण हिंदूचे मन तयार करण्यास जसे ब्राह्मण लोक असमर्थ आहेत तसेच असमर्थ सत्यशोधक व ब्राह्मणेतर लोकही आहेत. सर्वच अंधरूढीचे गुलाम ! पण डॉ. बाबासाहेबांनी ब्राह्मण–ब्राह्मणेतर हिंदूंची वरीलप्रमाणे जशी टिंगल केली, तशीच श्री. सकट यांचीही केली. मला या समाजसेवकाबद्दलची ऐकीव माहिती बरीच आहे. पण ती इथे देण्यात काही स्वारस्य नाही. माहिती अतिशयोक्तीची अगर खोटीही असेल, पण त्यांच्याशी एकदा अहिल्या आश्रमात बोलण्याचा प्रसंग आला, तेव्हा सदर समाजसेवकाची बौद्धिक व सांस्कृतिक पातळी कशी आहे हे समजून आले. त्यांच्या हातून भरीव कार्य झाल्याचे ऐकिवात नाही. मातंग समाजासाठीही त्यांनी काही विधायक कार्य केलेले नाही. अशा तऱ्हेच्या लोकांचा उपयोग ब्राह्मण

लोक डॉ. आंबेडकरांना विरोधक म्हणून उभे करण्यासाठी करीत असत. हाच मुद्दा येथे महत्त्वाचा होय. यासाठी चांभार व मांग समाजसेवकांना पैशांची मदत होत असे, असेही मला काही लोकांनी सांगितले होते.

# प्रकरण ८ वे

## डॉ. मुंजे – डॉ. आंबेडकर पत्रव्यवहार

डॉ. आंबेडकर यांनी शीख धर्म स्वीकारण्यासाठी हिंदूंकडून त्याना कोणत्या प्रकारचे सहाय्य पाहिजे, हे त्यांच्याशी वाटाघाटी करून नक्की काय ते ठरवा, अशा प्रकारचा पत्रव्यवहार मुंबईतील काही मित्र आणि श्रीमान जुगल किशोर बिर्ला यांनी डॉ. मुंजे यांच्याशी केला. तेव्हा डॉ. मुंजे १८ जून १९३६ ला मुंबईला आले व डॉ. आंबेडकरांच्या बरोबर तीन दिवस विचारविनिमय करून त्यांनी एक योजना ( फॉर्म्युला ) अगर तोडगा तयार केला. त्याला डॉ. आंबेडकरांनी सम्मती दिली; पण त्याचबरोबर साहेबांनी एक लेखी निवेदनही डॉ. मुंजे यांच्या हाती दिले.

डॉ. मुंजे यांनी सुचविलेला तोडगा असा :–

१) अस्पृश्यांनी, मुसलमान अगर ख्रिस्ती धर्म न स्वीकारता, शीख धर्म स्वीकारावा. त्या शीखधर्म स्वीकाराला हिंदुमहासभा पाठिंबा देईल.
२) नवशिखांची नोंद अनुसूचित जातींमध्ये करावी. आणि
३) पुणे कराराप्रमाणे जे राजकीय हक्क अस्पृश्यांना देण्यात आलेले आहेत ते नवशिखांनी सार्वजनिक निवडणुकीत भाग घेऊन मिळवावेत.

डॉ. आंबेडकरांचे लेखी निवेदन असे होते :–

"हिंदूंकडून अस्पृश्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणणे हे अशक्य दिसत असल्यामुळे अस्पृश्य लोक हिंदुधर्म सोडून दुसऱ्या धर्मात जाऊन आपली सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास उद्युक्त झालेले आहेत. हिंदूंनी त्यांना धर्मांतरापासून परावृत्त करणे, हे त्यांच्याच हिताचे आहे. पण हे करण्यास हिंदू तयार होत नसतील तर त्यांनी अस्पृश्यांच्या धर्मांतराचा विचार गंभीरपणे करणे जरूर आहे.

कारण या धर्मांतरामुळे भारत देश व हिंदू समाज यांच्यावर जबरदस्त घातक परिणाम होणार आहेत. हिंदूंनी धर्मांतराला पाठिंबा द्यावा. अस्पृश्य, नवा धर्म स्थापन करणार नाहीत. सध्या जे धर्म भारतात अस्तित्वात आहेत त्यांत (१) इस्लाम, (२) ख्रिश्चन, आणि (३) शीख हे तीन धर्म प्रमुख आहेत. यांपैकी ज्या धर्मात अस्पृश्यांना जास्तीत जास्त सवलती व फायदे मिळतील, तो धर्म अस्पृश्य स्वीकारतील. इस्लाम धर्म देशाच्या कोनाकोपऱ्यांत पसरलेला आहे आणि त्यांत गडगंज श्रीमंत आहेत की जे नवमुसलमानांसाठी कोटी कोटी रुपये खर्च करू शकतील. मुसलमान, नवमुसलमानांना जादा राजकीय हक्कही देतील आणि व्यापार उदीम व नोकऱ्या या बाबतींतही ते सहाय्य करतील. तीच स्थिती ख्रिस्ती समाजाची आहे. ते अस्पृश्य समाजाला आपल्या धर्मात सर्व सवलती देतील आणि धर्मांतरित अस्पृश्यांच्या प्रगतीला जोराची गती देतील. भारताबाहेरील देशातील ख्रिस्ती लोकही अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी कोटिकोटींनी पैसे खर्च करतील. हिंदी ख्रिस्ती समाज नवधर्मांतरित अस्पृश्यांना जादा राजकीय हक्कही देऊ शकतील.

इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म यांच्या मानाने शीख धर्म फारसा फायदेशीर दिसत नाही. शिखांची संख्या ४० लक्ष आहे आणि त्यांच्याकडे फारशी मोठी संपत्ती नाही. शीख लोक नवधर्मांतरित अस्पृश्यांना सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टाने फारसे साह्य करू शकणार नाहीत. असे असताही केवळ हिंदूंच्या हितावर आपण निखारे ठेवू नयेत म्हणून अस्पृश्य लोक शीख धर्म स्वीकारण्यास उद्युक्त झालेले आहेत कारण शीख झाल्याने अस्पृश्य लोक हिंदू संस्कृतीतच राहतात. इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर अस्पृश्य लोक हिंदू संस्कृतीच्या कक्षेतून दूर जातील. म्हणून शीख धर्माचा स्वीकार अस्पृश्यांनी केला तर तो परिणामी हिंदूंना हितावह होणार आहे.

अस्पृश्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला तर हिंदुस्थानात मुसलमानांची संख्या दुप्पट होईल. त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर ख्रिस्ती लोकांची संख्या सुमारे ५ ते ६ कोटी होईल. अस्पृश्य शीख झाले तर शिखांची संख्या वाढेल आणि राजकीय दृष्टीने या वाढलेल्या संख्येचा परिणाम इतर समाजाच्या राजकीय आकांक्षांना पायबंद घालील. म्हणून हिंदूंनी अस्पृश्यांच्या शीख धर्म स्वीकारात जे राजकीय आणि आर्थिक अडथळे येतील ते दूर करण्यास कंबर कसली पाहिजे. ज्या ज्या प्रांतात शीख आहेत तेथील शिखांच्या यादीत नवशिखांची नोंद केली पाहिजे, आणि जातीय निवाड्यामुळे जे राजकीय हक्क अस्पृश्यांना

मिळालेले आहेत ते त्यांना शीख धर्मात राहूनही मिळाले पाहिजेत, अशी हिंदूंनी घोषणा केली पाहिजे. हिंदूंनी मागणी मान्य केली तर पुणे करारात फारसा फेरफार करावा लागणार नाही. जे धर्मांतरित अस्पृश्य नाहीत ते आणि धर्मांतरित शीख या दोघांनाही पुणे करारातील जागा लढविण्यास मुभा राहील, असा पुणे करारात बदल करावा लागेल. हा मुद्दा हिंदूंनी मान्य केला नाही तर त्यांना राजकीय बखेड्याला तोंड द्यावे लागेल, आणि इतके करूनही त्यांना करारातील अस्पृश्यांच्या जागा धर्मांतर न केलेल्या अस्पृश्यांसाठी राखून ठेवता येणार नाहीत, याबद्दल हिंदूंनी सावधानपणाने विचार करावा.

शीख धर्म स्वीकारण्यासंबंधीचा तोडगा आणि आंबेडकरांचे लेखी निवेदन यांच्या नकला डॉ. मुंज्यांनी रा. ब. एम्. सी. राजा, पंडित मदन मोहन मालवीय, सी. राजगोपालाचारी आणि म. गांधी यांना पाठवून त्यांची संमती मागविली. पण त्या चौघांनीही पसंती दर्शविली नाही. राजा यांचे म्हणणे असे की या शीखधर्म स्वीकार तोडग्यामुळे मुसलमान नाराज होतील आणि मग देशात मोठे पेचप्रसंग निर्माण होतील. या म्हणण्याला बाकीच्या तिघांनी पाठिंबा दिला. आम्हां अस्पृश्यांना आंबेडकर शेळ्या व गुरे समजून दुसऱ्या धर्मात नेत आहेत, हेच मला मान्य नाही असे राजांचे म्हणणे होते. हिंदूंनी अस्पृश्यांना जवळ करावे व त्याच्या प्रगतीस सहाय्य करावे असे ते म्हणाले. गांधीजींचे मत असे की, अस्पृश्यता निवारण हा हिंदूंचा धर्म आहे व तो त्यांनी पाळलाच पाहिजे. धर्मांतर हे भयंकर आहे व त्याला माझा विरोध आहे वगैरे.

वरील सर्व हकिकत इंग्लिशमध्ये प्रसिद्ध झाली होती. ती अशी–

**' The Munje – Ambedkar Correspondence,**
**Re : Conversion of Depressed Classes.**

" Dr. Ambedkar's views on the relative advantages to the Depressed Classes by embracing one religion or the other, the formula agreed upon between Dr. Ambedkar and Dr. B. S. Munje, Rao Bahadur M. C. Rajhas disagreement with the formula and endorsement of Rajha's views by Mahatma Gandhi, Pandit Malaviya and Mr. C. Rajgopalachari are disclosed in the following correspondence released to the press for publicatlon .–

## Dr. Moonje's Letter to Mr. Rajah

Dr. Moonje wrote the following letter dated, ( New Delhi ) 30 th June 1939 to Rao Bahadur M. C. Rajah :-

On urgent calls from Bombay friends and also from Shreeman Seth Jugal Kishore Birla with the concurrence of Dr. Ambedkar, I had occasion to go to Bombay on the 18th instant. There Dr. Ambedkar had long conversation with me for three days. Eventually a formula for amicable settlement of his revolt against Hinduism was drafted. Dr. Ambedkar entirely agrees with it. The formula is as follows :—

If Dr. Ambedkar were to announce his decision that he and his followers are prepared to embrace Sikhism in preferance to Islam and Christianity and that he shall honestly and sincerely cooperate with the Hindus and the Sikhs in propagating their culture and in countering the muslim movement for drawing the depressed classes into the Muslim fold, the Hindu Mahasabha will be prepared in view of their having agreed to remain within the Hindu culture, to make an announcement that it will not object ;-

1) To the conversion of the depressed classes to sikhism.

2) To the inclusion of the neo-sikhs in the list of the scheduled castes;and

3) To the enjoyment by the depressed classes of the political rights of the Poona pact by free competition between the non-Sikhs and the Neo-Sikh depressed classes as provided for under the Poona pact. From Bombay I have come here just this morning for consultatian on it with formally putting it before friends and before the Hindu Mahasabha, for its consideration. I am trying to see Pandit Malaviyaji and if possible also H H. The Maharaja of Patiyala. It is a very delicate matter. I have, therefore, to request you to kindly think over it and let me have your opinion in the matter. Until we decide one way or the other, the matter will be kept strictly private and confidential.

I am enclosing also a copy of the statement of his case

handed over to me, by Dr Ambedkar for your Persual. Please let me have your reply to my Nagpur address.

## Dr. Ambedkar's Statement

Dr. Ambedkar's statement referred to in Dr. Moonje's letter read (s) as follows ;-

The Hindus cannot afford to be indiffereut to the movement of conversion which is gaining ground among the depressed classes. It would undoubtedly be the best thing from the standpoint of the Hindus the depressed classes were to be persuaded to drop idea of conversion But if that is not possible then the hindus must cohcern themselves with the next move which the depressed classes will take, because their move is bound to have serious consequences upon the destiny of the Hindus and the destiny of the country. If they cannot be persuaded to stay, the Hindus must help if they cannot lead them to embrace a faith which will be least harmful to the Hindus and to the country.

It seems very unlikely that the depressed ceasses will formulate a new religion. Most probably they will embrace one of the existing faiths. At any rate, the Hindus can well proceed on that assumption. The first question is what is the faith that the depressed classes are likely to embraee ? Obviously the one most advantageous to them.

There are three faiths among which the depressed classes can choose
1) Islam, 2) Christanity, 3) Sikhism.
Comparing these three, Islam seems to give the depressed classes all that they need. Financially the resourees behind Islam are boundless. Socially the Mohamedans are spread all over India. There are Mohamedans in every province and they can take care of the new converts from the depressed classes and tender them all help. Politically the depressed classes will get all the rights which Mohgmedans are entitled to. Convertion to Islam does not involve loss to such political rights as the right to special representation in the legislature, right to services, etc.

Christianity seems equally attractive. If Indian Christians are too small numerically to provide the financial recources necessary for the conversion of the depressed classes, the christian countries such as America and England will pour their immense resourecs if the depressed classes show their readiness to embrace Christianity. Socially the christian community is numericallv too weak to render much support to the converts from the depressed classes, but Christianity has government behind it. Politically christianity, will give them the same rights which Islam gives. Like the Maslims, indian christians are also recognised by the constitution for speeial representation in the legislatures and in the services.

Compared to Christianity and Islam, Sikhism has few attractions. Being a small community of 40 lakhs, the Sikhs cannot provide the finance. Socially, they cannot be of much help to the depressed classes. They are confined to the Punjab, and as for the majority of the depressed classes the Sikhs can give them no social support. Politically, Sikhism is at a positive disadvantage as compared with Islam or Christianity. Outside the Punjab, Sikhs are not recognized for special representation in the legislature and in the services.

The second suggestion is, looking at these three altetrative faiths purely fror the standpoint of the Hindus, which is the best,- Islam, christianity or Sikhism, Obviouslv Sikhism is the best. If the depressed classes join Islam or Christianity they not only go out of the Hindu religion, but they go also out of the Hindu Culture. On the other hand, if they become Sikhs they remain within the Hindu Culture. This is by no means a small advantage to the Hindus.

What the consequences of conversion will be to the country as a whole is well worth bearing in mind. Conversion to Islam or Christanity will denationalise the deprssed classes. If they go to Islam the number of Muslims will be doubled and the danger of muslim domination also becomes real. If they go to,

Christianity, the numerical strength to christians becomes 5 to 6 crores. It will help to strengthen the hold of the British on this country. On the other hand, if they embrace Sikhism they will not only harm but they will help the destiny of the country. They will not be denationalised. On the contrary, they will be a help in the political advancement of the country. Thus it is in the interest of the country that the depressed classes if they are to change their faith should go over to sikhism.

The third question is if it is in the interest of the Hindus that the depressed classes should go over to Sikhism, are the Hindus prepared to make Sikhism, as good an alternative to the depressed classes as Islam or Christianity is? If they are, then obviously they must try to remove the difficulties which lie in the way of Sikhism as compared with Islam and Christianity. The deficiencies are financial, social and political. The Hindus cannot help Sikhs to remove the social defficulty. But they can certainly help the sikhs to remove financial and political difficulties; Of these, it is most urgent to remove the political difficulty, because it might become an obstacle in the way of the Sikhs.

The solution of the political difficulty is fortunately a very small matter. All that is necessary is to add to the list of scheduled castes in each province other than the Punjab, the word "sikh" as that of a person from the depressed classes who becomes a convert to sikhism will not lose his political rights, he would have had if he had remained a deprssed class under the the communal award. Communities have been given the liberty to agree to any change in the award and the Government has bound itself to alter the award in accordance with the agreement.

This change can, therefore, easily be brought about if the Hindus so desire by mutual agreement with the deprerred classas. This does not invove any radical change in the Poona pact. It does not require any apportionment of any seats. The seats, assigned to the depressed classes under the Poona pact will remain the same. The only chenge that will

be inroduced is that non- sikh and depressed classes who have gone to sikhism – will both be free to compete. It merely removes a disability to the depressed classes who become sikh.

Those Hindus who oppose this suggestion must answer the following questions.

(1) The seats assigned to the depresed class under the Poona pact cannot come back to the Hindus. They will go to Muslim or Christians, if the depressed classes become Muslims or Christians. Because by conversion of the depressed classes the population of muslims or chiristians increases, then the muslim & chritians are bound to ask for increased representation in the legislatures. Thus if these seats are to go why not allow these seats to the sikhs ?

(2) If under the constiution the D. C. can not lose his political rights by becoming a muslim or christian, why should a D. C. on becoming a sikh, be made to lose his political rights ? This is placing premium on conversion to Islam and Christianity and a penalty on conversion to sikhism. This is driving the D. C. to the Muslim and christian folds. Is it in the interest of the Hindus to allow this to be so ?

(3) It may be that the D. C. will not loose their politic l rights by becoming converts to sikhism, because even under the Poona pact the scheduled castes order – in – concil their right to special represantation is not made dependant upon their prefering the Hindu religion. Their representaion is made dependant upon their being member of certain castes or rribes. But why give the sikhs cause for complaint and create bad blood against tne Hindus ?

(4) The propcsal to add sikhs to the list of sheduled castes In the different provinces for politcal recognition cannot be said to be a strange proposal. On the other hand, not to give such a recognition would appear queer If sikhs in the Punjab can be

recogrnised for political purpose, why should Sikhs in other provinces be not so recognised? If the D. C. of the Punjab cannot lose their rights on becoming Sikhs why shuld of the fate of the D.C. in other provinces on becoming Sikhs be made different?'

## Mr Raja's Reply to Dr. Moonje.

I have acready expressed my view about Dr. Ambedkar's proposal that the depressed classes should give up Hiduism and embrace some other religion. I make a distinction between coversion — which is a spiritual change and migration from one community to another for social, economic and political reasons.

Dear Dr. Moonje, you will excuse my saying that you view the whole problem of Depressed Classes, in view of Dr. Ambedkar's proposal, as one of the communal migration and not as a religious problem. One would expect the president of the Hindu Maha Sabha to view it as a religious problem and not merely as a political problem, without even looking at it as a social and economic problem. One can understand your concern if as President of the Hindu Mahasabha you placed the spiritual welfare of the Depressed Classes first and formost and thought of the social and economic welfare next and lastly thought of them as a political factor. Your solicitude for the place of the Depressed Classes in the political scheme not only exposes the interested nature of your concern for these classes, but is like placing the cart before the horse. One would expect you as president of the Hindu Mahasabha to ameliorate the social condition of the Depressed classes by removing civic and social disabilities of these classes, not to speak of securing for them the right of worship in Hindu temples on an equal fooing with other worshippers, and to further the Harijan movement started by Gandhiji all over the country. Instead of doing this, what is it that you are doing? You are dissecting the Depressed Classes and affiliating them religiously to the Sikhs while retaing them politically as Hindus.

The whole thing seems to me not to be conceived in the interest of the Depressed classes but on the other hand to be planned in the communal interests of the Hindus and the sikhs. We are not sheeps and cattle to be bartered away in this fashtion, driven from one political fold to another as a result of a bargain between the leaders of different communites. We want to remain as solid community moving of our own accord in the direction of progress and this we can best do by not throwing away our birth rights as Hindus but by remaining within Hinduism and changing it so as to make it more comfortable not only to our communities which are suffering from similar liabilities, though our hardships are greater and more palpable. It is not our purpose to weaken the Hindu community but to strenghthen it by reforming it from within. We do not wish to be pawns in the game of communal conflicts and competition.

Your proposal involves of electoral fortunes of Hindus, Sikhs and Muslims. If you want us to shift religion from the Hindu fold, we shall have to choose religion between the Sikhs and the Muslims who are the bidders for our communal migration, wrongly called conversion. Why should we antagonise and stand arrayed against Muslims ? They are our brothers as much as the Sikhs and the Hindus. If the Depressed Classes all to become Sikhs and call themselves Neo - Sikhs, it will create all over the India a Sikh - Hindu-Muslim problem, as in the Punjab, made move complicated by the fact that the so-aclled Neo-Sikh belongs to the Depressed Class even among Sikhs.

This question of conversion or the communal migration as a move of the political chess board does not disturb us much in South India. We are content to work under the Poona Pact, partly as a separate electorate and partly with a joint electorate preserving our status with the Hindus both religiously and politically. I would therefore be no party even to the polit cal manipulations which are proposed in your letter. I would urge the Hindu Mahasabha to address itself to the task of making easy for the Depressed Classes to stay within Hindism and

Hindu Society instead of arranging for the ticket for entraining them to some far off destination. As the qnestian you raise is likely to rousealot of discussion. I reserve to mysefr the rignt to publish my reply when the occasion arises.

## Mahatma Gandhi's Views

Mahatma Gandi's letter to Mr. Raja dated 26th July 1936:-

' I have no difficulty about giving general endorsement to your letter to Dr.Moonje. I do not at all understand Dr. Moonje's or Dr. Ambedkar's position. For me removal of untouchability stands on a footing all its own. It is to me a deeply religious question. The very existence of our religion depends on its voluntary removal by Savarna Hindu in the spirit of repentence. It can never be a question of barter to me. And I am glad you take nearly the same position that I do '(The Annual Register, Vol. II, July - December 1936, page 276-279.)

शीख धर्म स्वीकारण्याकडे डॉ. आंबेडकरांचा बराच कल आहे, हे ओळखल्यानंतर मुंबईतील सुशिक्षित तरुण शीख त्यांच्याशी विचार विनिमयासाठी राजगृहाकडे येऊ लागले. काही तरुण शीख बाबासाहेबांची बॅग घेऊन त्यांच्याबरोबर फोर्टमध्ये लॉ-कॉलेज अगर हायकोर्ट येथे जात व तेथून राजगृहाकडे संध्याकाळी येत असत. प्रो. वेदी हे रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स येथे नोकरीवर होते. ते बाबासाहेबांच्या सहवासात असलेले मला अनेक वेळा दिसले होते. वृद्ध शीखही राजगृहाकडे येत असत. एका सधन वृद्ध शिखाने चि. यशवंत व चि. मुकुंद (डॉ. आंबेडकराचा अनुक्रम मुलगा व पुतण्या) यांना अमृतसरला हवा पालटण्यासाठी व पंजाब युनिव्हर्सिटीतून मॅट्रिक पास होण्यासाठी नेण्याच्या विचारांचा कार्यक्रम बाबासाहेबांपुढे ठेवला. त्याला बाबासाहेबांनी संमती दिली. तेव्हा चि. यशवंत व चि. मुकुंद हे दोघे १९४१ साली सुमारे दीड महिना अमृतसरला जाऊन राहिले; व मुंबईला परत आले. पंजाब युनिव्हर्सिटीची मॅट्रिक परीक्षा दोघेही उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. त्यानंतर त्यांनी परीक्षेला बसण्याचा नाद सोडला.

अखिल भारतीय हिंदुमहासभेचे १८ वे अधिवेशन लाहोर येथे २१ ते २३ ऑक्टोबर १९३६ ला भरले होते. अध्यक्ष श्री. शंकराचार्य (डॉ. कूर्तकोटी) होते.

(The Indian Annual Register, Vol II, July-December 1936, Pages 253-261)

अस्पृश्यतेसंबंधी श्री शंकराचार्य म्हणाले की, काही कारणामुळे प्राचीन काळी अस्पृश्यता हिंदू समाजात उत्पन्न झाली. ती सध्याच्या परिस्थितीत अस्तित्वात राहू देणे सर्वथैव अयोग्य आहे. यासंबंधी मी पूर्वी अनेकदा हा मुद्दा सप्रमाण सिद्ध केलेला आहे. त्याची पुनरावृत्ती करण्याची जरूरी नाही. अस्पृश्यतेच्या रूढीमुळे आम्ही हिंदू, भारतातील उदात्त शिकवणुकीकडे डोळेझाक करीत आलेलो आहोत. ती शिकवण ही की, धर्माला तर्कनिष्ठ पाया असला पाहिजे; दुसऱ्याचे अंधानुकरण हा धर्म नव्हे. शांततामय काळात एक धर्म असतो, तर अशांत काळात अगदी वेगळा धर्म असला पाहिजे, जेथे तर्काला गोष्टी पेलू शकत नाहीत तेथे धर्मशास्त्रांचा आधार घेणे जरूर आहे, असे आद्य शंकराचार्य यांनी गीताभाष्यात म्हटलेले आहे. मात्र शास्त्राधार अगदी आंधळेपणाने घेऊ नये. तो केवळ प्रथम पाऊल टाकण्यासाठीच घ्यावा. प्रत्येक पावलासाठी शास्त्राधार घेणे मूर्खपणाचे होईल. अशी शिकवण बाजूला सारून आपण हिंदूंनी शास्त्राधाराचा एवढा बाऊ करून ठेवला की, त्यामुळे हिंदुसमाजजीवन गतिमान होऊ शकले नाही. अस्पृश्यता पाळणे ही मानवी धर्माला काळोखी आहे आणि यासाठी अस्पृश्य लोकांकडे आपण दयादृष्टीने पाहिले पाहिजे, हे मला मान्य नाही. आपण अस्पृश्यांना मानवी हक्कांपासून दूर ठेवले, ही आपली चूक झाली आणि ती चूक मान्य करून आणि अस्पृश्यांची क्षमा मागून आपण त्यांना जवळ घेतले पाहिजे. त्यांना ' हरिजन ' हे नाव देऊन आपण त्यांना दयेला पात्र असलेले भिकारी लोक, असे मानू लागलो आहोत. हे मला मान्य नाही ! ' डॉ. आंबेडकर हे एक खलपुरुष आहेत आणि ते आपल्या विषारी भाषणांनी हिंदु-समाजात वैरभाव निर्माण करीत आहेत ' असे काही हिंदू म्हणतात; मला ते मान्य नाही. उलट माझे असे मत आहे की, डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रचंड प्रयत्नांनी आणि कार्यांनी अस्पृश्य समाजाला जागे केले आणि त्यांच्यात स्वाभिमान, दलित जीवनाबद्दल लाज आणि उन्नत जीवनाबद्दल प्रयत्न करण्याची जिद्द निर्माण करून आम्हां सवर्ण हिंदूंना नतमस्तक केलेले आहे. हे त्यांचे आम्हांवर अगणित उपकार आहेत.

डॉ. आंबेडकरांना आम्हां हिंदूंच्या निष्क्रिय दुबळेपणाची जाणीव झाली, आणि हिंदू अस्पृश्यांबद्दल काही भरीव कार्य करण्यास असमर्थ आहेत, हे पाहून ते धर्मांतरास उद्युक्त झालेले. आहेत. त्यांनी शीख धर्म स्वीकारण्याची तयारी

दाखविलेली आहे, ती मला मान्य आहे. शीखधर्म स्वीकारल्याने मुसलमानांची मने संतप्त होतील, हे रावबहादूर राजांचे मत मला मान्य नाही. डॉ. आंबेडकरांच्या शीखधर्म स्वीकाराला काहीना काही कारण पुढे करून जे विरोध करतात त्यांच्या मनात मुसलमानांची भीती दडून बसलेली आहे, हे उघड आहे. अशा लोकांचा निषेध तीव्र भाषेत केला तर तो अस्थानी होणार नाही ..... वगैरे.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी ( २२ ऑक्टोबर ) प्रतिनिधींची तिकिटे संयुक्त प्रांतातील हिंदुमहासभेच्या प्रतिनिधींना देण्याचे स्थानिक पुढाऱ्यांनी नाकारले. हे प्रतिनिधी, पंडित मदनमोहन मालवीय यांच्या गटाचे होते. त्यांत पंडित राधाकांत मालवीय आणि इतर दोन पुढारी होते. त्या प्रतिनिधींना प्रेक्षकांची तिकिटे देण्यात आली. तेव्हा त्यांनी ती घेण्याचे नाकारले. अधिवेशनाला सुरुवात झाली तेव्हा मंडपात आरडाओरड व ' मालवीय झिंदाबाद ' अशा घोषणा सुरू झाल्या. प्रतिनिधींनी एकमेकांवर आरोप केले व खुर्च्या फेकल्या. तेथे काही हस्तपत्रिका व पुस्तिका वाटण्यात आल्या. हरिजन आणि शीख धर्मांतर यांना पाठिंबा देणारी डॉ. कूर्तकोटी यांची भूमिका महासभेच्या घटनेला धरून नाही व हे आम्हांला पसंत नाही, असा गिल्ला या प्रतिनिधींनी केला व ते मंडप सोडून बाहेर पडले. त्यांतील प्रमुख व्यक्ती म्हणजे, स्वागत मंडळाचे अध्यक्ष रायबहादूर रामशरणदास, रायबहादूर बिदासरण आणि दिवाण किशेनकिशोर हे होते. त्यांनी नंतर डॉ. कूर्तकोटींच्याविरुद्ध पत्रक प्रसिद्ध केले. शीख, जैन, बौद्ध हे हिंदुधर्माचेच भाग आहेत, आणि एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यास कुर्तकोटींनी अस्पृश्यांना उत्तेजन दिले, हे हिंदुमहासभेच्या घटनेविरुद्ध आहे, अशी त्यांनी आपली भूमिका सदर पत्रकात मांडली.

अधिवेशनात अस्पृश्यता निवारणावर ( ' The Sabha further reaffirmed its faith that untouchability is not regarded as part of the Hindu religion or social system ' – p. 260 ) आणि जातिभेद नष्ट करण्यावर ( p. 260 ) ठराव मंजूर करण्यात आले. हरिजनासंबंधीचा ठराव होशियारपूरचे प्रिन्सिपाल देवीचंद यांनी मांडला. पुण्याचे प्रतिनिधी श्री. राजभोज हे या ठरावावर बोलताना डॉ. आंबेडकरावर टीका करू लागले तेव्हा अध्यक्षांनी त्यांना सुचविले की, मी वैयक्तिक टीका सहन करणार नाही.

लाहोर येथील गुरुसिंग सभेतर्फे शिखांनी डॉ. कूर्तकोटी यांना मंडपातच

मानपत्र दिले ! शिखांनी अशी तळमळ व्यक्त केली की, अस्पृश्य लोक हिंदुधर्मात रहाण्यास तयार होतील तर ठीकच होईल ! पण ते धर्मांतर करणार असतील तर त्यांना इस्लाम अगर खिस्ती धर्माकडे जाऊ देऊ नका. त्यांना शीख धर्माकडे वळवण्यास सहाय्य करा, अशी मानपत्रात डॉ. कूर्तकोटी यांना शिखांनी विनंती केली.

वरील वर्णन केलेली हकिकत प्रसिद्ध झाली होती ती अशी–

## The All India Hindu Mahasabha

18th. Session, - Lahore - 21st. to 23rd, October 1936
( The Indian Annual Register, vol II, July - December 1936, pages 253-261 )

The following are extracts from the Presidential Address by **Shri Sankaracharya ( Dr. Kurtkoti )** -

## The Untouchables

' It is not possible for me to deal with all these evil practices But I cannot shut my eyes to the question of the so-called untouchables, a most burning question. My sympathies always go with this poor class of our own people who have suffered wrong at our hands in the name of religion for a long time. No logic can support it, no sense of humanity can tolerate it. There should be no hasitation on our part to do away with the evil without the least delay.

I neither wish to waste my breath nor your precious time on proving that untouchabilty has no earthly reason to exist today, when the causes and conditions that ( p. 256 ) at one time may have given rise to it are wholly absent. I have proved this to the hilt on many previous occasions as also at the last session of the Mahasabha held at Poona. The small and ever - dwindling coterie which still persists in the practice of untochability is so ignorant as to have become blind to such noble teachings as the one in Mahabharat which says -

' Religion must have a rational grounding. It does not mean

doing what others do. While peaceful times need one religion, troubled times need quite a different one. " Again the great Shankaracharya himself has said in his ' Gita Bhashya, that the scriptures are to be depended opon only in matters which cannot be penetrated by reason. Thus, for example, says the Acharya, even if a hundred scripural authorities were to say that fire is cool and without light it cannot be taken as the truth. The Shastras are not to be blindly followed to the last word but they are to be used only as a starting ground. This dependency of blindly following the scriptures is common to the followers of all faiths and hence quarrels on trivial matters always arise. What an irony that even when such are the views of the great Acharya to whom we owe our existance today and when the people are clamouring for something more inovigorating and broadening than that the shastras are in a position to give today, some of us should still be stulifying themselves in the now stagnant pool of the Shastras !

I do not hold the view as some do that the practice of untouchability revolts against hnmanitarianism, that we must take pity on the unfortunate untouchables and that we should concede to them their due rights in the charitable mood. Pity and charity in any form are destable to me. I stand for the removal of untouchability not because I pity the untouchables'lot but because it is the untouchables right. It is hence that the term Harijan is not agreeable to me because it connotes charity and pity. Moreover a mere change in terminology is not going to solve the problem. It is some times said that Dr. Ambedkar is the villain of the peace and it is he who by his-' wonton ' speeches creates arimosities. On the contrary, I should say that we should be all grateful to him for his ceaseless and brave efforts in arousing the untouchable masses and creating within them a deep sense of shame for the humiliation and sufferings they have been undergoing and preparing them to wipe off the

dirty tar with which they have been besmeared so far. We must also admit that we owe even our own eye-opening and man-awakening in this matter to Dr. Ambedkar's millitant attitude.

I now come to the most pertinant question which is hanging before the Hindu community and that is, should the untouchables change over to Sikhism. I must emphatically say that those who wish to, should be allowed to join that sect..... I cannot help noting here with regret that one of the reasons given by Rao Bahadur Rajah in rejecting the Ambedkar-Moonje formula, namely that it would antagonise the Muslims against the untouchables, came to me an unpleasent surprise. Does it not reveal a pusillaminons attitude ? Does it not show that all the tall talk about no barter of religion is mere eyewash and that what is really at the bottom of the oppositon to the formula is the fear of Muslims ? Can any words be sufficient to condemn such poltroonery ? (P. 257)

## Proceedings and Resolutions

Second Day – 22nd October 1936; U. P. Delegates not admited.

There was a sensation at the Mahasabha Session this morning when local organisers refused delegates' tikets to the members of the United Provinces Sabha (Which is recognised by Pandit Malviya) including Pandit Radhakant Malaviya and two others. They were offered admission as visitors, but the latter refused to attend in that capacity and went away in protest.

At the time of the commencement of the session a scuffle ensued in a corner of the Pandal from where shouts of "Malaviya Zindabad" were heard. Rival groups were seen to lift chairs to

throw them at each other.

According to one version of the incident, the cries of " Malaviya Zindabad " were resented by the opponents. According to another version, distribution of pamphlets led to the fight. Later constables (a large posse of whom were present in the premises) were seen sitting in the midst of visitors and even delegates.

Protesting against certain expressions in the presidential address, particularly relating to Harijans and their suggested conversion to Sikhism, some members of the ( page 259 ) Mahasabha, the most prominent of whom being Rai Bahadur Ramsarandas, Chairman of the Reception Committee, Rai Bahadur Bindasaran and Diwan Kishenkishore announced their withdrawal from futher sittings of the conference. They latter issued a statement declaring that the President was not right in preaching from the Mahasabha Platform for or against different sects of Hinduism.

The seceeders were Sanatanists, who objected to Dr. Kurtkoti's interpretation of the Shastras and Sanatan Dharma and dictum that for harijans to embrace Sikhism was no conversion. Prior to the commencement of the session, their spokesmen were closeted with Dr. Kurtkoti for several hours and requested him to delete the reference to conversion. But the President, it was understood, offered to withdraw from the session rather than supress his convictions.

In announcing their withdrawal from further sittings of the Mahasabha session, sanatanist leaders declared that they had explained to the President the genesis of the organisation of the

Mahasâbha viz., that it was to be and to act as a body which, without interfering with or disturbing the tendencies of any section of the Hindu community – ' in which we wel-come Sikhs, Jains and Bundhists' – was to protect their interests as representing as a whole an this had been the guiding principle of Hindu Mahasabha hitherto. Conversion or preaching conve-rsion from one section into another had never been permitted to come within the scope of the Mahasabha's work much less could that be advocated from the platform of the Sabha's annual gathering like the present one.

The resolution on Harijans was moved by Principal Devichand of Hoshiarpur. Mr. Rajbhoj proceeded to criticise Dr. Ambedkar, but was checked by the President, who said he would not allow any personal remarks.

A feature of the session was the interest evinced in it by sikhs. The Gurusingh sabha presented an address to Dr. Kurtkoti at an open session, stating that if harijans wished to stay where thay were, it was well and good.

Sikhs, in the course of their address said, " If the depr-essed classes choose to remain where thay are, we are perfectly satisfied, but if they cannot be persuaded to remain where they are, then we expect that yon will see them join the Sikh religion, which, in aloofness of its ideals and in feelings of brotherhood and equality occupies a unique position. We beseech you to save the depressed classes from embracing either Christianity or Islam, for we cannot tolerate the idea of their adopting any foreign religion. ' (The Indian Annual Reqister, Vol. II, July December 1936, PP. 251–261)

# प्रकरण ९ वे

# धर्मांतराची चळवळ

## शीख धर्माचा विचार

धर्मांतराची घोषणा केल्यानंतर बाबासाहेबांच्या बंगल्यावर, राजगृहावर ख्रिस्ती, मुसलमान, बौद्ध व शीख धर्मांच्या लोकांची रीघ लागली. बाबासाहेबांनी आपला धर्म स्वीकारावा म्हणून ते आपापल्या धर्माची थोरवी त्यांच्यापुढे मांडू लागले. आपापल्या धर्माचे धार्मिक वाङ्मयही आणून देऊ लागले. अस्पृश्यांनी आपला धर्म स्वीकारला तर आपण त्यांना संपूर्ण समतेने वागवू, त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार करू आणि त्यांच्या शिक्षणासाठीच नव्हे तर औद्योगिक व व्यापार-विषयक बाबतींतही सहाय्य करू, असे ते बाबासाहेबांना सांगू लागले. बाबासाहेब या लोकांशी सर्व दृटिष्कोनांतून विचारविनिमय करीत. आपण जो धर्म स्वीकारू तो लढाऊ वृत्तीचा आणि समाजाच्या नैतिक उन्नतीला पोषक असला पाहिजे, असा त्यांनी या सर्व लोकांना आपला मनोदय कळविला. सर्व धर्मांतील आधारभूत साहित्य व त्यावरील समीक्षा यांचा त्यांनी कसून अभ्यास चालविला होता. हिंदुधर्माच्या तत्त्वज्ञानात वाढलेल्या व त्या तत्त्वज्ञानाने वेढलेल्या अस्पृश्यांना बरोबर घेऊन त्यांना धर्मांतर करायचे होते. या साऱ्यांचा विचार करता, त्यांचा शीख धर्माकडे कल होऊ लागला. कारण शीख धर्माचा इतिहास वीरवृत्तीला व समाजो-न्नतीला पोषक आहे, असे त्यांना वाटू लागले. त्यांतील काही आचार आणि विधी यांच्यात सुधारणा केल्या तर शीख धर्म अस्पृश्यांना स्वीकारण्यास योग्य होईल, असे त्यांनी शीख पुढाऱ्यांना सांगितले. या सुधारणांपैकी एक सुधारणा म्हणजे धर्मांतरित अस्पृश्यांना केस व दाढी राखण्याची सक्ती नसावी. शीख पुढाऱ्यांनी सांगितले की, हे पांच ककार ( केस, कंगण, किरपान, कंगवा व कच ) पाळलेच

पाहिजेत; कारण ते वरवर पाहाणाऱ्याला बाह्य उपाधी वाटल्या, तरी त्यांची बैठक आध्यात्मिक तत्त्वावर उभारलेली आहे आणि हे ककार जर नष्ट केले, तर धर्माचा प्रमुख पायाच खणून काढल्यासारखे होईल. या पाच ककार गोष्टी 'शीख, परमेश्वर व गुरू यांना साक्ष ठेवून पाळतात. व त्यांतील निष्ठेवर शिखांचे आध्यात्मिक बळ वृद्धिगत होत जाते. हा शिखांचा खुलासा ऐकून बाबासाहेबांनी त्याबद्दल फारसा आग्रह धरला नाही. कारण त्यांना शीख धर्माची ऐतिहासिक भूमिका अत्यंत तेजस्वी वाटली आणि त्यामुळे त्यांचा तो धर्म स्वीकारण्याकडे मनाचा कल होऊ लागला.

शीख धर्माची ऐतिहासिक भूमिका बाबासाहेबांना दिव्य व भव्य आणि म्हणून अत्यंत आकर्षक वाटली. तिचा थोडक्यात इतिहास मी खाली देत आहे.

महमद–बिन–कासिम याने सिंधवर इ. स. ६७२ साली स्वारी करून तो प्रांत आपल्या ताब्यात आणला. गझनीचा महमद ( ९७१ ते १०३० ) याने उत्तर भारतावर इ. स, १००१ मध्ये स्वारी केली. त्यानंतर घोरी, तुघलक, सूर, लोदी आणि मोंगल यांनी उत्तर भारतावर स्वाऱ्या केल्या. मोंगलांनी आपले राज्य भारतात सुरू केले. त्यांची राजधानी दिल्ली. १५२६ सालापासून उत्तर भारतात मोंगल अम्मल सुरू झाला. त्यानंतर मोंगलांनी आपला राज्यविस्तार दक्षिण भारतात केला. ६७२ ते १५०० च्या काळात मुसलमानांनी लाखो हिंदू, बौद्ध, व जैन धर्मीय लोकांना आपल्या इस्लामी धर्मात ओढले. त्यांत बहुसंख्य धर्मांतरित लोक अस्पृश्य वर्गातील होते. एका हातात तलवार व दुसऱ्या हातात कुराण घेऊन मुसलमानांनी कोटयवधी भारतीयांना मुसलमान केले. या धर्मांतरित मुसलमानांच्या वंशजांनीच १५ ऑगस्ट १९४७ ला पाकिस्तान निर्माण केले.

इस्लामी धर्मांतरासाठी मुसलमानांनी भारतीय जनतेशी जे क्रूर वर्तन केले त्याबद्दल ज्या लोकांना घृणा उत्पन्न झाली त्यापैकी श्री नानक हे एक होते. त्यांचा जन्म तालवंडी राई बोई या गावी १५ एप्रिल १४६९ ला झाला. हे गाव लाहोर–पासून सुमारे ४० मैल आहे. त्यांचे काही वर्षांनी नानकानासाहेब असे नामांतर झाले. त्यांचे वडील श्री. कलीगानदास बेदी; ते त्या गावचे कुलकर्णी (मेहता) होते. त्यांची पत्नी ' तृप्ता ' या होत. हिंदू पंडित आणि मुसलमान मुल्ला यांच्याजवळ नानक यांचे शिक्षण झाले. ऐहिक व्यवहारापेक्षा धार्मिक गोष्टीकडे त्यांचा ओढा लहानपणापासून होता. यांचा विवाह श्री. सुलखणी (सुलक्षणी) यांच्या

बरोबर झाला. पण त्यांचे लक्ष संसारात नव्हते. हिंदू व इस्लामी धर्माचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी परमेश्वर, भक्तिमार्ग, मोक्ष वगैरे बाबीसंबंधी सूक्ष्म विचार केला. तेव्हा त्यांना असे दिसून आले की, परमेश्वर एकच आहे; पण निरनिराळ्या धर्मांचे लोक त्याला निरनिराळी नावे देऊन त्याची पूजाअर्चा निरनिराळ्या तऱ्हेने करतात. एका धर्मातील लोकांना तुच्छ लेखणे, त्यांचा छळ करणे, त्यांना आपल्या धर्मात सक्तीने घेणे, हे चूक आहे. जगातील सर्व मानव हे एकाच परमेश्वराची मुले व ते परस्परांचे बंधू होत, हा बंधुभाव लक्षात घेऊन सर्व धर्मीय वागू लागले तर जगात द्वेष, वैर, कलह राहणार नाहीत; जगात विश्वबंधुत्वाचे व शांततेचे साम्राज्य येईल. अशा विचारसरणीने भारल्यामुळे ती विचारसरणी भारतात प्रसृत करण्यासाठी त्यांनी भारताच्या सर्व प्रमुख भागात दौरा काढला. त्यांच्याबरोबर हिंदू धर्माचे संत व मुसलमान धर्माचे फकीर होते. मथुरा, काशी, जगन्नाथपुरी, मलबार, कोकण, मुंबई, राजस्थान, (सिलोन) लंका, लडाख, नेपाळ, मक्का, मदिना वगैरे ठिकाणी जाऊन तेथील लोकांना त्यांनी उपदेश केला आणि आपले मठ स्थापन केले. ( A History of the Sikhs, Volume I 1469—1839, Pages 29-35 ) by Khushwant Singh; and Guru Nanak and his mission, Pages 14-15, by Teja Singh. )

नानक यांचा पोषाख हिंदू व मुसलमान यांच्या संमिश्र पद्धतीचा होता. तो पाहून लोक त्यांना विचारीत "तुम्ही हिंदू की मुसलमान? तुमची जात कोणती?" अशा प्रश्नांबद्दल नानक लोकांवर रागावून उत्तर देत की, "पोषाखात व जातीत परमेश्वर नसतो. तो सर्वत्र आहे. तुमच्यांत आहे, माझ्यात आहे, हिंदूंत आहे, मुसलमानांत आहे. पण तसे पाहण्याची तुम्हांला दृष्टी नाही. ती दृष्टी तुम्हांत यावी, आणि तुम्ही ईश्वरमय व्हावे, जातीमय व पोषाखमय राहू नये, म्हणून मी प्रवचने देत फिरत आहे. तुम्ही ईश्वरमय व्हा, सर्वांबद्दल बंधुभाव ठेवा, ईश्वराची मनोमन प्रार्थना करा, व मोक्ष मिळवा!" अशा उत्तरांनी पृच्छक गप्प बसत.

ईश्वराचे चिंतन व नामस्मरण करीत असताना नानक यांना जी दृश्ये दिसत व ज्या सद्भावना मनात उत्पन्न होत, त्यांना त्यांनी अक्षरबद्ध करुन ठेवले. ही अक्षरबद्ध स्तोत्रे पुढे एकत्र करुन लिहून काढली. त्या ग्रंथाला पुढे **आदिग्रंथ** किंवा ग्रंथसाहेब हे नाव मिळाले. हा ग्रंथ शिखांचा परमपवित्र धार्मिक ग्रंथ होय. या ग्रंथातील स्तोत्रांत नानक यांनी परमेश्वराला राम, हरी, गोविंद, हरिमुरारी व

रहीम या हिंदू व मुसलमानी नावांनी आळविलेले आहे. आपण परमेश्वराचे पाईक आहोत आणि मानवांना सन्मार्ग दाखविणारा शिक्षक व गुरु आहोत, असे ते लोकांना प्रवचनांत सांगत. ' मी परमेश्वराचा दूत नाही ' असेही ते सांगत असत. परमेश्वर निराकार, निरामय, अवर्णनीय आणि सर्व सत्ताधिष्ठित आहे, तो मायाळू व कृपावंत आहे. दुष्टपणा, दांभिकपणा, खोटेपणा, वैर, तंटेबखेडे, जातिभेद, इत्यादी अमंगल भावना आपल्या अंतःकरणातून व मनातून नष्ट करण्यासाठी परमेश्वराचे भजन, पूजन व मनन करीत रहावे; म्हणजे मांगल्य, भक्ती, बंधुभाव इत्यादी पवित्र भावना अंतःकरणात व मनात रुजतील, अशा प्रकारची प्रवचने **नानक** करीत असत. परमेश्वर अवतार घेतो, या सिद्धांतावर त्यांचा विश्वास नव्हता. ( A History of the Sikhs, Volume I, Page 36-38 )

नानक यांची प्रवचने ऐकून हजारो हिंदू व मुसलमान त्यांचे शिष्य झाले. या शिष्यांच्या समूहाला ' सत्संग ' हे नाव त्यांनी दिले. ' सत्संग ' म्हणजे सज्जनांची सोबत आणि सज्जन म्हणजे सत्प्रवृत्तीचे लोक. आपण नानक गुरूचे शिष्य सदैव सत्प्रवृत्तीचेच लोक म्हणून राहिलो तर आपल्या जीविताचे आणि समाजाचे कल्याण होईल, ही थोर भावना या शिष्यांच्या मनात पूर्णपणे बिंबली, म्हणूनच या धर्माचा प्रसार त्यांनी उत्तर भारतात लौकर केला आणि दक्षिण भारतातही थोडासा केला. (कित्ता, पा. ४८) ज्या हिंदू, मुसलमानांनी शीख धर्माचा स्वीकार केला त्यांनी आपापल्या धर्मातील पूजाअर्चांचे विधी, स्तोत्रे, इत्यादी सोडून दिली आणि गुरु नानकाने पंजाबी भाषेत जी स्तोत्रे रचली होती ती म्हणण्याचा प्रघात सुरू केला. शीख धर्माचा स्वीकार केलेल्या हिंदूंत व मुसलमानांत दोन वर्ग होते. ते उच्च दर्जाचे व जातींचे, आणि नीच दर्जाचे व जातींचे. ते परस्परांशी वागताना पूर्वसंस्कारांचे गाठोडे टाकून द्यायला तयार नव्हते. म्हणून उच्च जातीतले शीख नीच जातीतील शिखाशी आपलेपणाने वागत नसत. हीच परिस्थिती धर्मांतरित मुसलमानांबद्दलही होती. ही दृश्ये पाहून नानक गुरूला वाईट वाटले. आपल्या शिष्यांच्या मनांतील हे वैगुण्य नष्ट केले पाहिजे. तरच आपल्या धर्माला बळकटी येईल, नाहीतर आपला धर्म हिंदुधर्माप्रमाणे जातिभेदाच्या भक्ष्यस्थानी पडेल. यावर उपाय योजना जी केली ती ही की, सर्व शिष्यांनी एका पंक्तीत बसावे आणि सर्वांनी सहभोजन करावे. ही योजना नानक गुरूने अमलात आणली. ती योजना म्हणजे ' **लंगर.** ' लंगर प्रथम ' **कर्तारपूर** ' येथे अमलात आले. सर्व शिष्यांचा **स्वयंपाक एकत्र** करणे आणि तो सर्वांना गुरुप्रसाद म्हणून एकाच पंक्तीत वाढणे **ही** लंगर**ची** पद्धत शिष्यांना आवडली,

काहींना आवडली नाही ज्यांना आवडली नाही, त्या शिष्यांशी युक्तिवाद करून गुरुने त्यांची मने 'लंगर' ला अनुकूल केली. ही पद्धत इतर ठिकाणीही फैलावली आणि थोड्याच दिवसात ही 'लंगर' पद्धत शीख धर्माचे एक अंग बनली. शीख धर्म स्वीकारलेले पूर्वाश्रमीचे हिंदू परस्परांना भेटले की 'नमस्ते' म्हणत व मुसलमान 'सलाम अले कुम' म्हणत असत. नानक गुरूने या सर्वांना 'सतकरतार' (खार निर्माता) या नमस्कार पद्धतीची वहिवाट करण्यास सांगितले आणि तशी ती प्रथा चालू केली. पूर्व धर्मातील अनिष्ट संस्कारापासून मुक्त करून आपल्या शिष्यांना सेवाभावी व भ्रातृभावी मार्गावर आणून गुरू नानकाने त्यांच्या जीवनात क्रांती केली. ( किंता पा. ४८ ) शीख धर्मात एकंदर दहा गुरू होऊन गेले.

१) पहिले गुरू नानक ( जन्म १५–४–१४६९ वैशाख शु. ३, संवत १५२६, मृत्यु २३–९–१५३९ ) त्याचा मुलगा 'चंद' याला गुरुपद देण्यात यावे, असे काही शिष्य नानक यांना वेळोवेळी सुचवीत असत; पण गुरूने आपला सत्प्रवृत्तीचा आणि भक्तिमार्गी शिष्य 'लेहना' याला गुरुपदासाठी निवडले. गुरु नानक यांनी त्याला 'अंगद' हे नाव देऊन त्याची निवड जाहीर समारंभात शिष्यांना सांगितली. गुरू नानक यांचे देहावसान २३ सप्टेंबर १५३९ ला झाल्यानंतर अंगद हे दुसऱ्या क्रमांकाचे गुरू गादीवर आले. (किंता, पान ५३)

२) **अंगद गुरू** (१५०४–१५४२) यांनी गुरुपद १३ वर्षे (१५३९–१५५२) भूषविले. त्यांनी कर्तारपूर येथे चालू असलेली लंगरची योजना व्यवस्थितपणे नावारूपास आणली आणि श्री. नानक गुरूच्या वचनाच्या पुस्त्या तयार करून त्या निरनिराळ्या ठिकाणी पाठवून दिल्या. त्या ठिकाणचे शीख त्या वचनांचा उपयोग प्रार्थनेच्या व कीर्तनाच्या वेळी करू लागले. 'गुरू नानक' यांनी आपल्या धर्माला अनुरूप लिपी शोधून काढण्याचा प्रयत्न केला. त्या लिपीतील ३५ अक्षरे घेऊन आणि उत्तर भारतातील निरनिराळ्या भाषेतील काही अक्षरे घेऊन एक संपूर्ण वेगळी लिपी तयार केली. तिला अंगदांनी 'गुरुमुखी' ( गुरूच्या मुखातून तयार झालेली ) हे नाव दिले. याच लिपीतून पुढील काळात शीख धर्माचे ग्रंथ लिहिण्यात आले. अंगद यांना पुत्र होते. पण त्यांना गादीवर बसण्याचा अधिकार अंगदांनी दिला नाही. त्यांचा वृद्ध भक्त आणि शिष्य '**अमरदास**' यांची त्यांनी गुरू म्हणून निवड केली. ( खुशवंतसिंग : पाने ४९–५२ )

३) **अमरदास :–** ( जन्म १४५२ – १४७९ – १५७४ ) हे अत्यंत साधुवृत्तीचे आणि भक्तिनिष्ठ होते. गुरुपदी (१५५२) आल्याबरोबर त्यांनी लंगरची व्यवस्था

अत्यंत कसोशीने चालू ठेवली. कोणी शीख त्यांच्या दर्शनार्थ आला की, त्याला प्रम आपल्याजवळ असलेल्या शिष्यांच्या बरोबर जेवावयास लावीत व मग त्याला दर्शन देत व उपदेश करीत. हिंदू व मुसलमान संतांची वचने व काव्ये व त्या धर्मांचे ग्रंथ, यांतील उत्तमोत्तम भाग घेऊन त्यांना **नानक** व **अंगद** गुरूंची वचने यांच्या शेजारी स्थान देऊन, गुरुमुखीतून वाङमयीन लेखन केले. तेच शीख धर्माचे आद्य वाङमय होऊन बसले. पुढील काळात त्यात नवी भर वेळोवेळी पडत गेली. अमरदास यांच्या सोज्ज्वळ कीर्तीचे पडसाद अकबर बादशाह यांच्या कानांवर गेले. तेव्हा बादशहाने असे ठरविले की, अमरदास यांना त्यांच्या कामासाठी दान द्यावे. पण ते दान स्वीकारण्याचे अमरदासांनी सविनय नाकारले. तेव्हा अकबर बादशहाने ते अमरदासाच्या मुलीच्या लग्नाच्यावेळी तिला कन्यादान म्हणून दिले. ते दान म्हणजे काही खेड्यांच्या शेतसाऱ्याची रक्कम. हे दान त्या मुलीला वंश–परंपरेने मिळण्याच्या हक्कांची सनद बादशहाने लिहून दिली.

शीख धर्माचा स्वीकार करण्यासाठी हिंदू व मुसलमान समाजांतील हजारो स्त्रीपुरुष येऊ लागले, तेव्हा शीख धर्माची लोकसंख्या खेड्यांतून व शहरांतून वाढू लागली. त्यांच्या धार्मिक व आध्यात्मिक प्रगतीची सर्व प्रकारची व्यवस्था व्हावी म्हणून अमरदासांनी प्रमुख ठिकाणी गुरुमंदिरे ( मंजी ) बांधली व त्यांवर व्यवस्थापक ( मसंद ) नेमले. अमरदासच्या भक्तिसामर्थ्यामुळे हजारो हिंदू व मुसलमान आपापले धर्म सोडून शीख धर्मात येऊ लागले. तेव्हा हिंदू धर्मगुरू व मुसलमान मुल्ला मौलवी यांना वाटू लागले की, ही आपल्या धर्माला जी गळती लागलेली आहे ती बंद केली नाही तर आपला धर्म नष्ट होणार. त्यांनी अमरदास व त्यांचे शिष्य यांचा छळ करण्यास सुरवात केली. अकबर बादशहावर आपले वजन खर्च करून अमरदासाचे कार्य बंद पाडण्याच्या खटपटी केल्या. परंतु अकबर बादशाहाने तसे काही केले नाही. यामुळे शीख धर्माचा प्रसार चोहोकडे झटचापाने होतच राहिला. ही परिस्थिती काही दिवस टिकली. ब्राह्मण व मुल्ला मौलवी यांनी शीख लोकांना छळण्याचे सत्र सुरू केले. पण त्याला शिखांनी दाद दिली नाही. शेकडो शिखांनी आत्मबलिदान केले, पण शीखधर्म सोडला नाही. अमरदास यांनी आपल्या एकाही मुलाला गुरुपदासाठी पसंत केले नाही. खत्री (क्षत्रिय) जातीत सोधी म्हणून उपजात होती. त्या उपजातीतील एकाने शीख धर्म स्वीकारून गुरुसेवेचे व्रत स्वीकारले. तो गुरुगृही राहत होता. पुढे गुरुने त्याला आपला जावई केला. पण जावयाने आपल्यासाठी गुरुगृहात खास काही स्थान निर्माण करण्याचे कधीच मनात आणले नाही. गुरुसेवा व धार्मिक निष्ठा यामुळे

तो सर्वांना आदरणीय झाला. अमरदासांनी त्याचीच गुरुपदासाठी निवड केली व त्याचे ' रामदास ' हे नामाभिधान केले. ( खुशवंतसिंग पान ५६–५२ ) यांच्या लग्नात अकबराने त्यांच्या पत्नीलाच वरील सनद दिलेली होती.

४) रामदास :– ( १५३४–१५८१ ) रामदास गुरुपदावर येण्याअगोदरच अकबर बादशहाच्या दरबारात तो शीख धर्म याचा प्रतिनिधी म्हणून राहात होता. गुरुपदावर ते आले तेव्हा त्यांनी मंजीची ( गुरुमंदिरांची ) पुनर्रचना दृढ व विस्तीर्ण पायावर केली आणि बादशहाने पत्नीला दान दिलेल्या जागेत एक विस्तीर्ण तळे तयार केले. त्याच्या आसपास हजारो कुटुंबे येऊन राहिली; व त्या ठिकाणी एक टुमदार गाव अस्तित्वात आले. तेव्हा रामदासांनी, पूर्वीच्या ' गोविंदवाल ' या गावातून आपली वस्ती हलवून नव्या गावात आणली. या नव्या गावाला ' गुरू का चक, चक रामदास ' किंवा रामदासपुरी असे नामाभिधान केले. हेच गाव पुढे शीखधर्माचे मुख्य ठिकाण झाले. या रामदासांनी काही भक्तिरसप्रधान काव्ये लिहिली. शीख धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दूर दूरच्या देशांत काही धर्मप्रचारक पाठविले. त्यांनी त्यांचा कनिष्ठ पुत्र ' अर्जुनमल ' याला पाचवे गुरू नेमले. ( खुशवंतसिंग पान ५५ )

५) अर्जुनमल (१५६३–१६०५), हे १५८१ ते १६०५ या काळात पाचवे गुरू म्हणून होते. त्यांचे वडील बंधू **पृथी** (पृथ्वी) **चंद** यांनी अर्जुनसिंहाच्या विरुद्ध एक गट तयार केला व गुरुपद मिळविण्यासाठी अर्जुनसिंहाची बदनामी करण्याची मोहीम सुरू केली. पण अर्जुनसिंगाच्या अनुयायांनी पृथीचंदाच्या मोहिमेला नेस्तनाबूत केले. अर्जुनसिंगांनी रामदासपुरी येथे शीखधर्माचे भव्य मंदिर बांधण्याचे कार्य हाती घेतले. या मंदिराची पायाभरणी करण्यासाठी त्यांनी लाहोरचे त्यावेळचे आदरणीय मौलवी **मियाँ मीर** यांना आणले होते. या मंदिराचा पाया खोलगट भागात घातला त्या मंदिरांला चार दिशांना चार दरवाजे ठेवले. याचा प्रतीकात्मक अर्थ असा कीं, सर्व भक्तांनी आपल्या उच्चनीच परिस्थितीचे व जातपातीचे भाव टाकून द्यावेत आणि चारी दिशांनी मंदिरात यावे व नम्रतेने खाली मान घालून खोल खोलीत खाली खाली जावे व तेथे ईश्वर चरणी लीन व्हावे हे मंदिर ' हरिमंदिर ' म्हणून बांधण्यात आले. पण ते व त्याचे पूर्वी बांधलेले तळे यांना मिळून ' अमृतसर ' ( अमृताचा झरा ) असे नाव देण्यात आले. हे ' अमृतसर ' पुढील काळात शीख धर्माचे पवित्र पीठ बनले. ख्रिश्चन धर्माचे रोम, इस्लामी धर्माचे मक्का त्याप्रमाणे शीख धर्माचे ' अमृतसर ' हे पवित्र ठिकाण आहे.

अर्जुनसिगाने आणखी काही गावे वसविली.

अर्जुनसिगांना बरेच विरोधक होते. ते लोक अर्जुनसिगांची बदनामी करण्याची व त्यांना गुरुपदावरून काढून टाकण्याची एकही संधी व्यर्थ जाऊ देत नसत. ते या बाबतीत अकबर बादशहाचे मन कलुषित करण्याचे हरतऱ्हेने प्रयत्न करीत असत. निरनिराळ्या धर्मातील साधुसंतांची वचने एकत्र गोळा करून त्याचा उपयोग अर्जुनसिंग प्रार्थना मंदिरात करू लागले; तेव्हा त्यांच्या विरोधकांनी अकबराकडे अशी तक्रार केली की, अर्जुनसिगाने या वचनसंग्रहात इस्लामी धर्माची नालस्ती करणारा मजकूर घातला आहे. त्याबद्दल त्याचे पारिपत्य व्हावे. यावेळी दरबारात अर्जुनसिगाचे दोन प्रतिनिधी **'भाई बुद्ध'** आणि **'गुरुदास'** हे होते. त्यांनी सर्व वचन-संग्रहाचा अर्थ बादशहाला समजावून सांगितला. तेव्हा बादशहा म्हणाला की, ही सर्व वचने परमेश्वराची प्रार्थना व स्तुती करणारी आहेत. त्यात इस्लामी धर्माची बदनामी करणारी वचने नाहीत. बादशहाला अर्जुनसिगाच्या कार्याची महती कळली आणि त्यांनी अंगीकारलेल्या कार्याला सहाय्य म्हणून अकबराने द्रव्य आणि भूमी यांचे दान निरनिराळ्या गावात केले.

अर्जुनसिंग यांनी वचनसंग्रहाचे कार्य १६०४ च्या ऑगस्ट महिन्यात पूर्ण केले. या संग्रहात गुरू नानक यांची सर्व वचने, उपदेश व कवने त्यांच्यानंतरच्या तीन गुरुंची वचने, उपदेश व कवने, हिंदू व मुसलमान साधुसंत व धार्मिक ग्रंथातील वचने; स्पृश्य व अस्पृश्य संताची वचने व धार्मिक कवने इत्यादिकांचा संग्रह केला. या संग्रहाचा जो ग्रंथ तयार झाला त्याला अर्जुनसिंगाने ' **ग्रंथसाहेब** ' हे नाव दिले आणि त्याची प्रतिष्ठापना ' अमृतसर ' मंदिरात यथाविधी केली. त्याचे वाचन व स्पष्टीकरण करण्यासाठी ' **भाई बुद्ध** ' यांची त्यांनी नेमणूक केली. ते शीख धर्माचे पहिले ग्रंथी ( प्रवचनकार ) होते. ( Sikh Maryrs by Bhagat Laxman Sing P., P. 38—39 आणि A History of the Sikhs by Khushwant Sing, Vol. I ,PP 57—59 )

अकबराच्या मृत्यूनंतर जहांगीर बादशहा झाला आणि त्याने शीख धर्माचा नायनाट करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. शीख लोकांना सर्व बाजूंनी त्रास द्यावा व त्यांना मुसलमानी धर्मात आणावे, हे त्या कार्यक्रमाचे मुख्य सूत्र होते. जहांगीरचा मुलगा खुश्रू याने वडिलांच्या विरुद्ध बंडाळी सुरू केली. तेव्हा त्याने जहांगीरच्या विरुद्ध लढाई करण्यामध्ये शिखांनी त्याला मदत करावी, अशी त्याने गुरू अर्जुन-

सिंगांना गुप्तपणे भेटून विनंती केली. गुरू अर्जुनसिंगाने खुश्रूचा अतिथिसत्कार शीख धर्माप्रमाणे केला. पण मदतीची विनंती गुरूंनी स्वीकारली नाही. " तुमचे वडील आम्हां शिखांचा उच्छेद करण्याची भाषा बोलतात, तसे वर्तनही करतात; पण शिखांचा नायनाट करणे त्यांना शक्य नाही. जहांगीरने शिखांचा छळ चालवला असला तरी आम्ही तुमच्या बाजूने त्याच्यावर हत्यार चालविणार नाही. आमच्या धर्माच्या उन्नतीसाठी बादशहावर हत्यार जरूर चालवू !" अशी गुरूंनी खुश्रूपुढे आपली स्पष्ट भूमिका मांडली तेव्हा. खुश्रू नाराज होऊन परत गेला; परंतु या गोष्टीचा विपर्यास करून जहांगीरने गुरू अर्जुनसिंगावर असा ठपका ठेवला की ' आमचे विरुद्ध बंड करणाऱ्यांना तुम्ही आश्रय दिला व सहाय्य केले, याचा जाब द्यावा. ' अर्जुनसिंगाने आपल्या वर्तनाचा खुलासा केला; पण तो बादशहाने ग्राह्य मानला नाही. त्याने गुरूला कैद करून, लाहोरच्या किल्ल्यात ठेवून अमानुषपणे छळ चालविला. तेव्हा लाहोरमधील मुल्लामौलवी यांनी मियाँ मीर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ नेऊन बादशहाकडे निषेध केला; तरी अर्जुनसिंगाचा छळ करणे थांबले नाही. त्या छळाच्या काही दंतकथा परंपरेने चालत आलेल्या आहेत. त्या अशा (१) वाळू तव्यावर तापवून ती गुरूच्या अंगावर ओतीत; (२) गुरूला अतितप्त लोखंडी पत्र्यावर बसवीत; (३) गुरूला गाईच्या कातड्यात बसवून व ते सर्व- बाजूंनी शिवून रावी नदीच्या प्रवाहात सोडून दिले, (४) गुरूंनी रावी नदीत स्नान करण्याची परवानगी ( तुरुंगाच्या ) अधिकाऱ्याकडून मिळविली व स्नान करीत असता ते नदीत अंतर्धान पावले.

परंतु खरा प्रकार असा की, छळामुळे गुरूची प्रकृती ढासळली व ते तुरुंगा- तच ३१ मे १६०६ रोजी दिवंगत झाले. रावी नदीच्या किनाऱ्यावर त्यांचा दहन- विधि यथासांग करण्यात आला. त्या दहनभूमीवर कांही दिवसांनी शिखांनी गुरुद्वारा बांधले. तेथे दरवर्षी यात्रा भरविण्याचा परिपाठ सुरू केला. आपला मृत्यू जवळ आलेला आहे, हे दिसताच गुरूने भाई बुढ्ढ यांना तुरुंगात बोलावून घेतले आणि आपला ११ वर्षांचा मुलगा हरगोविंद याला आपल्यानंतर गुरुपदावर बसवा व त्याच्या नावाने तुम्ही सर्व कारभार पहा ' असे सांगितले. त्याप्रमाणे व्यवस्था कर- ण्यात आली. ( खुशवंतसिंग पा. ६०–६१ आणि भगत पा. ४३ )

गुरू अर्जुनसिंग सिद्धहस्त लेखक व कवी होते. त्यांनी विपुल लेखन केले. ते सर्व धर्मविषयक होते. त्यांची धार्मिक काव्यरचना अत्यंत लोकप्रिय झालेली होती. हिंदू व मुसलमान यांना शीख धर्माच्या पीठावर आणून त्यांच्यात दिलजमाई केली.

" तुम्ही पूर्वीचे सर्व भेदभाव विसरा व शीख धर्मावर निष्ठा ठेवा व ऐक्य करा मग शीख ही तिसरी शक्ती, भारतात निर्माण होईल. " असा उपदेश नवशिखांना करीत. असत ( खुशवतसिंग पा. ६१–६१ )

(६) **हरगोविंद** ( १५९५–१६४५) हे शिखांचे सहावे गुरू. (१६०६–१६४५ ) आपल्या गुरूला छळून तुरुंगातच मरावयास लावले ही टोचणी सर्व शिखांच्या मनाला बोचत होती. भाई बुद्ध यांनी सहाव्या गुरूच्या झेंड्याखाली सर्व शिखांना एकत्र आणून मुसलमानानी सत्तेला विरोध करावयाचा प्रयत्न केला; पण त्यांत शिखांची पिछेहाट होऊ लागली. तेव्हा शिखांनी लष्करी सामर्थ्य अंगी बाणवले, तरच त्यांचा मुसलमानांपुढे टिकाव लागेल, असे पटल्यावरुन ते सामर्थ्य शिखांना मिळवून देण्याचा कार्यक्रम भाई बुद्ध व त्याचे सहकारी यांनी हाती घेतला. एकूणएक शीख मर्द लढवय्या झाला, तरच शीख-समाज मुसलमानी आक्रमणांना तोंड देऊ शकेल असे त्यांना वाटू लागले. या कार्यक्रमाला चालना देण्यासाठी त्यांनी **हरिमंदिर** या गावी **अकाल तख्त** (अनाद्य-नंद परमेश्वराचे आसन ) उभारले. येथे वीरवृत्तीला पोषक असे व्यायाम, पोवाडे पवित्र स्तोत्रे, कीर्तन इत्यादी कार्यक्रम आठवड्यातून दोन तीन वेळा ठेवण्यात आले. युद्धाचे व कुस्तीचे डावपेच यांचे शिक्षण देण्याचीही सोय करण्यात आली. शिखांनी जे लष्कर उभे केले ते गुरू हरगोविंद यांच्या नेतृत्वाखाली. त्या लष्कराची एकसारखी व झपाट्याने वाढ होऊ लागली. तेव्हा जहांगीर बादशहाला या लष्करी सामर्थ्याची दहशत वाटू लागली. त्याने शिखांच्या लष्करी सामर्थ्याला आळा घालण्यासाठी गुरू हरगोविंदसिंग यांना अटक करून तुरुंगात टाकले आणि शिखांचे लष्कर बेका-यदा ठरवून ते नष्ट केले. जहांगीर नंतर आलेल्या शहाजहानाने हेच धोरण पुढे चालू ठेवले व जहांगीर पेक्षाही शिखांचा जास्त छळ केला. त्याच्या छळाला तोंड देण्याची जेव्हा शिखामध्ये ताकद उरली नाही, तेव्हा गुरू हरगोविंद यांनी शिखांना बरोबर घेऊन हिमालयात, गिरिकुहराचा आश्रय घेतला. तेथे त्यानी शिखांची एकी पुन: मजबूत केली आणि मुसलमानी सत्तेला धडका मारण्याचा कार्यक्रम तेथूनच सुरू केला. मुसलमानांना हैराण करणारे शीख लष्कर वाढत आहे, हे पाहून गुरुंनी हिमालयातील आश्रय सोडून देऊन ते आपल्या लवाजम्यानिशी फि‍रू लागले. गुरुपरंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांनी आपला नातू ( मुलीचा मुलगा ) **गुरुदत्त** यांना सातवा गुरू नेमले. गुरू हरगोविंद यांचा मुक्काम मध्यप्रदेशातील बिलासपूर नजिकच्या खेड्यात असताना त्यांची प्रकृती फार ढासळली आणि तेथेच मार्च १६४४ मध्ये दिवंगत झाले. या खेड्याचे नाव शिखांनी कार्तापूर ठेवले. (खुशवंतसिंग पा. ६३–६७ )

७) **हरराई** :– (१६३०–१६६१) 'गुरुदत्त' यांना हरगोविंदानी 'गुरुपद' दिले हे बऱ्याच शिखांना आवडले नाही. या प्रश्नावर त्यांच्यात दोन तट पडले व ते सत्तेसाठी एकसारखे झगडत राहिले. त्यामुळे शिखांचे लष्करी सामर्थ्य ढासळले. आपला कमकुवतपणा ओळखून **हरराई** गुरूंनी शहाजहान व औरंगजेब **बादशहां**–**बरोबर** नमते घेण्याचे धोरण स्वीकारले. हे 'हरराई' यांच्या विरोधकांना आवडले नाही. या विरोधक - शिखांनी हरराई यांना इतका त्रास दिला की ते गुरू कार्तरपूर सोडून गेले व पुढील १३ वर्षे वनवासात राहिले. त्यांच्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत शिखांचे ऐक्य व सामर्थ्य संपूर्ण ढासळले. त्यांनी आपला लहान मुलगा 'हरिकिसन' (हरिकृष्ण) यांना आठवा गुरू म्हणून निवडले. हे हरराईचा मोठा मुलगा 'रामराई' यांना आवडले नाही. (खुशवंतसिंग पा. ६९-७०)

८) **हरिकिसन –** (१६५६ – १६६४) हे १६६१ मध्ये गुरू झाले. यांच्या अज्ञानाचा स्वार्थासाठी उपयोग करण्यासाठी काही शिख व खुद्द औरंगजेब बादशहा आणि शीख धर्माचे **मसंद** यांचे गुप्त प्रयत्न चालू झाले. औरंगजेबाने हरीकिसन यांना दिल्लीत नेऊन ठेवले व त्यांच्या नावाने शिखांवर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचे डावपेच चालू केले. पण त्यांत औरंगजेबाला यश आले नाही. गुरू हरिकिसन हे तीन वर्षांच्या कारकीर्दीनंतर दिवंगत झाले (१६६४). त्यांनी आपले चुलते, **तेगबहादूर (** तेजबहादूर **)** यांना नववे **गुरू** नेमले. त्यावेळी तेगबहादूर हे बकला गावी राहात होते (खुशवंतसिंग पा. ७०)

९) **तेगबहादूर** (१६२१ - १६७५) - तेगबहादूर **१६६४** मध्ये गुरुपदावर आले ते मसंद यांच्या पाठिंब्यावर. कारण गुरुपदासाठी **धरिमल** आणि **रामराई** हे गुरू घराण्यांतील दोघे तरुण तेगबहादूर यांना उघडपणे विरोध करीत होते. या दोघांच्या पक्षांचे लोक तेगबहादूर यांना परोपरीने छळत होते. तेगबहादूर यांना जबरदस्तीने हरिमंदिरातून बाहेर काढणे, त्यांची निंदानालस्ती करणे, त्यांच्यावर प्राणघातक हल्ले करणे, असे विरोधकांचे सत्र चालू होते. त्यांनी गुरूवर खोटे आरोप करून बादशहाकडून त्यांना तुरुंगात टाकण्यास भाग पाडले. पण चौकशी-अंती बादशहाने त्यांना मुक्त केले.

**तेगबहादूर** हे अत्यंत पापभीरु, धार्मिक आणि नि:स्वार्थी असल्यामुळे त्यांनी हे सर्व त्रास निमूटपणे सहन केले. या सर्व प्रकारांमुळे गुरूंना एके ठिकाणी फार

दिवस राहाता येत नसे. ते उत्तरेकडील सर्व प्रांतात फिरत राहिले आणि शिखांची लष्करी उभारणी सुरू केली. या योजनेत त्यांनी हिंदूंचीही भरती केली. या कार्यासाठी ते पंजाबच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या विरोधकांनी मुसलमान अधिकाऱ्यांना त्यांच्या विरुद्ध उठविले. अधिकाऱ्यांनी तेगबहादूर यांना अटक केली व दिल्लीतील काजीच्या समोर त्यांचा खटला सुरू झाला. त्यांना देहांताची शिक्षा देण्यात आली. ११ नोव्हेंबर १६७५ ला त्यांचा दिल्लीच्या तुरुंगात शिरच्छेद करण्यात आला. रात्रीच्या काळोखात तुरुंगातून त्यांचे शिर व धड चोरून नेण्याचे धाडसी व स्वार्थत्यागी कृत्य एका पूर्वास्पृश्य शिखाने केले; ते गुरूंना शास्त्रोक्त विधिपूर्वक अग्निसंस्कार मिळावेत म्हणून !

गुरू तेगबहादूर यांचा छळ औरंगजेबाने सुरू केला तेव्हा दयालचंद या पूर्वास्पृश्य शिखाने पंजाबात मुसलमान सत्तेविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला. औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांनी ते बंड चिरडून टाकले. तेव्हा दयालचंद व त्याचे निवडक साथीदार यांना दिल्लीतील काजीच्या न्यायालयाने वधाची शिक्षा दिली. तेलाच्या कढईत दयालचंदला उभे करुन खाली जाळ केला व त्यात त्याला उकळवून ठार केले. या दयालचंदच्या घराणात जन्मलेला भाई मणीसिंग यांने गुरू तेगबहादूर यांचे धड व शीर तुरुंगातून गुप्तपणे नेण्याचा कट तयार केला. आपले स्वतःचे धड व शीर तेथे ठेऊन गुरू तेगबहादूरांचे शीर व धड गुप्तपणे नेऊन आनंदपूर येथे रहात असलेल्या गुरूच्या मुलाच्या गोविंदसिंगाच्या हाती देणे व गुरूचा अंत्यविधी यथाशास्त्र गोविंदसिंगाच्या हस्ते घडवून आणणे, हा तो कट होता. या कटात त्याने जे तरुण सामील करुन घेतले त्यांत त्याचा स्वतःचा मुलगा होता. त्याने मुलाला आज्ञा केली की, 'तू माझे शिर धडावेगळे कर, ते गुरूचे धड व शिर पडलेले आहे तेथे हे नेऊन ठेव व त्यांचे धड व शीर घेऊन आनंदपूरला जा व तेथे त्यांच्या धड व शीर याला गोविंदसिंगाच्या हस्ते योग्य विधीने अग्नी द्या.' मुलगा या कृत्याला तयार होईना तेव्हा वडील संतापाने म्हणाला, "थू तुझ्या ! भित्र्या ! तू असे केले नाहीस तर मुसलमान लोक गुरूंचे धड व शीर यांची उद्या विटंबना करतील, ते पहात रहाणार काय ? मी सांगितल्याप्रमाणे करणार नसलास तर मीच तुला आताच ठार करतो ! असला भित्रा मुलगा मला नको !" यावर मुलगा तयार झाला व रात्री योजनेबरहुकूम सर्व कार्यक्रम पार पडला. दुसरे दिवशी औरंगजेबाने सुचविल्याप्रमाणे गुरू तेगबहादूरांच्या शवाचे तुकडे करण्यात आले आणि ते तुकडे व शीर दिल्लीच्या चार वेशीवर घारी,

गिधाडांनी खावेत व त्या कलेवराला मंत्राग्नी मिळू नये यास्तव ठेवण्यात आले.

गुरूचे शीर व धड हे आधीच आनंदपूरला पोहोचून त्यांना यथाविधी, गोविंदसिंग यांच्या हस्ते अग्निसंस्कार देण्यात आला होता. भाई मणिसिंग यांच्या या अतुल स्वार्थत्यागाने गुरूच्या धडाची व शिराची विटंबना मुसलमानांच्या हातून झाली नाही, ही जाणीव सर्व शिखांना झाली; तेव्हा त्यांचे हृदय भरून आले. नंतर गोविंदसिंग गुरू झाले. तेव्हा त्यांनी पूर्वास्पृश्य शिखांना ' रंगरेटे गुरूके बेटे ' ( हे रंगरेटे - पूर्वास्पृश्य - गुरूचे बेटे आहेत ) असे नामाभिधान केले.

गुरू तेगबहादूर यांचा वध दिल्लीतील ज्या तुरुंगात झाला होता त्याठिकाणी काही वर्षांनी शिखांनी एक मंदिर बांधले. ते ' सिसगंज ' ( मस्तकाचे पवित्र मंदिर ) म्हणून प्रसिद्धीस आले. ते चांदणी चौकात आहे. आनंदपूर येथे ज्या ठिकाणी गुरूचे धड व शीर यांना अग्निसंस्कार दिला तेथेहि पुढे शिखांनी मंदिर उभारले. तेही ' सिसगंज ' या नावाने ओळखले जाते. तेथे व चांदणी चौकात दर वर्षी मोठी यात्रा भरते. (खुशवंतसिंग पा. ७१–७४, भगतसिंग पा. ५९–६२)

१०) गोविंदसिंग (१६६६–१७०८)– तेगबहादूरांचे चिरंजीव गोविंदसिंग हे नवव्या वर्षी दहावे गुरू झाले. औरंगजेब बादशहा त्यांना त्रास देईल अगर तुरुंगात डांबील, अगर देहांताची शिक्षाही देण्यास कमी करणार नाही, अशी भीती **मसद** व प्रमुख शिखांना वाटत होती. म्हणून त्यांनी गुरू गोविंदसिंग यांना आनंदपूर येथून जगलात व गिरिकुहरांत नेऊन ठेवले. गुरू कोठे आहेत, याचा पत्ता मुसलमानांना लागू नये म्हणून त्यांचा मुक्काम निरनिराळ्या ठिकाणी हलविण्यात येत होता. या धामधुमीच्या काळात त्यांचे शिक्षण चालू होते. त्यांना लेखनकलेची आवड उत्पन्न झाली. त्यांनी पुढे उत्कृष्ट काव्ये नीतिपर व तत्त्वज्ञानासंबंधी काही ग्रंथ आणि सुरस आत्मचरित्र लिहिले.

बलोपासना, भक्ती, बंधुत्व, ऐक्य, नीती, सदाचार वगैरे भावना शिखांमध्ये प्रज्वलित करणारे कार्यक्रम गोविंदसिंगांनी हाती घेतले. शीख व हिंदू यांच्यात लढवय्येपणा बाणला तरच ते मुसलमानांच्या अतिक्रमणाला तोंड देऊ शकतील ही जाणीव गोविंदसिंगांना झाल्यामुळे त्यांनी स्वतःचे लष्कर उभारण्याची योजना आखली. या योजनेप्रमाणे लष्कर उभे केले. त्यांत त्यांनी पठाण–मुसलमान व हिंदूंचीही भरती केली. पण पठाण लोक शेवटी बादशहाच्या लष्कराला जाऊन मिळाले. शिखांची धर्मनिष्ठा गुरू गोविंदसिंगांनी एवढी वाढविली की हजारो शीख

धर्मासाठी प्राणार्पण करण्यास तयार झाले. त्यांनी आनंदपूर येथे एक मेळावा भरविला. तेथे त्यांनी घोषणा केली की मला पाच शीख तरुणांना समोरच्या तंबूत बळी द्यावयाचे आहेत. कोण बळी जाण्यास तयार आहे ? तेव्हा पाच तरुण उभे राहिले. ते पूर्वाश्रमीचे, एक ब्राह्मण, एक क्षत्रिय व तीन अस्पृश्य होते. गुरुंनी एकेकाला तंबूत नेले व प्रत्येकवेळी रक्ताने माखलेली तलवार हातांत घेऊन ते तंबू बाहेर आले. पाचव्या तरुणाची पाळी संपल्यानतर गुरुने पाचही तरुणांना बाहेर आणून शिखांच्या मेळाव्यापुढे उभे केले; तेव्हा सर्व मेळावा आश्चर्यचकित झाला. तेव्हा गुरू म्हणाले की, तुमची धर्मनिष्ठा कसाला लावण्यासाठी मी हे केले. मी तंबूत ५ बकरे ठेवलेले होते. त्या एकेकाचा शिरच्छेद मी दरवेळी केला व रक्ताचे थेंब निथळणारी माझी तलवार तुमच्या समोर आणली. तुम्ही धर्मनिष्ठेत माझ्या कसाला उतरलात. हे पाच तरुण शीख आजपासून पंजपियार ( पाच प्यारे ) म्हणून शिखांच्या इतिहासात पवित्र मानले जातील. यांच्या हातून मी आजपासून नव्या शीख समाजाची मुहूर्तमेढ रोवतो. या समाजाचे नवे नाव ' खालसा ' (पवित्र) आजपासून चालू होईल, आजपासून ' खालसा ' समाजात नवे रीति-रिवाज सुरू होतील. ते आता मी सुरू करतो. गुरू नानक यांच्यापासून चालू असलेला ' चरणपौहल ' विधी आपण अजपर्यंत पाळत आलो. प्रार्थनेला बसण्या-पूर्वी गुरू आपले पाय धूत असत व ते पाणी आपण तीर्थ म्हणून पीत असू. याच्या ऐवजी आता आपण नवा विधी सुरू करू या, असे बोलून गुरुंनी एक लोखंडाचे भांडे घेतले. त्यात पाणी ओतले. मग त्यात दुधारी तलवार (खांडा) घालून ते पाणी पाच पवित्र स्तोत्रे म्हणत ढवळले. लोखंडातून व तलवारीतून उत्पन्न झालेले हे पाणी म्हणजे अमृत आहे. ते शिखांनी प्यावे आणि लोखंडाप्रमाणे कणखर व्हावे आणि सिंहाप्रमाणे लढावे. यापुढे प्रत्येक शिखाच्या नावापुढे सिंग (सिंह) हे पद लावण्यात येईल. हे अमृत किती प्रखर आहे हे मी तुम्हांस दाखवितो असे म्हणून गुरुने ते अमृत एका लहान भांड्यात बाजूला ठेवले. तेव्हा दोन चिमणे ते पिण्यास आले. ते ते अमृत प्याल्यावर झगडू लागले व झगडता झगडता दोघेही मेले. कोणी माघार घेतली नाही. हा प्रकार पाहून मेळावा आश्चर्यचकित झाला. त्यानंतर गुरू म्हणाले, मी आता या ' पाच प्यारे ' यांना हे अमृत देऊन दीक्षा देतो. तेव्हा गुरुपत्नी साहेबकौरजी या उठून म्हणाल्या, "या अमृताला थोडे बत्तीसे, मिळविण्याची मला परवानगी द्या म्हणजे हे अमृत पिणाऱ्या खालसा समाजात गोडी उत्पन्न होईल." गुरुंनी संमती दिली. नंतर गुरू म्हणाले की, आजपासून सर्व शिखांना नवा जन्म प्राप्त होणार आहे. या अमृताने मी सर्वांना दीक्षा देणार आहे, असे बोलून गुरुंनी पाच प्यारे यांना बोलाविले त्यांना ते अमृत लोखंडाच्या

भांडयांतून घोट घोट प्यावयास सांगितले आणि 'वाह् गुरूजी का खालसा' श्री. वाह् गुरुजीकी फक्ते ' अशी घोषणा करीत गुरूंनी पाच प्यारे यांच्या डोकीवर अमृताचे थेंब टाकले व त्यांना गुरूंनी नवी नावे दिली; ती अशी–दयासिह, धर्मसिंह, मोहकमसिंह, साहेबसिंह आणि हिम्मतसिंह. त्यानंतर गुरूंनी मेळाव्याला सांगितले की, हे **पाचप्यारे** म्हणजे **खालसा** ! आणि **खालसा** हे मला गुरूस्थानी होय ! ते तुम्हांलाही गुरूस्थानी आहेत. मी या खालसापुढे नतमस्तक होतो असे म्हणून गुरूंनी ' पाचप्यारे ' यांना साष्टांग नमस्कार घातला. त्यांचे अनुकरण करून सर्व मेळाव्याने **खालसाला** नमस्कार केला.

गुरूंनी मेळाव्याला सांगितले की, आजपासून प्रत्येक शीख पूर्वाश्रमीचे सर्व आचार, विचार व धार्मिक कर्मे सोडून संपूर्णपणे खालसा होत आहेत व त्यांना' सिंह' हे नामाभिधान मिळत आहे. त्यांनी पाच पवित्र वस्तू जवळ ठेवल्या पाहिजेत.

१) केस राखणे, २) कंगवा - केस विंचरण्यासाठी बाळगणे, ३) कच ( गुडघ्यापर्यंत असणारी विजार ) वापरणे ४) कडे उजव्या मनगटावर वापरणे ५) कृपाण ( लहान तरवार ) कमरेवर बाळगणे. याशिवाय प्रत्येक खालसाने पाच राहत ( आचार ) पाळले पाहिजेत १) अंगावरील कोणत्याही भागावरील केस न कापणे २) तंबाखू खाणे अगर ओढणे व दारू पिणे - वर्ज्य ३) फक्त एकाच झटक्याने मारलेल्या मेंढीचे मांस खाणे. ४) मुसलमान स्त्रियांना त्रास न देणे, ५) . . . . . . ? त्यानंतर गुरूंनी ' पाच प्यारे ' यांना सांगितले की, तुम्ही आता खालसा धर्माचा प्रचार करीत सर्व देशभर फिरा, आणि त्यांनी ' पाच प्यारे ' यांना नमस्कार करून उद्‌गार काढले 'वाह् गुरूजीका खालसा ! वाह् गुरूजीकी फत्ते ! ' (खालसा हे परमेश्वराचे लाडके पुत्र आहेत ! परमेश्वराचा जयजयकार असो ! ! ) – – – – ( खुशवंतसिंग पान ७६–७८, ८२–८४; छब्रा पान ११० व रातव पान १७–१९)

गुरू गोविंदसिंग यांनी अस्पृश्य वर्गातील स्त्रीपुरुषांना शीख धर्माची दीक्षा खेडोपाडी फिरून दिली, आणि त्यांना शीख समाजात समानतेचे स्थान दिले. याबद्दल वरिष्ठ हिंदू जातींतून शीख झालेल्या बऱ्याच लोकांनी नापसंती दाखविली. त्यांनी याबद्दल गुरूकडे तक्रारी केल्या पण गुरूंनी त्यांना दाद दिली नाही. तेव्हा हे लोक रुष्ट झालेले शीख स्वतःला गुरू नानकांचे शिष्य म्हणवून घेऊ लागले. ते स्वतःच्या नावापुढे ' सिंग ' हे पद लावीत नसत. ' सिंग ' हे गुरू गोविंदाचे शिष्य म्हणू लागले.या प्रकरणामुळे शीख समाजात वरून जातिभेदाचे बीज रुजले, आणि पुढील काळात 'अस्पृश्य शीख' या जाती धंद्यावरून निर्माण झाल्या.हा जातिभेद ब्रिटिशांच्या लष्करात भरती झालेल्या शिखांनीही पाळला.

गुरू गोविंदसिंग यांनी शीख लोकांना शीलवान व धार्मिक वृत्तीचे करण्याचे जे प्रयत्न केले त्यांत त्यांना बऱ्याच अंशी यश आले. पण पुढील काळात दारू, गांजा, अफू, तंबाखू, परदारागमन, वगैरे अनीतिमान आचरणांचा शीख समाजात शिरकाव झाला.

गुरू गोविंदसिंग यांनी ग्रंथसाहेब यात बरीच भर घातली. हे पवित्र कार्य ते मुसलमानांच्या हल्ल्याला तोंड देत सर्व भारतभर फिरत असताना करीत असत. अशा फिरतीत त्यांचा मुक्काम नांदेड ( मराठवाडा ) येथे असतानाच त्यांचा खून करण्याचा कट रचण्यात आला. कटातील सूत्रधार मुसलमान होते. त्यांचे हस्तक दोन पठाण हे गुरूंच्या लष्करात होते. त्या दोघांनी गुरू गोविंदसिंग यांच्यावर हल्ला केला. मृत्युपूर्वी त्यांनी शिखांना सांगितले की, यापुढे आपली गुरू परंपरा बंद! यापुढे ग्रंथसाहेब हेच आपले आता कायमचे गुरू ! त्यातील आदेशाप्रमाणे सर्व शिखांनी वागावे. गुरू गोविंदसिंग, नांदेड येथे ७–१०–१७०८ रोजी दिवंगत झाले. तेथे शिखांनी गुरुद्वार उभारले ते शिखांचे एक पवित्र ठिकाण मानले जाते. ( खुशवंत, पा. ८३–९५ आणि तेजासिंग, २४–२५ )

(१) एकेश्वरी पूजा, (२) सकाळी, संध्याकाळी व प्रत्येक जेवणाचे अगोदर प्रार्थना करणे व ग्रंथसाहेबातील काही वचने म्हणणे, (३) जेवताना डोके उघडे न ठेवणे, (४) गाईला पवित्र मानणे, (५) संत आणि मूर्ती यांची पूजा न करणे, (६) मशिदी व हिंदूंची मंदिरे याना भेट न देणे, (७) ब्राह्मण आणि मुल्ला आणि त्यांची धर्मशास्त्रे यांना न मानणे, त्यांचे धर्मोपदेश न ऐकणे आणि त्यांची धार्मिक प्रतीके यांना मान न देणे, (८) खालसा तेवढा एक, त्यांच्यात जातिभेद नाहीत हे तत्त्व कटाक्षाने पाळणे, (९) लोणी, गव्हाचे पीठ व साखर एकत्र करून तळलेला खाद्यपदार्थ यथाविधी शास्त्रोक्त गुरुवचनांनी पवित्र करून ते जमलेल्या शिखांना प्रार्थनेनंतर गुरुप्रसाद म्हणून वाटणे व तो वाटताना जातिभेद किंचितही न पाळणे आणि (१०) निळ्या रंगाची वस्त्रे दररोज वापरणे अशी आचारसंहिता गुरू गोविंद यांनी शिखांच्यासाठी तयार केली. शीख धर्म व शीख समाज शक्तिमान व नीतिमान करण्यासाठी गुरू गोविंद यांनी अशा प्रकारचे पवित्र नियम तयार केले. पण काही काळानंतर, विशेषतः पाश्चात्य संस्कृतीची छाप शीख लोकांवर पडत गेली, तेव्हा शीख लोक पाश्चात्य पद्धतीचे पोशाख करू लागले, तंबाखू ( सिगार व सिगरेट्स ) ओढू लागले, दारू पिऊ लागले, परदारागमन करू लागले, आणि हॉटेलमध्ये मांसाहार घेऊ लागले. तेव्हा त्यांच्यात सुधारक व जीर्णमताभिमानी असे भेद पडले. त्यांच्यात जातिभेदही निर्माण झाले. ते लोक

शीलभ्रष्ट व धर्मभ्रष्ट झाले. त्यांच्यातील बंधुप्रेम व ऐक्यभाव कमजोर झाले. ( तेजासिंग, पा. २४–२५, भगत पा. ८९–९१ छब्रा )

शीख धर्म व शीख समाज यांनी मुसलमानी सत्तेला वीरवृत्तीने तोंड देऊन जो स्फूर्तिदायक इतिहास निर्माण केला, त्याचे आकर्षण बाबासाहेब आंबेडकरांना मनस्वी वाटू लागले. ( हिंदुस्थानातील दोन मुख्य धर्मांच्या चांगल्या तत्त्वांच्या मिलाफाने बनलेला शीख धर्म ) याबद्दल सर्व बाजूंनी विचार करून त्यांनी ठरविले की, पददलित अस्पृश्यांना महापराक्रमी करणारा हा शीख धर्म आहे. तो आपण स्वीकारावा, आणि शिखांच्या आर्थिक सहाय्याने अस्पृश्य समाजात शिक्षण प्रसार करावा आणि भारताच्या लष्करात व सरकारीदरबारी अधिकारांची पदे काबीज करावीत. शीख समाजाची व अस्पृश्य समाजाची लोकसंख्या एकत्र झाली की, भारतीय राजकारणात प्रचंड उलथापालथ आपणांस घडवून आणता येईल, असेही त्यांना वाटत होते.

शीख धर्माचा पद्धतशीर अभ्यास करणारे व त्यानंतर धर्माचे प्रचार कार्य करणारे लोक तयार करणे जरूर आहे, असे बाबासाहेबांना वाटल्यानंतर त्यांनी शीख पुढाऱ्यांपुढे ही योजना मांडली. ती त्यांनी ताबडतोब मान्य केली. मुंबईतील १६ व्यक्तींची निवड, अमृतसरला पाठविण्यासाठी बाबासाहेबांनी केली. त्यांत बहुसंख्य पूर्वाश्रमीचे संत व गोसावी (बैरागी) होते. ते सर्वजण महार समाजातील होते. या १६ व्यक्तींना अमृतसरला १५ सप्टेंबर १९३६ ला मुंबईहून पाठविण्यात आले. या सोळा जणांचे नेतृत्व श्री. शंकरदासबुवा नारायणदासबुवा बर्वे (चितेगाव जि. नाशिक) यांच्याकडे सोपविलेले होते. श्री. बर्वे हे भक्तिमार्गातील गृहस्थ होते. धर्मांतराच्या चळवळीत संतांची जी परिषद मुंबईत (१९३६) भरली होती तीत त्यांनी आपली दाढी, जटा व माळा यांची आहुती दिलेली होती. त्यांना पूर्वी बाबासाहेबांनी ' बहिष्कृत हितकारणी सभा ' आणि ' बहिष्कृत भारत ' यांचे प्रचारक म्हणून नेमलेले होते. या संबंधीचे बाबासाहेबांचे पत्र असे होते :–

॥ जय भवानी ॥

Bhimrao R. Ambedkar,
M. A., Ph. D., D. Sc.
Bar - At - Law
Member, Legislative Council,
Bombay

Damodar Hall,
Parel, Bombay
4-7-27

This is to certify that the bearer. Shankardas Narayandas Barve is *a* worker of the **Bahishkrit Hitkarini Sabha,** an organization established for the uplift of the Depressed classes and a canvasser for the 'Bahishkrit Bharat' a paper stand for safeguarding the interests ot the Depressed classes.

His duty is to travel from place to place in the presiding in the cause of the Depressed classes to deliver lectures and enhart them to strive for their betterment. It is requested that, the public bodies should help him as far as possible..

Sd./
B. R. Ambedkar.

श्री. बर्वे यांच्या संबंधी ६ मे १९२७ च्या 'बहिष्कृत भारत' पत्रात अग्र–लेखाच्या वर, ५ पानावर खालील मजकूर प्रसिद्ध केलेला होता.

**" विशेष सूचना "**

बहिष्कृत भारत पत्रासाठी वर्गणी गोळा करण्याचे कामी आम्ही वेदमूर्ती हरीपरायण श्री. शंकरदासबुवा नारायणदासबुवा चित्तेगावकर यास नियोजित केले आहे. ते या कामासाठी गावोगाव फिरणार आहेत. पत्राच्या बाबतीत वर्गणी व देणगी घेण्याचा अधिकार त्यांस आम्ही दिला आहे. तरी ज्यास आमच्याशी प्रत्यक्ष व्यवहार करण्याची सोय नसेल त्यांनी आमच्या या प्रचारकातर्फे व्यवहार करावा.

व्यवस्थापक
'बहिष्कृत भारत'

सोळाजणांची तुकडी अमृतसरला पोहोचली तेव्हा श्री. बर्वे यांनी बाबा–साहेबांना तसे पत्रद्वारे कळविले. त्यात त्यांनी असेही लिहिले होते की, आमचा धार्मिक अभ्यास चालू झाला आहे. तेव्हा त्या पत्राला बाबासाहेबांनी जे उत्तर दिले ते असे :–

| | |
|---|---|
| 'भीमराव रामजी आंबेडकर' | 'राजगृह' |
| एम्. ए. पी. एच्., डी., | दादर |
| डी. एस्सी., बॅरिस्टर ॲट लॉ. | मुंबई १४ |
| एम्. एल्. सी., जे. पी. | ३०–९–३६ |

रा. रा. शंकरदास बर्वे यांस अनेक जोहार.
आपले पत्र पोहोचले आपण सर्वजण सुखरूप पोहोचलात व सर्व व्यवस्था चांगली आहे हे वाचून अत्यानंद झाला. आपण सर्वांनी प्रकृतीस जपत जाणे. इकडील सर्व कुशल आहे. काही चिंता करू नये. तुम्हां सर्वांना धर्मांतराच्या बाबतीत जो पहिला मान मिळाला आहे. त्याबद्दल इतर लोक तुमचा हेवा करीत आहेत. या मानाप्रमाणे तुम्ही आपले कार्य संकलित करून याल, अशी आशा आहे. सर्वांस माझा नमस्कार.

आपला कृ.
भीमराव आंबेडकर.

या सोळा जणांनी ३१ मार्च १९३७ रोजी अमृतसर येथील 'अकाल तख्त' येथे शीखधर्माची दीक्षा घेतली. ते मुंबईत ४ एप्रिल १९३७ ला आले. त्यांचा जाहीर सत्कार १४ एप्रिलला विलेपार्ले येथे शीख मिशनचे श्री. शेटिया बाबू यांनी केला. सदर समारंभास बाबासाहेब व त्यांचे इतर सहकारी उपस्थित होते. सदर समारंभाचा फोटो काढण्यात आला.धर्मप्रचारक म्हणून त्यांना शीख मिशनतर्फे दरमहा पगार. रु. ४५, १७-४-३७पासून ठरविलेलाहोता. तो पगार बाबासाहेबांच्या मार्फत त्यांना देण्यात येत असे. हे धर्मांतरित लोक फारसे शिकलेले नव्हते, शीख धर्माचा त्यांचा अभ्यासही जुजबी स्वरुपाचा. तेव्हा हे अस्पृश्य समाजांत परिणामकारक प्रचार कसा काय करणार ? अशा शंका अनेक लोक प्रदर्शित करीत. बाबासाहेबांना खरोखरच जर शीख धर्म स्वीकारावयाचा होता तर त्यांनी सुशिक्षित लोक का हाती धरले नाहीत ? अशाही शंका काही लोकांच्या चर्चेचा विषय झाल्या होत्या. पण या शंकांचा स्फोट कोणीच समाजात उघडपणे केला नाही. कारण बाबा करतील ती पूर्व इतकी त्यांच्यावर लोकांची श्रद्धा बसलेली होती ! हे धर्मांतरित लोक प्रचार कार्यासाठी हिंडू लागले तेव्हा धर्मांतराबरोबरच 'स्वतंत्र मजूर' पक्षाचेही प्रचार कार्य करण्याचे आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे हे लोक महाराष्ट्रातील जिल्ह्यांतून फिरत प्रचार करू लागले. पण त्यांच्या या दुहेरी प्रचाराच्या परिणाम काही ठिकाणी बरा होई तर काही ठिकाणी अनिष्ट होई. काही प्रचारकांच्या आचरटपणाच्या आणि आगाऊपणाच्या वर्तनाबद्दल लोकांकडून विरोध होई. अशा वेळी बाबासाहेब प्रचारकांची बाजू घेऊन लोकांची तोंडे बंद करीत असत. याचे एक उदाहरण मी देतो. जनतेच्या १८-१२-३७ च्या अंकात ( पा. ६ ) प्रसिद्ध झालेला मजकूर असा :–

## 'जाहीर सूचना'

सर्व लोकांस कळविण्यात येते की, शीख धर्माची दीक्षा घतलेले श्रीयुत

अर्जुन रामजी कादगावकर उर्फ केरसिंग यांनी हल्ली कोकणात जो दौरा काढला आहे तो माझ्या पूर्ण परवानगीने काढला आहे. तरी त्यांच्या विरुद्ध रा. शिवा भाग्या जांभारकर यांनी जे खोडसाळपणाचे पत्र पाठविले आहे, ते अतिशय चुकीचे आहे. जनतेने त्या पत्राचा विचार करू नये व असे खोडसळपणाचे पत्र मी चुकीने लिहिले अशी कबुली देऊन रा. शिवा भाग्या जाभारकर यांनी श्रीयुत भादगावकर यांची माझ्या समक्ष माफी मागितली. तरी सर्वास हेच जाहीर करतो की, भादगावकर बुवा हे माझे अनुयायी आहेत. त्यांच्याविरूद्ध कोणी खोटया नाटया बातम्या प्रसिद्ध करतील त्यांजवर कोणीही विश्वास ठेऊ नये, अशी नम्र विनंती आहे.

दादर, १२–८–३७ आपला

डॉ. भीमराव आंबेडकर

श्री. बर्वे यांना ' भाई अमरसिंग ' व इतर धर्मांतरितांना अशीच शीख नावे देण्यात आली होती. हे सर्व धर्मांतरित प्रचारासाठी फिरू लागले. तीन चार महिन्यांच्या अवधीनंतर प्रचारकांना मासिक वेतन वेळेवर मिळेना व जे मिळे ते अपुरे पडू लागले. या व इतर कारणांमुळे सोळा प्रचारकांनी अंग काढून घेतले. पैकी पंधरा जणांनी आपल्या पूर्वीच्या ' जटा माळा ' धारण केल्या व भीक्षा मागत फिरू लागले. श्री. बर्वे बाबासाहेबापासून दूर झाले ते कायमचेच ! ते ' खालसा कॉलेज ' मध्ये नोकर म्हणून राहिले. ते शीख म्हणून तेथेच १९५० सालात वारले.

शीख धर्मप्रचारकांची अशी वाताहत झाली. मध्यंतरीच्या १९३७–४१ च्या काळात बाबासाहेब व शीख मिशन व खालसा कॉलेज ( जून १९३७ ला सुरू ) या संस्थांचे सूत्रधार यांच्यात अनेक कारणानी धुसफूस सुरू झाली व शेवटी बाबासाहेबांनी शिखांशी असलेले आपले सर्व संबंध तोडले. आंबेडकरांनी आपल्याला खड्डयात टाकले अशी शीख समाजाची समजूत झाली.

' भारत भूषण प्रिंटिंग प्रेस ' पूर्वी कामाठीपुऱ्यात होता. तो नायगावला मोरबागच्या पश्चिम नाक्यावर शीख मिशनने घेतलेल्या जागेत आणून बसविला त्यांच्यासाठी छोटीशी बंगली मिशनने बांधलेली होती. कारण प्रेस व ' जनता ' पत्र यांचा उपयोग धर्मांतराच्या कार्यासाठी करावयाचा होता. बाबासाहेबांचे शिखांशी संबंध तुटल्याबर प्रेस मोरबागच्या पूर्व नाक्याकर नेण्यात आला.

शीख लोकांशी आपण संबंध का तोडले, या संबंधाने बाबासाहेबांनी कधीच स्पष्ट खुलासा केला नाही. शिखांनीही केला नाही. मात्र अफवा अशा होत्या की, बाबासाहेब शीख मिशनचे सर्व पैसे स्वतःच्या ताब्यात मागत होते. या मुद्यावर त्यांचे, मिशनच्या सूत्रधारांबरोबर मतभेद व तंटे झाले. दुसरी अफवा म्हणजे शिखांनी अवश्य पाळावयाचे पाच 'ककार', केस, कच्छ, कृपाण, कंगा व कडा यांपैकी केस राखणे आम्हांला आवश्यक राहू नये असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. हे शिखांना मान्य नव्हते. या मुद्यावर बाबासाहेब व शिखांचा बेबनाव झाला, म्हणून त्यांनी शीख धर्माचा स्वीकार केला नाही. खरी कारणे कधीच बाहेर आली नाहीत.

मागील प्रकरणात सांगितलेली परळच्या बहुजन विहारमधील गडबड आणि बाबासाहेबांनी शीख धर्माचा स्वीकार करण्याची चालविलेली तयारी पाहून श्री. धर्मानंद कोसांबी यांना अत्यंत वाईट वाटले. त्यांनी बहुजन विहाराचे एक ट्रस्टी श्री. वैकुंठभाई मेहता यांना विनंती केली की, हा विहार कलकत्त्याची "महाबोधी सोसायटी ऑफ इंडिया" या संस्थेकडे सुपूर्त करा व मला या व्यापातून मुक्त करा. तसा कायदेशीर व्यवहार झाल्यानंतर श्री. कोसांबी काशीला गेले व तेथे त्यांनी ग्रंथ लिहिण्याचे काम हाती घेतले. याच्यापूर्वी त्यांचे खालील ग्रंथ प्रसिद्ध झालेले होते :-

१) बुद्ध, धर्म आणि संघ ( १९-४-१९१० )
२) बुद्धलीला सारसंग्रह ( १०-३-१९१४)
३) जातक कथा संग्रह भाग १ (५-४-१९२४)
४) निवेदन (५-५-१९२४)
५) समाधिमार्ग (१९२५)
६) बौद्ध संघाचा परिचय (१९२६)
७) हिंदी संस्कृति आणि अहिंसा (५-१२-१९३५)
८) लघुपाठ (बौद्ध सूत्रांचा संग्रह, दुसरी आवृत्ति (५-५-३७)

काशीस गेल्यावर 'काशी विद्यापीठाने' कोसांबींना लिहिण्यास एकांत मिळावा, म्हणून एक स्वतंत्र घर बांधून दिले व त्यांच्या संशोधनासाठी लागतील ते सर्व ग्रंथ ( इंग्रजी, संस्कृत, व पाली ) पुरविले. त्यानंतर त्यांनी खालील ग्रंथ लिहिले :-

१) भगवान बुद्ध चरित्र, पूर्वार्ध (१९४०)
२) " " " उत्तरार्ध (१९४१)
३) पार्श्वनाथाचा चातुर्याम (२९–६–१९४९)
४) बोधिसत्व (नाटक १९४९)

श्री. धर्मानंद कोसांबी (१८७६–१९४७) वर्ध्याला १९४६ मध्ये येऊन राहिले व तेथेच बौद्ध धर्माप्रमाणे प्रत्येक दिवशी एक घास कमी करीत करीत शेवटी उपोषण करून बुद्धवासी झाले.

आपल्या हातून काही धर्मकार्य वा देशकार्य होत नाही, तेव्हा आपण पृथ्वीला भारभूत झालो आहोत, अशी त्यांची धारणा झाल्यामुळे त्यांनी प्रायोप-वेशनाने आत्मसमर्पण केले. ते आणखी दहा वर्षे जगले असते तर बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला जो धर्मचक्रपरिवर्तनाचा प्रचंड सोहळा केला, तो पहावयास त्यांना मिळाला असता. आणि त्यांना आनंदाच्या समाधीत निर्वाणपद भोगता आले असते.

तिरुवनमलाई (मद्रास) येथील थोर संत श्री. रमण महर्षी यांच्या व धर्मानंद कोसांबींच्या चेहऱ्यामध्ये, मला विलक्षण साम्य आढळून आले.

# प्रकरण १० वे

## " धर्मांतराला विरोध आणि पाठिंबा "

येवले येथील धर्मपरिषदेत धर्मांतराच्या घोषणेचा विचार विनिमय करून तिच्या पूर्ततेसाठी जोराची चळवळ चालू करण्याच्या उद्देशाने मुंबईत ' मुंबई इलाखा महार परिषद ' दि. ३० व ३१ मे १९३६ रोजी व्हिन्सेंट रोड व नायगाव यांच्यामधील भव्य पटांगणात भरविण्यात आली. या सभेसाठी जो भव्य मंडप उभारण्यात आलेला होता त्याला " रमाबाई नगर " हे नाव देण्यात आले होते. परिषदेचे अध्यक्ष हैद्राबादचे अस्पृश्य पुढारी श्री. बी. एस्. व्यंकटराव हे होते. या परिषदेस डॉ. सोळंखी, श्री. भास्करराव जाधव, श्री. देवराव नाईक, श्री. डी. व्ही. प्रधान, श्री. अ. ह. गद्रे, श्री. र. ल. जोशी, इंदूरचे श्री. एस्. के. कर्णिक, श्री. पी. जी. काणेकर, महाडचे श्री. सुरेंद्र टिपणीस, श्री. देवदत्त टिळक, श्री. भास्कर कद्रेककर, डॉ. केशवराव पाध्ये, श्री. वाघ, मि. व मिसेस जॉन स्टॅली, बापूसाहेब सहस्त्रबुद्धे, कमलाकांत चित्रे, सुभेदार श्री. राजाराम भोळे, श्री. भाऊराव गायकवाड, श्री. अमृतराव रणखांबे हे हजर होते.

## ' मुक्ती कोन पथे ? '

बाबासाहेबांचे भाषण संपल्यावर सभेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पण सभेचे कामकाज संध्याकाळपर्यंत तहकूब ठेवल्यामुळे सभेत बोलू इच्छिणाऱ्यांना संध्याकाळपर्यंत थांबावे लागले. सभेत समता–सैनिक दलाने चोख व्यवस्था ठेवली होती. सभेस अनेक धर्मांचे उपदेशक व अनुयायी उपस्थित होते. सभेचे कामकाज ६–३० वाजता सुरू झाले. या सभेत अनेक ( महार ) स्त्री – पुरूषांची भाषणे झाली. श्री. भाऊराव कृष्णाजी गायकवाड यांनी धर्मांतराचा ठराव मांडला तो असा :– "मुंबई इलाखा महार जातीची ही परिषद

पूर्ण विचारांती असे जाहीर करते की, महार जातीला समता व स्वातंत्र्य मिळ–विण्यासाठी धर्मांतर करणे हा एकच मार्ग आहे. ही परिषद आमचे एकमेव पुढारी डॉ. आंबेडकर यांना निश्चयपूर्वक असे जाहीर आश्वासन देते की, महार समाज सामुदायिकरीत्या धर्मांतर करावयास तयार आहे." ( टाळ्यांचा कडकडाट )

## पूर्वतयारी

धर्मांतराची पूर्वतयारी म्हणून महार जातीने यापुढे हिंदू देवदेवतांची पूजा–अर्चा करू नये, हिंदूचे सणवार, व्रतवैकल्ये, उपोषणे वगैरे पाळू नयेत व हिंदूंच्या कोणत्याही धार्मिक उत्सवात भाग घेऊ नये. तीर्थाटने, वाऱ्या वगैरे करू नयेत, असे या परिषदेचे मत आहे. ( टाळ्या )

( ज्ञानप्रकाश दि. १–६–१९३६ )

हा ठराव निरनिराळ्या वक्त्यांच्या भाषणानंतर मंजूर झाला.

याच परिषदेच्या मंडपात महार समाजातील संत, साधू, वैरागी, गोसावी इत्यादिकांची परिषद १–६–१९३६ ला झाली. या परिषदेचा वृत्तांत ३-६-१९३६ च्या " स्वराज्य " पत्रात खालील प्रमाणे प्रसिद्ध झाला होता –

" संत परिषदेत दाढ्या–माळांची होळी
साधूंच्या कुळांत जन्मलेल्यांची कामगिरी
महार ब्राह्मणाचा गुरु होऊ शकत नाही
खरा साधू कोण मानावा ?
महार संत ही महारच राहील

मुंबई ता. १ – मुंबई इलाखा महार परिषदेच्या मंडपातच आज सकाळी अखिल मुंबई इलाखा संत परिषद धर्मांतराच्या ठरावास सक्रिय पाठिंबा देण्यास भरली होती. परिषदेचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले होते. साधुसंत, महंत, नाथ, कबीर, वारकरी इत्यादी सर्व पंथांतर्फे प्रतिनिधी व सभासद हजर होते. व्यासपीठाच्या समोर एक खड्डा खणलेला दिसत होता, व काही लाकडेही तेथे पडलेली दिसत होती. परिषदेचे स्वागतअध्यक्ष महंत शंकरदास नारायण बर्वे यांनी नियोजित अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ब्रह्मवेत्ते व तत्त्वज्ञानी असा उल्लेख करुन धर्मांतर व संतांचे कर्तव्य या मुद्यावर ते म्हणाले, " आपण सर्व संत मंडळी अस्पृश्य समाजाचे प्रधान घटक आहोत व

सर्व समाजाचे जे भवितव्य तेच आपले भवितव्य होय. संताचा धर्म आजवर सनातन हिंदू होता. त्या धर्माच्या रूढी, व्रतवैकल्ये, नेमधर्म आजवर अंधपणे व गतानुगतिकत्वाने पाळून आम्ही काही साधले नाही. तर उलट मनुष्यधर्माला पारखे झालो व व्यर्थ कालापव्यय केला. धर्मांतराच्या घोषणेला सक्रिय पाठिंबा देऊन आमच्या धार्मिक व बौद्धिक गुलामगिरीच्या सर्व प्रतीकांचे आम्ही उच्चाटन केले पाहिजे व आपल्या संतांच्या निदर्शक, रुद्राक्षाच्या व पवित्र मानलेल्या लाकडांच्या माळा घालून धर्मांतराच्या मार्गाने अस्पृश्य जनतेचे खरेखुरे लोक–कल्याण व सेवा करण्यास बाहेर पडा व संतपंथाची सार्थकता पटवा." अध्यक्षास स्थानापन्न होण्याची विनंती करण्यात येऊन अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारले. ते आपल्या भाषणात म्हणाले आपण प्रत्यक्ष साधू नसलो तरी संताच्या कुळात जन्म घेतल्याचे सांगून व आयुष्यातील जवळजवळ १८ वर्षे साधूच्या संगतीत धार्मिक ग्रंथांचे पठण करण्यात कशी घालविली याचे वर्णन करून डॉक्टर म्हणाले "समाजाच्या घटनेत साधूचे महत्त्व फार मोठे आहे आणि म्हणूनच कित्येक वर्षे अशा स्वरूपाची परिषद भरविण्याची माझी मनीषा होती, निर्विकल्प मनाने विचार केला तर अस्पृश्य समाजातील संतांची कामगिरी, ज्ञानसंपादनासाठी त्यांनी केलेले श्रम व सोसलेला छळ अवर्णनीय आहे. शूद्रांना ज्ञानसंपादन करता येऊ नये, यासाठी हिंदूधर्माने केलेल्या कडेकोट बंदोबस्तातून व कोंडमाऱ्यांतून या लोकांनी ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. आज अनेक अस्पृश्य संतांजवळ कित्येक हस्तलिखित पुरातन ग्रंथ आहेत. तसले ग्रंथ हिंदू धर्माभिमान्यांजवळ नस–तील. परंतु मागील पराक्रमावर संतुष्ट न राहता प्राप्त परिस्थितीतील आपले कर्तव्य पार पाडण्यास संतांनी पुढे आले पाहिजे. संतांनी आजवर काय कमावले? संत महार ते महारच राहिले. महार कितीही विद्वान झाला तरी तो ब्राह्मणाचा गुरू होऊ नये, अशा तऱ्हेची बोधवचने हिंदुधर्माच्या शिलेदारांनी लिहीली आहेत. मला वाटते की, **आजची संतसंस्था भिक्षसंघाची दुर्धारलेली अवस्था आहे**. आजचे संत निःस्वार्थी लोकसेवक तर नाहीतच, पण धर्माचा बागुलबुवा माजवून व थापा देऊन साधुपणा हा पोट भरण्याचा मार्ग बनविण्यात आला आहे.

संतांवर समाजाची जबाबदारी असली पाहिजे. जटा, दाढी, माळा, रंगीत फडकी ह्या बाह्य लक्षणांनी खरा साधू होत नाही. समाजात होत असलेला अन्याय, जोरजुलूम यांचा प्रतिकार करणे हे साधूचे कर्तव्य आहे. तीच लोकसेवा! धर्मांतराच्या घोषणेचा संदेश व त्याची पूर्वतयारी करण्यास या संतसमाजाची अत्यंत आवश्यकता आहे. आहे. लोकांवर त्यांचे वजन असल्यामुळे नव्या धर्माची नवी तत्त्वे

विशद करून सांगण्यास धर्मोपदेशक म्हणून हा समाज बाहेर पडेल. तेव्हा सर्व साधुसंतांना माझे सांगणे आहे की, हिंदुधर्माच्या ढोंगी साधुत्वाचा सांगाडा फकून देऊन नवधर्माच्या प्राणप्रतिष्ठेला बाहेर पडा. नुसत्या माळा, जटांना आज किंमत उरली नसून स्वार्थत्यागपूर्वक सेवा, हीच आज समाजाला हवी आहे. आपल्या साधुत्वाचे सार्थक करावयाचे असेल तर नवधर्माच्या प्रसाराचे कंकण बांधा."

अशा आशयाच्या अध्यक्षीय भाषणानंतर, साळुंखेबुवा ह्यांनी मांडलेल्या ठरावाने संतसमाजाने डॉ. आंबेडकर यावरील आपली निढळ निष्ठा व्यक्त करून व त्यांचे मार्गदर्शन स्वीकारून त्यांनी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेस सक्रिय पाठिंबा देण्याचा निश्चय जाहीर करण्यात आला. दुसऱ्या ठरावावर भाषणे चालू असतानाच व्यासपीठासमोर खड्ड्यात होळी पेटविण्यात आली व एकामागून एक वैरागी, साधू, कबीर, अगोदर आणून ठेवलेल्या नापिताच्या सुविधा वापरून सर्वांच्या पुढ्यात दाढी मिशा, जटांचेउच्चाटन करण्यास बसले. सुमारे पन्नास जणांनी हा कार्यक्रम उरकला व नंतर एकामागून एक अशा ३५० ते ४०० साधुसंतांनी हिंदूधर्मीय पथांची प्रतीके माळा अग्नीत टाकल्या. ह्यावेळचा लोकांचा उत्साह अवर्णनीय होता. जयजयकार धर्मक्रांतिघोषक गर्जना, डॉ. आंबेडकर झिंदाबाद या आरोळ्यापलीकडे दुसरे काहीच ऐकू येईना.

ह्याच परिषदेच्या मंडपात मुंबई प्रांतिक मातंग सभा भरविण्यात आली होती. मातंग समाजातर्फे धर्मांतराच्या घोषणेस व चळवळीस पाठिंबा देण्यात आला. ( स्वराज्य ३–६–३६, टाइम्स ४-६–३६ )

या परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. रेवजी दगडूजी डोळस ह्यांना त्यांच्या ३५ वर्षांच्या समाजसेवेबद्दल ता. ३०मे१९३६ रोजी रात्री १० वा. मानपत्र देण्यात आले. अध्यक्षस्थानी बाबासाहेब होते. मानपत्र, ह्या परिषदेचे चिटणीस श्री. दिवाकर पगारे ह्यांनी वाचून दाखविले. ( प्रभात १–६–१९३६ ) ह्यानंतर राजकीय परिषद बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. अस्पृश्यांना मुंबई इलाख्यात १५ राखीव जागा मिळालेल्या आहेत, त्या सर्व जागा अस्पृश्य उमेदवाराने लढवून मिळवाव्यात; शिवाय आणखी ३० जागा बिनराखीव जागेच्या भागांतून मिळवाव्यात. निवडणुका व्यवस्थितरीत्या लढविल्या तर मुंबई इलाख्यात अस्पृश्यांना ४५ जागा काबीज करता येतील, असे बाबासाहेबांनी मत व्यक्त केले. इलाख्यातील प्रत्येक विभागात २० सभासदांची एक कमिटी नेमावी व त्या समितीने आपल्या

भागात राखीव व बिनराखीव जागेवर अस्पृश्य व स्पृश्य उमेदवार निवडून आणण्याची खटपट करावी, अशी योजना निवेदन करून, निवडणुकांचे पार्लमेंटरी बोर्ड लवकरच स्थापन करण्यात येईल असे बाबासाहेबांनी ह्या राजकीय परिषदेत जाहीर केले. ( ज्ञानप्रकाश – २–६–३६ )

ह्या परिषदेच्या विषय-नियामक कमिटीची बैठक ३०–५–३६ रोजी रात्री ११ ते १२ पर्यंत भरली. तीत तीन ठराव मंजूर करण्यात आले. (१) अस्पृश्यांनी कोणता धर्म स्वीकारावा हे बाबासाहेबांनी ठरवावे. (२) अस्पृश्यांनी आपापसांतील जातिभेद नष्ट करण्यासाठी रोटी व बेटी व्यवहार सुरू करावेत आणि (३) हिंदुस्थानातील सर्व प्रांतातील अस्पृश्यांनी धर्मांतरास पाठिंबा देणाऱ्या सभा व परिषदा भरविल्यानंतर सर्वांची एक परिषद भरवावी व तीत धर्म-स्वीकाराचा जो निर्णय बाबासाहेब देतील तो मान्य करावा. ( नवाकाळ – ३१-६-३६ ) बाबासाहेबांचा साधारण कल शीख धर्म स्वीकारण्याकडे आहे, असा समज त्यावेळी प्रसृत झाला. ह्याचे कारण त्यांच्या बोलण्यात असे विचार प्रदर्शित होत की, तो धर्म हिंदुसंस्कृतीपासून फारसा दूर नाही. पण जो आपल्या अनुयायांना लढवय्ये-पणाचा संदेश देतो असा शीख धर्म आहे. शिवाय प्रत्यक्ष कृतीतही तसा त्यांचा कल दिसत होता. खालील उल्लेखांवरुन हे स्पष्ट होते :–

मिस्टर मणियार ह्यांना नकार :– हरिजन समाजाने धर्मांतराची घोषणा केल्यापासून तो समाज आपल्या धर्मात सामील करुन घेण्यासाठी बऱ्याच धर्मांचे पुढारी टपलेले आहेत. आज सकाळी येथील मुसलमान पुढारी मिस्टर मणियार यांनी मंडपात बरीच भांडी नेऊन हरिजन प्रतिनिधींना जेवण देण्याची तत्परता दर्शविली होती. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिस्टर मणियार यांना स्पष्ट नकार दिल्यामुळे त्यांना हात चोळीत परत जावे लागले.

शीखाकडे मुदपाकखान्याची व्यवस्था :– महार जातीचा शीख धर्म स्वीकारण्याकडे कल झुकणार आहे असे वाटायला जी अनेक कारणे आहेत, त्यांतील एक कारण महार परिषदेतील मुदपाकखान्याची सर्व व्यवस्था लाहोरच्या अकाली दलाचे श्री जथेदार ईश्वरसिंग व माटुंगा गुरुद्वार जथा यांच्याकडे सोप-विण्यात आली होती. उद्या शिखांतर्फे सर्व महार प्रतिनिधींना लंगर (भोजन) देण्यात येणार आहे. ( लोकमान्य – ३१-५-३६ ) ह्या परिषदेचे वृतान्त मुंबईतील गुजराती, उर्दू, मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले होते.

हिंदुस्थानातील इतर वर्तमानपत्रांतूनही ते प्रसिद्ध झाले होते. काही वर्तमानपत्रांनी प्रतिकूल व काहींनी अनुकूल मते प्रदर्शित केली होती. त्याचा सारांश खालीलप्रमाणे :-

प्रतिकूल मते –

1) The People, 25 5-36 ( लाहोर )
या शीर्षकाखाली सदर पत्राने हिंदू समाजसुधारणा होत आहे व अस्पृश्यांना धर्मांतर करावयाची जरूरी नाही आणि धर्मांतर करावयाचेच तर आंबेडकरानी व अस्पृश्यांनी हिंदूंची व धर्माची कुचेष्टा न करता धर्मांतर करावे असे मत प्रदर्शित केले. " — — — it seems grossly improper for Dr. Ambedkar or anybody else to keep on cursing the Hindus as a whole, whether most of them are fighting on his side or against them. It is he that is being unjust to those who have strengthened the claims of the depressed classes for a recognition to equality. We have no prejudice against Dr. Ambedkar and we do not defend the social alignment that has made for the exsistance of a depressed group. But we do say, and every rational person must agree with us that if Dr. Ambedkar wants the Hindu outlook to change, it will not do for him to fall foul of those who stand by him. If however, he wants to abandon Hinduism then he may well leave the business of purging it of its weakness to those that continue to remain within it. '

२) 'इंडियन विटनेस' The Indian Witness, 4-6-36 लखनौ :-
'Dr. Ambedkar's New Technique.' ह्या स्फुटात सदर पत्राने असे विचार प्रदर्शित केले की, उत्तर हिंदुस्थानात भंगी समाजाच्या दोन जाती आहेत. लालबेगी व अझबी शीख. यांची आत्मोन्नतीसाठी चळवळ चालू आहे. पण ती स्वतंत्रपणे. चांभारांचीही चळवळ स्वतंत्र आहे. ह्या तीन जमातींनी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेचा विचार केला तर त्यांना धर्मांतराचे महत्त्व पटेल व ह्या जातींना आत्मप्रगतीचा मार्ग दिसेल.

३) जन्मभूमी :- १-६-३६ — "आंबेडकर के गांधी" ह्या अग्रलेखात सदर पत्राने धर्मांतराच्या घोषणेत काही तथ्य नाही, काही योजना नाही. असा अभिप्राय व्यक्त करुन म. गांधीजी हिंदुसमाजाचे जे मतपरिवर्तन करीत आहेत,

त्यानेच अस्पृश्यांचे हित होईल, धर्मांतराने नाही असे मत प्रदर्शित केले. ( जे नाद महार परिषदेने चमकावी गयी छे, नथी लागतु के कोई अघोर निराशामांथीज अे नादनो उद्‌भव थयो छे ? अेनी पाछळ कोई चिंतन नथी, अेनी पाछळ कोई योजना नथी, आकाश आवेश सिवाय अे नाद पाछळ कोई शक्तिज नथी, अजत्र जंक छे के, आ गुलामीनी घोर खोदवानो धर्म आंबेडकराने धारवोज नथी, साचेन जे परिवर्तननी आंबेडकरोंने आज जरूर पडे छे अे परिवर्तन मानसनुं छे, धर्मनुं नहीं. . . . अछूतो रखे भूले केते ओनो उद्धार आंबेडकरनुं काम नथी ! तेओ रखे विसरे के, गांधी सभी निस्पृती विभूतीयोंसिवाय काई सवगडपंथी पुरूष के कोई समय साधुमानवीना ह थमां अछूतोनां सूत्रो सायमन नथी. "

४) मुंबई समाचार- २-६-३६ :- " वळी पाछी धर्मपलटांनी वातो - तेनी पाछळ कोई डंडो? राज्य द्वारा तो नथी?" ह्या अग्रलेखात सदर पत्र म्हणाले की, स्वराज्य संपादनासाठी हिंदुस्थानचा जो लढा कित्येक वर्षे चालू आहे त्यात अस्पृश्य समाजाची चळवळ ही एक मोठी धोंड आहे आणि इंग्रज लोक अस्पृश्यांची चळवळ स्वराज्य संपादनाच्या चळवळीच्या मार्गात वेळोवेळी उभी करते. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा व चळवळ ही ब्रिटिश कपटनीतीचे डाव नसतील कशावरून ?

५) हिंदुस्थान अने प्रजामित्र - २-६-३६ :- " महारो अने धर्मपरिवर्तन " या अग्रलेखात हिन्दू समाज अस्पृश्यांना वाईट रीतीने वागवतो म्हणून अस्पृश्यवर्ग धर्मांतरास तयार झाला असे सांगून अस्पृश्यांची चळवळ ही अस्पृश्यांना जादा राजकीय हक्क हिंदूकडून उपटण्याची युक्ती होय, असे मत प्रदर्शित केले. परंतु धर्मांतर हा अस्पृश्यांचा सुधारणेचा मार्ग नसून पतनाचा आहे असा शेवटी या पत्राने अभिप्राय व्यक्त केला (" अेटले जे महार बिरादरोने धर्मपरिवर्तन मां पोतांनी मानवतानो विकास जणातो होय, तेओ भले बुद्धिपूर्वक तेम करे, पण तेमना ठरावो पूरवार करे छे के तेओ तो केवळ गाडरिया प्रवाहनी माफक गतानुगतिकतानुंज आंधळुं अनुकरण करे छे, अे मार्ग उद्धारनो नहीं पण पतननो छे)"

६) जामे जमशेद - २-६-३६ :- या पत्राने " महारोनी कोन्फरन्स - शूं धर्म बदलवाथी हरिजनोने समान दरज्जो मळी शकशे ?" या नावाचा अग्रलेख लिहिला. जिल्हा लोकलबोर्डस्, म्युनिसिपालिटया व सरकार अस्पृश्यांच्या हितासाठी अनेक कार्ये करीत आहेत व हिंदू समाजही अस्पृश्यांकडे सहानुभूतीने पहात आहे. तेव्हा अस्पृश्यांना धर्मांतर करण्याचे काही कारण नाही. त्यामुळे त्यांना वरचा दर्जा प्राप्त होणार नाही. शिवाय येत्या राजकीय सुधारणेमुळे प्रत्येक प्रांतात अस्पृश्यांचा एक राजकीय गट उत्पन्न होईल व त्या गटातर्फे अस्पृश्य लोक आपले म्हणणे ऐकावयास

सरकारात भाग पाडतील. धर्मांतर केल्याने राजकीय गट उत्पन्न होणार नाहीत असे सदर पत्राने मत प्रदर्शित केले आहे.

७) नवाकाळ २-६-३६ :- ह्या पत्राचा लेखक "फरिस्ता" याने संकीर्ण समालोचन हे सदर सर्व परिषदेसंबंधी लिहिले होते. धर्मांतराने अस्पृश्यांच्या परिस्थितीत काही फरक पडणार नाही व म. गांधींची हरिजनोद्धार चळवळ हीच रास्त आहे, अशा अर्थाचे मत ह्या लेखकाने प्रदर्शित केले होते.

8) The congress socialist, 6-6-36 (Bombay) :—धर्मांतराने अस्पृश्यांचे हित न होता भांडवलशाही हिंदू समाजव्यवस्था नष्ट केल्यानेच त्यांचे हित होणार आहे, असे या पत्राने मत प्रदर्शित केले. (**'What the leaders fail to recognise is the fact that the oppressed and the dispossessed exist in every religion and no change of religion will in any way alleviate the economic position of the Mahars. What is really needed is an entire scrapping of the eapitalist economy which breeds distnction and oppresion.'**

९) संघशक्ती – ७-६-३६ :- या पत्राने धर्मांतर, समतेची चळवळ का वैताग? या नावाचा अग्रलेख लिहून, लोकांनी धर्मांतर केले तरी ते ज्या धर्मात जातील तेथेही त्यांना हीन दर्जा मिळेल व त्यांना अगीतून उठून फुफाट्यात पडावे लागेल असे मत प्रदर्शित केले. " धर्मांतराची घोषणा ही एक धमकी असो किंवा काहीही असो, आम्हांला तर तिच्या बुडाशी एक प्रकारचा भ्याडपणा दिसतो. ज्याला समतेची इच्छा आहे तो ती महत्प्रयासाने साध्य केल्याखेरीज मुळीच राहणार नाही. आपल्या समाजात राहून समता साध्य होत नाही, म्हणून दुसऱ्या समाजात जाण्याचा मार्ग भित्रेपणाचा नव्हे काय ? या पत्राने शेवटी असा सल्ला दिला की अस्पृश्यांनी हिंदू समाजात राहूनच हिंदूंशी धैर्याने लढा देऊन आपले माणुसकीचे हक्क मिळवावेत.

१०) सत्यशोधक – ७-६-३६ ( रत्नागिरी ) :- या पत्राने "डॉ. आंबेडकर यांची कृतघ्नता" या मथळ्याखाली एक स्फूट लिहून आंबेडकरांनी जी धर्मांतराची घोषणा केली व परिषद भरविली ती प्रातिनिधिक स्वरूपाची नाही व खेड्यातील महार यांना पाठिंबा देणार नाहीत असे मत व्यक्त केले.

११) लोकसत्ता – ७-६-३७ :- या पत्राने " बुजगावणे निष्फळ होईल " हे स्फूट लिहिले. त्यात त्याने खालीलप्रमाणे मत व्यक्त केले.

– – – – – कोणाही विचारी माणसाला कळून येईल की, डॉ. आंबेडकरांना महार समाजात पुढारीपण कायम ठेवता येण्यापेक्षा सदर उपद्व्यापाचा काहीही उपयोग नाही – – त्यांना धर्मांतराची धमकी देऊन स्पृश्यांकडून यथेच्छ वागण्याची सवलत उपटावयाची आहे. पण अंत:संदेश हा आर्यधर्मीयांचा प्रेरक नसून धर्मग्रंथ हे आर्यांना प्रमाण आहेत. तेव्हा त्यांच्या आज्ञा उल्लंघविण्यात धर्मप्रवण आर्य कधीच तयार होणार नाहीत. तेव्हा आंबेडकरांचे बुजगावणे फोलच होईल हे निश्चित.

१२) केसरी – ९–६–३६ :– या पत्रात 'फुटकी होडी व घातकी नावाडी' या शीर्षकाखाली खालीलप्रमाणे स्फुट लेख प्रसिद्ध झाला होता :– "समुद्राच्या दुसऱ्या तीराला जातेवेळी नावाड्याला जी तयारी करावी लागते तीच तयारी धर्मांतराचे वेळी करावयास पाहिजे. आपल्या जहाजातून किती लोक बसून जाणार याचा अंदाज नावाड्याला करावयास लागतो, त्याचप्रमाणे धर्मांतर करावयास एकूण किती लोक तयार आहेत हे अजमावणे मात्र अवश्य आहे". अशा गंभीर अभिनिवेशाने डॉ. आंबेडकरांनी मुंबई येथे मे अखेर भरलेल्या 'मुम्बई इलाखा महार परिषदे" मध्ये आपल्या प्रदीर्घ भाषणाचा प्रस्ताव केला. दीडशे पानांवर पसरलेल्या व दोन तास चाललेल्या या त्यांच्या भाषणाचे ध्रुवपद कोणते असेल हे आता कोणास नव्याने सांगावयास नको. त्यांच्या झालेल्याच काय पण न झालेल्याही भाषणात कोणता सूर उमटलेला असेल हे कोणालाही ताडता येण्याजोगे आहे. लाहोर येथील जातपात तोडक मंडळाचे ' अधिवेशन गर्भमृत बनविण्याला त्यांच्या अनुच्चारित भाषणाचा हा बदसूरच कारणीभूत झाला. हे त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेवरून सिद्ध होत आहे.

## अनुच्चारित भाषणाचा सूर

त्या अधिवेशनात धर्मांतराचा तारस्वर मी काढणार नाही असे स्पष्ट अभिवचन आगाऊ देणारे कायदेपंडित डॉ. आंबेडकर हे आपल्या अनुच्चारित भाषणात हे माझे हिंदूंपुढील शेवटचेच भाषण आहे असे म्हणून न्यायनीतीची चाड गुंडाळून हिंदुत्वावर निखारा ठेवण्यात बिनदिक्कत धजले. त्याचे प्रायश्चित्त घेण्यासाठी जातपात तोडक मंडळाला, आपले अधिवेशन रद्द करण्यापलीकडे अन्य मार्ग काय होता ? हिंदूंचा एक धर्मग्रंथ असावा, उपाध्यायांची सरकारने परीक्षा घेऊन त्यांचे सरकारी खाते बनवावे आणि ब्राह्मण्याची व जातिसंस्थेची चिता रचावी अशी उपाययोजना डॉक्टरमहाशयांनी त्या भाषणात सांगितली आहे.

पण मुख्य प्रश्न एवढाच आहे की, या सुधारणा अमलात आल्या म्हणजे तरी ते हिंदू धर्मात राहावयास तयार आहेत काय? खरी स्थितीही आहे की त्यांना धर्मांतराचा मोह अनावर झाला आहे. इंग्लंडातून "मे फ्लॉवर" जहाजातून गेलेल्या लोकांनी अमेरिकेची यक्षनगरी बनविली तशी नवी सृष्टी आपण अस्पृश्य बांधवांसाठी उभारू असे रम्यचित्र त्यांच्या डोळ्यापुढे नाचत आहे. पण त्या धाडशी यात्रेकरूंच्या अंत:करणात जे धर्मप्रेम वसत होते, त्याचा आंबेडकरांमध्ये व त्यांच्या अनुयायांत अभावच आहे, हे येवल्यापासून मुंबईपर्यंतच्या साऱ्या सभापरिषदांमध्ये ढळढळीतपणे दिसून आले. त्यांना परतीराचा पत्ता नाही, उतारूंचा अंदाज नाही आणि त्यांची धर्मांतराची नाव धर्मद्वेषाने फुटलेली आहे. अशी घटना आपल्या अज्ञ बांधवाच्यापुढे उभी करण्यात डॉ. आंबेडकर हिंदू समाजाबरोबरच स्वसमाजाचेही अत्यंत नुकसान करीत आहेत. यांत संशय नाही. एकाकी बेटात गेलेल्या रॉबिन्सन क्रूसोची जंगली माणसांशी गाठ पडली; तेच त्यांच्या अविचारी कृत्याचे पर्यवसान होय.

## जठराग्नी भडकत चालला

मुंबई येथील परिषदेतील अध्यक्ष श्री. व्यंकटराव काय किंवा डॉ. आंबेडकर काय, अस्पृश्यांनी दुसरा कोणता धर्म स्वीकारावा व त्या योगाने आपली प्रगती कशी होईल हे कोणीही सांगू शकले नाहीत. उडी घ्यावयास सांगणारा परंतु ती कोठे घ्यावयाची हे निर्दिष्ट न करू शकणारा पुढारी घातकीच ठरत नाही काय? भुताने ढकलून दिल्याप्रमाणे त्यांनी कोठे तरी पडावे हे इष्ट आहे काय? हिंदू समाजातील जातिसंस्था नष्ट होण्यावर अध्यक्षांनी भर दिला आणि खुद्द आंबेडकरही येवल्याच्या परिषदेपासून तसे म्हणत आले. पण आता डॉक्टरसाहेबांचा जठराग्नी भडकत चालला. म. गांधींनी प्राण पणाला लावून मंदिर-प्रवेशाची मोहीम सुरू करताच मंदिर प्रवेशाला आंबेडकरांनी ज्या वृत्तीने तुच्छ लेखिले, त्याच वृत्तीने ते आता म्हणतात की जातीसंस्था जाऊन काय होणार? चातुर्वर्ण्यच नष्ट झाले पाहिजे. आणि त्यांचा शेवटचा ठोका हा की, हिंदुसमाजात बुद्धिवादाला वाव नाही. पण असे म्हणणारे डॉक्टरसाहेब जगाच्या पाठीवर दुसरा एखादा अधिक बुद्धिमंत धर्म दाखवून देऊ शकतील काय? कालमानाप्रमाणे हिंदुधर्म परिवर्तन पावत असताना व आता तर अस्पृश्यता मृत्युपंथास लागली असताना त्याचा त्याग करावयास चिथावणी देणे आणि अधिक तर्कशुद्ध, अधिक न्यायसंमत व अधिक समताधिष्ठित धर्म न दाखविणे हे घातकीपणाचे नाही असे कोण म्हणेल?

अशा अर्धवट शिकवणीमुळे महारांच्या परिषदेत धर्मांतराचा अविचारी ठरावही पसार झाला. तो असा की, "धर्मांतराची पूर्वतयारी म्हणून महार जातीने यापुढे हिंदू देव-देवतांची पूजा–अर्चा करू नये, हिंदूंचे सणवार, व्रतवैकल्ये, उपोषणे वगैरे पाळू नयेत व हिंदूंच्या कोणत्याही धार्मिक उत्सवात भाग घेऊ नये आणि तीर्थाटने, बाऱ्या वगैरे करू नयेत अशी या परिषदेची शिफारस आहे." या बेफाम धोरणाचे एक कटू फळ म्हणजे परिषदेच्या दुसऱ्या दिवशी महारांमधील संतांची परिषद दादरला भरली असता तीत पाचपन्नास संतांनी हिंदुत्वाचा त्याग केल्याचे चिन्ह म्हणून दाढ्या काढल्या व गळ्यांतील माळांची होळी केली. हजामत करणे व होळी करणे सोपे आहे. पण त्या " संतांना " आता कोणता धर्म राहिला ? उद्या काही अस्पृश्यांनी आंबेडकराच्या सांगीप्रमाणे हिंदुत्व सोडले तर ते कोणत्या धर्माचे अनुयायी होणार ? आणि त्या धर्मात–मग तो शीख असो वा बौद्ध असो वा मुसलमानही असो– विषमतेचे काटे नाहीत काय ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. अस्पृश्यता गेली तरी पूर्वास्पृष्य म्हणून आमचेवर लांछन राहीलच असे भय दर्शविणाऱ्या श्री व्यंकटरावांना हे माहीत नाही काय की, खिश्चन, मुस्लिम वगैरे समाजातही बाटलेल्यांच्या कपाळावर निराळा टिळा बसतोच बसतो. ही सर्व सत्य स्थिती शांतपणे व समतोलपणे विचारात घेऊन डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना विझत चाललेल्या आगीतून परधर्माच्या फोफाट्यात टाकू नये. यातच त्यांचे शहाणपण, त्यांच्या समाजाचे कल्याण व हिंदू समाजाचे बळ साठविलेले आहे."

१३) सुबोधपत्रिका (१४–६–३६) या पत्राने " महार परिषदेची फलश्रुती " या स्फुटात धर्मांतराची चळवळ अस्पृश्यांना घातक होईल, असे सांगून शेवटी असे उद्‌गार काढले की, ...... आमचा तरी दृढ विश्वास आहे की, गेल्या आठवड्यात झालेल्या परिषदेप्रमाणे कितीही परिषदा झाल्या, त्यात हजारो लोकांनी गर्दी करून सोडली, तरी अस्पृश्यांमध्ये लाखांनी धर्मांतर होणार नाही. मग त्यासाठी स्वतः मुंबईचे डॉ. आंबेडकर अगर दक्षिण हैद्राबादचे आंबेडकर कितीही खटपट करोत. अखेरीस बोलणे फोल असाच त्यांस अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

## अनुकूल मते

१) लोकमान्य :– (३१–५–३६) :– या पत्राने " दोन दुःखद घटना " या

अग्रलेखात म. गांधींचे थोरले चिरंजीव श्री. हिरालाल गांधी यांनी शुक्रवार ता २९ मे १९३६ ला इस्लामी धर्माचा स्वीकार केला व ३० मे १९३६ ला मुंबईत महार परिषद भरून तीत धर्मांतराचा ठराव मंजूर झाला यांचा उल्लेख करून या दोन घटना हिंदू धर्माच्या व समाजाच्या दृष्टीने अत्यंत दुःखद आहेत असे मत प्रदर्शित केले. हिंदू लोकांना या पत्राने शेवटी अशी सूचना दिली :– " स्पृश्य हिंदूंनी ह्या वरील दोन घटनांपासून योग्य बोध न घेतल्यास आमची खात्री आहे की, गेल्या हजार वर्षांत ह्यांच हिंदुस्थानात जसे सात कोटी मुसलमान झाले तद्वतच पुढील काही शतकांत आणखी आठ, दहा कोटी हिंदू मुसलमान झाल्या–खेरीज रहाणार नाहीत.... "

२) ज्ञानप्रकाश (२–६–३६) – " डॉ. आंबेडकरांची पुनः धर्मांतर घोषणा " या अग्रलेखात या पत्राने खालीलप्रमाणे उद्‌गार काढले होते–

"..... धर्मासारख्या मनुष्याच्या मनाला, बुद्धीला आणि अंतःकरणाला अत्यंत जिव्हाळयाच्या, अत्यंत पवित्र आणि अत्यंत उदात्त वाटणाऱ्या प्रश्नाच्या बाब–तीतही महार परिषदेत जमलेल्या त्या प्रचंड जनसमुदायाने डॉ. आंबेडकरांना धर्मांतरनिर्देशाच्या बाबतीत अगदी कोरी हुंडी स्वतःच्या सहीनिशी द्यावी ही गोष्ट डॉक्टर महाशयांवर हरिजनांचा विश्वास किती कमालीचा बसलेला आहे, याची उत्कृष्ट निदर्शक आहे. हिंदुस्थानातील अस्पृश्य वर्गाची आजपर्यंत अनेक कार्य–कर्त्यांनी मोठी सेवा केलेली आहे, पण त्यापैकी कोणासही डॉ. आंबेडकरांइतका हरिजनसमाजाचा विश्वास संपादन करता आलेला नाही ..... हरिजनांना असा कार्यकुशल नेता आजपर्यंत कोणीही मिळालेला नव्हता व त्यामुळे हरिजनांची खरी जागृती घडवून आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांना जसे यश आले व येत आहे तसे दुसऱ्या कोणासही आलेले नाही.....डॉ. आंबेडकर यांनी हिंदुधर्म सुधारणेचा प्रयत्न, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह वगैरे बाबतींत करून पाहिला; पण त्यांत त्यांना अपयश आले, तेव्हा आता डॉक्टरसाहेबांवर हिंदुधर्म सुधारकाचा पेशा लादण्यात हशील नाही.....हिंदुधर्म सुधारणेबद्दल ते पूर्ण नैराश्यवादी बनले आहेत, म्हणूनच स्वज्ञातिबांधवांना ते धर्मांतरात प्रवृत्त करीत आहेत "

३) विहार– (४–६–३६) – " महार परिषद " या अग्रलेखात या पत्राने असे मत प्रदर्शित केले होते की, ,, ..... धर्म, इतिहास, चालीरीती, भावना वगैरे बंधनात आजवर अपमान आणि कष्ट सोसूनही हिंदुसमाजात राहिलेला अस्पृश्य वर्ग यापुढे

तशाच स्थितीत काळ कंठण्यास बिलकूल राजी नाही, हे महार परिषदेने जाहीर केले आहे...." या पत्राने ' डॉ. आंबेडकर ' या शीर्षकाखाली एक स्फुट लिहिले होते. त्यात त्याने असे मत प्रदर्शित केले की, " गेल्या आठवड्यातील मुंबईतील सार्वजनिक कार्यात डॉ. आंबेडकरांची छाया पडली होती असे म्हणावयास हरकत नाही. अस्पृश्यतेचा हिंदू समाजावरील कलंक दूर करण्यासाठी पहिली जागृती स्पृश्यांनी केली, हे जरी खरे असले, तरी शंभर वर्षांत स्पृश्यांकडून न झालेली कामगिरी डॉक्टरसाहेबांनी गेल्या १० वर्षांत घडवून आणली आहे....... डॉक्टर–साहेबांचे धर्मांतर केवळ अस्पृश्यता घालविणारे नसून हिंदू धर्माचे शुद्धीकरण करणारेही आहे... "

४) सेवक– (६–६–३६)– (कोल्हापूर) " या पत्राने हिंदु सभेचा हरिजनो–द्धार " या अग्रलेखात खालीलप्रमाणे उद्‌गार काढलेले आहेत :–

" हरिजनांचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराची घोषणा केल्यापासून हिंदू महासभेच्या भाडोत्री हस्तकांनी हरिजनोद्धाराचे मायावी नाटक महाराष्ट्रात चांगलेच रंगविले आहे. पं. मालवीय, मसूरकर–पाचलेगावकर बुवां–पासून तो तहत निर्भीडकार गद्र्यांपर्यंत सर्वांनाच हरिजनांचा कळकळीचा पान्हा राजापुरी गंगेसारखा अकस्मात फुटला आहे. तत्पूर्वी मात्र यापैकी एकालाही हरिजनांवर होणारा अन्याय दिसत नव्हता. जणू काय, डॉ. आंबेडकरांच्या घोषणे-मुळेच त्यांना हरिजनांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव झाली आहे. कोणी हरि–जनांना मंत्रदीक्षा देऊन त्यांची दिशाभूल करीत आहेत. तर कोणी झुणकाभाकरीचे थोतांड उभे करून सामाजिक समतेच्या थापा मारीत आहेत. काही दिवसांपूर्वी पं. मालवीयांनी नाशिकच्या हरिजनांना पतित, नीच समजून मंत्रदीक्षा दिली व बुद्धिवादी म्हणविणाऱ्या केसरीने तिची तरफदारी केली. पण या मंत्रदीक्षने हरिजनांच्या स्थितीवर काय परिणाम झाला ? पं. मालवीय गेले बनारसला व हरिजन राहिले महारवाड्यात. हा फसवणुकीचाच प्रकार नव्हे काय ? . . . काही महाभाग पदरच्या (?) पैशाने दौरे काढून अज्ञ बहुजन समाजाला समतेचा संदेश सुनवीत आहेत. गेल्या दोन तीन महिन्यांत मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, वेंगुर्ला वगैरे ठिकाणी अशी सहभोजने झाली, या सहभोजनांच्या अतिशयोक्तपूर्ण हकिकती, सहभोजनांच्या पुरस्कर्त्यांचे फोटो ठराविक दैनिकात प्रमुख स्थळी प्रसिद्ध होत आहेत. इतकेच नव्हे तर या लोकांची एक लिमिटेड कंपनीच बनली असून त्या कंपनीतील लोक एकमेकांना " धर्मात्मा " व " धर्मवीर " बनवून त्यांचा बाजार-

भाव वाढवू पहात आहेत. आणि पुण्याचे एकच एक दैनिक न झालेल्या सह–भोजनांचेही श्रेय त्यांच्या गळ्यात अडकवून बुद्धिपुरस्सर त्यांना प्रोत्साहन देत आहे... ब्राह्मणांना नैसर्गिक देशभक्त ठरवून इतर जातींची निंदा करणारे भोपट–करच अस्पृश्योद्धारक होतात आणि जातिसंस्थेवर फक्त लेखणीचे फटकारे उडवून चित्तपावन संघात हळूच शिरणारे सावरकर समतावादी म्हणून मिरवतात. सरड्याची धाव जशी कुंपणापलीकडे जात नाही तशी या समतावाद्यांची समता सहभोजनालीकडे पाऊल टाकीत नाही. मिश्रविवाहाचा तर ते चुकूनही विचार करीत नाहीत. उलट अस्पृश्यता निवारणाची त्यांची व्याख्या काय आहे हे परवा वेंगुर्ला येथील बॅ. सावरकरांचें जे भाषण झाले त्यावरून दिसून येईल. सावरकर म्हणतात . . . " जे बोट तू कुत्र्याला लावतोस ते बोट तू स्वधर्मीयाला लाव म्हणजे झाले अस्पृश्य निवारण " सावरकरांच्या मते अस्पृश्यांना कुत्र्यासारखे वागविले म्हणजे झाले . . . हिंदु समाजात समता उत्पन्न करण्याकरिता जातीभेदच मोडले पाहिजेत. राजर्षि शाहू महाराज म्हणतात... " आपले शिक्षण अगदी पूर्ण होईपर्यंत पाच पंचवीस वर्षे संशयात आणि चिंतेत स्वस्थ रहा, असे अस्पृश्यांना सांगण्यापेक्षा त्यांना जखडून टाकणाऱ्या भयंकर जुलमाच्या शृंखला तोडून टाकणें हीच खरी राष्ट्रसेवा होय. जातिभेद नाहीसा करावा असे पुष्कळांस वाटते. पण हे कसे करावे हा प्रश्न आहे. खालच्या जातींनी कितीही प्रयत्न केला तरी हे काम त्यांच्या हातून व्हावयाचे नाही. प्राचीन कालापासून वंशपरंपरेने उपभोगीत असलेले हक्क वरिष्ठ जातींनीच सोडले पाहिजेत. असल्या पवित्र आत्मयज्ञानेच त्यांचे उदाहरण उपयोगी होईल. असला आत्मयज्ञ करण्याची हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांची तयारी आहे काय ?

५) राष्ट्रवीर– (९–६–३६) " कुसंगे नडला हिंदुधर्म " या अग्रलेखात महार समाजाची डॉ. आंबेडकरांवरील अढळ निष्ठा व डॉ. आंबेडकरांचे आदर्श पुढारी–पण या दोन गोष्टींबद्दल स्तुती व अभिनंदन करून आणि म. गांधीजींना ब्रिटिश साम्राज्याचे कंबरडे मोडण्याची युक्ती शोधता आली पण अस्पृश्यतेच्या एका रोमालाही त्यांना हलविता आले नाही, पण डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यतेचा वृक्ष गदगदा हलवून तो उपटण्याचा मार्ग मोकळा केला, असे मत प्रदर्शित करून सदर पत्राने असे उद्‌गार काढले की, " धर्मांतराच्या - - - पहिल्या ठरावाप्रमाणे नुसते मत व्यक्त करून दुसऱ्या ठरावाची पूर्तता होणार नाही. तर त्याकरिता कार्यं वा साधयामि देहं वा पातयामि अशा प्रतिज्ञेचे प्रचारकार्य सर्वत्र झाले पाहिजे. अर्थात, या प्रकरणी ब्राह्मण, या ना त्या प्रकारे आड येणारे, प्रचारकार्यात विघ्ने

उत्पन्न करणार, हे निश्चित होय. आणि म्हणून निदान दुसऱ्या ठरावाच्या पूर्वतयारीच्या वादीत **ब्राह्मण्यविध्वंसन** याही कार्यक्रमाला प्राधान्य द्यावयास पाहिजे होते. परंतु ही निकडीची गोष्ट परिषदेच्या दृष्टिकोनातून का सुटली, हा एक आम्हांस विचाराचा प्रश्न वाटतो..... जातिभेदाचा व शिवाशिवीचा पायंडा स्पृश्यांनीच अगोदर घातला व या पापाचे तेच धनी आहेत ' असे डॉ. आंबेकरांनी अतिव्याप्त विधान केले आहे. ते पाहिले म्हणजे धर्मांतरास तयार होऊनही ते ब्राह्मण्याला दचकत आहेत असा जबर संशय निदान आम्हांला तरी येत आहे. स्पृश्यांतही जातिभेद व शिवाशिवी पाळतात याला ब्राह्मण्यसंरक्षक जातच कारणीभूत आहे, ही वस्तुस्थिती उघड न करता अस्पृश्यतेच्या बाबतीत धार्मिक दृष्टचा सर्व स्पृश्यांना डॉ. आंबेडकर जबाबदार धरीत आहेत, ही आमच्या मते तरी त्यांची सर्वात मोठी चूक होय. मुंबई इलाख्यात हिंदूमध्ये बहुसंख्य असलेल्या मराठा जातीला तरी सत्तासंपत्तीचे सामर्थ्य असलेली ब्राह्मण्यसंरक्षक जात समानतेने वागवीत असते काय ? व ती विषमतेने वागविते याची डॉ. आंबेडकराप्रमाणे मराठा पुढाऱ्यांना चीड येते ना ? आणि म्हणूनच जागरूक व अभिमानी मराठा पुढाऱ्यांनी आपल्यावरील ब्राह्मणी धर्माचे जू फेकून देऊन सध्याच्या जीवन कलहात ब्राह्मण्यविध्वंसन हें कर्तव्यच ठरवून घेतले आहे. असे असतांना अस्पृश्यतापालनाच्या गुन्हेगारीबद्दल सर्व स्पृश्य समाजाला डॉ. आंबेडकरासारखे महारथी जर जबाबदार धरून त्यांवर हल्ला चढवू लागले तर त्यात स्पृश्य समाजाच्या पोटात घुसून खरा गुन्हेगार असताही आपली कातडी सुरक्षित ठेवण्याची ब्राह्मण्यसंरक्षक समाजाला संधी साधताही येणार नाही काय; .... तेव्हा हिंदुधर्म बगलेत धरून विषमतेचे विषारी वातावरण ते संबंध हिंदुस्थानात ब्राह्मण्याने निर्माण केले आहे, ते अंशतः तरी नष्ट झाले पाहिजे अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनी ब्राह्मण्यविध्वंसन हेच पहिले कर्तव्य मानले पाहिजे. "

३) दीनमित्र – १०–६–३६ – " धर्मांतरच योग्य " या अग्रलेखाखाली सदर पत्राने खालील उद्गार काढले – " डॉ. आंबेडकर यांनी धर्मांतराची घोषणा केली म्हणून चांगले चांगले विद्वान आणि पुढारी यांनी नापसंती व्यक्त केली आहे. धर्मांत ( समानता ) शांती नाही हा डॉ. आंबेडकरांचा भ्रम आहे. धर्मांतर केल्याने दैन्यांतर होत नसते. कोणत्याही धर्मात काही लोक हीन दीन स्थितीत असतातच इ. अनेक मुद्दे अनेक लोकांकडून आले आहेत. पण योग्य विचार केला तर या मुद्द्यास काहीच अर्थ नाही असे दिसून येते. आज अस्पृश्य लोक धार्मिक व सामाजिक समानता मागत आहेत. ते कोणाही सनातन्याची संपत्ती अथवा संतती

मागत नाहीत. " धर्म " म्हणून सनातनी जे आचरण करतात, तसले आचरण अस्पृश्यांसही करू द्या, एवढेच त्यांचे मागणे आहे.पण ही अगदी साधी समताही ज्यांना मान्य करवत नाही, त्यांनी इतर धर्मातील विषमतेचे भडक वर्णन करणे स्वाभाविकच आहे. दुसऱ्या धर्मात घाणआहे, म्हणून आपल्या धर्मातील ही अस्पृश्यतेची घाण घालविणे शक्य नाही, आणि ती कशी घालवावी या संबधाने आमच्या शास्त्रात आधारही नाहीत; मग ती घालविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे धर्मात ढवळाढवळ करणे होय, असा हृदयहीन विचार धर्मार्थ प्रतिपादन करणाऱ्यांनी दयाळूपणाची ऐट का मारावी हे कळत नाही ? . . . म. गांधींनी एका रोगट वासराला रोगमुक्त करण्यासाठी त्याचा प्राण घालविण्यास संमती दिली म्हणून त्यांच्यावर टीकेची आग उधळणाऱ्या दयावंताना, अस्पृश्यांच्या क्लेशाचे काहीच शुभाशुभ वाटत नाही. काय म्हणे, गायवासरांहून हीन दीन स्थितीत तडफडणाऱ्या अस्पृश्य माणसांविषयी दुःख मानण्यास शास्त्रात आधारच नाही. ज्या शास्त्रात जनावरांच्या दुःखाविषयी हळहळणारा आधार सापडतो पण माणसांच्या दुःखाविषयी हळहळण्यास आधार सापडत नाही, ते शास्त्र अस्पृश्य समाजास देवतुल्य कसे वाटावे ? यज्ञकुंडापुढे बुकलून बोकड मारण्यास वेदात असलेला आधार याज्ञिकास कितीही पवित्र वाटत असला तरी त्याची पवित्रता मरणाऱ्या बोकडास कुठून वाटणार ? तो वेदाभिमानी व शास्त्राभिमानी याज्ञिकास म्हणेल की, "दीक्षितांनो, जर वेदोनारायणास प्रसन्न करून धर्माचरणाचे पुण्य जोडावयाचे असेल, जर वेदाज्ञेचे पालन करून वेदाचार जिवंत ठेवावयाचा असेल, जर दिव्य ऋषींची दिव्य दृष्टी स्वच्छ राखावयाची असेल किंवा सनातन धर्म निःशकपणे पाळावयाचा असेल तर वेदीपुढे बोकडाबरोबर ' भट ' यांनाही बुकलून द्यावे. " रोहिदासासारख्या राजपुत्रास यज्ञात बळी देण्याच्या चालीस जर भक्कम शास्त्राधार आहे तर त्या शास्त्राधाराच्या अन्नसाठी याज्ञिकांनी आपली मुले आतापर्यंत किती बळी दिली बरे ? शास्त्राधाराशिवाय धर्माचार करावयाचा नाही असे अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतीत बहकणाऱ्यातून एकानेही हा शास्त्राधारयुक्त रोहिदासयाग का केला नाही ? वेदाभिमानी पुरुष निर्बल असला तरी त्याने पत्नीस स्वातंत्र्य देऊन नियोगशास्त्राद्वारे हवी तवेढी संतती निर्माण करावी या धर्माचारास शास्त्राधार असूनही वेदाभिमानी या सनातन धर्माप्रमाणे का वागत नाहीत ? सारांश, यांचा शास्त्राधार म्हणजे स्वतःचा स्वार्थ, असेच सिद्ध होत नाही काय ? सनातन्यांच्या शास्त्राधारामुळे कोणत्या हीनदीन लोकांचा कुठे उद्धार झाला हे कोणी दाखवू शकेल काय ? जे देवधर्म, शास्त्रे आणि शास्त्री ही आपणांस उपयोगी पडू शकत नाहीत त्यांचा अभिमान डॉ. आंबेडकरांनी का धरावा ? प्रेमाने हात न फिरवता नेहमी झिडकारीत गेल्यास जनावरे देखील लाथा घालतात, मग अस्पृश्य तर

माणसेच आहेत. त्यांनी सनातन्यांवर लाथा झाडल्या तर त्यात आश्चर्य कसले ?

७) विविधवृत्त – १४-६-३६ :– " हिंदुधर्मशास्त्रे व हिंदू लोक यांनी अस्पृश्य समाजावर किती निर्दयपणे अन्याय केलेला आहे याची त्रोटक माहिती " अस्पृश्य आणि धर्मांतर " या अग्रलेखात सांगून सदर पत्राने पुढील विचार प्रदर्शित केले. " हिंदू समाजाच्या पुढाऱ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या भाषणाचा धिक्कार करून चालणार नाही. आपले दोष चवाठ्यावर मांडून उपरतीच्या मार्गाने आपले जो कल्याण साधतो तोच अंती समाजाचा व व्यक्तीचा खरा मित्र ठरतो. त्याऐवजी स्वतःचे अधिष्ठान कायम टिकवून बडेजाव वाढविण्यासाठी आपल्या उघड दोषावर जो पांघरूण घालतो तो अंती स्वतःचा वैरी ठरतो. हिंदू समाजाची घडी नीट बसविण्यासाठी पुढारलेले वैदू आपणांत आज अनेक आढळतील. राजकारण आणि सामाजिक चळवळ या दोन्ही क्षेत्रांतून बाहेरून ऐक्याचा डोलारा साधू पहाणारे मांत्रिकही आपल्यामध्ये कमी आढळणार नाहीत. परंतु कडू औषध किंवा प्रसंग–विशेषी शस्त्रक्रिया करावी लागली तरी पत्करली, पण रोग नष्ट होऊन समाज जिवंत राहिला पाहिजे, तो जोमदार आणि सामर्थ्यवान बनून स्वातंत्र्य उपभोग–ण्यास पात्र झाला पाहिजे या हेतूने " सत्य दिसेल ते बोलणार व सत्याग्रहाप्रमाणे वागणार " असे म्हणणारा पुढारी आज आपणांत नाही. अस्पृश्यांच्याच नव्हे तर एकंदर हिंदू समाजाच्या दृष्टीने अशी स्पष्टोक्ती केल्याची प्रचीती डॉ. आंबेड–करांच्या भाषणात ठिकठिकाणी मिळत असल्यामुळे त्याचा आज विस्ताराने विचार केला आहे.

एक महार तरुणाने १९३६ च्या मे मध्ये इस्लामी धर्म स्वीकारला. आणखी दोघांनी शीखधर्माची दीक्षा घेतली. त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात येण्याची इच्छा प्रदर्शित केली. हिंदुमहासभेतर्फे नागपूर येथील टाऊन हॉल समोर १४–६–३६ रोजी त्यांचा हिंदू धर्मात स्वीकार करण्यात आला. त्याच दिवशी टाऊन हॉल मध्ये जाहीर सभा झाली. आंबेडकर व त्यांचे अनुयायी यांनी कोणताही धर्म स्वीकारला तरी त्यांना त्या त्या धर्मात संपूर्ण समानता कधीही उपभोगता येणार नाही आणि अस्पृश्यांची ही धर्मांतराची चळवळ म्हणजे आगीतून उठून फुफाट्यात पडण्याची धडपड आहे अशा अर्थाचे भाषण डॉ. मुंजे यांनी केले. (टाइम्स १८-६-३६) उपरिनिर्दिष्ट तीन महारांना हिंदू धर्मात व समाजात समानता मिळाली किंवा मिळेल या प्रश्नाबद्दल मुंजे किंवा इतर कोणीही व्यक्त्याने सांगितलेले नाही.

धर्मांतराच्या चळवळीच्या संबंधात आणखी काही सभादी कार्यक्रम झाले त्यांचा वृत्तांत मी येथे देत आहे.

मुंबईतील "अंजुमन तवलीगुल इस्लाम" या संस्थेतर्फे बाबासाहेबांना २–६–३६ रोजी अंजुमन इस्लाम हॉलमध्ये चहापार्टी देण्यात आली होती. यावेळी एक फोटो घेण्यात आला व तो वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात आला. या फोटोत श्री. अब्दुला गांधी बाबासाहेबांच्या बाजूला बसलेले होते.

बंगलोरपासून १० मैलावर असलेले केंगरी गावात हरिजन आश्रम होता. त्यात १०–६–३६ रोजी दक्षिण हिंदुस्थानातील हरिजनसेवकांचा मेळावा भरला होता. त्याचे उद्घाटन म. गांधींनी केले. तेव्हा श्री. वल्लभभाई पटेल, श्री. घन:शाम बिर्ला, श्री. राजगोपालाचारी आणि हरिजनसेवक संघाचे सर्व (दक्षिणेतील) कार्यकर्ते उपस्थित होते. डॉ. आंबेडकर हे लाखो सवर्ण हिंदूंपेक्षा श्रेष्ठ असूनही त्यांना आपण अस्पृश्य मानतो ही आपल्या हिंदूधर्मशास्त्राची व आपली चूक आहे व ती चूक सुधारणे इष्ट आहे असे तुम्हाला वाटत असेल तर तसे करा, असा गांधीजींनी उपदेश केला. ( टाईम्स, १३–६–३६ )

कै. अच्युतराव कोल्हटकर यांची पाचवी पुण्यतिथी १४–६–३६ रोजी कृष्ण सिनेमात श्री शंकराचार्य डॉ कूर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. तेव्हा ते धर्मांतराच्या प्रचलित इशाऱ्याकडे वळले आणि ते म्हणाले "परवा एका शीख परिषदेला मी संदेश पाठवला, याबद्दल काही लोक माझ्यावर चिडले आहेत. एक धर्मरक्षक म्हणून तुम्ही अस्पृश्यांना शीख होण्यास कसे सांगता ? असे विचारता त्यावर माझे उत्तर आहे की शीख होणे म्हणजे धर्मांतर करणे नव्हेच. ही गोष्ट सिद्ध करुन देण्यासाठी पुढे जाऊन मी असेही म्हणतो की जरूरी पडल्यास मी स्वतः शीख होण्यास तयार आहे. ( नवाकाळ, १६–६–३६ )

श्री. शंकराचार्यांनी असेही आपले मत व्यक्त केले की हिंदू धर्मातील उत्तमोत्तम तत्त्वे गोळा करून आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी ब्राह्मो व आर्य समाज यासारखा एखादा पंथ स्थापावा. ( टाईम्स, १५–६–३६)

हिंदूंच्या समाजघातक चालीमुळे अगणित अस्पृश्य मुसलमान झाले. हिंदबद्दलच्या त्यांच्या तिरस्कारात त्यामुळे भर पडली. या धर्मांतरित मुसलमानांचे वंशज पुढे

हिंदूंचे हाडवैर पत्करून हिंदूंना हैराण करू लागले. हैराण करण्याच्या त्यांच्या अनेक मार्गांपैकी हिंदूंच्या स्त्रिया पळविणे व त्यांच्याशी निका लावणे हा एक मार्ग होय. याबद्दलचे लाखो पुरावे उपलब्ध झालेले आहेत. या सुमाराचा एक पुरावा पहा. " बंगाल कायदे मंडळात श्री.शे.हनुमान-प्रसाद यांनी बंगाल प्रांतात सन १९३१-३२ व १९३३ मध्ये किती स्त्रिया पळविण्यात आल्या, याची माहिती विचारली होती. तीस ना. रीड यांनी जी माहिती दिली होती तिचा सारांश चार कोष्टकांत आणि केसरीच्या २३-६-३६ च्या अंकात " बंगालमधील स्त्रीहरण " या शीर्षकाखाली दिलेला होता. त्यावरून असे दिसते की, या बाबतीत १६९७ फिर्यादी पोलिसांच्याकडे नोंदविण्यात आल्या होत्या व ९८८ खटले न्यायाधिशांपुढे उभे करण्यात आले होते. हरण केलेल्या स्त्रियांची संख्या हिंदू ४७५, मुसलमान ९१२ व इतर जमाती १६ अशा होत्या. तथापि हिंदूंच्या मूर्खपणामुळे व नेभळट वृत्तीमुळे त्यांना याबद्दल चीड येत नसे आणि आलीच तर ते शिव्याशाप देण्यापलीकडे काही करत नसत. सर्व हिंदूंना समान पातळीवर आणा व हिंदू समाज बलशाली करा, या घोषणा हिंदू करीत. पण त्यांची कृती फारशी नसे.

ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेसतर्फे लखनौ येथे अस्पृश्यांची जंगी परिषद २२-५-३६ ला भरविण्यात आली. धर्मांतराची घोषणा व चळवळ यांना या परिषदेत पाठिंबा देण्यात आला. या परिषदेच्या चालकांपुढे काही धर्मांच्या उपदेशकांनी सर्व धर्मांची परिषद भरवा व तीत प्रत्येक धर्मोपदेशकाने आपापल्या धर्माची माहिती व महती सांगावी व अस्पृश्यांना जो धर्म श्रेष्ठ व इष्ट वाटेल तो त्यांनी स्वीकारावा अशी सूचना केली. तेव्हा लखनौच्या टाऊनहॉलमध्ये २८-५-३६ ला सर्व धर्मांची परिषद भरविण्यात आली. या परिषदेला हिंदुस्थानातील १३ प्रांतांतील ९ प्रांतांतून १०० प्रतिनिधी आले. बाबासाहेबांची प्रकृती बरी नसल्यामुळे ते परिषदेला उपस्थित झाले नाहीत. या परिषदेत बुद्ध, बहाई, अहमदिया, मुसलमान, ख्रिस्ती, कबीर पंथ, शीख, जैन, सनातन हिंदू व आर्य समाज या धर्मांचे व पंथांचे अकरा धर्मोपदेशक उपस्थित झाले या परिषदेतील प्रेक्षक, गच्ची-खिडक्या इत्यादी ठिकाणी उभे होते, कारण हॉल प्रेक्षकांनी चिक्कार भरलेला होता. प्रथम अस्पृश्यांच्या प्रतिनिधींनी हिंदुधर्मशास्त्रातील उदाहरणे व वचने यांचा आधार देऊन हिंदू धर्माची तीव्र शब्दांत व उच्च रवाल हेटाळणी केली. या धर्मातून अस्पृश्यांनी बाहेर पडलेच पाहिजे असे निक्षून सांगितले. हिंदू धर्माचे उपदेशक सनातनी सुधारक व आर्यसमाजिस्ट हे जेव्हा हिंदू धर्माची थोरवी गात, तेव्हा अस्पृश्य प्रेक्षक नापसंतीचे सूर व आवाज काढत. ख्रिस्ती धर्मोपदेकांनी आपल्या धर्मात दरमहा १५,००० अस्पृश्य

घेऊ शकू व त्यांची योग्य ती निगा राखू असे सांगितले. ११ धर्मोपदेशकांची भाषणे संपल्यानंतर अस्पृश्य प्रतिनिधींनी अशी घोषणा केली की आंबेडकर आम्हांला ज्या धर्मात नेतील, तेथे आम्ही जाऊ. तोपर्यंत सरकारने आमचे हितरक्षण करावे. अस्पृश्यांवर हिंदूंचे जे अन्याय होतात त्यांचे निवारण करण्यासाठी मुसलमान, खिस्ती व अस्पृश्य लोकांची एक समिती नेमावी, इत्यादी संबंधी परिषदेत ठराव मंजूर करण्यात आले. "हरिजन" हा शब्द अस्पृश्यांना अपमानकारक वाटतो असाही एक ठराव होता. ( **The Indian Witness, 28/5/36** व ज्ञानोदय ४–६–३६.)

दक्षिण हिंदुस्थानात ज्या अस्पृश्य जाती आहेत त्यांत थिया ही एक प्रमुख जात आहे. या जातीत ख्रिस्तीमिशनऱ्यांनी बराच शिक्षणप्रसार केला. या जातींतील हजारो स्त्री–पुरुष ख्रिस्ती झालेले आहेत. ह्या जातीतील तरुणांनी ज्या निरनिराळ्या चळवळी चालविल्या आहेत त्या 'थिया युवजनसमाज' या संस्थेतर्फे. या संस्थेचा चवथा वार्षिक समारंभ कोचीन येथे २८–४–३६ रोजी दक्षिण हिंदुस्थानातील प्रसिद्ध ब्राह्मणेतर पुढारी श्री. ई. व्ही. रामस्वामी नाईकर (इरोडे) यांच्या अध्यक्षतेखाली झाला. तेव्हा त्यांनी अध्यक्षीय भाषणात असा उपदेश केला की थिया लोक इतके शिकले तरी त्यांचे हिंदू धर्माचे वेड, व त्या वेडापाई धार्मिक विधीत लाखो रुपये खर्चून स्वतःच्या मूर्खपणाचे प्रदर्शन करण्याची प्रवृत्ती अद्याप जात नाही. थिया समाजाची सर्वांगीण उन्नती करावयाची असेल तर तरुणांनी हिंदु धर्मविधीचे बंड व हिंदुधर्माचा पगडा ही दोन्ही नष्ट करण्याची चळवळ हाती घ्यावी व त्यासाठी स्वाभिमान-संरक्षक-चळवळीची उभारणी करावी. डॉ आंबेडकरांनी जी धर्मांतराची चळवळ उभारली आहे ती योग्य आहे व थियांनी याचा विचार करावा. ख्रिस्ती झालेले थिया अजून अस्पृश्यच राहिले आहेत. म्हणून थियांनी धर्मांतर करावयाचे ठरवलेच तर त्यांनी ख्रिस्ती धर्म न स्वीकारता इस्लामी धर्म स्वीकारावा अशा अर्थाचे श्री. नाईकर यांचे भाषण झाले. ( The Lamp, 15-5-1936, Lahore )

दिवाणबहादुर श्रीनिवासन्, मद्रास कायदेमंडळ सभासद आणि रा. टे. कॉन्फरन्सचे सभासद यांना डॉ. बाबासाहेबांची धर्मांतराची चळवळ व घोषणा पसंत नव्हती. हिंदू धर्मात राहूनच अस्पृश्यांनी माणुसकीचे हक्क संपादन करण्यासाठी झगडा चालू ठेवावा असे मत ते सभेमधून व्यक्त करीत. परंतु या मताला दक्षिण हिंदुस्थानातील बहुसंख्य अस्पृश्यांचा पाठिंबा नव्हता. सुशिक्षित व तरुण

अस्पृश्य, धर्मांतराची बाजू घेऊन सभेत श्रीनिवासन्ना विरोध करीत. ( टाईम्स १५-६-३५ )

धर्मांतराची चळवळ सुरू झाल्यानंतर सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांना परोपरीने छळल्यास व नाडविण्यास सुरूवात केली. (१) दिंडोरी (जिल्हा– नाशिक) या गावच्या शेजारच्या खेडयात एका महार तरुणाचे लग्न होते. वर धर्मांतराच्या चळवळीतील एक कार्यकर्ता होता. लग्नाची वरात ज्यावेळी निघाली त्यावेळी मराठ्यांनी ती अडविली व या रस्त्याने वरात नेली तर तुमचे मुडदे पाडू अशी धमकी दिली. तेव्हा महारांनी वरात परत नेली. ( टाईम्स – १४-६-३६ ) २) श्री. अमृतराव रणखांबे यांचे मेहुणे श्री. सावळाराम दाणी, नाशिक तालुका लोकलबोर्ड मेंबर व त्यांची पत्नी हे इगतपुरी तालुक्यातील नांदुरवैद्य या खेडयातून दुसऱ्या खेडयात लग्नसमारंभासाठी जात असता तेथील मराठ्यांनी त्यांना अडविले आणि महारीण आमच्या समोरून चप्पल घालून जाते, हा आमचा अपमान आहे, असा एकच गिल्ला केला. " ए महारणी, तू चप्पल हातात घेऊन चाल, नाहीतर तुला आम्ही चावडीवर बसवून ठेवू !" अशी मराठ्यांनी धमकी दिली. तेव्हा सौ दाणी म्हणाल्या, " मी आतापर्यंत चप्पल घालून अनेक खेडयांतून फिरलेली आहे, पण मला कोणी हटकले नाही. मग तुमची ही दमदाटी का ? " तेव्हा मराठे चवताळले व शिव्या हासडीत माराची धमकी देऊ लागले. दाणी दांपत्याला लौकर पुढच्या गावी जाणे भाग असल्यामुळे सौ. दाणींनी चपला हातात घेतल्या व त्या पुढे चालू लागल्या, तेव्हा मराठे लोक फिदीफिदी हसू लागले. (टाइम्स– १३-६-३६)

जबलपूरचे श्री. सिधीक हुसेन खान, एम्. ए., एल्एल्. बी. ( अलिगड ), यांनी '**The Light**' या पत्राच्या ८-६-३६ च्या अंकात '**To Dr. Ambedkar**' या शीर्षकाखाली एक पत्र प्रसिद्ध करून त्यांना अशी विनंती केली, की अस्पृश्यांनी कोणता धर्म स्वीकारावा याचा निर्णय जेव्हा डॉ. आंबेडकर घेतील तेव्हा इस्लामी धर्मातील थोर तत्त्वांचा संदेश लक्षात घ्यावा. इस्लामी धर्माचा स्वीकार केला, तर इस्लामी लोक अस्पृश्यांना बंधुत्वाने वागवतील, असाही सूर पत्रात लेखकाने काढला

'Two Lawyers of India या शीर्षकाखाली E, Leigh Mudge या लेखकाचा लेख त्याच्या आठ पानावर प्रसिद्ध झाला आहे. त्यात त्याने

गांधीजी व डॉ. आंबेडकर यांची तुलनात्मक दृष्टीने माहिती देऊन अस्पृश्यांच्या उन्नतीच्या दृष्टीने दोघांचे दृष्टिकोन कसे भिन्न आहेत; बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या चळवळीने अस्पृश्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे व त्याचा फायदा घेण्याकरिता मुसलमान व शीख लोक प्रयत्न करीत आहेत, त्यांत ख्रिस्ती लोकांनीही भाग घ्यावा व अस्पृश्यांना ख्रिस्ती धर्मात घ्यावे असा लेखकाने सल्ला दिला आहे. तो लेखक बाबासाहेबांच्या बाबतीत म्हणतो :– अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या चळवळी-मुळे हिंदुस्थानात व पर्यायाने सर्व जगात विचारी माणसांत भावनांची प्रचंड उलथापालथ झाली आहे व समाजशास्त्राच्या दृष्टीने ही घटना न भूतो न भविष्यति अशा स्वरूपाची झाली. अशाच अर्थाची विचारसरणी लोथ्राप स्टोडार्ड ( **Lothrop Stoddart** ) या सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाने " Closing Tides of colour " या आपल्या ग्रंथात मांडली. अस्पृश्यांनी धर्मांतराची चळवळ सुरू केली म्हणून अस्पृश्यांना धाकदपटशा दाखवून व अरेरावीचे वर्तन करून ही चळवळ हाणून पाडण्याचा हिंदूंनी प्रयत्न केला, पण तो फसला, असे सदर लेखकाने ग्रंथात म्हटले आहे. हिंदुधर्मापेक्षा बौद्ध धर्म अस्पृश्यांना जास्त हितकारक वाटतो व अस्पृश्य हिंदू धर्म टाकून बुद्ध धर्मात गेले तर ही घटना मोठी क्रांतिकारक होईल असेही मत सदर लेखकाने प्रदर्शित केले आहे.

# प्रकरण ११ वे

# इतर चळवळी

अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या घोषणेमुळे निरनिराळ्या लोकांवर निरनिराळे परिणाम झाले. त्यांतील एक परिणाम असा की, हिंदुधर्मात व सामाजिक आचार-विचारांत कितपत सुधारणा केल्या तर अस्पृश्य लोक हिंदुधर्मात राहतील, असा अंदाज बांधणारा एक वर्ग हिंदू समाजात उपन्न झाला. अस्पृश्यांनी धर्मांतर केले तर करावे पण त्यांनी मुसलमानी धर्म स्वीकारू नये, अशी विचारसरणी व्यक्त करणारा दुसरा वर्ग सवर्ण हिंदूंत उत्पन्न झाला. हे दोन्ही वर्ग अस्पृश्य वर्गांना चुचकारण्याचे मार्ग चोखाळू लागले; या वर्गांतील लोकांची लाहोर येथे "जात-पात तोडक मंडळ" या नावाची संस्था होती. ती संस्था हिंदुसमाजातील जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न फार पूर्वीपासून करीत होती. या संस्थेच्या कार्याबद्दल बाबासाहेबांनी १६-९-२७ च्या बहिष्कृत भारताच्या "आजकालचे प्रश्न" या स्तंभात आपले विचार प्रदर्शित केलेले होते. ते असे :-

"भाई परमानंद हे एकेकाळी पंजाबातील हिंदु-महासभेचे मोठे पुरस्कर्ते होते. परंतु थोडक्याच अवधीत त्यांना असे दिसून आले की, हिंदुसंघटनेचे कार्य हिंदु-महासभेचे हातून पार पडणे शक्य नाही. कारण ब्राह्मण्याचा उच्छेद झाल्या-शिवाय हिंदूंचे संघटन होणे दुरापास्त आहे. या ब्राह्मण्याचा उच्छेद करावयास ज्या रोटीबंदी, बेटीबंदी तटबंद्यांच्या आत ते सुखरूपणे नांदत आहे त्या उडवून दिल्या पाहिजेत, हे निर्विवाद आहे. परंतु हिंदूंचे संघटन करावयास कंबर कसलेली हिंदु-महासभा दरभंग्याच्या महाराजांच्या सनातन महामंडळाप्रमाणे संघटनेच्या आड येणाऱ्या ब्राह्मण्याला कापून काढण्याऐवजी त्याची जोपासनाच करू पाहते ! याचा उद्वेग वाटून भाई परमानंद यांनी "जातपात तोडक मंडळ" या नावाची

संस्था स्थापन केली. तिच्यामार्फत संघटनेचे कार्य चालू, असता त्यांनी नुकतेच एक ' हिंदू साम्यवादमंडळ ' उभारले आहे. हे नवीनच काय आहे म्हणून भाई परमानंद यांना जिकडून तिकडून विचारपूस होत असता उत्तरादाखल त्यांनी एक खुलासेवार जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. त्यात भाई परमानंद लिहितात " मला वाटते आजच्या काळात हिंदुसमाजरचनेत आमुलाग्र क्रांती घडवून आणणे अत्यंत जरूरआहे. समता आणि बंधुत्व यांचा संदेश सर्वत्र प्रसृत करताना जरूर तर **आपण जुन्या शास्त्राज्ञा पाळू नयेत**, त्या शास्त्राज्ञादेखील तत्परिस्थितीत समाज-संवर्धनाला आवश्यक वाटल्या म्हणूनच प्रसृत केल्या होत्या. समाज - संरक्षण हे मुख्य साध्य असून शास्त्राज्ञा हे त्याचे केवळ साधन होते. अर्थातच परिस्थित्यनुरूप शास्त्राज्ञांत फरक करणे अत्यावश्यक आहे.

जन्मजात अधिकारांच्या रक्षणासाठी जे लोक भांडतात त्यांना तोंड देण्यासाठी ४ वर्षापूर्वी ' जातपात तोडक मंडळ ' स्थापन झाले होते. जे जीर्ण-मतवादी आपल्या आपल्या जन्मजातीचा वृथा अभिमान बाळगून विधवा आणि कनिष्ठ वर्ग यांना माणुसकीने वागविण्यास तयार नाहीत त्यांना शह देणे हे या मंडळाचे कार्य आहे. जुने " जातपात तोडक मंडळ " म्हणजेच नवे ' हिंदू साम्यवाद मंडळ ' होय. त्या मंडळाचा पूर्वीचा हेतू विध्वंसक स्वरूपाचा होता; आता समाजातील असता नष्ट करून एकता, बंधुभाव आणि समता निर्माण करणे असे विधायक ध्येय पुढे ठेवले आहे. अमेरिकेत जी यादवी ( Civil war ) झाली ती जगातील गुलामगिरी नष्ट करणे या सामाजिक प्रश्नावरच झाली. फ्रान्स देशात क्रांती होण्यापूर्वीच तेथील विचारप्रवर्तकांनी आपल्या बांधवास समता आणि बंधुभाव यांचे शिक्षण दिले होते. १८३२ साली इंग्लंडात जो सुधारणांचा कायदा अंमलात आला, त्यानेही बरीच सामाजिक प्रगती झाली. त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील आपल्या स्वराज्याच्या चळवळीचा अखेर निष्कर्ष हाच निघाला आहे की आपण आपल्या कोटयवधी बांधवांना समानतेचे हक्क दिल्याखेरीज आपण राजकीय हक्कांस लायक ठरत नाही. आपल्या हिंदुसंघटनांच्या चळवळीविषयी असे म्हणता येईल की, मुसलमानांच्या जातिविषयक चळवळीला तोंड देण्यासाठी संघटन पाहिजे. या मुद्यावर जरी सर्वांचे एकमत असले, तरी त्यामुळे हिंदू समाजात संघ–शक्ती निर्माण झालेली नाही. जाती आणि धर्मपंथ यांची विध्वंसक शक्ती संघटने-पेक्षा अधिक सामर्थ्यवान ठरत असल्यामुळे उच्चनीच हे भेदभाव विसरून जाऊन हिंदुसमाजाची समानतेच्या तत्त्वावर पुनर्घटना करणे हेच आपले कर्तव्य ठरते. इथून तिथून सारे हिंदू एकाच रक्तामांसाचे व त्यांचा इतिहासही एकच असून आज

त्यांच्यावर अपूर्व आपत्तीला तोंड देण्याचा प्रसंग आला आहे. या एकात्र भावनेने ते बद्ध झाले पाहिजेत. आज हिंदुसमाजापुढे तो जिवत कसा राहील, हा प्रश्न आहे. अशा परिस्थितीत ज्यांनी त्यांनी आपल्या पूर्वजांच्या धर्मावर श्रद्धा ठेऊन व उज्ज्वल भवितव्याची आशा करून परिस्थितीनुरूप वागण्यास तयार झाले पाहिजे.

२) आज इतके दिवस संघटनेचे बाबतीत हिंदुमहासभेकडुन जी फसवणूक होत आहे, तिचा विचार केला असता भाई परमानंद यांच्या स्पष्टोक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करणे जरूर आहे. ब्राह्मण्याचा त्याग केल्याशिवाय संघटन होणे शक्य नाही ही गोष्ट हिंदुमहासभेवाल्यास कळत नाही, अशातला भाग नाही. पण काही गोष्टी काही लोकांना इतक्या जिव्हाळ्याच्या वाटतात की त्यांचा त्याग करणे तर राहोच, पण नुसता त्यांच्या त्यागाविषयीचा विचार करणेदेखील मनाला दु:खदायक होते. हिंदु महासभेला ब्राह्मण्य ही अशाच प्रकारची प्रिय झालेली चीज आहे. तिचा त्याग करण्याच्या विचार हिंदु महासभेच्या मनाला शिवणंसुध्दा अशक्य आहे. हिंदु महासभा ही प्रांजलपणे जर कबूल करती, तर तिला दूषणे देण्याचे काही कारण नव्हते. ' कणगीला हात लावू नको व पोरेही उपाशी मरू देऊ नको ' असा विचार सांगणारा कुणबी बापडा नेणताच होता. पण एकीकडे ब्राह्मण्याला धक्का लावायचा नाही व दुसरीकडे तर संघटना करण्याचा आव आणावयाचा, हा हिंदुमहासभावाल्यांचा नेणतेपणाचा अविचार नसून त्यात दगलबाज जाणत्या माणसांची ठकबाजी भरलेली आहे. या ठकबाज लोकांना बाजूस सारून भाई परमांनद यांनी ' जातपाततोडक उर्फ ' हिंदू साम्यवाद मंडळ ' प्रस्थापित केले, ही गोष्ट संघटनेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे असे आम्ही समजतो.

३) भाई परमानंद यांच्या जातपात तोडक उर्फ हिंदु-साम्यवाद मंडळाचे हेतू व साधने बऱ्याचशा हिंदू लोकांना पटत चालली आहेत, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. मुंबईत चिंचपोकळी येथील सोशल सर्व्हिस लीगच्या परेल शाखेने चाल-विलेल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी व तालमीच्या खेळगड्यांनी चालू साली गणेशोत्सव साजरा केला होता. सार्वजनिक गणेशोत्सव ही अगदी अलीकडील बाब आहे. हिंदुधर्माचे असूनही मुसलमानी मोहरमचे वेळेस आपपर भाव सोडून त्यांच्या देवास नवससायास करण्याचा हिंदूचा प्रघात असे. परंतु प्रतिवर्षी मुसलमानांशी एकरूप होत असतानाही मुसलमान हिंदूची कत्तल करण्यास कमी करीत नाहीत, असे जेव्हा मुंबईतील हिंदु-मुसलमानांच्या दंग्यानंतर दिसून आले, तेव्हा लोकमान्य टिळकांनी हिंदूंना ताबूतापासून परावृत्त करावे व उत्साहनिवृत्त होणाऱ्या या

लोकांना स्वधर्माशी संबंध असलेली अशी काही तरी नवीन करमणूक मिळवून द्यावी अशा उद्देशाने सार्वजनिक गणेशउत्सवाची प्राणप्रतिष्ठा केली. सार्वजनिक गणेश उत्सवाची पूर्वपीठिका ही अशी असल्यामुळे त्या उत्सवाचा रोख साधारणपणे मुसलमानाविरुद्ध असणे अगदी साहजिक आहे. आता हा उत्सव हिंदुमहासभेच्या पंखाखाली साजरा होत असल्याने तर गणेश-उत्सव म्हणजे मुसलमानांविरुद्ध व्याख्यानांचे एक सत्रच आहे, असा भास होऊ लागला आहे. चिंचपोकळी येथील या गणेशउत्सवात मागे घडलेला प्रकार या नेहमीच्या प्रकाराहून भिन्न होता. येथे मुसलमाना विरुद्ध जप करण्याऐवजी ब्राह्मण्यावर गदा घातली गेली व सहभोजनाच्या द्वारे ब्राह्मण्याचे संरक्षण करण्यासाठी उभारलेल्या रोटीबंदीची तटबंदी उडवून देण्यात आली. या सहभोजनात ब्राह्मणापासून भंग्यापर्यंत सर्व जातींचे मीलन झाले होतेच. पण या सहभोजनात आमच्या मते दोन गोष्टी अपूर्व अशा झाल्या. पहिली अपूर्व गोष्ट म्हटली म्हणजे ही की, अस्पृश्यांनी स्पृश्यांना जेऊ घातले. स्पृश्य-अस्पृश्यांत जी सहभोजने होतात, त्यांत बहुधा स्वयंपाकी अथवा यजमान कोणीतरी स्पृश्य गृहस्थच असतो. असल्या सहभोजनाला आमचे मते काहीच महत्त्व नाही. सर्वच लोक आपल्याला ब्राह्मणाच्या उष्टयाचे धनी समजतात. ब्राह्मणाच्या हातचे कोणीही खातो. ब्राह्मणाच्या हातचे शिजवलेले अन्न स्पृश्य अस्पृश्य यांनी मिळून एका पक्तींला बसून खाल्ले तर त्यांत ब्राह्मणाला काहीच धोका पोहोचत नाही; ते अढळ राहते. सहभोजनाचा मुख्य हेतू जर 'ब्राह्मण्यविध्वंसन' हा असेल तर अस्पृश्यांनी शिजवलेले अन्न ब्राह्मणांना खावयास लावले पाहिजे. तो प्रकार या सहभोजनप्रसंगी घडला म्हणून या सहभोजनाला विशेष महत्त्व आहे; असे आम्ही समजतो. या प्रसंगी घडलेली दुसरी अपूर्व गोष्ट म्हणजे ही की या सहभोजनात शाळेच्या व तालमीच्या शेजारी असलेल्या इस्पितळातील भंगी लोकही स्पृश्य लोकांच्या मांडीला मांडी लावून पंक्तीला बसले होते. नुसता अस्पृश्य आहे असे म्हटले तरी काही ब्राह्मण्यग्रस्त स्पृश्य लोकांना शिसारी येते. अनोळखी अशा अस्पृश्यांची संगत करण्याची गाठ पडली तर ते कसाबसा कड सोसून वेळ मारून नेतात. असा जेथे प्रकार आहे तेथे आपल्या देखत भंग्याचा धंदा करीत असलेल्या माणसाला पंक्तिपावन करणे ही मोठ्याच मनोधैर्याची गोष्ट आहे. हे ब्राह्मण्याची जाणीव असणारा कोणीही माणूस नाकबूल करणार नाही. या मंगलमय पर्वणीचे श्रेय, आमचे उत्साही मित्र डॉ. आपटे यांना आहे. ही वार्षिक पर्वणीची बाब न राहता हा नेहमीचा शिरस्ता होईल अशी काहीतरी भाई परमानंद यांच्या जातपाततोडक मंडळाच्या धर्तीवर नित्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी डॉ. आपटे यांस आमची सूचना आहे."

जातपाततोडक मंडळाचे जातिभेद नष्ट करण्याचे प्रयत्न जुजबी होत, असे बाबासाहेबांनी मत १९२७ साली व्यक्त केले. पण १९३६ सालात त्यांनी त्या संस्थेशी सहकार्य करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. या संस्थेत अनेक विद्वान कार्यकर्ते होते. त्यांतील बहुसंख्य सभासद आर्यसमाजिष्ट होते. या संस्थेची १९३६ ला वार्षिक परिषद लाहोर येथे भरविण्याचे ठरविले व त्यांचे अध्यक्षस्थान बाबासाहेबांनी स्वीकारावे असे ठरविले. पत्र व्यवहारानंतर बाबासाहेबांनी अध्यक्ष-पद स्वीकारले व मंडळाने त्यांना आपले अध्यक्षीय भाषण तयार करावयास सुचविले. कोणतेही गंभीर स्वरूपाचे आणि चिरंतन महत्त्वाचे काम हाती घ्यावयाचे तर त्याचा सर्व बाजूनी विचार करावयाचा व आपणाला नक्की जे काय सांगावयाचे ते निदान मुद्देसूद व साधार मांडावयाचे ही जी बाबासाहेबांची पद्धत आहे, त्या पद्धतीचा परमोच्च उत्कर्ष बिंदू या भाषणात चढलेला दिसून येतो. या भाषणात त्यांनी खालील प्रमाणे विचारसरणी मांडलेली होती.

१) जातपात तोडक मंडळाने मला अध्यक्ष निवडले हे त्यांच्या दृष्टीने व हिंदूंच्या दृष्टीने अनिष्ट होय. कारण मी अंत्यज आहे, आणि अंत्यजाने सवर्ण हिंदूना उपदेश करणे हे हिंदुधर्मशास्त्रांनी निषिद्ध मानलेले आहे. मी धर्मशास्त्रांचा व हिंदूंचा टीकाकार आहे आणि हिंदूंना परम वंदनीय वाटणाऱ्या महात्म्यांचे पुढारीपण मी मान्य करीत नाही. मी वर्णश्रेष्ठ हिंदूंच्या नंदनवनातील काळा सर्प आहे. मी हिंदूंचा द्वेष करीत नाही. मी त्यांचा मूर्खपणा दाखविणारा एक सत्यवादी समाजकार्यकर्ता आहे. पण हिंदू माझा द्वेष करतात. मी हिंदूपासून फटकून वागतो, मी माझे विचार माझ्या अवर्ण बांधवापुढे मांडीत आलेलो आहे. हिंदूंच्या सभा-मधून मला यापूर्वी बोलण्याची संधी मिळाली नाही ती आता मिळत आहे म्हणून मी हे अध्यक्षपद स्वीकारले.

२) सवर्ण हिंदू लोकांनी काँग्रेस स्थापन केली ती मुख्यत: राजकीय हक्क संपादन करण्यासाठी; पण तीत सामाजिक सुधारणा व हक्क मिळविण्याबद्दल परिषदा भरू लागल्या. टिळक व इतर राजकीय पुढाऱ्यांनी या परिषदा हाणून पाडण्याचे प्रयत्न केले. १८९२ साली अलाहाबादला काँग्रेसचे अधिवेशन झाले. तीत सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही, असा दृष्टिकोन अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. डब्लू. सी. बानर्जी यांनी मांडला व त्याची री इतरांनी पुढे ओढली व शेवटी राजकीय परिषदेबरोबर सामाजिक परिषदा भरण्याचे बंद झाले.

हिंदूंनी अपृश्यांवर हजारो वर्षे अत्याचार केलेले आहेत. पेशवाईत तर अस्पृश्यांना थुंकण्यासाठी गळ्यात मडके व रस्त्यावरील धुळीत उमटलेली पावले नष्ट करण्यासाठी कंबरेला बोराटीचा फेस बांधून फिरावे लागत असे. अशाच तऱ्हेचे जुलमी जीवन अस्पृश्यांना अद्याप घालवावे लागत आहे. अस्पृश्यांनी चांगले कपडे वापरले, अंगावर दागिने घातले, जेवणात तूप घेतले, शेती केली, कोणी घरे बांधली तर अजूनही हिंदूंच्या अंगाचा तिळपापड होतो व ते अस्पृश्यांना झोडपून काढतात. या अन्यायाची दाद लावण्यासाठी अस्पृश्यांनी कितीही प्रयत्न केले तरी त्यांना न्याय मिळत नाही.

सामाजिक सुस्थिती ही सामाजिक सर्वांगीण प्रगतीची जननी आहे. ज्या समाजाची स्थिती अनिष्ट आहे त्याला अनिष्ट अपायांपासून तारणे महाकठिण कर्म होय. या सिद्धांताचा ऊहापोह कार्ल मार्क्स व फर्डिनंड लॉसेल यांनी प्रशियात १८६२ साली भरलेल्या सभेत केलेला होता. या सिद्धांताची सत्यता हिंदू समाजापुरती आपणांस आतापर्यंत अनेक वेळा पहावयास मिळालेली आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे जातीय निवाडा ! हिंदू समाजात जातिभेद नसते तर हिंदुस्थानला पारतंत्र्यात दिवस घालवावे लागले नसते व हा जातीय निवाडा निमूटपणे स्वीकारावा लागला नसता. सामाजिक सुधारणेची चळवळ रोमन लोकांत झाली व रोमन समाज या सुधारणेच्या पायावर राजकीय वर्चस्व स्थापू शकला. मार्टिन ल्यूथरने धार्मिक सुधारणेचे बंड पुकारले व त्याच्या चळवळीतून विशुद्धमार्गी ख्रिस्ती उत्पन्न झाले. यांनीच अमेरिका देशाची ऊर्जितावस्था घडवून आणली. प्रेषित महंमद पैगंबर यांनी प्रथम अरब लोकांतील अनिष्ट धर्मांचा व चालीरीतींचा नायनाट केला व समानतेच्या धर्मात सर्वांना आणून त्यांची संघटना अभेद्य केली. म्हणून मुसलमानांना चारी खंडांत आपले राजकीय वर्चस्व स्थापन करता आले. शिवाजी व नानक यांच्यापूर्वी संतांनी सामाजिक समतेच्या चळवळींत समाजाला आणले म्हणूनच शिवाजी व नानक यांना आपले धैर्य प्रगट करण्यास क्षेत्र मिळाले. या सर्व उदाहरणांवरून हेच सिद्ध होते की, समाजाची प्रथम मानसिक व आध्यात्मिक गुलामगिरी नष्ट झाली की त्याची सर्वांगीण सुधारणा तावडतोब घडून येते.

३) हिंदुस्थानातील समाजवादी लोक म्हणतात की मनुष्य हा आर्थिक परिस्थितीचा दास आहे व त्याची आर्थिक गुलामगिरी गेली की, त्याची सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक गुलामगिरी नष्ट होईल. समाजवाद्यांचा हा दृष्टिकोन सर्वस्वी बरोबर नाही. आर्थिक सत्तेपेक्षाही सामाजिक व राजकीय व धार्मिक सत्ता जबरदस्त आहे. नंगे फकीर आणि दिगंबरावस्थेत राहणारे साधू यांच्यापुढे कोट्याधीश आणि सम्राट

आतापर्यंत साष्टांग नमस्कार का घालत आलेले आहेत ? रोमच्या साम्राज्यात पद-दलित ( प्लेबियन ) लोक सत्ताधारी ( पेट्रिशियन ) लोकांच्या विरुद्ध शेकडो वर्षे झगडत राहिले व शेवटी ते सामाजिक, धार्मिक व राजकीय सत्ता काबीज करण्यात यशस्वी झाले. या झगड्यातील एक विशेष म्हणजे, सत्ताधारी पेट्रिशियन लोक अनेक युक्त्या, प्रयुक्त्या करुन पददलितांना डोके वर काढू देत नसत. त्याचे एक उदाहरण असे :– कॉन्सलच्या जागेवर नेमणूक ज्या इसमाची करावयाची त्याबद्दलचा कौल, डेल्फी देवीच्या गुरवाने द्यावयाचा असे. हा गुरव नेहमी पेट्रीशियन असे व तो देवीचा कौल, जो इसम पददलितांचा असे, त्याबद्दल कधीच देत नसे. म्हणून प्लेबीयन इसम या अधिकारावर पुष्कळ दिवस येऊ शकला नाही. सारांश, धार्मिक, राजकीय व सामाजिक सत्ता ही आर्थिक सत्तेपेक्षाही जास्त प्रभावी आहे, हे मान्य केले पाहिजे.

समाजवाद्यांचा दुसरा सिद्धांत असा की, बहुजन समाजाने बहुजन समाजासाठी राज्ययंत्र काबीज केले पाहिजे. ही राज्यसत्ता काबीज करण्यास लोकांनी एकत्र आले पाहिजे. यासाठी हिंदू समाजातील बहुजन लोक हा महार, हा मराठा हा ब्राह्मण असले जातिभेद विसरून खांद्यांला खांदा लावून राज्यसत्ता काबीज करण्यास, लढाई देण्यास एकत्र येऊ शकतील काय ? प्रथम सामाजिक समता प्रस्थापित केली तरच ही वस्तुस्थिती उत्तम होऊ शकेल.

एवंच, हिंदुस्थानात आर्थिक, राजकीय धार्मिक व सामाजिक समता स्थापन करावयास कोणीही तयार झाला तर त्याला प्रथम जातिभेदाचा सैतान त्याच्यापुढे ' आ ' वासून उभा राहिलेला दिसेल.

४) जातिभेदामुळे हिंदूंचे, हिंदू समाजाचे व हिंदुस्थानाचे आतापर्यंत अनेक तऱ्हांनी नुकसान झालेले आहे. तसे असताही जातिभेदाची तळी, आकाशाला नेऊन भिडवणारे अजूनही लाखो हरीचे लाल अस्तित्वात आहेत.

जातिभेद हे श्रमविभागाच्या तत्त्वावर उभारलेले आहेत, असे जातिभेदाचे पक्षपाती म्हणतात. काहीजण असेही म्हणतात की धंद्यावरून जातिभेद पडले. जातिभेदाचे मंडन कसेही केले तरी ते चूक आहे. श्रमविभागात श्रमाची विभागणी झालेली आहे आणि जातिभेदात श्रमजीवी लोकांची विभागणी झालेली आहे. धंदे एकाच अवस्थेत ठेवणे हे समाजाच्या व देशाच्या आर्थिक विकासाला बाधक होय. शिवाय

एकच धंदा एकाच कुटुंबात वा समाजात सक्तीने चालू ठेवणे हे त्या कुटुंबाच्या व समाजाच्या आत्मविकासाला बाधक होय.

५] जातिभेदाचे काही पक्षपाती असे म्हणतात की, समाजात वंशशुद्धी ठेवणे हे जातिभेदाचे उद्दिष्ट होय. हिंदुसमाजातील ब्राह्मण, चांभार, मराठे, महार, मांग वगैरे जाती एकाच वंशाच्या आहेत; व त्या वंशात रक्तशुद्धी शंभर टक्के सापडणे हे अशक्य होय, असे अनेक विद्वानांचे मत आतापर्यंत प्रचलित झालेले. आहे. तेव्हा जातिभेद म्हणजे वंशभेद असे न होता एकाच वंशातील भेद असे झाले आहे. तेव्हा रक्तशुद्धीचा जातिभेदाशी कांही संबंध पोहोचत नाही.

६) जातिभेदाने हिंदुसमाजाला आपली आर्थिक, धार्मिक, सामाजिक व राजकीय शक्ती प्रस्थापित करता आलेली नाही. उलट अंशी जातिभेदाने हिंदुसमाजाने स्वतःला निःसत्त्व व दुर्बळ करून घेतलेले आहे. एवढेच नव्हे साऱ्या हिंदुसमाजाला एकच नाव होते, असा कोणत्याही संस्कृत ग्रंथात संदर्भ मिळत नाही. " हिंदू " हे नाव मुसलमानांनी सुरू केले व ते हिंदूंनी आतापर्यंत चालवीत आणले. हिंदूंना ऐक्याची चाड व चीड नव्हती, याचे कारण जातिभेद !

७) समाजांत ऐक्य उत्पन्न व्हावे, अशा हेतूने हिंदूंनी धर्मग्रंथ व शास्त्रे लिहिलेली नाहीत. ब्राह्मण श्रेष्ठ व इतर जाती कनिष्ठ आहेत, हे दाखविण्यासाठी प्रत्येक जातीच्या जन्माची कपोलकल्पित कथा शास्त्रपुराणांतून दिलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर खुद्द ब्राह्मण जातीत गोळक, देवरूखे, कऱ्हाडे, पळशे, चित्पावन, वगैरे जे जातिभेद आहेत, त्यांच्यात श्रेष्ठ कोण, कनिष्ठ कोण हे ठरविणाऱ्या कपोल–कल्पित कथा ब्राह्मणी ग्रंथात लिहिलेल्या आहेत. सह्याद्रिखंड या दृष्टीने वाचून पाहावा. या जातिभेदामुळे खुद्द शिवाजीलाही ब्राह्मणांपुढे नाक घासावे लागले, हे सर्वांना माहित आहेच जातिभेदामुळे हिंदूंना राष्ट्रवीर व राष्ट्रहित यांची काहीच मातब्बरी वाटत नव्हती हे उघड आहे.

८) हिंदू धर्माचे अनुयायी म्हणवून घेणारे सुमारे दीड कोटी लोक गुन्हेगार जाती, जंगलवासी, वगैरे नावांनी ओळखले जातात. सर्व जगाला आत्मज्ञानाचे धडे शिकवणाऱ्या हिंदूंना आपल्या धर्मातील सात कोटी अस्पृश्यांबद्दल जशी कधी लाज वाटली नाही, तशी या दीड कोटी लोकांबद्दलही कधी लाज वाटली नाही. जाति-भेदाच्या भावनेमुळे हिंदूंना या दीड कोटी लोकांकडे सहानुभूतीने वा भूतदयेने पाहण्याची इच्छा होत नाही. या लोकांना ख्रिस्ती वा मुसलमान लोकांनी आपल्या

कळपात नेले तर हेच लोक पुढे हिंदूंच्या छातीवर बसतील, याची जाणीव हिंदूंना झालेली आहे. तरी पण जातिभेदाच्या भावनेमुळे त्यांना याबाबतीत काहीच भरीव कार्य करता येत नाही.

९ ते १३) आमची जात श्रेष्ठ, तुमची जात कनिष्ठ, या मुद्यावर हिंदू लोक परस्परांशी नेहमीच झगडे करीत असतात. ब्राह्मणांनी पाठारे, प्रभू, सोनार, मराठे, महार इ. जातींना या मुद्यांवर पूर्वी फार छळलेले आहे. जातिभेदाच्या भावनेमुळे हिंदूंना हिंदुसंघटन करता आले नाही व परदेशात हिंदू धर्माचा झेंडा फडकविता आला नाही.

१४) स्वतंत्रता, समता व बंधुत्व या तीन तत्त्वांच्या पायावर ज्या समाजाची रचना झालेली आहे, तो समाज आदर्श समाज होय. ज्या समाजात जात, पैसा, व वशिलेबाजी याच्यावर माणसांचे श्रेष्ठत्व ठरविले जाते तो समाज कनिष्ठ दर्जाचा होय.

१५) आदर्श समाजाची ही कल्पना आर्यसमाजिस्टांना पसंत नाही. ' चातुर्वर्ण्य ' ही त्यांची आदर्श समाजरचना होय. कारण ती गुणांवर आधारलेली आहे, जन्मा-वर नाही. गुणांवरून ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र हे वर्ण जर ठरविलेले आहेत तर या वर्णात असे लाखो लोक सापडतील की ज्यांच्यात त्या त्या वर्णाचे सद्‌गुण नाहीत; पण ते केवळ त्या त्या जातीत जन्मले म्हणूनच त्यांना त्या त्या जातीचे गणण्यात येते. मग गुणांवर आधारलेले चातुर्वर्ण्य राहिले कुठे ? इतर देशांत एकाच माणसाला ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांचा पेशा आलटून पालटून करता येतो, पण चातुर्वर्ण्यात तशी व्यवस्था नाही ! मग चातुर्वर्ण्यास आदर्श कसे समजता येईल ? ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या जातींबद्दल चातुर्वर्ण्याने जी कल्पना लोकांच्या मनात रूढ केलेली आहे ती कल्पना, जोपर्यंत नष्ट होणार नाही तोपर्यंत समाजात समाजसुधारणेचे क्रांतिबीज रूजू शकणार नाही !

१६–१८ ) चातुर्वर्ण्याबद्दल मला मनस्वी चीड आहे. माझ्या अणुरेणूंत त्याबद्दल तिटकारा उत्पन्न झालेला आहे. केवळ भावनेच्या आहारी जाऊन मी हे म्हणत नाही. त्याला पुष्कळ संयुक्तिक कारणे आहेत. चातुर्वर्ण्य ही जर सगुण समाजव्यवस्था म्हणावी तर त्यातून जातिभेद का, कसे व केव्हा निर्माण झाले हे आर्यसमाजिष्टस प्रमाण दाखवू शकत नाहीत. वर्णव्यवस्था जर चिरंजीव म्हणावी तर ती सध्या प्रचलित नाही; तिची जागा जातिभेदांनी घेतलेली आहे. मग चातुर्वर्ण्याची मातब्बरी का मानावी ? चातुर्वर्ण्य

हे व्यावहारिक दृष्टीने यशस्वी झालेले नाही. मग त्याचा उदोउदो का करावा ? समाजाची रचना चार भागांत करावयाची की जास्त भागांत करावयाची हे मनुष्याच्या अंगात जितके सद्‌गुण वा दुर्गुण आहेत यावर अवलंबून ठेवावे ही जास्त शास्त्रशुद्ध रीत प्रमाण मानली पाहिजे. पण असे कारणे शक्य आहे का ? नाही. मानवी समाजाची विभागणी चार व जास्त भागांत करणे हे शास्त्रशुद्ध नाही. ज्या सद्‌गुणांसाठी जो मानवी समाज प्रथम प्रमाण मानला गेला त्यासमाजात त्याच सद्‌गुणांचे मानव उत्पन्न होतील, असे मानणे शुद्ध मूर्खपणा आहे. चातुर्वर्ण्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी काही साधनांचा उपयोग करणे जरूर आहे. ते साधन म्हणजे चातुर्वर्ण्याच्या मर्यादा उल्लंघणाऱ्या अपराध्यांना शिक्षा करणे व अशी शिक्षा करण्याचे अधिकार असलेले लोक अस्तित्वात असणे. याबद्दलची तरतूद मनुस्मृती वगैरे ग्रंथांत आहे. रामाने शंबूकाचा शिरच्छेद केला, तो या ग्रंथांतील अधिकारावरहुकूमच होय. राम हा चातुर्वर्ण्याचा सरंक्षक म्हणून त्याने शंबुकाचा जो वध केला तो योग्यच होय ! आता तसला राम आर्यसमाजिस्टांना मिळेल काय ? हे लोक मनुस्मृती वगैरे ग्रंथांतील कायद्यां-प्रमाणे हिंदू समाजाचा गाडा हाकू पाहतात. हा शुध्द पोरखेळ नव्हे काय ? चातुर्वर्ण्यामुळे हिंदू समाजाची सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकोय शक्ती खच्ची झाली व हिंदू समाज निःसत्त्व झाला आणि त्यांच्यात परावलंबी, अज्ञानी, दांभिक आणि गुलामी मनोवृत्तीची वाढ होत गेली. ज्या ज्या काळांत बहुजन समाजाने चातुर्वर्ण्याची चौकट खिळखिळी केली व सर्वसत्ता काबीज केली त्या त्या काळांत हिंदुस्थानची सर्वांगीण प्रगती झाली. मोर्य राजांच्या कारकीर्दीत तर चातुर्वर्ण्य बेचिराख होत गेले. म्हणून मौर्यांच्या काळात हिंदुस्थान देश सर्व दृष्टींनी प्रभावशाली व वैभवशाली झाला.

चातुर्वर्ण्य हे वेदोक्त आहे व ते फार फार पुरातन कालापासून टिकलेले आहे, असे आर्यसमाजिस्ट म्हणतात. ब्राम्हण व क्षत्रिय यांचे समाजात श्रेष्ठत्व प्राप्त करून घेण्यासाठी किती प्रासंगिक झगडे झालेले आहेत असे आर्यसमाजिस्ट म्हण-तात. ब्राह्मण व क्षत्रिय यांचे समाजात श्रेष्ठत्व प्राप्तकरून घेण्यासाठी किती प्राणांतिक झगडे झालेले आहेत व त्यांत किती लोकांचे बळी पडलेले आहेत याची तपशीलवार माहिती ऋग्वेद, रामायण, महाभारत, भागवत इत्यादी ग्रंथांतून पहावयास मिळते.

ब्राह्मणांनी कपटनीतीचा अवलंबकरून आणि आपल्या बाजूला जेवढे राजे लोक झाले, त्यांना देवावताराची वस्त्रे घालून ते क्षत्रिय इतर ब्राह्मणेतर समाज

यांच्या बोकांडी कसे बसविले, याचीही माहिती हिंदुधर्मशास्त्रे, पुराणे व वेद यांच्या मध्ये मिळते. ब्राह्मणांनी उत्पन्न केलेले देवावतार हे ब्राह्मणांचे रक्षण करण्यासाठी आहेत. त्या अवतारींना सर्व हिंदूंच्या संरक्षणाची आच कधीही लागलेली नव्हती हेही एक विलक्षण सूत्र ब्राह्मणी धर्मग्रंथांतून पहावयास मिळते. चातुर्वर्ण्य जर परमेश्वरनिर्मित समाजरचना आहे तर याच्या विरुद्ध क्षत्रियादी ब्राह्मणेतर बहुजन समाजाने वेळोवेळी का बंडे उभारली, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. आर्यसमाजिस्टांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे ! त्यांना जर या प्रश्नाचे संयुक्तिक उत्तर देता येत नसेल तर चातुर्वर्ण्य ही समाजरचना आदर्श व सनातन आहे, हा त्यांचा दावा खोटा ठरतो.

१९) चातुर्वर्ण्यावर व जातिभेदावर हजारो वर्षे हल्ले झाले तरी ती अद्याप अस्तित्वात आहेत व हिंदुसमाजही अद्याप अस्तित्वात आहे. ही विचारसरणी प्रकट करणारे पुष्कळ हिंदू विद्वान लोक आहेत. त्यापैकी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉ. राधाकृष्णन् हे तत्त्ववेत्ते आहेत. चातुर्वर्ण्य सध्या अस्तित्वात आहे, हा दावा सपशेल खोटा आहे. जातिभेद व हिंदुसमाज सध्या अस्तित्वात आहे, हे म्हणणे खरे आहे. पण हिंदुसमाज कोणत्या अवस्थेत अस्तित्वात आहे, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. हिंदुसमाज जातिभेदामुळे हीन, दीन व गुलामी मनोवृत्तीने जीव धरून जगत आलेला आहे, ही मोठी स्पृहणीय गोष्ट आहे, असे कोणीही विचारवंत व स्वाभिमानी मान्य करणार नाही.

२०) चातुर्वर्ण्य वा जातिभेद हे समाज धारणेला पोषक नाहीत, हे स्पष्ट झालेले आहे. ह्याचा अवलंब करून हिंदुसमाजाला आत्मसंरक्षणासाठी प्रबळ करता येत नाही. चातुर्वर्ण्य व जातिभेद हे समूळ नष्ट करून हिंदुसमाजाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. यासाठी मिश्रविवाह झाले पाहिजेत व नव्या पिढ्यांना हिंदू हे एकच नाव दिले पाहिजे. हे मिश्र विवाह घडून येण्यास दोन गोष्टींची अत्यंत जरूरी आहे. त्या दोन गोष्टी म्हणजे हिंदूंच्या मनात रूढ झालेल्या धार्मिक कल्पना आणि धार्मिक ग्रंथांचे प्रामाण्य ही समूळ नष्ट करणे. गौतम बुद्ध व गुरुनानक यांनी हिंदूतील धार्मिक कल्पना नष्ट करण्याची व वेदादी ग्रंथांचे प्रामाण्य झुगारून देण्याची चळवळ हाती घेतली. या दोन उपायांचा निर्भयपणे सदुपयोग केला म्हणूनच त्यांचे समाजपुनर्रचनेचे कार्य सफल झाले.

२१ ते २६) जातपात तोडक मंडळाचे ध्येय जातिभेद नष्ट करायाचे आहे. यासाठी

रोटी बेटी व्यवहार झाले पाहिजेत हेही मंडळाला मान्य आहे. परतु या गोष्टी जातिभेद नष्ट करण्यास सर्वस्वी समर्थ नाहीत. चातुर्वर्ण्याची कल्पना हे एक थोतांड आहे व ते थोतांड जोपर्यंत अस्तित्वात राहिल तोपर्यंत रोटी बेटी व्यवहार चालू होऊनही हिंदुसमाजात जातिभेद अस्तित्वात राहतील. म्हणून हिंदूंच्या मनांत रूढ झालेल्या देवावतार, ब्राह्मण श्रेष्ठ, ब्राह्मणेतर कनिष्ठ वगैरे प्रकारच्या धार्मिक कल्पना व भावना नष्ट केल्या पाहिजेत आणि हिंदूंचे वेद, स्मृती इत्यादी ग्रथ ईश्वरनिर्मित आहेत व ते वंदनीय व पवित्र आहेत, म्हणून त्यांतील सर्व प्रकारचे धार्मिक प्रामाण्य प्राणान्तापर्यंत मान्य केले पाहिजे, अशा ज्या हिंदूंच्या श्रद्धा, कल्पना व भावना आहेत त्या नष्ट केल्या पाहिजेत. या दोन गोष्टी नष्ट करण्यासाठी मंडळाने चळवळ सर्व हिंदुस्थानात चालविली पाहिजे ही चळवळ मंडळाने यशस्वी केली तर हिंदुसमाज खात्रीने प्रबळ होईल. अशी आपण चळवळ चालवावी अशी माझी फार इच्छा होती. परंतु अनेक कारणांमुळे मला तसे करता आले नाही. हिंदू लोकांपुढे होत असलेले माझे हे भाषण अगदी शेवटचे आहे. कारण मी हिंदू धर्माचा त्याग करणार आहे. मंडळाच्या भावी कार्यक्रमांत मला भाग घेता येणार नाही. तथापि मंडळाची जातिभेद नष्ट करण्याची चळवळ यशस्वी होवो, अशी मी इच्छा प्रदर्शित करतो !

बाबासाहेबांनी आपल्या भाषणाचा मसुदा तयार केल्यानंतर तो त्यांनी रिवाजाप्रमाणे जातपात तोडक मंडळाकडे मंजुरीसाठी पाठविला. त्या भाषणातील आर्यसमाजिस्टांवरील विवेचनात्मक टीका व जातिभेद नष्ट करावयाचे असतील तर धार्मिक भावना आणि कल्पना व वेदादी धार्मिक ग्रंथांचे प्रामाण्य नष्ट करा हा उपदेश, मंडळाच्या कार्यकर्त्यांना आवडला नाही. ' भाषणातील उपरिनिर्दिष्ट भाग वगळा ' असे त्यांनी बाबासाहेबांना सुचविले. या संबंधी उभयपक्षांत डिसेंबर १९३५ ते एप्रिल १९३६ च्या दरम्यान बराच मोठ्या प्रमाणात पत्रव्यवहार झाला. अंदमानमध्ये शिक्षा भोगलेले सुप्रसिद्ध क्रांतिकारक भाई परमानंद, महात्मा हंसराज, डॉ. गोकुळचंद नारंग, राजा नरेंद्रनाथ, इत्यादी प्रसिद्ध आर्यसमाजिस्ट व हिंदुसभा-वादी पुढाऱ्यांनी असा हेका धरला की, भाषणातील हे उपरिनिर्दिष्ट भाग जर तसेच राहून दिले तर मंडळावर आम्ही बहिष्कार पुकारू आणि मंडळाची होऊ घातलेली परिषद उझळून लावू. अशी मंडळाला समज दिल्यामुळे, मंडळाने बाबासाहेबांना गळ घातली की, भाषणातील हे अनिष्ट भाग वगळा. पण बाबासाहेबांनी तसे करण्याचे साफ नाकारले. हे भाग तुम्हांला जर अनिष्ट वाटत असतील तर का, याची कारणे सांगा, असा बाबासाहेबांनी मंडळाला जेव्हा उलट प्रश्न केला, तेव्हा मंडळाने त्यांना

कळविले की आम्हांला लोकमत सांभाळून जातिभेद मोडण्याची चळवळ चालवायची आहे. ' सती जावयास निघावयाचे व शालूला आग लागेल म्हणून त्यालाही जपून ठेवावयाचे ' असे दुटप्पी वर्तन करणाऱ्या सतीप्रमाणे मंडळाचे मन पाहून बाबासाहेबांनी मंडळाला कळविले की तुमच्या मताप्रमाणे जो भाषण करील असा अध्यक्ष परिषदेसाठी निवडा व परिषद पार पाडा ! मंडळाने परिषद तहकूब केली. कारण बाबासाहेबांना अध्यक्ष निवडले म्हणून हिंदू लोक मंडळावर गुपचूपपणे दात ओठ खात होते. बाबासाहेब हिंदूच्या धार्मिक भावना व कल्पना नष्ट करा व वेदादी ग्रंथांचे धार्मिक प्रामाण्य झुगारून द्या, असा हिंदूना उपदेश करणार म्हणजे हिंदुधर्माची पाळेमुळे व ब्राह्मणादी त्रैवर्णिकांचे हिंदू समाजातील चढत्या व उतरत्या भांजणीप्रमाणे अस्तित्वात असलेले स्थान खणून निघणार. हा भीषण देखावा हिंदूना भेडसावू लागला व ते मंडळावर उघडपणे तुटून पडू लागले. या संतप्त वातावरणात परिषद भरली तर हिंदू लोक परिषदेचा मंडप जाळतील व अध्यक्षादी लोकांवर अत्याचारी हल्ले करतील, अशी मंडळाला भीती पडली, म्हणून परिषद तहकूब करण्यात आली.

बाबासाहेबांनी आपले भाषण " भारत भूषण प्रिंटिंग प्रेस " मध्ये छापून मे १९३६ मध्ये " Tracts for the Times " No. I या शीर्षकाखाली ' Speech Prepared by Dr. B. R. Ambedkar, M. A. Ph. D., D. Sc., Barister at Law, for the 1936 Annal Conferrence of the ' Jat-Pat Todak Mandal ' of Lahore, but not delivered owing to the canceilation of the conferrence by the Reception Committee on the grou d that views expressed in the speech would be unbearable to the conferrecne. या नावाने प्रसिद्ध केले. मंडळ व बाबासाहेब यांचा जो पत्रव्यवहार झाला तो या पुस्तकाच्या प्रारंभी देण्यात आलेला आहे. या पुस्तकावर वर्तमानपत्रांतून व सभांतून हिंदू पुढाऱ्यांनी व आर्य समाजिस्टांनी निकराचे हल्ले चढविले. काही वर्तमानपत्रांनी व वक्त्यांनी या भाषणाला सर्वस्वी अनुकूल नसले तरी बऱ्याच अंशी अनुकूल अभिप्राय व्यक्त केले. त्याबद्दलची खालील उदाहरणे पहा.

1) Bombay Standard, 24-5-36.

२) विविधवृत्त ३१-५-३६ :- हिंदू समाजाचा सर्वांत भयंकर शत्रू! (अग्रलेख)

" - - - - डॉ. आंबेडकर यांनी लाहोरच्या जातपाततोडक मंडळाच्या परिषदेपुढे

वाचण्याकरिता अध्यक्षांच्या नात्याने जे भाषण तयार केले होते, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. डॉ. आंबेडकरांच्या भाषणाला बिचकून या परिषदेच्या स्वागत कमिटीने परिषदेचे अधिवेशनच रद्द करावे, ही गोष्ट त्या मंडळाला अत्यंत लांछनास्पद होय. या मंडळाचा उद्देशच जर जातपात मोडणे हा आहे, तर हा उद्देश सिद्धीस नेणारी उपाययोजना, तत्पोषक स्पष्टोक्ती व जातिभेदाचा सविस्तर व पूर्वापार इतिहास ज्या भाषणात आला आहे. त्या भाषणाने बिचकून जाण्याचे कारण उरत नाही. अंधदृष्टीमुळे खड्डयात पडून जीवाचा नाश होण्याची पाळी आली असताना दृष्टी देणारे अंजन ते किंचित् काळ झणझणते म्हणून जो डोळयांत घालू देणार नाही, त्याची गणना शहाणे लोक मूर्ख व आत्मघातकी माणसांतच करतील. डॉ. आंबेडकरांचे समग्र भाषण शांतपणे वाचल्यास, ते अशाच प्रकारचे अंजन आहे, अशी पूर्ण खात्री पटते आणि हे घरी चालून आले असता किंबहुना असे अंजन घाला अशी स्वतःच विनंती केली असता ते स्वहस्ताने दूर लोटणाऱ्या माणसांची कीव आल्याशिवाय रहात नाही.

आचार, उच्चार आणि विचार यांच्या गुलामगिरीतून हिंदुसमाजाची मुक्तता झाल्याशिवाय तो निगडित व संघटित होणार नाही, आणि त्याची बौद्धिक गुलामगिरी त्याला खरे स्वातंत्र्य व लोकशाहीचा मनू या स्थित्यंतरांत त्याचे स्थान लाभू देणार नाही. जातिभेदाचे प्रस्थ आणि ही गुलामगिरी यांचा अन्योन्य संबंध काय, यांचे सुंदर मुद्देसूद सर्वांगीण व शास्त्रीय विवेचन डॉ. आंबेडकरांच्या भाषणात केले असल्यामुळे त्यांच्या शत्रूंनीही त्यांचे मनन करावे इतके ते योग्य झाले आहे. या भाषणाने थरकाप होऊन लाहोरच्या जातपात तोडक मंडळाने आपली परिषद रद्द करावी, हे याच कारणास्तव नामुष्कीचे म्हटले पाहिजे, म्हातारीने कोंबडा झाकला म्हणून उजाडावयाचे थोडेच थांबते ? या न्यायाने डॉ. आंबेडकरांच्या या भाषणाचा योग्य तो फैलाव व परिणाम झाल्याखेरीज राहणार नाही, अशी आम्हांस खात्री वाटते. "

(३) **Bombay Chronicle,** 5-6-36 " Down and Cast" या अग्रलेखात या पत्राने खालील मत प्रकट केले :–

- - - - - The presidential address is now published as a pamphlet called Annihlation of caste. The pamphlet is a valuable contribution to the literature on this subject and has the merit of being practical in its discussion, is not merely aca-

demic ---- that caste is an evil is now recognised by most thinking people and the pertinent question is now to get rid of it. It is a hard problem and Dr. Ambedkar regards it as even harder than the fight for Swaraj --- In as much as caste is ordinant by the shastras, it is necessary, he says, " to distroy the belief in the sanctity of the shastras." But it is not necessary to go so far, whatever one's opinion of the propriety expediency of this last suggestion, nor is it desirable to ignore altogether the aid of the movements of fusing the sub-castes or the promotion of inter-dining among all castes. But we agree that inter caste marriages are a far more effective remedy. As regards the Shastras, if some tests support caste, then there are others that support its abolition. The right attitude towards them, as towards all scriptures, should be a discriminating one, not supporting what is repugnant to reason and must, therefore, be annihilated.

४) त्रिकाळ – ८–६–३६ "– – – – – – – डॉ. आंबेडकर यांच्या भाषणातील काही भाग गाळण्यात यावा असे लाहोरच्या मंडळींनी कळविल्यामुळे डॉक्टर–साहेबांनी अखेरीस हे अध्यक्षपदच नाकारले असाही वृत्तान्त प्रसिद्ध झालेला आहे, या सर्व प्रकरणात मौजेची गोष्ट अशी आहे की, डॉ. आंबेडकर यांनी एका शब्दा–बद्दल आग्रह धरून लाहोरच्या मंडळींना तोंडघशी पाडले. 'शास्त्रप्रामाण्याला फाटा द्यावा' या डॉक्टरसाहेबांच्या मताला लाहोरची मंडळी विरुद्ध नव्हती; पण, वेदप्रामाण्याबद्दलचा अशाच तऱ्हेचा उल्लेख आर्यसमाजिस्टांना दुखविणारा असल्या-मुळे तेवढा काढण्याबद्दलचा आग्रह लाहोरकर मंडळींनी धरला होता. पण डॉक्टरसाहेबांना तेवढीही सूचना मानवली नाही ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. झुणकाभाकरीच्या सहस्त्रभोजनांनी अस्पृश्यता निवारण होईल असे म्हणून पराक्रम करणाऱ्या लोकांनी तर डॉक्टरसाहेबांची ही अत्याग्रही वृत्ती जरूरच लक्षांत ठेवावी.

५) वैनतेय ९-६-३६– प्रासंगिक विचार :–"लाहोरच्या जातपात तोडक मंडळाने आपल्या यंदाच्या वार्षिक अधिवेशनचे अध्यक्षपद स्वीकारण्याविषयी डॉ. बाबा–साहेब आंबेडकर यांना विनंती केली होती व त्यांनीही ती मान्य केली होती. पण पुढे स्वागत मंडळाला डॉ. आंबेडकर यांनी तयार केलेले अध्यक्षीय भाषण, केवळ जातीवरच नव्हे तर हिंदुधर्मावर तीव्र हल्ला करणारे आहे, असे वाटून त्यांनी

अधिवेशनच तहकूब केले. नियोजित अध्यक्षांची विचारसरणी पसंत न पडल्यामुळे अधिवेशन रद्द झाल्याचे उदाहरण बहुधा हेच पहिले असावे, असे वाटते. हिंदू धर्म आणि जातिभेद तत्त्वतः स्वतंत्र असली तरी व्यवहारात इतकी एकरूप बनली आहेत की, एकाचा निषेध करताना दुसऱ्याला धक्का लागू न देणे कठीण होते. त्यातून डॉ. आंबेडकर तर हिंदू धर्माला वैतागून धर्मांतराला उद्युक्त झालेले. त्यांनी ' इन्द्राय स्वाहाः तक्षकाय स्वाहाः' म्हटले तर आश्चर्य कसले ? डॉ. आंबेडकर यांचे हे भाषण Annihilation ot caste या नावाने प्रसिद्ध झाले असून त्याती विचारसरणी सर्वांना पसंत न पडली तरी त्यांनी आपल्या अध्यक्षपदाला न शोभ-ण्यासारखे काहीही लिहिलेले नाही. हे निःपक्षपाती माणसाला. कबूल करावे लागेल लाहोरच्या जातपात तोडक मंडळाचे हे कृत्य शिष्टाचाराचा भग आणि डॉ. साहेबांचा अपमान करणारे म्हणून अविचाराचे झाले असेच कोणाही विचारी माणसाला वाटेल. "

६) निर्भीड १४-६-३६ :- " जाती तोडाल तरच पुण्य जोडाल " असा मथळा देऊन या पत्राने बाबासाहेबांच्या प्रमुख मुद्यांचा सारांश प्रसिद्ध केला होता.

7) Bombay Standard - 24-5-36 " for the greater glory of Hinduism ? Doctor Ambedkar Prescribes, " Destroy the Shadtras burying priesthood under the State " असा मथळा देऊन या पत्राने बाबासाहेबांच्या भाषणातील प्रमुख मुद्दे भाषणातील उतारे देऊन प्रसिद्ध केले होते.

८) ज्ञानप्रकाश १५-७-३६:- श्री. ल. ब. उर्फ आण्णासाहेब भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रो. श्रीपाद महादेव उर्फ बापूसाहेब माटे यांची पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात बाबासाहेबांच्या भाषणावर २३, २४ व २५ जून १९३६ रोजी व्याख्याने झाली. त्या व्याख्यानांत प्रो. माटे यांनी भाषणात ग्राह्य व त्याज्य मुद्दे कोणते, त्याची चर्चा केली. त्यांनी पहिल्या व्याख्यानात खालील उद्‌गार काढले. कोणत्याही समाजावर बौद्धिक छाप सहजरीत्या पाडू शकतील इतके डॉक्टरसाहेब विद्वान आहेत यात शंका नाही. पण आमचे दुर्दैव असे की, त्यांना जसा पाहिजे आहे तसा त्यांचा आपणास उपयोग करून घेता आला नाही . . . . . . . . . डॉ. आंबेडकरांचे हे भाषण त्या परिषदेच्या चालकांना, जरी ते जातपात तोडणारे होते तरी पचेना. 'पचेना' हा शब्द या ठिकाणी बरोबर आहे. जातपात तोडक मंडळास हिंदुसमाज हिंदू या दृष्टीने कायम टिकवावयाचा आहे व हिंदुत्व आणि हिंदूचे मूळ

धर्मग्रंथ याविषयी त्यांना पूर्ण आस्तिक्य बुद्धी आहे. त्यामुळे त्यांच्याही विचार-श्रेणीपलीकडे गेलेले डॉ. आंबेडकर यांचे हे भाषण त्यांना पचेना - - - - -" - - - -डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करावे असे जे मी म्हणतो, ते एवढ्यासाठीच. अस्पृश्य तसेच चिकटून राहून भटजींच्या लाथा खाऊ म्हणतील तर धर्म किंवा देव त्यांना लाभणार नाही. पण तेच जर त्यांची पर्वा न करता चैतन्य प्रकट करतील तर धर्म त्यांच्या मागे धावत जाईल असे २७-६-३६ ला पुण्यातील विजयानंद नाटकगृहात भरलेल्या सभेत डॉ. कूर्तकोटी यांनी उद्गार काढले. (निर्भीड ५-७-३६)

# प्रकरण १२ वे

# इतर चळवळी

हिंदूंच्या देवळात ज्या हिंदू जातींना पूर्वी प्रवेश मिळत नसे त्या जातींनी देवळांत प्रवेश करण्याचे प्रयत्न पूर्वी केलेले होते. अशा प्रकरणांची नोंद कागदो–पत्री प्रविष्ट केलेली असे, ती फक्त सरकारच्या दप्तरात. ही परिस्थिती फक्त ब्रिटिशांची कारकीर्द हिंदुस्थानात सुरू झाल्यानंतर पुष्कळ वर्षांनी अस्तित्वात आली. त्यांपैकी एक प्रकरण १८७४ मध्ये दक्षिण भारतातील तामिळनाडू प्रांतात उत्पन्न झाले. शनार या अस्पृश्य जातीतील काही लोकांनी मदुरा येथील मीनाक्षी देवीच्या मंदिरात बळजबरीने घुसण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सवर्ण हिंदूनी, त्यांचा प्रयत्न संघटितपणे हाणून पाडला. शनार म्हणत, आम्ही क्षत्रिय आहोत. त्यांचे विरोधक मारवान म्हणत हा तुमचा दावा खोटा आहे. या मुद्यावर या दोन जातींत वेळोवेळी तंटे उत्पन्न होत असत. शिवकाशी (शिवकांची) या गावात या दोन जातींची १८९९ मध्ये मोठी मारामारी झाली. मारवान हे बहुसंख्य असल्यामुळे ते शनार यांना पिटून काढीत असत. १९१८ मध्ये या दोन जातीत अनेक ठिकाणी मारामाऱ्या झाल्या. काही मारामाऱ्यांच्या वेळी पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यांत दोन्ही जमातींतील काही लोक प्राणास मुकले. ( Caste, Class and Occupation :- Dr. G S. Ghurye )

हिंदू समाजातील जातिजातींतील वैमनस्यामुळे ज्या अनेक समाजघातकी रूढी निर्माण झाल्या त्यांची दुष्ट फळे समाजाला चाखावी लागली. अशा परि–स्थितीत हिंदुसमाजाला तीन चार हजार वर्षे घालवावी लागली. हे दुष्टचक्र नष्ट करण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी अनेक तऱ्हेचे प्रयत्न केले. हिंदुसमाजातील जातिभेद या विषयावर खुद्द हिंदुसमाजातील विष्णुबुवा ब्रह्मचारी, जोतिराव फुले, दयानंद सरस्वती, रानडे, आगरकर, कर्मवीर शिंदे, राजर्षी शाहू महाराज,

सयाजीराव महाराज इत्यादी, अलीकडील काळातील अनेक समाजसुधारकांनी कोरडे ओढले होते. या विषयावर यूरोप, अमेरिका व आशिया या खंडातील अनेक विद्वानांनी ग्रंथ लिहिलेले आहेत. त्यातील काहीजण या विषयाकडे धार्मिक ग्रंथातील तत्त्वानुसार पाहात होते, तर काही ऐतिहासिक व समाजशास्त्रातील घडामोडीच्या आधारे पहात होते. या सर्वांची इच्छा ही की हिंदुसमाजाला जातिभेदाचा जो रोग जडलेला आहे तो नष्ट व्हावा व त्यासाठी त्यांनी जे उपाय सुचविले ते मलमपट्टीच्या स्वरूपाचे होते.

बाबासाहेबांचाही जातिभेदाकडे पहाण्याचा दृष्टिकोन हाच होता. परंतु हा जातिभेदाचा रोग वरील मलमपट्टीने नष्ट होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. या रोगाचे जन्मस्थान हिंदूंचे धार्मिक ग्रंथ, या ग्रंथावर असलेली हिंदूंची मनोमय श्रद्धा आणि ग्रंथप्रामाण्यबुद्धी या सर्वांचा समूळ नाश केला तरच जातिभेदाचा रोग संपूर्णपणे नष्ट होईल. मलेरियाने पछाडलेल्या रोग्यांना निव्वळ औषधोपचार करून मलेरिया नष्ट करता येत नाही तर त्याला कारणीभूत होणाऱ्या डासांची ज्या डबक्यांतून उत्पत्ती होते ती डबकीच नष्ट केली पाहिजेत, अशा स्वरूपाची बाबासाहेबांची जातिभेदाकडे पाहण्याची दृष्टी होती.

ख्रिस्ती धर्मात सुधारणा व्हावी म्हणून मार्टिन ल्यूथरने व त्यानंतर अनेक लोकांनी प्रचंड चळवळ केली. हिंदू धर्मात सुधारणा व्हावी म्हणून चार्वाकाने व त्याच्यानंतर अनेक संतमहंतांनी, ब्राह्मोसमाजिस्टांनी, प्रार्थनासमाजिस्टांनी, आर्य-समाजिस्टांनी व सत्यशोधकांनी प्रचंड चळवळी केल्या. परंतु यांतील कोणीहि, बायबल, वेद, स्मृती, इत्यादी ग्रंथातील समाजधारक तत्त्वांचे सनातनत्व व त्यावरील प्रामाण्यबुद्धी, श्रद्धा व भावना ही नष्ट केली पाहिजेत असा संदेश जाहीर केला नाही. ही श्रद्धास्थाने, भावना व प्रामाण्यबुद्धीही नष्ट केली पाहिजेत, असा संदेश फक्त बाबासाहेबांनीच जाहीर करून सर्वांवर मात केली, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

महात्मा गांधी यांनी बाबासाहेबांच्या भाषणावर 'Dr. Ambedkar's Indictment' या शीर्षकाखाली ११ व १८ जुलै आणि १५ ऑगस्ट (Varna V. Caste) १९३६ च्या 'हरिजन' मध्ये आपले विचार प्रसिद्ध केले. त्यांनी आपल्या दृष्टिकोनातून चातुर्वर्ण्य, वर्ण, जातिभेद इत्यादी मुद्यांसंबंधी धार्मिक श्रद्धाळूपणाने पण सुधारक दृष्टीने विचार प्रदर्शित केले. म. गांधींचे हे तीन

लेख ' Annihilation of caste ' च्या द्वितीय आवृत्तीत ' Appendix I-A vindication of caste by Mahatma Gandhi ' आणि त्याला उत्तर ' Appendix II A reply to the Mahatma by Dr. B. R. Ambedkar' या नावांनी प्रसिद्ध केलेली आहेत. या उत्तरातील बाबासाहेबांची विचारसरणी संकुचित, निर्दोष आहे आणि ती यथार्थ तिखट भाषेत प्रदर्शित केलेली आहे. प्रत्येक हिंदूने आपल्या वाडवडिलांचा पेशा चालवावा या सनातन रूढीबद्दल बाबासाहेबांनी म्हटले आहे की ' एखाद्याच्या बापाचा धंदा भटभिक्षेचा असला तर त्याच्या मुलाने तोच धंदा करावा अगर आपल्या आईचा धंदा वेश्येचा असेल तर तोच धंदा मुलीने करावा, ही विचारसरणी मानवी जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीला घातक आहे, हे कोणीही मान्य करील.

म. गांधी आणि हिंदुधर्माभिमानी पुढारी अस्पृश्यांच्या आणि हिंदुधर्मसुधार-णेच्या प्रश्नासंबंधी चिरस्थायी, दूरगामी आणि संकुचित विचारसरणी सोडीत नाहीत, अशी बाबासाहेबांची या उत्तरात प्रामुख्याने तक्रार होती. आणि अशा माणसांचे पुढारीपण हिंदूंना चिरसातत्य मानावे लागते, ही हिंदू लोकांच्या जीवनाची भयंकर शोकांतिका होय! असा बाबासाहेबांनी आपल्या उत्तराच्या शेवटी शेरा मारला आहे. (' The Hindus, in the words of Mathew Arnold are ' Wandering between two worlds, one dead, the other powerless to be born. ' What are they to do ? The Mahatma to whom they appeal for guidance does not believe in thinking and can therefore give no guidance which can be said to stand the test of experience. The intellectual classes to whom the masses look for guidance are either too dishonest or too indiffernent to educate them in the right direction. We are indeed witnesses to a great tragedy. In the face of this tragedy all one can do is to lament and say-"Such be thy Leaders, O ! Hindus !! ' )

हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्य व जाती या संस्थांच्यामुळेच हिंदुसमाजाचा पाया खिळखिळा झालेला आहे. त्यामुळे हिंदुधर्म व समाज यांच्यावर हजारो वर्षे, अनेकांचे हल्ले झाले तरी हिंदुधर्म व समाज आजपर्यंत तग धरून राहिले. त्यांना संपूर्णतया नष्ट करणे कोणालाही शक्य झाले नाही. अशा अर्थाच्या सर राधाकृष्णन यांच्या विचारसरणीला बाबासाहेबांनी उत्तर दिले की, हे ठीक आहे. पण हिंदुधर्म व समाज यांना स्वाभिमानाने व स्वतंत्र बाण्याने कधी जीवन व्यतीत करता आले

का ? परक्यांच्या प्रबळ शक्तीपुढे लाचारीचे जीवन जगण्यातच हिंदूना पुरुषार्थ वाटला, हे कशाचे फळ ? लाचारीचे जीवन व स्वातंत्र्याचे जीवन, यांत श्रेष्ठ दर्जा कोणाला द्यावा ? हिंदुधर्म व समाज यांनी या श्रेष्ठतम जीवनतत्त्वाबद्दल कधी विचार केला का ? केल्यास त्यांच्या दुबळ्या वृत्तीचे कारण कोणते ? हे त्यांना कळले का ? कळले असेल तर ते कारण नष्ट करण्यासाठी त्यांनी कधी कंबर कसली का ? मूळ उत्तराचा मजकूर मी येथे देत आहे.

## ' Dr. Ambedkar's reply to Sir S Radhakrishnan's The survival Theory.

' Professor Radhakrishnan once said that there was one argument to prove the greatness of hindus and that was it had survived the shakes of time, it still existed whereas other ancient cults and creeds had been dead long ago. In reply to this argument Dr. Ambedkar says :— " I fear that this statement may become the basis of a vicious argument that the part of survival is a proof of fitness to survive. It seemes to me that the question is, not whether a community lives or dies; the question is, on what plane does it live. There are different modes of survival. But all are not equally honourable. For an individual as well as for a society there is a gulf between merely living and living worthily. To fight in a battle and to live in glory is one mode. To treat a retreat, to surrunder and live the life of a capture is also a mode of survival. It is useless for the hindus to take comfort in the fact that he and his people have survived. What he must consider is what is the quality of that survival. If he does that, I am sure he will cease to take pride in the mere fact of survival. The hindus have been living a life of continnuous defeat and what appears to them to be life everlasting is not living everlastingly. It is a more of survival of which every rightminded hindu, who is not afraid to own up the truth will feel ashamed. ' ( The Lamp, 25-6-36 )

बाबासाहेबांनी ' जातपात तोडक मंडळा' पुढे वाचण्यासाठी जे भाषण लिहिले होते त्यात असे विधान केले होते की, पेशवाईत प्रत्येक अस्पृश्याने आपल्या गळ्यात अथवा मनगटावर काळा गंडा आपली जात दर्शविण्यासाठी बांधावा,

गळ्यात मडके बांधावे या विधानाला काय ऐतिहासिक पुरावा आहे, असा श्री. य. न. केळकर यांनी प्रश्न उपस्थित केला. त्यांचे पत्र ५–६–३६ च्या केसरीत प्रसिद्ध झाले होते. तो पत्रव्यवहार असा–

## ' या विधानांना आधार दाखवा '

रा. रा. केसरी कर्ते यास–

सा. न. वि. वि. पुढील चार ओळीस आपल्या पत्रात जागा द्यावी. जातपात तोडक मंडळातर्फे लाहोर येथे भरणाऱ्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान डॉ. आंबेड–करांना द्यायचे ठरविले होते. पण पुढे स्वागत कमिटीचा व डॉ. आंबेडकरांचा, भाषणातील काही मुद्यांबाबत मतभेद होऊन अखेर स्वागत मंडळाने अधिवेशनच तहकूब केल्याचे जाहीर केले. तो प्रकार आता सर्वांस ठाऊकच आहे त्यानंतर अलीकडे डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षीय भाषण स्वतःच स्वखर्चाने छापून काढले आहे. प्रस्तुत भाषण म्हणजे एक विद्वत्तापूर्ण निबंधच आहे, असे कोणीही म्हणेल. मतभेदाचे अनेक प्रश्न त्यात उपस्थित होण्यासारखे असले तरी त्यात दिसून येणारा व्यासंग व विद्वत्ता कोणासही नाकबूल करता येणार नाही. पण हे पत्र लिहिण्याचा उद्देश फक्त एका शंकेचा खुलासा डॉ. आंबेडकरांना विचारावा इतकाच आहे. पान ३ वर पेशवाईपासून अगदी १ एप्रिल १९३६ पर्यंत म्हणजे आजवर अस्पृश्यांचा किती निर्दयतेने छळ चालला होता व आहे याची निर–निराळी उदाहरणे डॉक्टरसाहेबांनी दिली आहेत. त्यांत ते लिहितात-' पेशव्यांच्या अमलात मराठी मुलखात अस्पृश्यांवर असे बंधन होते की, त्यांनी एकादा स्पृश्य हिंदू सार्वजनिक रस्त्यावरून येत असेल तर त्या रस्त्यावर जाऊ नये, कारण त्यांच्या सावलीने त्या स्पृश्य हिंदूला विटाळ व्हावयाचा. प्रत्येक अस्पृश्याने आपल्या गळ्यात अथवा मनगटावर काळा गंडा आपल्या अस्पृश्यतेची निशाणी दर्शविण्या–करिता घातलाच पाहिजे अशी सक्ती होती. पेशव्यांच्या राजधानीत पुण्यात तर असा कडक कायदा होता की प्रत्येक अस्पृश्याने आपल्या पाठीमागे कमरेस एक झाडू अडकवून फिरावे. तो अशाकरिता की, अस्पृश्याच्या चालण्याने भूमीचा जो भाग विटाळला जाई तो लगेच मागच्या झाडूने झाडून शुद्ध व्हावा. तसेच प्रत्येक अस्पृश्याने आपल्या गळ्यात एक मडके बांधून फिरावे. अस्पृश्याने त्या मडक्यातच थुंकले पाहिजे; एरवी त्याच्या थुंकीने कदाचित त्या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या स्पृश्य हिंदूस नकळत विटाळ व्हावयाचा. '

अस्पृश्यांची अत्यंत दीन स्थिती वर्णन करण्याच्या भरात व ब्राह्मण जातीला

प्रहार करण्याच्या आवेशात डॉक्टरसाहेबांनी हे जे चित्र रंगविले आहे ते उत्कृष्ट असले तरी सर्वस्वी असत्य आहे, एवढीच माझी तक्रार आहे. मडके गळ्यात बांधण्याच्या साऱ्या गोष्टी केवळ दंतकथात्मक भाकडकथा असून त्याला समकालीन अस्सल इतिहाससाधनांत कोठेही आधार उपलब्ध नाही. हल्ली वाडकृत पेशवा डायरीचे १२ भाग, पेशवे दप्तराचे ४५ भाग व इतर अस्सल साधनांचे पाचपन्नास खंड उपलब्ध आहेत. त्यांत अस्पृश्याने गळ्यात मडके बांधल्याचा किंवा कमरेला केरसुणी लटकावल्याचा उल्लेख सापडत नाही. डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वानाला भाकडकथा व समकालीन अस्सल कागदपत्रे यांतला फरक कळत असता त्यांनी असा विपर्यास का करावा ? ते वर्णन करतात त्याप्रमाणे ५ ते १० उदाहरणे तरी त्यांनी काढून दाखवावी अशी त्यांना विनंती आहे. नुकतेच श्रीयुत यशवंत नारायण टिपणीस यांनी ' दख्खनचा दिवा ' नावाचे एक नाटक लिहिले आहे. त्यात तर शिदनाक महार नावाच्या पात्राला प्रत्यक्ष गळ्यात मडके बांधूनच रंगभूमीवर आणले आहे ! त्यांनाही हीच विनंती आहे की त्यांनीही आपले आधार जरूर प्रसिद्ध करावे. स्पृश्य जातीच्या किंवा ब्राह्मणांच्या जुलमाचे चित्र रंगविताना ते अतिरंजित न करण्याची खबरदारी त्यांनी घेणे जरूर आहे.

आपला,
**यशवंत नरसिंह केळकर**

आंबेडकरांचे केळकरांना उत्तर

रा. रा. केसरीकर्ते यास–

वि. वि. आपल्या तारीख ५ जून १९३६ च्या अंकात श्री. यशवंत नरसिंह केळकर यांचे एक पत्र छापण्यात आले आहे. त्यात पेशवाईच्या अमलात अस्पृश्यांच्या गळ्यात थुंकण्याकरिता मडकी बांधली जात असत वगैरे जी विधाने मी माझ्या जातपात तोडक मंडळाच्या परिषदेकरिता तयार केलेल्या भाषणामध्ये केलेली आहेत त्यांना आधार दाखवा, असा प्रश्न त्यांनी मला केला आहे. वृत्तपत्रातील टीकेला उत्तर देण्याचा माझा शिरस्ता नाही. व त्याप्रमाणे या पत्रालाही उत्तर देण्याची माझी इच्छा नव्हती. परंतु परवा माटे मास्तरांनी जी माझ्या भाषणावर तीन व्याख्याने दिली त्यांत त्या पत्राचा उल्लेख करून त्याला मी उत्तर देऊ शकलो नाही असे सखेदाश्चर्य विधान केलेले माझ्या पहाण्यात आले. आधार नाही म्हणून उत्तर नाही असा कदाचित् माटे मास्तरांप्रमाणे इतर लोकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून उत्तर देणे आवश्यक आहे असा काही मित्रांचा

आग्रह असल्यामुळे मी रा. केळकर यांच्या पत्राला उत्तर देत आहे.

पेशव्यांच्या काळात हातात काळा दोरा, गळ्यात मडके व कंबरेला कुंचा वागवण्याची अस्पृश्य लोकांवर सक्ती केली जात असे ही कथा अस्पृश्य लोकांमध्ये कितीतरी दिवसांपासून प्रसृत झालेली आहे. ' यत्र धूमस्तत्र वन्हिः ' या न्यायाने पाहता ही जी दंतकथा सर्व अस्पृश्य लोकांत पसरलेली आहे व जिचा अनुवाद (उल्लेख) अस्पृश्य लोकांतील वयोवृद्ध लोकांनी केलेला मी स्वतः ऐकला आहे त्या दंतकथेला सत्याचा आधार काहीच नसेल असे मला तरी निदान म्हणता येणार नाही. दंतकथा ही इतिहासाच्या अनेक साधनांपैकी एक साधन आहे असे सर्व इतिहासज्ञ मान्य करतात, ही गोष्ट रा. केळकर यांना नाकबूल करता यावयाची नाही. सर्वच गोष्टीला इतिहासाचा पुरावा देणे शक्य होणार नाही. निदान हिंदुस्थानात तरी ते अशक्य आहे. हिंदुस्थानातील लोकांना घडलेल्या गोष्टींची नोंद करून ठेवण्याची सवय नाही आणि म्हणून बऱ्याचशा घडलेल्या गोष्टी घडल्या असल्या तरी त्याला लेखी पुरावा देता येत नाही. शिवाय हल्ली जे इतिहाससंधशोक आहेत ते सर्वच सद सद्‌विवेक बुद्धीला जागून खरा इतिहास बाहेर पाडतील अशी फारशी आशा मला तरी वाटत नाही. आपल्या जातीचा इतिहास उज्ज्वल राहावा या हेतूने पुष्कळ इतिहाससंशोधकांनी हिंदुसमाजातील अंतर-व्यवस्थेवर प्रकाश पाडणाऱ्या काही महत्त्वाच्या कागदपत्रांची जाळपोळ केल्याचे मी ऐकले आहे.

तसेच काही जणांनी आपल्याजवळ असलेले कागदपत्र प्रसिद्ध करण्यास तयार नसल्याचेही मी ऐकले आहे, पुण्यात पेशवाईत काही सोनार लोकांनी आपण दैवज्ञ ब्राह्मण आहोत असा आग्रह धरून आपली धर्मकृत्ये वेदोक्त रीतीने केली. ही गोष्ट पेशव्यांना कळल्यानंतर त्यांनी ज्या दैवज्ञ ब्राह्मणांनी वेदोक्त रीतीने धर्मकृत्ये केली त्यांच्या जिभा कापण्याचा हुकूम केला व ही सजा अमलात आणण्याचा अधिकार कराड येथील ब्राह्मणांवर सोपविला. या हुकुमान्वये कराड येथील ब्राह्मणांनी दैवज्ञ ब्राह्मणांच्या जिभा कापल्या व त्याप्रमाणे पेशव्यांना कळविले. या प्रकरणाचे कागदपत्र एका ब्राह्मणाजवळ असल्याचे व आपण वाचल्याचे मला माझ्या एका मित्राकडून कळले आहे. परंतु ज्याच्याजवळ ते कागद आहेत तो गृहस्थ ते प्रसिद्ध करण्यास तयार नाही. अशा परिस्थितीत प्रत्यक्ष कागदपत्राचा पुरावा कोणास कसा देता येईल ? व मला जर माझ्या विधानांना प्रत्यक्ष कागदपत्रांचा पुरावा देता आला नाही तर त्यात नवल काय ? तथापि

माझ्या विधानाच्या समर्थनार्थ मला जरी प्रत्यक्ष पुरावा देता आला नाही तरी एका मोठ्या सन्माननीय विद्वान व्यक्तीचा हवाला देता येण्यासारखा आहे. रा. यशवंत नरसिंह केळकर यांनी ' मराठ्यांच्या संबंधाने उद्‌गार ' या कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या पान १८० वर नजर फेकली तर मी केलेली विधाने काही भरमसाट लिहिण्याच्या हेतूने केलेली नसून त्यांना कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांचा आधार आहे असे दिसून येईल.

राजगृह, मुंबई.
६–७–३६

आपला,
**भीमराव रा. आंबेडकर**

सामाजिक, धार्मिक व राजकीय वर्चस्व आपल्या हातांत राहावे म्हणून ब्राह्मण व क्षत्रिय यांचे झगडे वैदिक काळापासून होत आलेले आहेत. क्षत्रियांना व त्यांना उचलून धरणाऱ्या इतर वर्गांना नामोहरम करण्यासाठी ब्राह्मणांनी अनेक तऱ्हेचे धार्मिक ग्रंथ लिहिले व त्यांत ब्राह्मणांना परमेश्वरापेक्षाही श्रेष्ठ व इतरांना कनिष्ठ स्थान दिले. या धार्मिक ग्रंथांना जे मानणार नाहीत त्यांच्या मागच्या व पुढच्या पिढ्या नरकवासात राहतील, ही भीती समाजात याच धार्मिक ग्रंथानी ( अर्थात् ब्राह्मणांच्या तोंडाने ) प्रसृत केली व ती भीती आजतागायत हिंदुसमाजातील बहुजन समाजात रूढ झालेली आहे.

ब्राह्मणांचे वर्चस्व हिंदुसमाजात प्रस्थापित झाल्यानंतर हिंदुसमाजातील हजारो जातींच्या अज्ञानावर यथेच्छ चैन करण्याची बुद्धी ब्राह्मणांना झाली; या चैनी अप्रतिहपणे चालू ठेवण्यास त्यांनी अनेक धार्मिक पंथ स्थापन केले व त्या त्या पंथाला श्रेष्ठत्व प्राप्त करून देण्यासाठी अनेक धर्मग्रंथ संस्कृतमध्ये लिहिले. या पंथांपैकी शाक्त हा एक पंथ आहे. या शाक्त पंथाची उत्पत्ती कशी झाली, याची हकिकत शंकर पार्वतीला सांगतो असे शाक्त पंथाच्या धार्मिक ग्रंथात लिहिलेले आहे. हा पंथ शंकरानेच निर्माण केला व तो सर्वोत्तम धार्मिक पंथ होय, अशी माहिती शंकर पार्वतीला देतो. तो म्हणतो की या पंथाची पाच मकार प्रिय तत्त्वे आहेत. ती मद्य, मांस, मीन, मुद्रा व मैथुन. त्यांची तीर्थे व त्यांची फळे याबद्दल माहिती अशी– 'वारांगना प्रयागश्च रजकी पुष्करस्तथा । चर्मकारी भवेत्काशी सर्वतीर्थं रजस्वला ।। (वेश्येशी संभोग केला तर प्रयाग तीर्थाचे पुण्य प्राप्त होते, परटिणीशी संभोग केला तर पुष्करतीर्थाचे पुण्य लाभते, चांभारिणीशी संभोग केला तर काशीयात्रेचे पुण्य लाभते आणि रजस्वलेशी संभोग केला तर जगन्नाथ पुरीसारख्या सर्व तीर्थांचे पुण्य पदरी पडते). ज्या ब्राह्मणांची बुद्धी केवळ स्वार्थासाठी

इतक्या हीन दर्जाला गेलेली होती तिने ब्राह्मणेत्तर जातींना अनेक रीतीने छळले याचे अनेक पुरावे इतिहासात मिळतात.

ब्राह्मणांनी मराठे, प्रभू, सोनार व ब्राह्मण पोटजातींतील लोकांना कसे छळले याचा साधार इतिहास श्री. के. सी. ठाकरे यांनी 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास, या ग्रंथात (प्रसिद्धिकाळ १९१९) दिलेला आहे. या ग्रंथावरून खालील गोष्टी दिसून येतात.

(१) चांद्रसेनीय कायस्थांना धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचा अधिकार नाही, असा वाद एका ब्राह्मणाने शालिवाहन शकापूर्वी ६५६ वर्षे उत्पन्न केला. त्यावेळच्या जगद्गुरूंनी सदर ब्राह्मणाची समजूत काढण्याचे प्रयत्न केले; पण पालथ्या घड्यावर पाणी! कायस्थांचे वेदोक्त विधी करणाऱ्या ब्राह्मणांना वाळीत टाकले होते. जगद्गुरूंनी त्यांना आपल्या पंक्तीत बसविले व वाळीत काढून टाकले.

(२) हैदराबाद संस्थानातील औरंगाबाद प्रांतात, परभणी परगण्यात, गोदावरीच्या काठी आंबेजोगाई म्हणून गाव आहे. तेथील प्रभूंना वेदोक्ताचा अधिकार नाही, असा तेथील ब्राह्मणांनी वाद उपस्थित केला. हा वाद शके १३९१ (इ. स. १४६९) मध्ये चालू होता. शेवटी काशीतील श्रीपाद गुरू गोविंद भट्ट यांनी निर्णय दिला की प्रभू हे चांद्रसेनीय कायस्थ क्षत्रिय वंशाचे असून त्यांना त्रिविध कर्मे, षोडश संस्कार, वेदाधिकार आहेत. सदर विद्वानाने याबद्दल एक ग्रंथही निर्माण करून दिला. त्याचे नाव 'गोविंद भट्टी'

(३) जुन्नरच्या प्रभूंना मौंजीबंधनादी संस्कार करण्याचा अधिकार नाही असा प्रश्न ब्राह्मणांनी शके १५८५ (इ. स. १६६३) मध्ये उत्पन्न केला. या वादाच्या-वेळी काशीतील कमळाकर भट्टजी याने 'शूद्र कमळाकर' हा ग्रंथ लिहून त्यात प्रभू लोकांच्या जन्माची उत्पत्ती दिली आहे. हा वाद विजापूरच्या मुसलमान सुभेदाराकडे गेला व त्याने असा निकाल दिला की, प्रभू हे क्षत्रिय आहेत व त्यांना वेदोक्ताचे व गायत्री मंत्र म्हणण्याचे अधिकार आहेत.

(४) श्री शिवाजी महाराज कुळाने आपल्या तोडीचे नाहीत असे त्यांचेच सरदार मोहिते, निंबाळकर, सावंत, घोरपडे वेळोवेळी बोलून दाखवीत. महाराजांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचे जेव्हा ठरविले तेव्हा त्यांच्याच पंत अमात्य मोरोपंत

पिंगळे व निळो सोनदेव आणि रघुनाथपंत या ब्राह्मणांनी असा प्रश्न उपस्थित केला की, जोपर्यंत महाराजांचे कुल **क्षत्रिय** आहे असा पुरावा मिळत नाही. तोपर्यन्त महाराजांना वेदोक्त पद्धतीने राज्याभिषेक करता येणार नाही. या मुद्यावर ब्राह्मण लोक एका पक्षाला उभे राहिले व हा वाद फार दिवस चालला. शेवटी गागाभट्ट या पंडिताला काशीहून आणले. महाराज हे शूद्र आहेत, असा त्याने निवाडा दिला व नंतर भरपूर दक्षिणा मिळाल्यावर महाराज हे क्षत्रिय आहेत, असा त्याने दुसरा निवाडा दिला. महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी उदेपूर घराण्यातील वंशावळ आणून तिच्याशी भोसल्यांच्या वंशाचा संबंध आहे, कअसे सिद्ध केलेले होते. तरी ब्राह्मण व गागाभट्ट ते मान्य करावयास तयार नव्हते त्यांना गडगंज दक्षिणा मिळाल्यावर ते महाराजांना क्षत्रिय म्हणण्यास तयार झाले. हे रायगड ग्रामण्य शके १५९१ (इ. स. १६६९) मध्ये झाले. गागाभट्टाने बाळाजी चिटणिसाच्या मुलाची मुंज वैदिपद्धती ने केली.

(५) कल्याण प्रांतातील प्रभूंना वेदाधिकार नाही, असे ग्रामण्य ब्राह्मणांनी शके १५९३ (इ. स. १६७१) मध्ये उपस्थित केले. परंतु शिवाजी महाराजांनी रघुनाथ पंडित अमात्य यांना पत्र पाठविण्यास लावून सदर ग्रामण्य मिटविले. या वेळी कटू अनुभवान्ती महाराजांनी ब्राह्मणांचा नंगानाच चालू न देण्याचे धोरण स्वीकारले.

(६) छत्रपती शाहू महाराजांची शेवटी शेवटी प्रकृती नीट रहात नसल्यामुळे त्यांनी सर्व राज्यकारभार जिवाजी खंडेराव चिटणीस व गोविंद खंडेराव चिटणीस या दोघां प्रभूकडे सोपविला. यमाजी शिवदेव मुतालिक निसबत प्रति–निधी हे ब्राह्मण गृहस्थ या दोघा प्रभूंना उठवून राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेण्याची धडपड करीत होते. पण त्यांचे काही चालेना; तेव्हा ते मूळचे पढिक शास्त्री असल्यामुळे त्यांनी एक संस्कृत ग्रंथ तयार केला व त्यात प्रभूंना वेदोक्त अधिकार नाही, असे माहुलीच्या ब्राह्मणांना ग्रामण्य करावयास उभे केले. राज्यकारभारी मंडळात दोन तट पडले. नानासाहेब पेशवे व शाहूमहाराज यांनी यमाजीपंताची समजूत काढण्याचे प्रयत्न केले; पण व्यर्थ ! शेवटी शाहू महा–राजांनी एक वटहुकूम काढून ब्राह्मणांना ताकीद दिली की प्रभू हे क्षत्रिय आहेत, असे पूर्वी निकाल झालेले आहेत व त्यांच्या वेदोक्त विधींना ब्राह्मणांनी अडथळा आणला तर ते दंडास पात्र होतील. हे यमाजी शिवदेव ग्रामण्य नंतर मिटले. (शके १६६९, इ. स. १७४७)

७) सदाशिव चिमणाजी उर्फ भाऊसाहेब यांनी प्रभू लोकांचे राज्यकारभारातील व लष्करातील प्रस्थ नष्ट करण्याकरता ग्रामण्ये सुरू केली व प्रभूंच्या घरी विधी करणाऱ्या ब्राह्मणांना जबर दंड केले. ' पानपतच्या स्वारीवर निघताना सदाशिवराव भाऊंनी सखाराम हरीस दम भरून सांगितले " ठीक आहे, हिंदुस्थानातून परत आल्यावर पाहून घेईन. साऱ्या कायस्थांची डोचकी मेखसूखाली फोडून टाकीन. याद राखून ठेवा ! " यावर सखाराम हरीने एवढेच उत्तर दिले, " हिंदुस्थानातून श्रीमंतांनी आधी सुखरूप परत यावे मग आमची डोचकी आणि आपले मेखसू आहेच ' ( पा. ३३, ३४ ) भाऊसाहेब हे पानपतला गेल्यानंतर त्यांची ग्रामण्याची चळवळ थंडावली. ( शके १६८१, इ. स. १७५९ ).

८) नारायणराव पेशवे यांनी प्रभूंच्या विरुद्ध शके १६९५ ( इ. स. १७७३ ) साली ग्रामण्य उभारले व न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांनीही त्या चळवळीला टेकू दिला. नारायणरावांनी नऊ कलमी यादी तयार केली व तीवर प्रमुख प्रभू लोकांना सह्या करावयास भाग पाडले. आम्ही वैदिक मंत्र म्हणणार नाही, शालिग्राम पूजा करणार नाही, शूद्राच्या देवास जाऊ, ब्राह्मणांना हलक्या कामावर घरी नोकरीस ठेवणार नाही आणि विधवांचे पाट लावू अशी कलमे त्या यादीत होती.

९) बाळाजी जनार्दन फडणीस उर्फ नाना फडणवीस यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, नारायणरावांनी जी यादी प्रसिद्ध केली तीत काही फेरफार करावा की काय? हा प्रश्न निर्णयासाठी काशीस पाठविला. नानांनी साताराच्या राजघराण्यातील विधी वेदोक्त पद्धतीने होत ते बंद केले व पुराणोक्त विधी चालू केले. ब्राह्मण व प्रभू यांच्या ठिकठिकाणी व पुण्यात मारामाऱ्या झाल्या. शेवटी नाना फडणीसाच्या त्रासामुळे सवाई माधवरावाने आत्महत्या केली व दुसरा बाजीराव गादीवर आला. त्याने नारायणरावाच्या यादीचा पुरस्कार केला व जाहीरनामा प्रसिद्ध केला.

१०) चिंतामणराव पटवर्धन, नीळकंठशास्त्री थत्ते व बाळाजीपंत नातू यांनी साताऱ्चा शेवटचा छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या कारकीर्दीत प्रभू विरुद्ध ग्रामण्ये उभारून शके १७४९ (इ. स. १८२७) साली एक २३ कलमी यादी प्रसिद्ध केली. एकेरी धोतर नेसू नये, दुहेरी धोतर नेसावे, ब्राह्मणांसारखे आसन घालून बसू नये, सोवळे नेसू नये, उभे आडवे गंध लावू नये, फक्त टिळा लावावा, ब्राह्मणास दीर्घ दंडवत घालावा, इत्यादी कलमे त्या यादीत होती.

११) १९०४ साली श्री शंकराचार्य ( सकेश्वर ) महाडला आले. तेव्हा प्रभू समाजातर्फे श्रींची पाद्यपूजा करण्याचे ठरले. श्री. द्वारकानाथ गणेश देखमुख, वकील यांच्या घरी पाद्यपूजा करण्याचे ठरले " आपली पाद्यपूजा जर पुराणोक्त होत असेल तरच आपण येतो, " असे श्रींनी देशमुखास सांगितले. याबद्दल प्रभूंनी जाहीर सभा घेतली व तीत या गोष्टीचा खल केला. प्रभूंना वेदोक्त अधिकार असता शंकराचार्य पुराणोक्ताचा का हट्ट धरतात? शंकराचार्यांच्या या वर्तनावर सुधारक ( फाल्गुन शु. ६ शके १८२५ व ९-५-१९०४ सुबोध पत्रिका (२८-२-१९०४, २७-३-१९०४) या पत्रांत चर्चा झाली; शेवटी शंकराचार्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की श्रींचा महाडास मुक्काम असताना तेथील ब्राह्मणांनी असा गिल्ला केला की प्रभूंकडे श्रींनी पुराणोक्त पाद्यपूजा घ्यावी, आणि श्रींजवळ दप्तर नसल्यामुळे प्रभूंचे वेदाधिकार श्रींना कळले नाहीत. प्रभूंना ते अधिकार आहेत, असा श्रींनी निर्णय दिला.

१२) दुसऱ्या बाजीरावाने पांचाल ( दैवज्ञ ) ब्राह्मण ( सोनार ) यांच्याविरुद्ध हुकूम काढून त्यांची वैदिक कर्मे बंद केली व त्यांची कामे चित्पावन ब्राह्मणांना सनदा करून दिली.

१३) शके १७१७ भाद्रपद वद्य नवमीच्या दिवशी पुण्याच्या सर्व प्रमुख सोनारांच्या घरांवर हल्ले करून त्यांना नाना फडणिसाने कैद करविले व कैदखान्यात हातांपायांत बेड्या ठोकून डांबून टाकले. ज्या कैद्यांनी नानांच्या अटी मान्य केल्या त्यांना जामिनावर मोकळे केले. पण त्यांनी रोज सकाळी अय्याशास्त्र्याच्या घरी जाऊन त्याला नम्रपणे मुजरा ( नमस्कार नव्हे ) केला पाहिजे. नानाने गारद्यांकडून सोनारांची जानवी काढविली व त्यांना मारहाण केली. सोनारांची धोतरे फाडून त्यांचे पंचे करून त्यांना नेसावयास भाग पाडले. दैवज्ञांनी ऐतिहासिक व ग्रांथिक पुरावे गोळा करून अय्याशास्त्र्याला चीत केले. तेव्हा नाना त्यांच्यावर चिडले; शास्त्रीबुवा नानांच्या सूचनेप्रमाणे शंकराचार्यांच्या पत्रावर अगर ' शूद्रकमलाकर ' ग्रंथातील वचनावर शाईचा बोळा फिरविण्यास तयार होईना. शेवटी शास्त्रीबुवांनी संन्यास घेतला व हे ग्रामण्य मिटले.

१४) परशुराम पटवर्धन हे आपल्या विधवा मुलीचा पुनर्विवाह करण्यासाठी धर्मग्रंथांतील आधार पाहून तयार झाले होते. पण ते सोनारांना पाण्यात पहात होते. ते भिलवडीला ( सातारा ) गेले असता त्यांना एका देवळात काही ब्राह्मण अनुष्ठान करीत असलेले दिसले. चौकशी अंती त्यांना कळून आले की हे सोनार ( दैवज्ञ

ब्राह्मण ) आहेत. तेव्हा पटवर्धनांनी या दैवज्ञास मारून हैराण केले. एक जण मरणोन्मुख असता त्याला पटवर्धन पाणी पाजू लागले. तेव्हा तो म्हणाला, मी चित्पावन ब्राह्मणाच्या हातचे पाणी पिणार नाही ! पटवर्धन संतापले व त्यांनी सर्वांना ठार करविले. तेव्हा पंचक्रोशीतून चित्पावनांनीच गिल्ला केला की, पटवर्धनांच्या हातून ब्राह्मणहत्या झाली. पटवर्धनांनी सोनारांना चांगले वागविण्याचे वचन दिले.

१५) चित्पावन ब्राह्मणांच्या भीतीने दैवज्ञ ब्राह्मण आपले व्रत, विवाहादिक धार्मिक विधी, गावाच्या बाहेर वेदोक्त पद्धतीने करीत. याबद्दल पंढरपूरच्या ब्राह्मणांनी पांचाल ब्राह्मणांना कैद करवून सातारला महाराजांकडे शके १७४२ ( आश्विन ) मध्ये पाठविले. महाराजांनी १–३–१८२० रोजी सोनारांच्या तर्फे निकाल दिला.

१६) मुंबईचे सुप्रसिद्ध दैवज्ञ ब्राह्मण श्रीमंत जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट हे कृष्णेच्या स्नानाकरिता वाईस गेले असताना तेथच्या भटांनी त्यांना ' शूद्र शूद्र ' म्हणून त्यांचा उपमर्द केला व तुम्हाला कृष्णा नदीत उतरू देणार नाही असा दम भरला. नानांनी स्वतःच मंत्र म्हणून स्नानविधी यथासांग उरकला व ता. १९ डिसेंबर १८२६ रोजी साताऱ्याचे महाराज प्रतापसिंह यांजकडे फिर्याद दाखल केली. महाराजांनी या प्रकरणाची ताबडतोब चौकशी करून आरोपींना शिक्षा ठोठावल्या. नंतर मोठा दरबार भरवून महाराजांनी नाना शंकरशेटांचा मोठा गौरव केला व एक बहुमोल भरजरी शाल त्यांना नजर केली. या संबंधाने ' सातारा केस प्रकरणाच्या विलायतेतील प्रोसिडिंगात ( पृ. २७८ ) खालीलप्रमाणे उद्गार आहेत :–
' In this manner did they ( Brahmins ) annoy any other persons when in the performance of their religious rights and ceremonies enjoyed by their respective castes. '

यानंतर नाशिक येथेही नाना शंकरशेटांवर असाच प्रसंग आला. किती झाले तरी नाशिककर भटजी वाईकर भटजी पेक्षा अधिक जहाल आणि सवाई राष्ट्रीय असतात. त्यांनी नानांशी दोन हात करण्यासाठी आपल्या धाबळ्या कंबरेला कसल्या, तेव्हा नानांनाही तेथच्या कलेक्टराला चिठ्ठी पाठवून हत्यारी पोलिसांची पार्टी बोलावून आणून या गंगापुत्र ' कारट्यां ' चा बंदोबस्त करावा लागला. ( पा. १९५–९६ )

येथे इतकी विस्तृत माहिती देण्याचे कारण हेच की, ज्या ब्राह्मणांनी अनेक

मातब्बर प्रभूंना व सोनारांना परोपरीने छळले व शिवाजी महाराजांना, शाहूमहाराजांना व शेवटच्या मराठी राजाला - प्रतापसिंहाला आपल्या पुढे नाकदुऱ्या काढण्यास लावले, त्या ब्राह्मणांनी व धर्मगुरूंनी महारांना छळले नसेल, व त्यांच्या गळ्यांत मडके व कमरेस केरसुणी बांधण्यास भाग पाडले नसेल असे जे अनुमान श्री. केळकर यांनी काढले ते अनाठायी आहे हे दाखविणे होय. या बाबतीत महार व ब्राह्मण व सवर्ण हिंदू यांचे एवढे वैमनस्य का व केव्हा उत्पन्न झाले व त्यात दोष कोणाचा, महारांचा की इतरांचा असा प्रश्न श्री. केळकरांनी उत्पन्न केला असता तर जातिभेदाचे तीक्ष्णत्व कमी करण्याच्या दृष्टीने ( फारसा ऐतिहासिक पुरावा नसताही, चर्चा झाली असती. गावचा ब्राह्मण गावचे हिशेब खोटे लिहितो व महार त्याच्या चुका दाखवून त्या ब्राह्मणाची लबाडी उघड करतो, असे उल्लेख तुकाराम व एकनाथ यांच्या अभंगांत आलेले आहेत. यावरून ब्राह्मण लोक महारांना गावच्या लोकांना बगलेत मारून कोणत्या स्थितीत ठेवीत व वागवीत असतील, हे तर्काने जाणता येईल. दामाजीपंताला मदत करण्यासाठी विठोबाने महाराचे रूप घेतले होते. त्या महाराच्या वेषाचे वर्णन महिपतीच्या 'भक्तिविजयात ४० व्या अध्यायात केलेले आहे. ते असे ( ' फाटक्या चिंध्या रुक्मिणीकांत । मस्तकी बांधोनिया त्वरित । कंठी घालूनि काळे सुत । पगर कानांत घातले ।। ११० ।। कांसेसी बांधोनि लंगोटी । हाती सत्वर घेतली काठी ।। १११ ।।) दामाजीच्या काळातील महारांचा वेष म्हणजे डोकीस फाटके मुंडासे, गळ्यात काळा दोरा, कानात पितळेची बाळी, कमरेला लंगोटी, पायात फाटका जोडा व हातात काठी, दामाजीच्या व महिपतीच्या काळात व तत्पूर्वी महाराच्या गळ्यात त्याची जात दाखविणारी खूण म्हणून काळा दोरा होता, हे यावरून स्पष्ट होते. महाराच्या गळ्यात मडके व कमेरला केरसुणी ( बोराटीचा फेस ) कधी व कसे आले याबद्दल काही भरीव ऐतिहासिक पुरावा नाही. मात्र याचे उल्लेख जुन्या पिढीतील महारांच्या तोंडी ऐकावयास मिळत असत. तेव्हा हा मुद्दा फक्त तर्कानेच सिद्ध करता येईल. प्रत्यक्ष पुराव्याने नाही. मि. अलेक्झांडर रॉबर्टसन हे ' **The Mahar Flok -A study of Untouchables in Maharashtra** ' या आपल्या पुस्तकात ( १९३८ ) म्हणतात की पेशव्यांच्या घराण्यातील एका स्त्रीचा व गणपती नावाच्या एका महार तरूण शिपायाचा चोरटा संबंध होता, असा पेशव्याला संशय आला; म्हणून त्या तरुणाचा पेशव्याने शिरच्छेद केला. तेव्हा महारांना जरबेत ठेवण्यासाठी पेशव्याने महारांना गळ्यात मडके बांधणे, कमरेला झाडू बांधणे व सकाळी ९ वाजण्याचे आत व दुपारी ३ वाजल्यानंतर सार्वजनिक ठिकाणी न फिरणे इत्यादी बंधने लादली असावीत, असा तर्क केला तर तो चूक

होणार नाही. मि. रॉबर्टसन यांची ही हकिगत दंतकथेवरच आधारलेली आहे. ही दंतकथा महार समाजात पूर्वपरंपरेने चालत आलेली आहे. गणपतीचा शिरच्छेद गुलटेकडीवर करण्यात आला. त्या ठिकाणाकडे, अंगुलिनिर्देश करून, पुण्यातील जुने लोक, तरुणांना ही दंतकथा सांगत असत. या दंतकथेत सत्यांश असल्याशिवाय का महार लोक गुलटेकडीकडे ममत्वाने पहात होते ? श्री. रॉबर्टसनने या दंतकथेची विस्तृत माहिती दिलेली आहे. गणपतीचे भूत दिवसाढवळचा व स्वप्नात पेशव्याला त्रास देई व त्याला खुनाच्या व वंशखंडनाच्या धमक्या देई. तेव्हा गणपतीच्या आत्म्याची शांती करण्यासाठी पेशव्याने त्याची दगडी मूर्ती शनिवारवाडचाच्या पूर्वेकडील दरवाजावर बसविली व येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाने त्या मूर्तीला नमस्कार करावा, अशी आज्ञा केली. ही मूर्ती म्हणजे श्री गणपती दैवताची होय असे पुढे जाहीर करण्यात आले. हा पेशवा कोणता व गणपतीची प्रेयसी कोण होती, याचा दंतकथेतही उलगडा नाही. परंतु महाराच्या गळचात जे मडके आले ते या गणपती महाराच्या प्रेम–प्रकरणामुळे असा मि. रॉबर्टसनने उल्लेख केलेला आहे. गुजराथेतील अनहिलवाडचातील धेडांना १०९४ ते ११४३ च्या काळात कमरेला काळविटाचे शिंग बांधावे लागे, याबद्दल बॉबे गॅझेटियर ( Vol IX, i P 378 ) यात उल्लेख केलेला आहे. यावरून महारांनाही गळचात मडके बांधावे लागत असावे, असा तर्क मि. राबर्टसनने केलेला आहे. पेशवाईच्या अखेरच्या काळात महारांच्या गळचांत मडकी होती व त्याबद्दलचे उल्लेख स्कॉटिश मिशनऱ्यांनी लिहून ठेवलेले आहेत, असेही मि. रॉबर्टसन् म्हणतात. त्याचे उद्‌गार येणे प्रमाणे :

'Und r the Anhilwada kings, 1094-1143, Dhedas used to wear a stag's horn tied to their waist. There was a time when from black cord round the neck was suspended in front a black earthen pot for use as a spittoon and from behind there trailed on the ground a branch of the wild palm to obliterate the imprint of the Mahar's feet on the dust. Tradition affirms that this condition of dress was imposed on the Mahars in Poona by a Peshwa who suspected a watchman of scandlestine relations with one of his zanana. The Scottish missionaries who first settled in Poona in the thirties of the last century recorded that the Mahars and other untouchables were not permitted to enter the Brahman quarters of that town before nine o'clock in the morning or after three o' clock in the afternoon lest their shadow fell on Brahman. The writer on the Mahar caste in the Bombay Gazetteer, published in 1884-5, says

"Their touch, even the touch of their shadow, is thought to defile, and in some outlying villages, in the early morning the Mahar as he passed the village well, may be seen crounching that his shadow may not fall on the water drawers " ( page 16 )

" A similar legend from the Mahars of Poona explains the fall of the people from the esteem of the mighty They say that it was during the Peshwa rule that they were subjected to the degrading neccssity of wearing a black cord round their neck with a spittoon slung in front and a wild palm bush trailing on the ground behind them. The occasion for this opperessive enactment by the Peshwa was as follows:- A Mahar youth named Ganapati who used to be one of the guards over the Shaniwar Palace in Poona, was fair and elegant to look on. One of the ladies of the palace carried on intrigues with him. The miscon-duct was discovered, and the Peshwa put the guard to death. The ghost of the dead man kept appearing to the prince in his dreams and would give him no peace until he made an effigy of Mahar in the form of theGod,Ganapati,and set it up at the Eastern entrance to the palace where all would do obeyance to the Mahar's name. The ghost was laid by this means; but the Peshwa extended his wrath to the whole Mahar caste, and he forbade them their entrance to his capital city at hours when their shadows might fall on men of high degree; and when they disappear they were required to have the signs of their degreadation clinging to them. (पा. ७३)

सारांश, महारांच्या गळ्यात मडके होते हे सिद्ध होते.

सवर्ण लोकांना ओळखण्यासाठी म्हणून राजाने काही चिन्हे त्यांना अंगावर धारण करावयास लावावीत अशा हिंदू धर्मातील शास्त्रांत आज्ञा आहेत. मनु-स्मृतीत याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे. तो असा

दिवा चरेयु : कार्यार्थं चिन्हिता राजशासनै : ।
अबांधवं शवं चैव निर्हरेयुरिति स्थिति : ।।

(यांनी दिवसा राजाच्या आज्ञेवरून व राजाने दिलेली चिन्हे धारण करून कामा-

करिता गावात फिरावे व अनाथ प्रेते वाहून न्यावी अशी शास्त्राज्ञा आहे. अध्याय १० श्लोक ५५), प्रत्यक्ष आपल्या घराण्यातील स्त्री एका महारावर फिदा झाली हे कळल्यानंतर आणि अशा अपराध्याला शिक्षा करण्याची धर्माची आज्ञा असल्यावर राजकर्ते ब्राह्मण पेशवे यांनी महार जातीच्या गळ्यात मडके बांधले, हे म्हणणे फारसे अतार्किक वाटणार नाही.

पेशवाईच्या काळात अस्पृश्यांवर इतकी कडक बंधने असताना सवर्ण वर्गातील स्त्री अस्पृश्य वर्गातील पुरुषावर अनुरक्त होऊन त्याच्याशी पत्नी या नात्याने रहाणे शक्य नव्हते असे कोणाला वाटेल. पण त्यांचे वाटणे अस्थानी होय. पेशवाईच्या उतरत्या काळात हैबती घाडगे (जन्म १७९४, मृत्यु १८५४) या नावाचा एक प्रसिद्ध शाहीर होऊन गेला. त्याचे पूर्वज डिसकळ, तालुका खटाव, जिल्हा सातारा, या गावचे. पुढे ते पुसेगावला स्थायिक झाले. हैबतीची मुलगी पुसेगावच्या मातंग तरुणाबरोबर पळून गेली. ही हकिकत श्री. वि. कृ. जोशी आणि श्री. द दि. परचुरे यांनी 'शाहीर हैबती' या १९५६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत (पा. ३०) सांगितलेली आहे. उघडकीस न आलेली अशी शेकडो उदाहरणे ऐतिहासिक काळात घडली असतील. उघडकीस आलेल्या प्रकरणांची नोंद कागदोपत्री होणे, हे त्रिकाळ अशक्य. सारांश, तारुण्य, शौर्य, सौंदर्य ही ज्यांच्या अंगी आहेत ती माणसे परस्परांकडे आकर्षित होणे हा निसर्गाचा नियम आहे. जातिबंधने ही कृत्रिम होत व ती मानवी मनावर ताबा चालवू शकत नाहीत.

## प्रकरण १३ वे

# इतर चळवळी

## इतर हिंदूंचे विचार

रमाबाईंच्या मृत्यूनंतर घरातील दुःखी वातावरण बरेच दिवस टिकले. त्याचे कारण यशवंताचा संधिवाताचा आजार! तो १९३५ च्या ऑगस्टपासून अंथरुणाला खिळून होता. ऑक्टोबरच्या अखेरीस त्याची प्रकृती फारच खालावली. ८ नोव्हेंबरला त्याच्या प्रकृतीबद्दल सर्वांना चिंता वाटू लागली. त्याची सारी उठाठेव, मुकुंदची आई लक्ष्मीबाई व शंकरमामा हे करीत होते. बाबासाहेबांच्या कानावर यशवंताच्या आजाराची बातमी दररोज जात असे. वाचन, लेखन, सभादी आपली कामे उरकून त्यांना जो वेळ मिळे त्यात ते स्वतः वरच्या मजल्यावरून खाली येऊन यशवंताला पाहून जात. औषधपाण्याची व्यवस्था शंकरमामा करीत असत. १९ नोव्हेंबरपासून यशवंताच्या प्रकृतीत सुधारणा दिसू लागली. तेव्हा एका वैद्याच्या सांगण्यावरून त्याला आयुर्वेदिक उपचारासाठी त्रिवेंद्रम्‌जवळच्या एका खेड्यात पाठविण्याचे ठरले. २७ नोव्हेंबरला शंकरमामा यशवंताला घेऊन बोटीने त्रिवेंद्रमला गेले. तेथे दीड महिना औषधोपचार केल्यावर ते दोघे मुंबईला १९३६ च्या जानेवारीत परतले. यशवंताच्या प्रकृतीत बरीच सुधारणा झालेली पाहून साहेबांना आनंद झाला. त्यानंतर यशवंताला संधिवाताने पूर्वीसारखा त्रास दिला नाही. घरचे वातावरण दुःखी व निराशाजनक होते तर बाहेर समाजात धर्मांतराच्या ज्वलंत प्रश्नावर अनुकूल-प्रतिकूल टीकालेखनाचा व सभांचा भडिमार चालला होता.

धर्मांतराच्या ज्वलंत चळवळीसंबंधी काही हिंदूंनी आपले विचार प्रगट केले होते, त्यांतील काही मी पुढे देत आहे.

'डॉ. आंबेडकर यास अनावृत पत्र' या मथळयाखाली डॉ. वा. का किर्लोस्कर एल्. एम्. एस्, यांचे पत्र किर्लोस्कर मासिकाच्या जानेवारी १९३६ च्या अंकात प्रसिद्ध झाले होते. त्यांनी आंबेडकरांना असा सल्ला दिला की, डॉक्टरसाहेब, आपल्यास सांगण्याची मुद्याची गोष्ट एवढीच को, हरिजनांचा उद्धार ही ऐहिक बाब असून केवळ धर्माची कास धरून हा प्रश्न सोडवता येण्याजोगा नाही. इतकेच नव्हे, तर सध्या प्रचलित असलेल्या कोणत्याही धर्माची कास धरण्यात कोणते धोके आहेत, ते आपल्या नजरेस आणावे. सध्या आपणांस आपापल्या धर्मात ओढण्याचा अनेक धर्मियांचा खटाटोप चालू आहे. त्यात या लोकांचा मतलब काय आहे हे पक्के ओळखून ठेवले पाहिजे. असे करण्यात हरिजनांचे कल्याण करणे हा प्रधान हेतू या लोकांचा नसून आपल्या धर्माचे बल वृद्धिगत करून धर्माच्या नावाखाली चाललेल्या लुबाडणुकीचे क्षेत्र विस्तृत करणे हाच आहे. तसे नसते तर आज हजारो वर्षे हरिजनांची कुचंबणा चालू असताना ती दूर करण्याकरता काडीच्याही हातभार लावला नाही; व आताच एकाएकी हरिजनांच्या उद्धाराचा पुळका त्यास का आला आहे' – – – '

डॉ. आंबेडकर यांना आम्ही खालील काही मंडळींनी पत्र पाठविले, पण त्याला एक दोन ओळींचेही उत्तर आले नाही.

येवले येथील परिषदेत आपण हिंदू धर्मत्याग करणार असे जाहीर केले होते. ते ऐकून आम्हांस अनेक कारणांनी वाईट वाटले. आपल्या भावनांची तीव्रता आम्ही जाणतो. तथापि आपण धर्मांतर केल्याने हिंदुसमाजाचे काय, पण विशेषत: आपण ज्या समाजाचे एक पुढारी आहात त्याचे तर त्यातल्या त्यात अतिशय नुकसान होईल असे आम्हांस वाटते. आम्ही काही लोक अस्पृश्यतानिवारणासंबंधाने व मागासलेल्या जातींच्या उन्नतीसंबंधाने यथामति यथाशक्ति खटपट करतो त्याबद्दल आपणांस काय वाटत असेल ते वाटो. तथापि ही इष्ट सुधारणा लवकरच बऱ्याच प्रमाणात घडून येईल अशी आम्हांला आशा वाटते. कार्य मोठे आहे, त्या मानाने अद्यापि जागृती कमी आहे. परंतु ते कार्य घडून येण्याविषयी सुशिक्षितांतील बहुजन समाज प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे, ही गोष्ट आपणांस दिसून येत असेल. आशा वाटते की तुम्ही, आम्ही व तुमच्या आमच्या सारख्या विचारांच्या इतर लोकांनी असाच प्रयत्न करीत राहिल्यास इष्ट सिद्धि लवकरच होईल. पण ते कसेही मानले तरी आपल्या धर्मांतराने या कार्याची हानी होईल. उलट आपण करीत आहात, तसेच आणखी प्रयत्न करीत राहिल्यास या नाही तरी पुढच्या

पिढीत तरी बरेचसे दृश्यफल दिसू लागले असे आम्हांस वाटते. आपणांला योग्य वाटेल ते करण्यास आपण समर्थ आहा. परंतु एकंदर समाजाचा व या विशिष्ट प्रश्नाचा विचार करता आम्ही आपले मत आपल्या नजरेस घातले, ही गोष्ट गैर झाली, असे आपणांस वाटत असल्यास त्याची आपण क्षमा करावी.

आपले,

न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्री. म. माटे

( गतगोष्टी पा. ९५६ )

'हिंदुत्व म्हणजे काय? हिंदुराष्ट्र अशी एखादी वस्तू खरोखरीच आहे का?' या शीर्षकाखाली दे. भ. बॅ. सावरकर यांचा लेख किर्लोस्कर मासिकाच्या डिसेंबर १९३५ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यांत त्यांनी हिंदुत्वाची चर्चा करताना खालील उद्‌गार काढलेले होते, 'पगडीच्या डोकीत, जानव्याच्या दोऱ्यात गाईच्या मूत्रात, ते हिंदुत्व सामावलेले नाही. हिंदुत्व ही काही कोण्या ठिसूळ ताडपत्रावर लिहिलेली पोथी नाही, की ताडपत्र तडकताच ती चुरून जावी. एका कागदावर लिहिलेली आज जन्मणारी नि उद्या मरणारी राज्यघटना नाही. हिंदुत्व हे काही कोण्या एका गोलमेज परिषदेचा ठराव नव्हे. हिंदुत्व हे एका महान जातीचे जीवन आहे. सहस्त्रावधी पुण्यात्म्यांच्या, महात्म्यांच्या, हुतात्म्यांच्या युगानुयुगाच्या प्रयत्नांचा तो परिपाक आहे. ओहोटी असली तरी तो समुद्र आहे. सुप्त असला तरी तो ज्वालामुखी आहे. बेशुद्धीच्या चक्रात, वायूच्या झटक्यात, त्या विराट राष्ट्रपुरूषाच्या हातून प्रमादही घडत आहेत; पण ती बेशुद्धी मूर्च्छेची आहे, मृत्यूची नव्हे. या हिंदुराष्ट्राच्या नी हिंदुधर्माच्या उत्कर्षास्तव हवन होण्यास आजही ज्या शतावधी हुतात्म्यांच्या शरीरांतील बिंदू न बिंदू सळसळत आहे, त्या हुतात्म्यांची ती तळमळ नि तो आत्मयज्ञ हीच त्या हिंदुराष्ट्राची अक्षुण्ण जीवनाची साक्ष! त्याच्या उज्जीवनाची हमी!!'

'जैन हे हिंदूच आहेत' हा बॅ. सावरकरांचा लेख किर्लोस्कर मासिकाच्या फेब्रुवारी १९३६ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता.

'औंध संस्थानातील अस्पृश्यतानिवारण' या मथळ्या खाली श्री. द. ग. कुलकर्णी, एम. ए. एल्.एल्. बी. यांचा लेख, किर्लोस्कर मासिकाच्या जानेवारी १९३६ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. संस्थानाधिपती श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनी संस्थानातील अस्पृश्यांची प्रगती व्हावी म्हणून १९१० पासून

कोणते प्रयत्न केले, याची माहिती सदर लेखात दिलेली आहे. संस्थानात अस्पृश्यता-निवारणाबद्दल लोकमत तयार होत होते व १९२० च्या नंतर अस्पृश्यता पाळू नये असे तरुण पिढीचे मत बनलेले होते. पण त्या पिढीला जुन्या पिढीपुढे मान तुकवावी लागे, याचे एक उदाहरण सदर लेखकाने आपल्या लेखांत दिलेले आहे व त्यात बहुतेक पहिलाच महाराचा विद्यार्थी असणाऱ्या माझा उल्लेख आहे. ' – – – – एका खोलीत बसणाऱ्या अस्पृश्याच्या मुलास कळत वा न कळत स्पर्श झाला, तरी शाळेतील शिक्षक अगर विद्यार्थी कधी स्नान करून किंवा सवडीप्रमाणे केवळ गोमूत्रानेच परिमार्जन करून आपल्या शिवण्याचा विटाळ गेल्याची मनाची वेडी समजूत करीत होता. या बाबतीत, मी येथील हायस्कुलात असताना घडलेला एक प्रकारही मला चांगलाच एक प्रकारही मला चांगलाच आठवतो. त्या वेळी आमच्या हायस्कूलात चां. भ. खैरमोडे नावाचा एक महाराचा विद्यार्थी होता. तो होता मोठा चुणचुणीत. इतकेच नव्हे तर, तो कविताही चांगल्या करीत असे. मलाही पद्यरचनेचा लहानपणापासून नाद असल्यामुळे त्याचे माझे सूत अल्पावधीतच जमले. हायस्कुलातून अस्पृश्यतेने काळे केले होते. त्यामुळे आम्ही नेहमी एकाच बाकावर बसून प्रसंगी हातघाईवरही येत असू. एक दिवस अगदी अजाणतेपणे मी व तो अस्पृश्य विद्यार्थी असे दोघेजण बाहेर पडलो ते बोलत बोलत हातात हात घालून आमच्या घरापर्यंत आलो. तेथून तो महारवाड्यात निघून गेला. अशा रीतीने येण्यात माझ्या दृष्टीला नावीन्य काहीच नसल्यामुळे आपण आज काही भयंकर सामाजिक गुन्हा केला आहे, अशी मला जाणीवही नव्हती. व नित्याप्रमाणे नंतर मी फिरावयास गेलो. पण ही आमची दुक्कल हातात हात घालून येताना एका धर्ममार्तंडाने पाहिली होती. त्याने चटकन् घरी जाऊन चुगली केली व मी फिरून आल्यावर डोक्यावरील टोपीपासून तो पायांतील वहाणेपर्यंत रात्री आठ वाजता गार पाण्याने मला सचैल स्नान करावे लागले." सांगण्याची मुख्य गोष्ट हीच की, अस्पृश्यांचे सहशिक्षण जरी सुरू झाले होते, तरी त्यावेळी सहस्पर्शाला खेडोपाडी मज्जाव होता व औंध-सारख्या प्रगतिपर विचारांच्या राजधानीच्या ठिकाणी जरी शाळांतून विद्यार्थ्यांचा सहवास सुरू होता तरी पोरास दोन अक्षरे यावीत या गोष्टीकडे लक्ष देऊन पुराणप्रिय स्पृश्य वर्ग डोळ्यांवर कातडे ओढून ती गोष्ट सहन करीत होता. परंतु ती गोष्ट तितकीशी त्यांना मानवलेली दिसत नव्हती. ( पा. ५०० )

उच्चांकांची साथ – ( A Recod Epedimic) या शीर्षकाखाली दे. भ. बॅ. सावरकर यांचा लेख किर्लोस्कर मासिकाच्या जानेवारी १९३६ च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे. अंधश्रद्धाळू हिंदूच्या धार्मिक भावनांना चेतवून त्यांच्यावर

अलौकिक धर्ममते व धर्मकृत्ये लादण्याची जी साथ हिंदुसमाजात सुरू झालेली आहे तीवर लेखकाने तर्कप्रधान व भावनाविवश होऊन सदर ढोंगी लोकांना टीकेचे फटकारे दिलेले आहेत. विशेषत: अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या चळवळीत ज्या पुढाऱ्यांनी आपल्या हीन मनोवृत्तीचे हिडीस प्रदर्शन केले त्याबद्दल लेखकाने व्याजोक्तिपूर्ण शब्दांनी त्यांचा निषेध केला आहे. या पुढाऱ्यांपैकी श्री. बा. जा. देवरुखकर हे एक होते. त्यांच्याबद्दल पुढील उल्लेख पहा –

' त्यांनी मुंबईस एका व्याख्यानात सांगितले की " हिंदुधर्मास मी सोडणार. मुसलमानी, ख्रिस्ती व कोणचाही दुसरा धर्म स्वीकारण्याच्या आधी मी हे पाहीन की, त्या धर्मात गेल्याने आम्हांस आज मिळाले आहे त्याहून शेकडा अधिक प्रतिनिधत्व, शेकडा अधिक मते, विधिमंडळात मिळतात की नाही. ज्या धर्मामुळे विधिमंडळांत अधिक मतदारी आम्हांस मिळेल, तो धर्म मी स्वीकारणार " म्हणजे देवरुखकरास जो शेकडा अधिक मतदारी देईल तो धर्म – तो स्वीकारणीय धर्म– खरा धर्म – – – – तुझा धर्म किती पैशा पासरी बोल, असे मत आता रोखठोक विचारता येते ! खरा धर्म कोणचा? तर देवरुखकरांस शेकडा अधिक मतदारी देईल तो! अधिकात अधिक शेकडा मतदारी बौद्ध होऊन मिळेल तर बौद्ध धर्म खरा, ख्रिश्चन होऊन मिळेल तर ख्रिश्चन धर्म खरा, मुसलमान होऊन मतदारी शेकडा अधिक मिळेल तर मुसलमानी धर्म खरा ! ! ! बघू या आता देवरुखकर महाशयांनी पुकारलेल्या लिलावात कोण अधिक बोलतो ते. बुद्ध की जीजस की महमंद !' ( पा. ४६४ )

पंडित श्रीधर दामोदर सातवळेकर यांनी आपल्या ' पुरुषार्थ ' मासिकात खालील विचार प्रदर्शित केले.

## ' डॉ. आंबेडकरांचे कर्तव्य '

डॉ. आंबेडकर यांनी " धर्मांतर करतो " असे जाहीर सभेत सांगितल्यामुळे या विधानाकडे पुष्कळ लोकांचे लक्ष गेलेले आहे. म्हणून या संबंधाने दोन शब्द लिहिणे आवश्यक होत आहे. या धर्मांतराचा विचार करताना पुढील बाबींचा विचार होणे अगत्याचे आहे.

१) डॉ. आंबेडकरांना जे महत्त्व आलेले आहे ते यांच्या विद्वत्तेमुळे, बुद्धिवैभवामुळे किंवा कोणत्याही अन्य शक्तीमुळे नसून ते ' **महार जातीचे ( अस्पृश्य )**

आहेत. यामुळेच. महार मांग वगैरे ज्या जाती अस्पृश्य आहेत, त्या शिक्षणात अत्यंत मागासलेल्या आहेत. त्यांत डॉ. आंबेडकर विद्वान झाले म्हणून त्यास सरकारने उचलून धरले. जर ते स्पृश्य जातींपैकी ब्राह्मण असते तर त्यांस कोणीही विचारले नसते. मराठे असते तर थोडीशी किंमत आली असती; पण महार जातीत जन्मल्यामुळे जेवढी किंमत त्यांस मिळत आहे, तेवढी त्यांस इतर कोणत्याही जातीत जन्मास आल्याने मिळाली नसती. धर्मांतर करण्याच्या आधी या गोष्टीचा विचार त्यांनी व दुसऱ्यांनी करावा.

२) ज्या कारणामुळे त्यांचे महत्त्व वाढले ते **महारपण व अस्पृश्यत्व** लवकर नाहीसे झाले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे ! अर्थात् आपल्याला महत्त्व देणाऱ्या प्रमुख कारणांचाच नाश झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे ! यांच्या म्हणण्याप्रमाणे जर यक्षिणीच्या कांडीने सर्व हिंदूतील एकूण एक जाती नाहीशा झाल्या अथवा अस्पृश्यता नाहीशी झाली तर आज जे चार कोटी मागासलेल्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकरांचे महत्त्व आहे ते जाऊन ते तीस कोटी स्पृश्य हिंदूपैकी एक बनतील व दर्यामें खसखस होऊन जातील.

३) भावी हिंदवी राज्यघटनेत अस्पृश्यांना प्रमाणाबाहेर प्रतिनिधी निवडून देण्याची जी सवलत मिळालेली आहे, ती त्यांचे अस्पृश्यत्व असेपर्यंतच त्यास लाभणार आहे. जाती मोडल्या म्हणजे ती सवलत रहाणार नाही व केवळ गुणांनेच प्रतिनिधी निवडले जातील. त्यावेळी इतर अस्पृश्य प्रतिनिधी सभेत येणार नाहीतच पण स्वत: डॉ. आंबेडकरही निवडून येण्याचा संभव नाही. म्हणून नवी राज्यघटना असेपर्यंत अस्पृश्यांनी आपले अस्पृश्यत्व टिकविण्यासाठी व आपली जात कायम राहावी, म्हणून खटपट करावयास पाहिजे. व स्पृश्य जातींनी अस्पृश्यता घालविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. लाभाच्या दृष्टीने दोघांचे दृष्टिकोन असे असले पाहिजेत; कारण अस्पृश्यता टिकली तरच अस्पृश्यांचा फायदा व अस्पृश्यता गेली तरच स्पृश्य हिंदूंचा फायदा होणार हे निश्चित आहे. मग डॉ. आंबेडकर आपली हानी का करून घेत आहेत बरे ?

४) डॉ. आंबेडकर महार असेपर्यंत जे महत्त्व त्यांस हिंदी राजकारणात प्राप्त झाले आहे ते कोणत्याही पंथात त्यांनी आपला प्रवेश करून घेतला तरी टिकणार नाही; कारण इतर सर्व जातींत शिक्षितांचे अशिक्षितांशी प्रमाण महारांतील किंवा अस्पृश्यांतील प्रमाणांशी ताडून पाहता फार मोठे आहे. अशिक्षित समाजात पुढारीपण सहज मिळू शकते, तसे ते सुशिक्षित समाजात मिळणे शक्य नसते.

म्हणून त्यांनी धर्मांतर करताच त्यांचे राजकीय महत्त्व कमी झाल्याशिवाय कधीही राहणार नाही,

५) डॉ. आंबेडकर म्हणतात " मी दुर्दैवामुळे अस्पृश्यात जन्मास आलो " हा त्यांचा समज अगदीच चुकीचा आहे. डॉ. आंबेडकरांच्या आत्म्याचे पूर्वसुकृत फार मोठे असल्यामुळे त्यांस या अस्पृश्य जातीत जन्म मिळाला. सुकृत फार मोठे नसते तर ते ब्राह्मणांतच जन्माला आले असते. **चार कोटी अस्पृश्यांचा उद्धार करण्याच्या कामी देह झिजवून इतिहासात अमर होण्याची सुसंधी** सहजासहजी कोणास प्राप्त होत नसते ! जर त्यांच्या जागी दुसरा कोणी कर्मवीर पुरुषार्थी धीरगंभीर मनुष्य असता तर तो असे म्हणाला असता की " **मला चार कोटी लोकांच्या भवितव्याला वळण लावण्याचे काम करण्याची सुसंधी परमेश्वराने दिली हे माझे केवढे मोठे भाग्य आहे !** " ही परमेश्वराची मजवर कृपाच आहे. माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी आपल्या अस्पृश्य समाजाची उन्नती करण्यास झटेन व हे पवित्र कार्य करीत असता जर मला मरण आले तर उरलेले कार्य मी पुढील जन्मी करीन; पण माझ्या वाटयास आलेले कर्तव्य मी काही झाले तरी टाकणार नाही." पण डॉ. आंबेडकर काय म्हणत आहेत बरे ? 'मी दुसऱ्या पंथात जाईन व हा त्रास चुकवीन." त्रास चुकविणाराचे भाग्यच मरणाच्या पंथास लागते, हे त्यांनी विसरू नये. लोकोत्तर बनण्याची सुसंधी गमावणारा खरोखरच दुर्दैवी होय !

६) स्पृश्य लोकांत डॉक्टर ( Ph. D. ) काही थोडे नाहीत व ब्राह्मणांत तर त्यांची गर्दीच आहे. पण त्यांच्यापैकी एकासही इंग्रजी साम्राज्याचे दिवाण कवटाळीत नाहीत व त्यांपैकी कोणासही नामदारकी किंवा गोलमेजकडे जाण्याची परवानगी नाही. ती सहजासहजी डॉ. आंबेडकरास का लाभली? अस्पृश्य म्हणूनच ना ? इंग्रजी राज्य असेपर्यंत ब्राह्मण बनणे पूर्णतः व स्पृश्य हिंदू बनणे अंशतः अत्यंत नुकसानीचे होणार आहे. **अस्पृश्य बनण्याने सर्व प्रकाराचे राजकीय महत्त्व प्राप्त व्हावयाचे आहे !** हे राजकीय महत्त्व अस्पृश्यांस मिळाले असल्याने अस्पृश्यता कायम राखण्याकडे अस्पृश्यांचा कल होणे अगदी स्वाभाविक आहे. नवीन राज्यघटना सुरू झाली व तीत अस्पृश्यांचा सवता सुभा सुरू झाला म्हणजे अस्पृश्यांत समाविष्ट व्हावे असे पुष्कळच स्पृश्य जातींस वाटणार आहे. त्यावेळी असा चमत्कार दिसेल की ब्राह्मणांनी व सनातन्यांनी म्हणावे की, अस्पृश्य हे अस्पृश्य नाहीत; पण अस्पृश्यांनीच वेगळे राहून आपली अस्पृश्यता नाहीशी झालेली नाही, असे ठरविण्याचे प्रयत्न कसून करावे. यावरून कळून येईल की नवी

राज्यघटना अस्पृश्यता कायमपणें टिकविणारी आहे. हिंदुसभेकडून ते काम यापूर्वीच दूर झालेले आहे. याचा विचार डॉ. आंबेडकरांनी करावा.

७) कोणताही शाहणा पुढारी आपल्या अनुयायांची व आपल्या गटातील लोकांची संख्या कमी व्हावी, असा यत्न करणार नाही. जो असा यत्न करील त्याची गणना मूर्खात होईल. पण डॉ. आंबेडकर स्वतः अस्पृश्यांच्या गटातून निघून दुसरीकडे जात आहेत व आपल्या वजनाने आपल्या अनुयायांस दुसरीकडे नेण्याच्या प्रयत्नात आहेत. एकदा सर्व अस्पृश्य चार कोटीचे चार कोटी गटाने कोठेही गेले तरी सुद्धा त्यांचे अस्पृश्य म्हणून असलेले महत्त्वाचे स्थान त्यास लाभणार नाही. पण चार कोटी एका जमावाने कोठे जातील असे संभवनीय नाही. कारण **कोणत्याही जातींच्या चार कोटी हिंदूंचे एकमत झाले की तत्काळ त्यांना स्वराज्य मिळेल. इतकी संघटना आमच्या डोळ्यांदेखत हिंदूंच्या कोणत्याही जातींत होईल असे आज आम्हांस वाटत नाहीं**. त्यामुळे आम्हांस असे वाटते की, काही लोक डॉ. आंबेड-करांबरोबर जातील व पुष्कळसे आहेत तेथेच रहातील. याचाच परिणाम असा होईल की डॉ. आंबेडकरांचे पुढारीपण लयास जाईल व इतर अस्पृश्यांना इतका सुशिक्षित पुढारी मिळणार नाही. यामुळे अस्पृश्यांचे राजकारण सपशेल फसेल व त्याचे सर्व पाप डॉ आंबेडकरांच्या माथ्यावरच बसेल. या पापात दुसरे कोणीही भागीदार होणे शक्य नाही. आपला गट तोडून त्याची शक्ती कमी करणारा पुढारी पूर्वी झाला नाही व पुढेही होईलसे दिसत नाही. ज्याला पुढे आपले महत्त्व राहावे असे वाटत असेल तो तरी कधीही असे वर्तन करणार नाही. पण डॉ. आंबेडकर असे करीत आहेत याचेच आश्चर्य वाटते !

८) हिंदुधर्मात स्पृश्याचे अस्पृश्य बनत नाहीत. नाही तर सध्याची राजकीय घटना अशी आहे की स्पृश्यांना अस्पृश्य बनवण्याचा मोह अनावर व्हावा. असे असता व अस्पृश्यत्वाने लाभ करून दिला आहे याचा अनुभव स्वतःस आला असताही जे विद्वान ती अस्पृश्यता टाकून देण्यास तयार होत आहेत, त्याचे खरोखरच दुर्दैव ओढवले आहे, असेच म्हणणे प्राप्त आहे.

९) थोड्या शिकलेल्या अस्पृश्यांस हव्या तितक्या नोकऱ्या मिळणे शक्य आहे, पण पुष्कळ शिकलेल्या स्पृश्यांस नोकरीवरून अर्धचंद्र मिळण्याचा संभव अधिक आहे. असा सोन्याचा ठेवा अस्पृश्यांपुढे आला असता तो दूर लोटण्यारा भाग्यवान की भाग्यहीन याचा विचार डॉ. आंबेडकरांनी करावा.

२०) डॉ. आंबेडकरांनी विरोधी कार्यक्रम पुष्कळ आखला ,पण तो सर्व फसला. हिंदुसमाजामध्ये विरोधी कार्यक्रमात यश येणार नाही अशी हिंदूंची मनोरचनाच आहे, म्हणून पुढील २५ वर्षांसाठी त्यांनी उलट दिशेने प्रयत्न करावा अशी आमची त्यांस सूचना आहे. अस्पृश्यांनी असे म्हणावे– ' **आम्ही हिंदू आहोत, हिंदू-बरोबरच जाणार व हिंदूबरोबरच मरणार. हिंदूलोक आम्हांस जसे ठेवणार असतील तसे ठेवोत; पण आम्ही हिंदूची हिंदू धर्माची व हिंदू देवतांची अब्रू राखण्यासाठीच आपले सर्वस्व अर्पण करणार !** असे म्हणून वेळ प्रसंग पडताच ते आपल्या परा-क्रमाची शर्थ करतील, तर २५ वर्षांत होणारे काम ५ वर्षांत घडून येईल. सोयीने घेतले तर हिंदूंकडून हवे ते मिळेल, पण इरेस पेटाल तर सर्वस्वास मुकाल. पण वेळेवर आपल्या खुशीने फारसे काही करणारच नाही, या हटातटाच्या वेळी अस्पृश्यांस असा उपदेश करणे व त्यांनी तो ऐकणे हे अगदी अशक्य आहे; पण याचवेळी खरा उपाय सुचविणे योग्य असल्याने हा येथे लिहिला आहे. प्रगतीसाठी अनेक कार्यक्रम आखावे लागतात, तसा २५ वर्षांसाठी हा कार्यक्रम आखून पाहावा. आमच्या मताने या मार्गाने प्रगती लवकर होईल. डॉ. आंबेडकराना विरोधी उपाय सुचतात तसे हटकून कार्य घडून यावे असे अनुकूलतेचे उपाय मात्र सुचत नाहीत हे अस्पृश्यांचे दुर्दैव होय.!

२१) सातारा जिल्ह्यातील एक ब्राह्मणाने महारणीशी प्रेमसंबंध जोडला. पुढे त्यांची मैत्री सहवासात परिणत झाली. प्रेमामुळे तो ब्राह्मण त्या महारणीच्या घरी राहू, जेवू व निजू लागला. त्याने आपले घर सोडले. कारण त्यास कोणी घरी येऊ देईनात. आज या गोष्टीस १६ वर्षे झाली. तो ब्राह्मण त्या महारणीच्या घरी आहे पण कोणताही महार त्या ब्राह्मणास आपल्या पंक्तीत घेत नाही. ते म्हणतात की आमची महार जात कायम आहे, पण हा ब्राह्मण मात्र जात सोडल्यामुळे पतित झाला आहे. म्हणून **पतिताला** आम्ही आमच्या पंक्तीत घेणार नाही. यामुळे या गावात महार जातीत स्पृश्य असून हा ब्राह्मण अस्पृश्य झालेला आहे. कोणाला हा नमुना पाहावयाचा असेल तर आम्ही दाखवून देऊ. नावाचा उल्लेख मुद्दाम केला नाही. चहूकडे स्थिती अशीच असता सर्व जाती मोडल्याशिवाय मी हिंदूंत राहणार नाही, असे डॉ. आंबेडकर म्हणत आहेत म्हणून त्यांस इतकेच सांगा-वयाचे की तुम्ही ––– ती आधी अस्पृश्यांतील जातिभेद मोडा व मग सर्व जाती मोडण्याचा प्रश्न हिंदुमहासभेपुढे मांडा. खरी गोष्ट अशी आहे की, स्पृश्य लोक जाती लवकर मोडतील, पण अस्पृश्यच जाती सोडावयास तयार होणार नाहीत.

म्हणून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य राहूनच अस्पृश्यांच्या उद्धारासाठी कसून प्रयत्न करावा; त्यामुळे त्यांचे यश इतिहासात चिरस्थायी होईल व त्यांची मान्यताही वाढेल. इतकेच नव्हे तर जे अस्पृश्य दुसऱ्या पंथांत जात आहेत व गेले आहेत, त्यांसही पुन: आपल्या जातीत घेऊन आपली संख्या शक्य तितकी वाढवावी व आपला गट सुसंघटित करावा व इतके करीत असता तीस कोटी हिंदू लोकांचा पाठिंबा मिळणार आहे तो दूर सारू नये.

परमेश्वर त्यास अस्पृश्यांची खरी सुधारणा करण्याची प्रेरणा करो. (पुरुषार्थ, नोव्हेंबर, १९३५ पा. ५०१–५०३)

या लेखामुळे धर्मांतरासंबंधीच्या सर्व बाजूवर प्रकाश टाकणारे चर्चात्मक लेख व उत्तरे 'पुरुषार्थ' मासिकातून प्रसिद्ध करण्यात आली. त्यांत बाबासाहेबांचेही उत्तर होते!

# प्रकरण १४ वे

## विद्वद्वर्य डॉ. आंबेडकर यांस अनावृत पत्र

भारतबंधू श्रीयुत श्री. दा. सातवळेकर, यांस सप्रेम नमस्कार वि. वि. केसरी, ऑक्टोबर १८ मध्ये डॉ. हिंदुधर्म सोडणार आणि कोणता तरी परकीय धर्म स्वीकारून नंतर हिंदुधर्माच्या नाशार्थ प्रयत्न करणार आहेत, असे वाचनात आले. आपण ते यापूर्वीच वाचले असेल. आम्ही त्यांना केसरीमार्फत अनावृत पत्र लिहिले आहे. त्याची एक प्रत या पत्रासोबत आपले ' पुरुषार्थाकरिता ' पाठवीत आहोत. त्या पत्रात पुरुषार्थातील निबंधाचे अनेक उल्लेख आहेत. म्हणून ते पत्र पुरुषार्थातही प्रसिद्ध होणे हे आम्हांला उचित वाटले. याशिवाय हा विषय फार महत्त्वाचा असल्यामुळे या चर्चेला जितकी प्रसिद्धी मिळेल तितकी थोडीच आहे. यास्तव आपली दुसरी काही हरकत नसेल तर हे पत्र पुरुषार्थात प्रसिद्ध करावे व अन्यत्र प्रसिद्धी करवावी. आमची सूचना मान्य झाल्यास ज्या अंकात हे पत्र प्रसिद्ध होईल, त्या अंकाची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांजकडे पाठवालच; आणखी त्याशिवाय आमचे पूर्वीचे निबंध ( जुलै–नोव्हेंबर १९३४ आणि एप्रिल–ऑगस्ट १९३५ ) हे अंक त्यांच्याकडे पाठवावेत. हे पत्र प्रसिद्ध करताना त्याला संपादकीय प्रस्तावना जोडावी. हेच पत्री प्रो. गोखले यांचे नमस्कार. कळावे, लोभ असावा ही विनंती.

**स्केनेक्टेडी – न्यूयॉर्क** ता. १९–११–३५ : भारतभगिनी **सौ. उषाताई गोखले**

विद्वद्वर्य रा. रा. भी. रा. आंबेडकर यांस–

कृतानेक साष्टांग नमस्कार. पत्र लिहिण्यास कारण की केसरी ता. १८ माहे ऑक्टोबर, १९३५ चा अंक आजच मिळाला; त्यात येवल्याच्या दलितवर्गपरि–

षदेची थोडक्यात हकिकत आहे. त्या प्रसंगीच्या आपल्या भाषणातील काही अवतरणे दिलेली आहेत, त्यावरून हे पत्र लिहिण्याचे कारण पडले आहे.

पत्र खाजगी रीतीने न लिहिता वर्तमानपत्रातून अनावृत पत्राचे रूपाने लिहिण्याचे कारण, एक तर पत्रातील विषय, केवळ खाजगी नसून सामाजिक स्वरूपाचा आहे आणि दुसरे कारण असे की, खाजगी पत्राकडे लक्ष देण्याला आपणांला फावेलच असे नाही. सुमारे दोन वर्षांपूर्वी आपण अमेरिकेत आला होता. तेव्हा आमचेकडे भेटीला आणि भोजनाला आम्ही निमंत्रण केले होते. परंतु त्या निमंत्रणाकडे लक्ष देण्याला आपणाला फावले नाही. त्यावेळी निमंत्रण देण्याचे कारण असे होते की, माझ्या सहधर्मचारिणी सौ. उषाबाई गोखले यांनी अस्पृश्यतेवर एक निबंध तयार केला होता. तो निबंध कोणाला अर्पण करावा, या विचारात त्या असताना ( पुरुषार्थ, ऑगस्ट १९३५, पृ. २४ ) आपण अमेरिकेत प्रवास करीत असल्याची हकिकत माझे वाचनात आली. त्यावरून खाजगी भेटीत तो निबंध आपणाला दाखवावा आणि पसंत पडल्यास आपणांलाच अर्पण करावा असा आमचा हेतू होता. तो हेतू सिद्धीस गेला नाही, याबद्दल आम्हांस खेद वाटला.

तो निबंध नुकताच पुरुषार्थात खंडशः प्रसिद्ध झालेला आहे. ( पुरुषार्थ एप्रिल–ऑगस्ट १९३५ ) शक्य असल्यास तो निबंध वाचून त्यावर आपला अभिप्राय देण्याची कृपा करावी. हिंदुधर्म सोडून कोणता तरी परधर्म स्वीकारण्याचा निश्चय आपण केलेला आहे, असे केसरीवरून दिसते. हे खरे असेल तर, आमचा तो अस्पृश्यतेवरील निबंध आणि त्यापूर्वीचे पुरुषार्थातील दुसरे दोन निबंध वाचेपर्यंत धीर धरून धर्मांतराचा विचार लांबणीवर टाकावा, एवढी विनंती आहे. ' ख्रिस्तीधर्म आणि जातिभेद ' या विषयावरही आमचा एक निबंध प्रसिद्ध झालेला आहे. ( पुरुषार्थ जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर १९३४ ) त्या निबंधात ख्रिस्तीधर्म हा तत्त्वतः जातिभेदाच्या विरुद्ध नसून उलट उत्तेजकच आहे, असे सिद्ध केले आहे. त्या निबंधाच्या प्रती आमच्या विनंतीवरून पुरुषार्थाचे संपादकांनी अनेक ख्रिस्ती विद्वानाकडे पाठविलेल्या आहेत; परंतु त्या निबंधाचे खंडन आतापर्यंत कोणीही केलेले नाही, एवढेच नव्हे तर खंडनाचा प्रयत्न देखील केलेला नाही. यावरून आमचा सिद्धांत खराच असावा, अशी आता आम्हांला खात्री वाटू लागली आहे. यास्तव आपणाला कोणता तरी परधर्म स्वीकारावयाचाच असेल आणि तसे करण्याला हिंदुधर्मातील जातिभेद हेच एक कारण असेल तर आपण निदान ख्रिस्तीधर्म तरी

ग्रहण करू नये, अशी आमची सविनय सूचना आहे. आमचा तो निबंध वाचल्यावर आमच्या या सूचनेचे मर्म आपल्या लक्षात येईल.

आपण म्हणता " ज्या धर्मात राहिले असता अन्याय, अपमान आणि छळ–वाद सोसावा लागतो, तसला धर्म सोडून जेथे आपणांस समान दर्जा मिळेल तो धर्म आपण स्वीकारू या " आपले हे मत मला अगदी योग्य वाटते. आता प्रश्न काय तो एवढाच की, सर्वांना समान दर्जा देणारा धर्म कोणता ? हिंदुधर्मात भगवद्‌गीता हा अत्यंत श्रेष्ठ धर्मग्रंथ समजला जातो; या ग्रंथात ब्राह्मण आणि अस्पृश्य हे समान समजावे अशी भगवान् श्रीकृष्णाची शिकवण आहे.

" विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे – – – ।
– – – – श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥

The learned deem alike a Brahman of modesty and knowledge full and an outcaste Pariah.

( Bhagawadgita, V, 18 )

यापेक्षा अधिक समता कोणत्या धर्मात आहे ? तो शोध आपणांस लागला असेल तर आपण प्रसिद्ध करावा, म्हणजे आपल्या बरोबर मीही धर्मांतर करून त्या धर्मात येईन.

आपण म्हणता " आपल्या वाडवडिलांचा धर्म आपण चालविला पाहिजे, ही गोष्ट मला मान्य नाही. " माझेही मत असेच आहे. माझे वाडवडील स्मार्त धर्माचे अनुयायी होते. परंतु मी तो पंथ सोडून हल्ली कित्येक वर्षांपासून सांख्य धर्म स्वीकारला आहे. आत्मा हा एकच ' नित्य; सर्वगतः स्थाणुः' असतो, अशी सांख्य धर्माची शिकवण आहे. म्हणून त्या धर्मात उच्चनीचत्वाची शक्यता नाही. सांख्य मार्ग प्रारंभी कपिल मुनींनी स्थापन केला. परंतु त्या मतांत अनेक विद्वान ब्राह्मणांनी वेळोवेळी फेरबदल केलेला आहे. भगवद्‌गीतेतील सांख्य मत हे कपिल मूनींच्या मूळ सांख्य मताहून भिन्न आहे, हे प्रसिद्धच आहे. माझे स्वतःचे **सांख्यमत**, कापिलसांख्य आणि भगवद्‌गीताप्रणीत सांख्य या दोहोंहून थोडे थोडे भिन्न आहे. अस्तु, तो मुख्य मुद्दा नव्हे; **सांख्यधर्मात** उच्चनीच भाव नाही, समानता आहे; हा मुद्दा आहे. यास्तव आपण धर्मांतराचा निश्चय करण्यापूर्वी सांख्य–मार्गाचा विचार निदान आधी करावा, अशी माझी सविनय सूचना आहे.

सांख्यधर्मात जातिभेद ठेवूनही समानता ठेवता येते, ही गोष्ट आपले लक्षात येईलच. वैषम्य हे जातिभेदाचे तात्त्विक लक्षण नसून ती एक आगंतुक रूढी आहे. मी स्वत: जातिभेद व तदंतर्गत कर्तव्ये नियमाने पाळतो. परंतु वैषम्य पाळीत नाही. आपला विरोध केवळ वैषम्यापुरताच असेल तर तेवढ्यासाठी जातिभेद सोडण्याचे कारण नाही; आर्यसमाजात अस्पृश्यांना स्पृश्य करून घेतात आणि त्या धर्मात जातिजातीत वैषम्य किंवा उच्चनीच भाव नाही, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. हिंदु-धर्माचे शत्रू, ख्रिस्तीधर्मोपदेशकसुद्धा ही गोष्ट प्रांजळपणे कबूल करतात. यास्तव आर्यसमाज–पंथात जाण्याने आपला इष्ट हेतू साधून ख्रिस्तिधर्मासारख्या वैषम्यपूर्ण धर्मात शिरण्याचे कारण राहणार नाही. आर्यसमाजात अस्पृश्यता निवारणार्थ स्वामी श्रद्धानंदासारख्यांनी काय कामगिरी केली, ते आपणांला ठाऊकच आहे.

तथापि आपला आक्षेप केवळ वैषम्यापुरता नसून जातिभेदालाच असेल, तर त्याकरतासुद्धा धर्मांतराचे कारण नाही. आर्यसमाज पंथात जातिवैषम्य नसले तरी निदान नावाचा जातिभेद असतो आणि आपणांला कदाचित जातिभेद हे नावसुद्धा अनिष्ट वाटत असेल, तर आपण ब्राह्मोसमाजात जाऊन ब्राह्मो धर्माचा स्वीकार करावा. ब्राह्मो समाजी आपला मोठ्या आनंदाने स्वीकार करतील. ब्राह्मो समाजात नुसता नावाचा जातिभेदसुद्धा नाही, हे प्रसिद्धच आहे.

आपण म्हणता- " अस्पृश्यता हा एक हिंदुधर्माचाच अविभाज्य भाग असल्याने, जोवर हिंदुधर्म आहे, तोपर्यंत अस्पृश्यता राहणारच; म्हणून अस्पृश्यता जाण्याला हिंदु-धर्मच नष्ट झाला पाहिजे." आपले हे म्हणणे मला नीट समजले नाही. हिंदु-धर्मात वेद हे मुख्य धर्मग्रंथ समजले जातात वेदांतील काही सूक्ते वसिष्ठ ऋषींनी रचलेली आहेत. वसिष्ठांनी अक्षमाला नावाच्या अस्पृश्य जातीच्या एका कुमारिकेशी विवाह केला होता आणि तीच अक्षमाला पुढे अरुंधती या नावाने वंद्य झालेली असून, ब्राह्मण वधूवरे तिला विवाहप्रसंगी वंदन करतात, ही गोष्ट आपणांला ठाऊक असेलच. ऋग्वेदातील काही सूक्ते शूद्रप्रणीत आहेत व सोवळे ब्राह्मणसुद्धा याज्ञिक कर्मात ही सूक्ते पठण करतात, हे प्रसिद्ध आहे अशी खरी स्थिती असता अस्पृश्यता हा हिंदुधर्माचा अविभाज्य भाग आहे, असे कसे म्हणता येईल ? **हिंदुधर्म म्हणजे** काय ? या विषयावर माझा एक निबंध प्रसिद्ध झालेला आहे. (पुरुषार्थ–आक्टोबर १९३४ ). तो आपले वाचण्यात आलेला नसल्यास आपण वेळात वेळ काढून अवश्य वाचावा. मी दिलेल्या व्याख्येचे खंडन करण्याचा कोणी प्रयत्न केलेला नाही. त्याला अपवाद म्हणजे पुरुषार्थाचे संपादक पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांची त्याच अंकातील माझे निबंधावरील टीका. त्या टीकेत काही चुकीची विधाने आहेत.

मी त्या चुका पत्राने त्यांच्या नजरेस आणल्या. त्यावर त्यांचे उत्तर अद्याप आलेले नाही. यावरून ते त्या पत्राचा विचार अजून करीत आहेत असे वाटते. एवढा हा एक अपवाद सोडून दिला तर माझ्या त्या व्याख्येला अजून कोणी आक्षेप घेतला नाही असे म्हणावे लागते. यास्तव माझी आता अशी विनंती आहे की, माझी ती हिंदुधर्माची व्याख्या आपण मन:पूर्वक वाचावी आणि माझी विचारसरणी संयुक्तिक वाटली तर, आपण तेवढ्यापुरते आपले मत बदलून ' हिंदुधर्माचा अस्पृश्यतेशी अविभाज्य संबंध आहे ' हे आपलें मत सोडून द्यावे. याचे उलट अस्पृश्यता हा हिंदुधर्माचाच एक नुसता भाग नव्हे तर अविभाज्य भाग आहे असे आपण समप्रमाण सिद्ध केले तर, हिंदुधर्म नष्ट झाला पाहिजे हा आपला सिद्धांत मीही मान्य करीन आणि त्या धर्माचे नाशार्थ आपल्या बरोबरीने यथाशक्ति प्रयत्न करीन. मला अशी खात्री आहे की हिंदुधर्माचे शत्रू हिंदुधर्माविरुद्ध जी खोटी विधानें करतात ती त्यांची विधाने डोळे मिटून ग्रहण न करता, स्वत: आपण जर स्वतंत्र बुद्धीने हिंदुधर्माचे वाचन कराल तर हिंदुधर्म, विशेषत: ब्राह्मणी धर्म, हा अस्पृश्यता उत्पन्न करण्याकरिता अवतरला नसून, अन्य कारणाने उत्पन्न झालेली अस्पृश्यता मोडण्याकरिता उत्पन्न झालेला आहे, अशी आपली खात्री होईल.

ब्राह्मणी धर्मात अस्पृश्यता खरोखर नाही आणि जी आहेशी दिसते ती आगंतुक रूढी आहे, हे माझे म्हणणे आपणांला चमत्कारिक वाटेल. परंतु या विषयावर अनेक विद्वान शास्त्रीपंडितांनी जे लेख लिहिले आहेत, ते वाचले म्हणजे आपलीही तशीच खात्री होईल. उदाहरणार्थ महामहोपाध्याय वेदान्तवागीश श्रीधरशास्त्री पाठक यांची लेखमाला पुरुषार्थात प्रसिद्ध झालेली आहे; ती वाचली असता अस्पृश्यतेच्या रूढीला हिंदुशास्त्राच्या प्रमाण ग्रंथांचा आधार नाही अशी आपली खात्री होईल. या घटकेला मुख्य प्रश्न हिंदुधर्म काय म्हणतो हा नव्हे; त्या प्रश्नाचा निकाल पूर्वीच लागलेला आहे. आता प्रश्न एवढाच उरला आहे की, ही अस्पृश्यतेची शास्त्राविरुद्ध रूढी व्यवहारातून नाहीशी कशी करावी आणि त्या कामात पुढाकार कोणी घ्यावा ? हे काम करण्याचा अधिकार आपणांसारख्या विद्वानांचा आहे. यास्तव केवळ ऐकीव गोष्टींवर विश्वास न ठेवता स्वत: शास्त्रग्रंथ वाचून स्वत:ची खात्री करून घ्यावी व तशी खात्री झाल्यानंतर आपला शोध सर्व जनतेला सांगून अस्पृश्यतेची रूढी मोडण्याच्या कामाला हातभार लावावा. आजपर्यंत जे काम ब्राह्मणवर्गाने मोठ्या अडचणीने चालविलेले आहे, ते आपल्यासारख्या उत्साही आणि विद्वान ' अस्पृश्यांनी ' अंगावर घेतले तर अस्पृश्यता थोड्याच दिवसांत नामशेष होईल. वेदकाळी शूद्र ऋषी कवष यांचे शिष्यत्व ब्राह्मणांनी पत्करले;

महाभारतकाळी धर्मव्याधाचे शिष्यत्व ब्राह्मण जाबाली ऋषीने पत्करले; मध्यकाळात तुकाराम, नामदेव यांचे शिष्यत्व ब्राह्मणांनी पत्करले. कोणत्याही कीर्तनांत 'तुका म्हणे' या पालूपदावाचून कीर्तनकारांचे पाऊल पुढे पडत नाही. त्याप्रमाणे हल्लीच्या काळी आपण धर्मशास्त्राचे अध्ययन करून अस्पृश्यतेला हिंदुधर्माचा आधार नाही, हा सिद्धांत प्रगट करण्याचा प्रयत्न केला, तर अनेक ब्राह्मण आपले शिष्यत्व पत्करतील आणि जे यश ब्राह्मणांना या वेळेपर्यंत मिळाले नाही, ते आपणांला खात्रीने मिळेल अस्तु.

यासंबंधाने अधिक लिहिण्याचे कारण नाही; म्हणून हा विषय तितकाच सोडतो. माझी आपली प्रत्यक्ष ओळख नाही म्हणून स्वतःसंबंधी दोन शब्द सांगून हे पत्र संपवितो. मी जन्मतः धर्माने स्मार्तपंथी हिंदु आणि जातीने ब्राह्मण आहे. माझे शिक्षण आपल्यापेक्षा पुष्कळच कमी आहे. एम्. ए. पलीकडे माझी धाव गेलेली नाही. यास्तव आपणाला उपदेश करण्याचा मला अधिकार नाही. फक्त सूचना करण्याचा अधिकार आहे. पाश्चात्य शिक्षणामुळे जातिभेद हे एक ब्राह्मणी थोतांड आहे, अशी माझी कल्पना प्रारंभी झाली होती. परंतु अधिक अध्ययनाने ते मत बदलावे लागले. जातिभेद हा समाजातील विषमता मोडून समता स्थापन करण्याकरिता निर्माण झाला आहे, असे मला आढळले. या संबंधाने माझी टिपणे घेऊन त्या विषयावर सौभाग्यवतीने एक निबंध लिहिला आहे. ( पुरुषार्थ, १९३४ ), तो निबंध आपण अवश्य वाचावा, अशी सविनय सूचना आहे. १९०६ साली मी ख्रिस्ती धर्माचे अध्ययन सुरू केले. ख्रिस्ती धर्मात जातिभेद नाही आणि अस्पृश्यता तर नाहीच नाही, अशी माझी इतरांप्रमाणेच चुकीची समजूत होती. परंतु ख्रिस्ती धर्माच्या अध्ययनाने ती समजूत बदलावी लागली. १९०८ साली इंदूर येथे अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी एक संघ स्थापन झाला होता, त्या संघाचा मी अध्यक्ष होतो. परंतु पुढे ब्रिटिश सरकारची नाराजी झाल्यामुळे मला अगोदर इंदूर, नंतर हिंदुस्थान व शेवटी ब्रिटिश साम्राज्य सोडावे लागले. अमेरिकेत आल्यापासून, निर्वाहार्थ करावे लागणारे व्यवसाय करून जो वेळ उरे त्यात मी हिंदुधर्म व ख्रिस्ती धर्म यांचे तुलनात्मक अध्ययन केले. त्यावरून असे आढळले की —

१) जातिभेद हा हिंदुधर्माचा एक भाग आहे खरा, पण तो हिंदुधर्माचा अविभाज्य भाग नव्हे.

२) जातिभेदाचे ऐतिहासिकदृष्टया दोन भाग पडतात. राजन्य उर्फ अधिकारविशिष्ट

आणि ब्राह्मणी उर्फ कर्तव्यविशिष्ट. राजन्य जातिभेद हा समाजातील वैषम्याला कारण आहे, ब्राह्मणी जातिभेद वैषम्य मोडण्याकरता अवतरला आहे.

३) हल्ली व्यवहारात जो जातिभेद आढळतो, तो राजन्य आणि ब्राह्मणी यांच्या मिश्रणाने झालेला आहे. जातिभेदाचे परिणाम अनिष्ट म्हणून जे परिणाम आढळतात, ते राजन्य जातिभेदाचे परिणाम समजावे. ब्राह्मणी जातिभेदाचे नव्हत.

४) हिंदुधर्मसुधारकांचे या काळातील कर्तव्य म्हणजे, व्यवहारातील जातिभेदांत राजन्य आणि ब्राह्मणी जातिभेदाचे मिश्रण आहे ही गोष्ट ओळखून, राज्यन्य जातिभेद काढून टाकावा आणि ब्राह्मणी जातिभेद तेवढा शिल्लक ठेवावा. असे केल्याने समाजातील उच्चनीचभाव नाहीसा होऊन समता स्थापन होईल.

५) अस्पृश्यता हा राजन्य जातिभेदाचाच मुख्य भाग आहे, ब्राह्मणी जातिभेदांचा हा भाग नव्हे; ह्या मताची चर्चा पुरुषार्थातील निबंधात सविस्तर केलेली आहे. ( पुरुषार्थ, नोव्हेंबर १९३४ ).

६) ज्यांना जातिभेद कोणत्याच स्वरुपात नको असेल त्यांच्यासाठी हिंदुधर्मात सोय आहे, व तेवढ्यावर समाधान न झाल्यास त्यांना स्वतःचे भावनेला अनुरूप असा नवा पंथ काढता येईल. परंतु तसे करण्याची आवश्यकता नाही. ब्राह्मणी जातिभेदाचे खरे स्वरूप ज्याला स्पष्टपणे समजले आहे, त्याला जातिभेद नको असे वाटणार नाही.

आपला साम्याकांक्षी,

**शंकर लक्ष्मण गोखले**

( पुरुषार्थ, जानेवारी १९३५, पा. ६५९–६६ )

पुरुषार्थाच्या नोव्हेंबरच्या अंकातील ' **डॉ. आंबेडकरांचे कर्तव्य** ' या लेखाला

## डॉ. आंबेडकर यांचे उत्तर

रा. रा. श्रीपाद दामोदर सातवळेकर संपादक पुरुषार्थ, यांस, अनेक जोहार. आपल्या पुरुषार्थ मासिकाचा नोव्हेंबर महिन्याचा अंक मला पोहोचला. त्यातील ' आंबेडकरांचे कर्तव्य ' या शीर्षकाखाली लिहिलेला आपला लेख मी वाचून पाहिला. त्याचे नंतर दोनच दिवसांनी आपले ता. २–१२ चे पत्र आले. आपल्या–

प्रमाणे इतर हिंदू लोकांनीही माझ्या धर्मांतरासंबंधाने बरेवाईट विचार प्रसिद्ध केलेले माझ्या वाचनात आलेले आहेत. परंतु त्यापैकी कोणालाही उत्तर देण्याचे भानगडीत मी पडलो नाही इतर लेखकांनी जे लिहिलेले आहे, त्यापेक्षा आपल्या लेखात विशेष असे मला काही दिसून आले नाही आणि म्हणूनच आपले पत्र येईपर्यंत आपल्या लेखाला उत्तर देण्याचे कधीच माझे मनात आले नव्हते. तथापि ज्याअर्थी उत्तर यावे अशी मागणी केली आहे, व त्यास प्रत्युत्तर देण्याची आपण जी उत्कंठा व्यक्त केली आहे, त्याअर्थी आपली निराशा करू नये एवढ्या कारणा–करिता आपल्या लेखासंबंधाने मला काय वाटते, ते मी आपणांस लिहून कळवीत आहे.

**मी धर्माकरिता धर्मांतर करीत नसून व्यावहारिक फायद्याकरिता ते करीत आहे,** असा माझ्यावर ज लोक आक्षेप करतात, त्यापैकी आपण एक नाही, हे वाचून मला आनंद वाटतो. नफातोटा पाहून धर्मांतर करायचे ते करा, असा आपला सल्ला आहे, त्याची यथार्थता मला पटते. मी ते विसरलो नव्हतोच. पण आपण आठवण दिली, हे बरे केलेत. या धर्मांतराच्या सौद्यामध्ये जमाखर्चाचा जो तक्ता माझ्या समजुतीप्रमाणे मी तयार केला आहे, त्यात तोटयापेक्षा नफा मला जास्त दिसतो. परंतु आपल्या म्हणण्याप्रमाणे नफ्यापेक्षा तोटाच जास्त आहे हे जरी खरे धरले, तरी ज्या कारणामुळे मी धर्मांतर करू नये असे आपण म्हटले आहे ते खरे आहे; परंतु माझे **महारपण** नाहीसे झाल्यानंतर माझे मोठेपण लयास जाईल असे जे मत आपण व्यक्त केले आहे, ते एक तर **माझ्या विद्वत्तेसंबंधी आपल्या अज्ञानाचे द्योतक असावे.** किंवा ब्राह्मणेतरांच्या विद्वत्तेसंबंधाने ब्राह्मणांच्या मनांत वसत असलेल्या क्षुद्र बुद्धीचे द्योतक असावे. माझे महारपण गेले तरी माझी विद्वत्ता कायम मज–जवळ राहणार आहे व ती काही लहानसहान नाही. ब्राह्मण जातीच्या विद्वानांच्या–बरोबर मला तागडीत घातले असताना माझे पारडे कमी भरेल ही आपली भीती निरर्थक आहे. त्या विषयात पारंगत असलेल्या ब्राह्मण जातीतील कोणत्याही व्यक्तीशी मी बरोबरी करू शकेन अशी माझी खात्री आहे. **केवळ महार म्हणून राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये मला जागा मिळाली हे खरे असू शकेल.** परंतु त्यातून काय सिद्ध झाले याचा पुरता तपास आपण केला असता तर असे खुळे व वेडगळ विचार आपण पुढे मांडले नसते. राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये हिंदूंमधल्या गाजलेल्या व्यक्ती होत्या. त्यांत पुण्यातील **ब्राह्मण जातीचे शिरोमणी तात्यासाहेब केळकर हेही होते.** मांडीला मांडी लावून बसण्याचा योग सुदैवाने उभयतांस लाभला होता. त्याप्रसंगी मला त्यांची विद्वत्ता व त्यांना माझी विद्वत्ता ताडून पाहाण्याची वेळ

आली होती. त्यावेळच्या अनुभवावरून त्यांच्यापेक्षा मी विद्वत्तेने किंवा बुद्धिमत्तेने कमी आहे असे माझ्या स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते. तेव्हा केवळ माझ्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मला जे स्थान मिळेल ते मोठेच मिळेल, याच्याबद्दल मला काही शंका नाही. आडपडदा न ठेवता एवढे स्पष्ट लिहिण्याचे काही प्रयोजन नव्हते. परंतु आपल्यासारख्या ब्राह्मणाशिवाय दुसऱ्या कोणाही जातीच्या लोकांत बुद्धिमत्ता, विद्वत्ता नाही अशी दुर्मदाने माखलेल्या लोकांचा भ्रम नाहीसा करण्याकरिता तसे लिहिणे आवश्यक झाले. याबद्दल खेद वाटतो. माझे मोठेपण कायम राखण्याकरता आपण जी चिंता प्रगट केली त्याबद्दल आपला मी आभारी आहे. मी कोठेही गेलो तरी माझ्या विद्वत्तेनुरूप व बुद्धिमत्तेनुरूप जे मोठेपण मला प्राप्त व्हावयाचे ते होईलच, याबद्दल आपण कसलीच शंका बाळगू नये. परंतु **अस्पृश्यांत राहिल्याशिवाय माझे मोठेपण राहणार नाही**, हे जरी खरे धरले, तरी माझे मोठेपण कायम राहण्याकरिता अस्पृश्य लोकांनी अस्पृश्यच राहावे, ही विचारसरणी अत्यंत विलक्षण, नव्हे वेडसरपणाची आहे, असे मला वाटते. आपल्या जातीचा व आपला मोठेपणा राहावा, याकरिता बाकीच्या लोकांना खाली कायमचे दडपून ठेवणे हा ब्राह्मणादी तत्सम जातींचा शिरस्ता होऊन बसला आहे. तसे जर नसते तर ब्राह्मणादी तत्सम जातींनी इतर जातींचा उद्धार करण्याकरिता त्या जाती आपल्या बरोबरीच्या होऊन आपला दर्जा कमी होईल अशा भीतीने केव्हाही कच खाल्ली नसती; परंतु आपले महत्त्व राखण्याकरिता दुसऱ्यांना नरकात डांबून ठेवणाऱ्या लोकांना मी नीच कोटीतील लोक समजतो. **तशा नीचांपैकी मी नाही** याची आपल्याला जाणीव नाही, असे वाटते. **माझे महत्त्व जरी बुडाले तरी बुडो, परंतु आमचे लोक वर यावेत** हीच माझी एक भावना आहे. याशिवाय दुसरी भावना नाही, याची आपण खात्री बाळगावी.

"स्पृश्य लोक जाती लौकर मोडतील, पण अस्पृश्यच जाती सोडावयास तयार होणार नाहीत" हे आपले म्हणणे कदाचित् खरेही असू शकेल. परंतु "अस्पृश्यांतील जातिभेद मोडा, मग सर्व जाती मोडण्याचा प्रश्न हिंदुमहासभेपुढे मांडा" असे जे आव्हान मला केले आहे, ते आव्हान स्वीकारण्यास मी राजी आहे. अस्पृश्यांतील जातिभेद मोडण्यास मी माझी पराकाष्ठा करण्यास तयार आहे. परंतु जोपर्यंत अस्पृश्यसमाज हिंदुसमाजातील जातिभेदाच्या तांगडातांगडीत जखडून गेला आहे, तोपर्यंत त्या कार्याला कधीही यश येणे शक्य नाही. **अस्पृश्यांतील जातिभेद मोडण्याला त्यांनी हिंदुधर्मातून फुटून निघणे हाच एक मार्ग आहे.** महारांत जातिभेदाचे खूळ आहे हे दाखविण्याकरिता आपण महारणीशी संबंध असलेल्या

ब्राह्मणाचे जे सातारा जिल्ह्यातील उदाहरण दिले त्याचा अर्थ मला काही समजत नाही. महारणीशी लग्न करून तो ब्राह्मण राहिला असताना जर त्याला महारांनी घेतले नसते, तर महारांकडे दोष आहे असे मी मानले असते. परंतु जारकर्मी ब्राह्मणाला महारांनी अपंक्त ठरविला, त्यात त्यांनी वाईट काय केले, हे मला समजत नाही. **ब्राह्मण झाला भ्रष्ट तरि तो तिन्ही लोकी श्रेष्ठ** ' ह्या ब्राह्मण उक्तीप्रमाणे त्या जारकर्मी ब्राह्मणाला श्रेष्ठच मानावयास पाहिजे होते, असे आपले म्हणणे असल्यास ते कोणीही नीतिमान पुरुषास पटणार नाही, असे मला वाटते.

" आम्ही हिंदू आहो, हिंदूबरोबरच जगणार व हिंदूबरोबरच मरणार. हिंदुलोक आम्हांस जसे ठेवणार असतील तसे ठेवोत, पण आम्ही हिंदूंची, हिंदुधर्माची, हिंदुदेवतांची अब्रू राखण्यासाठीच आपले सर्वस्व अर्पण करणार " अशी घोषणा अस्पृश्यांनी करीत राहावी. म्हणजे हिंदूंच्या मनाला द्रव फुटून हिंदुलोक अस्पृश्यां–करिता पुष्कळसे काही करतील असा जो आपण पोक्तपणाचा सल्ला दिला आहे, तो दुसऱ्या कोणातरी अस्पृश्य पुढाऱ्याला पटेल. पण मी तो पत्करू शकणार नाही. एक तर आपला अनुभव माझ्या अनुभवाशी जुळता नाही. दाढीला हात लावून हिंदूंनी मोठेसे औदार्य दाखविले आहे असे एखादे देखील उदाहरण मला आढळत नाही. पण त्यांची शेंडी 'धरून त्यांच्याकडून बरचसे करवून घेतल्याची अनेक उदाहरणे माझ्या अनुभवावरून सांगता येतील. शिवाय **हिंदुधर्म हा माझ्या मते धर्म नसून लोकांना वेडे करण्याची ही एक जडी आहे. हिंदुसमाज** हा वेडसर लोकांचा समाज आहे. अशा वेडसर लोकांत राहण्याचा माझा इरादा नाही. अर्थात त्यांची मनधरणी करण्याची मला जरूरी नाही.

आपला कृपाकांक्षी,
**भीमराव रामजी आंबेडकर**
(पुरुषार्थ, जानेवारी, १९३६ पा. ६६३–६४ )

' डॉ. आंबेडकराचे पत्र वर छापलेच आहे. त्याचा विचार येथे थोडासा करणे अगत्याचे आहे.

१) **' ब्राह्मण विद्वानांच्या बरोबरीचे आपण विद्वान आहे.** ' हे जे त्यांनी म्हटले ते अगदी खरे आहे. या **संबंधाने** आम्हांला किंवा कोणालाही मुळीच शंका नाही व या विद्वत्तेमुळे जेवढे स्थान **इतर** जातींतील विद्वानांस मिळू शकेल तेवढे त्यांस धर्मांतरानंतरही मिळेल यातही कोणास शंका नाही.

फक्त आमचे म्हणणे इतकेच की, **मागासलेल्या जातीतील विद्वान जसा उठून दिसतो, तसा तो पुढारलेल्या जातीतील विद्वान दिसू शकत नाही.** यामुळे सध्याच्या परिस्थितीत जो त्यास उठावदारपणा मिळालेला आहे तो धर्मांतराने जाईल. पाच कोटी हरिजनांमध्ये एक दोन विद्वान असले तर त्यांस त्या गटात जे सहजासहजी महत्त्व प्राप्त होते ते दोन कोटी ब्राह्मणांत हजार विद्वान असल्यामुळे त्यांस केव्हाही प्राप्त होणे शक्य नाही.

शिवाय नवीन राज्यव्यवस्थेमध्ये हरिजनांचा गट कायम राहणारच आहे व तो कायम राहीपर्यंत त्या गटास राजकीय महत्त्वही फारच येणार आहे. कोणी नको म्हटले तरी हे टळणारे नाही. करिता चालून आलेले महत्त्व स्वीकारून त्याबरोबरच स्वजातीयांचा उद्धार करून देण्याची संधी डॉ. आंबेडकरांना हरि–जनांत राहण्याने आपोआपच मिळणार आहे, ती त्यांनी का दवडावी हाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

२) 'माझे मोठेपण राहण्यासाठी अस्पृश्यांनी अस्पृश्यच राहावे ही विचारसरणी वेडसरपणाची आहे' असे डॉ. साहेब म्हणत आहेत. या वाक्यात 'अस्पृश्य' शब्द नको असला तर तेथे 'हरिजन' शब्द घालता म्हणजे त्यातला वेडसरपणा कमी होईल. राजकीय सनदेने जो गट बनला आहे तो गट आम्हांस नको आहे असे तरी हरिजनांनी किंवा डॉ. आंबेडकरांनी म्हणावे व मग इतरांस वेडसर म्हणावे. या गटाचा फायदा स्वत: घ्यावयाचा व 'तो घेता येतो' असे म्हणणारास वेडसर म्हणावयाचे हे फक्त डॉ. साहेबांनाच शोभणे शक्य आहे !

हरिजनांनी कायमचे अस्पृश्य म्हणजे स्पर्श करण्यास अयोग्य राहावे असे आमचे मुळीच म्हणणे नाही. सार्वजनिक ठिकाणी सर्वांस समान अधिकार आहे, असा हिंदुधर्माचा सिद्धांत '**स्पर्शास्पर्श**' आहे व तोच आमचा पक्ष आहे. सर्व वैष्णव आचार्यांनी हा सिद्धांत प्रतिपादला व प्रचारातही आणला, ही गोष्ट वैष्णव धर्मांच्या इतिहासात प्रसिद्ध आहे. हिंदुधर्मानेही हा सिद्धांत बाजूस सारलेला नाही.

३) 'ब्राह्मणांनी इतरांस दडपून टाकले' हे डॉक्टर साहेबांचे म्हणणे इतर ब्राह्मणेतरी विधानासारखेच असत्य आहे खरे पाहिले असता अस्पृश्यतेचा व ब्राह्मणांचा अर्थाअर्थी काही एक संबंध नाही. ब्राह्मणांनी ती बनविलेली नाही. **उलट ब्राह्मणांनी तो कमी करण्याचाच अट्टाहास केलेला आहे. श्रीरामानुजाचार्यांनी**

अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी किती पराकाष्ठेचे यत्न केले हे त्यांच्या चरित्रा वरुन कोणालाही समजण्यासारखे आहे. इतरही अनेक उदाहरणे आहेत. प्रो. गोखले, यांच्या लेखात या संबंधाचा निराळ्या दृष्टीने विचार झालेला आहे व ते लेख या पुरुषार्थ प्रसिद्ध झालेले आहेत. म्हणून ब्राह्मणांनी इतरांस दडपून टाकले हे म्हणणे इतिहासदृष्ट्या चुकीचे आहे. उलट **ब्राह्मणांनी इतरांस सम लेखण्याचा प्रघात पाडला.**

आज जरी पाहिले तरी या अस्पृश्यतेमुळे स्पृश्यांसच अधिक त्रास होत आहे असे दिसेल. समजा, आगगाडीत स्पृश्य व हरिजन सरमिसळ बसले आहेत. अशावेळी हरिजनांच्या खाण्यापिण्यास यत्किंचित हरकत येणार नाही. तहान लागली तरी तडफडत रहावे, पण स्नान केल्याशिवाय पाणी पिता येऊ नये,हे कष्ट केवळ स्पृश्यांसच भोगावे लागतात याची जाणीव आम्हांस आहे. वैष्णवांनी यात सुधारणा घडवून आणली, एवढेच आमचे म्हणणे आहे. म्हणजे ब्राह्मणांनी इतरांस दडपले, हे म्हणणे असत्य आहे.

आर्थिक कारणांमुळे होणारे कष्ट कोणीही धर्मामुळे होतात असे म्हणू नये, एवढेच येथे वाचकांनी विचारात घेतले पाहिजे.

ब्राह्मणांनी इतरांस दडपले या असत्य विचारसरणीमुळेच ' **स्मृती जाळणे** ' वगैरे निष्प्रयोजन कृत्ये केली जात आहेत. पण स्मृती या आपण म्हणजे ब्राह्मणांनी केलेल्या नसून त्या त्या जातीत त्या त्या वेळी जे जे आचार व्यवहार चालू होते त्यांची फक्त नोंद स्मृतिकारांनी केलेली आहे. प्रत्येक जातीला आपले परंपरेने आचार पाळण्यास पूर्ण स्वतंत्रता स्मृतींनी दिलेली आहे व कोणावरही नवीन बंधने घातलेली नाहीत. **आमच्या स्मृत ( स्मरणा ) प्रमाणे आमचे आमचे आचार हे आहेत,** असे ज्या ज्या जातींनी सांगितले त्या त्या जातींनी तसे आचार करण्यास स्मृतींनी सवड ठेवली. स्मृतीची व्याख्या ही आहे. जाती या स्मृतिकारांनी घडवि– लेल्या नाहीत. **स्मृती बनण्यापूर्वी जाती होत्या. त्यांना वर्णांत समाविष्ट करुन एकोपा वाढविण्याचा यत्न स्मृतींनी केला म्हणजे स्मृतींनी जातिभेद वाढविला नसून तो कमी करण्याचा यत्न केला. या कृत्याबद्दल स्मृतिकारांची प्रशंसा व्हावयास पाहिजे.** पण ज्यास समजत नाही ते स्मृतींवर आग पाखडतात व आपले महत्त्व वाढविण्यासाठी ब्राह्मणांनी इतरांस दडपले असे म्हणतात. हे नुसते अज्ञान आहे.

४) **' आपले महत्त्व राखण्यासाठी दुसऱ्यास नरकात डांबून टाकणारा मी नीच**

**नाही** ' असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे. हे त्यांचे म्हणणे योग्य आहे व या म्हणण्याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. म्हणूनच आम्ही म्हणत आहो की, सर्व हरिजनांची उन्नती करण्याची जी सुसंधी त्यांस सुदैवाने प्राप्त झालेली आहे ती धर्मांतर करून त्यांनी घालवू नये. धर्मांतर न करता जर ते हरिजनांत राहूनच त्यांची उन्नती करतील तर ते खात्रीने सर्व हरिजनांस अंशतः तरी उन्नत करू शकतील. पण जर ते धर्मांतर करून अलग होतील तर मात्र त्यांच्या माथी सर्व हरिजनांस हीन स्थितीत कुचंबत ठेवण्याचे पाप लागेल.

' **माझे महत्त्व बुडाले तरी आमचे लोक वर येवोत एवढी एकच भावना माझी आहे ?** असे डॉक्टर सा. चे म्हणणे आहे. ते त्यांस भूषणावह आहे. पण हे साधावयासाठी त्यांनी धर्मांतर करता कामा नये हेही विसरून चालावयाचे नाही. धर्मांतर करून त्यांची ही इच्छा कधीही सफल होणार नाही, तर उलट हरिजनांत राहूनच त्यांचे हे साध्य त्यांस साधता येणे शक्य आहे. '

५) ' **अस्पृश्यांतील जातिभेद मोडण्याला त्यांनी हिंदुधर्मातून फुटून बाहेर निघणे हा एकच मार्ग आहे** ' हे डॉक्टर साहेबांचे म्हणणे कोणालाही पटणे शक्य नाही. कारण उदारपणासाठी प्रसिद्ध असलेल्या अमेरिकन ख्रिस्तीधर्मात **गोरे स्पृश्य व काळे निग्रो अस्पृश्य असे आहेत व ते हिंदूंच्या जातिभेदापेक्षा अधिक प्रखर आहेत.** गोऱ्या स्पृश्य ख्रिस्त्यांनी, या जातीभेदामुळे जितक्या काळ्या निग्रो ख्रिस्त्यांस जिवंत जाळले, फाडले, तोडले व ठार मारले त्यांच्या सहस्त्रांशानी स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्य हिंदूवर जुलूम केलेले नाही. निदान **अमेरिकन अस्पृश्यता व हिंदूंतील अस्पृश्यता यांची तुलना केली असता हिंदूंमधील अस्पृश्यता सह्य आहे, असेच कोणीही म्हणेल.**

युरोपियन ख्रिस्त्यांतही अस्पृश्यता अशीच तीव्रतर आहे जर्मन नाझींनी ज्यू लोकांस जर्मनीमधून हाकलून घातले हे सर्वश्रुत आहे. तसे स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्यांस गांवांतून हाकललेले नाही तर त्यांस गावात ठेऊन घेतले आहे व त्यांस गावकीचे हक्कही दिलेले आहेत.

आफ्रिकेत गोरे काळ्यास कसे वागवीत आहेत हे सर्वांस माहीत आहे. इतर युरोपियन लोकही असेच आहेत. **तेव्हा ख्रिस्ती धर्मात जी अस्पृश्यता आहे, ती हिंदू अस्पृश्यतेहून फारच भयकर राक्षसी स्वरूपाची आहे.** डॉ. आंबेडकर व त्यांचे जातभाई हे किरिस्ताव झाले तर त्यांस आगीतून उठून फोपाट्यात पडल्यासारखे

होणार आहे. मुसलमानी धर्मातही अस्पृश्यता आहे व मुसलमान अस्पृश्यांची शिरगणतीही करण्यात आलेली आहे. शिवाय मुसलमानांमध्ये शिया, सुनी, अहंमदी, कादियानी, असे जातिभेद अत्यंत प्रखर व एकमेकांचा उच्छेद करू इच्छिणारे असे आहेत. म्हणून तिकडे जाण्यापूर्वी त्यांनी या सर्व पंथांचा नीट अभ्यास करावा, म्हणजे तिकडे जाऊन पश्चाताप करण्याची पाळी त्यांच्यावर येणार नाही.

बाहेरच्या मुसलमानी देशांतही हिंदी मुसलमानांस स्थान मिळणार नाही; ही गोष्ट देशत्याग केलेल्या मुसलमानांच्या चांगली परिचयाची आहे. हिंदी उर्दू-मध्ये ही देशत्यागी लोकांची चरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत.

तेव्हा ख्रिस्ती व मुसलमानी धर्म स्वीकारण्याने जातिभेदांचे दुःख सुटेल हे म्हणणे अज्ञानाचे द्योतक आहे. **इतर धर्मांतील जातिद्वेष असह्य होणार असून हिंदूंतील जातिभेद हिंदूंच्या स्वाभाविक उदार धोरणामुळे फारच सह्य झालेला आहे व सध्या तर तो नाममात्र राहिलेला आहे.**

अमेरिकन, जर्मन व आफ्रिकन गोऱ्या लोकांतील अस्पृश्यता हा त्या ख्रिस्ती-धर्मावरील कलंक आहे असे त्यांस अजूनही वाटत नाही व ते लोक ती अस्पृश्यता काढून टाकण्याची खटपट करीत नाहीत, तर ती अस्पृश्यता वाढविण्याची पराकाष्ठा करीत आहेत. याच्या उलट हिंदूंमधील थोर थोर पुढाऱ्यांस आपल्या धर्मातील अस्पृश्यता ही कलंकरूप आहे असे वाटू लागले आहे व ते तसे म्हणून ती दूर करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत. **महात्मा गांधी, पं. मदनमोहन मालवीय** वगैरे जगद्वंद्य पुढारी अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून आपले जीवित पणाला लावून खटपट करीत आहेत. या हिंदूंच्या उदारपणाची अमेरिकन ख्रिस्त्यांच्या अनुदार धोरणाशी तुलना करावी, म्हणजे डॉ. आंबेडकरांस खात्रीने वाटेल की धर्मांतर करण्याने हरिजनांची दुःखे शतपटीने वाढणार आहेत. करिता ज्यांची उन्नती व्हावी असे डॉक्टरसाहेब इच्छीत आहेत, त्यांस तीव्रतर दुःखात लोटण्याचे पाप धर्मांतर करून त्यांनी करू नये.

पाच कोटी हरिजन हे हिंदू राहिले तरच ते अत्यंत सुखात राहतील; कारण त्यांच्या उन्नतीसाठी जितके नेटाचे प्रयत्न सध्या चालू आहेत, त्याच्या शतांश प्रयत्न ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्मात होत नाहीत, ही गोष्ट प्रत्यक्ष दिसत आहे. आयते मिळत असलेले सहाय्य सोडून धर्मांतराने हरिजनांना अधिक दुःखात लोटून देणे हे सर्वथा अयोग्य आहे.

६) **' हिंदुसमाज हा वेडसर लोकांचा समाज आहे व हिंदुधर्म वेडसर लोकांचा धर्म आहे अशा वेडसर लोकांत राहण्याचा माझा इरादा नाही '** हे डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले वाक्य त्यांच्या विचारसरणीचे द्योतक आहे.

ते स्वतः आतापर्यंत हिंदू आहेत, धर्मांतर करीपर्यंत ते हिंदूच असणार हे उघड आहे. जर सगळेच हिंदू वेडसर तर त्या हिंदूंबरोबर डॉक्टरसाहेबही स्वतः वेडसर ठरणार, ही गोष्ट वरील वाक्य लिहितेवेळी त्यांच्या लक्षात आली नाही हे दुर्दैव होय.

यावर आम्ही आजच अधिक लिहिण्याची इच्छा करीत नाही. पण जर खरोखरच डॉक्टरसाहेबांचा समज असा असेल तर हिंदुधर्माच्या एका एका तत्त्वावर विचारविनिमय त्यांनी आमच्याशी करावा व हिंदुधर्म हा वेडसर तत्त्वांचा धर्म आहे असे ठरवावे व जर त्यांना तसे ठरविता आले तर मग त्यांना जो धर्म हिंदू धर्मापेक्षा कमी वेडसर असेल त्यात त्यांनी प्रवेश करावा; त्यापूर्वी मात्र करू नये.

आम्ही, हिंदूधर्म हा सर्व धर्मांत अधिक सुज्ञांचा धर्म आहे व त्यात वेडसरपणा मुळीच नाही, हे सिद्ध करून देण्यास तयार आहो.

शक्य असेल तर त्यांनी हिंदूधर्माच्या एकेका सिद्धांतावर आपले आक्षेप प्रसिद्ध करावे, त्याचे सप्रमाण खंडन करण्यास आमची तयारी आजच्या आज आहे.

सं. पुरुषार्थ.
( पुरुषार्थ, जानेवारी १९३६ पा. ६६५–६७ )

'आंबेडकरांचा स्पृश्य हिंदूंवर आरोप'या शीर्षकाखाली प्रो. शंकर लक्ष्मण गोखले, एम. ए. एलबर्ट स्ट्रीट, स्केनेक्टेडी, न्यूयॉर्क संस्थान, याचा लेख पुरुषार्थाच्या, जुलै १९३६ च्या अंकात ( पा. १११८–२२ ) छापलेला आहे. डॉ. आंबेडकरांचा हिंदूंवर राग अनाठायी आहे व ते आपले पूर्वग्रह मोडून टीकाकारांना उत्तरे देत नाहीत, अशी तक्रार केलेली होती.

' पुरुषार्थ ' मासिकात हे जे विचार प्रदर्शित केले गेले, त्यात सत्याची बाजू कोणाची, हे वाचकांना ठरविता यावे, म्हणून संपूर्ण उतारे मी येथे दिले.शिवाय दुसरा हेतू हा की ही विचारसामुग्री अभ्यासूंना उपलब्ध व्हावी.

' **हजरत बिलाल व डॉ. आंबेडकर ( जमियते शुब्बान-अल मुस्लेमीन, मुंबई नं. ३ यांनी प्रसिद्ध केलेली,** माधव प्रिंटिंग वर्क्स, नासिक )' या नावाची एक हस्तपत्रिका ( पाने ४ ) नशिकमध्ये १९३६ च्या जूनच्या सुमारास वाटण्यात आली होती. अरबस्तानात **बिलाल** या नावाचा कुरूप व काळाकुट्ट अस्पृश्य अरब होता. त्याने इस्लामचा स्वीकार केला व तो स्पृश्य झाला. बिलाल हे पैगंबरसाहेब व हजरत अबूबकर, उमर, उस्मान व अली यांच्याबरोबर एका ताटात जेवीत असत व एकाच पेल्यात पाणी पीत असत.' **झैद** हेही अस्पृश्य होते. इस्लामी धर्म स्वीकारल्यानंतर ते स्पृश्य झाले. याप्रमाणे माहिती देऊन सदर हस्तपत्रिकेत अशी जाहीर विनंती केली होती की, अस्पृश्यांनी इस्लाम धर्म स्वीकारावा व आपल्यावरील अस्पृश्यतेचा कलंक पुसून काढावा.

मिस् मिल्ड्रेड जी. ड्रेशर या अमेरिकन विदुषींचा परिचय बाबासाहेबांशी १९३५ साली झाला. त्या दोघांची मैत्री दिवसेंदिवस वाढत गेली. ती इतकी की, बाबासाहेब ड्रेशरबाईंकडे अनेक वेळा जेवावयास जात असत. सदर बाईंना बाबासाहेबांच्या विद्वत्तेचे आणि करारी स्वभावाचे इतके आकर्षण उत्पन्न झाले की त्या बाबासाहेबांच्या अस्पृश्यांच्या चळवळीत अनेक रीतीने निरपेक्ष बुद्धीने सहाय्य करीत असत. त्या त्यांना ' डॉक्टरसाहेब ' असे संबोधीत.

बाबासाहेबांच्या जीवनात आणि सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि साहित्यिक कामांत ड्रेशरबाईंचा थोडाबहुत कार्यभाग होता, याबद्दलची माहिती मला१९३६पासून कर्णोपकर्णी ऐकावयास मिळे. मी बाबासाहेबांचे चरित्र लिहावयास १९५० साली सुरवात केली, तेव्हापासून या बाईंशी संपर्क करण्यासाठी प्रयत्न करीत होतो. पण त्या १९४७ सालीच मुंबई सोडून अमेरिकेस गेल्या होत्या. तेव्हा मी त्यांचा अमेरिकेतील पत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला. १९५९ मध्ये सुरू झालेल्या 'मूक नायक' चे संपादक श्री. रमेश कांबळे यांनी मला **W. D. C. S. of the Methodist Church** अग्रीपाडा येथे नेऊन मिस्. जी. क्लायनर यांची भेट घडवून आणली व मला ड्रेशरबाईंचा पत्ता दिला. मी ड्रेशरबाईंना पत्र व पहिल्या खंडाची (प्रसिद्धी १९५३) प्रत पाठविली. त्यांचे उत्तर मला लागलीच २०–१२–५७ ला मिळाले. त्यांत त्यांनी लिहिले होते :– डॉ. आंबेडकर हे हिंदुस्थातील एक थोर पुरुष होऊन गेले. त्यांच्या चरित्रलेखनास मला जेवढी माहिती कळवता येईल तेवढी मी कळवीन. कारण त्यांच्यासंबंधीची माहिती असलेली फाईल मी तयार करून ठेवलेली आहे. मराठीतून

त्यांचे चरित्र लिहिले गेले हे ठीक आहे. परंतु त्यांनी अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगती-साठी किती जिवापाड प्रयत्न केले याची साद्यंत माहिती सर्व जगाला व्हावी **म्हणून तुम्ही त्यांचे चरित्र इंग्रजीत लिहाच,** असे मी सुचविते. मी त्यांच्याबद्दलची माहिती १९५८ च्या सुरवातीलाच पाठवीन.

सदर पत्र मी खाली देत आहे :–

**' Dear Mr. Khairmoday '**

I was very glad to receive your book in Marathi and your letter about our great Dr. Ambedkar. I do wish I could remember Marathi well enough to enjoy reading it, but I find I have forgo-tten it because I have been away from India so long.

I have a file about the Doctor and early in 1958, I shall try to send answers to your questions.

My mother has been very ill for months, has just died; so I will have more time.

I feel Dr. Ambedkar was one of India's great souls and I shall be glad to help in any way with his story.

Do try to write a book in English about him so that the world may know of him and his brave struggle.

Sincerely
sd / Mildred. G. Dresher.

त्या १९५८ च्या सुरवातीस हिंदुस्थानात येण्याची परिस्थिती निर्माण झाली व मला द्यावयाची माहिती समक्ष देण्याचे त्यांनी ठरविले. पण त्या १९५९ च्या मार्चमध्ये मुंबईस आल्या, आणि १७ एप्रिलला सकाळी ९–४५ ला माझ्या घरासमोर दत्त म्हणून उभ्या राहिल्या. माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. कारण आगाऊ काहीच न कळविता त्या माझे घर शोधीत हिंदू कॉलनीत राजगृहातून माझ्या घराचे ठिकाण मिळवून आल्या होत्या. बरोबर क्लायनरबाईही होत्या. त्यांनी मला १८ तारखेस सकाळी ९ वाजता आग्रीपाड्यातील मिशनमध्ये

बोलाविले. ९ ते १२ वाजेपर्यंत त्यांनी मला सर्व मुद्यांवर माहिती दिली. काही मुद्यांवरील माहिती त्यांनी स्वहस्ते लिहून दिली.

मि. माईल्स आर.ड्रेशर हे त्यांचे वडील, माता मिसेस मिनर्व्हा एन्. ड्रेशर मिस मिल्ड्रेडबईचा जन्म ४–१०–१८८८ ला जोन्स (मिचिगन राज्य) शहरात झाला. त्यांचे शिक्षण वेस्टर्न कॉलेज, युनिव्हर्सिटी ऑफ मिचिगन, अमेरिका येथे झाले. निरनिराळ्या विषयांत एम्. ए. झाल्यावर १० वर्षे त्यांनी शिक्षिकेचे काम केले. त्या मेथॉडिस्ट चर्चतर्फे नागपूर येथे समाजसेवा करण्याच्या हेतूने अमेरिकेहून १९२० च्या एप्रिलमध्ये हिंदुस्थानात आल्या. त्यांची नेमणूक नागपूरला झाली. तेथे त्यांनी ' मेकोसा बाग नॉर्मल स्कूल ' हे सुरू केले व नावारूपाला आणले. त्यांची बदली मुंबईस १९३५ साली झाली. तेव्हापासून १९४७ पर्यंत त्या आग्रीपाडा मिशन सेंटरच्या प्रमुख म्हणून काम करीत होत्या. १९४७ ला सेवानिवृत्त होऊन त्या मायदेशी परत गेल्या.

बाबासाहेबांनी १६–१०–३५ ला येवले येथील परिषदेत धर्मांतराची घोषणा केली, तेव्हापासून त्यांनी सुरू केलेल्या धर्मांतराच्या चळवळीला बराच जोर आला. अस्पृश्यांना आपल्या धर्मात आणण्यासाठी मुसलमान, ख्रिश्चन, शीख, वगैरे धर्माधिकारी व पुढारी यांचे प्रयत्न चालू होते. अस्पृश्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करावा, यासाठी अनेक ख्रिस्ती पुढारी हिंदुस्थानात व बाहेर प्रयत्न करीत होते. त्यांत डॉ. हेन्री हिट् क्रेन हे धर्मांतराच्या चळवळीचे निरीक्षण करण्यासाठी अमेरिकेहून १९३५ च्या नोव्हेंबरमध्ये आलेले होते. त्यांनी वर्ध्याला जाऊन गांधींजी बरोबर या चळवळीबद्दल चर्चा केली. अस्पृश्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर अस्पृश्यांची सर्वांगीण उन्नती करण्याचे प्रयत्न ख्रिस्ती देश करतील व त्याबद्दल भारताला व हिंदूना वाईट वाटण्याचे कारण नाही; असा पक्ष (मनोदय) डॉ. क्रेन यांनी गांधीजींच्यापुढे मांडला व त्याला त्यांचा पाठिंबा अप्रत्यक्षपणे मागितला. पण गांधीजींनी तसे करण्याचे साफ नाकारले. खुद्द अस्पृश्य लोक ख्रिस्ती धर्माचा स्वीकार स्वखुषीने करीत असतील तर त्यांना कोणताही अडथळा आणण्याचा हक्क नाही. परंतु अस्पृश्यांनी धर्मांतर करू नये, हिंदुधर्मात राहूनच आपल्या हक्कांसाठी झगडत रहावे, असे गांधीजींनी मत प्रदर्शित केले. त्यानंतर डॉ. क्रेन मुंबईस बाबा–साहेबांना भेटण्यास आले. ते आग्रीपाडा मिशनमध्ये उतरले होते. मिस् ड्रेशरबाईंनी बाबासाहेबांची भेट घेऊन त्यांना आपल्याकडे, १९३५ च्या डिसेंबरमध्ये चहाचे आमंत्रण दिले. त्यावेळी डॉ. क्रेन व बाबासाहेब यांची धर्मांतराबद्दल व निर–

निराळ्या धर्माबद्दल जी चर्चा झाली, तीत बाबासाहेबांच्या प्रकांड पांडित्याचे प्रदर्शन झाले. डॉ. क्रेन अक्षरशः दिपून गेले आणि ड्रेशरबाई स्तिमित झाल्या. बाबासाहेबांनी ख्रिस्तीधर्म स्वीकारावा अशी जी त्यांची इच्छा होती ती सफल होईल, असे मात्र बाबासाहेबांची चर्चा ऐकून, त्यांना वाटले नाही. मात्र तेव्हा–पासून ड्रेशरबाईंनी साहेबांच्याकडे आपले येणे जाणे चालू ठेवले व साहेबही त्यांच्याकडे वेळोवेळी चहाला, जेवायला व इतर कामांकरता जाऊ लागले. कधी–कधी श्री. भाटिना हेही तेथे साहेबाच्या बोलण्यावरून येत. ते साहेबांच्याबरोबर कोलंबिया युनिव्हर्सिटीत होते (१९१३ ते १९१६). तेथे यांच्या गप्पाष्टकांना मोठा रंग चढे. १९३८ सालात ड्रेशरबाईंचा व साहेबांचा इतका घनिष्ट संबंध आला की, ते ड्रेशरबाईंना हक्काने जेवण तयार करावयास लावीत असत. याबद्दलची एक साहेबांची चिठ्ठी ड्रेशरबाईंनी मला दाखविली. ती अशी :–

' High Court Library, Bombay,
Dear Miss D.

Will be on my legs in a moment, dinner at your place would suit me better.

yours,
sd/ B. R. A. 2-12-38 '

याच सुमारास मुंबई प्रांतातील ख्रिस्ती लोकांची वार्षिक परिषद (Bombay Christian Annual Conference of the Methodist Church) पुण्यात भरविण्याचे ठरविले होते. सदर परिषदेत साहेबांनी भाषण करावे, म्हणून त्यांना संयोजकातर्फे ड्रेशरबाईंनी आमंत्रण देऊन विनंती केली. तेव्हा ड्रेशरबाईंना. साहेबांनी खालील उत्तर पाठविले :–

' Bhimrao R. Ambedkar
M. A., Ph. D., D. Sc., Barrister at-law

Rajagraha,
Dadar,
Bombay 14.
15-12-38

Dear Miss Drescher,

Thank you for your letter. I am hoping to come to Poona, on the 17th Saturday. But I feel that things may turn out in such a way that I shall have to be in Bombay for the week-end. There is a very big appeal which has been entrusted to me

yesterday. If it does not come for hearing on Monday next I shall be free to come. But if does, then I am afraid I shall have to remain here io instruct. I shall be verv sorry, if I am detained. I am trying to get it postponed. But the pleader instructing me is not willing. He says the parties have come here and wish to have the matter disposed of before the H. C. closed for vacation. However I am still trying.

If I come, I will come on Saturday by the morning express which reaches Poona about 11-45

Wishing the conference every success, I am yours sincerely;

sd/ B. R. Ambedkar '

या चरित्रग्रंथाचे काही भाग प्रसिद्ध करणारे, डॉ. आंबेडकर एज्युकेशन सोसायटीचे काही कार्यकर्ते यांना आणि मला १९६३ च्या मे मध्ये ड्रेशरबाईंना पुन्हा भेटण्याचा योग आला. तेव्हा त्यांनी आमचे आदरातिथ्य करून दोन फोटोही घेतले व आमच्याशी चर्चा केली. यावेळी त्या शांतिमिशनच्या प्रमुख होत्या व लगेच खाटमांडूला जाणार होत्या. त्यावेळी त्या ७५ वर्षांच्या असताना एखाद्या २५ वर्षीय तरुणीच्या उत्साहाने वावरत होत्या. माझ्याकडून त्यांनी मिस् झेलिएट ( अस्पृश्य चळवळीचा अभ्यास करणाऱ्या ) यांचा पत्ता घेतला. पुढे त्यांची भेट न्यूयॉर्क येथे झाली.

# खंड सहावा

# परिशिष्ट

# CASTE AND CONVERSION

DR. B. R. AMBEDKAR

The instinct of self-preservation is responsible for the present upheaval in the Hindu Community. There was time when the elite of the society had no fear about its preservation. Their argument, was that the Hindu community was one of the oldest communities that had withstood the onslaught of many adverse forces and therefore there must be some native strength and stamina in its culture aud civilization as to make it survive. They were therefore firm in their belief that their community was destined ever to survive. Recent events seem to have shaken this belief. In the Hindu - Muslim riots that have taken place all over the country in recent times it has been found that a small band of Muslims can beat the Hindus and beat them badly. The elite of the Hindus are therefore reflecting afresh upon the question whether such a kind of survival in the struggle for existence is of any value. The proud Hindu who always harped upon the fact of survival as a proof of his fitness to survive never stopped to think that survival was of many types and not all are of equal value. One can survive by marching against the enemy and conquering him. Or one can survive by beating a retreat and hiding oneself in a position of safety. In either case there would be survival. But certainly the value of the two survivals is measu-

res apart. What is important is not the fact of survival but the plane of survival. Survive the Hindus may, but whether as free men or slaves is the issue. But the matter seems so hopeless that granting that they manage to survive as slaves it does not seem to be altogether certain that they can survive as Hindus. For they are not only beaten by the Muslims in the physical struggle but they seem also to be beaten in the cultural struggle. There is in recent days a regular campaign condcuted vigorously by the Muslims for the spread of Islamic culture and by their conversion movement, it is alleged, they have made vast additions to their nnmerical strength by winning over members of the Hindu faith. Fortunately for the Muslims there is a large mass of non-descript population unmbering about seven crores which is classed as Hindus but which has no particular affinity to the Hindu faith and whose position is made so intolerable by that faith that they can be easily induced to embrace Islam. Some of these are going over to Islam and yet more may go.

This is sufficient to cause alarm among the elite of the Hindus. If with a superiority of numbers the Hindus are unable to face the Muslims what would be their fate if their following was depleted by conversions to Islam ! The Hindus feel that they must save their people from being lost to them and their culture. Here in lies the origin of the Shuddhi Movement or the movement to reclaim people to the Hindu faith.

Some people of the orthodox type are opposed to this movement on the ground that Hindu religion was never a proselytizing religion and that a Hindu must be so by birth. There is something to be said in favour of this view. From the commencement of time to which memory or tradition can reach back proselytism has never been the practising creed of the Hindu faith. Professor Max Muller, the great German Savant and Oriental scholar in an address delivered by him in the nave of Westminister Abbey on the 3rd of December 1873, Day of Intercession for Missions, emphatically declared that the Hindu Religion was a non-missionary religion. The orthodoxy which

refuses to believe in expediency may therefore feel well grounded in its opposition to Shudhi, as a practice directly opposed to the most fundamental tenets of the Hindu faith. But there are other authorities of equally good repute to support the promoters of the Shudhi movement, for it is their opinion that the Hindu Religion has been and can be a missionary religion. Prof. Jolly, in an article. " DIE AUSBREITUNG DER INDISCHEN KULTUR ". gives a graphic description of the means and methods adopted by the ancient Hindu Rulers and Priests to spread the Hindu religion among the aborigines of the country. The late Sir Alfred Lyall who wrote in reply to Prof. Max Muller also sought to prove that the Hindu religion was a missionary religion. The probability of the case seems to be definitely in favour of Jolly and Lyall. For unless we suppose that the Hindu religion did in some degree do the work of proselytization it is not possible to account for its spread over a vast continent, inhabited by diverse races which were in possession of a distinct culture of their own. Besides, the prevalance of certain YAJNAS and YAGAS cannot be explained except on the hypothesis that there were ceremonies for the Shudhi of the Vrataya. We may therefore safely conclude that in ancient times the Hindu religion was a missionary religion. But that owing to some reason it ceased to be so long back in its historical course.

The question that I wish to consider is why did the Hindu religion cease to be a missionary religion. There may be various explanations for this, and I propose to offer my own explanation for what it is worth. Aristotle had said that man is a social being. Whatever be the cogency of the reasons of Aristotle in support of his statement, this much is true that it is impossible f r any one to begin life as an individualist in the sense of radically separating himself from his social fellows. The social bond is established and rooted in the very growth of self-consciousness. Each individual's apprehension of his own personal self and its interests involves the recognition of others and their interests; and his pursuit of one type of purposes, generous or selfish, is in so far the pursuit of the other also. The social

relation is in all cases intrinsic to the life, interests, and purposes of the individual; he feels and apprehends the vitality of social relations in all the situations of his life. In short, life without society is no more possible for him than it is for a fish out of water.

Given this fact it follows that before a society can make converts it must see to it that its constitution provides for aliens being made its members and allowed to participate in its social life. It must be used to make no difference between individuals born in it and individuals brought into it. It must be open to receive him in the one case as in the other and allow him to enter into its life and thus make it possible for him to live and thrive as a member of that society. If there is no such provision on conversion of an alien, the question would at once arise where to place the convert. If there is no place for the convert, there can be no invitation for conversion nor can there be an acceptance of it.

Is there any place in the Hindu society for a convert to the Hindu faith? Now the organization of the Hindu society is characterized by the existence of castes. Each caste is endogamous and lives by antogeny. In other words it only allows individuals born in it to its membership and does not allow any one from outside being brought into it. The Hindu Society being a federation of castes and each caste being self-enclosed there is no place for the convert, for no caste will admit him. The answer to the question why tre Hindu Religion ceased to be a missionary religion is to be found in the fact that it developed the caste system. Caste is incompatible with conversion. So long as mass conversion was possible the Hindu Society could convert, for the converts were large enough to form a new caste which could provide the elements of a social life from among themselves. But when mass conversions were no more and only individual converts could be had, the Hindu Religion had necessarily to cease to be missionary for its social organization could make no room for the incoming convert.

I have not propounded this question as to why the Hindu Religion ceased to be missionary simply to find an opportunity for obtaining credit for originality of thought by offering a novel explanation. I have propounded the question and given an answer to it because I feel that both have a very important bearing upon the Shudhi movement. Much as I sympathise with the promoters of that movement, I must say that they have not analysed the difficulties in the way of the success of their movement. The motive behind the Sudhi movement is to increase the strength of the Hindu Society by increasing its numbers. Now a society is strong not because its numbers are great but because it is solid in its mass. Instances are not wanting where a solid organized band of fanatics have routed a large army of disorganised crusaders. Even in the Hindu Muslim riots it has been proved that the Hindus are beaten not only where they are weak in numbers, but they are beaten by the Muslims even where the Hindus preponderate. The case of Moplahs is in point. This alone ought to show that the Hindus suffer not from want of numbers but from want of solidarity. To increase solidarity of the Hindu Society one must tackle the forces which have brought about its disintegration. My fear is that mere Shudhi, instead of integrating the Hindu Society, will cause greater disintegration and will annoy the Muslim community without any gain to the Hindus. In a society composed of castes shudhi brings in a person who can find no home and who is therefore bound to lead an isolated and separate existence with no attachment or loyalty to any one in particular. Even if shudhi were to bring into the Hindu fold a mass like the Malkana catch of Shradnanand, it will only add one more caste to the existing number. Now the greater the castes the greater the isolation and the greater the weakness of the Hindu society. If the Hindu society desires to survive, it must think not of adding to its numbers but increasing its solidarity and that means the abolition of caste. The abolition of castes is the real Sanghatan of the Hindus and when Sanghatan is achieved by the abolishing of castes, shudhi will be necessary and if practised will be gainful of real strength. With the castes in existence, it is impossible and if practised, would be harmful

to the real Sanghatan and solidarity of the Hindus. But somehow the most revolutionary and ardent reformer of the Hindu Society shies at the idea of abolition of the caste and advocates such puerile measures as the reconversion of the convrted Hindu, the ehanging of the diet and the starting of Akhadas. Someday it will dawn upon the Hindus that they cannot save their society and also preserve their caste. It is to be hoped that that day is not far off.

( From Telagu Samachar—
Sankranti special issue, Jan. 1925 )

# आधारभूत वाङ्मय

## मराठी

| | |
|---|---|
| १) खैरमोडे चां. भ. | डॉ. आंबेडकर चरित्र खंड १ ला ( द्वि. आ. ) |
| २) पं. श्री. दा. सातवळेकर | १) पुरुषसूक्त, त्याचा अर्थ, भावार्थ आणि स्पष्टीकरण.<br>२) ऋग्वेदाचे मराठी भाषांतर |
| ३) महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव | पुरुषसूक्त |
| ४) साखरे महाराज | सार्थ ज्ञानेश्वरी |
| ५) शं. वा. दांडेकर | सार्थ ज्ञानेश्वरी |
| ६) चिं. वि. वैद्य<br>७) वि. का. राजवाडे | निबंध, ( इतिहास संशोधन मंडळ. ) |

## वर्तमानपत्रे, मासिके व नियतकालिके

1) **The Bombay Chronicle**
2) **Indian Wittness**
3) **The Times of India**
४) केसरी
५) जनता
६) जन्मभूमी
७) जामे जमशेद
८) दैनिक त्रिकाळ
९) दीनमित्र
१०) नवाकाळ
११) नवा मनु
१२) नवयुग
१३) पुरुषार्थ
१४) प्रभात
१५) प्रमोद
१६) बहिष्कृत भारत
१७) मुंबई समाचार
१८) राष्ट्रवीर
१९) लोकसत्ता
२०) लोकमान्य
२१) लोकशक्ती
२२) विहार
२३) वैनतेय

## English


1) **Bhagat Laxman Sing** — Sikh Martyrs ( 1924 ).

2) **Chhabra G. S.** M. A.; Ph. D. ( Head of the Post-Graduate Department of History ) — History of the Punjab. ( 1849 - 1901, Octo. 1962 )

3) **Ganga Sing Gyani, B. A.** ( Religious Teacher and Preacher, Gurudwar, N.D.A., Khadakvasala ) — Lives of Sikh Gurus and Basic Principles of Sikhism.

4) **Khushwant Sing :** — A History of Sikhs. Vol. I ( 1469 - 1839, 1962 )

5) **Sardar Sing Rataval** M. A. — The Khalsa ( 1954 )

6) **Teja Sing** M. A. —
1) Sikhism-Its Ideas and Instruetions, (1938)
2) Guru Nanak and his Mission ( 1957 ).

7) **Chabra** — Social and Economic History of Punjab

8) **Fallen girl** — The biography of an educated Hindu fallen girl

9) **Dr. G. S. Ghurye** — Caste, Class and Occupation

10) **Godfray Philip** — The untouchables' Question

11) **G. H. Hutton** — Caste in India

12) **Khalida Khanum** — Inside India

13) **Robertson Alexander** — The Mahar Folk

14) **Walts Martha** — The Men In My Life

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र

## खंड सातवा

### प्रकरण १ ले

## स्वतंत्र मजूर-पक्ष

१९३५ च्या कायद्यान्वये हिंदुस्थानात नवीन कायदे मंडळाच्या निवडणुका १९३७ च्या जानेवारीत होण्याची चिन्हे दिसू लागली. तेव्हा या निवडणुका अस्पृश्यांच्या वतीने कशा लढवाव्या ? हा एक साहेबांच्यापुढे प्रश्न होता. १९२४ ते १९३५ च्या दरम्यान साहेबांनी अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जी चळवळ चालविली ती बहिष्कृत हितकारिणी सभेच्या मार्फत. १९३० ते १९३५ च्या काळात काँग्रेस, हिंदुमहासभा वगैरे मातब्बर राजकीय पक्षांनी साऱ्या हिंदुस्थानच्या पुढारी-पणाचे नेतृत्व आपल्याकडे घेण्यासाठी जो अश्वमेध सुरू केला त्यात या पक्षांच्या अश्वांचा लगाम साहेबांनी पकडून ते अश्व अस्पृश्यांच्या राजकीय क्षेत्रातून दूर उभे केले व अस्पृश्यांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व या पक्षांच्या अश्वमेधाच्या यज्ञात पडू दिले नाही. लंडन येथील वर्तुळ परिषदेत आणि पुणे कराराच्या वेळी प्राणपणाने लढा देऊन साहेबांनी अस्पृश्यांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व व हक्क मिळविले. या राजकीय हक्कांचा उपयोग अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी करण्यासाठी त्यांनी

विस्तृत भूमिका तयार करण्याचे ठरविले. अस्पृश्यांसाठी राजकीय पक्ष स्थापावा व त्यातर्फे अस्पृश्यांना जे १९३५ च्या कायद्याने राजकीय हक्क दिलेले आहेत त्यांचा भरपूर फायदा घेऊन अस्पृश्यांत जादा राजकीय आकांक्षा उत्पन्न कराव्यात, असे विचार निवडणुका जसजशा जवळ आल्या तसतसे बाबासाहेबांच्या मनात घोळू लागले. या बाबतीत सहकाऱ्यांशी विचार विनिमय करता त्यांना असे वाटू लागले की १९३५ च्या कायद्यान्वये जे राजकीय हक्क मिळालेत ते तर त्यांना मिळविता येतीलच, पण स्पृश्य लोकांकरिता जे राजकीय हक्क मिळालेत त्यांना मतांचा पाठिंबा देऊन इतर उमेदवारही आपण निवडून देऊ शकू. हे विचार मनात येताच साहेबांनी राजकीय पक्ष जातीय पायावर न उभारण्याचे ठरविले. आतापर्यंत अस्पृश्यांचा लढा मर्यादित स्वरूपाचा होता. त्याला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी कामगार शेतकरी यांच्या लढ्यांशी अस्पृश्यांचा लढा संलग्न करण्याचे ठरविले. त्यासाठी अखिल भारतीय स्वरूपाचा राजकीय पक्ष प्रस्थापित करण्याचे त्यांनी ठरविले. पक्षाची घटना आणि त्याचे ध्येय व कार्यक्रम त्यांनी ठरविले, ते इंग्लंडमधील ब्रिटिश लेबर पार्टीचा आदर्श पुढे ठेवून. वर्तुळ परिषदेच्या निमित्ताने बाबासाहेबांना लंडनला पाच वेळा जावे लागले व तेथे प्रत्येक वेळेला काही महिने राहावे लागले. तेव्हा त्यांना मजूर पक्षाचे पुढारी, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी परिचय करून घेण्याची व चर्चा करण्याची संधी मिळालेली होती. त्यावेळी त्यांनी ब्रिटिश मजूर पक्षाची घटना, कार्यक्रम वगैरे संबंधीचे वाङ्मय अभ्यासलेले होते. त्यातूनच त्यांनी आपल्या पक्षाची घटना, कार्यक्रम व ध्येय ही ठरविली. बाबासाहेबांनी नवीन पक्षाचे '**Independent Labour Party**' **स्वतंत्र मजूर पक्ष** असे नामाभिधान केले.

भारताच्या राजकारणात १८८५ पासून कॉंग्रेस ही राजकीय संस्था चळवळी करीत आली. तिच्यात १९०० ते १९०८ च्या दरम्यान मवाळ आणि जहाल गट उत्पन्न झाले. १९०४ ते १९०८ या काळांत दहशतवादी तरुणांचे सशस्त्र क्रांतिवादी गट उत्पन्न झाले. ते बंगाल प्रांतात, पंजाबात आणि महाराष्ट्रात अनुक्रमे युगांतर गट, अनुशीलन गट आणि अभिनव भारत गट म्हणून काम करू लागले. १९२० ते १९३० च्या काळातील कॉंग्रेसच्या चळवळीतील सारे पुढारी आणि कार्यक्रम, यांच्याबद्दल सुशिक्षित तरुण पिढीला ( कॉंग्रेसमधील ) फारसे आकर्षण वाटेना. समाजवाद व साम्यवाद यांचे आकर्षण त्यांना जास्त वाटू लागले व दोन्ही वादांचा सखोल अभ्यास केला. १९३० ते १९३५ च्या दरम्यात जे तरुण तुरुंगात होते त्यांना या वादांवर वाचन, वादविवाद व विवेचन करण्यास भरपूर वेळ

मिळाला. त्यांनी १९३४ साली काँग्रेसांतर्गत समाजवादी ( काँग्रेस सोशालिस्ट पार्टी ) पक्ष काढला. दहशतवाद्यांनी साम्यवाद स्वीकारला. १९२६–२७ सालात कम्युनिस्ट पार्टी अस्तित्वात आलीच होती तीत ते गेले. त्यांच्यातील काहीजणांत मतभेद उत्पन्न झाले. त्यांनी रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, बोल्शेव्हिक पार्टी ऑफ इंडिया, सोशियालिस्ट रिपब्लिकन पार्टी, बोल्शेव्हिक पार्टी, सोशियालिस्ट युनिटी सेंटर, बोल्शेव्हिक मजदूर पार्टी ऑफ इंडिया, रिव्होल्युशनरी वर्कर्स पार्टी, देशसेवक पार्टी, बिहार किसान सभा, वर्कर्स अॅन्ड पेझंटस् पार्टी, वर्कर्स अॅन्ड पेझंट्स लीग, किसान मजदूर पार्टी, कृषीकर लोक पार्टी इत्यादी नवे पक्ष १९३४ च्या नंतर काढले. १९३९ मध्ये सुभाषबाबूंनी काँग्रेसच्या बाहेर पडून **फॉरवर्ड ब्लॉक** नावाचा पक्ष काढला. यात मार्क्सिस्ट विचारसरणीचे लोक जास्त होते. ( Party Politics In India - Myron Weiner ) एवढ्या प्रचंड संख्येच्या राजकीय पक्षांत बाबासाहेबांनी आपल्या पक्षाची भर टाकली. पक्षाचा जाहीर-नामा व कार्यक्रम तयार करण्यासाठी साहेब बैठक मारून बसले व तो त्यांनी तीन–चार दिवसात तयार केला. पक्षाची घटना व ध्येय ठरविताना त्यांनी इंग्लंडच्या लेबर पार्टीला नजरसमोर ठेवलेले होते. इंग्लंडची लेबर पार्टी मंगळवार २७ फेब्रुवारी १९०० रोजी मेमोरियल हॉल, फॅरिग्डन स्ट्रीट, लंडन येथील ५, ६८,००० कामगारांच्या ६५ ट्रेड युनियन्सच्या १२९ प्रतिनिधींच्या सभेत निर्माण करण्यात आली. मजुरांच्या प्रश्नांना यापूर्वी इंग्लंडच्या राजकारणात प्राधान्य मिळवून देण्यात केर हार्डी यांनी आपले सहकारी जॉन बर्नस, बेन टिलेट, विलथॉर्न, जेम्स सेक्स्टन इत्यादींच्या, सहकार्याने खाण मजूरांचे प्रश्न धसास लावले. कारण हे सर्वजण खाणींत काम करणार लोक होते. केर हार्डी हा पार्लमेंटमध्ये मजुरांतर्फे निवडून आला. जॉन बर्नस हा लिबरल गव्हर्नमेंटचा १९०५ मध्ये पहिला मजूर–मंत्री म्हणून घेण्यात आला. या पक्षाला रॅम्से मॅक्डोनाल्ड, फिलिप स्नोडन वगैरे लोक पुढे मिळाले. या पक्षात स्त्रियाही कार्यकर्त्या होत्या. मार्गारेट बाँडफिल्ड ही या पक्षाची कार्यकर्ती १९३० सालात मंत्री झाली.

गरिबी व श्रीमंती यांच्यावर चिकित्सक बुद्धीने विचार करणारे तरुण १८५० नंतर इंग्लंडमध्ये पुढे येऊ लागले. त्यांनी १८७९ मध्ये फेबियन सोसायटी स्थापन केली. हे चिकित्सक लोक आपले लहान–मोठे ग्रंथ या संस्थेतर्फे प्रसिद्ध करून गरिबीचा नायनाट केला पाहिजे, नाहीतर इंग्लंडमध्ये फ्रेंच क्रांतिप्रमाणे रक्तपात होईल अशी मते जनतेपुढे मांडू लागले. या लोकांत रॉबर्ट ब्लॅंच, फोर्ड,

जॉर्ज, बर्नार्ड शॉ, सिडने वेब, बीट्रिस वेब, अॅनी बेझंट, हॅवलॉक एलिस, रॅम्से मेकडोनल्ड वगैरे लोक होते. त्यांचा केर हार्डी व लेबर पार्टी यांना जोराचा पाठिंबा होता

हा मजूर-पक्ष म्हणजे केर हार्डीचा इंडिपेडंट लेबर पार्टी व इतर कामगारांचे पक्ष यांचा झालेला ( १९०० ) संमिश्र पक्ष होय. यात अनेक लोकांचे हेवेदावे असत. पण ते पक्षात फूट पडू देत नसत. मॅक्डोनल्ड व वेब यांचे जमत नसे व या दोघांचे इतरांशी जमत नसे. हेंडरसन हा सर्वांचा दुवा होता. याने मॅक्डोनल्ड व वेब यांना एकत्र करून सोशालिस्ट पार्टी १९१८ च्या फेब्रुवारीत जन्मास घातली. तर मुख्य पक्ष जो कामगार पक्ष तो अस्तित्वात होताच व त्याच्यातर्फेच मरजांचे सर्व प्रश्न हाताळले जात होते. हा पक्ष इंग्लंडमध्ये १९२४ आणि १९२९ साली सत्तारूढ झाला. शेवटी १९४५ मध्ये सत्तारूढ होऊन याच पक्षाने हिंदुस्थानास स्वातंत्र्य १९४७ साली दिले. ( Fifty Years March – The Rise of the Labour party by Francis Williams )

## THE HUNGRY HEARTH-A ROMANTIC BIOGRAPHY OF JAMES KEIR HARDIE BY JOHAN COCKBURN [ 1956 ]

या ग्रंथात मि. हार्डी यांचे चरित्र आणि मजूर पक्षाचा इतिहास दिलेला आहे. विसाव्या शतकाच्या सुरवातीस साम्राज्याचा विस्तार अखिल जगावर पसरला होता व त्यामुळे " ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही " असे काहीसे दर्पाने व काही अंशी अभिमानाने भरलेले उद्‌गार काढण्यात येत असत. त्या साम्राज्याची राज्यसूत्रे इंग्लंडच्या कामगार पक्षाने १९२५ च्या सुमारास प्रथम हाती घेतली आणि त्यानंतर १९४५ ला दुसऱ्यांदा घेतली व भारताला संपूर्ण स्वातंत्र्य १९४७ ला दिले. त्या कामगार पक्षाचा आद्यजनक जेम्स् कीर हार्डी हा डेव्ही हार्डी व मेरी हार्डी या स्कॉटिश दांपत्याचा पहिला मुलगा. डेव्ही हा ग्लासगो येथे कोळशाच्या खाणी व डॉक यार्ड येथील कामगार होता. तो मालवाहू बोटीवरही मजूर म्हणून काम करीत असे. गलिच्छ आणि घाणेरड्या वस्तीत हे कुटुंब दैन्यावस्थेत जीवन कंठीत असता कामगार - अपघात झाल्यामुळे डेव्ही याला सहा महिने औषधोपचाराशिवाय त्या घाणेरड्या वस्तीत अंथरुणावर पडून रहावे लागले. कुटुंबाला एक वेळचे तरी अल्प जेवण मिळावे म्हणून जेमीला ( जेम्स ) एका भटारखान्यात व कारखान्यात वयाच्या सातव्या वर्षी काम धरावे लागले. त्यानंतर

तो नवव्या वर्षी कोळशाच्या खाणीत काम करू लागला. वयाच्या पंधराव्या वर्षी तो रात्रीच्या शाळेत शिकू लागला. वयाच्या सातव्या वर्षापासून बाविसाव्या वर्षापर्यंत तो दररोज १२ ते १४ तास काम करी. खाणींतील मजुरांचे जीवन सुधारण्या-साठी आपण काहीतरी केले पाहिजे, हा प्रकाश त्याच्या डोक्यात पडला. निरनिराळे धार्मिक पंथ, फ्रान्स, रशिया, जर्मनी व बेलजियम येथील क्रांतिकारक विचारांचे लेखन यांची लहान पुस्तके आणि मोठे ग्रंथ वाचून, कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगेल्स, लेनिन यांच्या विचारांचा हार्डीच्या मनावर पगडा बसला. रशियाच्या सरदार घराण्यातील महाक्रांतिकारक लेखक व प्रचारक प्रिन्स क्रोपॉटकिन यांच्याही विचा-रांनी त्याला घेरले होते. पण तो दरिद्री मजूरांत वाढलेला असल्यामुळे आणि दरिद्री लोकांत धर्माचा व भक्तिभावनेचा खोलवर परिणाम झालेला असल्यामुळे, त्याचा खिस्ती धर्माकडे फार ओढा होता. त्यामुळे त्याने समाजवादाचा स्वीकार जरी केला तरी त्याला तो खिस्ती समाजवादाचे स्वरूप देऊन तो त्याचा खाणी मजुरांत प्रचार करू लागला. फेबियन सोसायटीतील फिलीप स्नोडन, बर्नार्ड शॉ, सिडने वेब ( लॉर्ड पासफील्ड ) व त्यांची पत्नी बीयॅट्रिस वेब इत्यादिकांच्या संसर्गामुळे त्याची दृष्टी विशाल होत गेली. त्याने खाणी मजुरांच्या युनियन्स स्थापन केल्या व त्यांतर्फे अनेक संप यशस्वी करून मजुरांच्या पगारात वाढ, राहावयाच्या घरांत सुधारणा वगैरे सुधारणा घडवून आणल्या व कामगारांचे अत्यंत हीन दर्जाचे जीवन सुखावह केले.

त्याने प्रथम खिश्चन सोशालिस्ट पार्टी स्थापन केली व त्यानंतर स्कॉटिश लेबर पार्टी स्थापन केली. " मायनर " हे पाक्षिक सुरू केले व नंतर त्याचे रूपांतर " लीडर " या नावात केले १८८७ च्या मे महिन्यात स्कॉटिश पार्लमेंटरी लेबर पार्टी स्थापन केली. १८९३ मध्ये तिचे रूपांतर इंडिपेंडंट लेबर पार्टीत ( स्वतंत्र मजूर पक्ष ) करण्यात आले. ( पा. १४०–४४ ). या पक्षातर्फे पुंजीपती व गतानुगतिकवाला चिकटून राहाणारा मध्यम वर्ग यांची राजकीय, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील दादागिरी नष्ट केली, तरच कामगार व मजूर वर्गाला त्या क्षेत्रांत प्रवेश मिळेल, अशी विचारसरणी तो या पक्षातर्फे आपले वर्तमानपत्र व इतर वर्तमापत्रे आणि सभा व परिषदा यांतून प्रसृत करू लागला. कामगार आणि मजूर यांना संघटित करण्यासाठी व पक्षाचे आसन स्थिर करण्यासाठी हार्डीने अक्षरशः आमरण निर्धन अवस्था स्वीकारली.

A few generations hence, all that will be left of the landlord tribe, will be a preserved specimen with the inscription. " This monster used to roam the earth & swallow up the home happi-

nes of the common people, but being found not worth his keep, was allowed to die out it took too much to keep him....." The rich & comfortable classes have annexed Jesus and have perverted his Gospel, Thrice Kingdom did not refer to heaven in the future. The Kingdom of God meant the establiment, right here on earth, of a condition of things in which human life would be beautiful and would be free to develop along God-like lines. Christianity can never be realised until the very idea of private property has disappeared from men's minds — — —"

( — The Hungry Hearth, page 133 )

खाणीचा मालक, जमीनदार, सरदार, अमीर उमराव हे आपल्या मजुरांना, कामगारांना आणि गुलामांना आपल्या इस्टेटीवर दिवसाचे १८ तास राबवून त्यांच्या श्रमावर गब्बर होत असत व हे मजूर कामगार व गुलाम पशूचे जीवन व्यतीत करीत असत. इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड येथील धर्मोपदेशकांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार आशिया, आफ्रिका व ऑस्ट्रिया या खंडात करण्यासाठी शेकडो मिशन्स स्थापन केली व या मिशन्सना हे श्रीमंत लोक लाखो पौंडाच्या देणग्या देत. तेव्हा धर्मोपदेशक या लोकांना चर्चमधील आपल्या भाषणांत गौरव–पूर्वक आशीर्वाद देत व सरकार त्यांना मोठमोठे किताब देत. त्यामुळे सर्वसाधारण समाजात या व्यक्ती बडी-बडी धेंडे होऊन जात व पार्लमेंटमध्ये निवडून येत. ही धेंडे आपली संपत्ती व पत दिवसेदिवस जेणेकरून वाढेल असेच कायदे करीत. मजूर, कामगार व गुलाम यांची परिस्थिती सुधारण्यासाठी कायदे करण्याची कल्पना यांना कधीच सुचली नाही व तसे कोणी कायदा करण्याचे योजिले तर त्याला ते कसून विरोध करीत. तेव्हा असला वर्ग नष्ट करावा व त्याची पदार्थ-संग्रहालयात एक भूतपूर्व कुतूहलजनक वस्तू म्हणून स्थापना करावी, आणि हे कार्य मजूर-पक्ष करील असे जेमीने जे उद्‌गार एका सभेत काढले होते, ते वर उद्‌धृत केलेले आहेत. या श्रीमंत व सुखलोलुप लोकांनी येशू ख्रिस्ताला आपल्या मुठीत ठेवून त्याच्या धर्मोपदेशाचा संपूर्ण विपर्यास केलेला आहे. जर प्रत्येकजण माझ्या धर्मोपदेशाप्रमाणे वर्तन करील, तर परमेश्वराचे राज्य येथे, या पृथ्वीवर स्थापन होईल असा येशूने लोकांना उपदेश केला आणि या उपदेशाचा विपर्यास या लोकांनी असा केला की, प्रत्येकजण जर आपापले कार्य काही कुरकूर न करता करील तर जे ईश्वराचे राज्य स्वर्गात होणार आहे त्यात या लोकांना प्रवेश मिळेल.

मजूर पक्षाचा पहिला अध्यक्ष कनिंगहेम ग्रॅहम हा श्रीमंत गृहस्थ झाला. चिटणीस जेमी हार्डी. संपूर्ण दारुबंदी, वरिष्ठ कायदे मंडळ ( House of Lords ) नष्ट करणे, सर्व जमिनी, खाणी, रेल्वे व बँका यांचे राष्ट्रीयीकरण, मोफत शिक्षण इत्यादी या पक्षाची ध्येये जाहीर करण्यात आली (पान १४०–४१). या पक्षातर्फे हार्डी पार्लमेंटमध्ये निवडून आला तो पार्लमेंटमधील पहिला प्रतिनिधी म्हणून. हे पार्लमेंटच्या इतिहासात पहिलेच उदाहरण होय. पुढे मजूर पक्षाचा जोरदार प्रसार चोहोकडे झाला व कामगारांतूनच लोक पार्लमेंटमध्ये निवडून येऊ लागले. याचे कारण, हार्डीने मजूर व कामगार यांना मतदानाचा हक्क पार्लमेंट–मध्ये सतत १० वर्षे झगडत राहून मिळवून दिला १९०६ च्या निवडणुकीत २९ मजूर प्रतिनिधी मजूर पक्षातर्फे निवडून आले (पान २०८–२१०). जेमी मॅक्स्टन (ग्लासगो येथील शिक्षक), जिम् थॉमस, क्लेमंट ॲटली (लंडनच्या पूर्व भागातील निष्ठावंत कामगारांचा प्रतिनिधी), मॅक्डोनल्ड, बेल्स फोर्ड वगैरे तरुण कार्यकर्त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचा विस्तार केला. तो इतका की कॉन्झर्वेटिव (हुजूर पक्ष) आणि लिबरल (उदारमतवादी पक्ष) पक्षावर मात करून या पक्षाने राज्याचा सूत्र दोनदा (१९२४ व १९३०) हातात घेतली.

बाबासाहेबांनी इंडिपेंडंट लेबर पार्टी या नव्या पक्षाची घटना, ध्येय व कार्य-क्रम याबद्दलचा वृत्तांत टाईम्स ऑफ इंडियाच्या १५ ऑगस्ट १९३६ (शनिवार) या अंकात प्रसिद्ध केला. तो पुस्तिकेच्या रूपाने १९३७ साली श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई येथे छापून प्रसिद्ध केला. किंमत एक आणा. या पुस्तिकेच्या पृष्ठावर " Independent Labour Party. It's Formation and It's Aims ( Reprinted from the Times of India, 15th August 1936 ), Independent Labour Party Publication No 1 " असा मजकूर होता. या लेबर पार्टी पब्लिकेशनतर्फे पुढील काळात प्रसिद्ध झालेले पुस्तक माझ्या पहाण्यात आलेले नसावे.

पक्षाची घटना वगैरे संबंधीचा मजकूर मी येथे माहितीसाठी देत आहे तो असा:–

## INDEPENDENT LABOUR PARTY

" A new political party has been organised in Bombay for the purpose of contesting the elections in the Bombay Presidency

under the new constitution to both Chambers of the Legislature. It is known as the "Independent Labour Party" and has been formed by Dr. B. R. Ambedkar, the Depressed Classes' Leader.

It appears that originally Dr. Ambedkar's idea was to organise a party exclusively of the Depressed Classes. Its programme was specifically worded in terms of the needs of these classes. But at the desire of his friends from other classes, he has consented to give a general name to the Party and has worded the programme in more general terms. The Party is open to to anyone who wishes to stand for with the programme formulated for the purpose.

## BROAD PROGRAMME

In an interview with a representative of the Times of India, Dr. Ambedkar declared that having regard to the fact that the present was no time for the parties communally organised, he had in agreement with the wishes of his friends "broadened the name and the programme of the party so as to permit political co-operation between the other classes and the Depressed Classes". The necleus of the Party would still be the fifteen members of the Depressed Classes. But members of the other classes were free to join the Party.

Dr. Ambedkar added that the Depressed Classes possessed large voting strength in constituencies in which no seat was reserved for them, and would be possible for them to place that voting strength at the disposal of any candidate, who cared to become a member of the Party.

He made it clear that the party membership was open to persons of all creeds and communities, although the

Depressed Classes votes could be reason of the law be made available to all persons belonging to such communities and creeds as were included in the general electrorate. Already some persons from other classes had expressed their willingness to join the Party and others who cared to take advantage of that opportunity might correspond with the Secretary of the Party at the office of the Party.

Questioned what cohesion the Independent Labour Party would have, Dr. Ambedkar pointed out that the Party was not going to be a miscellaneous collection of members of the Legislature, who after getting elected, each of his own, would befriend one another in the Legislature, and agree to vote together. The Party would have its roots in the electrorate, and its members would have fought the election as such, would have pledged to the electorate to uphold a common and clearly defined programme, and to be bound by the rules of discipline framed by the Party.

## OPEN TO ALL

Asked what promoted him to elect that particular name for the Party, Dr. Ambedkar explained that the Party would be independent of every other political organisation, although it would be ready to co-operate with any other political party where co-operation was possible. The Party was a labour organisation in the sense that its programme was mainly to advance the welfare of the labourning classes. The Party believes in having a correct ideology suited to the section of the people whose interests it regards as paramount. The word 'Labour' is used instead of the words 'Depressed Classes' ec ause labour includes the Depressed Classes as well.

## AIMS OF PARTY
## Working the Constitution Desire Defects

Explaining the programme of the Party Dr. Ambedkar said that it had been formulated after mature consideration and in consultation with all those who were interested in it. So far as the new constitution was concerned -

" The Party recognises that the new constitution is full of defects and falls much short of full responsible Government. The Party objects to several features of the Provincial Constitution, particularly the institution of the second Chamber. All the same, The Party believes in working the Constitution. But while prepared to work the Constitution, the Party will strive to see that the Special Emergency and Reserved Powers vested in the Governor, are not exercised in a manner which altogether nullifies the system of responsible Government."

As regards the economic question (1) The Party will undertake to establish Land Mortgage Banks, agriculturist producers' co-operative societies and marketing societies with a view to improve the productivity of agriculture (2) The Party thinks that fragmentation of holding in the opinion of the Party is a severe handicap in the way of the appication of capital and improved methods of cultivation to agriculture and is therefore a direct case of the poverty of the agriculturists

## PRESSURE OF POPULATION

" The Party, however, believes that the fragmentation of holdings and the consequent poverty of the agriculturists ar mainly due to the pressure of population on land, and unless

the pressure is relived by draining of the excess population subsisting on land, fragmentation will continue and condition of the agriculturists will remain as poverty-stricken, as it is to-day. In the opinion of the Party, the principal means of helping the agriculturists and making agriculture more productive consists in the industrialisation of the province. The Party will, therefore endeavour to rehabilitate old industries and promote such new industries as the natural resources of the province will permit.

(3) To raise the efficiency and the productive capacity of the people the Party will endeavour to undertake an extensive programme of technical education.

(4) The Party accepts the principle of state management and state ownership of industry wherever it may become necessary in the interest of the people.

(5) The Party will endeavour to remove all obstacles to free and full life and to alter, amend or abolish any economic system which is unjust to any class or section of the people.

(6) " The Party will undertake legislation to protect agricultural tenants from the exactions and evictions by the landlords in general and in particular the tenants under (a) the Khoti system and (b) the Talukdari System.

(7) The Party will endeavour to provide for the workers, agricultural as well as industrial a minimum standard of living compatible with civilised life.

(8) For the benefit of the industrial workers the Party will endeavour to introduce legislation to control the employment,

dismissal and promotion of the employees in factories, to fix hours of work, to make provision for the payment of adequate wages, for leave with pay, and as many amenities of life as possible, and to provide payment to the workers of bonuses, pensions or other provisions of retirements from active work, on account of old age or other incapacity. The Party will also introduce a scheme of social insurance which will provide the workers against sickness, unemployment and accident. The Party will endeavour to provide cheap and sanitary dwellings for the workers.

(9) For benefit of the agricultural workers the Party will endeavour to extend to them the same benefits which it proposes secure for the industrial workers with such modifications as circumstances may require.

(10) The Party accepts the principle that it is the duty of State to relive unemployment, and the Party will, therefor endeavour to carry out this obligations by introducing schemes of land settlement and by starting public works to provide for the unemployed and the landless labourers.

(11) The Party will undertake legislation to protect the debtor class from undue exactions, usurious dealings and fraudulent transactions of the money-lenders and endeavour to tackle the problem of rural indebtedness.

(12) The Party will undertake legislation to afford adequate protection to the lower middle class in the matter of house rents in industrial centres in big cities and towns.

## Taxation Problems

The attiturde of the Party towards taxation is that " it beli-

eves that for the impovement in well-being of the people every goverment must undertake a large number of nation building activities and that these aetivities can be undertaken only when a Government has money in its trasury This mony comes mainly from taxation levied on the people. A prosperous Government is the best guarantee of good Government.

' The Party tninks that to preach reduction of taxation as a principle and to tell the people that redution of taxation even at the sacrifice of useful nation-building activies, is in their interest, is to misguide the people and to deceive the poorer classes. This does not mean that the party wishes to keep the system of taxation as it is. On the contrary the Party sees great objection to the system of taxation now in operation. The Party definetely recognises that the present system of taxation is unjust and weighs heavily on the poorer sections of the population. The Party will endeavour to rectiy this inequity in in the general system of taxation. The Party has great objections to the present system of levying land revenue and it will undertake legislation to make it mere equitable and more elastic "

## Social Reform Legislation Plans

With regrd to social reforms, (I) " The Party will undertake legislation for the advancement of all necessary social reform (I) to prevent social refomers form being outcasted by the orthodox and (II) to penalise all forms of organised attempts at direct action such as terrorism and boycott to prevent individuals or classes from exercising the rights and liberties given to them by law.

2) They party will undertake legislation to regulate the adminsitration of all public charities with a view to preventing the mismanagement and misapplication of the charity funds and so

secure the use of any surplus that may be left over to the advancement of such secular purposes as ducsation, etc.

(3) The Party will undertake legislation to deal with the Problem of beggars and other destitute persons. The attitude of the Party towards rural reconstruction is : ( i ) the Party will endeavour to make village life cheerful by providing as many amenities of life as may be necessary for the object in view ( ii ) The Party will endeavour to improve village sanitation and housing by introducing a Scheme of village planning somewhat on the lines of town-planning. ( iii ) The Party will endeavour to establish village libraries, village halls, village radios and rotary cinemas in order to modernise the outlook of the villager and to make him a progressive person.

## EDUCATION

In matters of education 1) The party will give effect to the scheme of free and compulsory primary education. 2) The party will undertake a scheme of adult education so as to make all people literates 3) The party will lay special emphasis on technical education. The party will endeavour to provide facilities for higher education in India and abroad by means of state and to deserving persons from communities which are educationally backward 4) The party will undertake legislation to reorganise the University education in the presidency by establishing regional universities and to make them teaching universities. The party belives that this is the only remedy by which the curse of examination which has blasted the intelligence and effort of the student population can be removed.

The attitude of the party towards the administration is: 1) The party will endeavour to see that the administration is good, efficient and free from corruption. 2) To secure the ends of good and efficient administration the party will endeavour. (I) To secure the separation of judiciary from the Executive and (II) to amend the Vatan system in a way suited to modern conditions. 3) The party will also endeavour to prevent the administra-

tion from becoming the monopoly of any single caste or community. Consistently with efficiency of adminsitration the party will eadeavour to bring about a fair admiture of all castes and communities in the administration of the presidensy.

या जाहीरनाम्याची माहिती " स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा " या शीर्षकाखाली जनतेच्या २२–८–३६ च्या अंकात प्रसिद्ध केली होती.

स्वतंत्र मजूर पक्ष स्थापल्यानंतर या संबंधी स्पृश्य व अस्पृश्य वर्गांत निरनिराळ्या स्वरूपाची प्रतिक्रिया उत्पन्न झाली. सर्वस्वी अस्पृश्य वर्गाच्या आश्रयावर अवलंबून राहाणाऱ्या नव्या राजकीय पक्षाला इतर राजकीय पक्षांपुढे कितपत तग धरता येईल अशी सर्वसाधारण शंका प्रदर्शित केली जाई. आतापर्यंत बहिष्कृत हितकारिणी सभा हिच्यातर्फे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय हक्कां-संबंधीची जागृती साहेबांनी अस्पृश्य समाजात केली व लोकांच्या नजरेत भरेल असे विधायक कार्यही या सर्व क्षेत्रांत त्यांनी केले. परंतु सर्वस्वी राजकीय हक्कांसंबंधी अस्पृश्यांना लढाऊ व कार्यप्रवण करणारी संस्था आतापर्यंत उभ्या भारतात नव्हती, ती साहेबांनी अस्तित्वात आणली याबद्दल अस्पृश्यांना विशेष आनंद झाला आणि काँग्रेस, हिंदूमहासभा वगैरे संस्था राजकीय हक्कांसाठी कित्येक वर्षे झगडत आहेत. या झगड्यात आपणांलाही स्वतंत्रपणे आपल्या स्वतंत्र मजूर–पक्षातर्फे लढत देता येईल अशी अस्पृश्यांची मनोभावना दृढ झाली. स्वतंत्र मजूर पक्षासंबंधी स्पृश्य वर्गीयांची अशी समजूत झाली की, हा पक्ष जरी मजुरासंबंधी कार्य करण्यास उद्युक्त झालेला आहे तरी कम्युनिस्ट, सोशियालीस्ट व काँग्रेस या पक्षांनी मजुरांच्या सृष्टीतील सर्व मोक्याच्या जागा व्यापून मजूरांना आपल्या तावडीत पकडलेले आहे. तेव्हा. हा पक्ष अस्पृश्य मजुरांतच कार्य करील व मजुरांत स्पृश्य व अस्पृश्य असा भेद पाडील. या संबधीचे काही पुरावे जनतेच्या ५-९-३६ च्या अंकात ( पा. ८ ) प्रसिद्ध केलेले होते. ते येणे प्रमाणे :–

" स्वतंत्र मजूर पक्षाविषयी लोकमत " डॉ. आंबेडकर यांचा नवीन पक्ष

डॉ. आंबेडकर यांच्या धर्मांतराच्य घोषणेने सारा हिंदुस्थान खळबळून गेला असता, याच खळबळीत आणखी भर पाडणारी एक गोष्ट त्यांनी नुकतीच केलेली आहे. ती म्हणजे त्यांनी स्थापन केलेला नवा राजकीय पक्ष ही होय. डॉ. आंबेडकर हे हल्लीच्या मुंबई कायदेमंडळात सरकारतर्फे नेमलेले सभासद आहेत. तसेच ते

मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजचे मुख्याध्यापक आहेत. तथापी ते सरकार पक्षाचेच आहेत, असे म्हणण्याचे धाडस कोणी करू शकेल, असे आम्हांला वाटत नाही. सरकारने नेमलेले सभासद असताही कायदे मंडळाच्या कित्येक बैठकींना ते गैरहजर राहिले. जो हुकुमावाल्या सरकारनियुक्त सभासदांप्रमाणे मत देण्याच्या वेळी यंत्राप्रमाणे सरकारचे बाजूने हात उचलण्याचा आचरटपणा त्यांनी केला नाही, व ते पुढे कधी करतील असे कोणी म्हणणार नाही. मुंबई कायदेमंडळाच्या अध्यक्षाची निवडणूक गेल्या उन्हाळ्यात झाली. त्यावेळी कायदेमंडळातील सरकारविरोधी पक्षाने डॉ. आंबेडकर यांनाच मते देऊन त्यांच्यावरील विश्वास व्यक्त केला. ही गोष्ट प्रसिद्ध आहे. या सर्व माहितीवरून डॉ. आंबेडकर हे लोकपक्षाला ऊर्फ कॉंग्रेस पक्षाला किती जवळचे आहेत व भावी काळातील कायदेमंडळातील लढ्यांमध्ये त्यांचे सहकार्य कोणाला मिळ शकेल हे सहज ध्यानात येईल. त्यांच्या परिस्थितीचे मुस्लीम लीगचे पुढारी मि. जिना यांच्या परिस्थितीशी काहीसे साम्य आहे.. मि. जिना हे हाडाने राष्ट्रीय व स्वतंत्र वृत्तीचे पण परिस्थितीने संकुचित जातीय पक्षाचे नेतृत्व यांना पत्करावे लागल्यामुळे त्यांचा तात्पुरता विरोध कधी-कधी दिसून येतो. तथापि असेंब्लीमध्ये यांनी बहुतेक महत्त्वाच्या प्रश्नांमध्ये कॉंग्रेसशी पूर्ण सहकार्य करून सरकारला विरोधच केला ही गोष्ट मशहूरच आहे. आज डॉ. आंबेडकर हे एका जातीचे पुढारी झाले असले, तरी ते मनाने राष्ट्रीय, वृत्तीने स्वातंत्र्यप्रिय आहेत असे म्हणण्याला आम्हांला तरी कोणतीच हरकत वाटत नाही. यामूळे त्यानी राजकीय पक्ष स्थापन केला. या गोष्टीचे वैषम्य वाटण्याचे कारण नाही असे आम्हांला वाटते.

डॉ. आंबेडकर हे अस्पृश्यांचे पुढारी असले तरी त्यांनी आपल्या नवीन पक्षामध्ये अस्पृश्येतरांनाही प्रवेशाची मोकळीक राहील, अशा व्यापक स्वरूपाचा त्याचा कार्यक्रम आखला आहे. या नवीन पक्षाचे कोणालाही वैषम्य वाटण्याचे कारण नाही, असे आम्ही वर म्हटले त्याचा अर्थ किंचित स्पष्ट करून सांगणे जरूर आहे. मि. जिना यांचा पक्ष काय किंवा डॉ. आंबेडकर यांचा पक्ष काय, दोघेही निवडणुकीमध्ये कॉंग्रेसला विरोध करणार, कॉंग्रेसच्या झेंड्याखाली येऊन या दोघांही पुढाऱ्यांपैकी कोणीही काम करणार नाही, हे निश्चित आहे. अर्थात्त पूर्ण मिलाफ होणे शक्य नसेल तर " अर्धं त्यजति पडित " या न्यायाने वरील दोघा पुढाऱ्यांचे मिळेल तेवढे सहकार्य संपादन करणे हेच कॉंग्रेसला श्रेयस्कर होय. मि. जिना यांचेकडून जसे सहकार्य मिळाले तसे डॉ. आंबेडकर यांचेकडूनही मिळेल आशी अशा करण्यास आम्हांला काहीच प्रत्यवाय दिसत नाही. आणि म्हणूनच यांच्या स्वतंत्र

पक्ष स्थापनेबद्दल वाईट वाटण्याचे कारण नाही असे आम्ही वर म्हटले आहे.

प्रस्तुत पक्षाचे नाव " इंडिपेंडंट लेबर पार्टी " ऊर्फ " स्वतंत्र मजूर पक्ष " असे असून त्याचे आर्थिक धोरण शेतकरी व मजूर वर्ग यांची संघटना घडवून आणून त्यांची रहाणी सुधारण्याचा यत्न करणे हे आहे. जगात सोशियालिझम उर्फ समाजसत्तावाद याची प्रगती झपाट्याने होत आहे व त्याचे प्रतिबिंब हिंदुस्थानातील प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यक्रमातही दिसून येत आहे. कॉंग्रेसचे धोरणही शेतकरी व मजूर वर्ग यांची उन्नती घडवून आणण्याचेच असल्यामुळे या बाबीपुरते कॉंग्रेस व हा पक्ष यांचे मतैक्य व सहकार्य होऊ शकेल. विद्यमान जमीनधारा पद्धती अनिष्ट व अन्याय्य असून ती बदलणे हे या पक्षाचे उद्दिष्ट आहे व त्याच्याशी भांडण करण्याचे काहीच कारण नाही.

राजकीयदृष्ट्या या पक्षाची मते प्रगतीपर असली तरी सुधारणा राबवून घेणे, हे या पक्षाचे धोरण आहे. उलट नवीन राज्यघटना ही टिकावू असल्यामुळे ती मोडून टाकणे हा कॉंग्रेसचा उद्देश आहे. म्हणजे कॉंग्रेस अडवणुकीच्या उद्देशाने निवडणुकी लढविणार आहे व हा पक्ष या सुधारणांतून मिळेल तेवढे चांगले घेण्यासाठी त्याचा उपयोग करणार आहे. निवडणुका झाल्यानंतर कायदेमंडळामध्ये कॉंग्रेसशी या पक्षाचे सहकार्य होते किंवा नाही हे उभय पक्षाच्या बलाबलावरून ठरणार असल्याने तो प्रश्न तूर्त तरी अंधुक स्थितीतच रहाणार हे उघड आहे.

डॉ. आंबेडकरांनी केवळ अस्पृश्यांपुरता आपला पक्ष मर्यादित न ठेवता व्यापक पायावर त्यांची रचना केली आहे. या पक्षाचा राष्ट्रीय कार्यक्रम पार पाडावयाची उमेद डॉ. आंबेडकर व त्यांचे सहकारी यांनी बाळगल्यास नवीन राज्यघटना टाकावू व कुचकामाची ठरविण्यास विलंब लागणार नाही.

— बलवंत १९–८–३६

## " डॉ. आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष "

नवीन सुधारणेप्रमाणे आगामी निवडणुकी लढविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी वरील पक्षाची स्थापना केली असून या पक्षाचे क्षेत्र तूर्त मुंबई इलाख्यापुरतेच राखण्यात आलेले आहे. या पक्षाचा कार्यक्रम व्यवहार्य ठेविला आहे. आज देशात जी स्वराज्य–स्वातंत्र्याची भंपकगिरी चाललेली आहे व ज्या भंपकगिरीवर सारा

देश झुलविण्याचा चंग काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाने बांधलेला आहे त्याला आळा घालण्याचे प्रयत्न प्रत्येक देशहितेच्छूने केले पाहिजेत. लोकांच्या हिताविषयी बेपर्वा राहून मन मानेल तसले " घट भिन्द्यात् पटं छिन्द्यात् " सारखे प्रयोग करून पाहण्याला काँग्रेसने आता पायबंद घातला पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पार्टीचा कार्यक्रम पहाता ती पार्टी जर तिला योग्य पाठबळ मिळेल तर जनतेचे काहीतरी कल्याण साधू शकेल असे आम्हांस वाटते. आणि म्हणूनच या नूतन पार्टीचे व डॉ. आंबेडकरांचे आम्ही मनापासून अभिनंदन करतो.

डॉ. आंबेडकरांची धार्मिक मते आम्हांस जरी पटत नसली तरी त्यांच्या व्यवहारनैपुण्याबद्दल, राष्ट्रीय वृत्तीबद्दल व देशहिततत्परतेबद्दल आम्हांस शंका घ्यावीशी वाटत नाही. त्यांनी आखलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यक्रमावर ओझरती नजर फेकली तरी आमच्या म्हणण्याची सत्यता कोणासही पटेल. तपशि-लात मतभेदाची स्थळे अनेक निघतील तथापि तेवढ्यावरून सर्व पक्षयोजनाच त्याज्य म्हणणे मूर्खपणाचे ठरेल.

अव्यवहार्यता, मोहक आश्वासने आणि भावी पराक्रमाच्या बाष्कळ वल्गना यांचे साम्राज्य आज हिंदी राजकारणात पसरलेले आहे. व्यवहार्य धोरण ठरविणाऱ्यांना बेअकलीपणा पदरी घ्यावा लागत आहे. सामान्य जनसमुहात तर अज्ञान इतके माजलेले आहे की तो सहज फशी पडतो. स्वतःचे हितानहित अर्थात वैयक्तिक नव्हे तर सार्वदेशिक हिताची कल्पनाच अद्याप लोकांनापटलेली नाही. त्यामुळे सगळ्या सार्वजनिक जीवनाचा चुराडा होणार की काय असे केव्हा केव्हा मनास वाटल्यावाचून राहात नाही.पराक्रमाच्या गोष्टी करायच्या तेव्हा करा, पण जेथे पराक्रमाचा संबंध नाही तेथे तुमची बडबड काय कामाची ?

नवी कायदेमंडळे ही राबवावी लागणारच. ही न टळणारी गोष्ट आहे. म्हणून घटना मोडण्याच्या वल्गना फोल आहेत. काँग्रेसिक जोवर विध्वंसक भाषा सोडणार नाहीत, तोवर त्यांना दिला जाणारा पाठिंबा देशहितघातकच ठरेल हे स्पष्ट आहे.

मजूर पक्षाच्या कार्यक्रमात अव्यवहार्यता नाही, फाजील आश्वासने नाहीत. प्राप्त झालेल्या सुधारणा शक्य तितक्या जास्त उपकारक होतील असे प्रयत्न करणे हे या पक्षाचे धोरण राहणार आहे. जातिनिष्ठेवर या पक्षाचा भर नसून, राष्ट्रीय

वृत्तीस पोषक असाच त्यांचा कार्यक्रम आहे. शेतकरी वर्ग, मजूर वर्ग वगैरे वर्गांची आज दलितांसारखी स्थिती आहे, ती सुधारण्यासाठी जो कार्यक्रम या पक्षाने आखलेला आहे तोही हितकर असाच आहे. लोकांनी वरपांगी सोंगाढोंगास अगर शब्दमात्र स्वराज्य गर्जनास न भुलता आपले खरे हितकर्ते कोण याचा विचार एव्हापासूनच करावयास पाहिजे. वरील पक्षास सुसंघटित स्वरूप येवो व त्या कामी त्या पक्षाच्या पुरस्कर्त्यांस जनतेचा पाठिंबा मिळो असे आम्ही इच्छितो.

— परीक्षक, २०–८–३६

राजकीय पक्ष स्थापल्याची घोषणा केल्यानंतर मुंबई प्रांतातील पधरा जागांसाठी कायदेमंडळासाठी कोणत्या ठिकाणी कोणते उमेदवार उभे करावयाचे हे मुक्रर करण्याचे कार्य साहेबांनी हाती घेतले. काही उमेदवार त्या त्या भागात लोकांना पसंत नव्हते. याचे कारण उमेदवारांची नालायकी आणि बऱ्याच अंशी त्यांची वैयक्तिक घाणेरडी चरित्रे. समाजसेवेच्या पांघरुणाखाली हे लोक साहेबांच्या अंधश्रद्धाळू आणि अज्ञानी लोकांना लुटीत होते. व ते निवडून आल्यानंतर तर त्यांनी या बाबतीत कहर करून सोडला. या लोकांना साहेबांनी उभे करण्याचे ठरविले तेव्हा त्या त्या जिल्ह्यातील समंजस व प्रामाणिक कार्यकर्त्यांनी साहेबांच्या भेटी घेऊन आपली मते त्यांच्यापुढे मांडली. पण साहेबांनी लोक मुक्रर केले ते कायम. यामुळे सोलापूर, सातारा, नगर जिल्ह्यातील आणि मुंबईतील अस्पृश्य समाजांत असंतोष पसरला. पण या असंतोषाची झळ साहेबांना फारशी लागली नाही. उमेदवार निवडण्याच्या प्रकरणावरून साहेबांना फार त्रास झाला तो ाशिक जिल्ह्यात! तेथे कायमचे दोन तट उत्पन्न झाले. या तटांत पुढे भांडणे, मारामाऱ्या व कोर्टकचेऱ्या उत्पन्न झाल्या. हे दोन तट गायकवाड आणि रणखांबे यांच्या उमेदवारीमुळे उत्पन्न झाले. या जिल्ह्यातील राखीव जागेवर हे दोघे उमेदवार हक्क सांगू लागले. गायकवाड यांचे म्हणणे असे की, सर्वसाधारण मतदार संघात जी जागा आहे, तेथे अस्पृश्य उमेदवारांची बरीच संख्या आहे, व तेथे थोडे पैसे खर्च केले तर स्पृश्य मतदारांची मते मिळू शकतील म्हणून रणखांबे यांनी उभे राहावे. रणखांबे यांचे म्हणणे असे की गायकवाड हे स्पृश्य समाजात लोकप्रिय आहेत, तेव्हा ते सर्वसाधारण मतदार संघातील जागेसाठी उभे राहिले तर स्पृश्य आणि अस्पृश्य मतदारांतर्फे निवडून येऊ शकतील. या दोन्ही उमेदवारांच्या बाजू घेणाऱ्या लोकांत खूप खडाजंगी सुरू झाली आणि दोन्ही पक्षांनी परस्परांवर आरोप केले की, आमचा उमेदवार पडावा म्हणून त्याला सर्वसाधारण

मतदार संघातील जागेसाठी उभे करण्याचे गुप्त प्रयत्न बाबासाहेबांकडे विरुद्ध पक्ष करीत आहेत. या दोन्ही पक्षांत समझोता घडवून आणण्याचे साहेबांनी प्रयत्न केले. परंतु त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले आणि शेवटी गायकवाड आणि रणखांबे हे पक्ष इरेला पेटून परस्परांशी १९३६ पासून जे झुंजत राहिले ते कायमचे.

गायकवाड आणि रणखांबे यांच्यात प्रथम धुसफुस सुरू झाली तेव्हा साहेबांनी दोघांना सल्ला दिला की, तुम्ही दोघे समेट करा व या दोन जागांवर कोण कोण उभे राहणार ते ठरवा. म्हणजे तुमच्या समेटाची घोषणा मी देवळालीच्या सभेत करीन व लोकांना सांगेन की नाशिक जिल्ह्यात अस्पृश्यांच्या निवडणुकीच्या जागेवरून फाटाफूट होत नाही. या समेटाची माहिती शनिवारच्या आत आली नाही, तर देवळालीच्या सभेत मी हजर रहाणार नाही, असे साहेबांनी गायकवाडांना स्पष्ट सांगितले. याचा संदर्भ साहेबांनी गायकवाड यांना २०–८–३६ ला जे पत्र पाठविले त्यात आहे. स्व. म. पक्षाच्या कार्यक्रमाबद्दल गायकवाड यांचे काय मत आहे हेही या पत्रात साहेबांनी विचारले आहे. ते पत्र असे :–

"Rajgraha"
Dadar, Bombay- 14
20-8-1936

My dear Bhaurao,

I have been anxiouslv waiting to hear from you as to what arrangement you have arrived at with Rankhambe. But I am sorry there has been no intimation from you in this behalf. There will be no use of my coming to Deolali on sunday next unless you & Rankhambe have reached an arrangement which I can announce at the meeting. If I do not hear from you in this connection before saturday next, you can take it that I shall not be coming.

Have you read the programme of the Independent Labour Party which was published in the Times of India on saturday last? Let me know what you think of it.

Yours,

Sd / **B. R. A.**

हे पत्र लिहले तेव्हा बाबासाहेबांची प्रकृती बरीच बिघडलेली होती. त्यांना डोकेदुखीचा त्रास होत होता. मधून मधून त्यांना चक्कर येई. त्यांना वाटे की, आपल्या आईला मस्तकशूळाची जी व्यथा होती, तीच आपल्याला जडते की काय ? साहेबांनी डॉ. दस्तूर व डॉ. वाड यांच्याकडून आपली प्रकृती तपासून घेतली तेव्हा दोघांनीही सल्ला दिला की, बाबासाहेब ! तुम्हांला विश्रांतीची अत्यंत जरूरी आहे. तुम्ही दोन तीन महिने विश्रांती नाही घेतली तर तुम्हाला अंथरूण धरावे लागेल. त्यावर साहेब म्हणाले, की मला कसली विश्रांती घेता येते ? माझ्याकडे दररोज शेकडो लोकांचे जाणे-येणे, त्यांच्याशी विचार–विनिमय व चर्चेची माथेफोड करावी लागते, अनेक वेळा मुंबईबाहेर सभा, परिषदा व खटल्यांची कामे यासाठी जावे लागते आणि आता निवडणुका तोंडावर आल्या आहेत. मी जर विश्रांती घेत बसलो तर पक्षाचा व उमेदवारांच्या निवडणुकीचा प्रचार कोण करील ? डॉक्टरांनी साहेबांना सांगितले की, आधी प्रकृती, मग साऱ्या गोष्टी. तुम्ही वेळात वेळ काढून विश्रांती घेतलीच पाहिजे. या सल्लयावर साहेबांनी खूप विचार केला. अस्पृश्यांनी जर धर्मांतर केले, तर त्यांना जे राजकीय हक्क १९३५ च्या कायद्यान्वये मिळालेले आहेत त्यांचा त्यांना नव्या धर्मात उपभोग घेता येईल की नाही, हा एक प्रश्न येवले येथे धर्मांतराची घोषणा केल्यानंतर आणि शीख धर्माचा स्वीकार करण्याच्या वाटाघाटी चालू असताना त्यांच्या मनात घोळत होता. अस्पृश्यांनी धर्मांतर केले तरी सदर हक्कांचा उपयोग त्यांना घेता यावा, याचा एकदा सोक्षमोक्ष लावावा म्हणून साहेबांनी भारतमंत्री आणि पार्लमेंटच्या निरनिराळ्या पक्षांचे पुढारी यांना लंडनमध्ये भेटून त्यांची मने वळविण्याचे ठरविले. या लंडनच्या प्रवासात आपणाला जी विश्रांती मिळेलदे तेवढीच आपली. त्यानंतर पक्षाचा प्रचार, निवडणुकांचा गोंधळ आणि कायदे मंडळातील कामकाज यांचा रामरगाडा आहेच. पुढे लंडनला जाण्याच्या अगोदर गायकवाड व रणखांबे यांच्यात समेट व्हावा याबद्दल साहेब अत्यंत उत्सुक होते. प्रकृती सुधारण्यासाठी मी भारताबाहेर जाण्याचे ठरविले आहे, तेव्हा तुमचा समेट लौकर घडवून आणा व तो मला कळवा, असे साहेबांनी २५–८–३६ ला गायकवाडांना पत्र राज्यगृहामधून पाठवून कळविले ते पत्र असे:–

My dear Bhaurao,

I have reeeived your letter of the 22nd in which you say that you have written earlier a detailed letter. I have not received any such letter. I cannot understand what you and Rankhambe

have been doing. My health has completely failed and the Doctors are advising me to go out of India for rest. I may go abroad any time. I must have your decision without delay. I cannot wait. Will you, therefore, write to me by return post what agreement, if any, you have reached with Rankhambe ?

Yours sincerely,
Sd B. R. A.

गायकवाड आणि रणखांबे यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील काही लोक प्रयत्न करीत होते. परंतु या दोन्ही समाजसेवकांना उचलून धरणारे जे चिल्लर पुढारी होते त्यांनी आपापल्या पुढाऱ्यांची तळी वर उचलून धरताना असा काही गोंधळ उत्पन्न झाला की, या पक्षांत तडजोड अशक्य होऊन बसले. ही तडजोड लौकर व्हावी आणि ती गायकवाडांनी आपल्याला ताबडतोब कळवावी म्हणून साहेब पत्रांवर पत्रे पाठवीत. पण एक महिना झाला तरी गायकवाडांकडून काही उत्तर येईना. मध्यंतरी साहेबांनी स्वतंत्र पक्षाचे उमेदवार ठरविले आणि त्यांची नावे जनता पत्रात ( २९-८-३६ ) प्रसिद्ध केली. त्यांतील काही उमेदवारांना लोकांचा विरोध होता. इतर जिल्ह्यांतील लोकांनी आपला विरोध साहेबांना पत्रे पाठवून अगर वर्तमानपत्रांतून लेख लिहून जाहीर केला. पण साहेबांनी त्यांना काही महत्त्व दिले नाही. नाशिक जिल्ह्यातील लोकांनी आपला विरोध दर्शविण्यासाठी अनेक ठिकाणी सभा घेतल्या. २४-९-३६ ला इगतपुरी येथे आणि २७-९-३६ ला नाशिक - रोड येथे ज्या सभा भरविण्याचे ठरविले त्यांच्या हस्तपत्रिका ( हँडबिल्स ) साहेबांच्याकडे पाठविण्यात आल्या. २७-९-३६ ला साहेबांनी राजगृहातून गायकवाड यांना जे पत्र पाठविले त्यांत गायकवाडांनी साहेबांना एक महिना का पत्र पाठविले नाही याचा उलगडा ही हस्तपत्रके पाहून मला झाला असे मत त्यांनी प्रदर्शित केले. श्री. सावळेराम बापूजी दाणी हे रणखांबे यांचे मेहुणे ( बहिणीचे यजमान ) व व्याही आणि गायकवाड यांचे चुलत सासरे. ते साहेबांचे अंधभक्त, असा लोकांचा समज. हस्तपत्रिकेत त्यांचे नाव पाहून साहेबांना आश्चर्य वाटले. या सभा रणखांबे यांच्यां संमतीने भरविण्यात आल्या काय, असे साहेबांनी गायकवाड यांना सदर पत्रात विचारले. भगूर गावच्या महारांच्या वेतनासंबंधीचे कागद वाचून सरकारकडे हे प्रकरण पाठवितो असाही सदर पत्रात उल्लेख होता. ते पत्र असे :—

**My Dear Bhaurao,**

I cannot blame you for your silence. But I had expected

you to keep me informed of the happenings in regard to the electoral campaign. I am sending you two handbills which have been sent to me. I am surprised to find Dani's name. Does Rankhambhe know of this ? Is it done with his consent ? I sould like to have some information on these points.

I have gone through the papers of the Bhagur Mahars. I think govt has regulated the remuneration of the Mahars. However, I will take up the matter with the Government and let you know what they say.

Yours sincerely,
( sd ) B. R. A.

हँडबिल्स –

## ही दिशाभूल नव्हे काय ?

ता. २४–९–३६ गुरुवार रोजी मु. इतगपुरी येथे होणारी सभा पुण करार स्मृतिदिन पाळण्यासाठी होण्याचे निमित्त असून त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जिल्हानिहाय कमेटीकडील सम्मती नसताही मजूर पक्षाकरिता " जनता " पत्रात उमेदवारांची नावे दाखल केली आहेत, त्यास पाठिंबा देण्याचे ठरविले आहे.

तरी जाहीर केलेल्या उमेदवारांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या निवडणुकीस पाठिंबा या मसुद्याबाबत फेरविचार व्हावा, अशी आम्हां नाशिक जिल्ह्यातील लोकांची आग्रहाची विनंती आहे. कळावे. ता. २३–९–३६

आ. नम्र,

| | |
|---|---|
| श्री. नानाजी रावबा चंद्रमोरे | स. क. खजीनदार |
| ,, तुळशीराम संभाजी काळे | उपाध्यक्ष |
| ,, रंगनाथ शंकरराव भालेराव | मेंबर |
| ,, सावळेराम बापूजी दाणी | ,, |
| ,, आर्. बी. रिपोटे | ,, |
| ,, सीताराम केशव कदम | ,, |
| ,, कचरू रावबा भालेराव | ,, |
| ,, चोखाजी गोपाळराव काळे | ,, |

श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस, नाशिक.

दुसरी हस्तपत्रिका

## जाहीर सभा.

बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई कौन्सिलबाबत आखलेल्या धोरणाबाबत फेरविचार करणे.

तारीख २७–९–३६ रविवार रोजी सायंकाळी ४ वाजता मुक्काम नाशिक-रोड येथे रा. सिताराम केशव कदम यांच्या वखारीसमोर (आंबेडकर क्लब नजीक) श्रीयुत तुळशीराम संभाजी काळे यांचे अध्यक्षतेखाली सभा होणार असून तीत खालील विषयांचा विचार होणार आहे; तरी सर्वत्र समाजहितेच्छूंनी हजर राहण्यास विनंती आहे.

तारीख ३०-१-३६ रोजी मुंबई इलाखा राजकीय परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कौन्सिलमध्ये जाणाऱ्या उमेदवारांचे अर्ज जिल्हानिहाय कमेटद्यामार्फत सेंट्रल कमेटीकडे पाठविल्यानंतर निवड करण्यात येईल असे भाषण केले असता, जिल्हानिहाय कमेट्या व सेंट्रल कमेटी स्थापन झालेली नाही असे असता स्वतंत्र मजूर पक्षाने ता. २९–८–३६ रोजी ' जनता ' अंक २८ यामध्ये नावे प्रसिद्ध केली गेली आहेत, त्याबबात फेरविचार करणे आहे. तरी सर्वांनी अगत्य येण्याची कृपा करावी. कळावे, लो. असावा.

आ. नम्र,

( वरील हस्तपत्रिकेतील नावे )

९–१०–३६ ला गायकवाडांनी साहेबांना पत्र पाठवून कळविले की, जिल्ह्यात निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी मोहीम सुरू करण्याचा कार्यक्रम आखण्यासाठी एक परिषद घेण्याचे ठरलेले आहे. या परिषदेत आपले भाषण व्हावे अशी सर्वांची इच्छा आहे या पत्राला साहेबांनी १३–१०–३६ राजगृहातून उत्तर दिले की माझी प्रकृती इतकी खालावली आहे की थोडा वेळ काम केले, तरी मला भयंकर थकवा येतो. तेव्हा अशा परिस्थितीत मी फिरतीवर येणे मला अशक्य झालेले आहे. तुम्ही अ ग्रह करू नये. रणखांबे जरी राखीव जागेसाठी उभे राहिले तरी प्राथमिक निवड ह णार नाही असे वाटते ( चारांपेक्षा जास्त उमेदवार उभे राहिले तरच प्राथमिक निवड शक्य आहे ) आणि तसा बाका प्रसंग येण्याची शक्यता तुम्हांला दिसली तर मला कळवा. मी परिषदेला हजर राहीन. पण तिच्या

तारखा मी माझ्या सोयीप्रमाणे ठरवून तुम्हांला कळवीन. परवा रोहम मला मुंबईत भेटले त्यांनी असे सांगितले की, रणखांबे पक्षाने निफाडला सभा भरविली व तीत रणखांबे यांच्या उमेदवारीला पाठिंबा आणि धर्मांतराच्या घोषणेचा धिक्कार या बाबत ठराव मंजूर करण्यात आले. या बाबतीत कितपत तथ्य आहे, हे मला कळवा. मी दोन हस्तपत्रिका सोबत पाठवीत आहे. त्यात सांगितल्याप्रमाणे सभा भरल्या का ? त्या सभेत काय ठरले ? रणखांबे माझ्या विरुद्ध पक्ष उत्पन्न करीत आहेत असे मी ऐकतो. सदर पत्र मी खाली देत आहे :—

**My dear Bhaurao,**

I have your letter of the 9th. I am very bad from the point of health. I have no energy left and I feel exhausted after any little exertion. I wish you spared me the trouble of going about. Besides I do not think that there would be an election even if Mr. Rankhambe stands. There does not seem that there is any urgency. If however you think that I must come I certainly will. However the dates you have fixed will not suit me. We will have leave to take some other dates. I will let you know what dates will suit me.

Roham who came here dav before yeserday told that there was a meeting held by the Rankhambe Party at Niphad and that not only a resolution was passed supporting Rankhambe but there was also another resolution passed condemning conversion. Please let me know how far this is true. I am sending you two handbills sent to me. Can you let me know what happened at the meeting ?

Yours sincerely,

( sd. ) **B. R. A.**

गायकवाडांनी वरील पत्राला उत्तर दिले. त्याला उद्देशून साहेबांनी १६ ऑक्टोबरला गायकवाडांना लिहिले की रणखांबे यांना जर सर्वसाधारणजागेसाठी उभ राहावयाचे असेल तर त्यांनी १९ तारखेला राखीव जागेसाठी उमेदवारीचा अर्ज भरू नये. तसे केले तर त्यांना सर्वसाधारण जागेसाठी उभे राहता येणार नाही. हा मुद्दा रणखांबे यांना कळविण्याची व्यवस्था करावी. ( 'If Rankhambe wants to stand for general seat he must not put in his nomination

paper of the 19th for the esrerved seat. If he does, he will not be entitled to stand for the general seat. You should inform him of this. )

श्री. रणखांबे व श्री. गायकवाड यांच्यात निवडणुकीच्या जागा कोठे व कोणाला द्याव्यात या संबधी जो मतभेद झाला त्याबद्दल नाशिक जिल्ह्यात दोन पक्ष पडले. या पक्षांनी आपापल्या बाजूने, मतप्रचार सुरू करण्याच्या अगोदर दोघात काही पत्रव्यवहार झाला. त्यांतील दोघांची पत्रे २४.१०.३६ च्या 'जनते' त ( पा. ५ ) प्रसिद्ध झाली होती. ती अशी –

## " विनंती पत्र "

श्री. भाऊराव कृष्णराव गायकवाड यांचेकडून श्री. अमृतराव धोंडीबा रणखांबे यांचे सेवेशी कृ. सा. न. वि. वि. आपण मनमाडास याल अशी अपेक्षा होती. परंतु ती निरर्थक ठरली. आलेल्या मंडळींबरोबर झालेल्या चर्चेत असे कळले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई इलाखा लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीच्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध केल्यानंतर मी आपणांस जे पत्र पाठविले त्यात आपणांस वाईट वाटेल अशी एक दोन वाक्ये आहेत असे श्रीयुत भादुजी निकाळे सांगत होते. सदर पत्रातील वाक्यांमुळे आपणांस जर राग आला असला तर ती वाक्ये लिहिल्याबद्दल वाईट वाटून मी दिलगिरी प्रदर्शित करतो.

वरील प्रदर्शित केलेल्या दिलगिरीवरून तरी आपल्या पोटातील आग काढून टाकाल काय ? चर्चेत असे कळले की, मी असे कधीच म्हटले नाही की, आपण जनरल सीटसाठी उभे राहिल्यास मी तुम्हांस मदत करीन. परंतु जेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे, तेथे माझ्या आश्वासनाची काही गरज होती असे मला वाटले नाही. तथापि या पत्राने मी आपणांस नम्रतापूर्वक अशी विनंती करतो की, आपण जनरल सीटसाठी उभे राहण्याची कृपा केल्यास मी तुम्हांस सर्व तऱ्हेने मदत करीन. तरी जनरल सीटसाठी उभे राहण्याची आपण कृपा करावी.

चर्चेत शेवटी असे ठरले की, आपल्या जिल्ह्यात माजलेल्या वादाचा शेवट आपणच उभयतांनी करावा व काय केले असता वादाचा शेवट होईल हे शोधून काढणे अत्यंत कठीण आहे. तथापि आपल्या जिल्ह्याचा बोज आपणच उभयतांनी

सांभाळावयास हवा आहे. त्या दृष्टीने विचार करून आपण योग्य तो समेट घडवून आणण्यास मदत कराल, अशी आशा आहे.

आपल्या पुष्कळ ठिकाणच्या सहवासात जी उदारता मला दाखवून मला पुढे पुढे केले आहे व मला पुढे आणण्यात ज्याप्रमाणे अनेक मदत केली आहे, त्याचप्रमाणे याही वेळेस उदारता दाखवून मला राखीव जागेसाठीच उभे राहण्याची संधी कृपेने देऊन जनरल सीटसाठी आपण उभे राहण्याची कृपा कराल अशी सविनय प्रार्थना आहे. क. लो. अ. ही विनंती

आपला नम्र सेवक,
भा. कृ. गायकवाड

वरील पत्रास श्री. रणखांबेसाहेब यांचेकडून उत्तर : –
रामराम विशेष,

पत्रातील मजकूर वाचून लक्षात घेता आपण मला उदारता दाखविण्याबद्दलची जी पुन्हा विनंती करीत आहात, त्या विनंतीस मान देऊन व नाशिक जिल्ह्याची इभ्रत कायमची राहावी म्हणूनच मी उदारता दाखवून उभा राहू इच्छित नाही.

आपला हितेच्छू
अमृतराव धोंडीबा रणखांबे,
विंचूर

" श्रीमंत अमृतराव रणखांबे " असा मथळा देऊन त्याचा फोटो ' जनते ' च्या २४–१०–३६ च्या अंकात सहा पानावर छापला होता व त्यांना याबद्दल धन्यवाद दिले होते.

श्री. गायकवाड यांना प्रतिस्पर्धी म्हणून श्री. रामचंद्र संभाजी रोकडे हे निवडणुकीला उभे रहिले. त्यांना श्री. रणखांबे यांचा पाठिंबा आहे, असा समज व प्रचार झाल्यामुळे नाशिक जिल्ह्यात दोन पक्षात विलक्षण चुरस उत्पन्न झाली. जिल्ह्यातील हे अंत:स्पर्धेचे घातकी स्वरूप इष्ट नव्हे हे दोन्ही पक्षाला कळे. पण इरेस पेटल्यानंतर या तात्त्विक समजुतीची कास कोण धरणार ? हे वातावरण पाहून बाबासाहेबांनी नाशिक जिल्ह्यात जानेवारी १९३७ च्या पहिल्या आठव–

ड्यात दौरा काढला व ठिकठिकाणी प्रचारसभांतून श्री. गायकवाड यांच्यातर्फे प्रचार केला. त्या सर्व भाषणांचे वृत्तांत ३०–१–३७ च्या "जनतेत" (पा. २ व ७) प्रसिद्ध केले होते. श्री. गायकवाडांना आपण का पाठिंबा दिला याबद्दल बाबासाहे– बांनी जो सभांमधून खुलासा केला तो असा:–

आपल्या या नाशिक जिल्ह्यात गायकवाड व रणखांबे हे दोघेही कार्यकर्ते असताना भाऊराव गायकवाडांचीच निवड मी का केली याबाबत बराच संशय माजला असल्याचे माझ्या ऐकिवात आहे. आपल्या नाशिक जिल्ह्यात दोन इसम गायकवाड व रणखांबे कायदे मंडळासाठी लायक आहेत ही गोष्ट खरी. म्हणूनच चार महिन्यापूर्वी उभयतांना बोलावून मी स्पष्टपणे सांगितले होते की, तुमच्या जिल्ह्यातर्फे कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी कोणी उभे रहावे, हे तुम्ही ठरवावे. उभयतांत जर हा वाद मिटला नाही तर मात्र मी भाऊराव गायकवाड यांच्यातर्फे निकाल देईन, असे रणखांबे यांनाही सांगितले होते. कारण उभयतांत अधिक लायक कोण हे तुम्हांपेक्षा मी चांगले जाणतो. आतापर्यंत अमृतराव रणखांबे यांनी अध्यक्ष व स्वागताध्यक्ष म्हणून सभांतून जी भाषणे केली ती अमृतरावांची नसून भाऊराव गायकवाडांनी लिहून दिली आहेत, हे मी जाणतो. रणखांब्यांचा बोला– विता धनी वेगळाची असण्याची मूळ कथा मला पूर्णपणे माहीत आहे व म्हणून अमृतराव रणखांब्यांपेक्षा भाऊराव गायकवाड मला अधिक लायक वाटले.

दुसरे असे की, रणखांबे यांनी राजीखुषीने अंमलपाणी न करिता स्वतःच्या सहीने पत्र पाठवून मला स्पष्ट कळविले आहे की, कायदेमंडळात नाशिक जिल्ह्याच्या राखीव जागेसाठी श्री. भाऊराव गायकवाड यांनाच घ्या. असे असता आज श्री. रणखांबे यांनी श्री. गायकवाड यांच्या उमेदवारीस मदत करावयास हवी आहे. परंतु प्रत्यक्ष मदत न करता अगर तटस्थही न राहता रणखांबे उघड उघड भाऊराव गायकवाड यांच्या उमेदवारीस विरोध करीत आहेत. यास काय म्हणावे? तसे पाहता रणखांबे घराण्याचा व रोकडे घराण्याचा माझ्या माहितीप्रमाणे गेली ७–८ वर्षे काही कारणामुळे वाद होता. उभयतांत सलोखा अगर प्रेमभाव मुळीच नव्हता. असे असता रणखांबे यांचे नाव मी कायदेमंडळासाठी सुचविले नाही म्हणून गेली कैक वर्षे भावाभावाप्रमाणे व गुण्यागोविंदाने राहिलेल्या गायकवाडां– विरुद्ध रणखांब्यांनी जाऊन विरोधी गटाच्या गळ्यात मिठ्या माराव्यात व ज्याला आतापर्यंत मित्र म्हणवून घेतले त्याला विरोध करावा, हे रणखांब्यांचे करणे न्यायाचे नाही, अयोग्य आहे.

नाशिक जिल्ह्यांत असलेली संघटना दुभंगून जो निरर्थक बेबनाव व बखेडा माजविला आहे त्यास श्री. रणखांबेच जबाबदार आहेत.

( जनता, ३०–१–३७ पा. २ व ७ )

# प्रकरण २ रे

काँग्रेसने राज्यसत्ता स्वीकारण्याचे धोरण धरसोडीचे ठेवल्यामुळे मुंबईतील कायदेमंडळावर तिने बहिष्कार पुकारल्यासारखेच झाले. तेव्हा १९३५ च्या कायद्यान्वये गव्हर्नरने हंगामी मंत्रिमंडळ नेमले. त्याचे मुख्यमंत्री साताऱ्याचे सर खान बहादूर धनजीभाई बी कपूर यांना करण्यात आले. याविरुद्ध तक्रार करण्याची मोहीम काँग्रेसतर्फे सुरू झाली व सदर मोहिमेला सर्व पक्षांचा पाठिंबा आहे, हे जनतेला दाखविण्यासाठी श्री. बाळ गंगाधर खेर हे निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांशी पत्रव्यवहार करून त्या पक्षांतील निवडून आलेल्या कायदेमंडळातील सभासदांच्या सह्या मिळवू लागले. त्यांनी बाबासाहेबांना याबाबतीत जे पत्र लिहिले त्याला बाबासाहेबांनी उत्तर दिले. त्यांत आपला स्व. म. पक्ष सह्या देण्यास व काँग्रेसशी सहकार्य करण्यास तयार नाही, असे स्पष्ट मत दिले. ते उत्तर २२-५-३७ च्या जनतेच्या अंकात ( पा. १ ) प्रसिद्ध केले होते. ते असे :-

डॉ. बाबासाहेबांचे पत्र

मुरूड, जंजिरा, १५-५-३७

प्रिय मित्र खेर,

तुमचे ता. ११ चे पत्र पोचले. मी जंजिऱ्याला गडबडीत असल्यामुळे तुमच्या पूर्वीच्या पत्राला उत्तर पाठविण्याचे मला विस्मरण पडले. हे पत्र काँग्रेस पक्षाचे पुढारी या नात्याने तुम्ही मला पाठविले होते व हंगामी मंत्रिमंडळाबद्दल अविश्वास व्यक्त करण्यासाठी जे पत्र आपण तयार केले आहे त्या पत्रकावर स्वतंत्र मजूर पक्षातर्फे वैयक्तिकरीत्या सह्या मिळण्याच्या शक्यतेबद्दल आपण त्यात मला विचारले होते. या पत्रकाची प्रतही आपण मला पाहण्यासाठी पाठवून दिली होती. हा प्रश्न पक्षाचा असल्यामुळे त्याच दृष्टीने त्याच्याकडे पाहिले पाहिजे म्हणून स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभासदांनी आपल्या पत्रकावर सह्या करण्याचा प्रश्नच

मुळी उद्‌भवत नाही. या प्रश्नावर मी बारकाईने विचार केला असून स्वतंत्र मजूर पक्षातर्फे आपल्या पत्रकाला मान्यता देता येत नाही, असाच निष्कर्ष मी काढला आहे. माझे उत्तर आपल्याला तुटकपणाचे वाटू नये म्हणून माझ्या नकाराबद्दलची खुलासेवार कारणे मी आपल्याला देत आहे. ही कारणे अशी –

(१) सध्याच्या परिस्थितीचा मुख्य दोष काँग्रेसकडेच येत आहे; गव्हर्नरवर नाही. काँग्रेसने केलेली आश्वासनाची मागणी अनावश्यक व अशक्य आहे, असेच आमच्या पक्षाचे मत आहे.

(२) असेंब्लीचे अधिवेशन न बोलविण्याचे गव्हर्नरांचे धोरण चालू घटकेला तरी बेसनदशीर म्हणता यावयाचे नाही. कायदेमंडळाचे अधिवेशन सहा महिन्यांच्या अवधीत बोलावण्यात आले नाही, तरच बेसनदशीरपणा होईल. ही मुदत अजून संपली नाही.

(३) संघटनेचा अंमल सुरू झाल्यामुळे सर्व सनदशीर उपाययोजना निष्फळ झाल्याचे आढळून येईपर्यंत इतर जादा सनदशीर चळवळ सुरू करण्याची आवश्यकता आहे असे स्वतंत्र मजूर पक्षाला वाटत नाही.

(४) आपली ही चळवळ आपल्या पक्षाची सत्ता व इभ्रत वाढविण्याच्या इच्छेच्या पोटी जन्मली असून ही चळवळ आपल्या पक्षापुरतीच आहे. या चळवळीच्या मागे कोणताही राष्ट्रीय कार्याचा हेतू नाही. असा हेतू या चळवळीमागे नसल्याने राष्ट्रीय कार्यासाठी एकजूट करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही व असा प्रश्न उद्‌भवत नसल्यामुळे स्वतंत्र मजूर पक्षाने काँग्रेस पक्षाशी असलेले आपले मतभेद विसरून या पक्षाला मिळण्याचेही काहीच कारण दिसत नाही. हे कार्य आपल्या ( काँग्रेस ) पक्षापुरतेच मर्यादित आहे.

सध्याच्या मंत्रिमंडळाबद्दल विश्वास वाटणे अगर अविश्वास वाटणे या मुद्यासंबंधाने आमच्या पक्षाने अजून आपले मत ठरविले नाही असा मात्र याचा अर्थ होत नाही. हा मुद्दा कायदेमंडळात चर्चेसाठी पुढे येईपर्यंत आपले मत जाहीर न करता स्वस्थ राहणे, हेच आमच्या पक्षाचे धोरण आहे.

आपला,

भी. रा. आंबेडकर.

अखेरीस काँग्रेसने राज्यसत्ता स्वीकारली, आणि बाबासाहेब विरोधी पक्षाचे प्रभावी वक्ते व काँग्रेच्या राज्यकारभाराचे बाभाडे काढणारे प्रखर टीकाकार म्हणून नावाजले गेले. त्यांची कायदेमंडळातील भाषणे कोणत्याही श्रेष्ठ पुढाऱ्यांच्या भाषणांपेक्षा गुणांनी काकणभर जास्त आहेत. हे समंजस लोक मान्य करतील.

अस्पृश्यांनी धर्मांतर केले तर त्यांना १९३५ च्या कायद्यान्वये जे राजकीय हक्क देण्यात आलेले आहेत त्यांचा त्यांना उपभोग घेण्याचा हक्क राहतो किंवा नाही, हा मोठा वादग्रस्त प्रश्न होता. धर्मांतराची घोषणा करण्याअगोदर या प्रश्नाचा बाबासाहेबांनी सर्व बाजूंनी विचार केलेला होता. हा प्रश्न स्पृश्य आणि अस्पृश्य लोक सभांतून व वर्तमानपत्रांतून वेळोवेळी उपस्थित करीत असत. तेव्हा काही वेळा साहेब त्यांना त्रोटकपणे उत्तरे देत व अस्पृश्यांनी धर्मांतर केले तरी-त्यांना अस्पृश्य म्हणून जे राजकीय हक्क मिळालेत ते त्यांना धर्मांतरानंतरही उपभोगावयास मिळतील असे आपले मत प्रदर्शित करीत असत. या बाबतीत जे साशंक होते, त्यांची शंकानिवृत्ति व्हावी या हेतूने त्यांनी 'जनते' च्या २५ जुलै आणि १ ऑगस्ट १९३६ च्या जोडअंकात अग्रलेख लिहिला तो असा :-

## अस्पृश्यांचे धर्मांतर आणि त्यांचे राजकीय हक्क

अस्पृश्य वर्गाने हिंदुधर्माचा त्याग करून परधर्माचा अंगीकार करण्याचा आपला मनोदय व्यक्त केल्यापासून हिंदू लोकांत मोठीच खळबळ उडून गेलेली आहे. धर्मांतराच्या चळवळीला शह देण्यासाठी हिंदू लोक शिकस्तीचे प्रयत्न करीत आहेत. शह देण्याकरिता ते ज्या मार्गांचा अवलंब करीत आहेत, ते मार्ग न्याया-न्यायाची चाड असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शिष्टसंमत होणार नाहीत, अशी आमची खात्री आहे. ज्या ज्या वेळी अस्पृश्यांनी स्वाभिमान संरक्षणासाठी स्वतंत्र-तेच्या मार्गावर पाऊल ठेवून आपली प्रगती करून घेण्याचा निर्धार जाहीर केला त्या त्या वेळी हिंदूंनी जातिहिताच्या व श्रेष्ठतेच्या भावनांना बळी पडून अस्पृश्यांना जरब बसविण्यासाठी पूर्वीपासून ज्या शस्त्रांचा उपयोग ते करीत आले आहेत ती शस्त्रे अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या घोषणेलाही विरोध करण्याकरिता उपयोगात आणण्याचा उपक्रम त्यांनी चालू केला आहे. हिंदू जमीनदार अस्पृश्य कुळांकडील जमिनी काढून घेत आहेत. तसेच हिंदू जनता अस्पृश्यांवर सामाजिक व आर्थिक बहिष्कार पुकारीत आहेत. परंतु अस्पृश्यांना गुलामगिरीत डांबून ठेवण्यासाठी योजिलेल्या या जुन्या पुराण्या उपायांचा काहीच उपयोग होत नसून अस्पृश्यवर्गाची

धर्मांतराची चळवळ अप्रतिहतपणे सर्वत्र पसरत चाललेली आहे. अस्पृश्यांना जेरीस आणण्याचे जुने उपाय अपुरे पडू लागले आहेत, असा अनुभव येताच हिंदू लोकांनी अस्पृश्यांना भेडसावून व गांगरून टाकण्याचा एक नवीनच मार्ग शोधून काढला आहे. अस्पृश्यांनी धर्मांतर केल्यास त्यांना नवीन राज्यघटनेत प्राप्त झालेल्या राजकीय हक्कांना मुकावे लागेल, असा गिल्ला हिंदू लोकांनी चालविलेला आहे. आतापर्यंत अस्पृश्य वर्गाने धर्मांतर केल्यास त्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील असा इशारा अस्पृश्य वर्गाबद्दल सहानुभूती बाळगणारे काही स्पृश्य हिंदू मधून मधून देत असत. हे लोक अस्पृश्य वर्गाचे विरोधक नसून हितचिंतक होते. परंतु या हिंदू हितचिंतकांनी जे इशारे म्हणून म्हटले होते, त्याचा विरोधी लोक धमकी म्हणून उपयोग करीत आहेत. ता. २१ च्या '**जन्मभूमि**' नावाच्या गुजराथी दैनिक पत्रात अशी बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती की, हिंदुधर्माचा त्याग करण्याच्या ठरावामुळे अस्पृश्य वर्ग कोंडीत सापडला आहे व हिंदुधर्माचा त्याग केल्यास जे राजकीय हक्क मिळाले आहेत ते नष्ट होतील अशी त्यांना भीती वाटू लागली आहे. या पत्राने अशी थाप उठवून दिली होती की डॉ. आंबेडकरांना ही चूक कळून आल्यामुळे ते गांगरून गेले आहेत; आणि म्हणूनच ते येत्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे रहाणार नसून आपल्या अनुयायांनाही तशा प्रकारचा सल्ला देत आहेत. '**बॉम्बे क्रॉनिकल**' च्या ता. २२ च्या अंकात तर या पत्राच्या प्रतिनिधीने फारच मोठी कंडी पिकवून विकली आहे. या पत्राच्या प्रतिनिधीने अशी बातमी प्रसिद्ध केली आहे की, डॉ. आंबेडकरांनी धर्मांतरामुळे राजकीय हक्क हिरावले जातील की काय या प्रश्नासंबंधी मुंबई सरकारबरोबर पत्रव्यवहार केला होता, व मुंबई सरकारने त्यांना असे कळविले की, धर्मांतर केल्यास अस्पृश्यांकरिता कायदे कौन्सिलात राखून ठेवलेल्या जागेसाठी उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही. या बाबतीत डॉ. आंबेडकरांनी '**टाइम्स ऑफ इंडिया**' पत्राच्या प्रतिनिधीला दिलेली मुलाखत त्या पत्राच्या ता. २४ च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे. या मुलाखतीत डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या राजकीय हक्कांवर धर्मांतरामुळे कायद्याच्या दृष्टीने काय परिणाम घडतील या विषयी आपले मत सविस्तर रीतीने प्रदर्शित केले आहे. धर्मांतराने अस्पृश्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील अशी धमकी देणाऱ्या वृत्तपत्रांना आपली विचारसरणी बिनचूक आहे अशी खात्री वाटत होती. परंतु डॉ. आंबेडकरांनी आपली मुलाखत प्रसिद्ध केल्यानंतर ज्या ज्या लोकांनी एक आठवडाभर नंगानाच चालविला होता, त्या लोकांची दातखिळी बसून आता जिकडे तिकडे सामसूम झालेली दिसत आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या तर्कशुद्ध विचारसरणीने या प्रश्नाची चर्चा इतक्या मुद्देसूदपणे

केलेली आहे की, अस्पृश्य वर्गाच्या प्रतिस्पर्ध्यांना धर्मांतरामुळे अस्पृश्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील असा जो विश्वास वाटत होता तो नष्ट झाला आहे. इतका की ज्या ज्या लोकांनी पहिल्या दिवशी अस्पृश्यांना भेडसावून सोडणारे अग्रलेख लिहिले त्या त्या लोकांनी दुसऱ्या दिवशी जीभ चावून आपले चुकले म्हणून उलट अग्रलेख लिहिले व डॉ. आंबेडकरांनी केलेला अर्थ व मांडलेली विचारसरणी बरोबर व कायदेशीर आहे, अशी कबुली दिली.

धर्मांतराने राजकीय हक्कांस बाध येतो की काय या प्रश्नासंबंधाने डॉ. आंबेडकरांनी महार परिषदेत केलेल्या भाषणात त्यांनी त्या प्रश्नाची चर्चा सविस्तर केलेली होती. ' जनते ' च्या वाचकांनी ते भाषण वाचलेले असल्यामुळे फिरून त्या प्रश्नाची चर्चा ' जनते ' त करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे, आणि अस्पृश्य समाज नवीन राजकीय घटनेच्या बाबतीत ज्ञानहीन असल्यामुळे त्याची या बाबतीत दिशाभूल करणे कोणालाही शक्य होऊ नये म्हणून या विषयाची पुन्हा एकदा चर्चा करणे प्राप्त झाले आहे. गेल्या आठवड्यात हिंदू विरोधकांनी जी वावटळ उठविली होती व तीत जे अनेक मुद्दे मांडले होते, त्यांतील पहिला मुद्दा जो प्रामुख्याने मांडला गेला होता तो हा की, अस्पृश्य लोकांनी हिंदुधर्माचा त्याग करण्याचा व हिंदू देवतांना व ग्रंथांना न मानण्याचा जो ठराव पास केला. त्यामुळे त्यांना दिलेल्या राजकीय हक्कांचा उपभोग घेण्यास ते कायद्याने अपात्र ठरले आहेत. याचा स्पष्ट अर्थ असा की, अस्पृश्य लोकांना नवीन राजकीयघटनेत जे राजकीय हक्क देण्यांत आलेले आहेत त्यांचा जर उपभोग घ्यावयाचा असेल तर त्यांना हिंदू म्हणूनच राहिले पाहिजे. आपण हिंदू नाही असे ते जर म्हणतील तर ते आपल्या राजकीय हक्काला मुकतील. जसा कोळी आपले जाळे लांबवर पसरून त्यात ओहोळातील मासे अडकवून धरण्याचा प्रयत्न करतो, तसाच हिंदुत्वाचा अस्पृश्यांभोवती पाश पसरून त्यांना आपल्या जाळ्यात अडकविण्याचा हिंदूंचा हेतू असेल तर तो या डावाने साध्य होऊ शकणार नाही. कारण हा डाव सफल होण्यास आधी हिंदू कोणाला म्हणावे याची काहीतरी ठराविक कायदेशीर व्याख्या असावयास पाहिजे. पण हिंदू या शब्दाची सर्वसामान्य व्याख्या आजवर कोणीही दिलेली नाही व कोणत्याही कायद्यात ठेवण्याचा प्रयत्नही केलेला नाही. हिंदुधर्माची व्याख्या करणे इतके कठीण आहे की, जो कोणत्याच धर्माचा अनुयायी नाही तो हिंदुधर्माचा अनुयायी, अशी व्याख्या एक तज्ज्ञ माणसाने तयार केलेली आमच्या वाचनात आहे. खुद्द हिंदुमहासभेने देखील हिंदुस्थानात उत्पन्न झालेल्या कोणत्याही धर्माचे पालन करणारा तो हिंदू अशी हिंदू या शब्दाची व्याख्या केलेली आहे व हिंदू या शब्दात सनातनी, आर्यसमाज,

जैन, शीख, बौद्ध व ब्राह्मो वगैरे सर्वांचा समावेश होतो असे आपल्या उद्देश व नियम पत्रकात म्हटले आहे. जेथे हिंदू कोण आणि कोण नव्हे हेच अनिश्चित आहे तेथे अस्पृश्यांना हिंदू या कोंडीत कोंडून ठेवण्याचा प्रयत्न निष्फळ होणार आहे. हिंदुधर्म हे एक अशा प्रकारचे जाळे आहे की, ह्या जाळ्यातून कोणत्याही माणसास तो पुरेसा लवचिक जिभेचा व उलट्या काळजाचा असला तर त्याला निसटून जाता येईल. अशा स्थितीमध्ये हिंदू लोकांनी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याचा विचार करण्याची खरोखरी काही आवश्यकता नाही. परंतु प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळे एवढ्या प्रास्ताविक मुद्यावरच निकाल करून सोडून देणे आम्हांस योग्य वाटत नाही.

राजकीय हक्क उपभोगण्यासाठी अस्पृश्यांनी हिंदू म्हणून घेतलेच पाहिजे काय या प्रश्नाचे खरोखरी दोन भाग पडतात. एक नुसता हिंदू धर्माचा त्याग केला तर त्यांच्या राजकीय हक्कांवर काय होईल परिणाम व दुसरा हिंदू धर्माचा त्याग करून परधर्माचा स्वीकार केला तर त्यांच्या राजकीय हक्कांवर काय परिणाम होईल? हिंदू लोकांनी उपस्थित केलेली बाब इतकी गुंतागुंतीची आहे की, वरील प्रमाणे दोन भाग पाडूनच एक एका भागाचा निरनिराळा विचार करणे वाचकांच्या समजुतीच्या दृष्टीने इष्ट आहे. प्रथमतः नुसता **हिंदु धर्माचा त्याग केला तर काय होईल ?** त्यांना आपल्या राजकीय हक्कांना मुकावे लागेल काय ? या प्रश्नाचा विचार करू. या प्रश्नांचा विचार करताना गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टात निरनिराळ्या जातींना जे प्रतिनिधित्व देण्यात आले आहे त्याला लागू असणाऱ्या कलमाचा परिचय करून घेणे अत्यंत जरूरीचे आहे. ज्या लोकांनी हे बुजगावणे पुढे केले आहे त्या लोकांना आमची अशी सूचना आहे की, त्यांनी अस्पृश्य वर्गाची जी व्याख्या कायद्यामध्ये केली आहे या व्याख्येकडे लक्ष पुरवावे. ही व्याख्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टाच्या पहिल्या परिशिष्टाच्या २६ व्या कलमामध्ये दिलेली आहे. या कलमामध्ये अस्पृश्यवर्ग असा शब्दप्रयोग मुळीच केलेला नाही. ही गोष्ट प्रथमतः सर्वांनी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी आहे ती ही की या कलमामध्ये – डिप्रेस्ड क्लासेस – दलित वर्ग असा देखील शब्द प्रयोग केलेला नाही. या कलमात जो शब्दप्रयोग केलेला आहे तो ' शेड्युल्ड कास्ट ' असा शब्दप्रयोग केलेला आहे. या शब्दप्रयोगावरून उघड आहे की, कलम २६ यामध्ये जी व्याख्या दिलेली आहे ती व्याख्या धर्मावर अवलंबून ठेवलेली नाही. सम्राट बादशहा व त्यांचे कौन्सिल यांनी ज्या

जातींनतत्र लिस्टातवसाया घातले असेल त्यांना शेडयूल्ड कास्ट म्हणण्यात यावे. अशी शेडयूल्ड कास्ट याची व्याख्या करण्यात आलेली आहे. शेडयूल्ड कास्ट म्हणजे फक्त पूर्वीचे अस्पृश्य किंवा डिप्रेस्ड क्लासेस असे व्याख्येत म्हटलेले नाही. तसेच ज्या जातींचा समावेश लिस्टात करून त्यांना शेडयूल्ड कास्टमध्ये टाकण्यात आले आहे, त्यांचा उल्लेख करताना हिंदूंपैकी अमूक अमूक जाती असे विशेषणात्मक वचन लावलेले नाही. हे परिशिष्ट १ कलम २६ यात शेडयूल्ड कास्टच्या व्याख्ये-वरून उघड होत आहे. इतकेच नव्हे तर शेडयूल्ड कास्टच्या बाबतीत जी सार्वभौम बादशहाची ऑर्डर इन कौन्सिल प्रसिद्ध झाली आहे त्यात शेडयूल्ड कास्टमध्ये प्रांतोप्रांती कोणकोणत्या जातींचा समावेश करावयाचा याची जी यादी देण्यात आलेली आहे त्यातही **हिंदूंतील अमूक अमूक जाती असे विशेषणात्मक वचन घातले नाही**. नुसता जातींचा उल्लेख केलेला आहे. या व्याख्येवरून स्पष्ट आहे की, राजकीय हक्काकरिता हिंदू समाजात किंवा हिंदुधर्मात राहिले पाहिजे अशी अट कायद्याने घातलेली नाही आणि म्हणून जे लोक असे म्हणतात की, हिंदू धर्मांतर्गत किंवा हिंदू समाजांतर्गत जातींनाच हे राजकीय हक्क दिले आहेत, ते त्या जाती हिंदुधर्माचा त्याग करतील तर त्यांना राजकीय हक्कांना मुकावे लागेल, त्या लोकांचे म्हणणे या एका व्याख्येच्या विवेचनावरून कसे निखालस खोटे आहे हे कोणासही कळून येईल.

अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या बाबतीत हिंदुधर्मत्यागाच्या ठरावाचा काही विघातक परिणाम होऊ शकत नाही. याला दुसरीही कारणे देता येतील, व ही कारणे सुलभ रीतीने जनतेच्या वाचकांना समजावी म्हणून ती देण्यापूर्वी जात-वार प्रतिनिधित्वाच्या कायद्याने ठरविलेल्या पद्धतीची रूपरेषा काय आहे हे आधी सांगितले पाहिजे. म्हणून या विषयाची मांडणी प्रथम आम्ही करण्याचे योजिले आहे. हिंदुस्थानातील लोक भिन्न भिन्न धर्मांचे अनुयायी आहेत. उदाहरणार्थ हिंदू जैन, बौद्ध, पार्शी, मुसलमान वगैरे लोक त्या त्या धर्माचे अनुयायी आहेत. त्याच प्रमाणे कित्येक लोक नास्तिक असून कोणत्याच धर्माला मानीत नाहीत. या सर्व लोकांचा मिळून हिंदुस्थानामध्ये सामान्य जनसमूह बनलेला आहे. या सामान्य जनसमूहाचा जो मतदार संघ घडविण्यात आला आहे त्यालाच कायद्याने सामान्य मतदार संघ असे नाव देण्यात आले आहे. जातवार प्रतिनिधींचे तत्त्व जर हिंदुस्था-नांत आले नसते तर एकाच मतदारसंघात सर्व धर्माच्या लोकांचा तसेच निधर्मी लोकांचाही समावेश झाला असता. म्हणजे सामान्य मतदार संघाला धर्माचा कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध झाला नसता. परंतु जातवार प्रतिनिधित्वाचे तत्त्व

मान्य झाल्यामुळे जातीय निवाड्याने पहिली जी गोष्ट केली ती ही की, सामान्य मतदारसंघांतून काही विशिष्ट धर्मांचे लोक निवडून काढून त्यांचे स्वतंत्र मतदार-संघ घडविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे जातीय निवाड्याने तीन धर्मांच्या लोकांना सामान्य मतदारसंघांतून बाहेर काढून त्यांचे स्वतंत्र गट बनविले ते म्हणजे ख्रिस्तीधर्म, इस्लामधर्म व पंजाबांतील शीख धर्म हे होत. अशा रीतीने जातीय निवाड्याने हिंदुस्थानामध्ये मतदारांचे दोन प्रकारचे संघ निर्माण केले आहेत. एक सामान्य मतदार संघ आणि दुसरा स्वतंत्र मतदार संघ. या बाबतीत एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. ती ही की, धर्मावलंबी स्वतंत्र मतदार संघांत ठेवलेल्या राजकीय हक्कांचा उपभोग घेण्यासाठी ख्रिस्ती, इस्लाम व शीख या तीन धर्मांपैकी ज्या धर्मानुयायांचा तो संघ असेल त्या धर्माचे अनुयायित्व मान्य करणे ही एक आवश्यक अट आहे. परंतु सामान्य मतदार संघामध्ये दाखल होण्याकरिता आणि या मतदार संघाकरिता दिलेल्या हक्कांचा उपभोग घेण्यासाठी त्यांत समाविष्ट झालेल्या कोणत्या तरी धर्माचे अनुयायित्व मान्य करण्याची अट कायद्याने घातलेली नाही. ही गोष्ट मुसलमान व ख्रिस्ती मतदार संघांतील आणि सामान्य मतदार संघांतील मतदारांसाठी कायद्याने ज्या अटी ठरविल्या आहेत, त्या ताडून पाहिले असताना सहज कळून येण्यासारखी आहे गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्टच्या ६ व्या परिशिष्टात मतदार होण्याला अवश्य असलेली पात्रता अंगी येण्याकरिता ज्या अटी कायद्याने घातल्या आहेत त्या पाहिल्या तर असे आढळून येईल की, मतदार २१ वर्षांचा असला पाहिजे, विवक्षित ठिकाणी ठराविक मुदतीपर्यंत वस्ती करीत असला पाहिजे अगर त्याचे शिक्षण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत झाले असले पाहिजे. या अटी जशा सर्वसाधारण मतदार संघातील मतदाराला लागू आहेत त्याचप्रमाणे स्वतंत्र मतदार संघातील मतदाराला या सर्वसाधारण मतदाराच्या अटी लागू आहेतच. परंतु ६ व्या परिशिष्टाच्या कलम ५ व कलम ६ याकडे नजर फेकली असताना असे दिसून येईल की विवक्षित धर्माचे अनुयायित्व ही एक जादा अट घालण्यात आली आहे. म्हणजे मुसलमान मतदार संघात सामील असलेला मनुष्य धर्माने आपण मुसलमान आहोत असे मान्य करणारा असला पाहिजे. ख्रिस्ती मतदार संघात सामील असलेला मनुष्य ख्रिस्ती धर्माचा तो अनुयायी आहे असे मान्य करणारा असला पाहिजे. तसेच शीख स्वतंत्र संघात सामील असलेला मनुष्य आपण शीख धर्माचे आहोत असे मान्य करणारा असला पाहिजे. सामान्य मतदार संघात सामील असलेला मतदार हा त्या सामान्य मतदार संघात ज्या अनेक धर्मांचा समावेश झालेला आहे

त्यांपैकी कोणत्या तरी एका धर्माचा अनुयायी आहे असे त्याने मान्य केले पाहिजे अशी अट कायद्यात कोठेच घातलेली नाही. यावरून असे दिसून येईल की, सामान्य मतदार संघात धर्माला कोणत्याही प्रकारने राजकीय महत्त्व देण्यात आलेले नाही आणि ज्यांचा समावेश सामान्य मतदार संघात करण्यात आला आहे त्यांचे राजकीय हक्क अमुक धर्म असण्यावर अगर नसण्यावर कोणत्याही प्रकारे अवलंबून ठेवलेले नाहीत. अस्पृश्य वर्गाचा समावेश सर्व सामान्य मतदार संघात करण्यात आलेला आहे, ही गोष्ट ध्यानात घेतली आणि वर दर्शविल्याप्रमाणे सामान्य मतदार संघात धर्माधर्माचा आणि मतदाराच्या पात्रापात्रतेचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. या दोन गोष्टी जमेस घेतल्या म्हणजे अस्पृश्य वर्गाला जे राजकीय हक्क दिले आहेत ते हक्क त्यांनी हिंदुधर्माचा त्याग केल्याचा निश्चय जाहीर केल्यामुळे हिरावले जातील, असे म्हणणे कोणालाही शक्य होणार नाही. कारण ते हक्क धर्मावलंबी नाहीत. ज्या अस्पृश्य लोकांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याचा निश्चय जाहीर केला आहे परंतु ज्यांनी अजून दुसरा धर्म स्वीकारला नाही त्या लोकांना फार तर निधर्मी म्हणता येईल. परंतु निधर्मी लोकांचा समावेश सामान्य मतदार संघात करता येणार नाही असे कायद्याचे अल्पस्वल्प ज्ञान असणारा कोणीही माणूस म्हणू शकणार नाही.

ज्या लोकांनी हा बागुलबोवा अस्पृश्यांपुढे उभा केला आहे त्या लोकांचा असा समज आहे की, अस्पृश्य वर्गाला देण्यात आलेल्या जागा हिंदू लोकांच्या वाटचास आलेल्या जागांमधून दिलेल्या आहेत. परंतु आमच्या मते हा त्यांचा केवळ भ्रम आहे. कारण हिंदुजातीला कायद्याने ठराविक अशा जागा कोणत्याच प्रांतात दिलेल्या नाहीत. मुसलमान, ख्रिश्चन, शीख इत्यादी मतदार संघांना ठरवून दिलेल्या जागा सोडून ज्या शेषजागा राहिल्या त्या मुसलमान, ख्रिश्चन, शीख यांना वगळून जी बाकीची जनता राहिली व जिचा सर्व साधारण मतदार संघात समावेश करण्यात आलेला आहे, त्या सामान्य जनतेला मिळून म्हणून देण्यात आलेल्या आहेत, आणि अस्पृश्यांना देण्यात आलेल्या जागा या सामान्य जनतेला देण्यात आलेल्या जागांपैकी राखीव असलेला भाग असल्यामुळे केवळ हिंदू लोकांच्या वाटचास आलेल्या जागांपैकी काही जागा अस्पृश्य लोकांना देण्यात आल्या, या म्हणण्याला काहीच आधार नाही. कारण ज्या सर्वसाधारण मतदार संघाच्या वाटचातून अस्पृश्य वर्गाकरिता काही भाग राखून ठेवलेला आहे त्या सर्वसाधारण मतदार संघात हिंदूप्रमाणे जैन, बौद्ध, पारशी, यहुदी, नास्तिक वगैरे हिंद्वेतरांचा समावेश झालेला आहे. मुळातच हिंदूंच्या जागा नाहीत असे ठरल्यानंतर हिंदूंनी

**आपल्या वाटणी पैकी काही भाग अस्पृश्यांना ते हिंदू आहेत म्हणून व हिंदू राहतील असे समजून दिल्या, असे म्हणावयास काही आधार नाही.**

येथपर्यंत आमच्या मताच्या समर्थनार्थ आम्ही तीन कारणे दिली आहेत. पहिले कारण असे की, शेडयूल्ड कास्ट याची व्याख्या देताना हिंदू धर्मांतर्गत जाती असा उल्लेख कायद्यात कोठेच केलेला नाही. दुसरे कारण असे की, ज्या सर्व–साधारण मतदार संघामध्ये अस्पृश्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्या सर्व साधारण मतदार संघामध्ये दाखल होण्यास ज्या अटी कायद्याने घातल्या आहेत त्यांत हिंदुधर्माचे अनुयायित्व नव्हे तर कोणत्याही धर्माच्या अनुयायित्वाची आवश्यकता सांगितलेली नाही व तिसरे कारण असे की, अस्पृश्य वर्गाला ज्या जागा देण्यात आलेल्या आहेत त्या हिंदूंच्या वाटयातून दिलेल्या नसून सर्वसाधारण जनतेच्या वाटयातून दिलेल्या आहेत. परंतु हिंदू लोकांनी शेडयूल्ड कास्टच्या लिस्टात समाविष्ट झालेल्या जातींना राखून ठेवलेल्या जागांचा फायदा घेण्याकरिता हिंदू धर्मातच राहिले पाहिजे, असा जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याला आम्ही नकारार्थी उत्तर दिले आहे. त्याला आणखी चौथे कारण देता येण्यासारखे आहे. शेडयूल्ड कास्टच्या लिस्टात समावेश केलेल्या जातींनी हिंदू धर्माशी एकनिष्ठ राहिले तरच त्यांना राखीव जागांचा फायदा घेता येईल असे जे म्हणतात त्यांनी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले असावे असे आम्हांस वाटते. आमच्या मते या जातींतील लोकांना राखीव जागेचा जो फायदा देण्यात आलेला आहे तो त्या जातींतील मतदारांच्या धार्मिक निष्ठेवर नसून मतदारांच्या जातित्वावरच आधारलेला आहे. जातीय निवाडयाने सामान्य मतदार संघांत जे वर्ग किंवा ज्या जाती समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत त्यांपैकी काही विशिष्ट जाती निवडून काढून त्यांचा एक गट बनविला आहे. आणि त्या गटाला शेडयूल्ड कास्ट असे नाव देऊन त्या गटासाठी सामान्य मतदार संघाच्या वाटयास आलेल्या जागांपैकी काही ठराविक जागा त्यांच्याकरिता राखून ठेविल्या आहेत. या राखीव जागेकरिता पात्रापात्रतेची कसोटी पाहावयाची झाल्यास ती जातीवरून पाहावयाची आहे. धर्मावरून पाहावयाची नाही. **राखीव जागेकरिता अस्पृश्य उमेदवाराची पात्रता ठरवावयाची झाल्यास ती जातीवरून ठरवावयाची, धर्मावरून ठरवावयाची नाही** या आमच्या म्हणण्याची सत्यता खालील उदाहरणावरुन स्पष्टपणे वाचकांच्या ध्यानात येईल.

पंजाबातील शेडयूल्ड कास्टच्या लिस्टात आदधर्मीय लोकांचा व रामदासी लोकांचा समावेश करण्यात आलेला आहे. ही गोष्ट शेडयूल्ड कास्टच्या बाबतीत

जी सरकारी आर्डर-इन-कौन्सिल प्रसिद्ध झालेली आहे त्यावरून दिसून येईल. या आदधर्मीय लोकांचा इतिहास या ठिकाणी अतिशय उद्बोधक होईल अशी आमची खात्री आहे. काही वर्षापूर्वी पंजाबातील चांभार व च्यूडा वगैरे अस्पृश्य जातींच्या लोकांनी आदधर्म मंडळ नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेचा मूळ उद्देश हिंदू धर्माचा त्याग करणे असाच होता. सन १९३१ च्या खानेसुमारीचे वेळी या संस्थेने पंजाब सरकारकडे असा अर्ज केला होता की, आम्ही हिंदुधर्माचा त्याग केलेला आहे आणि म्हणून खानेसुमारीत आम्हांला हिंदूपासून निराळे करून सेन्सस रिपोर्टात आमची लोकसंख्या आदधर्मीय या नावाखाली स्वतंत्रपणे निराळी दाखविण्यात यावी. या मागणीमुळे पंजाबातील हिंदू लोक चिडून जाऊन त्यांनी पुष्कळ अत्याचार केले. परंतु या लोकांनी आपला निश्चय न सोडल्यामुळे आद-धर्मीयांची चळवळ यशस्वी होऊन पंजाबच्या सेन्सस रिपोर्टात आदधर्मीयांची संख्या आदधर्मीय नावाखाली हिंदूंपासून निराळी दाखविण्यात आली आहे. रामदासी लोक हे शीख धर्माचे अनुयायी आहेत. अर्थातच ते हिंदू नाहीत. तथापि त्यांचा समावेश शेडयूल्ड कास्ट-मध्ये करण्यांत आलेला आहे. यावरील दोन उदाहरणावरून एकच निष्कर्ष निघू शकतो व तो हा की, शेडयूल्ड कास्टच्या गटातील जातींना त्यांना दिलेले राजकीय हक्क उपभोगण्याकरिता ते पात्र आहेत किंवा अपात्र आहेत हे ठरविण्याकरिता ते हिंदू धर्माचे आहेत किंवा नाहीत हा प्रश्न निरर्थक आहे. उमेदवार या शेडयूल्ड कास्टच्या लिस्टात समाविष्ट केलेल्या कोणत्या तरी एका जातीचा माणूस असला म्हणजे कायद्याच्या दृष्टीने बस्स आहे. तो त्यांच्याकरिता राखून ठेवलेल्या राजकीय हक्कास पात्र होऊ शकतो. अमूक एका धर्मावर निष्ठा असण्याची आवश्यकता नाही. म्हणजे हिंदू धर्माचा त्याग करून देखील त्यांना कायद्याने मिळालेल्या राजकीय हक्कांचा उपभोग घेता येईल.

## परधर्मात गेल्याने काय होईल ?

अस्पृश्य वर्गाच्या हितशत्रूंनी जो प्रश्न उभा केला आहे तो खोडून टाकण्या-साठी याहून अधिक लिहिण्याची आवश्यकता आहे असे आम्हांस वाटत नाही. शेडयूल्ड कास्टच्या लिस्टमधील काही जातींनी हिंदू धर्माचा त्याग केला इतकेच नव्हे तर दुसऱ्या एकाद्या धर्माचा अंगीकार केला तर त्यांच्या राजकीय हक्कांचे काय होईल, याही प्रश्नाची वासलात आजच लावण्याचा आमचा इरादा आहे.अस्पृश्य वर्गाच्या प्रतिपक्षीयांनी या बाबतीत काही प्रख्यात हिंदू कायदे पंडितांचा सल्ला घेत-ल्याचे जाहीर झाले आहे. या हिंदू पंडितांनी शेडयूल्ड कास्टच्या लिस्टमधील जातींनी

हिंदू धर्माचा त्याग करावा असे केवळ अभावात्मक धोरण ठरविले तर राजकीय हक्क हिरावून घेण्याला कायद्याच्या दृष्टीने ते कारण अपुरे पडेल असे मत दिले आहे. आम्हांला आनंद वाटतो की, कायदे पंडितांच्या या सल्ल्यामुळे अस्पृश्य वर्गाच्या हितशत्रूंच्या कुटील नीतीला बराच आळा बसेल. परंतु या हिंदू-कायदे पंडितांनी अस्पृश्यांनी धर्मांतर केले तर त्यांचे हक्क नष्ट होतील असे जे मत दिले आहे, त्याने आमचे समाधान होऊ शकत नाही. या हिंदू कायदे पंडितांच्या मतांत अतिव्याप्तीचा दोष आहे आणि म्हणून कायद्याच्या दृष्टीने ते अग्राह्य आहे, असे आम्हांला वाटते. आमच्या कायद्याच्या मते जातीय प्रतिनिधीत्वाच्या बाबतीत कायद्याने ठरवून दिलेल्या व्यवस्थेप्रमाणे अस्पृश्य वर्गाला सामान्य मतदार संघात असलेले राजकीय हक्क काही धर्म अंगीकारिल्याने निश्चितपणे नष्ट होतील हे खरे; परंतु हा नियम सर्व धर्मास लागू होईल असे नाही. आमच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ असा की, **अस्पृश्य वर्गाने सामान्य मतदार संघापासून विभक्त करण्यात आलेल्या एखाद्या धर्माचा अंगीकार केला तरच त्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील.** सामान्य मतदार संघातून वगळण्यात आलेला धर्म कोणता हे प्रत्येक इलाख्यात कायद्याने जी व्यवस्था ठरवून दिली असेल तिच्यावर अवलंबून आहे. इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म हिंदुस्थानातील सर्वच प्रांतांत सामान्य मतदार संघापासून वेगळे काढण्यात आलेले आहेत. परंतु शीख धर्म फक्त पंजाब प्रांतांतच स्वतंत्र करण्यात आलेला आहे. याचा अर्थ असा की, अस्पृश्य लोक मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले तर हिंदुस्थानातील सर्वच प्रांतांत त्यांचे राजकीय हक्क नाहीसे होतील. आणि शीख झाले तर फक्त पंजाब प्रांतांतच ते नाहीसे होतील. अस्पृश्य वर्गाने बुद्ध, जैन, ज्यू आणि शीख –पंजाब प्रांतखेरीज करून—धर्माचा अंगीकार केला तर त्यांच्या राजकीय हक्कांना कोणत्याही प्रकारचा बाध येऊ शकणार नाही, ही गोष्ट निर्विवाद आहे. याला बंगाल प्रांत हा एकच अपवाद आहे. बंगाल प्रांतातील शेडचूल्ड कास्टस्च्या बाबतीत असा नियम करण्यात आला. आहे की शेडयूल्ड कास्टपैकी एखाद्या व्यक्तीने बुद्ध धर्माचा स्वीकार केला तर त्याची शेडचूल्ड कास्टमध्ये गणना करता येणार नाही. म्हणजे त्याला त्या गटाचे राजकीय हक्क उपभोगता येणार नाहीत हा नियम शेडयूल्ड कास्ट ऑर्डर्स–इन–कौन्सिलमध्ये घालण्यात आलेला आहे. हा प्रतिबंध फक्त बौद्ध धर्मापुरता असून तो फक्त बंगालच्या अस्पृश्य लोकांनाच लागू आहे.

या सर्व विवेचनाचा मथितार्थ आमच्या वाचकांना पूर्णपणे कळावा म्हणून धर्मांतराचा राजकीय हक्कांवर काय परिणाम होईल हे थोडक्यात सांगणे इष्ट

आहे असे आम्हांस वाटते. म्हणून आमच्या विवेचनाचे संकलन आम्ही खालील कलमांत देत आहोत.

१) नुसता हिंदू धर्माचा त्याग केल्याने व दुसरा कोणताही धर्म न स्वीकार-ल्याने म्हणजे निधर्मी बनल्याने अस्पृश्यांचे राजकीय हक्क नष्ट होऊ शकत नाहीत. हा नियम सर्व प्रांतांना लागू पडेल.

२) हिंदुधर्माचा त्याग करून अस्पृश्य लोकांनी इस्लाम अगर ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर त्यांचे राजकीय हक्क हिरावले जातील. हा नियम सर्व प्रांतांतील लोकांना लागू पडेल.

३) बंगाल प्रांतखेरीज करून इतर कोणत्याही प्रांतांतील अस्पृश्य लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला असताना त्यांचे राजकीय हक्क नष्ट होणार नाहीत.

४) पंजाब प्रांतखेरीज करून बाकी सर्व प्रांतांतील लोकांनी शीख धर्माचा स्वीकार केला असताना त्यांचे राजकीय हक्क नष्ट होणार नाहीत.

५) कोणत्याही प्रांतांतील अस्पृश्य लोकांनी जैन यहुदी, इस्त्राइली अगर झोरोस्ट्रियन पार्शी धर्म स्वीकारला तर त्यांचे राजकीय हक्क नष्ट होणार नाहीत. हा नियम सर्व प्रांतांना लागू पडतो.

वरती जेथे आम्ही असे म्हटले आहे की, सर्व प्रांतांतील अस्पृश्य लोक ख्रिस्ती अथवा मुसलमान झाले अथवा पंजाबमधील अस्पृश्य लोक शीख झाले तर त्यांचे राजकीय हक्क बुडतील यावरून कोणाही धर्मांतरवादी अस्पृश्य माण-साने दु:खित होऊ नये किंवा स्वार्थसाधू हिंदूने समाधान मानू नये. कारण त्यांचे हक्क नष्ट होतील यांचा अर्थ त्यांना कोठेच राजकीय हक्क उपभोगावयास मिळ-णार नाहीत, असा समज कोणीही करून घेऊ नये. त्यांचे हक्क बुडतील याचा अर्थ इतकाच की, अस्पृश्य म्हणून जे हक्क दिले गेले आहेत त्यांचा उपभोग त्यांना घेता येणार नाही. परंतु अस्पृश्य म्हणून दिलेल्या राजकीय हक्कांना ते जरी आचवले तरी हिंदुस्थानातील मुसलमानांना व ख्रिस्ती लोकांना प्रांतोप्रांती जे राजकीय हक्क दिलेले आहेत किंवा पंजाबात शिखांना जे राजकीय हक्क दिलेले आहेत त्या हक्कांचे ख्रिस्ती म्हणून, मुसलमान म्हणून वा शीख म्हणून ते भागीदार होऊ शकतील. तेथे कसलीही आडकाठी येऊ शकणार नाही.

अस्पृश्य वर्गाला होता होईल तोपर्यंत नामोहरम करण्याचा हिंदूंनी केलेला हा पहिलाच उपद्व्याप नव्हे. पुणे-करार झाल्यानंतर तो निष्फळ कसा करावा व त्यापासून अस्पृश्य लोकांना जास्तीत जास्त लाभ कसा न घेता येईल अशी व्यवस्था करण्याचा घाट हॅमंड कमिटीपुढे करण्याचा शक्य तो प्रयत्न हिंदूंनी केला. अस्पृश्यांच्या प्राथमिक निवडणुकीत कमीत कमी चार उमेदवार उभे राहिलेच पाहिजेत. चारांपेक्षा कमी राहिले तर पुणे करारास बाध येतो, असा लबाडीचा मुद्दा हिंदू लोकांनी हॅमंड कमिटीसमोर मोठ्या आग्रहाने मांडला होता. चार उमेदवार उभे राहिलेच पाहिजेत असे जर ठरले तर अस्पृश्यांच्या मतांची विभागणी होऊन हिंदूंनी आपल्यांतीलच थोडकीच मते भरीस टाकली असताना त्यांना आवडता असेल असा अस्पृश्यांतील उमेदवार निवडून देता येईल म्हणून चार ही संख्या कमीत कमी आहे असा आग्रह ते धरून बसले होते. परंतु त्यांच्या दुर्दैवाने हॅमंड कमिटीतील सभासद इतके मूर्ख नव्हते. त्यांनी हिंदूंची विचारसरणी लबाडीची होती असे जरी स्पष्ट भाषेत म्हटले नाही तरी ती विचारसरणी अयोग्य आहे असा निकाल दिला. हॅमंड कमिटीसमोर अशा प्रकारे त्यांच्या करामतीची वासलात लागल्यानंतर आता हिंदू लोकांनी अस्पृश्यांचे राजकीय हक्क संपुष्टात आणण्याची ही दुसरी करामत चालू केली आहे.

हिंदु लोकांनी अस्पृश्यांच्या धर्मांतराच्या बाबतीत ज्या करामती चालविल्या आहेत त्या पाहता मालकांची गुलामासंबंधांने जी मनोवृत्ती दिसून येते तीच मनोवृत्ती हिंदू लोकांची अस्पृश्य वर्गासंबंधी दिसून येते. जर हिंदूंना अस्पृश्य वर्गाच्या कल्याणाची खरीखुरी कळकळ असती तर त्यांनी असे म्हटले असते, " खेद वाटतो आजवर आम्ही तुम्हाला गुलाम म्हणून वागविले. आमच्या हातून तुमची उन्नती होऊ शकली नाही. परंतु आज आम्ही तुम्हांला स्वातंत्र्य देतो, आणि तुमच्या उद्धाराची आमच्या मनाला जी तळमळ लागलेली आहे आणि तुमच्याविषयी आमच्या मनात ज्या सदिच्छा वसत आहेत त्यांची खूण पटविण्यासाठी आम्ही राजकीय सत्तेचा एवढा भाग तुमच्या स्वाधीन करतो. आपल्या इच्छित मार्गाने जा आणि आपल्या सामर्थ्याने समाजात योग्य असे सन्मानाचे स्थान प्राप्त करून घ्या." परंतु हिंदूंची मनोवृत्ती अशा प्रकारची नाही. गुलाम सेवा करण्याला कबूल असेल तरच त्याला अन्न घालणाऱ्या मालकाच्या मनोवृत्तीप्रमाणे हिंदू लोकांची मनोवृत्ती आहे. अस्पृश्य वर्गातील ज्या आमच्या मित्रांना हिंदू लोकांच्या सहानुभूतीचा मोह वाटतो त्यांनी या त्यांच्या मित्रांच्या – हिंदूंच्या - मनोवृत्तीपासून योग्य तो धडा घ्यावा. हिंदू लोकांना आमचे उत्तर अगदी सरळ आणि सोपे

आहे. आम्ही जे राजकीय हक्क संपादन केले आहेत ते हिंदू लोकांनी आम्हांला देणगी म्हणून दिलेले नाहीत. आमच्या राजकीय हक्कांवर आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. ख्रिश्चन, मुसलमान किंवा शीख यांचा राजकीय हक्कांवर जितका नैसर्गिक हक्क आहे त्यांपेक्षा अस्पृश्यवर्गाचा अधिक हक्क आहे. आमचे नैसर्गिक हक्क आम्हांला या पूर्वीच मिळाले नाहीत, यावरून त्यांच्यावर आमचा हक्क पोहोचत नाही असा अर्थ करता येणार नाही. आजपर्यंत हिंदू लोक सामर्थ्यवान होते आणि अस्पृश्य असमर्थ होते म्हणून हिंदू लोकांनी अन्यायाने दाबून ठेवलेले आमचे हक्क आम्हांला मिळू शकले नाहीत, एवढेच फार तर म्हणता येईल. आम्ही कोणत्याही तऱ्हेने हिंदूंचे ओशाळे नाही आणि जे हक्क वस्तुत: आमचेच होते ते आम्हांला मिळाल्याबद्दल हिंदू लोकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे अस्पृश्यांना काहीच कारण नाही. उलट अस्पृश्यांचे मार्गात हिंदू लोकांनी जे काटे पेरले त्याबद्दल संताप वाटण्याला अस्पृश्यांना सबळ कारणे आहेत. अस्पृश्य वर्गाने जर कोणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करावयाची असेल तर ब्रिटिश सरकार संबंधानेच होय ! आमच्या संकटाच्या वेळी तेच आमच्या सहाय्याला धावले आणि आमचे न्याय्य हक्क संपादन करण्याला त्यांच्या सहाय्यानेच आम्ही समर्थ झालो. अस्पृश्य वर्गासंबंधी महात्मा गांधींनी केलेल्या लीला जगजाहीर झालेल्या आहेत. कॉंग्रेस आणि मुसलमान यांच्या संयुक्त प्रयत्नाने अस्पृश्य वर्गाच्या मागण्या हाणून पाडण्यासाठी मुसलमानांना लाच देण्याचा जो कावा या महात्म्याने रचला होता त्याची हकिगत हिंदुस्थानच्या इतिहासात वाचीत असताना कोणाही हिंदी माणसाला लज्जेने मान खाली घालावी लागेल. महात्म्याने अस्पृश्य वर्गाचा जो विश्वासघात केला त्याला, जगाच्या इतिहासात कोठेही तुलनाच सापडणार नाही. आमची खात्री आहे की, कॉंग्रेस आणि अस्पृश्यवर्ग यांची पुरतेपणी ताटातूट करण्याला जर एकादी गोष्ट प्रामुख्याने कारणीभूत झाली असेल तर गोलमेज परिषदेच्या वेळी या महात्म्याने अस्पृश्यवर्गाचा केलेला विश्वासघात हीच होय. म्हणून अस्पृश्य वर्गाने हिंदू लोकांबद्दल कृतज्ञतेची भावना दाखविली नाही, तर त्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटण्याचे करणा. नाही श्याना कृ अस्पंतज्ञता वाटण्यासारखे हिंदूनी त्यांच्यासाठी काहीच केलेले नाही.

या विषयावर ता. २८ जुलैच्या अंकात ' केसरी ' च्या संपादकाने "धर्माचा विचित्र लिलाव " या शीर्षकाखाली एक अग्रलेख लिहून आपल्या अकलेचे प्रदर्शन केले आहे. या अग्रलेखात जी हीन मनोवृत्ती व्यक्त करण्यात आलेली आहे व जो शिवराळपणा करण्यात आला आहे त्याच्याशी आम्हांला काही कर्तव्य नाही.

स्वतःच्या मुलाला त्याच्या आईसमोर ' शिदळीच्या ' म्हणून संबोधण्यास ज्या जातीच्या लोकांना कवडीचीही खंत वाटत नाही त्या जातीपैकी एकाने परकीया-संबंधाने अयोग्य भाषा वापरली तर त्याबद्दल कोणास आश्चर्य का वाटावे ? ' केसरी ' च्या संपादकाने रचलेल्या तर्कटातील दोनच विधानांना आम्ही उत्तर देऊ इच्छितो. कम्युनल अवार्ड मध्ये अस्पृश्यांकरिता अवघ्या एकाहत्तर जागा राखून ठेवल्या होत्या. त्याच्याऐवजी पुणे करारात अस्पृश्यांना १४८ जागा देण्यात आल्या. म्हणजे ७१ जागा अधिक देण्यात आल्या. हा मोठा स्वार्थत्याग आहे, असे ' केसरी ' चा शहाणा संपादक सांगत सुटला आहे व अस्पृश्य लोक हिंदूंचे आभार मानीत नाहीत, म्हणून तो त्यांना कृतघ्न म्हणतो. या उडाणटप्पू संपाद-काला असे सांगणे प्राप्त आहे की, कम्युनल अवार्डमध्ये फक्त ७१ जागा राखून ठेविल्या होत्या, जास्त काही दिले नव्हते, ही गोष्ट खोटी आहे. अस्पृश्य लोकांना कम्युनल अवार्डमध्ये नुसत्या ७१ जागा राखून ठेवल्या होत्या इतकेच नव्हे, तर त्याच्याहीपेक्षा जास्त विस्तृत प्रकारचे राजकीय हक्क देण्यात आलेले होते. कम्युनल अवार्डमध्ये स्वतंत्र मतदार संघातर्फे ७१ जागा देण्यात आल्या होत्या एवढीच गोष्ट या निंदकाच्या ध्यानी राहिलेली दिसते. परंतु कम्युनल अवार्डमध्ये अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदार संघातर्फे ७१ जागा राखून ठेवल्या होत्या व त्याशिवाय त्यांना सार्वजनिक मतदारसंघात मत देण्याचा अधिकार देण्यात आलेला होता, ही गोष्ट पुष्कळसे हिंदुलोक विसरून गेलेले दिसतात. कम्युनल अवार्डमध्ये अस्पृश्य मतदाराला दोन मते देण्यात आलेली होती. एक त्यांच्या स्वतंत्र मतदार संघात त्यांचा प्रतिनिधी निवडून देण्याकरिता व दुसरे सर्वसाधारण मतदार संघात सर्वसाधारण उमेदवाराला निवडून देण्याकरिता. ही दोन मतांची सवलत हिंदु-स्थानातील इतर कोणत्याही वर्गातील अगर धर्मातील लोकांना देण्यात आलेली नव्हती. पुणे-करारात सत्त्याहत्तर जागा अधिक देण्यात आल्या हे खरे. परंतु पुणे-करारात अस्पृश्यांचे दुय्यम मत काढून घेण्यात आले हेही तितकेच खरे आहे. या सौद्यात कोणाचा लाभ झाला. कोणाचे नुकसान झाले हे तराजूत घालून कोणालाही नक्की सांगता येणार नाही. परंतु या सौद्यात फक्त अस्पृश्यांचा फायदा झाला व हिंदूंचे नुकसान झाले म्हणणाऱ्यांची गणती लुच्चे लोकांत किंवा निर्बुद्ध लोकांत केली पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी मांडलेला हा धर्माचा लिलाव कसा विचित्र आहे हे दाखविण्याकरिता ' केसरी 'च्या संपादकाने मोठ्या दिमाखाने म्हटले आहे की, शीख व बौद्ध झाल्याने अस्पृश्यतेचा डाग तर जावाच पण अस्पृश्य वर्गाच्या मतदार संघाकरिता राखून ठेवलेल्या जागा पटकाविण्याची सवलत मात्र आपल्या हातची जाऊ नये, अशी डॉ. आंबेडकरांची दुहेरी मागणी आहे. धर्मांतरापुढे राजकीय

हक्कांची आपल्याला काही मातब्बरी नाही हे डॉ. आंबेडकर यांनी नुकत्याच भर– लेल्या महार परिषदेत जे भाषण केले त्यात त्यांनी अगदी स्पष्टपणे जाहीर केले होते. परंतु ' केसरी ' ने म्हटल्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांना दोन्हीही गोष्टी साधा– वयाच्या आहेत, असे जरी गृहीत धरले तरी त्यांत वावगे असे काय आहे ? ख्रिस्ती लोक अस्पृश्य नाहीत, तथापि हिंदूंनी त्यांना स्वतंत्र जागा राखून ठेवण्याचे बाबतीत कसलीच आडकाठी दाखविलेली नाही. मुसलमान लोक काही अस्पृश्य नाहीत. त्यांना त्यांच्या संख्येच्या अनेक पटीने जागा राखून ठेवल्या आहेत व त्यालाही ' **केसरी** ' ने कधी हरकत घेतलेली नाही ! ख्रिस्ती लोक अस्पृश्य नसूनही राखीव जागेच्या सवलतीचा उपभोग घेतात. मुसलमान लोक अस्पृश्य नसूनही राखीव जागेच्या सवलतीचा उपभोग घेतात. मग अस्पृश्य लोकांनी अस्पृश्यतेचा डाग घालवून राखीव जागेची सवलत टिकवून धरणेचा जर प्रयत्न केला तर' **केसरी**' चे पोट का दुखावे ? ' केसरीचे ' वाचक ज्यांना हिंदु–संस्कृतीच्या रक्षणार्थ काळजी वाटत असेल, त्यांनी या पत्राच्या नादान संपादकास असा प्रश्न विचारावा की, अस्पृश्यांकरिता राखून ठेवलेल्या जागा ते ज्या धर्मात जातील त्या धर्माच्या लोकांना लाभणार असतील तर अस्पृश्य लोक शीख अगर बौद्ध होऊन त्या धर्मियांची भर झालेली बरी, का अस्पृश्य लोक मुसलमान व ख्रिस्ती होऊन मुसलमान व ख्रिस्ती लोकांची धन झालेली बरी ? कोणी तरी या जागांचा अपहार करणार असेल तर, तो शीख किंवा बौद्ध यांनी केलेला बरा, का मुसलमान किंवा ख्रिस्ती यांनी केलेला बरा ?

राखीव जागेच्या बाबतीत हिंदू लोकांच्या मनात जो एक भ्रम उत्पन्न झाला आहे त्याचे आम्ही निरसन करू इच्छितो. धर्मांतरामुळे अस्पृश्य वर्गाला मिळा– लेल्या जागा त्यांच्या हातून जातील अशी धमकी देणे किंवा अस्पृश्यांना धर्मांतराचा प्रयत्न यशस्वी झाल्यास त्यांनी गमावलेल्या जागा आपल्या पदरात पडतील अशी आशा करणे या दोन्ही गोष्टी अगदी निष्फळ आहेत हे हिंदु लोकांनी विसरू नये. आम्ही वर सांगितलेच आहे की, अस्पृश्य वर्गाने ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्माचा स्वीकार केला तर त्यांचे राजकीय हक्क नष्ट होतील. परंतु दुसऱ्या एखाद्या कोणत्या तरी धर्माचा जर त्यांनी अंगीकार केला तर त्यांच्या कोणत्याही हक्काला बाध येणार नाही. परंतु महत्त्वाचा मुद्दा असा की, अस्पृश्य वर्गाने ख्रिश्चन किंवा मुसलमान धर्माचा स्वीकार केला तर शेड्यूल्ड कास्टच्या गटातील जाती म्हणून त्यांचे जे हक्क असतील त्यांना ते जरी मुकले तरी ख्रिस्ती किंवा मुसलमान लोकांना जे हक्क असतील ते त्यांना प्राप्त होतील. कारण ख्रिस्ती किंवा इस्लाम धर्मात

प्रवेश केलेल्या नव्या लोकांना मुळच्या ख्रिश्चन किंवा मुसलमान लोकांना कायद्याने जे हक्क दिलेले आहेत ते मिळू नयेत असे कोणालाही म्हणता येणार नाही आणि जर इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मात गेलेल्या नवीन लोकांना राजकीय हक्क देण्याची व्यवस्था करावयाची असेल तर सामान्य मतदार 'संघातील शेड्यूल्ड कास्टच्या गटाला मूळच्या ज्या जागा देण्यात आल्या असतील आणि ज्या त्यांच्या धर्मांतराच्या कारणाने रिकाम्या पडल्या असतील त्या जागा ख्रिश्चन किंवा मुसलमान मतदार संघाला जातील. नव्हे ख्रिस्ती व मुसलमान लोक आपली लोकसंख्या वाढली म्हणून हिंदूंच्या उरावर बसून त्या जागा घेतील.

प्रत्येक हिंदुमात्राने हे ध्यानात ठेविले पाहिजे की, ज्या जागा आज अस्पृश्य वर्गाला देण्यात आलेल्या आहेत, त्यांची परतवणी कधीच होणार नाही व त्या हिंदू लोकांना कधीच मिळणे शक्य नाही. जमिनीबरोबर त्या जमिनीसंबंधीचे करारमदार ज्याप्रमाणे कायम असतात त्याचप्रमाणे अस्पृश्य जातीला ह्या मिळालेल्या जागा जातीय प्रतिनिधित्व अस्तित्वात असेपर्यंत त्या जातीच्याच ताब्यात राहातील. ते जिकडे जातील तिकडे त्यांच्या मागे त्या जातील. म्हणून स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या बाबतीत जे धोरण स्वीकारले आहे ते अगदीच निर्बुद्धपणाचे आहे. धर्मांतराच्या चळवळीला थोपवून धरण्याला हिंदुलोकांच्या या धोरणाचा काहीच उपयोग होणार नाही. त्या धोरणाने अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या जागा त्यांच्या हाती लागू शकणार नाहीत. त्यांच्या या धोरणाचा एकच निश्चित परिणाम होईल तो असा की, गुलामाच्या मनात आपल्या धन्यासबंधाने जी तिरस्कार आणि संतापाची भावना वसत असते तशाच प्रकारची भावना हिंदुलोकांसंबंधाने अस्पृश्यांच्याही मनात उत्पन्न होईल.

अस्पृश्य वर्गाने हिंदू लोक आणि त्यांचा--हिंदुधर्म यांचे बरोबर असलेला संबंध सर्वस्वी तोडावा असाच सल्ला आम्ही अस्पृश्य वर्गाला दिलेला आहे. हिंदू लोकांचे व त्याचप्रमाणे त्यांच्याबरोबर ज्या जातींचे राजकीय भवितव्य निगडित झाले आहे, त्यांचे कल्याण व्हावे म्हणून त्यांनी कोणते धोरण ठेवणे इष्ट होईल हे सांगण्याची जबाबदारी आमच्यावर येऊ शकत नाही. परंतु या बाबतीत हिंदू लोकांच्या हातून इतकी अक्षम्य चूक घडत आहे की, त्यांनी आपले मार्ग बदलले नाहीत तर त्यांच्या सर्वस्वाचा नाश झाल्याशिवाय रहाणार नाही, अशी आम्हाला भीती वाटते. केवळ या भावनेमुळेच आम्हांला हिंदुलोकांना दोन उपदेशाचे शब्द सांगावेसे वाटतात आणि ते त्याचा शांत चित्ताने व निर्विकल्प मनाने विचार कर–

तील अशी आम्ही आशा बाळगतो. सामाजिक जीवन अविरोध आणि सुरक्षितपणे चालण्यासाठी एक मूलभूत तत्त्व सर्वमान्य झाले पाहिजे. ते तत्त्व हे की, ज्यांच्या– जवळ माया आहे त्यांनी ती ज्यांच्याजवळ नाही त्यांच्याबरोबर राहून खाण्यास शिकले पाहिजे. पुरातन काळापासून जगाच्या इतिहासात ज्या अनेक बंडाळ्या घडून आल्या त्यांचा विचार केल्यास असे आढळून येईल की, जेव्हा जेव्हा समाजातील सत्ताधारी लोकांनी आपल्या हाती असलेली सत्ता आणि अधिकार यांची सत्ताहीनांबरोबर वाटणी करण्याचे नाकारले, त्या त्या वेळी क्रांती घडून आली. क्रांतीचा मार्ग रोखून धरण्याचा फक्त एकच उपाय आहे आणि तो म्हणजे समाजात सत्ता आणि अधिकार यांची योग्य प्रकारे वाटणी करणे हा होय.

युरोप खंडातील कांही देशांत ज्याप्रमाणे क्रांत्या घडून आल्या त्याप्रमाणे इंग्लंड देशात क्रांती घडून आली नाही. युरोपमधील वरिष्ठ सत्ताधारी वर्ग ( ARISTOCRACY ) नाश पावला. परंतु इंग्लंडमधील वरिष्ठ सत्ताधारी वर्ग ( ARISTOCRACY ) अद्याप जिवंत आहे. याचे कारण इतकेच की, इंग्लंड-मधील वरिष्ठ सत्ताधारी वर्गाला आपल्या हाती असलेली सत्ता आणि संपत्तीची वाटणी केली पाहिजे, हे माहीत आहे आणि त्याप्रमाणे तो वर्ग ती वाटणी करीत असतो. आमच्या हिंदुमित्रांना आम्हांला एवढीच सूचना द्यावयाची आहे की, भूत-काळात सत्ताधारी वर्गांनी केवळ स्वार्थ बुद्धीला बळी पडून सत्ता आणि संपत्तीचा सारा वाटा आपल्याच पदरांत पाडून घेण्याची अभिलाषा धरली व शेवटी आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेतला. तीच गत हिंदूंची झाल्याशिवाय राहणार नाही. ( जनता जोड अंक, २५ जुलै व १ ऑगष्ट १९३६, पा. ९-१२ )

धर्मांतर केले तर अस्पृश्यांना १९३६ च्या कायद्यातील हक्क उपभोगता येतील काय, याची शहानिशा घेण्यासाठी, आरोग्य संपादन करण्यासाठी आणि ' मिलिटरी प्रॉब्लेम्स ऑफ इंडिया ' या ग्रंथाला कोणती प्रकाशन संस्था हाती घेईल यासाठी बाबासाहेब लंडनला बुधवारी ११ नोव्हेंबर १९३६ ला मध्यरात्री " लॉयड ट्रिस्टीनो बोट काँटेव्हेर्डे " हिने गेले. तेव्हा ' दी टाइम्स ऑफ इंडिया ' या दैनिकाच्या प्रतिनिधीने त्यांची मुलाखत घेतली. सदर मुलाखतीत त्यांनी आपल्या सफरीच्या हेतूबद्दल खुलासा केला नाही. मात्र त्यांना प्रकृती सुधारण्या–साठी वैद्यकीय सल्ला मिळाला होता, त्याप्रमाणे ते विलायतेस गेले. मुलाखतीत त्यानी काँग्रेस पक्षावर अशी टीका केली की, ती भांडवलवाले, जमीनदार, जुन्या–पुराण्या विचारणीचे दुढ्ढाचार्य व धर्माच्या नावावर समाजाच्या अज्ञानावर

चरणारे भोंदू व रक्तपिपासू हिंदू यांच्या हाती असल्यामुळे तिच्या हातून जनतेचे हित साधणार नाही, तर जनहिताच्या मृगजळाचा देखावा उभा करून काँग्रेसचे लोक जनतेची पिळवणूक करतील व स्वतःचे उखळ पांढरे करून घेतील. याला पायबंद घालण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष राजकीय क्षेत्रात शिरून काँग्रेसचे ढोंगधत्तुरे जनतेसमोर मांडील व जनतेच्या पिळवणुकीला पायबंद घालणारे कायदे कायदेमंडळात मंजूर करून घेईल. जे लोक या उदात्त ध्येयाला मानणारे आहेत ते या मजूर पक्षात येतील व भरीव कार्य करतील. या पक्षात सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांना प्रवेश मिळेल. या पक्षातर्फे सर्वश्री ए. व्ही. चित्रे, एस. व्ही. परुळेकर, एस. जी. टिपणीस, ए. व्ही. गडकरी, सी. टी. रणदिवे आणि बी. व्ही. प्रधान असे सवर्ण जातीचे सहा उमेदवार उभे करण्यात येतील असा बाबासाहेबांनी सदर मुलाखतीत खुलासा केला. मुलाखतीचा मजकूर मी येथे उद्धृत करीत आहे.

## Independent Labour Party
## Wide Support
### Dr. Ambedkar on aim of Organisation

The Independent Labour Party which was recently formed in Bombay has bright chances of success in the forthcoming elections to the new Provincial Legislature according to Dr. B. R. Ambedkar, Leader of Depressed Classes, who formed the party.

The growing influence of the party and the widespread support it was receiving from the progressive elements in the Bombay Presidency and outside were emphasised by Dr. Ambedkar to a representative of 'The Times of India' prior to his departure for Geneva by the 'Lloyd Triestino Steamer Conte Verde' on wednesday night.

Dr. Ambedkar pooh-poohed the claim of the Congress that it would safeguard the interests of the masses and was emphatic that the "exploiters in the Congress will not allow it to work for the masses."

"I have been agreeably surprised to find that the publica-

tion of the aims and objects of the Independent Labour Party has aroused considerable interest among the General Public, " said Dr. Ambedkar, referring to the numerous inquiries that were being made regarding the future programme of the Party.

## Branch in C. P.

" A Branch of the Party has already been formed in the Central Provinces, " he added. " In the Bombay Presidency, a large number of persons of different classes and communities have generously responded by joining the Party.

" The economic programme of the Party, as also its social and educational programme, and the fact that the Party has not been organised on communal lines have met with wide acceptance. Although the Party is in its infancy, it is gaining wide-spread support from various progressive elements all over the Presidency. "

## Fundamental Differences

There were two fundamental differences between the programme and the policy of the Congress and that of the Independent Labour Party. The Congress wanted to capture the legislatures with a view to destroying the new eonstitutuion. The Independent Labour Party, on the other hand, wished to enter the legislatures in order to work that constitution for what it was worth.

The Congress claimed to safeguard the interests of the masses. So did the Independent Labour Party. But, added Dr. Ambedkar, the Independent Labour Party feels that by its very composition the Congress is not free to serve the masses. The Congress is a heterogenous body composed of the exploiters as well as exploited, and it is quite certain that the exploiters in the Congress will not allow the organisation to work for the masses.

A combination of the exploiters and exploited might be

necessary for the purposes of achieving political freedom, but to seek to form a common party consisting of exploited and exploiters for purposes of social reconstruction was to deceive the masses, continued the leader of the Depressed Classes.

## Membership of Party

The Independent Labour Party, in Dr. Ambedkar's opinion, did not want to increase its strength in the legislature byad mitting anybody and everybody in its fold. The Party wanted to avoid being a collection of heterogeneons elements.

" Confining its membership to persons who accept its programme without reservation and who have on other affiliations, " said Dr. Ambedkar, " the Party has decided to put up fewer candidates for the ensuring elections than it was possible for the party to do. "

Although there was work to be done in the legislatures, in the view of his party there was much more importanant work to be done outside the legislatures in educating the masses, placing efore them the correct ideology and organising them for political action through the legislatures.

## Appeal to Public

Dr. Ambedkar thought that a party like the Independent Labour party was necesary and appealed to all workers, peasants and the lower middle classes to join it in large nnmbers and thus make it a mass organisation He also stated that for the purpose of educating the masses and carrying on propaganda a committee consisting of eight persons had been appointed.

In addition to the candidates nominated to seats reserved for the Scheduled Castes, the Independent Labour Party has decided to put up for the present the following candidates for election to the Bombay legislature :— Mr. A. V. Chitre ( Ratnagiri North)

Mr. S. V. Parulekar (Ratnagiri South) Mr. S. G. Tipnis (Kolaba), Mr. V. A. Gadkari ( Poona East ), Mr. C. T. Ranadive ( Thana South ) and Mr. B. V. Pradhan ( Khandesh East )''

( The Times of India, Thursday, 12-11-1936, p. 5 ).

श्री. सीताराम नामदेव शिवतरकर हे बाबासाहेबांचे चांभार ( रोहिदास ) समाजातील उपद्व्यापी सहकारी गृहस्थ यांना बाबासाहेबांनी १९३४ मध्ये दूर केले. त्यांना श्री बाळकृष्ण जानूजी देवरूखकर यांच्या खटपटीमुळे ( ते महारांबरोबर जेवले म्हणून ) जातीने बहिष्कृत केले व बाबासाहेब राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या कार्यात लंडनमध्ये व्यग्र असताना शिवतकरांनी जातीला जेवण व दारू देऊन जातिबहिष्कार काढून घेतला. त्यामुळे बाबासाहेबांची मर्जी खप्पा झाली. ते स्वतःला निवडणुकीत उभे करण्यासाठी बाबासाहेबांना विनवू लागले. तेव्हा बाबासाहेब त्यांना संतापाने म्हणाले की, मी तुम्हांला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले व महार समाजातील तरुणांना दूर करून मी तुमचा चळवळीत उदोउदो केला, आणि तुम्ही समता समाजाच्या तत्त्वाला व माझ्या तोंडाला काळे फासले आणि तुम्ही आता निवडणुकीसाठी तिकीट मागता? तुम्ही माझ्या चळवळीत १५ वर्षे राहिला. या काळात तुम्ही किती चांभार लोक चळवळीत आणले? तुम्ही महारांचा तर द्वेष करीत होताच, पण चांभार समाजातील समाजसेवकांचाहि द्वेष करीत होता !! तुम्ही यापुढे माझ्याकडे येऊ नये, हेच बरे !!!

श्री. शिवतरकर नंतर आंबेडकरांना विरोध करणाऱ्या चांभार समाजसेवकांच्या कळपात गेले. हा कळप १९४६ मध्ये कॉंग्रेसला मिळाला आणि श्री. शिवतरकर व बरेच चांभार समाजसेवक कॉंग्रेसतर्फे आमदार झाले ! ज्यांच्यामुळे बाबासाहेबांनी श्री. घोलप वगैरे महार तरुणांना जीवनातून उठविले त्या श्री. शिवतरकरांचा शेवट असा झाला ! हा शेवट पाहून श्री. देवरुखकर यांनी बाबासाहेबांचे नेतृत्व स्वीकारण्याचे ठरविले. बाबासाहेबांचे त्यावेळचे जिवलग मित्र, 'विविधवृत्त' पत्राचे संपादक श्री. रामचंद्र काशिनाथ तटणीस यांच्याकडे सूत्र लावून देवरुखकरांनी त्यांना गळ घातली की, मी कॉंग्रेस सोडतो, मला आंबेडकरांच्याकडे घेऊन चला व त्यांच्या पक्षात मला स्थान मिळवून द्या. तटणिसांनी बाबासाहेबांच्या खूप वेळा विनवण्या केल्या. पण ते तटणिसांच्या विनवणीस मान्यता देईनात. तटणिसांनी या बाबतीत पुन्हा पुन्हा खटपट केली, आणि बाबासाहेबांनी देवरुखकरांना आपल्या पंखांखाली घेतले. थोड्याच काळात ते शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन'तर्फे मुंबई नगरपालिकेत निवडून आले.

बाबासाहेबांचे विलायतेस जाण्याचे जे हेतू लोकांच्या चर्चेतून त्यावेळी मला समजले होते, त्यांपैकी आणखी एक हेतू असा होता की रोममधील भव्य इमारतींची स्थापत्यशास्त्रीय दृष्टीने पाहाणी करणे व त्यांतील सर्वोत्कृष्ट कला एकत्र करून त्यांची एक – दोन हस्तलिखित चित्रे रोममधील स्थापत्य शास्त्रज्ञांकडून तयार करून घेणे. या चित्रांप्रमाणे त्यांना माटुंगा येथे खालसा कॉलेजची भव्य वास्तू तयार करावयाची होती. त्याप्रमाणे सध्याची वास्तू अर्धवट तयार होत असतानाच बाबासाहेबांचे व गुरुद्वार प्रबंधक कमिटीची धर्मांतर – सबकमिटी यांचे संबंध तुटत तुटत संपुष्टात ( १९४०–४१ ) आले. मात्र खालसा कॉलेजची इमारत ही रोमन स्थापत्य शास्त्रावर उभारली ती बाबासाहेबांनीच. तीत शीख लोकांचा फारसा वाटा नव्हता.

सफरीला जाण्याचा प्रमुख हेतू जो होता त्याची वाच्यता बाबासाहेबांनी केली नव्हती. निदान मुलाखतीत तरी त्यांनी तो हेतू स्पष्ट केला नव्हता. तो हेतू हा की, पुणे–करारामुळे ज्या राखीव जागा अस्पृश्यांना मिळाल्या होत्या, त्या अस्पृश्यांनी धर्मांतर केले तरी त्यांना उपभोगण्यास संसदीय अडथळे येतील काय आणि आले तर ते कसे दूर करता येतील याबद्दलची चर्चा लंडनमधील संसदीय पंडित आणि मंत्रिमंडळांतील प्रमुख लोक यांच्याशी करून काय ते निष्कर्ष घेऊन लंडनहून परत मुंबईस येणे. या सफरीबद्दल सात हजार रूपयांचा खर्च शीख मिशनने दिला होता. याबद्दलचा खुलासा शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक कमिटी, अमृतसर या संस्थेतर्फे प्रसिद्ध होत असलेल्या " गुरुद्वार गॅझेट " या मासिकाच्या ऑगस्ट १९३९ च्या अंकात ( पान ३६ ) केलेला आहे. तो असा –

" सकीम दी मद एट खरचवीन् ७००० वी शॉमल है, जो डॉक्टर आंबेडकर बम्बैईनु अच्छतॉं दे शिख सज्जन् नाल उना ते पुना पॅक्ट दी बर्तोंसबंदी कानुनी रॉए लॅंड लई इंग्लंड जॉण दे खरचास बंदी बिल मुकता देते गये सन् " ( अस्पृश्यांनी धर्मांतर केले तरी त्यांना पुणे–करारान्वये जे राजकीय हक्क मिळालेले आहेत ते उपभोगता येतील की नाही, याबद्दल संबंधित लोकांशी इग्लंडमध्ये चर्चा करण्यासाठी डॉ. आंबेडकर लंडनला गेले होते, त्यांच्या खर्चासाठी ७००० रु. दिल्याबद्दलची नोंद वरील स्तंभात केलेली आहे.

(Gurudwar Gazet Amritasar
Page 36 Augst 1939:
Published under the authority
of the Shiromani Gurudwar
Prabandhak Committee)

बाबासाहेब जिनेव्हा येथे काही दिवस राहिले, काही दिवस रोममध्ये राहिले व काही दिवस लंडन मध्ये राहिले. ते लंडनहून मुंबईस परत आले ( १४–१–३७ ) तेव्हा त्याच्या अगोदर अशी बातमी प्रसिद्ध झाली की, त्यांनी एका आंग्ल स्त्री-बरोबर विवाह केला व ते परत तिच्यासह येत आहेत. या बातमीने सर्वत्र खळबळ माजून राहिली आणि निरनिराळ्या लोकांनी तर्कुतर्क या बाबतीसंबंधी केले. या संबंधीची जास्त माहिती मी येथे देत आहे.

" डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे गुरुवार ता. १४–१–३७ रोजी सकाळी १० वाजता व्हिक्टोरिया बोटीने मुंबईस येणार आहेत. " अशी बातमी 'जनते' च्या ९–१–३७ च्या अंकात ( पा. ५ ) प्रसिद्ध झाली होती. बाबासाहेबांची बोट २-३० वाजता आली. त्यांच्या स्वागताचा मनोरंजक वृत्तांत 'जनते' च्या १६–१–३७ च्या अंकात ( पा. १–२ ) दिलेला होता. स्वागतासाठी सुमारे ५० हजार लोक आणि समता सैनिक दल ( जी. ओ. सी. अर्जुनराव साळवे ) उपस्थित होते. 'जनते' च्या वृत्तांताचा पहिला भाग पुढीलप्रमाणे होता :–

" बाबासाहेब आंबेडकर गुरुवार ता. १४ रोजी विलायतेतून मुंबईस येत आहेत, असे पत्र येताच आम्ही 'जनता' पत्राच्या गेल्या अंकी त्यांच्या आगमनाची बातमी प्रसिद्ध केली. परंतु दुसरे दिवशी रविवार ता. १०–१–३७ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या 'विविधवृत्त' पत्रामध्ये 'डॉ. आंबेडकर ता. १४ रोजी एका इंग्रज बाईशी विवाहाने बद्ध होऊन सपत्नीक येत आहेत' अशी दुसरी बातमी प्रसिद्ध केली. त्यामुळे जिकडे तिकडे खळबळ उडून लोक आश्चर्यातिरेकाने स्तब्ध झाले. या विवा-हासंबंधी नानाप्रकारचे तर्कवितर्क सुरू होऊन लोकांची मने अस्थिर बनली. आमच्या ऑफिसात या बातमीच्या खरेखोटेपणाविषयी चौकशी करण्याकरिता लोकांची गर्दी होऊ लागली व बाहेरगावाहून अनेक पत्रे येऊ लागली. 'विविधवृत्ताने' प्रसिद्ध केलेल्या बातमीचा असा परिणाम झाल्यावर लोकांना काय उत्तरे द्यावी याची आम्हांला मोठी काळजी वाटू लागली. शेवटी येत्या गुरुवारी प्रत्यक्ष बाबासा-हेब येत आहेतच. त्याचवेळी खरे खोटे कळेल 'असे आश्वासन' लोकांना देऊन वेळ मारून घ्यावी लागली. शेवटी ज्या बातमीने अस्पृश्य समाजात नव्हे तर इतर लोका-मध्ये आणि निरनिराळ्या वर्तमानपत्रांमध्ये खळबळ उडून गेली होती त्याचा खरा निर्णय देणारा दिवस येऊन ठेपला.

गुरुवारी 'व्हिक्टोरिया' बोट सकाळी १० वाजता येणार म्हणून पूर्वी जाहीर

झाले होते. परंतु ही बोट दुपारी १-३० वाजता येणार असे अचानक ठरल्यामुळे पुन्हा गोंधळ झाला. बुधवारी सारी रात्र जागून मे. सुभेदार सवादकर, कमलाकांत चित्रे, सुरेंद्रनाथ टिपणीस, डॉ. साहेबांचे चिरंजीव यशवंत आंबेडकर व पुतणे चि. मुकुंद आंबेडकर यांनी स्पेशल मोटारीने मुंबई शहर व उपनगर विभागातील अस्पृश्य वस्तीत फिरून बोट आलेक्झांड्रा डॉकमध्ये येण्याची वेळ बदलल्याचे कळविले. एका रात्रीत सर्व ठिकाणी प्रत्यक्ष फिरूनही कित्येक लोक सकाळपासूनच आलेक्झांड्रा डॉकच्या मार्गाला लागले. इतकी दांडगी उत्सुकता लोकांना डॉ. बाबासाहेबांच्या स्वागताविषयी लागली होती.

बाबासाहेबांच्या स्वागतासाठी सुमारे पन्नास हजार स्त्रीपुरुष बॅलर्ड पिअरवर पहाटेपासून येऊन बसले होते. स्त्रियांनी आरत्या आणल्या होत्या. बाबासाहेबांच्या नूतन पत्नीची ओटी भरण्याची तयारी काही स्त्रियांनी केलेली होती. पण बाबा-साहेब एकटेच बोटीतून उतरले. लोकांनी त्यांचे स्वागत उत्साहाने केले, पण स्त्रियांचा हिरमोड झाला.

मुंबईतील ' विविधवृत्त ' या पत्राने १० जानेवारी १९३७ च्या अंकात (पा.७) बाबासाहेबांचा फोटो देऊन ठळक अक्षरात त्यांच्या लग्नाची बातमी प्रसिद्ध केली होती, ती अशी :–

## डॉ. आंबेडकर यांचा विवाह

( आमच्या बातमीदाराकडून )
लंडन, ता. ८ जानेवारी १९३७

विविधवृत्ता'च्या लंडन येथील बातमीदाराकडून शुक्रवारी पुढील खास तार आली आहे.

अस्पृश्य समाजाचे एकमेव पुढारी डॉ. भीमराव आंबेडकर यांनी एका इंग्रज बाईशी आपला विवाह उरकून घेतला. आपल्या नवपरिणीत वधूसह डॉ. साहेबांनी हिंदुस्थानात जाण्यासाठी प्रयाण केले. ता. ३ रोजी व्हेनीस येथे एस. एस. व्हिक्टो-रिया बोट गाठून ता. १४ जानेवारीच्या सुमारास ते मुंबईस पोचतील असा अंदाज आहे. ( खास तार )

विविधवृत्ताला लंडनहून जी तार आली ती मला त्या पत्राच्या कचेरीतून श्री. र. अ. उर्फ मामा मोरतकर यांनी १९५७ सालच्या नोव्हेंबर महिन्यात दिली. ती अशी :–

**" The Indian Radio and Cable Communications Co. Ltd. "**

1372

Recd. at Bombay at :- **1937** January 7

P. M. 11-19

1356

2533 London 11-19

7' 1658

Press — Vividhavritta 364

Thakurdwar Bombay

Dr Ambedkar secretly married English widow. Left Venice Victoria with wife. Jaurary 3. Correspondent

ही तार श्री. द. वि. ताम्हणकर यांनी लंडनहून पाठविली होती. त्यांची मुलाखत मी मे १९५८ मध्ये पुण्यात घेऊन या विवाहाची हकिकत त्यांना विचारली. ह्याबद्दलची माहिती पुढे येईल.

या बातमीसंबंधी टाइम्सच्या प्रतिनिधीने बाबासाहेब बोटीतून उतरल्यानंतर त्यांची मुलाखत घेतली. तेव्हा ते म्हणाले की,ही बातमी सपशेल खोटी आहे. माझ्या प्रकृतीसंबंधी बरेच लोक असल्या विचित्र बातम्या पसरवितात. मी प्रकृती स्वास्थ्यासाठी गेलो होतो, आणि बहुतेक सारा वेळ मी व्हिएन्ना आणि बर्लिन येथे घालविला. मला चोरून लग्न करण्याची काय जरूर आहे ? आपण स्वतंत्र मजूर पक्ष निवडणुका वगैरे बाबतीत कार्य करणार आहो असे त्यांनी प्रतिनिधीला सांगितले. ती मुलाखत बाबासाहेबांचा फोटो देऊन प्रसिद्ध झाली होती, ती अशी :–

## " Dr. Ambedkar Not To Marry European "
## Denial of Rumour

A rumour regarding his marriage to a European woman published by a vernacular paper in Bombay was flatly denied by Dr. B. R. Ambedkar, leader of the Depressed classes, who

returned to India from a short visit to Europe, by the M. V. Victoria on Thursday.

Describing the rumour as entirely baseless, Dr. Ambedkar said : " Somebody seems to start some rumour or the other about me always; and the lastest about my alleged marriage to a European woman is one of them. I have no knowledge of it. Why should I marry stealthily ? "

Dr. Ambedkar said that he visited Eurppe purely for reasons of health and he stayed most of the time in Vienna and Berlin. He was in London only for a week. He had no conversation of a political nature with any one in London.

Asked if he had come to any decision regarding his intention to leave the Hindu fold, he said that the decision still remained, although he had not finally made up his mind which new faith he should embrace.

Dr. Ambedkar said that his immediate concern was the ensuing elections to the Bombay Legislative Assembly and he would devote himself to the election campaign. The Independent Labour Party, which he had started, would work for the betterment of the political and social condition of the Depressed Classes in the Legislature, and he was sanguine that all the candidates put up on behalf of his Party would come out successful in the elections.

Dr. Ambedkar was given a rousing reception on arrival. More than a thousand Khaki-clad volunteers belonging to the Social Equity League lined up the entire route from Ballard Pier Station to Alexandra Dock No. 18, cheered him as he passed.

Most of the candidates put up by the Independent Labour Party of which Dr. Ambedkar is the founder, for the ensuing elections to the Bombay Legislative Assembly were present on the wharf to meet him. Among them were Dr. (?) B. K.

Gaikwad ( Nasik District ), Mr. Prabhakar Roham ( Ahmednagar ), Mr. B H. Varale ( Belgaum ), Mr. R. R. Bhole (Poona), Mr. B J. Sawadkar, Mr. S. G. Titnis ( Tipnis ) ( Kolaba ), Mr. G. R. Ghatge ( Ratnagiri ), Mr. R. E. Bhatankar ( Thana ) and Mr. V. A. Gadkari. " ( The Times of India, Friday, 15-1-37 ( Page 5 )

ही मुलाखत प्रसिद्ध झाल्यानंतर विविधवृत्त आणि जनता या पत्रांनी बाबासाहेबांचा विवाह लंडनमधील इंग्रज विधवेशी झाला किंवा नाही, या मुद्या-बाबत खुलासा प्रसिद्ध केला नव्हता. त्यामुळे या विवाह प्रकरणाला बराच गुप्तपणाचा मुलामा लागला. यासंबंधी बाबासाहेबांच्या तरुण अनुयायांमध्ये काही दिवस वितंडवाद चालू होता.

टाइम्सने बाबासाहेबांची मुलाखत ज्या दिवशी (१५-१-३७) प्रसिद्ध केली त्याच दिवशी त्यांचो मैत्रीण ' एफ ' ( मिसेस फ्रॉन्सिस्त्रा फिझिराल्ड ) हिने लंडनहून त्यांना पत्र पाठविले ते राजगृहाच्या पत्त्यावर. ते पत्र मी येथे देत आहे. :-

I· Primrose 5997. 10, King Henry's Road

Primrose Hi-

N. W. 3

15-1-37

I noticed in the Telegraph this morning that your boat had reached Bombay. I do hope, dear, that the journey was pleasant and that you feel better for the change. Now you have to start work, don't over do it, keep well until I come. I am markting off each day.

I am glad to say that all enquiries concerning you seem to have faded away. I have heard nothing more since I wrote you. Thank you for your letter posted at Port Said. It reached me on Wednesday evening, so I went off on Thursday morning to see about the books. They will be out by the next mail.

I fnd the work at the India office very interesting and it gives me so much pleasure to do it for you.

I have been at the market to-day and I have bought a beautiful pair of silver canddlebras. You will like them. I can picture them on our table.

I am ever so sorry you did not get my card at X'mas and my farewell letter. You won't get it now. It must have gone astray in the rush although I well - packed it and wrote X'mas Card on the outside.

I am thinking of you all the day and longing to be with you.

God bless you, my darling.
With fondest love.

Ever yours
F X. "

या पत्रावरून हे दिसून येते की बाबासाहेबांनी एफ्ला पोर्ट सय्यदहून पत्र पाठविले होते. त्यांची बोट मुंबईला सुखरूप पोहोचली. ही बातमी तिने 'टेलिग्राफ' ( लंडन ) या दैनिकात वाचली, तेव्हा त्यांच्याबद्दलची तिची काळजी बरीच कमी झाली. त्यांची प्रकृती सुधारली असेल याबद्दल तिने आशा व्यक्त केली. बाबासाहेबांना हवी असलेली पुस्तके विक्रीस लौकरच तयार होतील, त्यांनी इंडिया ऑफिसमधील लायब्ररीतील काही संदर्भ लिहून काढावयास तिला लावले होते. ते काम ती अत्यंत आनंदाने व उत्साहाने करीत होती. मेणबत्ती ठेवण्याचे स्टँड्स तिने बाजारातून विकत आणलेले होते व ते टेबलावर ठेवलेले आहेत आणि आपण दोघेजण त्या टेबलावर जेवण घेत आहोत अशी दिवास्वप्ने तिला दररोज पडत आहेत. मी मुंबईला येईपर्यंत तुम्ही फार काम करून स्वतःची प्रकृती बिघडवून घेऊ नका, असे ती पत्रात बाबासाहेबांना विनवीत आहे. मुंबईला येण्यासाठी मी एक एक दिवस मोजत आहे व ठरलेला दिवस कधी उगवतो याची मी लंडनमध्ये चातकाप्रमाणे वाट पाहात आहे, असेही सदर पत्रात तिने लिहिलेले होते. पण ती प्रेमविव्हल फॅनी मुंबईस कधीच आली नाही व तिचा बाबासाहेबांशी विवाहही कधीही झाला नाही.

१९२० जुलै ते १९२३ मार्चपर्यंत बाबासाहेब लंडनमध्ये डी. एससी. चा निबंध तयार करीत असता व बार – अॅट – लॉचा अभ्यास करीत असता प्रथम

एका कजाग व दरिद्री स्वभावाच्या लँडलेडीकडे विद्यार्थी म्हणून रहात होते. ती त्यांना कशी छळत होती व बाबासाहेब या छळांना तोड देऊन कसा अभ्यास करीत होते, याबद्दलची माहिती श्री. प्रभाकर पाध्ये यांनी दिलेली आहे. श्री. पाध्ये यांनी जानेवारी १९३९ मध्ये बाबासाहेबांची राजगृहात मुलाखत घेतली. ती मुलाखत त्यांनी एप्रील १९४१ मधील प्रसिद्ध झालेल्या आपल्या " प्रकाशांतील व्यक्ति " या पुस्तकात ग्रथित केलेली आहे. त्या मुलाखतीतील एक भाग मी येथे उद्धृत करीत आहे. " लंडन येथील त्यांच्या आयुष्यक्रमाचे वर्णन मी त्यांच्याच तोंडून ऐकले तेव्हा माझ्या अंगावर शहारे आले. ते ज्या बाईकडे राहत होते ती अगदी नतद्रष्ट बाई होती. ( That Landlady was a horrlble woman. I am always praying for her soul; but I am sure she will go to perdition ' ! )

सकाळी ती न्याहरीला मला काय देत असेल असे वाटते तुम्हांला ? एक माशाचा तुकडा, एक कप चहा, एक पावाची स्लाइस आणि गणपतीच्या कपाळाला गंध टेकतात त्याप्रमाणे त्या तुकड्याच्या टोकाला लावलेला जॅम ! ते कदान्न खाऊन मी म्युझिअममध्ये वाचायला जाई. दुपारचे जेवण घ्यावयास मजपाशी पैसेच नव्हते. तसाच मी अर्धपोटी पाच वाजेपर्यंत वाचीत असे. घरी आल्यावर संध्याकाळचे जेवण ते जेवण. म्हणजे एक कप बॉव्हरीन आणि बटर बिस्किट्स ! नंतर पुन्हा वाचन ! रात्री १० ला कडकडून भूक लागे. मी काय खात असे माहीत आहे. ? माझ्या एका गुजराती मित्राने मला पापडांची करंडी दिली होती ते भाजण्याकरिता एक पत्र्याचातुकडा कोठून तरी मी पैदा केला होता. तो माझा तवा ! त्यावर भाजलेले चार पापड आणि कपभर दूध हे माझे अन्न ! असा रहात असे मी ! महिना ८–८॥ पौण्डात गुजराण करीत होतो मी ! ( पा. ३० )

या नतद्रष्ट लँडलेडीच्या कद्रूपणाला कंटाळून बाबासाहेब दुसऱ्या लँड-लेडी-कडे रहावयास गेले. त्या लँडलेडीची मुलगी मिसेस फ्रॅन्सिस्का फिट्झिराल्ड हिची व बाबासाहेबांची मैत्री झाली. त्यांच्या मैत्रीची व रुसव्या फुगव्याची अल्प माहिती बाबासाहेबांनी मला जी सांगितली ( १९२४ ते १९२६ च्या दरम्यान ) ती मी चरित्र खंड दोन यात दिलेली आहे. ती माहिती बनावट आहे आसा प्रचार बाबासाहे-बांच्या नावावर जगणाऱ्या कांही हीन संस्कृतीच्या पदवीधरांनी व त्यांच्या हस्तकांनी केला होता. बाबासाहेबांना वेळोवेळी पैशाची मदत करणे, त्यांनी सांगितलेला मजकूर लिहून काढणे, ग्रंथांतील उतारे लिहिणे ( याचे पुरावे मजजवळ आहेत ) असली कामे ती त्यावेळी ( १९२०–१९२३ ) करीत असे. बाबासाहेबांचा ५००

पुस्तकांचा संग्रह त्यांना लंडनहून आणता आला नाही. कारण त्यांच्याजवळ पैसे नव्हते. तो ग्रंथ संग्रह फॅनीने स्वतःच्या खर्चाने जुलै १९२३ ला पाठविला होता. तो मला बाबासाहेबांनी दाखविला होता. तिचे पत्रही त्यांनी मला दाखविले होते. ते मधून मधून मला तिच्या प्रेमळपणाच्या गोष्टी सांगत व म्हणत की, " She was mothering me too much. " मात्र माझ्या आयुष्यात जी काही कार्ये करावयाची आहेत, त्यासाठी मी विद्याभ्यास दररोज २०-२० तास अमेरिकेत व लंडनमध्ये केला. याचे कारण मी बौद्धिक व मानसिक दृष्टीने सर्वांपेक्षा श्रेष्ठ व्हावे म्हणून. पुढील काळात मला अनेक थोर, मोठ्या नेत्यांना तोंड द्यावे लागणार आहे, त्याचे बौद्धिक व मानसिक सामर्थ्य मला माझ्यात उत्पन्न करावयाचे होते. म्हणून मी कोणत्याही स्त्रीच्या मोहात पडलो नाही. याच भावनेने मी एफ्लाही माझ्या आयुष्यात शिरकाव करून देणार नाही. स्त्रिया या पुरुषांच्या जीवनात फार अडथळे निर्माण करतात. मला हे लोढणे नको आहे. असे बाबासाहेबांचे विचार होते. ते त्यांनी १९३५ ते १९४८ पर्यंत पाळले. त्यांनी तिला एक ग्रंथ १९४५ मध्ये अर्पण केला.

मुंबईहून जिनिव्हा-लंडन व लंडन ते मुंबई २॥ सफरीची तयारी करणे, इलेक्शनच्या भानगडीकडे लक्ष देऊन आपला नवा पक्ष यशस्वी करणे, वगैरे गोष्टींकडे बाबासाहेबांचे मन व्यग्र झालेले असताच त्यांच्यावर एका खटल्याची छाया पडू लागली. बाबासाहेबांनी २५००० रु. किंमतीचे डिबेंचर्स विकत घेण्यासाठी १९२८-२९ मध्ये आपल्या मित्र मंडळीत विकले होते. श्री. शंकरराव सायण्णा परशा यांनी पाचशे रुपयांचे व श्री. लक्ष्मण कराडी जया यांनी पांचशे रुपयांचे (नंबर ९ दिनांक १४ डिसेंबर १९२९) विकत घेतले होते. बाबासाहेबांनी डिबेंचर्स विकून हाती आलेल्या पैशातून प्रेस विकत घेतला व त्याला " भारतभूषण प्रिंटिंग प्रेस " हे नाव दिले. डिबेंचर्सच्या अटींप्रमाणे बाबासाहेबांकडून डिबेंचर्स विकत घेतलेल्या मित्रांना जो हिशोब, व्याज, वगैरेबद्दल अहवाल मिळावयाला पाहिजे होता तो मिळाला नाही. म्हणून (१) रावबहादूर आर. एस. आसवले, जे. पी. (२) नागनाथ सयाजी नागूजी (३) लक्ष्मणराव कराडी जया, (४) एस. एस. परशा (५) रामकृष्ण एम. साळवी, जे. पी. (६) गुणाजीराव डी. घुले, जे. पी व (७) व्ही. एस. आलकोंडा, या डिबेंचर्स होल्डर्सनी बाबासाहेबांच्यावर स्मॉल कॉजेस कोर्ट, मुंबई १ येथे १९३७ मध्ये फिर्याद केली. फिर्याद सॉलोमन अॅन्ड कंपनी, सॉलिसिटर्स, स्पिनर बिल्डिंग, टॅमरिंड लेन, फोर्ट मुंबई - १ यांनी कोर्टात करण्याचे ठरले होते. याबद्दलचे सदर सॉलिसिटर्सचे १९ मार्च १९३७ चे पत्र मी येथे देत आहे.

Solomon & Co
Solicitors
Solomon Moses
Phone : 21210
No. 277/37.

Spinner Buildins
Tamarind Lana
Fort, Bombay.
19 th March 1937

Rao Bahadur R. S. Asawale, J. P.
Nagnath Sayaji Nagoji, Esqr
Laxmanrao Karadi Jaya, Esqr.
S. S. Parsha, Esqr.
Ramkrishna M. Salvi, Esqr. J. P.
Goonajirao D. Ghule, Esqr., J. P.
V. S. Alkonda, Esqr.

Dear Sirs,

**Ref. : Debentures of the Bharat Bhushan Printing Press.**

We have taken the necessry papers in hand to file the suit as our letter to Dr. Ambedker has met with no purpose.

Will you please therefore put us in necessary facts for the purpose of the suit by contributing Rs. 50 /- each?

Yours truly,

Solomon & Co.

या प्रकरणाचा खटला १९३८-३९ मध्ये स्मॉल कॉजेस कोर्टमध्ये बोर्डावर जाहीर झाला होता, अशी माहिती पुण्याचे एक गृहस्थ व एस. एस. परशा यांचे नातलग श्री. एल. एम. सत्तूर ( ९९ मेन स्ट्रीट, कॅम्प पुणे ) यांनी मला सांगितली होती. वरील पत्र त्यांनीच मला दिले होते. त्याबरोबर त्यांचे स्वतःचेही पत्र मला त्यांनी पाठविले होते.

## डिबेंचर्स खटल्याच्या शेवट काय झाला

श्री. सत्तूर हे शंकरराव परशा यांचे मेहुणे. ( पत्नीचे भाऊ. बाबासाहेबांना परशा यांनी सॉलिसिटर्स फर्ममधून केसेस मिळवून देण्यासाठी १९२५-२६ मध्ये खूप प्रयत्न केले. बाबासाहेब त्यांना फार मान देत असत. ) यांनी मला सांगितले

नाही. या निकालाची माहिती काढण्याचे मी अनेक वेळा प्रयत्न केले. पण ती मला मिळाली नाही. डिबेचर्स व खटला याबद्दलची माहिती जी मला अनेक लोकांनी तोंडी सांगितली होती ती पडताळून पहाणे मला शक्य झाले नाही. म्हणून या प्रकरणाची साधार व सत्य बाजू वाचकांच्या पुढे ठेवणे मला जमले नाही.

"एफ" (फ्रॅन्सिस्का फिल्झिराल्ड तथा फॅनी) या आयरिश विधवेशी बाबासाहेबांचा विवाह झाला किंवा नाही, याबद्दलची माहिती मी यापूर्वी दिलेली आहे. ती बाबासाहेबांना पत्रे पाठवीत असे आणि सदर पत्रात ती आपल्या प्रेमाची आणि बाबासाहेबांच्या सान्निध्यात रहाण्याची मनीषा प्रदर्शित करीत असे. तिने १३-५-१९३७ ला लंडनहून जे पत्र बाबासाहेबांना पाठविले त्यात तिच्या इच्छेचे प्रतिबिंब पहावयास मिळते. ते पत्र मला श्री. नानकचंद रत्तु (दिल्ली) यांच्याकडून मिळाले. ते मी येथे देत आहे.

" PRIMROSE 5997.

10, King Henry's Road.
Primrose Hill
N. W. 3
13-5-37

My darling Bhim,

I am sorry not to have written you last week. I remember (I) have not had the heart to do anything. I am trying to recover from the great disappointment. I am not blaming you dear, you could not have done otherwise.

I do hope you are keeping well. You must be busy watching yuro College grow. What about our Cottage, is that also in the making ? Do write and give me some idea as to when you will be ready for me.

Have you been able to fix up a holiday ? I hope so. Have you any more cases on hand ?

It is still very cold here and we have had such a lot of rain.

God bless you, my darling.
My love and prayers are with you.
Ever yours.
Sd. F. X.

वरील पत्रात माझी जी घोर निराशा झाली तीतून सावरण्याचा मी प्रयत्न करीत आहे, असे जे उद्गार " एफ " ने काढलेत ते बहुतेक तिचा बाबासाहेबांशी विवाह झाला नाही, या संदर्भात, अगर तिला लंडनहून मुंबईला येण्यास बाबासाहेबांनी परवानगी अगर संमती दिली नाही, या संदर्भात असावेत ती पुढे म्हणते की, तुम्ही माझा स्वीकार करण्यास केव्हा तयार होणार याबद्दल मला पत्र पाठवून थोडीशी कल्पना द्या. तुम्ही कामातून सुट्टी घ्या व केव्हा येणार तेही मला कळवा. तुम्ही तुमचे कॉलेज भरभराटीस कसे येईल याबद्दल विचार करीत असाल, असेही ती लिहिते. हे कॉलेज म्हणजे खालसा कॉलेज, माटुंगा. ते २०-६-१९३८ ला सुरू झाले. या कॉलेजबद्दल बाबासाहेबांनी तिला लिहून कळविले असेल. आपली झोपडी बांधून तयार झाली का ? असा प्रश्न तिने बाबासाहेबांना विचारला आहे. बाबासाहेब पन्हाळागडावर एक छोटा बंगला बांधणार होते, याबद्दल त्यांनी तिला सांगितले असावे. त्याबद्दल हा उल्लेख असावा. हा बंगला कधीच बांधला गेला नाही. पुढे १९४७-४८ सालात बाबासाहेबांनी तळेगाव ( ढमढेरे ) येथेही जमीन घेतली होती. तेथेही छोटा बंगला ते बांधणार होते. तेथे विहीर खणण्याचे काम त्यांनी सुरू केले होते. शेतीही सुरू केली होती. थोड्याच वर्षांनी या कामाकडे त्यांनी दुर्लक्ष केले औरंगाबाद येथे मोठा बंगला बांधण्याचाही त्यांचा विचार १९५२-५३ मध्ये होता. तोही त्यांनी नंतर सोडून दिला.

१९३७ च्या निवडणुकीत मुंबई प्रांतात स्वतंत्र मजूरपक्षातर्फे जे उमेदवार बाबासाहेबांनी उभे केले होते, ते असे -

| | |
|---|---|
| १) मुंबई ( इ व एफ वॉर्ड ) | श्री. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर एम. ए. पीएच्.डी. डी.,एससी. बॅरिस्टर - ॲट लॉ. |
| २) सुरत - | डॉ पी. जी सोळंखी एल. एम. ॲन्ड एस्., जे. पी. |
| ३) कुलाबा | सुभेदार विश्राम गंगाराम सवादकर |
| ४) नाशिक ( पश्चिम भाग) | श्री. भाऊराव कृष्णराव गायकवाड |
| ५) पुणे ( पश्चिम भाग ) | श्री. राजाराम आर. भोळे, बी. एस्सी. |
| ६) सातारा ( उत्तर भाग ) | श्री. खंडराव सखाराम सावंत |
| ७) बेळगाव ( उत्तर भाग ) | श्री. बळवंत हनुमंत वराळे. |

८) अहमदनगर ( दक्षिण भाग ) श्री. प्रभाकर जर्नादन रोहम
९) पूर्व खानदेश ( पूर्व भाग ) श्री. दौलतराव गुलाजी जाधव बी. ए.
१०) ठाणे ( दक्षिण भाग ) श्री. रामकृष्ण गंगाराम भातनकर
११) रत्नागिरी ( उत्तर भाग ) श्री. गंगाधर राघोराम घाटगे
१२) सोलापूर (उत्तर पूर्व) श्री. जिवाप्पा सुभान ऐदाळे
१३) मुंबई ( जी वॉर्ड आणि सबर्बन ) श्री. कृष्णाजी महादेव काळोखे
१४) रत्नागिरी (उत्तर भाग) श्री. अनंतराव व्ही. चित्रे बी. ए.
१५) पुणे ( पूर्व भाग ) श्री. विनायकराव आ. गडकरी वकील
१६) कुलाबा श्री. सुरेंद्रनाथ गोविंदराव टिपणीस
१७) रत्नागिरी ( दक्षिण भाग ) श्री. शामराव विष्णू परूळेकर एम. ए.
१८) सोलापूर ( मजूर मतदार संघ ) श्री. आर. आर. बखले

( 'जनता,' शनिवार, ३०-१-१९३७, पा. १ )

या उमेदवाराशिवाय वऱ्हाड व मध्य प्रांत यांतील सर्वसाधारण व राखीव जागेसाठी बाबासाहेबांच्या संमतीने खालील उमेदवार उभे राहिले होते –

१) शंभूजी अंसूजी खंडारे ( अकोला-बाळापूर )
२) पवार चिखलीकर ( चिखली-मेहेकर )
३) संपतराव गणपतराव नाईक ( एलिचपूर-दर्यापूर )
४) डी. के. भगत ( यवतमाळ-दारव्हा )
५) देवाजी भिवाजी खोब्रागडे ( चांदा-ब्रह्मपुरी )
६) केशव नारायण देव ( हिंगणघाट, वर्धा )
( श्री. पतितपावनदास )
७) दौलत भीमसेन बारसे ( छिंदवाडा-सौंसर )
८) राघव गंभीर घोडीचोर ( भंडार-साकोली )
९) हरदास एल. एन. ( नागपूर-शहर )
१०) रा. बा. फुले वकील ( नागपूर मजूर संघ )

११) डॉ. पंजाबराव देशमुख (अमरावती)
बॅरिस्टर

१२) विठ्ठल बंडूजी चौबळ (वऱ्हाड–पूर्व)
वकील

१३) सौ. विमलाबाई देशमुख (अकोला–अमरावती)
बी. ए.

१४) रा. सा. जयनारायणजी (रामटेक)

('जनता', शनिवार २३–१–१९३७, पान ८)

या उमेदवारांना निवडून द्या, अशी विनंतीपत्रे बाबासाहेबांनी २३ जानेवारी (पा. ८) व ३० जानेवारी (पा. १) च्या 'जनता' पत्रात प्रसिद्ध केली होती. विजयी झालेले उमेदवार (१) बाबासाहेब, (२) भोळे, (३) सावंत, (४) गडकरी, (५) भातनकर, (६) चित्रे, (७) घाटगे, (८) परुळेकर (९) रोहम, (१०) एदाळे, (११) जाधव, (१२) गायकवाड (१३) वराळे (१४) द.वा. राऊत.
(जनता, शनिवार, २७–२–३७, पा. १)

## या उमेदवारांची जातवारी अशी –

१ मातंग, १ होलार, ३ कायस्थ आणि १० महार. त्यांत तिघे पडले व १२ निवडून आले. या पक्षाचे चिटणीस व उपचिटणीस वारवार व बदलले जात असत व त्या जागा बॅ. समर्थ, द. वि. प्रधान, वगैरे कायस्थ लोक यांना बाबासाहेब देत असत. त्यामुळे सदर पक्षात श्री. मो वा दोंदे, सुरेंद्रनाथ टिपणीस, अनंतराव चित्रे, कमलाकांत चित्रे इत्यादी लोक असल्यामुळे महार समाजात सदर पक्षाबद्दल मनापासून आपुलकी वाटली नाही. चांभार, मांग, ढोर वगैरे अस्पृश्य लोक आणि सवर्ण हिंदू, ख्रिस्ती, पारशी, वगैरे लोक या पक्षात बहुसंख्येने कधीच आले नाहीत अशा स्थितीतही महार समाजाच्या पाठिंब्यावर बाबासाहेबांनी या पक्षाचा गाडा महाराष्ट्रात तरी खूप फिरविला. सदर पक्षातर्फे कायदेमंडळात जनहिताची अनेक विधेयके आम्ही आणू, बौद्धिक बळावर ती मंजूर करून घेऊ आणि काँग्रेसचा राज्यकारभार उलथून पाडू, अशा प्रकारची तिखट भाषणे करून बाबासाहेबांनी आपल्या पक्षाचा झेंडा फडकत ठेवला. याबद्दलचे काही पुरावे मी येथे देतो.

पक्षातर्फे निवडून आलेल्या उमेदवारांचे अभिनंदन करण्यासाठी डॉ. सोळंकी यांच्या अध्यक्षतेखाली कामगार मैदान, पोयबावडी येथे ३०–५–१९३७ ला संध्याकाळी सभा भरली होती. तीत भाषण करताना बाबासाहेबांनी जे उद्‌गार काढले त्यांतील एक भाग असा होता. " आज राजकारणाचा डाव बंद पडला असला तरी ज्या दिवशी हा डाव नव्याने सुरू होईल त्यावेळेस जरूर असलेली तयारी आमच्याजवळ मजबूत आहे. आम्हांला जे कायदे घडवून आणावयाचे आहेत त्यांचे बार आमच्याजवळ भरून तयार आहेत. टार्जेट लावण्याची खोटी की, आम्ही एकदम आमचे पिस्तुल झाडणार आहोत : . . . . प्रांतिक कायदे मंडळात जी माणसे तुमच्यातर्फे निवडून गेली आहेत ती तुमच्या हितासाठी सदैव जागृत राहतील, असे मी तुम्हांला आश्वासन देतो. तात्पुरत्या लाभाकरिता आम्ही कॉंग्रेसला मिळून अप्रामाणिकपणा करू शकत नाही. आम्हांला राष्ट्रकार्य करावयाचे आहे. सार्वजनिक हिताच्या प्रश्नासंबंधी एकमत होईल, त्यावेळी तात्पुरते भेदभाव विसरून आम्ही कॉंग्रेसबरोबर सहकार्य करू – – – कायदे मंडळापुढे मांडावयांच्या कायद्यांचे मसुदे आमच्या खिशांत तयार आहेत, आम्ही फक्त खेळ, सुरू होण्याचीच वाट पहात आहोत – – – ( जनता, १२–६–१९३७, पा. ४ )

१४–५–३८ रोजी कणकवली ( रत्नागिरी ) येथे पक्षातर्फे कुळांची सभा भरविण्यात आली होती. या सभेत भाषण करताना बाबासाहेबांनी खोती बिलाबद्दल माहिती सांगितली आणि हे बिल नामंजूर झाले तर आपण सत्याग्रह करून तुरुंगांत जाऊ असे उद्‌गार काढले " – – – कॉंग्रेस मंत्रिमंडळ व ॲसेंब्लीमधील कॉंग्रेसच्या आमदारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खोती पद्धत नष्ट करण्याचे बिल फेटाळून लावले तर आपण या कॉंग्रेस सरकारविरुद्ध सत्याग्रह करण्यासाठी जय्यत तयार राहिले पाहिजे. पुढे येणाऱ्या अरिष्टासाठी आपण आपली संघटना मजबूत करणे जरूर आहे. खोती बिल नापास झाले तर खोतांना कुळांनी पुढील वर्षाचा मक्ता देऊ नये. सारा भरणे थांबविल्याशिवाय हे कॉंग्रेस सरकार जागे होणार नाही. या साठी सत्याग्रहात सामील होऊन तुरुंगवास पत्करण्याची तयारी ठेविली पाहिजे. स्वतंत्र मजूरपक्ष या चळवळीचे नेतृत्व संपादन करून ही जुलमी खोतशाही नष्ट करण्याचा अखेरपर्यंत कसून प्रयत्न करील." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात स्पष्ट सांगितले की, "आपला लढा खऱ्या तत्त्वाचा आहे. हिंदी राजकीय सत्ता शेठजी, भटजी, सावकार, जमीनदारादी भांडवलवाल्या कॉंग्रेसच्या हाती जाण्यापेक्षा खऱ्या श्रमजीवी वर्गाच्या हाती गेली पाहिजे आणि त्याच दृष्टीने आमचा स्वतंत्र–मजूर–पक्ष धडाडीने कार्य करावयास पुढे सरसावला

आहे – – – जर मुंबई असेंब्लीत आपले खोतीशाही नष्ट करणारे बिल नापास झाले तर आपण पहिल्याने सत्याग्रह करून तुरुंगवास पत्करणार – – – ( जनता, २८–५–३८ )

१६–५–३८ ला चिपळूण येथे कुळांची सभा पक्षातर्फे भरविण्यांत आली होती. सदर सभेत सवर्ण हिंदूंच्या तर्फे बाबासाहेबांच्या चळवळीबद्दल काही वक्त्यांनी टीकात्मक भाषण केले होते. त्या वक्त्यांना उद्देशून बाबासाहेबांनी पक्षाची भूमिका विशद करून दाखविली. विरोधी वक्त्यांना उद्देशून ते म्हणाले, " खरोखर येथे तुम्हां शेतकऱ्यांजवळ तुमची यथाशक्ती सेवा करण्यात मी धन्यताच मानली असती. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, तुमच्या प्रमाणेच मलाही व्यवसाय आहे व तो व्यवसाय केल्याशिवाय माझा पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाही. माझा व्यवसाय मोठ्या दर्जाच्या असला तरी मी बांधलेला आहे. माझा जन्म गरीब परिस्थितीत झाला. माझेवर वडिलांच्या ३–४ हजार रूपये कर्जाचा बोजा होता. सांगण्याचा हेतू की, मी गर्भश्रीमंत नाही, त्यामुळे माझ्या इच्छेविरूद्ध तुम्हांला सोडून माझ्या व्यवसायाकरिता मला मुंबईला जाणे भाग आहे. आताच रत्नाबाईंच्या भाषणानंतर काही गृहस्थांनी टवाळी करण्याच्या उद्देशाने टाळ्या वाजविल्या. त्यांच्या टाळ्यांचा अर्थ मी असा समजतो की, त्यांच्या दृष्टीने आपल्या पक्षाची परस्पर ' हजामत ' झाली. परंतु मी विचारतो या लोकांना टाळ्या वाजविण्याचा काय हक्क आहे ? आम्ही जरी मुंबईस राहात असलो तरी जे बारा महिने येथेच राहतात, त्यांस काय तुमची दुःखे दिसत नाहीत ? त्यांस तुमची दुःखे जरूर माहीत आहेत. परंतु त्यांस तुमच्याकरिता काहीही करावयाचे नाही, काही खोत कुळास म्हणतात की, तुझा आंबेडकर काय करतो ते पाहून घेईन. हे खोत माझी व त्यांची लायकी सारखीच समजतात काय ? कोणताही खोत माझे पुढे आल्यास मी सहजासहजी त्याचा पाडाव करीन. ते माझी व त्यांची स्वतःची तुलना करीत असल्यास मी म्हणेन, **" कोठे मी हिमालयपर्वत व कोठे हा मूतखडा ! "**

मी श्रीमंत नसलो तरी माझे आतापर्यंतचे आयुष्य अत्यंत निर्मळ असे आहे व माझे दृष्टीने तुमचे हितास आवश्यक वाटते ते मी करीत आलो आहे व करीत राहणार. निवडणुकीचे वेळेस काँग्रेसने जी वचने दिली त्यापैकी कोणती पाळली आहेत? काँग्रेसने आतापर्यंत जी बिले पास केली त्यांत शेतकऱ्यांच्या हितसंबंधाचे काय आहे ? उलट खोती बिलासारखे महत्त्वाचे बिल गेले १० महिने काँग्रेस लांबणीवर

टाकीत असून निवडणूकीच्या वेळी दिलेल्या वचनांस हरताळ फासत आहे. आज मी काँग्रेसमध्ये गेल्यास तेथे मला योग्य स्थान मिळणार नाही अगर तेथे माझी प्रतिष्ठा रहाणार नाही असे तुम्हांस वाटते काय ? मी काँग्रेसमध्ये गेल्यास माझे बुद्धीचे जोरावर तेथेही माझी छाप पाडल्याशिवाय व मानाचे स्थान प्राप्त करून घेतल्याशिवाय राहणार नाही, अशी माझी खात्री आहे. गांधींचे प्राण कोणी वाचविले ? मी वाचविले; परंतु गांधींची ही काँग्रेस गरिबांच्या कल्याणाकरिता नाही, अशी माझी ठाम समजूत झाल्यामुळे मी काँग्रेसमध्ये जाण्यास तयार नाही. गांधींचे व्यक्तिमत्त्वापुढे सुभाष बोस, पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपली मान वाकविली. परंतु गांधींची माझेवर केव्हाच छाप पडली नाही. काँग्रेस ही आतापर्यंत ' भटजी शेटजींच्या " पैशावर पोसली जात असल्यामुळे ती त्यांची ' बटीक ' होऊन राहिली आहे. जो ज्यांचे अन्न खातो तो त्यांचा मिंधा असतो. मग तुम्हीच सांगा सावकारांच्या पैशावर पोसलेली ही काँग्रेस त्यांचे विरूद्ध कशी जाईल ? आज–पर्यंत ' भट भिक्षुक ' वर्गाने तुमच्या करता काय केले आहे ? तुम्ही लोकांनी त्यांच्या घरची भांडी घासणे व त्यांच्या बायकांची लुगडी धुणे, याखेरीज काय केले आहे ? सरकारी नोकरीत कोण लोक आहेत ? आज कोठेही जा, मामलेदार, मुनसफ, कलेक्टर हे सर्व पांढरपेशा वर्गाचे आहेत. आज तुमची संख्या शेकडा ८० पेक्षा जास्त असताना सरकारी नोकरीत तुमचे इतके लोक थोडे असावेत हे कशाचे निर्देशक आहे ? **मला तुमच्यापैकी प्राइमिनिस्टर झालेला पाहावयाचा आहे.** मला या मूठभर भटजींचे राज्य नको असून तुम्हां ८० टक्के लोकांचे राज्य हवे आहे.

आज तुम्ही खोतांच्या जुलमामुळे भीरू व भेकड बनला आहात. खोताने नुसते तुमच्याकडे पाहिल्यास तुमच्या अंगाचा थरकाप होतो. परंतु आता ही भीती सोडून त्याने ' अरे ' म्हटल्यास ' कारे ' म्हणण्याची तयारी झाली पाहिजे व त्याने काठीने मारल्यास तुमचीही काठी उचलण्याची तयारी पाहिजे. प्रत्येक मनुष्यास स्वसंरक्षणाचा कायदेशीर अधिकार असतो, हे मी तुम्हांस बॅरिस्टर या नात्याने सांगतो. कारण प्रत्येकाचे मदतीस आम्हांस पोलीस शिपाई देता येणार नाहीत. आज तुम्ही सर्वांनी जातिभेद, धर्मभेद विसरून खोतशाहीस नामशेष केले पाहिजे. कुळांनी आपली एकच जात आहे असे समजले पाहिजे, तसेच खोताने महार कुळां-कडून जर जमीन काढली तर ती कुळवाडी, मुसलमान कुळाने करू नये. तसेच कुळवाड्यांकडून काढल्यास महार अगर मुसलमान यांनी करू नये. मुसलमान

कुळांकडून काढल्यास महार अगर कुळवाडी यांनी करू नये. आज खोत तुमच्यावर जुलूम करीत असले, तरी ती त्यांची शेवटची धडपड आहे हे विसरू नका. मनुष्य मरताना हातापायांची जास्त धडपड करीत असतो. स्वतंत्र मजूर-पक्षाने तुमच्या-करिता खोती बिल आणले आहे. हे तुम्हांस माहित असेलच.परंतु आज कायदेमंड-ळात काँग्रेसचे बहुमत असल्यामुळे हे " खोती बिल " पास होईलच अशी हमी देता येत नाही. परंतु हे बिल पास झाले नाही तर माझ्याकडून हुकूम झाल्याबरोबर सर्व कुळांनी खोतास " मक्ता " देण्याचे बंद केले पाहिजे. तुम्हांला माहीतच आहे की, तुम्ही खोतास मक्ता न घातल्यास तुमच्यावर खोत " मदत दावे " करून जप्ती वारंट आणवून तुमचेकडून धान्य वगैरे बेलिफाकरवी जप्त करून नेतो. परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी खोतास " मक्ता " घालण्याचे बंद केल्यास सरकार वठणीवर आल्याशिवाय राहणार नाही. करण साधारणपणे प्रत्येक तालु-क्यात ५०–६० हजार शेतकरी असतात. त्या हिशोबाने तितकेच " मदत दावे " खोतास करावे लागतील व प्रत्येक तालुक्यात दोनतीनच बेलीफ असल्यामुळे इतक्या शेतकऱ्याकडून वसूल करणे अशक्य होईल व अशा प्रकारे या खोतशाहीस धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. या कारणास्तव तुम्हांवर तुरुंगात जाण्याची पाळी आल्यास तुमची तुरुंगात जाण्याची तयारी पाहिजे. मी येथे जाहीर करितो की तुमचे करिता. **तुरुंगात जाण्यास मी प्रथम तयार आहे.**

त्याचप्रमाणे स्वतंत्र मजूर-पक्षाचे कार्यकर्ते हेही वेळ पडल्यास तुमच्या हिताकरता तुरुंगांत जाण्यास एका पायावर तयार आहेत. परंतु तुमचीही आत्मबलि-दान करण्याची तयारी असली पाहिजे. तुरुंगांत जाण्यात कोणताही कमीपणा नाही. कारण आजचे अधिकारावर असलेले " काँग्रेसचे सर्व दिवाण " तुरुंगात जाऊन आलेले आहेत. तुम्ही चोरी अगर गुन्ह्याबद्दल तुरुंगांत जाणार नसून एका तत्त्वा-करिता तुरुंगवास पत्करणार आहात हे लक्षात ठेवा.

काँग्रेसचे काही प्रचारक स्वतंत्र मजूर पक्षाबद्दल भलताच गैरसमज पसरवीत असून असे भासवीत आहेत की, स्वतंत्र मजूर पक्षाची चळवळ ही निव्वळ लबाडीची व अज्ञ शेतकऱ्यांस फसविण्याची असून ती डॉ. आंबेडकर यांनी महारांकडून इतर जातीस बाटविण्यास व रोटीबेटी व्यवहाराची गल्लत करण्यास स्थापन केलेली आहे; अशी तुम्ही चुकीची समजूत करून घेऊ नका, असे माझे तुम्हांस सांगणे आहे. **आमच्या महारांत काय चांगल्या मुली नाहीत की काय ?** महार जातीवर माझा पूर्ण विश्वास असून

ते कायमचे माझे मागे येतील असा मला भरंवसा आहे. परंतु तुम्ही कुळवाडी व इतर लोक खोती बिल पास झाल्यावर स्वतंत्र मजूर पक्षाशी असलेले संबंध ' काम झाले रुजू, पगडी करा उजू ' या म्हणीप्रमाणे तोडणार नाही, अशी माझी अपेक्षा आहे. तुम्ही पिढयान् पिढया स्वतंत्र मजूर पक्षाशी आपला संबंध कायम ठेवा. कारण या पक्षाचे अंतिम ध्येय हेच आहे की, शेतकरी व कामकरी यांच्या हातांत सर्व सत्ता जाऊन त्यांचे सरकार स्थापन व्हावे. - - - - - " (जनता २८-१-३८)

मुंबई कायदे मंडळांत पक्षातर्फे तीन बिले आणण्याचे ठरविले होते. खोती नष्ट करणे, सावकारी नियंत्रित करणे आणि महार वतनात योग्य ती दुरुस्ती करण, या संबंधी ती तीन बिले होती. या तिन्ही बिलांची वाताहात कशी लागली, त्याचे वृतांत ' कायदे मंडळांतील कामगिरी ' या प्रकरणात दिलेले आहेत. कॉंग्रेस सरकारने खोती नष्ट करणे व सावकारी नियंत्रित करणे या संबंधी पुढील काळात कायदे करून लोकहिताच्या कायद्यांचे श्रेय पदरी पाडले. मात्र याची सारी पूर्व भूमिका बाबासाहेबांनी तयार केलेली होती व तिचा फायदा कॉंग्रेस सरकारने घेतला, हे कोणताही समंजस माणूस मान्य करील. मात्र खोती बिल मंजूर झाले नाही तर आपण सत्याग्रह करू व तुरुंगात जाऊ, अशा जाहीर घोषणा बाबासाहेबांनी केलेल्या होत्या, त्याप्रमाणे काही घडले नाही.

# प्रकरण ३ रे

## कायदे मंडळातील कामगिरी

१९२६ च्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बाबासाहेबांची नेमणूक सरकारने कायदे मंडळाचे सभासद म्हणून केली. तेव्हापासून ते कायदेमंडळाचे सभासद म्हणून १९३६ पर्यंत होते. या काळात ते कायदे मंडळाच्या बैठकींना फारसे हजर राहात नसत. पण जेव्हा हजर राहात तेव्हा ते एकाद्या सार्वजनिक प्रश्नावर जोरदार भाषणे करीत. विशेषत: अस्पृश्यांच्या हिताच्या प्रश्नाबद्दल त्यांची भाषणे माहितीने, तर्कशुद्ध विचारसरणीने आणि अंत:करणाच्या तळमळीने भरलेली असत. सरकार अगर हिंदू लोक यांच्या रागालोभाची तमा न बाळगता ते सडेतोडपणे बोलत असत. त्यांच्या भाषणांतील कडक व कडव्या शब्दांनी आणि निर्भीड कोटिक्रमाने सरकार पक्ष आणि हिंदुलोक घायाळ होत असत. यांच्या तीव्र वाक्प्रहारांनी घायाळ झालेले हिंदू त्यांच्यावर वर्तमानपत्रांतून टीका करीत असत. इतके होऊनही बाबासाहेबांच्या हातून भरीव स्वरुपाचे कार्य कायदे मंडळात झाले नाही. महार वतन बिल हिंदू सभासद आणि सरकार पक्ष त्यांच्या आडवणुकीच्या धोरणामुळे पास झाले नाही. यामुळे बाबासाहेब कायदे मंडळावर फार चिडले. ते कायदे मंडळात फारसे हजर राहात नसत, त्याचे हे कारण होते. मग त्यांनी सरकार व हिंदू सभासद यांच्यावर कायदेमंडळात टीकेच्या तोफा डागल्या. हे त्यांच्या अनेक भाषणांवरून दिसून येते.

सरकारतर्फे दी ओनरबेल मौलवी रफीउद्दीन अहमद यांनी युनिव्हर्सिटी अॅक्टमध्ये दुरुस्ती करण्याचे बिल ( A Bill further to amend the Bombay University Act, 1928 ) ८ जुलै १९३० रोजी कौन्सिलमध्ये मांडले. त्याचे पहिले वाचन झाले. ( Bombay Legislative Council Debates, Vol. XXIX. July 1930, pp. 149-170 ) शेवटी ते बिल सिलेक्ट कमिटीकडे

पाठविण्याचे ८–७–३० ला ठरवण्यात आले. ( किता पा. १७० ) या कमिटीत डॉ. आंबेडकरांना घेण्यात आले. युनिव्हर्सिटी बिलाला बाबासाहेबांनी अनेक दुरुस्त्या सुचविल्या. त्यांना मुंबई युनिव्हर्सिटी लंडन युनिव्हर्सिटीच्या नमुन्या बर-हुकूम करावयाची होती. पण सरकार आणि सिलेक्ट कमिटी यांना ते पसंत नव्हते. त्यांना युनिव्हर्सिटीत क्रांतिकारक बदल नको होते. आपापले हितसंबंध सुरक्षित ठेवून त्यांना युनिव्हर्सिटीत फरक घडवून आणावयाचे होते. या त्यांच्या पुच्छ प्रगतीच्या धोरणाला कंटाळून बाबासाहेब गप्प बसले. मात्र त्यांच्या विशाल दृष्टीबद्दल अनेक विद्वानांनी आणि पत्रांनी गौरवाचे उद्‌गार काढले. पण या कोरड्या सहानुभूतीचा काय उपयोग ?

मुंबई कायदेमंडळाची पहिली बैठक कौन्सिल हॉल मुंबई येथे बुधवार १८–२–३१ रोजी दुपारी २ वाजता सुरू झाली. (Bomba y Legislative Council Dabates, Vol. XXX, part, 1 February — March 1931, p. 1 ) बैठकीस ते हजर राहिले. यावेळी पंचम जॉर्ज बादशहाशी आपण राजनिष्ठ आहोत, अशा रीतसर शपथ विधीतून त्यांना प्रथम जावे लागले. ( किता पा. २६१ )

गाव–पंचायती स्थापन करण्याचा कायदा करण्याचे सरकारने १०–९–३२ रोजी सरकारी गॅझेटमध्ये जाहीर केले. त्या कायद्याचा मसुदा ( A Bill to amend and consolidate the law relating to Constitution of Villoage Panchayat — Bill No. XXI, of 1932 ) दी ऑनरेबल सरदार सर रुस्तुम जे. वकील यांनी कौन्सिलमध्ये ६-१०-३२ रोजी मांडला. त्यावर अनेक सभासदांची भाषणे झाली. आंबेकडरांनी या बिलावर जे भाषण केले ते या सभासदांच्या भाषणा-पेक्षा निराळे होते. या बिलामुळे जी सत्ता पंचायतींना देण्यात येईल त्या सत्तेचा उपयोग पंचायत सभासद गरीब लोकांना आणि विशेषत: अस्पृश्य लोकांना नाशविण्यात करतील, तर हे बिल सरकारने मंजूर करू नये. आणि केलेच तर यात अस्पृश्य जमातींच्या लोकांच्या संरक्षणाबद्दल पूर्णपणे तरतूद करण्यात यावी. तसे न करता जर सरकार हे बिल मंजूर करील तर त्याबद्दल मी विरोध करीन. किता, पा. ११११२–२२) त्यांच्या भाषणांतील संदर्भित भाग मी येथे देत आहे

" ——— Then my honourable friend asks, should we admit this principle in the judiciary? Well, if my honourable friend can assure me that the existing judiciary is not without commun-

al bias, that the Brahmin Judge, when he sits to ajudicate upon ssues between a Brahmin defendent and Brahmin plaintiff, he idecides as a mere judge. I perhaps would be inclined to consider his proposition favourably. But I know what sort of judiciary we have, if my honorable friend and if this House had the patience, I would rub off heaps of stories where I know to my knowledge that the judiciary has abused and prostituted its position. ( Honourable Members : Oh ho! ) It is because we are not certain that what they call the village folk, who are bound together by ties of blood, by ties of kith and kin, will not make a conspiracy to utilise the political and judicial power that they will get to put down the other classes that we want this provision——" P.324.

मुसलमान व अस्पृश्य लोक यांच्या संरक्षणाची तरतूद सरकारतर्फे बिलात केलेली पाहून आंबेडकरांनी सरकारचे आभार १०-२-३३ च्या बैठकीत मानले; Bombay Legislative Council Debates, Vol. XXXVII, February March, 1933, p. 322) हे संरक्षण जरूर आहे. कारण न्यायखात्यात, जातीजातींतील खटल्यात, ब्राह्मण ब्राह्मणेतर अधिकारी वर्ग अधिकारांचा वेश्याव्यवसाय करितात तर मग पंचायतीत जे गावातील प्रमुख लोक म्हणजे ब्राह्मण व मराठे हे अधिकारी होऊन बसतील ते अस्पृश्यांना कसे छळतील हे सांगावयास नको, असा आंबेडकरांच्या भाषणाचा सारांश होता. ( कित्ता, पा. ३३२-२४ )

बिलाचे तिसरे वाचन २४-३-३३ ला झाले तेव्हा आंबेडकरांनी तक्रार केली की, बिलांत म्हणावा तसा फरक करण्यात आला नाही. पण त्यांच्या तक्रारीला कोणी महत्त्व दिले नाही. (कत्ता, पा. २१९७-९८) बिल २४-३-३३ च्या बैठकीत मंजूर झाले. (कित्ता, पा. २२०८)

दी ऑनरेबल आर. डी. बेल यांनी १८-२-३३ च्या बैठकीत फटके मारण्याबद्दलच्या कायद्यात दुरुस्त्या करणारा खर्डा (Bill No. VIII of 1933-to amend the Law relating to the Punishment of Whipping in the Presidency of Bombay कित्ता, पा. ६३७) मांडला. या बिलाच्या दुसऱ्या कलमाची भाषा सुधारावी आणि दंगलीत भाग घेतलेल्या लोकांना फटके

मारावेत की नाही, हे स्पष्टपणे ठरवावे, अशा सूचना बाबासाहेबांनी या बिलावर १८–२–३३ ला भाषण करताना केल्या, (कित्ता, पा. ६५२–५३ )

१९३० पासून पुढे चालू केलेले कौन्सिल १९३६ पर्यंत चालू होते. त्याचे शेवटचे सेशन सप्टेंबर-ऑक्टोबर १९३६ मध्ये संपले ( B. C. L. Debates. Vol. XLV ) त्यानंतर १९३५ च्या कायद्यान्वये १९३७ ला नव्या निवडणुका झाल्या.

बॅ. जयकर यांनी सप्रूंना १४–६–३७ ला मुंबईहून ( Ashram, Winter Road, Malbar Hill ) पत्र पाठवून असे कळविले की, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी सप्रूंना आणि जयकरांना D. C. L. ही सन्माननीय पदवी लौवकरच अर्पण करणार आहे. ही बातमी युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर थॉमसन यांनी जयकरांना सांगितली होती. ती पदवी सप्रू आणि जयकर वर्तुळ परिषदेला राहिले होते तेव्हाच देण्याचा युनिव्हर्सिटीचा .विचार होता. परंतु इंडिया ऑफिसने युनिव्हर्सिटीला कळविले की, दोन हिंदूंना ही पदवी देणे व एकाद्या मुसलमानाला ती न देणे, हे सध्याच्या हिंदी राजकीय परिस्थितीला बाधक होईल, म्हणून तो पदवीदान समारंभ युनिव्हर्सिटीने तेव्हा ( १९३१–३३ ) घेतला नाही. ( " I Know from Thompson that you would be offered the D.C.L. of Oxford.He was keen about both of us taking it sooner or later. He would have liked us to do so during the Sittings of R. T. C., but as you khow, the India Office opposed it on the ground that honouring two Hindus without a Mohomedan would be politically inexpedient, and as no Mohomedan could be fonnd, the idea had to be dropped. I am very glad that Oxford is offering it to you now, and I hope you will accept it "). सरकार हिंदू व मुसलमान यांच्यांत मुसलमानांना किती महत्त्व देत होते, हे उघड होते.

श्री. खेर, वगैरे कॉन्ग्रेसचे प्रमुख लोक यांच्याशी राजकीय प्रश्नांसंबंधी विचार करता आपणांला ते असे म्हणाले की, प्रांतिक गव्हर्नर यांनी काँग्रेसला मंत्रिमंडळ बनविण्याचे आमंत्रण दिले तर ते काही अंशी आम्ही स्वीकारण्यास तयार आहोत. तेव्हा निवडणूक होऊन बरेच महिने गेले तरी मंत्रिमंडळे सरकार व कॉन्ग्रेस यांच्या हट्टामुळे आतापर्यंत तयार झाली नाहीत. तरी ब्रिटिश सरकारने,

या बाबतीत सरळ धोरण स्वीकारून काँग्रेसला मंत्रिमंडळे बनविण्याची संधी द्यावी, याकरिता तुम्ही ब्रिटिश पुढाऱ्यांची मने वळविण्याचा प्रयत्न करा असेही जयकरांनी सप्रूंना या पत्रात विनविले होते.

सोमवार १९–७–१९३७ ला दुपारी दोन वाजता मुंबईच्या नव्या कायदे मंडळाची पहिली बैठक सुरू करण्यात आली. पुणे स्टेशनच्या पिछाडीस असलेल्या मनमोहन रामजी यांच्या बंगल्यात श्री. बाळ गंगाधर खेर हे राहात होते. तेथे कॉन्ग्रेस पक्षीय जमले. त्यांनी झेंडावंदन व वंदेमातरम् हे राष्ट्रगीत म्हटले. हे कार्यक्रम संपल्यावर विधिमंडळाकडे बाळासाहेबांच्या नेतृत्वाखाली सर्वांनी कूच केले. ' इन्किलाब झिंदाबाद ' ' साम्राज्यशाहीचा नाश होवो ! ' वगैरे जयघोषांत सभासदांनी आपले आवाज उठविले आणि विधिमंडळात गेल्यानंतर काँग्रेस पक्षीयांनी राजनिष्ठेची शपत घेतली. काँग्रेस सभासदांचे हे कृत्य विरोधी पक्षांच्या चेष्टेचा विषय झाला. ( केसरी, २०–७–३७ पा. ८ )

या बैठकीत जेव्हा सभासदांचा शपथविधी झाला. ( Bombay Legislative Assembly Debates, Vol. I July – — September 1937, pp, 7-11) तेव्हा आपण धर्मांतराची घोषणा केली असल्यामुळे आपण शपथविधीसाठी हिंदुधर्माचा ग्रंथ, श्रीमद्भगवद्गीता, याचा आधार घेणार नाही, असे डॉ. आंबेडकर शपथविधीच्या अगोदर म्हणाले; पण त्यांनी बादशहांशी राजनिष्ठ राहण्याची शपथ घेण्याचे मान्य केले, असा मजकूर २० जुलैच्या काही वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेला होता.

मुंबईच्या मंत्रिमंळांतील मंत्र्यांना दरमहा पगार किती असावा याबद्दलचे बिल ( Bill No. I of 1937 — — A Bill to provide for the Salaries of the Ministers of the Government of Bombay and certain other matters) मुख्यमंत्री श्री. खेर यांनी २३–८–३७ च्या बैठकीत मांडले. महात्मा गांधीजींनी घालून दिलेला सेवा धर्माचा आदेश पुढे ठेवून मंत्र्यांनी जनतेची सेवा अल्प वेतन घेऊन करावी, हा मुद्दा प्रामुख्याने लक्षात ठेवून दरमहा पाचशे रूपये पगार, १०० रुपये घरभाडे, आणि रु. १५० मोटर खर्च अशी बिलात तरतूद केलेली होती. ( Appendix I, Vol. I, p 1 ) बिलावर श्री. खरे यांनी भाषण केले ( Vol. I, pp 244-47 ) त्यानंतर बाबासाहेबांनी भाषण केले. ( पा. २४७–५४ ) हे नव्या कायदेमंडळांतील त्यांचे पहिलेच भाषण होय. त्या भाषणाचा सारांश खालील प्रमाणे :

सर्व मंत्र्यांना सारखा पगार देण्याचे जे तत्व या बिलात आहे, ते मला नाही. हे तत्त्व इतर देशात पाळले जात नाही. तेथे मंत्र्यांना त्यांच्या कामाच्या महत्त्वावरून पगार ठरविला जातो. उदारहणार्थ खालील माहिती पहा –

| नं. देश | मंत्र्यांची संख्या | मुख्यमंत्री वार्षिक पगार | इतर मंत्री वार्षिक पगार | इतर भत्ते |
|---|---|---|---|---|
| १ आयरिश फ्री स्टेट | ११ | | १७०० पौंड | – |
| २ साऊथ आफ्रिका | १३ | ३५०० पौंड | २५०० पौंड | – |
| ३ कॅनडा | १६ | १९,००० डॉलर्स | १४००० डॉलर्स | ४००० डॉ. |
| ४ न्यूझीलंड | १२ | १८०० पौंड | १३७० पौंड | २०० पौंड |

१९३५ चा कायदा अमलात येण्यापूर्वी हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतांतील मंत्र्यांना त्यांच्या दर्जाप्रमाणे कमीजास्त पगार होता. मद्रास – मुख्यमंत्री रु ३००० इतर मंत्री (प्रत्येकी) दरमहा रु. २५००। – आणि घर. मुंबई–मुख्यमंत्री रु. ४०००। – आणि इतर मंत्री रु.दरमहा ३५०० यू. पी. – मुख्यमंत्री व इतर मंत्री प्रत्येकी दरमहा रु. २५००।– मध्य प्रदेश – मुख्यमंत्री दरमहा रू. ३००० आणि इतर मंत्री रु. २,२५० बिहार – मुख्यमंत्री रु. २५०० आणि इतर मंत्री रु. २००० ओरिसा – सर्व मंत्र्यांना प्रत्येकी रु. १००० मंत्र्यांचा पगार ठरविताना १) मंत्र्यांचा सामाजिक दर्जा २) त्यांची गुणवत्ता, ३) लोकशाहीशी त्यांच्या कार्याचा संबंध, आणि ४) राज्य कारभारात अवश्य असणारी विशुद्ध कार्यपद्धत आणि कार्यैकनिष्ठा, ही तत्त्वे लक्षात घेतली पाहिजेत. आजपर्यंतचा अनुभव असा आहे की भरपूर पगार न घेणारे अधिकारी पगाराशिवाय इतर साधनांनी आपली उत्पन्नाची वाढ करण्याच्या मोहाला बळी पडतात. त्याच प्रमाणे राज्यकारभारात आत्मीयत दाखवून काम करणारी माणसे सापडणे कठीण आहे. अशा परिस्थितीत प्रांताचा कारभार निर्विघ्नपणे चालणे शक्य होत नाही. शिवाय कमी पगाराच्या जागेवर बुद्धिमान माणसे न येता सर्वसाधारण बुद्धीची माणसे राज्यकारभारात जर आली तर त्या राज्यकारभाराचा सत्यानाश झाल्याशिवाय राहणार नाही. या प्रश्नाला दुसरी बाजू आहे. तुम्हांला जर निःस्वार्थी बुद्धीने लोकसेवा करावयाची आहे तर मग तुम्ही मंत्र्यासाठी ५०० रुपयापेक्षा कमी पगार का ठरवीत नाही ? आपल्या देशातील दरडोई उत्पन्न पाहिले तर हेच केले पाहिजे. युनायटेड किंगडमचे दरडोई वार्षिक उत्पन्न ५० पौंड, अमेरिकेचे १०० पौंड, फ्रान्सचे ४० पौंड, ऑस्ट्रेलियाचे

७० पौंड, कॅनडाचे ७५ पौंड आणि हिंदुस्थानचे ४ पौंड आहे. या प्रमाणात मंत्र्यांनी दरमहा ७५ रु. पगार घ्यावा. पण हे शक्य आहे काय? नाही. तेव्हा ५०० रुपयाचा पगार हाही योग्य नाही. पगाराची रक्कम तीन, चार अगर पाच हजार असावी, असे मी म्हणत नाही. पण ती रक्कम मुख्यमंत्री आणि इतर मंत्री यांच्या इतमामाला शोभणारी असावी.

बाबासाहेबांच्या या भाषणावर त्यावेळी वर्तमानपत्रांतून जाहीरपणे बरीच चर्चा झालेली होती. खाजगी स्वरूपातही होत होती. आंबेडकरांचे हे भाषण म्हणजे काँग्रेसच्या मंत्रिमंडळाला नुसता आडवणुकीचा कोलदांडा आहे, असेही काहीजणांनी मत प्रदर्शित केले. बाबासाहेबांचे ते संपूर्ण भाषण मी मुद्दाम येथे वाचकांच्या माहितीसाठी देतो –

" **Dr. B. R. Ambedkar** ( Bombay City, Byculla & Parel ): Mr. Speaker, I rise to make a statement, and I use the word " Statement " very advisedly. I am not moving an amendment to the Bill which has been proposed by my honourable friend the Prime Minister, nor do I propose to carry this matter to a division. The Ministers' salaries Bill, I think, ought to have been an agreed measure, and it need not have been carried through, as the Ministry proposes to do so, by a purely party vote. That course the Ministry has not chosen to take, and I am, therefore, bound to make this statement with the simple object of lodging a protest against the principles of the Bill. Notwithstanding what the Prime Minister has said in moving this Bill -- and no doubt every member of this House will feel a greater degree of respect for him for the sincerity with which he spoke and for the high principles he has enunciated regarding the conduct of Ministers -- taking the view of the situation as a practical man, looking at things from a practical point of view, I do not think that I can accept the standard salary for Ministers which has been laid down in this Bill,

Sir, before I explain the reasons why I think that this should not be a standard salary for the Ministers, I would like to place before the House some figures relating to the salaries which are

paid to Ministers outside India and also to MInisters in India, so that the House may at the outset be able to realise what a great departure we are making from the standard that exists to-day. I have here with me a few figures which I have collected. In the Irish Free State there are 11 Ministers; very one of them is paid a say of £ 1,700/-per annum, which according to my calculation comes to approximately to Rs. 2000/- a month. In South Africa there are 13 Ministers,2 without portfolio. The Prime Minister is paid £ 3,500/- per annum, the other Ministers paid £ 2000/- per annum, which according to my calculation comes to Rs. 2,900. per month. I have not been able to get the figures for Australia, but the figures for Canada are as follows :- Prime Minister gets $ 19000/- per annum; there are 16 Ministers in Canada altogether and the Ministers get $ 14,000/- per annum, which includes $ 4,000/- for sessional allowance. In New Zealand there are 12 Ministers. The Prime Minister there gets £ 1,800/- plus a residence, and a Minister gets £ 1,370/- per annum which includes £ 200/- for house allowance, so that the salary for the Minister comes to Rs. 1,500/- per month.

Coming to India and leaving aside for a mome t the salaries that were paid before the new Government of India Act came into operation, and taking the salaries that were fixed for the interium Ministers which were, to some extent at any rate, responsible to public opinion- these are the figures which I find from a table submitted to Parliament. In Madras the Prime Minister was paid a salary of Rs. 3,000/- and each of the ministers was paid Rs. 2,500/-- plus a house. In Bombay the salary was Rs. 4,000 for the Prime Minister, and for the ministers salary was Rs 3,500 - each. In the United Provinces each minister including the Prime Minister was paid Rs. 2,500/-. In the Central Provinces the Prime Minister was paid Rs. 3,000/- and each

Minister was paid Rs. 2,250l- In Bihar the Prime Minister was paid Rs. 2,500l- and a minister was paid Rs. 2000l- In Orissa the Minister was paid Rs. 1,000l- each.

Now, Sir, compare these figures with the figure proposed in the Ministers' salaries Bill. There can be no doubt that there is a great departure from the prevailing standard. It seems to me that the difference is not merely a difference of degree but is a difference of kind and I submit a difference of kind is a difference of principle. What are the considerations which ought to prevail ? The first is the consideration of the social standard of the Ministers, who are undoubtedly the social leaders of the community; Secondly, considerations of the competency; thirdly, considerations of democracy; and fourthly, considerations of integrity and purity of administration. I am not prepared to push the first consideration to any unreasonable length personally, I should have thought myself that the ministers of the Country, who are the first ctizens of the country, should lead a life which is cultured, which cares for art, which cares for learning, and which ought to be a model for the rest. But if our friends do not care to consider that aspect of the case,as I say, I am prepared to leave it out of the consideration. Consideration of competency, the consideration of democracy and the consideration of integrity could never be overlooked in fixing the salaries of Ministers. I do not know what view the Honourable Prime Minister takes of the duties and functions of the Ministers. If the view is that the Ministers are to do nothing more than go about and unfurl flags and receive from crimson clad ladies forming guards of honur, then that is a different proposition. In my view, and I want to emphasise it with all my emphasis I am capaple of, there is anything we expect from the Ministry, it is competency. I have no doubt in my mind that of the three organs of the State,

the ligislature, the executive and the Judiciary, the executive is the main spring of action. It is the executive which is to study the problems that are facing the country; it is the executive which is to show what solutions can be proposed for solving these problems; in short, Sir, it is the executive that must be the brain trust, if we are to solve the various problems with which we are faced and to get the best out of this consideration.

The question that arises in my mind is this, wether the salary that is propoed a salary which is capable of inviting men who are capable and who have the necessary competence to face the problems and suggest remedies. Looking the question dispassionately in the light of the circumstances which I see prevalent in this country, I cannot give, Sir, an affirmative answer. First of all, there is this fact to be considered, namely, that there other walks of life in which the prises are for greater than the prises which have been provided for the Ministrye Many people who have competence, who have ambitions, will seek other walks of life rather than come to the Ministry and have the responsibility of the Ministry. I could have understood f the Ministry was legislating that nobody should receive a salary of more than five hundred in any walk of life. If they. had done so, things would have been otherwise. But they are not doing so. They are driving away competent men in other walks of life. This is one aspect of the matter. The second aspect to bt considered is this. Looking at the situation in India, I canno help saying that the intellectual class from which you can draw men who are competent enough to undertake the responsibility is very small. Sir, in this country, on account of the social system which has been prevalent and which the British regime has not been able to damage very much, education was confined to a small class. Education has never been the privilege and the

opportunity of many. In fact, under the Chatur Varna, it is only one class who could take education and the rest were debarred. Consequently, a large mass of people are absolutely so situated that they cannot throw forth leader's who can be taken in the Ministry to carry on the administration. Therefore, my submission is that the salary is not a salary which can invite competent people to carry on the administration.

Now, Sir, coming to the question of democracy, what will be the effect of the salary ? I would not mince matters. I would straightway say that the consequence of this salary will be this. Either there would be people who do not care for money, who have private means but who want to capture political power for the advancement of their own class or their own community. That would be one consequence. The other consequence would be that men who cannot make anything in other walks of life will get into the Ministry. There can be no other consequences ( Laughter ). My friends may laugh, but I have no hesitation in saying that that will be the consequence of this bill. There can be no greater disaster if what I apprehend comes true. We want that the political power which is given under the Goverment of India Act should not be cornered or monopolised by a few who have money and who do not care for salary. Nor do we want in the interest of the masses that the power should go into the hands of incompetent people.

Coming to the other question, namely, the integrity and the purity of administration, a friend of mine who is Congress-minded said one thing which I would like to repeat on the floor of this house. He said that if the Governor were to give him a contract for supply of Ministers, he would very readily undertake

the contract and also give something to the Presidency of Bombay for giving him that contract. I think, Sir that remark is very pregnant. There are hotels in Europe where waiters pay to the managers to allow them to wait. That shows what possibilities there are open to people who are not kept above temptation to pick something which they cannot get by way of pay. I am not saying anything in regard to the present ministry, because we are discussing the principle of the bill, not at all personalities involed. Even with higher salaries I admit, and readily admit, that you can never buy the dishonesty of a dishonest man. Pay him any salary you like, if he is dishonest, he will be dishonest. That is, however, not the consideration. The consideration is whether you can fix your salary in such a way that the minister will be kept beyond temptation. Sir, we have had in this province a salary of Rs. 4,000/- and a salary of Rs. 3,000/- and yet there were scanadals relating to the administration. If even with salaries of Rs. 3,000/- and Rs. 4,000/- it is not possible to avoid scandals, I fear very much a salary of Rs 500/- may produce far greater scandals than have produced in the past. In this, the question that arises for consideration is not merely whether the salary is adequate. My friends opposite may say that the salary is adequate. But my view is that it is not the close of the argument. The problem of salary has to be considered from two points of view. From the stand-point of the individual the consideration is one of adequacy. From the standpoint of the State the consideration is a consideration of safety and purity of administration. A man may say that a particular salary is adequate salary for him. But it does not follow that you should not consider whether from the public point of view it is a safe salary. Lowest standard is not necessarily a safe standard. I belive my friends opposite will have, when they give contracts they shall not be given merely because the tenders are the lowest. Just as we do not give oontracts to persons simply because their tenders are the lowest, similarly we cannot allow persons to serve as ministers merely because they are prepared to accept the lowest salary. We have to consider the other side of the question whether the contractor who is offering the lowest tender is

capable of discharging the obligations of his task. Therefore, I am suggesting that, though the Honourable Minister may say that Rs. 500/- salary is good enough, it does not dispose of the argument. The House has to consider whether on this basis it can expect and hope to have an administration which is free from corruptions which may possibly arise.

Now, Sir, I should like to read to the House a small extract from the report that was made by the committee appointed by the House of Commons in year 1920 in order to suggest the principles on which the salaries of the Ministers ought to be fixed. This is what the committee observe.

" There are probably few subjects open to more varieties of opinion than the precise amount of salary suited to any given office of Government; and that the Committee disclaiming all pretensions to any infallible rule on a question necessarily so vague, will nevertheless submit some preliminary observations upon the general principles by which they have been governed in conscious discharge of an ungracious duty.

" It is impossible not to recognise in its fullest extent the principle, that the people have a right to have their service done at the smallest possible expense consistent with its performance. Whether public servants sit in Parliament or not, the principle is the same. The only justification for taxes of any sort is either necessity or evident public utitlity. If, notwithstanding the consecutive gleanings of different committees of the House, any sinecures are still existing no time should be lost in abolishing them; and it will be seen in the course of this report, that the Committee have not failed to do their duty, by more than one case of this description.

"If any offices are overpaid they should be reformed. If any can be united with others with benefit to the public, useful species of economy whould not be neglected and several suggestions of this sort will be found in the evidence which it is not within the powers

given to the Committee to follow up. In short, all departments of Government should be watched with the same view to economy in gneral which any individual would apply to the management of his own affairs.

"It is almost unnecessary to observe that these general principles do not lead to the absurd conclusion, sometimes imputed to them, that a willingness to accept low pay is any qualification for office. Economy, to deserve the name, must be rational; and no consideration of more money can be set in competition with the permanent evident necessity of securing for offices of great trust and confidence the highect class of intelligence and integrity. It has been frequently observed, and the observation, being founded on truth and reason, should never be cost sight of that offices in a free country should not be put beyond the reach of men of moderate fortune. If salaries should be fixed too low a monopoly would be created in the hands of the wealthy, the power of selection by the Crown would be most injuriously restricted, and the public would be deprived of the services of men of limited means, educated with a view to the pursuit of liberal professions, a class, furnishing more than any other the talents and industry suited to official life.

"It should be further considered, that the higher offices of Government require an entire devotion of the whole time and attention of those who fill them, that their own private affairs must necessarily be neglected; and that if care should be taken on one hand to avoid the scandals of private fortunes amassed at the public expense, it is neither for the interest nor for the honour of the country, on the other hand, that they should be ruined in its service "

I submit, Sir, that there are principles which any ministry who cares for the service of the country and for the purity of the administration, ought to bear in mind. And I do not think that the present Ministry in fixing the salary at Rs. 500/- has shown any regard to the principles which I have read out.

Now, Sir, what are the principles that have been suggested for the salary that has been fixen in the Bill ? The one thing I have heard often said is that the salaries ought to be in accord with the income of the people. I ask the question, if it is so, can it be said that Rs- 500/ salary is in accord with the income of the people ? What is the income of the people ? I have here figures given in the " Harijan "— — I suppose a standard authority — from which I may quote.

**The Honourable Mr. B. C. Kher** : I am glad you read it.

**Dr. B. R. Ambedkar**- I do not always read it. According to the figures given here, the income per head in the United Kingdom is £ 50 per annum; in the United States of America, £ 100; in France £ 40; in Australia, £ 70; in Canada, £ 75: in India £ 4.

( The Honourable Mr. B G. Kher : Hear, Hear. ) Now, Sir, if all this is done on the principle that the salaries ought to be in accord with the income of the people, then I do not understand how it can be suggested that the salary of Rs. 500 / per month is in accord with the £ 4 income of the people of this country. Surely, if my honourable friend is basing the Bill which he has placed before us, on this principle, namely, that the salary should be in accord with the income of the people, then Rs. 500/- I submit, is most extravagant sum to take for the Ministry, It ought to be less than Rs. 100 ; it ought to be Rs. 75/-, as was suggested., If they are honest, if they want to fix this sum as a matter of justice, and not to place to the people, then why not be logical in your honesty ? Why fix a sum which is out of all proportion to the income of the people ?

The second thing that has been suggested in justification of the low salary is that the ministers ought to live in such a manner that they should look as though they were of the people, that there should be no distinction between ministers on the one hand and the private citizens on the other. Sir, if this is the object of

the Ministry, that all distinctions should be abolished that they should look as though they were of the people, that the people should have full confidence in them as though they belog to the people, then, my submission is that this is not the method of winning the confidence of the people. Sir, in this country, the cleavages, social, and religious, are far greater than they exist anywhere else in the world. We have here -- I am speaking of this presidency for the moment -- we have here the division of Brahmins and non - Brahmins; the division of the touchables and the untouchables -- I am confining myself again to tne Hindus -- we have the division of Maharashtrians versus Gujaratis; We have the division of Gujaratis versus Kanarese. And add to all that the difference between the Hindus and the Mohomedans. If you want to create confidence in the administration, then, I submit that the proper way of doing it is not for the Ministers to go about in the streets half clad ; showing their anatomy , or smoking bidis in place of cigarettes., or going in third class or in bullock carts. Nobody is going to be declined by these things. If you want to gain confidence of the people, then, I submit that the only way of doing it is to constitute your Government, your Ministry, your civil Services, in such a way that it does not become the monopoly of any particular class or any particular community. ( Cheers ). We shall watch what the Ministry is going to do about it. But if they want to pretend that they are going to create confidence by doing these, what I might call, puerile things, then, I submit it is an attempt that is doomed to failure.

Then, Sir, the Ministry has come forward with which might be called an act of renunciation on their part. It reminds me of the conduct and the way of life medieval monks. The medieval monks when they started their careers as monks were required to take three vows -- the vow of celibacy, the vow of chastity and the vow of poverty. I do not know whether my honourable friends have taken the vow of celibacy (Laughter). I suppose it is too late for them now to do it. I do not know whether they

have taken the vow of chastity. But if they have and if they break it, it is certainly not a matter of grievance for this House. But they certainly have taken the vow of poverty, as I see from this Bill. Can they keep this vow ?. The medieval monks very seldom succeeded in maintaining their vow of chastity, but always succeeded in maintaining their vow of poverty. Why was it so ? That was because the monks had no families ; they were single, solitary individuals, with no obligations to any one. The Ministers in this respect stand in a different situation altogether. They have certainly large responsibilities arising out of their families and their children. I cannot see how they can succeed in keeping up to their vow of poverty. I wish them success, but I doubt very much whether they will be able to do it.

**Mr. A. V. Chitre** :— They will be drawing their dividends.

**Dr. B. R. Ambedkar** :— Now, Sir, There is one other matter which I would like to speak about. Is there any necessaity of this Bill ? Personally myself, I do not think the Bill is a necessary Bill. No-body can compel the Honourable Ministers to take more than what they desire. And surely, without bringing the Bill, and allowing the salaries fixed by the Governor to remain at the figure at which they are fixed, they could take Rs. 500/- and return the rest to the State or to the Party Chest, whichever they liked. Why is it they do not do that ? Why is it that they are bringing in the Bill ? And that is where the catch comes in. I venture to say that this Bill is not put forth out of pious motive, there is a strategy behind it. That strategy is this, that they should always remain in the saddle and nobody else should take their places.

**The Honourable Mr. K. M. Munshi** :— You are welcome.

**Dr. B. R. Ambedkar** :— This reminds me of how at the Round Table Conference the Conservative Party was trying to strengthen its provision by introducing certain clauses in the Goverment of India Bill which could have no other purpose

except to restrict the freedom of action of the Labour Party Many of us used to question them as to why they wanted certain clauses to be introduced into the Government of India Act which apparently had no justification. They could give no reply, but everybody knew that what they were doing was really to forestall the Labour Party Government, should it ever come into power, and prevent it from undoing what the conservative party wanted to do. If my learned friends want to adopt that policy, they are welcome to do so. We cannot prevent them. All I want to say is that this is a misuse of their power.

Let me at this stage make it clear, because I am likely to be misunderstood, that when I am protesting at the salary of Rs 500/- as being too low, I am not at all suggesting that the salary of Rs. 4,000/- or Rs. 3,000/- which was suggested by the Interim Ministry was a standard salary. Nobody need draw that conclusion, because I am not going to say that Rs. 4000/- or Rs. 3000/- is a proper salary. I bind myself to no figure. All I say is that Rs. 500/- is not a proper salary for a Minister. The statement I have made will no doubt leave me open to the criticism that I am suggesting an extravagance. But I do not feel any embarrassment in making the suggestion that the salary ought to be more than that fixed in the Bill. I am certainly not a recipient of the salary, if it was increased; and, so far as I can see the future, I do not think that I shall ever be receipient of it.

**The Honourable Mr. B. G. Kher :** Do not despair.

**Dr. B. R. Ambedkar :-** Well, I need not answer my learned friend. But his policy is what it is; he certainly has deliberately excluded members of the Scheduled Classes from his Cabinet.

**The Honourable Mr. K. M. Munshi :—** They may not like Rs. 500/

**The Honourable Speaker :—** Order, Order

**Dr. B. R. Ambedkar :—** I do not feel any emberrasment

in making this proposal, because I am not going to be a recipient of this salary. My motives are motives purely of public policy. Dr. Johnson said that patriotism was the last refuge of scroundels. He could very well have said that politics also was the last refuge of the scroundrels. India should become the last refuge of the scroundrel that I have risen to speak. ( Bombay Legislative Assembly Debates, Vol. I, July — - September 1937, Pages 247-54 )

बाबासाहेबांच्यानंतर ज्या सभासदांनी भाषणे केली त्या सर्वांनी त्यांच्या भाषणातील मुद्यांवर आपली मते प्रदर्शित केली. (पा २५४-७६) श्री. एस. के. पाटील यांनी बाबासाहेबांच्या मुद्यांना उत्तरे देताना बरीच खोचक भाषा वापरली. (पा. २६२-६६). श्री. खेर यांचे भाषण सदर मुद्यांना उत्तरे देणारेच झाले. (पा. २६९-७६). शेवटी बिल थोड्या दुरुस्त्यांनिशी मंजूर झाले. (पा. २८०)

बाबासाहेबांनी १७-९-३६ च्या बैठकीत खोती नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक ( A Bill to abolish Khoti system) मांडले. त्यावर त्यांनी सुमारे तीन मिनिटे भाषण करून त्या विधेयकाचे समर्थन केले. ( Bombay Legislative Assembly Debates. Vol. I July-September 1937, pp. 1087-88 )

खोती पद्धत रत्नागिरी जिल्हा आणि कुलाबा व ठाणे जिल्ह्यातील काही भाग यांच्यात चालू आहे. खोताने कुळाकडून सारा वसूल करावयाचा व सरकारला ठरलेली रक्कम द्यावयाची. कुळाकडून वसूल करण्याची रक्कम खोताने ठरवावयाची असल्याने खोत कुळाकडून हवी तशी रक्कम जबरदस्तीने वसूल करतात. कुळांनी या पद्धतीविरूद्ध चळवळ चालविलेली आहे. तेव्हा खोतीपद्धत बंद करावी आणि सरकारने खोताला नुकसान भरपाई द्यावी आणि कुळांकडे जमिनी ठेवून त्यांना शेतीसाठी आर्थिक साह्य द्यावे, असा बाबासाहेबांच्या भाषणाचा सारांश होता.

या बिलाला श्री. एस. एल. करंदीकर (उत्तर रत्नागिरी) यांनी विरोध केला. सरकार लँड रेव्हेन्यूसंबंधी १९३८ च्या बैठकीत एक बिल आणणार आहे. तेव्हा खोतीसंबंधीचे प्रश्न त्यात येतीलच. तेव्हा आता डॉ. आंबेडकरांच्या बिलाची गरज नाही, असा श्री. करंदीकरांनी दावा मांडला. (पा. १०८८). या बिलावर

रावबहादूर जी. के. चितळे हे बोलावयास उठले. परंतु अध्यक्षांनी मध्येच प्रश्न काढला की, बिलावर जर जास्त सभासद बोलतील तर त्यांना डॉ. आंबेडकर उत्तर देतील. (पा. १०८८–८९). लगेच बाबासाहेब म्हणाले, सरकार जे बिल आणणार आहे त्यात खोतीपद्धती संबंधी मला हवी असलेली तरतूद दिसून आली अगर ती तरतूद माझ्या बिलातील तरतुदीपेक्षा उत्तम आहे असे दिसून आले तर मी माझे बिल त्यावेळी परत घेईन. आता ते या बैठकीत येऊ द्या. अध्यक्षांनी बिल मांडण्यास परवानगी दिली व बिल मांडण्यात आले. (१०८९)

याच बैठकीत ( १७ सप्टेंबर) बाबासाहेबांनी वतन कायदा दुरुस्त करणारे विधेयक ( A Bill to amend the Bombay Hereditary Offices Act III of 1874 ) मांडले आणि त्यावर भाषण केले. (पा. १०९१-९२). हेही भाषण सुमारे तीन मिनिटांचे होते. वतनदाराला आपली जमीन रयतवारी करण्याची इच्छा होईल तेव्हा त्याला तसे करण्याची मुभा असावी. काही वतनदारांना त्यांच्या कामाचा मोबदला पद्धतशीरपणे मिळत नाही. त्यासाठी एक कायमची पद्धत ठरविण्यात यावी, आणि वतनदारांची कामे ठरलेली नाहीत, ती ठरवून नक्की करावीत असे तीन उद्देश सदर विधेयकाचे होते. ते विधेयक मांडण्याची परवानगी मिळाली व ते मांडण्यात आले. (पा. १०९२)

लोकलबोर्डाच्या कारभारासंबंधीच्या कायद्यांत काही दुरुस्त्या करणारे विधेयक ( Bill No. I of 1938---A Bill to amend the Bombay Local Board Act 1923 ) मंत्री श्री. ल. मा. पाटील यांनी १८-१-३८ च्या बैठकीत मांडून त्यावर भाषण केले. ( Bombay Legislative Assembly Debates Vol. 2, January - February 1938, pp. 332-335 )

सरकारनियुक्त ( सभासद ) पद्धत बंद करणे, अल्पसंख्याकांसाठी भरपूर जागा देणे, स्वतंत्र मतदार संघाऐवजी संयुक्त मतदार संघ ठेवणे, वगैरे योजना सदर विधेयकात होत्या. स्वतंत्र मतदार संघ बंद करण्याच्या योजनेवर सर अलि महमद खान देहलवी ( सुरत व रांदेर शहरे ) यांनी टीका केली आणि मुसलमानांना लोकल बोर्डांत व इतरत्रही स्वतंत्र मतदारसंघ दिलेच पाहिजेत, असा आग्रह धरला. ( पा. ३२५–३२६ ) त्यानंतर बाबासाहेबांचे विधेयकावर भाषण झाले. ( पा. ३२६–२९ ) पुणे करारावर सही केलेली असल्यामुळे आपण जरी स्वतंत्र मतदार संघांच्या बाजूचे असलो तरी आता त्या संघाची लोकल

बोर्डात अस्पृश्यांसाठी तरतूद करणे जरूर आहे, असे आपणांला म्हणता येत नाही, असा प्रथम बाबासाहेबांनी खुलासा केला. संयुक्त मतदार संघ मुसलमानांना देऊन मुसलमान आणि हिंदू, यांच्यांत ऐक्य साधण्याच्या अनेक योजना आतापर्यंत ढास ळलेल्या आहेत, तेव्हा लोकल बोर्डात या योजनेचा काही उपयोग होणार नाही. हा सर्व दोष हिंदूचा आहे. यांनी मुसलमान व अस्पृश्य समाज यांच्यांशी वागताना नि:स्वार्थ व निरहंकाराने वागावे म्हणजे हिंदूमुसलमान व अस्पृश्य यांच्यात परस्परांबद्दल खरे हार्दिक प्रेम उत्पन्न होईल. या असल्या योजना म्हणजे दिशाभूल करण्याच्या युक्त्या होत.

कायदा करणे ही घटनात्मक बाब आहे. आणि या कायद्याने आपण सरकारला काही अधिकार देत आहोत. ते अधिकार देताना त्यांचा नामनिर्देश विधेयकात का करावा ? हे अधिकार देण्याचे कलम घालून प्रत्यक्ष अधिकार कोणकोणते त्याबद्दल सरकारी हुकूम काढता येतील. १९३५ चा कायदा या बाबतीत आदर्शवत आहे, त्याचा कित्ता मंत्र्यानी गिरविला असता तर ठीक झाले असते.

प्रत्येक अल्पसंख्यांक जातीला तिच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा देण्यात येतील, असे विधेयकाच्या उद्देशात म्हटलेले आहे. ही तरतूद महत्त्वाची असल्यामुळे तो एकाद्या कलमात समाविष्ट करणे जरूर आहे. मतदान पद्धतीबद्दल या विधेयकात काहीच उल्लेख नाही. बोर्डाच्या निवडणुकी क्युम्युलेटिव्ह की डिस्ट्रीब्युटिव्ह पद्धतीने व्हाव्यात, हे विधेयकात स्पष्ट केले पाहिजे, असा बाबासाहेबांच्या भाषणाचा सारांश होता. Prob tion of Offenders Bill यावर बाबासाहेबांनी २०–१–६८ ला भाषण करून बिलाला पाठिंबा दिला. ( पा. ४२५–२६ ) हे बिल इंग्लंडच्या कायद्याला पुढे धरून केलेले आहे. तथापि इंग्लंडच्या कायद्यात असलेल्या उणीवा आपल्या कायद्यांत आणू नयेत. सोळा वर्षांच्या खाली असलेल्या अपराध्यांच्या आईवडिलांना बाधक होईल अशी योजना या बिलात नसावी, असा बाबासाहेबांच्या भाषणाचा सारांश होता.

लोकल बोर्डाच्या कायदा दुरुस्तीला ज्या सभासदांच्या दुरुस्त्या आल्या होत्या, त्यांपैकी दोघांच्या दुरुस्यांवर २२–१–३८ ला चर्चा झाली. एकवीस वर्षे पूर्ण झालेल्या मुसलमानी मतदारांनी बहुमताने जाहीर केले की, मुसलमान मतदार संघ बंद करावा. तर सरकार त्यांच्या विनंतीचा स्वीकार करील, अशी तरतूद बिलात केलेली होती. ती नष्ट करावी, अशी दुरुस्ती श्री. जी. के. फडके आणि श्री. चंद्रीगर यांनी केलेली होती. फक्त फडक्यांची दुरुस्ती अध्यक्षांनी स्वीकारली आणि ती

बहुमतांनी नामंजूर झाली. ( पा. ४९९ – ५०१ ) या संबंधी बाबासाहेबांनी असं घटनात्मक प्रश्न उपस्थित केला की, श्री. फडके यांनी दुरुस्तीवर विरुद्ध मत दिलेले आहे. ते घटनेला धरून आहे काय ? यावर थोडीशी शाब्दिक चकमक झाली. शेवटी अध्यक्ष म्हणाले, माणसाचे मन शेवटच्या घटकेपर्यंत बदलते, असे कधी कधी होते. ( पा. ५०१ – २ )

याच बैठकीत (२२ जानेवारी) लोकल बोर्डाच्या संबंधीच्या विधेयकाचे कलमवार वाचन सुरू झाले. कलम दोन मध्ये "हरिजन" या शब्दाची व्याख्या दिलेली होती. हा शब्द व ही व्याख्या बिलातून काढून टाका, अशी श्री. भा. कृ. गायकवाड यांनी दुरुस्ती आणली. त्या दुरुस्तीवर चर्चा करण्याचे कारण नाही, असे मंत्र्यांनी मत देऊन दुरुस्तीला विरोध केला. दुरुस्ती बहुमताने नामंजूर झाली यानंतर बाबासाहेबांनी सरकारच्या या अरेरावी वागण्याबद्दल निषेधात्मक भाषण केले. श्री. खेर यांनी "हरिजन" शब्दाची पाठराखण करणारे भाषण केले. त्यांना बाबासाहेबांनी उत्तर दिले व ते सभागृह सोडून बाहेर गेले. त्यांचे अनुयायी ( स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद ) हे त्यांच्या मागे गेले. (पान. ५०८–१२)

